म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. नं.

from the Peshwa Daftar

# 36

# The First Maratha War

*Editor*—G. S. SARDESAI, B.A.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
क्र. ........ नं. ........
ता. ..........

*Government Central Press, Bombay*
*1934—Price Rs. 5 As. 5 or 8s. 9d.*

# Selections from the Peshwa Daftar

*(Available at the Government Book Depot, Bombay, and other prominent booksellers in Bombay and outside)*

### *Already Printed*

| No. of Volume. | Title of Volume. | Price. |
|---|---|---|
| No. 1. | Letters and Despatches relating to The Battle of Udgir, 1760 .. .. | As. 13 or 1s. 4d. |
| No. 2. | Letters and Despatches relating to The Battle of Panipat, 1747–1761 .. | Rs. 2-3-0 or 4s. |
| No. 3. | Shahu's Campaign against the Sidis of Janjira, 1733–1736 .. .. | Rs. 2-1-0 or 4s. |
| No. 4. | Reports about Anandibai, September 1786—October 1788 .. .. | Re. 1-0-0 or 1s. 8d. |
| No. 5. | The League of the Barbhais .. | Re. 1-0-0 or 1s. 8d. |
| No. 6. | Ramraja's Struggle for Power .. | Rs. 2-2-0 or 4s. |
| No. 7. | Early Activities of Shahu and Balaji Vishvanath, 1707–1720 .. .. | As. 8 or 10d. |
| No. 8. | Shahu in his Private Life .. .. | As. 9 or 11d. |
| No. 9. | Bajirao and his Family, 1720–1740 .. | As. 10 or 1s. 1d. |
| No. 10. | Early Strife between Bajirao and the Nizam .. .. .. | Re. 1-0-0 or 1s. 8d. |
| No. 11. | Shahu's relations with Sambhaji of Kolhapur .. .. .. | As. 10 or 1s. 1d. |
| No. 12. | The Dabhades and the Conquest of Gujarat .. .. .. | Re. 1-3-0 or 2s. |
| No. 13. | Bajirao's entry into Malwa and Bundelkhand .. .. .. | As. 10 or 1s. 1d. |
| No. 14. | Maratha Conquests in the North .. | As. 12 or 1s. 3d. |
| No. 15. | Bajirao's advance upon Delhi .. | Re. 1-3-0 or 2s. |
| No. 16. | The Bassein Campaign .. | Re. 1-8-0 or 2s. 6d. |
| No. 17. | Shahu and Bajirao—Administrative .. | Re. 1-9-0 or 2s. 9d. |
| No. 18. | Private Life of Shahu and the Peshwas.. | Re. 1-4-0 or 2s. 3d. |
| No. 19. | Peshwa Madhavrao at cross purposes with his uncle Raghunathrao .. | Re. 1-7-0 or 2s. 6d. |
| No. 20. | The Bhonsles of Nagpur (1717–1774) .. | Rs. 3-4-0 or 5s. 9d. |
| No. 21. | Balajirao Peshwa and Events in the North, 1741–1761 .. .. | Rs. 3-8-0 or 6s. |
| No. 22. | Extracts from the Peshwas' Diaries .. | Rs. 2-14-0 or 5s. 3d. |
| No. 23. | Balaji Bajirao—Administrative .. | Rs. 1-13-0 or 3s. 3d. |
| No. 24. | The Peshwas' Commitments on the West Coast .. .. | Rs. 4-2-0 or 7s. |
| No. 25. | Balaji Bajirao Peshwa and the Nizam (1740–1761) .. .. | Rs. 4-12-0 or 8s. |
| No. 26. | Tarabai and Sambhaji (1738–1761) .. | Rs. 3-10-0 or 6s. 3d. |
| No. 27. | Balajirao Peshwa and events in the North (1742–1761)—Supplementary .. | Rs. 5-8-0 or 9s. |

**_Already Printed_—contd.**

| No. of Volume. | Title of Volume. | Price. |
|---|---|---|
| No. 28. | Peshwa Balajirao—Karnatak Affairs (1740–1761) .. .. .. | Rs. 6-2-0 or 10s. |
| No. 29. | Affairs of Northern India—Peshwa Madhavrao I .. .. .. | Rs. 6-11-0 or 10s. 9d. |
| No. 30. | Miscellaneous Papers of Shahu and his first two Peshwas .. .. | Rs. 6-15-0 or 11s. 6d. |
| No. 31. | Papers selected from the Jamav Section .. .. .. | Rs. 2-15-0 or 5s. 3d. |
| No. 32. | The Private Life of the later Peshwas .. | Rs. 2-5-0 or 4s. 3d. |
| No. 33. | Shahu's Campaign against the Sidis of Janjira (1733–1736)—Supplementary .. | Rs. 5-14-0 or 9s. 9d. |
| No. 34. | The Bassein Campaign (1737–1739)—Supplementary .. .. | Rs. 2-8-0 or 4s. 6d. |
| No. 35. | The Capture of Salsette by the English, 29-12-1774 .. .. | Rs. 2-11-0 or 4s. 9d. |
| No. 36. | The First Maratha War (1774–1783) .. | Rs. 5-5-0 or 8s. 9d. |

***In the Press***

| | | |
|---|---|---|
| No. 37. | Karnatak Expeditions of Madhavrao I (1761–1772) .. .. .. | |
| No. 38. | Madhavrao Ballal and the Nizam (1761–1772) .. .. | |
| No. 39. | Administrative Papers of Madhavrao I (1761–1772) .. .. .. | |
| No. 40. | Miscellaneous Papers of Peshwa Balajirao .. .. .. | |
| „ 41. | The last days of the Maratha Raj (1779–1818) .. .. | |
| No. 42. | Papers referring to Pratapsinh, Raja of Satara .. .. .. | |
| No. 43. | Social Life under the Peshwas (1727–1797) .. .. | |
| No. 44. | Some Historical Families .. .. | |
| No. 45. | Documents illustrating Maratha Administration .. .. | |

***Printed***

| | | |
|---|---|---|
| 1. | Foreword to Selections from the Peshwa Daftar by Sir Jadunath Sarkar .. | Re. 0-2-0 or 3d. |
| 2. | Handbook to the Records in the Alienation Office, Poona .. .. | Re. 0-11-0 or 1s. 2d. |
| 3. | Indexes to Selections 1–25.. .. | Rs. 2-10-0 or 4s. 9d. |

## *Already Printed*—contd.

| No. of Volume. | Title of Volume. | Price. |
|---|---|---|
| No. 28. | Peshwa Balajirao—Karnatak Affairs (1740–1761) .. .. .. | Rs. 6-2-0 or 10s. |
| No. 29. | Affairs of Northern India—Peshwa Madhavrao I .. .. .. | Rs. 6-11-0 or 10s. 9d. |
| No. 30. | Miscellaneous Papers of Shahu and his first two Peshwas .. .. | Rs. 6-15-0 or 11s. 6d. |
| No. 31. | Papers selected from the Jamav Section .. .. .. | Rs. 2-15-0 or 5s. 3d. |
| No. 32. | The Private Life of the later Peshwas .. | Rs. 2-5-0 or 4s. 3d. |
| No. 33. | Shahu's Campaign against the Sidis of Janjira (1733–1736)—Supplementary .. | Rs. 5-14-0 or 9s. 9d. |
| No. 34. | The Bassein Campaign (1737–1739)—Supplementary .. .. | Rs. 2-8-0 or 4s. 6d. |
| No. 35. | The Capture of Salsette by the English, 29-12-1774 .. .. | Rs. 2-11-0 or 4s. 9d. |
| No. 36. | The First Maratha War (1774–1783) .. | Rs. 5-5-0 or 8s. 9d. |

## *In the Press*

| | | |
|---|---|---|
| No. 37. | Karnatak Expeditions of Madhavrao I (1761–1772) .. .. .. | |
| No. 38. | Madhavrao Ballal and the Nizam (1761–1772) .. .. | |
| No. 39. | Administrative Papers of Madhavrao I (1761–1772) .. .. .. | |
| No. 40. | Miscellaneous Papers of Peshwa Balajirao .. .. .. | |
| 41. | The last days of the Maratha Raj (1779–1818) .. .. | |
| No. 42. | Papers referring to Pratapsinh, Raja of Satara .. .. .. | |
| No. 43. | Social Life under the Peshwas (1727–1797) .. .. | |
| No. 44. | Some Historical Families .. .. | |
| No. 45. | Documents illustrating Maratha Administration .. .. | |

## *Printed*

| | | |
|---|---|---|
| 1. | Foreword to Selections from the Peshwa Daftar by Sir Jadunath Sarkar .. | Re. 0-2-0 or 3d. |
| 2. | Handbook to the Records in the Alienation Office, Poona .. .. | Re. 0-11-0 or 1s. 2d. |
| 3. | Indexes to Selections 1–25 .. .. | Rs. 2-10-0 or 4s. 9d. |

REFBK-0005115

No. 1] [3-11-1773

पो छ २९ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवसी

विनंती सेवक शंकराजी केशव सां नमस्कार विज्ञापना. ता छ १७ साबानपावेतो मुा पुणे येथे स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. जंजीरकर शामल सालमजकूरचे जमाबंदीची तक्षीम[1] गल्याची व नगदी सालच्या सालां आकरा महाल मुत्सील[2] (?) दुतर्फा, याची तक्षीम मागतो. सरकारतर्फेचे माहाल आहेत त्याची जमाबंदी आहे, तो जाजतीचा हिसा नगदी व गल्ला मागतो व गुदस्ताचा अठावीससे खंडी गल्ला बाकी आहे, तो सालमजकुरी सेवक[illegible]ास तो मागतो, व सालमजकूरचा जाजती आजमास गला अडीच हजार स्वकीये कु[illegible]गदी दाहा हजार रुपये त्याचे वाजवी निघतात, याप्रमाणे द्यावे ऐसा [illegible]गुदस्ता करार जाहाला आहे. याजकरितां तूर्त त्याणें कल्याणतर्फेचे माहालास व ताा नानेमावळ व ताा पौडखोरे व ताा पोनमावळ व ताा मुठेखोरे येथें येकदोन माणसे पाठऊन घरे व सेताची उडवी दर गावा एकदोन जाळतात, व गांव पाहोन चाळीस पनास रुो खंडणी घेतात, ते सरकारतर्फेस रयेत लोक देत नाही व मतगड किला व दोहो माहालची त्याची तक्षीम हे कलम त्याणें सरकारात अमानत दिल्हे ते व मागील तेविसा वर्षाची रुजुवाती बाकी मागतो, त्याबद्दल कल्याणतर्फेचे माहाल वगैरा सदरहू माहाल व दाभोळ व राजापूर सुभा येथें खंडणी घेतली. जंजीरकराच्या निरोपानें रयेत रुो देतात. न दिल्हे तरी माणसे मारील व घरे जाळील म्हणोन त्यास पैका दिल्हा. याचा बंदोबस्त सेवकानें करावा आणि जंजीरकर शामल याचे पारिपत्य करावे तरी साहित्य पोख्ते जाले पाहिजे. व सर्व तालुकदार येकचित्ते जाल्याने व सरंजाम भरपूर असलियाने पारिपत्य सहजच होऊन सरकारकाम ईश्वरी कृपेनें घडोन येईल. तूर्त चार हजार माणूस व तीस पसतीस गलबते ऐसी जंजिऱ्याभोवती ठाणी बसवावी आणि बंदोबस्त करावा व ठाणी बांधोन व नाकेबंदी करून त्याचा परास्त्रम[3] न होय आणि त्यांचे मुत्सील माहाल आहेत ते जप्तीखाली आणावे म्हणजे बंदोबस्त होईल. कैलासवासी रावसाहेबांनी तह केला त्याप्रमाणे तो मागतो व आलीकडे म[illegible]र अमानत सरकारांत दिल्हा तो व दिवे व श्रीवर्धन हे दोन्ही परग[illegible]आज्ञा जाहाली

---

१ वांटा, हिस्सा. २ ताब्यांतील किंवा [illegible] याचा वेढा बेदरच्या

तक्षीम तो मागतो. सारांश किले मतगड किला जबून[२] आहे व त्याचे तक्षिमेचे दोन माहाल निमे व गुदस्ताचा अठावीससे खंडी गला व सालमजकूरची अकरा माहाल मुत्सील दुतर्फा त्याची निमे तक्षीम तेहि तो मागतो. यांत तो काहीं वावगे बोलत नाहीं. याप्रमाणे त्याची विल्हे जालियास तो समजेल व तेविसा वर्षांच्ये रुजुवातीची बाकी त्याची तोडमोड लाखपनास हजारपावत जाली तरी त्याचा चरसा (?) करावा. याप्रमाणे सरकारांतून जाले तरी मग त्यासी बोलणे तरी बोलावे. जंजिरा येणे नाही. मसलत करावी तरी खाऱ्या पाण्यामुळें व मुंबईची खाडी व म्हसाळयाची खाडी व जंजिरे याच्या पाठीमागील दर्या याचा बंदोबस्त होणे नाही, हे समजोन पूर्वी कैलासवासी रावसाहेबी तह केला होता तेसमई मला सांगोन तह करविला. सर्व वर्तमान सविस्तर पहिल्यापासून विदित व्हावे म्हणोन लिहिले आहे. यासी आज्ञा होईल ते प्रमाण. सेवकास खावंदाकडील करार कळला नाहीं, तो त्यासी कोणे रीतीने बोलावे याची आज्ञा जाली पाहिजे. सिबंदी जदीदे[२] ठेवावी तरी सरकारात पैसा नाही व कामणचे किल्याचे लोक जमा... तरी भरती नेमस्त आहे व लोकांस पांचा रोजमरेतही येथाकाली प्राप्... लोक श्रमी. जबाब तो पावतच नाही ऐसा किले हायचा विचार आहे. स... येथार्थ विचार पाहोन लिहितो. विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav informs Raghunathrao of the Sidi's demand for a portion of the revenue of the eleven districts and urges that the claim be decided in consonance with the treaty negotiated with him by the Peshwa Madhavrao.*

---

*No. 2*] [*7-12-1773*

पा० छ २२ रमजान

## श्रीगजानन

सेवेसी सदासिव अनंत करमरकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. बुनग्यांत पथके नेमली आहेत त्यापैकी येथे आली नाहीत, पथके बितपसील आ :—

७९ मानाजी व फिरंगोजी काले
४६ मलोजी बढे
३३ निबाजी भोपते
३६ बलवंतराव व म्हालोजी सितोळे
२९ संताजी व जिवनाजी घाटगे.
———
२१९

3. Indexes ...

...वर खराब. २ नवी.

REFBK-0005115

येकून दोनसे पंधरा स्वार सडेस्वारीत गेले आहेत. त्यास ताकीद होऊन येथे येत ते केले पाहिजे. रवाना छ २२ रमजान. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Anant reports that some 215 Sowars have not returned from the camp and begs that orders should be issued for their immediate return.*

---

*No. 3*] [*13-12-1773*

पौ छ २८ रमजान

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य**

**राजश्री सदासिवपंत दाजी स्वामीचे सेवेसी**

सेवक धोंडो माहादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत असिले पो विशेष. राजश्री त्रिंबकरावमामा यांचा मुकाम गोलगाव गदाण्यास आजचा जाहाला. आपणहि उदईक बुणगे घेऊन जाणार म्हणोन आइकतो. कदाचित आपला मुकाम येथे जाहाला तरी कही घाटावरी पाठवावी. इकडे उपद्रव बहुत लागला आहे. बहुत काये लिा लोभ कीजे हे विनंती.

¶*Dhondo Mahadev informs Sadashivpant that Trimbakrao Mama has **halted** that day at Golgaon in his campaign against Raghunathrao.*

---

*No. 4*] [*14-12-1773*

पो छ. ७ सवाल पौषमास

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**

**सदासिवपंत करमरकर स्वामीचे शेवेसी**

पोष्य बालाजी जनार्दन सां नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिो विशेष. राजश्री त्रिंबकरावमामा यांचे स्वारीबराबर तुम्ही आहा. इतके दिवसात येकादे तरी पत्र पाठवावे होतें ते काहीच [illegible] नाहीं. हाली पत्र लिहिले असे. तरी सविस्तर बारीक मोठे [illegible] आज्ञा जाहाली जावे. तुमची पत्रें आजताा च्यार पांच यावी [illegible] याचा वेढा बेदरच्या

5945

वाटलें. याउपर तरी वर(चे)वर लिहीत जावें. मामांची मर्जी राखीत जावी. बहुत काय लिहिणे. लोभ असों दीजे हे विनंती. शा छ २९ रमजान मुा मेणवली हे विनंती.

जनार्दन राम यास नमस्कार सांगावे

¶*Nana Fadnis takes Sadashivpant Karmarker to task for not sending frequent communications from the camp of Trimbakrao whom he is accompanying.*

---

*No. 5*] [*22-12-1773*

**श्री.**

**पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब**
**स्वामीचे सेवेसीं**

विज्ञापना. स्वामीचें आज्ञापत्र आल्याअगोधर नवाबाचेथें बातमी आली, कीं भोंसल्याकडील भेटीचा संदर्भ लागला. येंका दो दिवसांत भेटी होणार. त्याजवरून नवाब व रुकनुदौला व सर्वांस संशय आला, कीं श्रीमंताची आमची ऐक्यता काय जाली? आम्ही मोठ्या मोठ्या मजली करीत श्रीमंताचे म्हटल्याप्रमाणें आलों असें असतां, आम्हीं पावल्यापूर्वींच श्रीमंतानी भोंसल्याचा तह केला हे काय? या संशयांत पडले होते तों इतक्यांत कासदासमागमें नवाबास सर्वांस पत्रें आलीं व मजला आज्ञापत्र आलें त्याजवरून याची खातरजमा केली व जाली. नवाबाच्या येण्यांत गुंता नाहीं. नवाबहि मोठ्यामोठ्या मजली करितात. [1]छे ७ रोजीं बारा कोस आले व आजहि बारा कोसांची मजल करावी असें ठरलें होतें; परंतु मार्गीं पाणी नाहीं याजकरितां आज हलकी मजल करितील. उद्यां मोठी मजल करितील. स्वामीनी आज्ञा लिहिली कीं नवाबास त्वरेनें घेऊन येणें. त्यास नवाब दरमजल कोठें मुकाम न करितां येतात. नवाबाचे व सर्वांचे चित्तांत स्वामीचे तर्फेनें कोणे गोष्टीचा संशय नाहीं. स्वामीचे वचनाकरितां व मर्जीकरितां सरदाराच्या प्रतीक्षा न करितां, जितकी फौज जमा जाली तितक्यानसीच येतात. वरकडचा कोणे गोष्टीनें गुंता नाहीं. नवाब येतच आहेत. भेटीहि सत्वरीच होतील. हे विज्ञापना.

¶*Dadasaheb is informed of Nizam Ali proceeding to his assistance with*

3. Indexes ...rches.

---

१ सवाल.

No. 6] [27-12-1772

पौ छ १३ सवाल सुा सलास
सबैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना
फडनीवीस स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जानराव धुलप मुा जंजिरे विजयदुर्ग कृतानेक दंडवत् विज्ञापना. ताा छ २ माहे सवालपर्यंत वर्तमान यथास्थित आहे. विशेष. अरमार तयार करून वसईच्या बारियावर रवाना करावें म्हणोन आज्ञा होती. त्याजवरून अरमार वसईस राा केले आहे. वसईहून दोनसे खंडी भात अडिसेरीस व सालाबादप्रों तीनसे सोटे देविले आहेत. ते सहजामध्यें नोर पडल्यावाचून अरमारावरून येते. परंतु वसईचे मामल्याचे वालमेलीमुलें दिकत पडेल यास्तव सेवेसी लिहिले आहे. तरी दोनसे खंडी भात व तीनसें सोटे देणे म्हणोन वसईस सनद द्यावयाची आज्ञा करावी व यंदा हेट स्वारीस अरमार जाऊं नये. विजयदुर्गापासून सुर्तेपर्यंत छबिना करावा म्हणौन आज्ञा होती. परंतु सतावीस हजार रुपये बेहेडयास पैदास्त नेमून दिल्ही आहे. ऐशास पैदास्तिच्या यत्नास हेट स्वारीस भारी अरमारचा भरणा गेल्यावाचून पैदास्त होणार नाही. तशामध्यें फिरंगी टोपीकर सख्त गनीम, दर्यांत गुदस्तापासून दाव्याखाली पडला आहे. तेव्हां भारी सरंजामावाचून जाता न ये, व येविसीं पेशजी आज्ञा जाहाली होती. पैदास्ती थैवज लाऊन दिल्यामुलें लोकाचा गवगवा होईल. पैदास्त सत्तावीस हजार रुपयाचा मामलतीस तोटा यास्तव लिहिले आहे. तरी मर्जीस येईल त्याप्रों स्वारीची आज्ञा करावी, किंवा सतावीस हजार रुपये दुसरीकडून नेमून द्यावयाची आज्ञा करावी. अरमारचे कामकाजाविसीं राजश्री वासुदेव गोविंद मराठे तेथे आहेत ते विनंती करितील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janrao Dhulap sends his fleet to Bassein as instructed by Nana Fadnis whom he requests to make provision for the supply of the necessaries for the fleet.*

---

No. 7] [End of 1773 ?

श्री

पुा श्रीमंताचे शेवेसी

विज्ञापना. नवाब व सर्व लाहाण मोठे नित्यशा विचार घा... आज्ञा जाहाली श्रीमंतासी बिघाड करावा किंवा सख्यच राखावें, हा मा... याचा वेढा बेदरच्या

होता, त्याजवरून विदित जाहाले असेल. समसामुदौला व मा। कबीरखां, पातशाही बक्षी व गुलाम सैदखां व रुकनुदौला व मा। गौसखां इतक्यांस नवाबानी येकांती बोलाऊन पुसिलें व देवराज हरकाऱ्याचे दरोगे यांसीहि बोलाऊन सर्वांस पुसिलें कीं, श्रीमंतासी विघाड करावा कीं सख्य राखावे ये गोष्टीचा पुर्ता मनसवा आपले जागा करून सांगा, त्याप्रो। कर्तव्य ते करूं, याप्रो। नवाबानी सर्वांस पुसिले. त्यास रुकनुदौला प्रामाणिक माणूस व दुरंदेस. त्याचे मनात हाच भाव कीं स्वामीसी सहसा बिघाड न करावा. स्वामींचे नवाबाचे समाधान आंत:करण-पूर्वक व्हावे, आपल्या कारभारास शोभा यावी; नवाबाचे स्वामीचें समाधान उतम प्रकारे जाले म्हणजे दोन्ही सरदाऱ्या आराम पावतील, व मुल्क आबाद होईल. आपलाली कामे समयाचे समयासी करावयासी सुचतील. याप्रो। रुकनुदौलाचें मानस. याअन्वये पूर्वी विनंती लिहिली होती व रुकनुदोलाची पत्रे शेवेसी पाठविली होतीं त्याजवरून विदित जाहाले असेल. सारांश रुकनुदौला निर्मल आंत:करणे आहेत. परंतु नवाबाजवल व सर्वाजवल रुकनुदौलास साफ बोलता येत नाही की आमकेच करावे. पाच सात जण मिलतात, तेव्हा नवाबाचे व सर्वांचे भावाप्रो। बोलले पा। आंतस्ते नवाबास उचित तेच सांगतात व स्वामीसी बिघाड करून नये, सख्य करावें असेच बोलतात. ज्यापक्षी स्वामीकडील सख्य येथास्थित न होयेच, तेव्हा पुढे उचित जाणावे ते करावें, असे प्रकारे नवाबास समजावितात. समसामुदौला व मा। कबीरखां या उभैतानी नवाबास व रुकनुदौलास सांगितले की, आपण व श्रीमंतानी आपलाले जागा समजोन ज्यात आकृत्रिम स्नेह होये ते करावे. आपण श्रीमंतासी बिघाड करून हैदरनायेकाची कुमक करितील, तरी ही गोष्ट उचित नाहीं. हैदरनायेकाकडून आपणास नफा काये? तेव्हा गुलाम सैदखान (अपूर्ण).

¶*It is doubtful, in the absence of the date, to determine to which campaign this letter refers. The writer informs Dadasaheb from the Nizam's Camp of the vacillating mind of the Nizam as to which side he should support.*

---

*No. 8**] *[1766*

**श्री**

**पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब**
**स्वामीचे शेवेसी**

विज्ञापना. भोंसल्यांकडून भवानीपंत आले आहेत ते जाबसाल काहीं ठीक करीत नाहींत. नवाबानी भोंसल्याचे मुलुकांत जावें अथवा बिघाड करावा तरी ...र्गी राहात नाहीं; याजकरितां सर्व गोष्टी स्वामीचें वचनावर ठेविल्या.

3. Indexes i...

*...te of letter No. 8 see Nos. 160-165 of Selection 38.

भोंसल्यांकडून नवाबास कांहीं प्राप्त जालें नाहीं. कितेक बाबती भोंसल्याकडे नवाबाच्या वाजबी होत्या त्याहि स्वामीचे मर्जीकरितां येकीकडे ठेविल्या. भोंसले स्वामीकडून फिरून आले; त्यास भोंसल्यांचा मनोदय कीं नवाबास भेटावें, सफाई करावी, असें इसमाइलखानाचे मारफातीनें घाटीत आहेत. त्यास मी रुकनुदौलास व राजश्री जगंनाथपंतास सांगितलें कीं तुम्ही इसमाईलखानाचे म्हटल्यावर भोंसल्यांशीं सफाई कराल तरी अथवा भेट घ्याल तरी श्रीमंताची मर्जी राहणार नाहीं. जर भोंसल्यांसी भेटणेंच आहे तरी अगोदर श्रीमंतास इतिल्ला द्यावी, मग भेटावें. त्याजवरून म्हणों लागलें कीं भोंसल्याची भेट घेत नाहीं. इतक्यावर कोणता प्रकार घडतो तो वरचेवर सेवेसी लिहिण्यांत येईल. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Dadasaheb is informed of negotiations going on between the Bhonsles and the Nizam. "Rüknudcula has promised not to carry on the negotiations if he thereby incurs Raghoba's displeasure," says the writer.*

---

*No. 9*]* [*1766*

श्री

विज्ञापना. भोंसल्याकडील गृहस्थांनीं यांजला सांगतां हेंहि सांगितलें आहे कीं श्रीमत काबूवर नजर ठेवीत आहेत, तुम्हास जलदीनें बोलाविलें आहे. तुम्ही लवकर न जाल, महिना पंधरा दिवस अधिक आगळे लागले, श्रीमंत व भोंसले युध्ये करोन अथवा सरव्ये करोन समजतील; मग तुम्ही याल तर श्रीमंत तुम्हास उत्तर देतील कीं तुम्ही जलदी न आलेत, आम्ही कोठवर वाट पाहावी? जरूर जाणून कोणीही प्रकार केला तेव्हां तुम्हांस भारी जाईल. भोसले उलटे तुमचे शत्रू होतील. मग म्हणाल कीं भोंसल्यांनी आम्हाशीं सख्य करावें, तर कदापि होणार नाहीं. येणेंप्रमाणें गृहस्थ यांजला पेंचदरपेंच समजावीत आहेत; निदानीं पाहावें काय जाबसाल होतो; परंतु रुकनुदौला जगंनाथपंताचा रोख त्याजकडे फार करून दिसत नाहीं. राजकारणाचे रीतीनें लाऊन ठेवितील तर ठेवोत. हे विज्ञापना. कच्चेंपक्कें वर्तमान सेवेसी श्रुत व्हावें म्हणून विनंती लिहिली असें. हे विज्ञापना.

¶*The writer discusses the attitude of the Bhonsles if negotiations [are] carried on with the Nizam.*

आज्ञा जाहाली

याचा वेढा बेदरच्या

* For determining date of letter No. 9 see Nos. 16[illegible]

No. 10] [December 1773 ?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक नागो सिवदेव साष्टांग नमस्कार विनंति. येथील क्षेम कुशल. स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. पूर्वी विनंतिपत्रें सेवेसीं लिहिली होतीं तीं पावलींच असतलि. आम्ही श्रीयात्रेनिमित्य आलों होतों. आतां श्रीराम क्षेत्रीं आहोत. पूर्वापासून स्वामीच्या आनाचे आहोत. राजश्री सेनासाहेब सुभा याचें वर्तमान तरी आपलीं पत्रें यांस येतात कीं, फौजेसुधां सत्वर यावें. त्यासी यानी आपले तर्फेचे गणेशपंत व सरकारचे नीलकंठ गोपाल सेवेसी पाठविले आहेत कीं फौजेचें खर्चाची बेगमी व दिल्हे मुलकाची बंदोबस्ती वगैरे काजकामें मुद्यानरूप होतील तर सेवेसीं येऊं. प्रस्तुत वराड प्रांतीं दोन महिने आहेत. यानी मोंगलासी सख्ये करून आहेत. स्वामीकडील जबरदस्ती पाहिलियावर हे पूर्ववत-प्रमाणें मोगलाकडे जाणार. धातुपोशणास्तव येथून पत्रें लिहितात सेवेसीं येतो. परंतु चित्तांत यावयाचा नाहीं. स्वामीच्या उत्कर्शास साहत नाहीं. तेथून राजश्री रामाजी बलाल करनाटक प्रांतीचे व हिंदुस्थान प्रांतीचें वगैरे कितेक बारीक मोठें वर्तमान लिहितात, त्याजवरून याच्या ध्यानास येत नाहीं. सेवेसीं श्रुत होये बहुत काय लिहिणे कृपा लोभ असों दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Nago Sivdeo to Dadasheb, informing him of the Bhonsle being in league with the Nizam and that he does not wish to help the addressee though he may profess to do so outwardly.*

---

No. 11] [12-1-1774

पो छे + ८ जिलकाद
आर्बा

श्री

सेवेसीं विज्ञापना. तागायत छ २८ सवालपावेतो मुकाम मौजे देवठाणे परगणे बाम्हणी नजिक लोणार येथें स्वामीचे कृपाकटाक्षें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान छ २९ सवालीं जासूद ...ण्यास गेले त्याजबरोबर पाठवावयाकारितां पत्र लिहून ठेविलें होतं त्यास जासूद
3. Indexes ले. पत्र आम्हांजवली राहिलें. त्या आलीकडील वर्तमान तरी मौजे

+ पो नानाच्या हातची.

मुसलबीड परगणे मलकापूर पागेर येथील देशमुख मवासगिरी या प्रांतीं बहुत करीत होता, सबब मौजे मजकूर हें ठाणें तोफा लाऊन घेऊन परगणे मलकापूर पागेर जागीर मोगलाई सबब सरकारांत जफ्त करून राजश्री खंडेराव त्रिंबक पैठणकर यास जफ्ती सांगितली आहे. कलावें. दुसरीं वर्तमाने तरी

राजश्री रघोजी भोसले मुधोजी भोसले सेनाधुरंधर यांचे पुत्र व दर्याबाई याणी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा निरोप घेऊन वराडात नागपूर प्रांतीं जात आहेत. त्यास श्रीमंतानी राजश्री मामास लिहिलें कीं राजश्री साबाजी भोसले याची व दयाबाई व रघोजी भोसले याची भेट करून देणे म्हणजे साबाजी भोसले यांचे कबिले वगैरे वस्तवानी वराडांत आहेत, त्यास लढा पडणार नाहीं असें लिहिलें. त्यास दर्याबाई व रघोजी भोसले फौजसुधां धारूरचे सुमारें आलीं आहेत. त्याजकडे येथून कारकून तिलगूल देऊन पाठविला आहे, परंतु त्याचा खुलासा कसकसा आहे तो शोध लागला पाहिजे याजकरितां पाठविला आहे, कलावें कलम

१

मी स्वामीकडे पत्र पाठवितों त्याचें उत्तर पाठवावयासी आज्ञा जाली पाहिजे.

राजश्री सुमेरसिंग व महमद इसब गाडदी यांजबरोबर च्यार तोफा व पांचसे स्वार व दीड हजार गाडदी याप्रमाणें श्रीमंतानी मामाकडे रवाना केले ते आठदाहा दिवस होते. त्यास कसबे सिवणे व कसबे धावडे हीं दोन्ही ठाणी सरकारांत घेतलीं. त्यापैकीं सिवण्याचे ठाण्यांत फैजुलाखान ठाणेदार होता तो महमद इसब याचे वोलखीचा औरंगाबादेचा राहणार त्याविसी महमद इसब रदबदल करीत होता, ते समई कांहीं गोष्टीवरून उगी तूट खाऊन गाडदी व स्वार व सुमेरसिंग मिलोन यास न पुसतां उठोन श्रीमंताकडे गेले. येक दोन कारकून माघारे फिरोन आणावयासी पाठविले होते, परंतु आले नाहींत. कलावे. तोफा च्यार तोफखान्याकडील होत्या त्या मात्र येथें ठेऊन घेतल्या आहेत. गाडदी आगदींच नाहींत.

येणेप्रमाणें वर्तमान निवेदन व्हावें म्हणोन सेवेसीं लिहिलें असे. श्रृत होय हे विज्ञापना.

¶*The writer gives news about the village Beed being attacked on account of the rising of the Deshmukh there. He also mentions the interview arran... by Trimbakrao Mama at Raghunathrao's direction between Sabai... and Raghuji and Daryabai. The writer further reports th... has asked Sumersing and Muhammad Isaf to attack tw...*

आज्ञा जाहाली

याचा वेढा बेदरच्या

No. 12] [29-1-1774

**श्री**

वेदशास्त्रसंपन्न राजश्री शिवभट खरे यांसी

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्हीं पत्र पाठविले ते पावले. नवऱ्या-मुली पाहिल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास लग्न करावयाचा निश्चयच आहे ऐसे नाहीं. समक्ष मुली पाहिल्यानंतर विचारेकरून मर्जीस आल्यास निश्चय होईल. सविस्तर जनार्दन मुकुंद काळा व पांडू जेठी याचे जबानीवरून कळेल. जाणिजे छ १६ जिलकाद सुाा आर्बा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao to Shivbhat Khare, asking the latter to keep marriageable girls ready for inspection.*

---

No. 13] [January 1774

**श्री**

शेवेसी विज्ञापना. लस्करचे वर्तमान पुणियांत सावकारी आले ते कसकसे ते लिहून पाठवणे म्हणोन राा रंगोपंताबरोबर आज्ञा रुबरू आली. त्यास कागद कोणे सावकाराचे किती दिवसाचे आले हे काही पता लागत नाहीं. परंतु वर्तमान बहुत लोक बोलतात त्याचा बयाज श्रीमंत श्रीकार्तिकस्वामीचे दर्शनास गेले होते, तेथे सुचे जाले, त्यावरून पाचसाहा हजार फौज समागमे होतीच तीसहवर्तमान घेऊन पलोन मुरारराव घोरपडे याजकडील गुती किला आहे त्यांत गेले. लस्करात श्रीमंत सौ. मातुश्रीबाई व चिरंजीव आहेत. त्यांचे डेऱ्यासभोवती गाडद्यानी चौकी बिकट बसऊन बंदोबस्तीने आहेत. या प्राा मजकूर दाट बोलतात. कागदाचा शोध बहुत सावकाराकडे केला परंतु लागत नाही. जे वर्तमान बाजारात उघड बोलतात त्याप्राा सेवेसी विदित व्हावे यास्तव लिहिले आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राा छ १ जिल्हेज हे विज्ञापना.

3. Index

*writer reports that Raghoba, getting information of the intention ... to capture him, sought refuge in the fort of Gooty with his*

No. 14] [8-2-1774

पो छ २ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
शेवेसी

पोष्य नारो शंकर कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ २६ जिलकाद पर्यंत आपले कृपेकरून येथास्थित असे विशेष. कृपा करून पत्र पाठविले ते पावोन संतोष जाहाला. पत्री लेखन केले कीं ज्याचे पदरीं पूर्वापार कालक्षेप केला त्यांजवर अतिशये जाल्या सर्वत्र येकचितें होऊन त्यांच्या पायासीं निष्ठा धरून हा प्रकार केला. पुढें तुम्हींहि लौकर यावें. यैसियांस याप्रसंगी आम्हीं यावयास सिध्धच. परंतु शरीरवेथेचा प्रकार विलग जाणोन हे पत्र शेवेशी पाठविले आहें. आम्हीं सर्व प्रकारे आपल्या वेगले नाही. चिरंजीव फौजसुध्धां राजश्री त्रिंबकराव यांजपासी त्यांचे आज्ञेत आहेत. आपलें पत्र आल्यावर आन्वये त्यांजकडे लेहून पाठविले आहे. आमचा निजध्यास सर्व स्वामीचरणी आहे. आपले विरहित नाही. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Shankar while expressing himself in favour of the League regrets that his failing health deters him from actively participating. He has however deputed his son to accompany Trimbakrao with his contingent.*

---

No. 15] [9-2-1774

पो फाल्गुन शुा १० मुा पुरंधर.

श्री

तीर्थस्वरूप राजश्री तात्या
वडिलांचे शेवेसी

आपत्ये गोपालाचे सां ना विा ता माव वा च्यतुर्दसी बुधवारपर्यंत मुा ठाणे लातूर वडिलाचे आसीर्वादेकरून सुखरूप असो विशेष. सांप्रत वडिलाकडून आसीर्वादपत्र येऊन साभाल होत नाही, याकरितां स्वार पा आहेत. तर आसीर्वादपत्री सविस्तर ल्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. हिकडील वर्तमान तर श्रीमंत दादासा याचा वेढा बेदरच्या

किल्यास बसला. ते समई आत नबाबाजवल रा माहाराव जसवंत निंबालकर होते, त्याजकडे येथील सिलेदार व घोरपडे याची पागा चाकरीस जाईल म्हणून राउलाकडील ऐवज व विष्णुपंताकडील ऐवज घेतला तो, ऐसा घोरपड्याचे नेमणुकी प्रा पागेची व सिलेदाराची समजाविसी करून लोक रा मालोजी घोरपडे याजकडे सैन्यात रा केले. ते लोक त्याणी माहाराजाकडे रवाना न करिता आपणाजवल ठेऊन घेतले. पुढे नबाबाचा व श्रीमंताचा सला जाला ते समई माहाराव श्रीमंताचे भेटीस आले, हे त्याजकडे ते याजकडे जाऊ येऊ लागले. तेव्हा रा मालोजी घोरपडे यानी माहारायाकडे जाऊन त्यासी समाधानाच्या रीतीने च्यार गोष्टी सांगोन तेव्हा तरी लोक चाकरीस द्यावे ते न केले. म्हणो लागले जे माझा लेक केदारजी घोरपडा मृत्य पावला, त्याणी माझे डेऱ्यास येऊन समजाविसी करावी. ही आलाड (आकड?) धरून त्याजकडे जाऊन बंदोबस्त केला नाही. श्रीमंताचे कूच होऊन कर्नाटक प्रांते चालिले, ते समई मालोजी बावानी लोक आपणाजवलून माहारायाकडे रवाना केले. तेव्हा माहाराव लोकास आपल्या गोटात उतरू न देणे, म्हणो लागला जे, सारा प्रसंग उरकलियावर आता चाकरीस आला तेव्हा चाकरी कोणे ठिकाणीं करितों? मग लोकास आपले गोटातून लाऊन दिल्हे. तेव्हा लोक रा धोंडो राम यांजकडे गेले. त्यांस मार सांगितला. त्याणे आपल्याजवळ ठेऊन घेतले जे, माहारायास सांगून तुमचा बंदोबस्त करून देतो. या प्रा बोलून लोकास आपल्याजवल ठेविले. हे तावार वर्तमान आम्हास कलले जे, माहाराव लोकापासून चाकरी घेत नाही आणि लातूर त्याजकडे सरंजामासहि ठेवीत नाही, तेव्हा सीतारामपंत म्हणून घोरपडेयाकडील कारकून होते त्यास मालोजीबावाकडे पा जे बंदोबस्त करणे. तेथे गोविंद खिजमतराव आहेत आणि श्रीमंत आहेत, कलेल त्या रीतीने बंदोबस्त करणे. त्याणी अमलात न आणिता कारकुनास सांगितले जे तुम्ही जाणे, बंदोबस्त करून घेऊन मागून पाठवितो. त्यावर कारकून निघोन नवाबाच्या लस्करात धोंडोरामाकडे आले. हे वर्तमान माहारायास कलले जे, घोरपडे याकडून कारकून धोंडोरामाकडे आला, तेव्हा माहारायास आगोधर नवाबाचा निरोप जाहालाच होता. मग धोंडोरामाकडे न येता परभारा उठोन परांड्यास आला आणि पेसजी केदारजी घोरपड्यास जमीदारानी मूठ मारून मारिला त्यास पत्रे पा जे तुम्ही पो मारी दंगा करणे. त्यावरोन त्याणी बखेड्याचा प्रसंग योजिला, तों रा गोपालराव केशव निा कवडे हे फौज दीड हजार घेऊन आपला आमल वसूल करावयासी बालेघाट प्रांते आले. त्यास सदरहू जमीदार भेटून

काहीं आंतस्त कबूल करून गावखेड्यास उपद्रव करावा ऐसे ठीक केले. हे वर्तमान आम्हास कललियावर येथून आम्हीं कारकून पाठविला जे, मामलत तात्याची, त्याचा तुमचा स्नेह, बखेडा असल्यास सुरलीत करावे आणि तुम्ही जमीदारास हाताखाले घेतले याचा अर्थ काये? तेव्हा त्याणी अंतस्तावर दृष्ट देऊन जमीदाराचे ऐकून पो मजकुरी आले आणि तमाम पाटील धरून नेले आणि दोन गाव झाडून लुटले. घरे देखील जालली. ठाण्यांत प्यादे व कारकून आमचे होते त्यांची हत्यारे घेऊन कारकुनाची आबरू घेतली. आतील वाडा होता तो पाडून टाकिला. या प्रा त्याणी साहित्य केले. सांप्रत ते रा त्रिंबकराव मामा व साबाजीबावा भोसले नजीक बीड संगम दुधनापूर्णा येथे गेले. सांप्रत काली रा भिवराव मंत्री व सुलतानजी निंबालकर व गोपालराव नलेगावकर ऐसे दोन हजार मिलोन दंगा मांडला. आमचे स्वार माहारायाकडे चाकरीस गेले होते ते धोंडो रामाजवल होते त्यास पत्रे पाठऊन आणिले. आणिखी तीनच्यारसे स्वार व आठ नऊसे प्यादा चाकरीस ठेऊन. नित्य जुजे होतात. त्याणी पो मारी दोन च्यार ठाणी बसविली होती ती आम्ही उठऊन आपली बसविली. आम्हाकडील दाहा-पंधरा ठार जाहाले. त्याजकडील दाहावीस ठार जाहाले परिछिन्न ठाणे सोडा म्हणोन म्हणतात. कसबा अफाट, रखवालीचे संकट पडतात. मालोजीबावास दोनच्यार पत्रे पो जे ठाणे द्यावे की काये? त्यास त्याचे उतर येत नाही. येथे तो निकड. भोजनास फुरसत नाही. पुढे परिणाम कोणता? च्यार रुा वसूल केले ते सिबंदीच्या भरीस पडले. या प्रा घोरपड्याचा बंदोबस्त आणि कारभार येविसी पेसजीच विनंति केली होती जे, घोरपड्याचा कारभार शाषवती नव्हे. सांप्रत येऊन जिवावर गुजरली आहे, याउपरी काही वडिलीच बंदोबस्त केला तरीच बरी गत आहे. नाही तर जीव जगणे संकट आहे. घोरपड्याकडील तो बंदोबस्ताचा प्रकार समजोन गेला. त्यास कागद लिहून कंटाला आला, परंतु काही सोये दिसत नाही पत्र वाचून बंदोबस्त जाहालिया लिा पाठवावे. जाहानलीया(?) ठाणे देणे म्हा लिा पाठवावे. दम धरवत नाही. बहुत काय लिा सो श्रुत हो हे विा.

¶*Gopal writes to Haripant Tatya, narrating a detailed account of the disturbed condition of affairs. He says that a contingent was lent to Maharao Nimbalkar when Raghunathrao laid siege to Bedar and that Nimbalkar refused to entertain the men into service and give them their wages after peace was declared with Raghunathrao. The affair was somehow settled by the intercession of the Nizam. The writer refers to a rising of Nimbalkar and to its being quelled by Trimbakrao Mama and Sabaji Bhonsle.*

5947

No: 16] [9-2-1774

पो छ १२ जिल्हेज

## श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
सखारामपंत बापू स्वामीचे सेवेसी

पो। त्रिंबकराव विस्वनाथ सां। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. आम्हासमागमे फौज आहे, त्यास खर्चास पाहिजे; यास्तव येथून राजश्री राघोपंत आइतोले यास पथकसुधा आपणाकडे पाठविले आहेत. तरी याजबरोबर यैवज तूर्त तर भरणा रुपये ३००००० तीन लक्ष रुपये पाठवा. पुढे आणखी यैवज लागेल. लोकाची सोये मागे काहीच जाली नाही. आम्हीं हरतरेन रो।+ मात्र युक्तीने पुण्याहून पनास हजार मागे आले त्यासुधा आजपर्यंत चालविला. पुढे रो। चाल्हन नालबंदी लोकास दिल्ही पा। रा। साबाजी भोसले केवल खाली, त्यांचा खर्च चालविला पा। याउपर देऊनहि आर्जव सर्वांचे करून हे मसलतीचे दिवस निभावले पा।; व काही फौजहि नवी ठेविली पा। प्राप्त जाला प्रकार आकाश कवळून जसा सेवटास जाईल तसा कडेस लावावा, तरच सर्वांची आबरू; नाही तर कलतच आहे. राजश्रीचा बंदोबस्त किला सातारा वगैरे किलेसुधा उतम व्हावा. वरकड किल्यास घाटावर व कोकणात सावधता व्हावी. आशेर दौलताबाद नगर हे इकडे; त्यांत वरकड स्थलांचे संकट नाहीं. आपली पत्रे गेली असतील. आम्हीहि पा। आशेर बराणपुर नारो कृष्ण दर्वे याजकडे, तेवढें संकट. त्यास जैनाबादेस रा। त्रिंबकराव सिवदेव खासाच आहेत. त्यास आम्ही लिहून, बराणपूर हस्तगत करून, बंदोबस्त करा ऐसे लि। आहे. आशेर पाहाडी तेथे उपाये चालणार नाहीं. पुढें होईल ते खरे. कलावे या करिता लि। असे. रा। छ २७ माहे जिलकाद बहुत काये लि। हे विनंती.

¶*Trimbak Vishvanath writes to Sakharam Bapu, requesting funds for paying his forces and recommending vigilance in guarding the forts of Satara, Burhanpur, Ashirgad and Nagar.*

---

\+ रोजमरा.

No. 17] [12-2-1774

पौ छ १९ जिल्हेज.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बापू स्वामींचे सेवेसी

सेवक कृष्णराव नारायेण कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल फालगुन शुध २ म(द)वासर मु॥ नजीक का॥ वरवाल पा॥ मा॥र जाणौन स्वकीये कुशललेखन करीत आसिले पाहिजे विशेष. राजश्री त्रिंबकराव मामा व राजश्री साबाजी भोसले सेनासाहेब सुभा व मातुश्री दर्याबाई फौजसह नजीक नांदेड येथून सौम्यवासरी कूच करून खंदार नजीक ,मुकाम जाहाला. मजल भारी जाहाली (म्हणून) तोफखाना मागे राहिला. याजकरिता गुरुवारी मुकाम जाहाला. काल भृगुवारी कूच होऊन मुकाम मजकुरी आलो. हेहि मजल भारीच जाहाली. तोफखाना आला नाही. याजकरिता आज मुकाम जाहाला. उदईक कूच करून तुळजापुरच्या रोखे येत आहेत. वरकड वर्तमान तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री बाबूराव वैद्य यांस लिहिले आहे ते निवेदन करितील. बहुत काय लिंहिणे लोभ करीत जावे हे विनती.

¶*Krishnarao Narayan reports the arrival of the Bhonsles and Trimbakrao Mama at Varwal. The writer's father Nana Joshi, of the Baramati family, was with the Barbhais.*

---

No. 18] [13-2-1774

पौ छ ९ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री सखारामपंत
बापू स्वामींचे शेवेसी

पोष्य भवानी सिवराम कृतानेक सां नमस्कार विनती उपरी. येथील कुशल फालगुन शुध त्रितीया रविवार मुकाम सनिध नांदेड येथास्थित आसे विशेष. राजश्री कृष्णराव नारायण तात्या आपणापासोन आले. खर्डेयाजवळून त्याचे पत्र आले त्याजवरून सविस्तर कळले. त्यास आणावयाबदल स्वार पा॥ आहेत. आज उदईक येतील. येथे कुडीमात्र आहेत; प्राण आपणाजवळ आहेत. राजश्री नाना व बाबूराव याणी पहिले निवेदन केलेच आहे, व हली त्यास पत्र तपसीलवार लि॥ आहे, त्याजवरून आद्योपांत श्रवण होईल. जगंनिवासाचें

कर्तुत्व, ज्या काली जे होणे तदनसार साहित्य प्रकार घडतात. येथील लक्ष आपणास निवेदन आहे; तपसील ल्याहावा ऐसे नाही. आपण वडीलपणे पहिले सांभाल जाहला, पुढें होईल हा भरवसा. उदकापासोन वृक्ष जाहाला, त्यास उदक तारते; बुडवीत नाही. वनच्यरांस व्यसन प्राप्त जाहाल्यास कुरंग चंद्राकडेसच पाहील, आणि वराह पातालाकडेसच पाहातो. मनुष्य आपल्या मुरवियास कैसा विस्मरणीं आणील? आम्ही तपसील काय ल्याहावा? पत्रामागेच येऊन पोहोचलो जाणावे. आम्ही स्थापित आणि हे सरदारी आपली आहे. लक्ष दुसरें नाही. +सर्वस्वे स्थापित. तेथे बहुत लिहिण्यास कारणच नाही. आपन वडील मुरबी, या सरदारीचे आभिमानी. तेथे स्थापिताने वारंवार ल्याहावेसे नाही. श्रुत व्हावे. बहुत काये लिहिणे. लोभ कीजे हे विनंती.

¶*Bhavani Shivaram, one of the Nagpur Bhonsles' officials, writes to Sakharam Bapu of his own devotion to the cause of the Barbhais.*

---

*No. 19*] [*13-2-1774*

**श्री**

**राजश्री सखारामपंत बापू**
**गोसावी यांसी**

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष. राजश्री नानाजी कृष्ण जोसी व बाबुराव व विश्वनाथ वैद्य यांच्या पत्रावरून सकलार्थ कलेल. येथील मजकूर उभयतानी श्रवण केलाच आहे. आपणाजवळ येण्याविसी क्षणाचा विमर्ध[1] नाही. राजश्री भवानी सिवराम याच्या पत्रावरून तपसीलवार कलेल. पत्रामागेच यऊन पोहोचलों ऐसे जाणावे. रा छ १ माहे जिल्हेज. साराश पंथ चालोन येणे इतका मात्र उशीर. येरवी आम्ही आपणाजवळ आहो ऐसे जाणावे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle informs Sakharam Bapu that he is soon leaving Nagpur.*

---

+यापुढील मजकूर निराळ्या वळणाचा. १ विलंब.

No. 20] [14-2-1774

पौ छ २ जिल्हेज.

श्री

शेवेसी रंगो गोपाळ विज्ञापना. ता छ २ जिल्हेज. मकुंद जोसी यास पागेपैकी घोडे मणुश देऊन आपणाकडे आज येऊन पोहोचतील. रो नारो आपाजी, बाळाजीपंत लेले व आपाजीपंत यास सांगितले जे, सावकारात लस्करची बातमी जलद आल्यास किल्यास बातमी वरचेवर पोहोचावीत जाणे. आज्ञे ‍ो त्याणी सावकाराचे गुमास्ते बोलाऊन ताकीद केली. माघ वद्य शष्टीचे पत्र आले ते बाळाजीपंतानी कालच आपणाकडे पाठविले. आष्टमीचे पत्र आले त्याचे ठिकान काही लागत नाही. नारो आपाजीनी शोध बहुत केला. दाहा घटका रात्रपर्यंत मी त्याजवळ होतो. कागदाचे ठिकान लागेना. मग बाजारचे वर्तमान ऐकिले ते रात्री नारो आपाजीनी व आपाजीपंतानी लिहिले त्यावरून सर्व कळेल. कागद सावकारात आला खरा. परंतु भयेकरून दाखवीत नाही. साता दिवसाचे पत्र आहे. पत्राचे दर्शण होत नाही. तीन प्रकारचे वर्तमान. पुण्याहून तुम्ही निघाले ते समईची बातमी आगोधर केशोरायाची पोहोचली. ते समई दादासाहेब कार्तिकस्वामीस होते. देवाचे दर्शण घेऊन बुणग्यात येत होते. ऐकोन तेथे थबकोन उभे राहिले. नानाप्रकारचे वलगना करू लागले जे, बंदीत होतो तेथे शांभानी रक्षिले. आताहि ईश्वर आहे. तितक्यात मालोजी घोरपडे होते. हळू बोलावे, तुमचेजवळच शत्रू आहे. लवकर निघोन गुतीच्या ठाण्यात जावे. तैसच आडवाटे निघोन पाचशे राऊतानसी गेले. वामनरायास कळताच पाठी लागले. हे वर्तमान अनंदीबाईस कळले. गारद्यास बोलाऊन आपल्याबहुता+ बंदोबस्त केला. चिरंजीवहि त्यात आहे. महमद इसफ याणी मनावर धरून बाईच्या डेऱ्याबहुता बंदोबस्त चांगला केला. जुजून मरावे हे मानस. वामनराव याचे मंडळीचे लोक होते ते बाईजवळून निघोन दो कोसावर (थां)बले. याप्रा बातमी येक. दुसरी बातमी: हे वर्तमान कळताच बुणग्यात येत होते. विसा कोसावर थबकोन मुकाम केला. दाहा हजार फौजेनसी लोक तेथून रात्री पळाले. तिसरे बातमी: देवाचे दर्शण घेऊन बुणग्यात आले. हे वर्तमान कळताच मऱ्हाठे मंडळी पाटणकर, निंबाळकर, घाटगे, माने वगैरे यांस बोलाऊन सांगितलें जे, आम्हाभोवते वामनराव याणी आरिष्ट मांडले. याचे पारपत्य तुम्ही करावे. येविसी शपत द्यावी. मऱ्हाटे मंडळीने उतर केले जे, तुम्ही प्रभु येक उरले. वामनराव किमपि करणार नाही. आम्ही तुमचे सोबती आहो. वामनराव यास च्यार गोष्टी समजोन सांगू. येथ

+ भोवता.

रात्र जाली. उदईक याचा बंदोबस्त करू. तूर्त आमच्याने वामनराव याजवर जावत नाही. आपल्यातच लढावे हे विहित नाही. त्याची कल्पना आसेल ती उदईक काढो, ऐसे बोलोन आपले गोटात गेले. दादासाहेबी आपले गारदी बोलाऊन भोवता बंदोबस्त करून रात्री राहिले. तेथून बायेकासुधा व गारदी च्यार हजार फौजनसी निघोन गेले. वामनराव मऱ्हाठे मंडळी सारे येक होऊन तेथे थबकले. लोक बोलतात ते लिहिले. चिंतो विठल वामनरायाकडे आले हेहि ऐकिले. थोडकी मसलत मऱ्हाठेजवळून गेली. दादा जातो हे कळताच पाठिलाग न केला. त्यांस राखले. वामनरायास मसलत भारी पडली. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

*¶Rango Gopal writes that Wamanrao Patwardhan's objective of capturing Raghoba by surprise was defeated as the latter got wind of the plot against him and was allowed to make good his escape by the betrayal of the Maratha sardars.*

---

*No. 21]* *[14-2-1774*

पौ[१] छ २ जिल्हेज

आर्बा फालगून

**श्री**

विनंती[२]. आस्टमी शुक्रवारचा प्रातःकाल. वलभसुंदर यांचा कागद लस्करचा आला, त्यांत मजकूर. श्रीमंत पंचमीस मध्यरात्री प्रतिनिधीवर हला करावयाचा हुकूम जाला. प्रतिनिधि तयार जाले. वामनराऊ वगैरे सरदार प्रतिनिधीस सामील जाले. इतका मजकूर जाला, तों मुरारराव येऊन रात्रीची हला महकूब करविली. दुसरे दिवसी वामनरायावर हला करावयाचा हुकूम जाला, तोहि मुरारायानी राहाविला. प्रतिनिधि व वामनराऊ तिही कोशावर जवल दुसरे दिवसी जाऊन राहिले. सुमेरसिंग व महमद इसफ लस्करांत श्रीमंतांस येऊन भेटले. सुमेरसिंगास हती श्रीमंतानी दिल्हा. लस्करात फितूर गलबल फार आहे म्हणऊन लिा आहे. याप्रा पत्रांतील मजकूर आहे. विदित व्हावे. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती. पाा चितापुराजवल मुधोजी भोसले यांची पिछाडी नवाब निजामआलीखान यानी लुटले म्हणऊन आतांच वर्तमान आले आहे. म्हणऊन त्याच पत्रांत लिा आहे. हे विनती.

*¶Naro Appaji informs Nana Fadnis how an attack against Pratinidhi and Wamanrao was stayed by the intercession of Murarrao Ghorpade. He also refers to the rear of Mudhoji Bhonsle being plundered by Nizam's forces and to the presents given by Raghoba to Sumersing.*

---

१ पौ नाना फडणविसाची. २ पत्र नारो आपाजीचें.

No. 22] [15-2-1774

**श्रीशंकर**

**राजश्रिया विराजित राजमान्य**

**राजश्री बापू स्वामींचे सेवेसी**

पो॥ कृष्णराव नारायेण कृतानेक सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन श्वार जाहालो ते नांदेड नजीक लस्करात पावलो. पत्रे दिल्ही व मुखोतरे सविस्तर सांगितले. त्यास याचे लक्ष सर्व आपणाकडे आहे. गंगातीराहून कूच करून सोनवती पा॥ लातूर वानरातीरास आले. येथून तुळजापूर आठरा वीस कोश आहे. मजल दरमजल येऊन पोहचतील. येण्याविसी याजकडे गुंता किमपि नाही. सांगितल्या ठिकाणास सत्वरच येऊन पोहोचतो. बहुत काय लिहिणे लोभ करीत जावे हे विनंती.

*¶Krishnarao Narayan informs Sakharam Bapu that the Bhonsles are completely agreeable to the Barbhais and that they have already started for Poona.*

---

No. 23] [15-2-1774

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**

**हरिपंत तात्या स्वामींचे सेवेसी**

सेवक कृष्णराव नारायेण कृतानेक सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ फालगुन शुध पंचमी मुकाम लस्कर नजीक नांदेड जाणौन स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशेष. आपणापासून निघालो त्यास मार्ग दुर्घट. लस्कराची बातमी ठीक न लागे. याजकरिता येक दोन दिवसा हेलपटा खाऊन काल लस्करात येऊन पोहचलो. राजश्री सेनासाहेबसुभा याची भेट जाहाली. पत्रे दिल्ही व वर्तमान सांगितले. त्यावरून बहुतच समाधान पावले. पत्रदर्शनीच कूच करावे यैसे मानस, परंतु राजश्री त्रिंबकराव मामा यानी मातुश्री दर्याबाईस यास बोलाऊन आणिले. त्याचा प्रकार उरकून खातरजमा करून घ्यावी आणि कूच करावे, ते न होता कूच करिता न ये हे संकट मामास पडले. त्यामुळे काही दिवस लागले. काल निश्चय ठराऊन याच्या त्याच्या भेटी जाहाल्या. दर्याबाईने समागमे चालावे यैसे जाहाले. उदईक कुच दाहा दाहा कोशाचे करितात. सारांश याचे लक्ष पूर्वीपासून आपणापासी होते तेच आहे.

कायावाचामनसा दुसरा प्रकार नाही. बहुता दिवसीं आपले पत्र यावे यैसे भगवंते घडविले. मनोमय गोस्टी घडल्या. अक्षर आपले पाहोन आनंदित जाहाले ते काये ल्याहावे? तात्याची पत्रे येऊ लागली. आता आपली ऊर्जित दशा प्राप्त जाहाली, यैसे भाशण श्रीमंतानी व राजश्री भवानी सिवराम याणी बहुतच हर्षकडून केले. ज्या कामांत तात्या आहेत (त्या)कामाची काळजी करणे लागत नाहीं; यैसे कितेक प्रकारे निशा जाहाली. उभयेता आपणाजवळच आहेत. यैसी निशा आपलीहि आहे. तोच प्रकार याचा दृढतर आहे. अंधाची काठी अंधास सापडली म्हणून बोलून पत्र पाहून बहुत संतोसी जाहाले. सारांष हिकडील गुंता अत:पर किमपि नाही. पत्र वरचेवर येत असिले पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ करीत जावे हे विनती.

¶*Krishnarao Narayan writes to Haripant Tatya assuring him of the full support from the Bhonsles of Nagpur.*

---

*No. 24*] [*Recd. 18-2-1774*

छ ६ जिल्हेज

**श्री**

विनंती. मामानी दर्याबाईकडील राजकारण करून साबाजी भोसले यांच्या त्यांच्या भेटी केल्याचें वर्तमान लिहिले त्याजवरून कळले व त्यांचे लस्करचे पत्र त्रिंबक हरि यानी लिहिले होते. हे गोस्टी फार उतम जाली. मुधोजी भोसले यांजकडील निमे खूळ मोडले. याउपरी त्यांची गर्मी राहाणार नाही. मामा लस्करचे रोखे जालेयावर तिकडीलहि दुफळी मोडेल. तहावर येईल. दो चौ रोजाआलीकडे पत्रे येतील. पुढील सुमार सारा समजेलच. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.[१]

¶*Naro Appaji writes how the internal differences in the Bhonsle family of Nagpur were made up by Trimbakrao Mama prior to their march to Poona.*

---

*No. 25*] [*19-2-1774*

पो छ १४ जिल्हेज

**श्री**

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी

यासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असावें

---

१ चिठी नारो आपाजीची.

विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. लिा अर्थ सर्व कळला. राजश्री कृष्णराव नारायण यांचे मुखे सविस्तर कळले. खर्चाची बेगमी करून देतो स्वार व उंट भारदारी पाा म्हणोन लिा. त्यास राजश्री त्रिंबकराव मामा यांसी सर्व गोष्टीची माहितगिरी आपल्या लिहिल्यावरून व आम्ही तिलमात्र ठेवीत त्यासी नाही, त्याजवरून जाहलीच आहे. याउपरी यैवज आणवणें तो त्याणीच आणऊन आम्हास द्यावा आणि आपण त्याजकडेस पाठवावा. आम्ही यैवजाकरितां श्वतंत्र स्वार पाा आणणें हे उचित नाही. आम्हीं व मामा सामील येकत्रच आहो. आपली पत्रे त्यास येतात तोहि मजकूर सर्व आम्हास कलतो व आम्हाकडील रतिमात्र प्रतरणा न करितां सागतों. याद पाठविली ते पावली. आम्ही मामापुढें नेऊन ठेविली. येथें मनसबेयाचे सुकाण त्याणी धरिले आहे त्यापक्षी आपली व मामाची माया आम्हावर तेव्हां सेनासाहेबसुभा लांब आहे यैसे नाही. आधी योजिली मतलब सिधीस जावी. मामाची व आपली भेट व्हावी. मग उभयेता व राा बापू मिलोन करतील तेच कबूल होईल. तूर्त मसलतीवर नजर देऊन सर्व महकूफ केले आहे. येथे आम्हास ज्याप्रमाणें आपला लोभ आश्रा त्याचप्रमाणें मामाचा आहे. दुसरा विचार नाही. जे लिा ते खर्चाविसी वगैरे मामास ल्याहावे. राा छ ७ माहे जिल्हेज बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle writes informing Nana of his complete acquiescence in the measures of the Barbhais.*

---

*No. 26]* *[20-2-1774*

पौा छ १९ जिल्हेज

श्री

पुा+ उभेता श्रीमंताचे सोा

विनंती. नरसिंगराऊ मागून सेवेसी येतात. यांचे विनंती केल्यावरून सर्व विदित होईल. इकडील वर्तमान येथास्थित आहे. हे विनंती

¶*"Narsingrao Dhaigude proceeds to see Nana Fadnis and Sakharam Bapu", writes Dhondo Ram.*

---

+ पुा पत्र धोंडो रामाचें.

No. 27] [20-2-1774

पौ छ १९ जिल्हेज

श्री

पुा॥+ राजश्री कृष्णरावजी
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. रुकनुदौलास ईस्त्रराक्षं[१] ऐवज देणे तो अवरंगाबादेस शेरजंगापासी पावता करावा. साहुकाराकडे ठीक पडत नाही. अवरंगाबादेस साहुकारा देवणे. त्यास लिहावे की शेरजंगापासी पावता करावा. हे विनंती.

¶*Dhondo Ram advises Krishnarao to pay the sum secretly promised to Ruknuddaula at Aurangabad.*

---

No. 28] [20-2-1774

पौ छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

सेवक जिवाजी रघुनाथ कृतानेक सां। नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ ८ जिल्हेज मुा। जिरपली प्रा। यादगीर भीमातीर येथ स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशष. स्वामीकडोन पत्रे रुकनुदौलास व राजश्री धोंडोराम यास छ ३० जिल्कादची छ ७ जिल्हेजी पावली तेच वेलेस मी व धोंडोपंत मिलोन रुकनुदौलाकडे जाऊन त्यासी पत्राअन्वये बोलोन त्याची उतर पाठविली आहेत. सेवेसी येऊन पावतील. येथून राजश्री नरसिंगराव याची रवानगी आजच केली. स्वामीपासी येतील. सारांश इकडील काही गुता राहिला नाही. स्वामीचे विचारासिवाये रुकनुदौला नवाब नाहीत. याचा विस्तार नरसिंगराव विनंती करतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Jivaji Raghunath Khasgivale assures Sakharam Bapu of Ruknuddaula's sincere support.*

---

\+ पुा। पत्र धोंडो रामाचे. १ गुप्त (?)

No. 29] [20-2-1774

छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विनंती. प्रथम जासुदासमागमे श्रीमंत बापूचे व आपले पत्र आले त्याजवरून वर्तमान कलले. त्याचे उतर व रुकनुदौलाचे उतर त्यास जासुदासमागमे पाठविले आहे त्याजवरून विदित जाले असेल. आलीकडे राजश्री चिमणाजीपंत व नरसिंगराऊ आले त्याजसमागमील पत्रे पावली. त्याचे जुबानीवरूनहि कलेल. त्यांची रुकनुदौलाची भेट जाली. परस्परील बोलणे जाले. रुकनुदौलानी येका दो गोस्टीची दिकत घेतली होती. तिचे तोड सांगून ठीक जालें. सारांश बापूनी व आपण योजिल्या कार्यास रुकनुदौला शामील आहेत. याचे आर्थ नरसिगरायाचे विनंती केल्यावरून व रुकनुदौलाचे पत्रावरून विदित होतील. कोणे गोष्टीचा गुंता राहिला नाही. इत:पर ईश्वरी सता प्रमाण. वर्तमान वरचेवर येतच आहे. इकडून वरचेवर वर्तमान देत जाईल हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram to Nana Fadnis assuring him of the full support of Ruknuddaula for the cause of the Barbhais.*

---

No. 30] [20-2-1774

पौ छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

सेवक जिवाजी रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ ८ जिल्हेज मुाा निरपली प्राा यादगीर येथे स्वामीचे कृपेकरोन यथास्थित असें विशेष. स्वामीची पत्रे रुकनुदौलास व धोंडो राम यासी छ ३० जिल्कादची छ ७ जिल्हेजी मुाा मजकुरी पावली. तेच वेलस धोंडोपंत व मी मिलोंन रुकनुदौलाकडे जाऊन पत्राचे अन्वयें विस्तार बोलोन त्याची व पंत माारनिल्ची उतर सेवेसी रवाना केलीं. सारांश नवाब व रुकनुदौला श्रीमंत राजश्री बापूचे व स्वामीचे विचारासिवाये नाहीत. राजश्री नरसिंगराव याची रवानगी आज केली ते येऊन

पोहचतील. सविस्तर विनंती करिता ध्यानास येईल. त्या रोक नवाबाचे कूच आज नव कोसाचे केले. इकडील दुसरा विचार नाही. बहुत काये लिहिणे? आज आबाजी माहादेव येणार म्हणून वर्तमान आहे. हे विज्ञापना.

*¶Jivaji Raghunath informs Nana Fadnis that both the Nizam and Ruknuddaula are in complete agreement with the Barbhais.*

---

*No. 31]* *[20-2-1774*

पाा छ १९ जिल्हेज

**श्री**

पुाा राजश्री कृष्णरावजी स्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी लिहिले की, चाकरी करून दाखवावयाचा समय आहे, त्यास यामागें चाकरी केली नाही आताच चाकरीचा समय आहे असे दिसते. आस्तु. चाकरी करावयाची ती आजपावेतो करीत आलों. पुढेहि जो पावेतो चाकर आहे तो करीतच आहे. सर्फराजीची[१] उमेद नाही. धण्याची शब्दाशब्दी कृपा होत आली हीच पुरे. मजलाहि पुढे कोणी गोस्टीची उमेद संचय करावयाची नाहीं. परंतु दोही राज्याचा कारभार करितो, यात लक्षावधी मेलवितो हा अवध्यास संशय. त्यास धण्याचे देणे काय हे स्वामीचे ध्यानात व मोगलाइतून काये मिळते हेंहि स्वामी जाणतात. बारा हजाराची जागीर मोगलाकडील ती दरोबस्त सरकारात. आस्तु. लोकास भ्रम हजारो मेलवितात म्हणून-आणि मजला तरी कर्जदारी. ही गोस्ट दुसरियासी प्रमाण वाटत नाही. दाहा हजार रुाो कर्ज व्यंकोबा नाा याचे विद्यमानचे वारले हे स्वामीस ठावके आहे. माझी वर्तणूक स्वामीचे ध्यानात असिली तरी माझे प्रमाण मानावे. नाही तरी लोकास तरी संशय आहेच. आस्तु. या समई हे बोलणे ठीक नाही. आवघ्यानी आरंभिली गोस्ट सेवटास जाऊन धण्याचा बदोबस्त जाला म्हणजे निरोप दिल्ह्यास हजार सर्फराजी जाली. हे विनती.

*¶Dhondo Ram strongly repudiates the charge levelled against him of personal gratification in the discharge of his duties. On the contrary he says he is immersed in debt.*

---

१ सन्मान, बढती.

No. 32] [22-2-1774

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
सखारामपंत स्वामी गोसावी यांसी

पोष्य आबाजीराव कृष्ण प्रतिनिधि नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन परम संतोष जाहला. ऐसेच सदैव पत्रद्वारे संतोषावाप्ति करीत असावें. यानंतर पत्री लिहिले जे सौभाग्यवती मातुश्री पार्वतीबाई व मातुश्री गंगाबाई यांस पुणेयाकडून घेऊन आम्ही व राजश्री नाना फडनीस ऐसे किले पुरंदर येथें आलों. वरकड लहान मोठे सरदार राज्यांतील एकवाक्यता जाहली आहे, व राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांजबाार सरकारची फौज दहा पंधरा हजार व राजश्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा गंगातीरी होते तेहि इकडे लौकरच येतील. सिंदे होळकर हिंदुस्थानांत आहेत, तेहि सत्वरच येतील. व लष्करातील राजश्री वामनराव वगैरे सरदार यांची एकवाक्यताच आहे, म्हणोन लिहिले. ऐसास सर्व राज्यांतील भिस्त आपणावर आहे. तेथे बंदोबस्ताविसीं कोणे गोष्टीचे अगाध आहे ऐसा अर्थ नाहीं. सविस्तर वरचेवर पत्री लेहून संतोषवीत असावें. येथी-लहि सर्व मजकूर आपणावरच आहे. तेथें विस्तारे लेहून कळवावें ऐसे नाहीं. रवाना छ १० जिल्हेज. बहुत काय लिहिणे, लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*Abajirao Pratinidhi acknowledges to Sakharam Bapu the receipt of a letter communicating him the news of the safe arrival at Purandhar of Gangabai and Parvatibai, and of the formation of the league against Raghoba.*

---

No. 33] [22-2-1774

पो छ १० जिल्हेज
पुरंधर.

श्री

राजश्री हरिपंत गोसावी यांसी

ϐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावें विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन संतोष जाहला. बहुत दिवस पत्र येत नाही * *

(आपलं) लेखनात आले. दैवछा प्रमाण. दिवसाचा योग काही यैसाच घडला. निरोपाये रावसाहेब कैलासवासी जाहले त्याणी आम्हांस तो येथे ठेविले, परंतु चितें उल्हास सर्व घेऊन गेले. याजमुले पत्र येण्यास आंतर जाहले. सांप्रत मातुश्री गंगाबाई सगर्भ आहेत. उभयेता मातुश्रीसुधां किले पुरंधरास गेलीं, यैसी पत्रे राजश्री बालाजीपंत नाना व राजश्री सखारामपंत बापू यांची व तुमची आली आणि पंढरपूरच्या सुमारे जलद येणे, मसलत सेवटास नेणे, या घराची जोड तुमच्या वडिली केली त्याचे सार्थकसमय हाच आहे हे अन्वये पाहोन आनंद जाहला. अकृत्रिम कैलासवासी याचा श्नेह यैसे भाव खुणेच्या गोष्टी आपण लिहिल्या, त्यास या पत्रामागेच उदईक कूच करून दरमजल येत असो, किमपि अत:पर गुंता नाही. राजश्री त्रिंबकराव मामासी सांप्रत वोलख पुरली तेहि उदित जाहले. मातुश्री दर्याबाई परभारी वराडांत जात होती हाहि प्रकार वाईट होता तो देवानें अनकूल केला. या उपरी दरमजल येत आसो. सविस्तर राा कृष्णराव नारायण यांच्या पत्रावरून कलेल. सारांश दरमजल पत्रामागेच येत आसो. बहुत काये लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle writes to Haripant promising that he would soon start and join.*

---

*No. 34*] [*26-2-1774*

**श्री**

श्रीमंत राजश्री बापू
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक चिमणाजी नीलकंठ दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १४ जिल्हेजपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. आपला बेलभंडार आणिला तो नवाब व रुकनुदौलाबहादर यांस देऊन, सर्व अर्थ बोलोन, चिठी स्वदस्तुरची घेऊन पाठविली आहे. कलावे. इकडील कोणेविसी दुसरा विचार नाही. रुकनुदौलाबहादर याचें वारंवार सांगणे की, आरंभिली गोष्ट सेवटास न्यावी. आम्ही सर्व प्रकारे आपले आहो. जे येक वेल वचन जाहाले आहे तेथें दुसरेयाने कोटी प्रकारे लोभ दाखविले तरी आइकावयाचे नाही, याप्राा निश्चय आहे. दिकत नाही. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Chimnaji Nilkanth writes to Sakharam Bapu assuring him of the full support of Nizam Ali and Ruknuddaula in the new undertaking.*

No. 35] [26-2-1774

पौ छ २० जिल्हेज

श्री

सां[१] नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १४ माहे जिल्हेज मुकाम मटकी माहागांव पो कलबुर्गे जाणून स्वकीय कुशल लिहीत गेले पा। विशेष. आपण पत्र जोडागिरीचें विस्तारे पाठविलें तें पात्रोन सविस्तर वर्तमान कललें. यापूर्वीहि दोन पत्रे याच आन्वयाची आली होतीं, त्याची उतरे पाठविली आहेत तीं पावली आसतील. त्याजवरून कलले असेल. नरसिंगराऊ येऊन त्यांची भेट होऊन सविस्तर वर्तमान कललें असेल. इकडील वर्तमान नवाबानी आनुराहून कूच करून दर मजल दाहा दाहा कोसाच्या मजली करीत काल छ १३ रोजीं येथे आले. आज धुलोडीकरिता मुकाम जाला. वाईदेकरितां येक मुकाम केला होता. येथून उदैक रविवारीं कूच करून दर मजल आवसे लोहारे वरवाल लातूर या प्रांते जातात. राजश्री त्रिंबकराव व साबाजी भोंसले रेणापूर, लातूर या प्रांते आल्याचे वर्तमान आले होते. त्यांचा रूख पाहोन जिकडे जातील. वरकड मा।र राजश्री चिमणाजीपंताचे लिहिल्यावरून कलेल. बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Dhondo Ram writes to Nana Fadnis informing the latter of Nawab Nizam Ali having left Anur and arrived near Gulburga.*

---

No. 36] [26-2-1774

पौ छ १४ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे

सेवेसी

पो येसाजीराम कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ ६ जिल्हेज भृगुवासर जाणून स्वामीचें कृपेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी छ १८ जिल्कादचें पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहलें. आपण पुण्याहून निघोन किले पुरंदरास आलों. तुम्हीं आपले तालुकेयाचा बंदोबस्त राखोन हुशार राहावें. श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडून वराता वगैरे जाहलियास यैवज येकंदर न द्यावा. वर्तमान वरचेवर लिहीत जावे म्हणून लिहिले. त्यास आज्ञेप्रमाणें किले धारवाड वगैरे किल्याची चवकीपाहारेयाची खबरदारी करविली. सिबंदीची नेम-

---

१ पत्र धोंडो राम याचें.

5961

णूक कमी आहे याकरिता दोन च्यारशे माणूस नवे ठेऊन किल्याचा बंदोबस्त करवितो. लस्कर या प्रांतीं आहे. उभयेतां चिरंजीव लस्करात आहेत, लस्कर फिरले म्हणून वर्तमान आहे. परभारें लस्कर गेल्यास चिंता नाहीं. यामार्गे आले तर संकटच आहे. बातमीस लस्करास माणसे पाठविलीं आहेत. वर्तमान येईल ते सेवेसी लिहोन पाठवितों. सेवेसी विदित होये. लस्कर माघारे फिरले. मजल दरमजल कोपलावरून कपाटसंगमावर येणेची आवई आ (हे). बातमीस माणसे पाठविली आहेत. वर्तमान येताच होईल वर्तमान ते सेवेसी लिहोन पाठवितो. सेवेसी विदित होये हे विनंती.

¶*Yesaji Ram, Commandant of Dharwar, reports to Nana the measures of defence taken by him and says that the forces of Dadasaheb were going back from the Karnatak and that they would encamp at the confluence of Kapat.*

---

*No. 37*] [*Recd. 27-2-1774*

पो छ १९ जिल्हेज

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी

यांसी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष. आपणाकडून राजश्री कृष्णराव नारायण आले ते फाल्गुन शुध चतुर्थी इंदुवारी पोहोचले. पत्रावरून व मुखोद्गत सविस्तर कलले. त्याचे प्रत्योत्तर येथून मुजरद सांडणीश्वाराबा पाठविली आहे त्याजवरून कलो येईल. नांदेड गंगातीरीहून दोन कुचे तीस कोस घाट चढोन हेडगुल पा। उदगीर येथे आलों. उदईक छ ९ जिल्हेज इंदुवारी दाहा कोस मुकाम नेमिला आहे. दरमजलीनें पंढरपूरच्या सुमारें येत असों. राजश्री त्रिंबकराव मामा व आम्ही समागमे येकचित आहों. मसलतीच्या उपयुक्तविसी जिवेप्राणे अर्थ सोडून सादर असों. लक्ष दुसरें नाही. मामाच्या कह्यास[1] तिलमात्र प्रतिकूल नाही. दरमजलीने येत असों. सविस्तर राजश्री नानाजी कृष्ण श्रवण करितील. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle writes to Sakharam Bapu informing him that he has reached Hedgul near Udgir and together with Trimbakrao is marching towards Pandharpur.*

१ कह्या=(पु.) आज्ञा.

No. 38] [पो 27-2-1774?

पौ छ १९ जिल्हेज.

श्री

पुा राजश्री कृष्णरावजी

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी रुकनुदौलास फारसी पत्रे श्रीमंत बापूचे व श्रीमंत नानाचे व स्वामीचे होते ती प्रविस्ट करून रुकनुदौलानी स्वहस्तेच उतरे पाठविली आहेत. त्याजवरून कलेल. हे विनंती.

¶*Dhondo Ram informs Krishnarao Kale that letters for Ruknuddaula have been delivered to him and his replies enclosed.*

---

No. 39] [February 1774

श्री

राजश्री त्रिबकपंत काका स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आपणापासून आलियावर रुकनुदौलाकडील जाबसाल सिध केला. अनयासे जिवाजीपंत तेथे आले होते त्यास सांगितले, कीं बाईविसी आमची खातरजमा जाली. हरिपंताकडे तुम्ही जाऊन खातरजमा करणे आणि बाईचा बंदोबस्त करून देणे. ऐसी जिवाजीपंतास शफत घातली कीं, परिछिन्न तुम्ही जाणे आणि खातरजमा करणे. आतां काय कर्तव्य करणे ते करणे. कूच तर लोक होऊ देत नाहीत याचा विचार काय करणे तो करावा. पुरंधरीहून बापूची व नाना फडनीस याची पत्रे तात्यास आली आहेत ती आपणाकडे आली असतील. त्याचा अन्वये आपणास कललाच असेल. उत्तर लवकर यावे हे विनंती.

¶*Trimbakpant is informed that Jiwajipant has been deputed to Haripant and asked to convince him regarding the affair of the Bai (Daryabai Bhonsle, wife of Janoji Bhonsle).*

---

No. 40] [12-3-1774

पो छ २९ जिल्हेज

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री त्रिंबक-
पंत स्वामी गोसावी यासी

सेवक सखाराम भगवंत नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २८ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. श्रीमंतानी फौज बऱ्हाण-

\+ पुा पत्र धोंडो राम याचें.

पुरास रवाना करावयास आज्ञा केली त्यास तुम्ही फौजेस फार करून निरोप दिला असेल. राहिले असतील लोक ते व पागा सुधा तुम्हीं बराणपुरास जाणे. श्रीमंतानीं मलबा बाा फौज देऊन राा केले आहेत. तुम्हीं त्यास जाऊन मिलणें. तूर्त[1] तुम्हाखेरीज दुसरा जावयास कोणी नाहीं. रामसिंग व जाधवाचा कारकून दोघावरी काम चालेसें आसिलियास रवानगी करावी. सिलेदार गेले आसतील. जे बाकी राहिले असिले तितके व पागा येैसें जावे, परंतु चाकरीस नाहीं म्हणू नये. या मनसब्यास फार दिवस लागत नाहीं. थोड्यासाठीं तुम्हीं अलस न करावा. कोणेही प्रकारें चाकरी घडे ते करावे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bhagwant asks Trimbakpant to proceed with the forces that he has at his command to Burhanpur.*

---

*No. 41*] [*27-3-1774*

पैवस्ती

१६ मोहरम

**श्री**

**राजश्री बालाजी पंतनाना**

**गोसावी यांसी**

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. राजश्री रघुनाथराव दादा याणी मावारे पंढरपूरच्या सुमारें कूच करून चालिले. त्याजवरून राजश्री त्रिंबकराव मामा सडे जाहाले आणि मागें गेले. राजश्री वामनराव येऊन भेटले हें वर्तमान त्याणी लिहिलेच असेल. छ १३ मोहरमी वेणुनाद गोपालपूर येथें दादाचा मुकाम होता. कासेगावावर राजश्री सेनाधुरंधर वगैरे कांहीं फौज होती तेथें मामा गेले. आम्ही मागें होतों, कारण जे दब्याची संद+ मुसलमान लोकांची येऊन पडली याजबद्दल राहिलों. तेरावे तारखेस वीस कोस आम्ही येऊन नाझरे याजपुढें दोन कोस मुकाम केला. त्यास त्याच दिवशीं दोन प्रहरां मामासी व दादासी मोकाबला जाहाला. त्यांत गफलतसारिखी घडली हें सविस्तर वर्तमान राजश्री हरिपंताच्या पत्रावरून कलेल. सारांश हरिपंत बाा फौजसुधां आम्ही येकत्र वामनराव व रास्ते व नारो शंकर याचे पतक व राजश्री

---

१ येथून अक्षर सखारामपंताचें.   + डोल्यांची संधि = तातुतांचा समय.

सिवराव विठल देखील आसो. मोगलहि आज छ १४ मोहरम रविवारी चौ घटका आम्हांजवळ येणार. दादानी कूच मात्र न करावें. ईश्वर सर्व गोष्टी अनकूल करील. आपणांस कलावें म्हणून लिहिलें असे. रवाना छ १४ मोहरम. सारांश इकडील मसलतीविसीं आपण चिंता न करावी. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

¶*Sabaji Bhonsle after referring to the death of Trimbakrao assures Nana Phadnis that it was an easy work to finish up Raghoba provided he does not slip away.*

---

*No. 42*] [*December 1774*

**श्री**

सेवेसी सां दडवत विनती. आताच वर्तमान आले की बडोदियाहून फौज या प्राती यावयास कूच करून निघाली. येक मजल अलीकडस आली. सत्य मिथ्य न कले. आले वर्तमान ते लिहिले आहे. आपण तिकडील बातमी राखिलीच असेल. सारांष सत्य मिथ्य न कले, यास्तव नरोतमास पर्वतारूढ जलदीने करावा. लटका लफरा[1] लस्करात ठेऊ नये येैसे आमचे विचार. मग आपली मर्जी. परतु रवाना करावा हे उतम. समई रखवाली करण नलगे, येैसे आहे हे विनती. आज गायकवाडाकडीलहि ठाणे दखल होणार ऐसे आहे. आपला कूच होऊन शहरासनिध कधी मोकाम होणार ते लिहावे. हे विनती. साष्टीकडील वर्तमान मेस्त्र वाटसन इंग्रेज सरदार आला होता तो ठार पडिला. इग्रजाचे मोर्चे माघारे हटविले. तीनसे माणूस इंग्रेजाचे ठार मारिले, या प्रा वर्तमान आले आहे व जागा जागा सरकारचे किल्याचे लोक मदतीस पावले व हुजूरची मदत आली, येैसे वर्तमान आले आहे. याउपर इंग्रेजाचा उत्कर्ष नाही. याप्रा जनवार्ता आहे. हे विनती.

¶*The writer (Dattaji Narayan) suggests that Narottam should at once be imprisoned and removed to a mountain fort in order to avoid further trouble. The news from Salsette about the English having lost their general Watson and some 300 men in the battle is also reported in the letter.*

---

१ भानगड ?

No. 43] [About March 1774

श्री

यादी राजश्री बाबराव सदासिव याजकडील बोलणे विद्यमान राजश्री कृष्णराव बलाल सुा आर्बा सबैन मया व अलफ

तुम्ही बारामतीस स्वस्थ राहावे १

आबाजी नाईक यांचे चिरंजीव शंभरा स्वारानिसी कृष्णराव बलाल यांजबराबर येथे पाठऊन द्यावे.

टोक्यास जावयाचा प्रकार तर आमची मसलत सेवटास जाईल तोपर्यंत टोक्यासच स्वस्थ राहावे. १

पागेचे राउतांचा करार सरकारचा आहे त्यापैकी शंभर हुजूर यावे. वरकड आपल्याजवळ ठेवावे. नवे राऊत ठेऊ नयेत. बारामतीचे रक्षणास प्यादे फार ठेऊ नयेत. कार्याकारण ठेवावे कलम १

येकून च्यार कलमे लिहिली आहेत.

त्यास आम्ही मसलत आरंभिली आहे. यास शफतपूर्वक तिलमात्र मनात वाकडे न आणिता अनकूल असावें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील लक्ष धरू नये. याप्राो मसलत सेवटास जाई तोपर्यंत निखालस असावे याप्राो घडावें. पुढेंहि दौलतीचा बंदोबस्त जाल्यानंतर इकडील लक्ष असावें. श्रीमंत दादासाहेबांकडील लक्ष धरू नये. निर्वेलपणे[1] वर्तावें म्हणजे तुमचे स्वरूपायोग्य काम घेऊन तुमचे कर्जाचे परिहारास पाच लक्ष रुा तीन वर्षांत देऊ. याप्राों सरकारांतून घडेल. यास दरम्यान सखारामपंत व नानाफडनीस व शफत बेलभंडार. तुमची शफत पार्थिवपूजा जाल्यावर सिधेश्वराची शफत वाहून पार्थिवावरील बेल उचलून द्यावा.[2]

¶*The paper mentions the terms imposed upon Babuji Naik Joshi, by Sakharam Bapu and Nana Fadnis, who managed to win him over to the cause of the Barbhais.*

---

१ निखालसपणें. २ सबंध यादी हरीपंत फडके याच्या हातची आहे.

संपादक प्रत ... ता. ... डा. ग.

श्री

+विनंती विशष. सुर्तेहून आताच आपले ठाणयातोन बातमी आली की, सुर्तेहून इंग्रजाचे लोक जाहाजातोन भडोचस जाणार व काही भडोजेचे लोकास मिलोन आपणाकडेस मोकाबला घेणार यैसे वर्तमान आताच आले. मग न कले आपणाकडस येतील किंवा श्रीमंताकडस मदतीस जातील हे न कले. परंतु बातमीचे मनुश आले, त्याणे सागितले की लोकाची तयारी जाली आहे. हे वर्तमान आपणास कलावे म्हणून लिहिले आहे. श्रीमंत राजश्री बापू स्वामीकडील वर्तमान व राजश्री हरिपंत तात्या व होलकर सिंदे याचे फौजेचा वर्तमान कलत नाही. आपणाकडील काये वर्तमान आले असेल ते लिहावयास आज्ञा करावी. पाठीवरील फौज कोठे नाही, येणेकरून फार विलग गोष्ट घडोन आली आहे. साष्टीचा मजकूर पेशजी घेतल्याचे लिा होते. परंतु मध्ये आहे नाही यैसेहि वर्तमान आले. परतु सावकारी थोबन धनजीचे पत्र व मुजरद माणूस साष्टीहून रा बहिरोपंत मेहेंदले याचे माणूस आठा दिवसाचे परवाचे दिवसी आले. तो नजरेने पाहून इकडे आला. अत:पर संशये राहिला नाही. किल्याची बंदिस्त करीत आहे. आपल्याकडील विसाजी कृष्ण फौजसुधा साष्टीस कुमकेस आले होते ते कलवे खाडी आलिकडे उतरले होते. तेथेच राहिले. उपराला जाला नाही. हाली रा विसाजी केशव लेले ठाणे घेतल्यावर दाखल जाले. वसईस आहेत. इंग्रजाचा विचार साष्टीचा बंदोबस्त करून वसईचे तर्तुदेत आहे. पुढे जे वर्तमान येईल ते लेहून पाठऊ. आम्ही सुरतेतून बाहेर निघोन आलो. तेथे दाहा पंधरा माणसे व फारसी कारकून माहालास आहेत व येक कारकून यैसे ठेऊन आलो. ठाणे उठऊन नरोतमाचे पुत्रास आमल दखल द्यावा व पहिले परगणे उरपाड, हसोट, अकलेसर घेतले होते ते पुन्हा घ्यावे, यैसी मसलत इंगरज मोगल मिलोन साप्रत घाट घडीत आहेत. त्यापैकी सुरतेची मामलत तो स्वाधीन आहे. ते हवाला करणार. याप्रो विचार आहे. आम्ही आलो म्हणौन इगरज व नरोतमाकडील फारच श्रमी जाहाले, ते लिहिण्यात येत नाही. नरोतमाचे मुबदला कैद करावे यैसा विचार पहिल्यापासोन चितात होता, तो हाली व्यर्थ जाला. आम्ही या अनर्थापासून

+ पत्र दत्ताजी नारायेण वगैरे यांचें.

मुक्त जालो हे स्वामीचीच कृपा. सूचना केली नाही तर फसलो असतो. स्वामीचे पदरीचे आसो. बहुत काये लिा कृपा केली पाा हे विनंती.

¶*Dattaji Narayan reports that the English force at Surat has been removed to Broach but he is ignorant of their destination and objective. He enquires about the real state of affairs at Salsette.*

---

*No. 44A*] [*7-4-1774*

वडणी रुमाल नं. ४५९

नारो शंकर राजेबहादर

**श्री**

सुाा आर्बा सबैन मया व अलफ छ २२ माहे रबिलोवल अखेर मुाा पुणे विाा नारो आपाजी. सदासिव विठल याणी विदित केले की पाो यगरी येथील मामलत आपण हमीदखान ठोके याजकडून केली. ते समई सरकारातून तह ठरला की मानिलेनी सरजाम खाऊन चाकरी करावी आणि शाहाजखान व गुलज्यारखान पालक यास दोन गाव नेमून दिल्हे ते खाऊन हुजूर चाकरी करावी. येणे प्राो बदोबस्त जाला असता दाजी बालकृष्ण याणी उभयतास श्रीमत राजश्री दादासाहेबाकडे लस्करात नेऊन बारा हजार रुाो नजर कबूल करून सरदारी शाहाजखान व गुलज्यारखान याजकडे करार करावी असे केल. परतु सनदपत्र जाली नाहति. उभयता लस्करातून पळून खानदेशात गेले. गुलज्यारखान मौजे लासूर पाो चोपडे हा गाव बलकाऊन बसले. पागा व पथक सरकार चाकरीस यावे ते नारो बालकृष्ण दाजी बालकृष्ण याचे भाऊ याचे स्वाधीन होते ते जाऊन शाहाजखान याजकडे मिलोन पाो माारी मवासी करितात. मौजे तलवाडे येथील बावाजी पाा सटवा चाभार पागेचा चाकर होता तो व येक मुसलमान मुसाफर असे तिघे जण जिवे मारिले, परगणा लुटिला. लोक परगदा जाहाले. आपण रसद भरली ते बुडाली. सरकार चाकरीस ठिकाण नाही. येविसी सरकारचे पत्र सादर जाहाले असता त्याच्या ध्यानात येत नाही. अन्याय कर्मे करितात त्यांचे पारपत्य करून महालचा बंदोबस्त करावा म्हणून. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी शहाजखान व गुलज्यारखान याणी गढ्या बलकाऊन धामधूम करितात. खून खराबी करून माहाली उपद्रव करितात. रयतेचे दाणे वगैरे लुटून नेतात. साा त्यास कैद करून त्याची चीजबस्त घोडी वगैरे जफ्त

करून जाबता हुजूर पाठवणे आणि त्या दोघास कैद करून ठेऊन सरकारात लेहून पाठवणे. परगण्यांत कोणविसी उपसर्ग न लागे ते करणे म्हणून माारनिले याचे नावे छ २९ मोहरम सनंद [नारो शंकर राजेबहादूर यास]

¶*This is an order from the newly formed Council of the Barbhais, asking Naro Shankar to capture Shahajkhan and Guljarkhan who had made common cause with Dadasaheb and acted against the Peshwa's Government. The paper supplies useful information about the antecedents of Guljarkhan and his patron Hamidkhan.*

---

*No. 45*] [*27-4-1774*

## श्रीसीताकांत

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी

यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नाो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपणाकडून पत्रे वरचेवरी आली ती प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राये कलो आला. अपल्या व सेनासाहेबसुभा व सेनाबाहादर याच्या भेटी जाहाल्या. उतम जाले. बोलण्याचे कराराप्रमाणे लौकर यावयाचे करावे. ज्यापक्षी मसलतीचे वोझे आपण घेतले, तेव्हा सर्व गोष्टीची चिंता आपल्यासच आहे. हरिपंत दरमजल नेमल्याप्रमाणे जाणार. मोरो गोविंद याजबरोबर बापूजी मोरेस्वर देऊन बुंदेल्याकडे रवाना केले. तिकडील उतर येईल ते लेहून पाठवावें. सनदाप्राो बुंदेले अमल देतील, न दिल्यास ताकीद केली जाईल. वकिलासहि सांगितलेच आहे, दिकत पडणार नाही. वरकड समक्ष बोलणी जाली आहेत म्हणोन लिहिले यास वराडात आलियावरी बहुतकरून * * वस गावेल प्रकर्णीच लागलें; व नरनाल्याचा प्रकार आपले लिहिल्याप्रमाणे पर्यायावरी टाकून तेथे लोक चहूकडे त्याचे बदोबस्तास बिदा केले. अद्याप तेथील काही सोये व मार्ग नाही. जैसे होईल तैसे बेगडा खाल्हन कूच करून सिंगणापूर नजीक खोलापूर येथे मारुतीचे दर्शनास्तव येणे जाहाले. तोफखाना वगैरे सरंजाम खेमेज्यात[१] व लोकाची बोलणी व देण्याघेण्याची तोडजोडी करितां याच जाग्यावरी कितेक मु(का)म जाहले. येथून कूच होऊन आलजपूरचे पिराचे दर्शन घेऊन आबंडापूरचे सुमारें कूच करावें यैसे होते. तो मध्यंतरी जो प्रकार घडला तो

---

१ तंबू वगैरे सामान.

आपल्यासहि कललाच असेल. याजकरिता १२ दिवस गुंता पडला. तेरावे दिवसी जरिंदा आलजपुरी पिराचे दर्शनास जाणे होऊन दो दिवसात तेथील गुंता उरकून पुन्हा मुकामास येणे जाहाले. येथून कूच होऊन मार्गातच जे लोकांची बोलणी व रवानगी बंदोबस्त जो घडत जाईल तो घडून आंबडापुरास येत असो. तेथेही अलजपूरचे मंडली आदीकरून यांची बिदाई करितो. मुकाम दोन च्यार होतील. तेथून दरमजलीने येणे घडत असे. मंडल्याचे प्रकर्णी अद्याप मोरो गोविंद व बापूजी मोरेश्वर याजकडील वर्तमान आले नाही. जे गोष्ट आपण निश्चयात आणली ते सिद्धीस जाईलच हे खातरजमा आहे. परंतु पला लांब. जे गेले, त्याजकडून काही वर्तमान कलत नाही. या सालाचा प्रांताचा यैवज बिलकूल बुंदेल्याकडे गेला. तेव्हां याच्या पर्याये व इकडील तेथे अमल करार-वाकई[१] दाखल होणे हे सर्व करणें आपणाकडे आहे. सलाबतखान प्रकर्णी व बगाजी रघुनाथ यासी मोईनतदौला बाहादराचे बोलणे जाहले ते मशारनिलेनी येथे लिहिले, त्याचा मजकूर राजश्री हरिपंत तात्या यासी लिहिला आहे, त्याजवरून कलो येईल. रा छ १५ माहे सफर बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mudhoji Bhonsle writes to Nana Fadnis the state of affairs in his province and says that he would soon start and gives his probable halts on his way. Senasaheb Subha (Raghuji), Sena Dhurandhar (Mudhoji) and Sena Bahadar (Sabaji) were the three titles of the three Bhonsles. But Sabaji seems to have been given by the Barbhais the title of Senasaheb Subha for a time to conciliate him and secure his help.*

---

*No. 46*] [*Received on 29-4-1774*

पौ छ १६ मोहरम
अर्बा सबैन

**श्री**

**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी तुम्ही पत्र पाठविलें ते पावलें. राजश्री आनंदराव धुलप याणीं सालमजकुरीं गुराब धरिली. त्याजवर दरोबस्त माल गोवेकराचा, कठडा व दोन हजार रुपयांचा माल मात्र मुंबईकर साहुकाराचा. तो धुलपानी मुंबईकरास माल देऊन पावत्या घेतल्या. ऐसें असतां मुंबईकराचा वकील म्हणतो कीं, कठडा आमच्या बंदराचा व कौल आमचा आहे. तेव्हा वरील माल आमचा, तो आम्हांस द्यावा. ज्याअर्थी माल आम्हांस देत नाहीं तेव्हां आमचे येथे राहावयाचे

१ दुरुस्त, योग्य=करारायोग्य,

कारण काय ? ऐसें म्हणतो. त्यास गोंवेकराचा माल सांपडेल तो सरकारात द्यावयाचा ऐसें असतां यांचे गुराबेवर होता म्हणोन मागतात याचें कारण काय ? व सरकारी वाजबी कलमे सुरतेचा अंमल सुरलीत सुदामतप्रमाणे द्यावा तो देत नाही व भडोचचे सालाबादी शाहातरशे रुो द्यावयाचे असतां मनमाने तैसा ऐवज घेऊन कमावीसदारांचे ठाणे उठऊन आपलें बसविलें आणि मनास येईल तैसा पैका घेतात व बाणकोटचे खाडींतून सरकारचें भात वगैरे गलबतांवरून तालुक्यांत आणितात त्यास अडथला करावयाचें कारण नसतां अडथला करितात. या गोष्टींचा बंदोबस्त त्यांच्याने काहींच होत नाही आणि गैरवाजबी कलमाचा जाबसाल घालून वकील जातो म्हणतो याचे करण काय ? तरी येविसींची जाबसाल त्यास पुसोन काय तें त्याचें उतर घेऊन् लिहून पाठवावें हे+ विनंती.

¶*Nana Fadnis asks Naropant Nana to make enquiries as regards the differences that had arisen between Dhulap and the English and to find out why the English Vakeel has adopted quite a strange attitude.*

---

[11-5-1774

*No. 47*]

**श्रीशंभुप्रा**

राजमान्य राजश्री सखाराम भगवंत यासी श्रीमन्महाराज मातुश्री दुर्गाआईसाहेब याणी - आज्ञा केली यासी जे. साहेबाची सर्व भिस्त तुम्हावरी असतां यखादी गोष्टी सरकारात न कलता वडावी हे विहित की काय, समजोन पाहाणे. तीर्थरूप मातुश्री ताराऊसाहेब व माहाराज राजश्री स्वामी व मातुश्री आईसाहेब कैलासवासी यांचे सेवेसीं बालाजी पंडित तागायत कसे अर्ज करीत आले व यादीहि ठराऊन शफतक्रिया दिल्हा आहेत याची माहितगिरी तुम्हास पुर्ती आहे. बालाजी पंडित व राजश्री रघुनाथ पंडित उभयता करविरी आले ते समईच्या शफतपुरसर यादी करारमदाराच्या आहेत त्याच्या नकला वेदमूर्ति राजश्री माहादेवशास्त्री पोडेकर (?) यांजकडे पाठविल्या आहेत. तरी त्याची पुर्ती चौकशी करून सुज्ञपणास उचित आसेल तेच करावे. क्रियालोप वगैरा वर्तणूक आज्ञान लोकापासून घडती. परंतु त्यात कांहीं विशेषता नाहीं. सारांश क्रियेस व जातीस दोश न लागे ते करावे. सिवशाई रक्षण करावी यदंनिमित्य सेवेविसी निर्माण श्रीजगदंबेने तुम्हांस केले आणि प्रस्तुत काली शिवशाईत यक साहेब यांजकरितां देशादेश पाहोन जे कर्तव्य ते करणे. जर करिता तोच अगत्यवाद धरून केलेस साहेबाची अपकीर्ति

---

+ पत्र नाना फडणविसाचें.

तुम्ही घेता हे पुर्तेपणें समजणें. सर्वप्रकारें विस्वास साहेबी तुमचा मानिला आहे. तरी तुम्ही हुजूर येऊन साहेबाचे सेवेसी अर्ज करून साहेबाची स्वारी सत्पुरुषीस करविली तरी इहलोकी उत्तम आणि परलोकीहि इमान, हे दोन्ही साधिलीस होतील. हे अदिपश्चात ध्यानात आणोन उतर सत्वर पाठवावे म्हणिजे साहेबाचे सेवेसी विदित होऊन स्वस्तता मानिली जाईल. विनंति. लिहिण्यात आपली क्रिया स्मरोन दिगर न कर्णे. यविसी चिरंजीव+ राजश्री यशवंतराव सिंदे सरसुभेदार यांणी आज्ञेप्रो लिहिले आहे त्यावरून कलेल. जाणिजे रा छ २९ सफर बहुत काये लिहिणे.

*¶Durgabai, Rani of Kolhapur, complains to Sakharam Bapu about the Peshwa's breach of promise towards Kolhapur.*

———

*No. 48]* *[Received 23-5-1774*

पा छ ११ रबिलावल

**श्री**

यादी श्रीमंत राजश्री दादा साहेबाकडील जाबसालाचीं कलमें येणे प्रो. सुा आर्बा सबैन मया व आलफ.

१ सिबंदी वारायासी यैवज कमबेश साहा लक्ष रुपये द्यावे आणि सिबंदी दूर करावी कलम

१ पोटाचे बेगमीस तूर्त लाख रुपये द्यावे. पुढे शागीर्दपेशा व पीलखाना व धर्मादाव व भोजनखर्च वगैरे नेमणूक करून दरमाहाचा दरमाहा द्यावा. या यैवजी जागीर लाऊन द्यावी आथवा नख्तच दरमाहा देत जावा कलम

१ सिबंदी वारावार जाहाल्यावरी उभयता सरदार देसी येतील तेसमई श्रीमंतासहि समागमे घेऊन येतील कलम.

१ श्रीमंताजवल उभयता सरदाराकडील स्वार प्यादे मिलोन पाचसे चाकरीस राहावे. यैवज सिबंदीस लागेल तो सरकारांतून द्यावा. सरदार हिंदुस्थानात स्वारीस जात तोवर सरदाराकडील सिबं(दी) आसावी कलम.

१ कबिले ब्राम्हणाचे व मऱ्हाठ्याचे कैदेत असतील ते उभयता सरदार देसी येतील आणि रदबदल करितील तें सोडावे.

+ येथून अक्षर निराळें. अशाच मजकुराचें दुसरें पत्र करवीरकर शिवाजीचें सखारामबापूस रा. श. १०० जयसंवत्सर, वैशाख शुद्ध ३, सौम्यवासरचें आहे, म्हणजे ता. ११-५-१७७४ येतें.

१ फितुरियांचे पारपत्य येथायुक्त करावे.

१ नवाब बसालतजंग याचे पुत्रास सोडऊन द्यावे.

येणेप्राो सरदाराचे मते याद ठरली ते पाठविली असे. दादास उभयेता सरदारानी पुण्यास घेऊन यावे. येविसी उभयताचे सिक्यानसी दस्तायैवजी कागद लेहून घेतले आसेत. आपणास कलावे.

¶*These are the terms that were mutually agreed upon between Raghunathrao and the Barbhais. Raghoba however refused to abide by these terms and fled.*

---

*No. 49]* *[24-5-1774*

पाो छ १७ रोावल सन
आर्बा

**श्री**

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
उभयेता स्वामींचे सेवेसी

पाो कृष्णराव बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १२ राावल पाो वर्तमान येथास्थित असे विशेष. इंदुराहून राजश्री उभयेता सरदारांची पत्रे व गुरुजी, नागो राम, मोरो गिरमाजी याची पत्रे आली ती व श्रीमंत रा दादासाहेबाचे मजकुराची याद व पत्रें पाा आहे * * * * * * दित * * * श सरकारच्या फौजा मातबर व मोगल मिलोन दिवसगत लागल्यास भारी खर्च, यास्तव मसलत लाबवणें यास करोडो रुपये पाहिजेत, यास्तव श्रीमंताची सिबंदी लौकरच वारून त्यांजकडील जाबसाल उरकून घ्यावा, या अर्थी सिबंदीचा यैवज कबूल करावा लागला. त्यासी लौकरच कामाचा उलगडा तेच करण्यांत आणावे लागते. याचे विस्तार अर्थ राा हरिपंत तात्यानी लिा आहेत त्याजवरून कलों येतील. बहुत काये लिहिणें लोभ आसो दीजे. हे विनंती.

¶*Krishnarao Ballal communicates to Nana Fadnis and Sakharam Bapu the terms proposed by Raghoba through Sindia and Holkar and requests their acceptance as protracting the negotiations will be most costly in the end.*

No. 50] [29-5-1774

पो छ १७ रोवल
सन आर्बा रविवार
त्रितीये प्रहर

**श्री**

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी
यांसी

⑦ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री माहादजी सिंदे दंडवत विनंतीं उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. श्रीमंतामागें सरकारची फौज लागली, यामुळें तडक आजंठ्याचा घाट उतरून पलत पलत खांदेशात गेले. कदाचित नर्मदा उतरतील तरी तुम्ही घाटाची बंदोबस्ती करून आडवें व्हावें म्हणोन आपली पत्रें येत गेली. त्यावरून लोकांचे तोडीस उजनीत कारकून टाकून बाहेर निघालो. लोक पागा तयार होऊन यावयासी येक दोन दिवस लागले. इतक्यात श्रीमंत बऱ्हाणपुराहून पंचवीस पंचवीस कोसांच्या मजली करून सेमरुडीस आले. राजश्री तुकोजी होळकर जाऊन भेटले. दुसरे दिवसी आम्ही आलो. भेटी जाहल्या. श्रीमंत आपण होऊन आले, त्यासी निकर्ष करावा अगर भीड धरून जाऊ द्यावे, हे दोन्ही अर्थ न घडेत, तेव्हां भानगडीचा जाबसाल लाविला आहे. लोक श्रीमंतासी सिबंदीची निकड करितील तरी त्यांस नख्त रुपया देऊन तोड पाडली पाहिजे. येविसी राजश्री माहादाजीपंत गुरुजी आपणास लिहितील, त्याचे उत्तर पाठवावें. आमचे वोढगस्तीचा प्रकार आपले ध्यानातच आहे. श्रीमंतास अनेक प्रकारे संबोधने देऊन वाटेवर आणावे, हीच विवंचना रात्रंदिवस आहे. रा। छ ३ रौवल बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*In reply to Nana Fadnis who asked him to prevent Dadasaheb proceeding northwards, Mahadji Sindia says that he could neither allow him to proceed nor join issues with him. He has however,—he says,—detained him on the way.*

---

No. 51] [1-6-1774

पौ छ २७ रोवल सन
खमस

**श्रीरामोजयति**

सेवेसी बाळाजी नारायण सोवनी कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २० रौवल मुकाम बऱ्हानपूर यथास्थित आसे विशेष. सेवेसी

दोन च्यार पत्रे पाठविली ती पावली असतील. इकडील वर्तमान तर श्रीमंत इंदुरास आहेत. सिंदे होळकर यांची पत्रे परवाचे दिवसी आली होती की, येथील बोलण्याचा गुंता बहुतकरून उरकला आहे. याउपरी श्रीमंतास घेऊन लवकर निघोन येतो. इंदुरातून निघाल्यावर पुढे फौजा नरमदेवर आहेत, त्यानी माघारे जावे याजप्रमाणे लिहिले होते. सेवेसी निवेदन व्हावे म्हणौन लिहिले आसे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Narayan sends news about Raghunathrao from Indore.*

---

*No. 52]* [*2-6-1774*

असल प्रा नकल

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री गोविंद हरि कादार पा साखरखेडले गोसावी यासी प्रति मातुश्री गंगाबाई असीरवाद सुा आर्बा सबैन मया व अलफ. सिलेदार नि‍ा सरलस्कर * * * कडे पा मजकूर येथील मोकासा देखील जकात * * * बेगमीस सरजाम बितपसील.

१ सुभानजी आटोले धुरंधर समसेरबहादर यांजकडे फुट मोकासी खेरीजकरून अमल आहे तो

१ हणमंतराव आटोले सफेजंगबाहादर ता नानेफल पैकी देहे ९ नव

१ हणमंतराव बिन गिल्यानजी (?) आटोले यांजकडे मौजे निसरूल

---

३

येकूण तीन आसामी याकडे लिहिल्याप्रो अमल चालत आहे त्यास मारनिले तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे चाकरीस आहेत, सबब सदरहूची जफ्ती करून कमाविश तुम्हास सांगितली असे. तर अमल चौकसीने करून आकार होईल, तो सरकारात पावता करणे. जाणिजे छ १ रोवल आज्ञाप्रमाण मोर्तब.

¶*Government orders to Govind Hari to take possession of the villages granted to Subhanji and Hanamantrao Atole as they have joined Raghoba Dada.*

5975

No. 53] [2-6-1774

पो छ २९ रोवल

सन खमस

**श्रीगणपति**

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री

**उभयेता स्वामीचे सेवेसी**

पोष्य पुरुषोतम कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २१ रबिलावलपरियेत श्रीत्रिबकेश्वरी क्षेमरूप असो विशेष. आपण पत्र सोलावे रबिलावलचे पाठविले ते चंद्र येकुणिसावे रबिलावली प्रातकाली प्रहर दिवसास पावले. लिहिले वर्तमान कलले. किलेचे वर्तमान हस्तगत जाहालेचे लिहिले आहे. कोणाचे स्वाधीन करणे म्हणून पत्र येईल त्या पत्रांचा मार्ग पाहत आहे. माहागाई फारच जाहाली आहे. आज्ञेप्रमाणे राजश्री आबा हशमनिसाचे पत्र मोलेरीस रवाना केले. राजश्री कासीपंताची रवानगी गंगापुरास करतील. येथील लोकहि मोलेरीस रवाना केले आहेत. लक्षुमणपंत किलेकराकडून राजश्री आबाकडे आला आहे. आपणाकडे किलेकराचा कारकून आला आहे, असे कलले, त्यावरून लिहिले आहे. श्रीमताकडील व उभयेता सरदाराचा मजकूर लिहिला तो कलला. सदैव पत्री सांभालीत जावे. कृपेचे इछक आहो. श्रीमंत मातोश्री बाईसाहेब गंगापुरी आहेत. किला कोणाचे स्वाधीन करावा म्हणून विनंती केली, त्यानी आज्ञा केली की उभयेता आज्ञा करतील त्याप्रमाणे वर्तणूक करणे. येथे सतंत्र काही कारभार करावा ही वासना काही त्याची नाही. प्रातःकाली स्नान करून देवदेव करावा, धर्म करावा, हीच वासना आहे आणि करीतहि आहेत. भूतदया आहे. कोणावर राग करावा हे मानस नाही. आपण उभयेता करिता हे उतम मानीत आहेत. बहुत काय लिहिणे कृपा लोभ करावा हे विनंती.

*¶Purushottam Krishna (Patwardhan) awaits orders from Poona as to whom he should hand over the fort of Trimbak. He also says that Gopikabai does not wish to interfere in political affairs but leaves them to the two addressees at Poona. She passes all her time in religious occupations.*

---

No. 54] [7-6-1774

**श्री**

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रणसोड कृष्ण संजगिरे मो मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २६ माहे रबिलोवल पावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून

सेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. देवजी सिरोले व येसाजी काले जासूद-जोडी यासमागमे सेवेसी बातमी वर्तमानाचे विनंतीपत्र रवाना केले आहे. त्याचा मजकूर निवेदन जाहालाच असेल. उपरांत कितेक दिवसीं मल्हारी जासुदाबरोबर आज्ञापत्र पाठविले ते छ २१ मजकुरी सादर जाहाले. लिहिला अर्थ सविस्तर कलला. येशास सरकार ममतेचे सध्या तीन इंग्रेज मातबर कोसलदार पहिले-पासोन आहेत. त्यास काही बहुमानाची यादगिरी व्हावी व पुढे हरयेकविसी विशेष सरकारउपयोगास पडावे म्हणोन वारंवार सेवेसी विनंती केली की, बहुमानाची व पत्राची मर्जीस येईल ते आज्ञा करावी. त्याजवर सेवकास हालीं आज्ञा केली जे बहुमान काये पाठवावा, त्याची योगता काये? त्यास आम्ही काये सांगावे? धन्याचे नाव व मानिले त्रिवर्गाची मातवरी व येकनिष्ठता समजोन कोणास न कलता येकांती काये ते मेहरबान व्हावे. रोख ऐवज घेणार नाही. काही तोफा[१] जिनस अथवा दागिने असिल्यास खूश होतील. यानंतर तीपैकीचा इंग्रेज पुण्यास येणार व सरकार कामकाजे करून देणार येविसी पेसजी येकदोनदां स्वामीची आज्ञा आली होती, की आमचा येक कारकून शाहाणा पाठऊन द्यावा. मनसुबा मनास आणून काये ते उतर केले जाईल. त्याचा जाब तेच समई पाठ-विला येसा जे, बोलीचाली इंग्रजाकडील आहे त्यांची पांच कलमें सेवेसी रवाना जाहाली. मर्जीस आल्यावर सरकारचे पत्र जनरालास असावे त्याप्रमाणे इंग्रेजाची रवानगी होईल. व तेथे रुबरू मोडतोड करून करार करणार स्वामी धनी समर्थ आहेत. येसे असतां शब्द लाऊन लिहिले तर आम्ही आज्ञासिवाई काडी-मात्र कोणे गोष्टीची वर्तणूक करणार नाही व इंग्रेजासहि परवानगीखेरीज नेणार नाही. जे कलमे इंग्रेजाची मागें पाठविली होती, तींच आलाहिदा सेवेसी जात आहेत. इंग्रेज घडीघडी जाबाविसी पुसतात, यास्तव सेवेसी ल्याहावे लागते. व दोकडेस (दोनहीकडे) आंग पाहून प्रविष्ट करितो. वरकड दुसरेकडून बातम्या जातात त्यात हा विकल्प नाही. असो आम्हास जे आढळतें तेंच वरचेवर विदित करितो. सेवेसी श्रुत होये स्वामीचे पायाजवल सहसा लटके लिहिणारच नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ranchod Krishna, Peshwa's agent at Bombay, requests that some presents—cloth and ornaments—should be sent to three councillors at Bombay in order to secure their good will in favour of the Peshwa.*

---

१ भेट, नजराणा.

5977

No. 55] [11-6-1774

पैवस्तगी छ ९ रबिलाखर सुरु खमस सबैन जेष्ट.

श्री

राजश्री राऊ पंडित

प्रधान गोसावी यांसी

७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल राम राम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्रिकाप्रेषण केली ते उत्तम समई प्रविष्ट जाहाली. श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याणी पेशवाईचीं वस्त्रें बहुमानपूर्वक दिल्हीं तीं छ १६ रबिलावल वैशाख वद्य चतुर्थीस वीस घटिका रात्रौ सुमुहूर्तें करून घेतलीं म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐशास पत्रार्थ श्रवण होऊन कोट्यावधि आनंद जाहाला. एसेंच सदैव पत्रद्वारें लेखनाज्ञा केली पाहिजे. रवाना छ १ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणे कृपा करावी हे विनंती.

¶*Raghoji Angria congratulates the Peshwa on receiving the robes of the Peshwaship from the King.*

---

No. 56] [12-6-1774 ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री हरिपंत तात्या स्वामींचे
सेवेसी

पोा सिवाजी विठल कृतानेक साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २ राखर रविवारपर्यंत येथास्थित आसो विशेष. येथील वर्तमान राजश्री आपाचे पत्रावरून कळलें. रविवारी श्रीमताचे कूच उभयेतां सरदारसुधां व्हावे यैसे गुंता आठ पंधरा दिवस पडलेच. आमच्या खर्चाचा प्रकार दरमाहा तीस हाजार पाहिजेत. त्यांज पैा कैलासवासी मामानी पंधरा तूर्त देविले. बऱ्हाण-पुरचे मुाा आपल्यास सरदारीची बोढगस्ती सांगतलीच होती. त्याजवरी आपण दाहा हाजार पाठविले तों येक रोजमरा सिलेदारीचा जाला. पुढे चंदीस व दीढमाहीस ठिकाण नाहीं. लोकाचा गवगवा, अखेरसालचे दिवस, लोक सडे, येथें साहुकारा नाहीं, कर्ज न मिळे; चहूंकडून संकटांत आहोंत. माहालची अवस्ता तो सिहूर दुहारा वगैरे च्यारी माहाल पेंढारी याणी लुटून पस्त केले.

त. ३ न. ता. सुरत

लावणीचा हांगाम माहाली बखेडा, पेाा उरपाड प्रांत गुजरात येथील ठाणे राजश्री बाबूराव हरि याचे पुत्रानी उठविले, तेथील मामलेदार उठून सुरतेस आले. माहालची अवस्ता आपण परस्परे ध्यानांत आणावी. येविसई वारंवार ल्याहावे यैसे नाही. खर्चाची विपत्य बहुतच आहे. माहागाई जाली आहे. श्रीमंताची मसलत तो लांबली; यांजकरितां आपण चितावरी घेऊन तूर्त रुपये तीस हाजार द्यावे म्हणजे आमची स्थित राहील. येथे कर्जवाम मिलतें तरी आपल्यास संकट घालावे यैसे नाहीं. काही उ (अपूर्ण).

¶*Shivaji Vithal asks for a supply of funds in order to pay his troops.*

---

*No. 57*] [*25-6-1774*

पो छ ६ जोवल सन
खमस सबैन

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जगनाथ नारायेण मेाा किले अशर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ रााखरपावेतो किले मजकूरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र छ २० रबिलौवलचे सादर जाहालें की श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याणी पेशवाईची वस्त्रें छ १६ रोावल वैशाख वद्य चतुर्थीस वीस घटका रात्रीस दिल्ही. पत्र पावोन बहुत आनंद जाहाला. पत्री आज्ञा कीं किले आशेर येथे साल मजकुरी गडबडीमुलें बेहेड्याचे नेमणुकेपेक्षा जाजती लोक ठेवणें म्हणोन हुजूरची आज्ञा नाही व तुम्हीहि ठेविले नसतील. कदाचित ठेविले असिल्यास त्याचा पैका परिछिन मजुरा पडणार नाही म्हणून आज्ञा. यैसियास आवईने सेवक कचापका व्हावयाचा नाहीं व दरकार नसता सिबंदी ठेऊन सरकारनुकसान करणार नाही. परंतु श्रीमंत राजश्री दादासाहेब तीही कोसावरून किल्यापासून गेले. किल्याचा व पेठेचा बंदोबस्त राहिला पाहिजे हे जाणून पनास साठ माणूस जाजती ठेवणे पडले. मागाहून फौज आली ती तमाम मुलूक लुटीत जालीत चालली, तेव्हा रयेत पाहाडात गेली. तेथे चोरट्याचें भय. मैदानात फौजेचे भय. तेव्हां रखवालीस माणूस ठेवणे पडले. परंतु बेहेड्यासिवाये बहुतसा जाजती खर्च होणार नाही. कसोसी होतां होईल ती करून वर्तणूक करीत आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Jagannath Narayan, keeper of fort Asher, explains to the Peshwa why he was required to strengthen the garrison.*

5979

No. 58]

[June 1774

श्री

पुा श्रीमंत तात्या स्वामीचे शेवेसी

विनंती यैसीजे. उभयता सरदारांची पत्रे आपणाकडे सर्वदा येतात; त्यावरून याचे येण्याचा निश्चय बोलण्यातहि येतो. आंतरंगाचा भावार्थ की, उभयता धणी. आपण कोणासी झुंजावे? समान बल जबर आहेत. जोपर्यंत झुजतां येक धणी सबल ठरल्यास त्याजकडे सहजच जाणे पडेल किंवा दोन्ही थकतील आणि सलुखावर येतील तर आपण दरम्याने पडोन सलूख करून द्यावा. तोपावेतो आपण आपलाल्या जागाच श्वस्त राहावे. यैसेकरिता आपण देसी जावयास निघोन गेलों, तर श्रीमंत सौवती आनंदीबाई वर्तमानकाली जबर जागेस धारेच्या किल्यात बसली आहेत ती आपल्या जाहागिरीत दंगा करितील. वरदाखल मालवा आहे त्यात बखेडा जाल्यावर शेवट कसा लागतो? येणेप्राा या उभयताचा भावगर्भ दिसतो. वारंवार आपण लिहावयाकरितां आज्ञा होईल यास्तव मथितार्थ यैसा आहे. श्रीमंत दादाकडील सरदार व इग्रजा भेदार्थ ज्या द्वारे होईल तें बुध्धी विचारणी आनेक प्रेत्नी आलस नसावा. बुध्धीबलें सर्वार्थप्राप्ति आहे. कदांचित युध्धप्रसंगच कर्तव्यता जाल्यास दावधावे प्रथमता फत्ते होय यैसाच योग वडल्यास सर्वत्र द्वामुशणी जे आसतील ते आपल्याकडे येकाग्रतेने साहेकार होऊन सर्वार्थ होतील. आपण सर्वज्ञ मी अल्पज्ञ, परंतु शेवकाही यथामति विनंती करावी. सूर्यापुढे काढवात त्याप्राा लेखन असे. निरंतर पत्रीं साभाल करावा. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer reports to Haripant Tatya the attitude of Sindia and Holkar who are reluctant to espouse the cause of either of the two—the Barbhais or Raghunathrao. He further advises the addressee to try to effect defection in the following of Dadasaheb.*

---

No. 59]

[July 1774

श्री

राजश्री दिनकरपंत स्वामीचे सेवसी

विनंती उपरी. सुलतान सांडणीस्वारासमागमे पत्र पाठविले ते पावले असेल. पुरंधरास जाण्याचे निमित्य इंदुराकडील कांही विशेष वर्तमान नाही. सिंद्यासी व मानाजी फाकडा यासीं काही कटकट जाली. होलकर दुरोखी आहे. त्याचा भरवसा नाही. आपल्याआपल्यांत संषये धरितात. याच्या फौजा आलीकडे

आहेत. [1]श्रीमंत लवकरच इंदुराहून निघोन कराराप्रमाणे इकडे येणार. संषयाची गोष्ट अद्याप दिसत नाही. मग न कळे. सासवडाहून पुरंधरास यावयास कारण गावात राहाणे ठीक नव्हे. माचीस राहिल्यास बंदोबस्त खातरजमेचा; यास्तव निघोन गेले इतकाच अर्थ. विशेष नाही. आपणास कळावे म्हणोन लिहिले आहे. बंगल्याचे बागेचे काय जालें? बागाचा फरचा कसा जाला ते सविस्तर लिहावें. चिरंजीव नीलकंठराव पुणियास आज येतील. किल्याची हवा सोसेणा यास्तव चयार दिवस पुणियास येणे तरी येऊ. राजश्री नारोपंत नानाहीं कारकुनाविशीं राजश्री नानास सांगितलें. त्याणी कबूल काही केलेसे जालें. त्यास हाली नाना म्हणतात राजश्री बापूजवळ बोलावयास नाना जवळ असल्यास उतम. आम्ही बोलू, परंतु ते असल्यास उतम. त्याजउपरी आम्ही उतर केले की ते पुणियाहून आज्ञेसिवाये कसे येतात. उगेच येणार नाहीत. याप्रो बोलिलो. परंतु पुढे उतरं जाले नाही. हे वर्तमान नारोपंत नानास सांगावे. [2]बेहाड्याचे वेलेस जरूर यावे लागेल. आपण येत नाहीत तरी कारकुनाचे वगैरे काम येथ स्थित होणार नाही. येक दिवस येऊन जावे. याची बेहाड्याविशीं ताकीद फार आहे, की लवकर समजा (अपूर्ण.)

¶*The writer explains why Nana and Bapu left Saswad and went to Purandhar. He refers to a quarrel between Mahadji and Manaji Sindia and to the vacillating temperament of Holkar.*

---

*No. 60*] [*17-7-1774*

पौ छ १२ जावल.

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य**
**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे**
**सेवेसी**

पोष्य जंगनाथ नारायण मो किले आसेर कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ माहे जावलपावेतो आपले कृपेकरून असे विशेष. बहुतां दिवसी कृपा करून पत्र पा ते पावले. राजश्री हरिपंत तात्याकडील बातमी वरचेवर लिहावी व नवाबाकडील वगैरे वर्तमान लिहावे म्हणून लिा त्यास, तात्या फौजसुधा सुखरूप महेस्वरास दाखल जाले. अहिल्याबाईनी मेजवानी केली होती.

---

१ रघुनाथराव दादा परत येण्याचा करार इंदुरास जून १७७४ त ठरला.

२ बेहाडा = Budget estimates.

मर्दानेयाचे घाटे नर्मदा उतरणार. बराणपुराकडून येणार आहेत. अहिल्याबाईनी सिंदे यांस भेटावयास तात्यास राहाऊन घेऊन बलाविले आहेत म्हणून बातमी. कलावे. नवाब बालापुरावर आहेत. अवरंगाबादेस छावणीस येणार. राजश्री मुदोजी भोसले याचा तह नवाबानी केला आहे की, नागपुरास स्वस्त राहावे, श्रीमंत दादासाहेबाचा पक्ष धरू नये याप्रो करार केला आहे. पुढे होईल ते पाहावे. मा। इसफ गाडदी भोसले याजवल चाकर होता तो दूर करविला. तो सौभाग्यवती श्रीमंत मातुश्री आनंदीबाई धारेस आहे त्याजकडे गेला. हांडे सरकारात गेला आहे. जमयेत गाडदी २५०० व स्वार ५०० बराबर आहेत. राजश्री तात्यास त्याचे पारिपत्याविसी लि॥ आहे. सोई पडेल तर करितील याप्रो मजकूर आहे. स्वामीस कलावे म्हणून लि॥: बहुत काय लि॥ लोभ करीत जावा हे विनंती. तुम्हाकडील जासूद येथे आले होते, त्याजबराबर माणसे देऊन महेस्वरास रवाना केले. कलावे हे विनंती.

*¶Jagannath Narayan informs Naropant that Haripant Phadke has arrived as far as Maheshwar and has been asked to stop there by Ahilyabai in order to confer with Sindia. He also writes that the Nizam has prevailed upon Mudhoji Bhonsle not to join Raghunathrao. " Muhammad Isaf has been dismissed from service by Bhonsle and gone over to Anandibai at Dhar with his force."*

---

*No. 61]* *[28-7-1774*

पो छ २६ जमादिलावल
सु॥ खमस अशाढ मोक-
लिकेची यादी लिहिणें.

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी

विनंती उपरी. राजश्री रामचंद्रराव पवार सिलेदार हे तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबांकडे चाकरीस होते, सबब यांच्या सरंजामाची जप्ती केली आहे; त्यास मशारनिले तिकडून सरकारचे फौजेंत हजीर जाहाले, सबब यांच्या सरंजामाची जफ्ती जाहाली आहे ती मोकली करणें. जा[1]णिजे छ १८ जमादिलावल सु॥ खमस सबैन मया व अलफ, ब[2]हुत काय लिहिणें हे विनंति.

*¶Naro Appaji is asked to release the Saranjam of Pawar which had been confiscated as he has left the side of Raghoba and returned to the Barbhais.*

---

१ येथून तेरीख नाना फडणविसाचे हातची. २ यापुढील मजकूर सखाराम बापूचे हातचा.

*No. 62]* *[7-10-1774*

पौ छ ८ सवाल
सन खमस सबैन

श्री

**श्रीमंत माहाराज राजश्री पंत**
**प्रधान साहेबाचे सेवेसीं**

विनंती सेवक शंकराजी खंडेराव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा आस्विन शुध्ध द्वितीया माहाराजाचे कृपावलोकने यथास्थित असें विशेष. आज्ञापत्र सादर जाले ते शिरसावंदन केले. पत्री आज्ञा राजश्री मुधोजी भोसले व हैदरनाईक व गोविंदराव गायेकवाड यांजकडे वगैरे फितुरी जागा सिलेदार वगैरे चाकरीस गेले असतील त्यांची घरे ठिकाणी लाऊन जप्त करून त्यास कागद लेहून लवकर घरी आणावेत व पुढे फितुरी सरदाराकडे चाकरीस जाऊ नये यैसे, आणिक सिलेदार राहत असतील त्यास जमीदार जामीन घ्यावेत म्हणौन [illegible]; तदनुसारे जागाजागा शोध करून वर्तनूक करू. साहेबी स्वकीय प्रतापाधिक्य लेखनद्वारा आज्ञाधारकास संतोषवृद्धि केली पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

*¶Shankraji Khanderao to the Peshwa, saying that he has executed the orders regarding the confiscation of property of men who had joined Mudhoji Bhonsle, Haidar and Govindrao Gaikwad.*

---

*No. 63]* *[November 1774*

श्री

**श्रीमंत राजश्री बापू**
**स्वामींचे सेवेसी**

सेवक बाबूराव विस्वनाथ वैद्य कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ सवाल मुाा (ना)गपूर स्वामींचे कृपेकडून वर्तमान येथास्थित आसे वि(शेष). (आ)पण पत्र छ १३ रमजानचे पाठ * * * * * छ २६ मिनहूस पावले. तेथे आज्ञा (श्री)मत कासारबारीच्या सुमारें (आले त्यांजक)डील जाबसाल उभयेता सरदारा * * (वि)द्यमाने आहे. परंतु त्यांतील जाब म्वा(ल) * * * थून तेथून लेहून जावयास दिव * * * लागेल. लौकर निकाल पडणार नाही याजकरिता आंम्ही उभयेता कार्तिक वद्य ५ पंचमीस येथून निघोन कार्तिक आखेर टोकेयास येतो. तुम्ही राजश्री सेनासाहेबसुभा यास घेऊन

लौकर आपले फौजेत मिलोन मलकापूरचे सुमारे राहावे. राजश्री हरिपंत लिहिती त्याप्रा सावध आसावे म्हणोन आज्ञा. त्यास इकडील वर्तमान तरी राजश्री विठलपंत सुभेदार वगैरे सरदार बालापूरचे सुमारे राजश्री हरिपंत तात्या याचे आज्ञेप्रा होते, त्यांत याणी येऊन येकत्र होऊन मलकापूरच्या सुमारे आसावे, जैसी मसलत पडेल तैसे करावयास येईल हे योजनेत होतो. येथील फौजेची समजावीस नाही. पैकेयास जागा नाही. काम सुस्तीखाले पडले. याअर्थी येजमान कारभारी यात विक्षेप. त्यातहि कारस्थानी करून उपयोगी पडावे यैसे विचारणेत आसतां राजश्री सेनाधुरंधर व इस्माइलखान व महमद इसफ व झामसिं(ग) याणी फौजेची समजावीस करून श्रीमंताकडे जावे यैसे योजिले. दरम्याने * * * निभाव न पडे किंवा उभयेता * * * * करारत गोष्ट नाही ते जाहाली * * * * घड पडेल ते कैसे येऊ देतील? या * * * * तिकडील रोख टाकून नागपूरची * * (ध)रिली विसंच फौजेचा गला * * (फा)टका कारभार ठीक नाही, हे बातमी त्या * दीनच्ययेंची होतीच या संधीत गाठावे या मनसबेयावर राज श्री सेनाधुरंधर व गार(दी) मजल दरमजल किले आमनेरास आले. तेथील किलेदार भेटले. तेथे बुलगे टाकून येतात हे बातमी आली. तेव्हा छ १० रमजानी राजश्री सेनासाहेबसुभा डेरेदाखल जाहाले. राजश्री विठलपंत यांस निकडीची पत्रे व हातचिठ्या गेल्या, की रात्रीचा दिवस करून समयास येऊन पोहचावे त्यावरून ते आडवे आले. यानी येथून कूच करून पुढे जावे तरी विनापैका कैसे घडते? पैकेयास तर ठिकाण नाही. संकटात पडले. आपण व कारभारी यानी सावकाराच्या घरास जावे परंतु ताल न पटे. दिक जाहाले. मोठ्या संकटे येजमानानी व दिवाकरपंत व उभयेता भवानीपंत व सर्व मुछदी मिलोन दाह लक्षाचा यैवज ठराविला. आम्ही व राजश्री नाना नित्य जात होतो. पुढे हिसेब पाहोन लोकास पैका द्यावा आणि निघावे. विठलपंत व आपण येक होऊन गाठ घालावी त्यास दोन वर्षा(चे) हिसेब, देणे मबलग, यैवज थोडका, वरचेवर कैसे उरकते? परंतु * * * चिठीवर घेऊन करीत आहेत तो विठलपंत * * * बोजी मो। कठवलावर आले. दोन तीन * * * डके आहेत. ही बातमी त्यास लागली * * * * * चे करून छ २२ रमजानी गाठ पडली * * * * * जाब सुभेदारास भालेयाची * * * * गेली व रात्रहि जाहाली. हे थोडके ते * * * धलले त्यानी तेथेच मुकाम केला * * * * दिवसी सुभेदार व बरकड सरदार कलंबेश्वरचे मुकामी येकत्र जाहाले. फौज जमा केली. येथे बातमी आली, तेव्हा

काम विलग पडले यैसे जाणोन सर्व सरदार व लोक मुछदी येकत्र होऊन आळा केला. पुढे जावे तरी समजावीस नाहीं. पैका दिल्याखेरीज कूच कैसे होते? याजकरिता सुभेदार वगैरे सरदार यास आलीकडे बोलाविले. राजश्री मानसिंगराव मोहिते व आपलाजी नारायेण मागे होते तेहि आले. च्यार पाच हजार जथले. तेलंगखेडीवर याजपासून तीन कोशावर पुढे आहे ते हे येथेच आहेत. फौजेची समजोती करतात. सेनाधुरंधर यानी विचार केला की नागपुरास जाऊन फलादेश नाही. लोक नामी आहेत. तोफ व गारद व सरजाम आहे, आपण वर (?) येणार नाही. याचे फोजेची समाजिवीस नाही तोपरयेत नागपूर सोडून आपणावर येवत नाही. यावत्काल मुलकात पैका घ्यावा, फौजेचा जथ पडावा व चंद्रपुरीहून काही तोफा आणविल्या आहेत या मसलतीवर आजीवर गेले. मुलकात पैका घेतात. नागपूर चद्रपूर आलजपूर तिनी रोख धरून आहेत, पुढे कोणीकडे जातील पाहावे. हे तर अद्यापि स(म)जाविसीच्याच घोरात आहेत की * * * * आणखी आठ दाहा दिवस लागतील हा * * * * ल तेव्हा याचे येणे मलकापुराकडे * * * * त यास हे मसलत भारी आहे. ईश्वर * * * * व श्रीमत राजश्री पंतप्रधान * * * प्रतापे व आपले ममतेच्या योगे * * * धर याचे पारपत्य करून भेटीस या * * * छितात. याची चितवृती सर्व * * * * कडे आहे. परतु आवघडोन कुपेची * * * हेत. याचा पेच (वारणे) आगत्य स्वामीस आहे. आपणाकडून पत्रे येतात तेव्हा राजश्री सेनासाहेबसुभा विव्हल होतात की आम्ही काहीच केले नाही. त्याकडून पत्रे निकडी (अपूर्ण)

¶*Baburao Vishvanath Vaidya writes to Sakharam Bapu about the straitened conditions of the Bhonsle brothers, on account of which, he says, the forces could not be mobilised and kept ready. He further says that Mudhoji along with Ismailkhan and Muhammad Isaf wishes to join Dadasaheb who has already gone as far as Kasarbari.*

---

*No. 64*] [*About 6-11-1774*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**बाबूरावजी स्वामीचे सेवेसी**

पोष्य बाबूराव विस्वनाथ वैद्य कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम तागायत छ रमजान मुकाम नागपूर जाणोन स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कललें.

येसेंच सदैव पत्रोतरी परामृष करीत जावा. इकडील वर्तमान तरी पेशजीं येक दोन पत्रीं लिहिलेंच आहे त्यावरून कललेच असेल. आलिकडील वर्तमान तरी राजश्री सेनाधुरंधर व इस्माईलखान व महमद इसफ गारदी व झामसिंग याणी मसलत करून फौजेची समजावीस केली. काही फौज गारद नवे मेळऊन फौजेचा जथ केला. याणी श्रीमंताकडे जावें येसें योजिलें. त्यास वाटेवर राजश्री हरिपंत तात्या व विठल बलाल सुभेदार सोय न होय याजकरितां श्रीमंताकडे पत्रें पाठविलीं कीं मानाजी फाकडे व आणखी कांहीं फौज तिकडून यावी. त्याणी याणी येक होऊन मग जावें. त्यास तो प्रकार तिकडून न घडला. तेव्हां नागपुरावर यावें. येथील गर्गशा त्यास समजलाच होता, त्याअर्थी मजल दरमजल इकडे चाल धरिली. येथें बातमी आली त्यावर येथें गडबड फार जाहाली. कोणेही प्रकारें सेनासाहेबसुभा यानीं बाहिर निघावें त्यास येथील फौजेची समजोती नाहीं. पैका नाहीं चौंकडून विलग, तेव्हां सर्व मुछदी व सावकार यानी पैकेयाची सोय करून दिली. आतां फौजेची समजोती करून पुढें चालत आहेत. सविस्तर अर्थ श्रीमंतास लिहिला आहे त्यावरून ध्यानांत येईल. आम्ही तेथून आलों तेव्हां आपली आमची भेट न जाहाली, त्यास रावजी! आम्ही आपले भरवसियावर निश्चिंत आहों. कोणे विषईं फिकीर करीत नाहीं. वस्त्रें देऊन माघारे यावें, त्यास मार्गांत दंगा याजकरितां राहिलों व येजमानहि कृपा करितात. त्यास हलीं मार्गाचा सुभता आहे. येथील कामकाज उरकून सत्वरच यावयाचें करितों. निरंतर आपणांकडील वर्तमान लिहीत जावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंति.

*¶Baburao Vishvanath Vaidya writes to Baburaoji, probably the Nagpur agent at Poona, that Ismailkhan and Muhammad Isaf, who were mobilizing additional forces and thinking of making common cause with Raghoba, were prevented from doing so by Haripant Phadke.*

---

*No. 65]* *[22-11-1774*

**श्री**

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासीं सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्रे छ १३ रमजानची पाठविली ती पावोन लिहिला मार विदित जाहाला. फौज नेमणुकेपैकी काही सामानानिसी आली. झाडून लोक अद्याप आले नाहीत. बालाजी खंडेराव पागासुधा अद्याप आले नाहींत. त्यास लौकर यावयाविसी आज्ञा व्हावी. बलवंतराव धोंडदेव नासिक प्रांती आहेत. तलेगावापासी घाट उतरोन कोंकणातून सुरत अठाविसीत जाणार होतो. त्यास घाटाखाली दाणा मिलणार

नाही. झाडी बहुत; मागाहून सिलेदार येतील त्याची सोय नाही. याजकरिता राजश्री गोपाल नाईक याचे विचारे त्रिंबकेस्वरापासी घाट उतरोन जावे असें ठरले. त्यास मुकाम न करिता त्रिंबकेस्वराजवल घाट उतरून जातो म्हणोन लिा ते कलले. उतम आहे. मध्ये मुकाम न करिता चोहीकडील बातमी चांगली राखोन जाणे. बालाजी खंडेराव व बलवंतराव धोंडदेव यास पत्रे तेथून पाठऊन लौकर आणवणे. आपाजी पायगुडे याचे पथकाचे स्वार आसामी १९२ येकूण आठवडा रुपये ९८८ पाचसे आठ्यासी रुपये आकारात आले नाहीत म्हणोन लिहिले. त्यास सनद येथून जाईल त्याप्रमाणे आठवडा गणती घेऊन देत जाणे. जाणिजे.[१] छ १७ रमजान. आज्ञा[२] प्रमाण.

बार

¶*Naro Anandrao is asked to proceed to Surat expeditiously.*

---

*No. 66*] [*22-11-1774*

**श्री**

**राजश्री नारोपंत गोसावी**

यास

अखंडितलक्ष्मीआलंक्रत राजमान्ये श्नो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर येथील क्षेम जाणून श्वानंद लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. तुम्ही फौजसुधा दिव्याच्या घाटाखाले येऊन उतरले. राजश्री जनार्दन रायाजी फौजसुधा आफटी फुलगांवावर होते ते तुम्ही येकत्र होऊन पुढे दर कूच आलेच आसाल. परतु भीमातिरीहून निघालियाचे पत्र राजश्री गोपाल नाईक तांबवेकराचे आलें नाही हा संदेह वाटतो. सुरतेहून सावकारी वर्तमान आले, की फैजपुरीचे मुकामी सोडून कासीद आले, परतु तुमचें व राजश्री जनार्दन रायाजी यांचे पत्र आले नाही हाहि संदेह. न कले कासीद कोठे धरले गेले की दुखण्या पडले हेहि न उमजे, किंवा तुमचें आगमन गोदातीरी जालेंच नाही हेहि उमजत नाहीं. यास्तव सविस्तर लेहोन वर्तमान सत्वर आम्हास पावे तें करणें. राजश्री दौलत बाबूराव वगैरे सिलेदार मिलोन च्यार हजार फौज कनिष्टापासून निघोन रेवातीरास गेले, पुढे रेवा उतरून सुरत माहालांत वराता करून घेतल्या आहेत. त्याचबदल धामधूम करणार आणि मुल्हक खराब करणार, यास्तव तुमचे आगमन सत्वर सुरत प्रांते होये तो अर्थ करणें, म्हणजे ते माहालात धामधूम करूं पावणार नाहींत.

---

१ नाना फडणिसाचें अक्षर. २ येथून निराळें वळण.

यास्तव सत्वर आगमन फौजसुधा होये तो आर्थ कीजे. रा दौलतराव गेले यांजमुळें गकारीयापासी फौज आहे त्याचा धर सुटला. यास्तव तुमचें आगमन फौज सुधा सत्वर जालिया महदकार्य सहजात सिधीस पावेल यैसा समये आहे. येविसीं विशेष ल्याहावे यैसे नाहीं. श्रीमंत तापी उतरले. भडगाव पाचोरे येथे आले यैसे वर्तमान आले आहे. यास्तव त्याची बातमी वरचेवर राखावी. त्याचे फौजेची व आपले फौजेची धडक भेट न होये तो आर्थ कीजे. सारांष फौजसुधा आगमन सुरत माहालात सत्वर होये तो आर्थ कीजे. निरंतर वर्तमान वरचेवर लिहीत जावे. रा छ १७ माहे रमजान बहुत काय लिहीणें.

*¶Fatesing Gaikwad to Naropant Keskar, asking if he had left the river Godavari and when he could be expected to arrive in Gujarat, where Doulat Baburao was sent ahead by Raghunathrao to help Govindrao Gaikwad.*

---

*No. 67]* *[29-11-1774]*

पौ छ २ सवाल मार्ग.
सीश सुध ४

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपर. येथील कुशल ता छ २४ रमजान जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २१ रमजानचे पत्र सगमनेरचे मुकामचे पाठविले ते पावले. लिहिला मजकूर सविस्तर कलला. आपण लिहिल्याप्रो मुकाम मजकुरास आलो. येथेच मुकाम करून राहावे तरी सरकारच्या माहालास उपद्रव लागतो यास्तव सिनरचे सुमारे जात आहो. त्यास श्रीमंत कोठे आहेत, आपला मुकाम कोठे आहे, कोणत्या रोखे येणार, आम्ही पुढे वर्तणू (क) करावी म्हणौन लि। ते सविस्तर कलले. त्यास इकडील मनसुबा लाबणीवर आहे. सरदार श्रीमंतासी बोलतात, परंतु ताल्यावर येत नाही. किती दिवस लागतील पाहावे. आम्ही नवाब तयार आहो. श्रीमंत राजश्री बापू नाना पुरंदराहून निघाले, इकडे येत आहेत. श्रीसतेने घडेल ते खरे. तुम्ही गुजराथेस जाणार. त्यास इकडे बलावे तर लाबण दिसते. याजकरितां तुम्ही लवकर सुरत प्रांती जाऊन शह द्यावा ही येक मसलत आहे. उभयतां लिहीत असतील

नं. ३ नं. ५९९ ता. ता. व.

व तुम्ही पुसले असेल त्याप्रो करावे. लौकर जाणे हेच चांगले. तिकडील दरवाजा तुम्ही फौज घेऊन गेला असतां बंद होईल. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant giving Naropant Keskar news of the movements of Raghoba, of Bapu and Nana and their plans, urges him to proceed to Gujarat at once.*

---

*No. 68*] [*November 1774*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी**

पोष्य हरि बलाल कृतानेक सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष, तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान कलले. आपण घरीच होतो. त्यास गडास बोलाऊन नेऊन, समागमे फौजेची नेमणूक करून देऊन, गुजराथ प्रांते फतेसिंग गाइकवाड याचे कुमकेस जावयाकरिता रवानगी केली. त्याजवरून निरोप घेऊन आलो ते लोणीस दाखल जाहालो. पुढें दरमजल नासिकचे सुमारें येऊन राहातो. पुढें आपले पत्र येईल त्याप्रो करू म्हणून लिहिलें व सरकारची फौज दोन हजार व फतेसिंगाकडील रा। गोपाल नाईक तांबेकर यांणी साडेच्यार हजार फौज ठेविली ती येकूण साडेसाहा हजार फौज देऊन रवानगी केली ते सविस्तर कलले. आपले पत्र तिकडे येण्याचे आल्यास येऊ, नाही तर नासिकाजवल गंगा उतरून पुढें जाऊ म्हणोन लि।, त्यास श्रीमंत कासारबारीने येतात. समागमे सरदार आहेत. परंतु वर्तणूक सुधी दिसत नाहीं. मुलूक लुटितात यावरून परिणाम ठीक दिसत नाहीं. आम्ही फुलबारीवरून[१] येरूलचे सुमारे येत असों. इतक्यांत श्रीमंत कोठपर्यंत येतात, काय करितात हेहि कलेल. तुम्ही संगमनेरास आलियावर आम्हास लिहून पाठवावे. आम्ही लिहून पाठऊ त्याप्रो करावे. वरकड पत्र आले नाहीं म्हणोन मनात वारंवार येत असे. परंतु तुम्ही लिहिले कीं गावी होतो यामुले पत्र पाठविले नाही. त्यास मनोमन साक्ष, तेथे पत्र कशास पाहिजे ? फौज लौकर जमा करून संगमनेरास येऊन लिहून पाठवावें. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती. दुसरे पत्र सोनोरीचे मुकामचे पा। ते पावले. हे विनंती.

---

१ फुलंब्री.

सेवेसी बाजी गोविंद सां नमस्कार विनंती. उपरी, आपण पत्र पाठविले ते पावले. सविस्तर राजश्री तात्यानी लिा आहे त्यावरून कलेल. लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant writes to Naropant Keskar, informing him of the movements of Dadasaheb and asks him to communicate, on arrival at Sangamner, for further orders.*

---

*No. 69]* *[26-11-1774*

**श्री**

**श्रीमंत राजश्री बापू**

**स्वामीचे सेवेसी**

विनंति सेवक हरि उमाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. तागायत कार्तिक वद्य ८ परियेंत आपले कृपेकरून यथास्थित असो विशेष. स्वामीची आज्ञा होऊन स्वार जालों त्यास लस्करांत पावलों. राजश्री गोविंद राव गायकवाड सेनाखासखेल समसेरबहादुर याची भेट जाली व राजश्री खंडोजी आवजी याची भेट जाली. श्रीमंत साहेबाची व आपलीं पत्रें दिल्हीं. वाचून परम समाधानाते पावले. आम्ही जाबसाल येथाज्ञानेंकरून बहुता प्रकारें समजाविलें. श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडून कारकूण व खिजमतगार जासूद येऊन बसले. पत्रें आलीं आहेत कीं फौजसहवर्तमान सत्वर यावें, आमचा मनसुभा नीट जाला तर तुमचाही मनसुभा सेवटास जाईल, यैसी बहुता प्रकारें पत्रें येत असताती. स्वामीकडेहि सलूख करितात आणि इकडे याप्रमाणे पत्रें पाठवितात हें काय वर्तमान तें ध्यानास आनावें. आम्ही राजश्री गोविंदरावबावास व खंडोपंतास प्रबोध करून सेपता करून आपल्या लगामी लाविले. तिकडे जावयाचा विचार किमपि होत नाहीं. आपल्या गोत्रीं मेलविले. आज्ञप्रमाणे तयार होऊन सेवेसीं यावयासी तयार आहेत. परंतु सिबंदीचा कैच्या भारी, पनास लक्ष रुपये लोकाचे देणे. लढा मोठा. यामुलें सिबंदीवाले येऊं देत नाहींत. थोडेबहुत सिबंदीचा कैच्या हलका होईल तेव्हां त्यांस कांहीं सुचेल. आम्ही कार्तिक श्रुा ७ याचा निरोप घेऊन बडोद्यास जाऊन राजश्री फतेसिंगराव गायेकवाड यांची भेट घेऊं. सरकारचीं व आपलीं पत्रें त्यास आहेत ते देऊं. त्याची खातरजमा करून त्याच्या ध्यानांत बाहेर निघावयाचें आसल्यास बाहेरीलहि तजवीज करतील. सोनगडापासून काठेवाडपरियंत आमल याचा आणि अरब सिदी रोहेले याचा गवगवा रोज आहे. फतेसिंगाकडे बडोदें व पटन व खेडे यैसीं तिन सेहर मात्र आहेत. वरकड झाडून याजकडे. येथें रोज लडाई होते.

राजश्री आपाजी गणेश याजकडील आमल पेटलाद व खंबायत दो ठिकानचा वसूल घेतला होता. आतां पेटलाद खंबायत याची याजकडे दिल्ही. वसूल घेतला त्याची निशा पत्री करितात. याचे कारकूण आम्हांजवलच आहेत. सावली मात्र राहिली तेहि मागतात. आपल्या चेरणासी दुसरा विचार याचा नाहीं. हेहि इच्छा करीत होते कीं आम्हांवर सरकारची कृपा असावी. त्यास पत्रें व सेवक येऊन पोहचालियाउपर फारच समाधानातें पावले. अडीच लक्ष रुपये पेटलाद खंबाईत मिलोन वसूल घेतला. त्याचा निकाल त्याजकडून करवितो. सारांश रा। गोविंदराव बावा स्वामीच्या गोत्री कायावाचामनेकरून लागले यांत आंतर नाहीं. परंतु येक अपूर्व भाशतें कीं श्रीमंत राजश्री दादासाहेब सलूखाच्या गोष्टी सिंदे होलकर याचे विचारें स्वामीकडेस येतात आणि इकडे तिकडे भानगड करितात, थागाथुगी करितात, पु हां येत्न विरोधाचे करितात हें अपूर्व असे. या स्तली यौक्ति परियौक्ती बोध करून आहे. याचीहि स्वामीच्या चेरणासी येकनिष्टता करून ठेविली आहे. याणीहि सेवेसीं पत्रें लिहिलीं आहेत ते वाचून पुन्हां समाधानयुक्त अतिसत्वर पाठवावीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Hari Umaji was sent to Govindrao Gaikwad to bring him over to the side of the Regency Council. He informs Sakharam Bapu that he has succeeded in his mission beyond expectation. Govindrao would have immediately taken field against Raghoba but for his mutinous army clamouring for its arrears.*

---

*No. 70]* *[Soon after 5-12-1774 ?*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य**

**राजश्री बापू स्वामीचे सेवेसी**

पोष नारो कृष्ण जोसी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ सवाल मुकाम नागपूर जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असिलें पाहिजे. विशेष * * * रमजानचें पाठविलें तें छ २६ मिनहू * * * तेथें आपण लिहिलें, कीं श्रीमंत कासारबारीचे सुमारें आले. त्याकडील जाबसाल उभयतां सरदाराचे विद्यमाने आहे. परंतु त्यांतील जाबस्वाल * * * येथून लेहून जाण्यास दिवसगत लागेल, लौकर निकाल पडणार नाहीं, याजकरितां आम्ही उभयतां कार्तिक वद्य ५ पंचमीस येथून निघोन कार्तिक अखेर टोके यास येतों. तुम्ही राजश्री सेनासाहेबसुभा यास घेऊन लौकर आपले

फौजेंत मिलोन मलकापूरचे सुमारें रहावें, राजश्री हरिपंत लिहितील त्याप्रमाणें सावध असावें म्हणोन लिहिलें. त्यास इकडील वर्तमान तरी, राजश्री विठलपंत सुभेदार वगैरे सरदार बालापूरचे सुमारें राजश्री हरिपंत तात्या याचें आज्ञेप्रमाणें होते. त्यांत याणी येऊन येकत्र होऊन मलकापूरच्या सुमारें असावें, जैसी मसलत पडेल तैसें करावयास येईल हे योजनेंत होतों. येथील फौजेची समजावीस नाहीं, पैकेयास जागा नाहीं, काम * * सुस्तीखाले पडले, याअर्थी यजमान कारभारी यांत विक्षेप. त्यांतही कारस्थानी करून उपयोगी पडावें यैसे विच्यारणांत असतां राजश्री सेनाधुरंधर व इस्माईलखान व महमद इसफ व झामसिंग याणी फौजेची समजावीस करून * * * कडे जावें यैसें योजिलें. दरम्यान फौजा निभा * * * किंवा उभयेतां सरदाराच्या करारांत गोष्ट नाहीं ते जाहाली याने उघड पडिल ते कैसे * * * आर्थी तिकडील रोख टाकून नागपूरची * * येथील विसंच फौजेचा गलाटा, पेका टका कारभार ठीक नाहीं, हे बातमी त्यास दिनचर्येची होतीच. या समई गाटावे या मनसबेयावर राजश्री सेनाधुरंधर व गारदी मजल दरमजल किले आमनेरास आले. तेथील किलेदार भेटले. तेथें बुनगें टाकून येतात हे बातमी आली. तेव्हां छ १० रमजानी राजश्री सेनासाहेब सुभा डेरे दाखल जाहाले. राजश्री विठलपंत यास निकडीची पत्रें व हातचिठ्या गेल्या कीं रात्रीचा दिवस करून समयास येऊन पोहचावें. त्यावरून ते आडवे आले. यानी येथून कूच करून पुढें जावे तर विना पैका कैसे घडतें? पैकेयास तर ठिकाण नाहीं. संकटांत पडले. आपण व कारभारी यानी सावकाराच्या घरास जावें, परंतु ताल न पटे. दिक जाहले. मोठ्या संकटें येजमानानी व दिवाकरपंत व उभयेतां भवानीपंत व सर्व मुछदी मिलोन दाहा लक्षाचा यैवज ठराविला. आम्हीं व राजश्री बाबूरावजी, नित्य जात होतों. पुढें हिशेब पाहोन लोकांस पैका द्यावा आणि निघावें, विठलपंत व आपण येक होऊन गाठ घालावी, त्यास दोन वर्षाचे हिशेब, देणें मबलग, यैवज थोडका, वरचेवर कैसे उरकतें. परंतु चालीवर * * * आहेत. तो विठलपंत सटवोजी भाटे काठ * * * दोन तीन हजार थोडके आहेत ही बातमी त्यास कलली. यानी कूच करून छ २२ रमजानी गांठ पडोन लढाई जाली. सुभेदारास भालेयाची जखम लागली * * * हे थोडके ते फार, हे उधलले. त्यानी तेथेंच मुकाम केला. दुसरे दिवशीं सुभेदार व वरकड सरदार कलबेश्वरचे मुकामी येकत्र जाहाले. फौज जमा केली. येथें बातमी आली. तेव्हां काम विलग पडलें, यैसे जाणोन सर्व सरदार व लोक मुछदी येकत्र होऊन आळा केला. पुढें जावें तरी समजाविस नाहीं. पैका दिल्याखेरीज कूच कैसे होतें. याजकरितां

सुभेदार वगैरे सरदार यास आलीकडे बोलाविलें. राजश्री मानसिंगराव मोहिते व आपलाजी नारायेण मागें होते तेहि आले. च्यार पांच हजार जथले. तेलंगखेडीवर याजपासून तीन कोसावर पुढें आहेत हे येथेंच आहेत. फौजेची समजोती करितां सेनाधुरंधर यांनी विचार केला कीं नागपुरास जाऊन फलादेश नाहीं. लोक नामी आहेत. तोफा व गारद सरंजाम आहे, आपण बाार येणार नाही. याचे फौजेची समजावीस नाहीं तोंपर्यंत नागपूर सोडून आपणांवर येवत नाही. तावत्काल मुलकांत पैका घ्यावा, फौजेचा जथ पाडावा, चद्रपुरीहून कांही तोफा आणविल्या आहेत या मसलतीवर आजीवर गेले. मुलकांत पैका घेतात. नागपूर चंद्रपूर आलजपूर तीनी रोख भरून आहेत, पुढें कोणीकडे जातील पाहावें. हे तर आद्यापि समजाविसीच्याच घोरांत आहेत. किमान पक्षी आणखी * * * दिवस लागतील. हा शह वारेल तेव्हां याचे * * * (मल?) कापुराकडे होईल. प्रस्तुत यास हे मसलत भारी आहे. ईश्वरी कृपेनें व श्रीमंत राजश्री * * * स्वामीच्या प्रतापें व आप * * * सेनाधुरंधर यांचें पारपत्य करून * * * तात त्याची चित्तवृत्ति सर्व आपणांकडे आहे. परंतु आवघडोन कुपेचीं पडिले आहेत. याचा पेंच वारणें अगत्य स्वामीस आहे. †उभयतां कारभारी नवे जुने यांस आजपर्यंत घेऊन चालविले, सेनाधुरंधर यांचे येण्यामुलें निकड जाऊन गाठावें हें संकट प्राप्त. घडतां घडेल ते खरें. मेहनतीस कसुर करीत नाहीं. होईल तें वर्तमान वरचेवर लिहीत आहे. बहुत काय लिहिणें? लोभाची वृद्धि जाहली पाहिजे हे विनंति.

¶*Naro Krishna Joshi writes from Nagpur to Sakharam Bapu, explaining the situation of the Bhonsle brothers and their monetary difficulties, and assuring that they were trying their utmost to come and join the Peshwa's forces as soon as possible. This letter appears to be a copy of No. 63.*

---

*No. 71]* *[8-12-1774*

पौ छ २४ सवाल
खमस सबैन
मार्गेश्वर मास

श्री

राजश्री नारो आनंदराव गो यासी

सु॥ खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ २८ रमजानचे पत्र पाठविले ते खरवडीचे मुकामी पावले. लिहिले वर्तमान सविस्तर कललें. उदईक टोक्याचा

---

† From here the writer's hand.

मुकाम आहे. सुरत अठाविसीत लौकर जातो म्हणोन लिा ते कलले उतम आहे. लौकर जाऊन पोहचणे. तीर्थस्वरूप खानदेशांत आहेत. कदाचित पलीन गुजराथेकडे जाऊ लागल्यास तुम्ही बातमी राखोन वरचेवर लिहीत जाणें. तुम्हीं सावधतेन राहात जाणें. जाणिजे छ ४ सवाल.

¶*Naro Anandrao Keskar is asked to proceed to Surat and to watch the movements of Dadasaheb.*

---

No. 72]

[10-12-1774

श्री

तीर्थस्वरूप राजश्री तात्या
वडिलाचे सेवेसी

अपत्ये जनार्दन राम ठोसर दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताा छ ६ सवाल मुकाम पुरंदर येथे वडिलाचे आसीर्वादे सुखी असे विशेष. वडिलाकडून पत्र येऊन साभाल होत नाही. तरी सदैव आसीर्वाद पत्री संतोषविले पाहिजे. श्रीमंत दादासाहेब सुरते आलीकडे आले म्हणौन ऐकितो. त्यास इग्रजानी सलुकाची बोली लाविली असतां त्यास आलीकडे घेऊन आले. तस्मात् त्यांची लबाडीसी वाटते. मागे सुज्यातदौल्यासी सलुकाची बोली लाऊन त्यांस दगा केला. अशा नाना प्रकारे इग्रज्याच्या लबाड्या लोक सागतात, आण खरेपणाहि बोलतात. परंतु ह्या कालात विस्वास ईश्वराखेरीज कोणाचाहि धरावयाचा नाही. आपले फौजितहि प्रकार आततेचा थोडकाच आसेल. याजकरिता कालासारखी सावधता बहुत राहिली पाहिजे. ईश्वर सर्व गोष्टी पार पडीलच. कोणे गोष्टीची चिंता नाही. मी लेकराने आपणास ल्याहावेसे नाही. सर्व अर्थ वडिलाचे चितात आहेतच. परंतु आमचे सर्वांचे लक्ष आपले ठाई आहे, यास्तव लिा आहे. तीर्थरूप दादांची शरीरप्रकृत बरी आहे. तीर्थस्वरूप अंताजीपंत व चिरंजीव विठोबा व सर्व मनुष्ये सुखरूप आहेत. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Janardan Ram Thosar reports to Haripant Tatya the rumour about the English having joined Raghoba, contrary to the negotiations which they have opened with the Barbhais, which clearly shows—says the writer—that they mean some treachery as was seen in their dealing with Suja-ud-daula.*

No. 73] [9-1-1775

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर—येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. छ १ सवालचें पत्र पाठविले ते छ ४ सवाली पावले. लेखनार्थ ध्यानास येऊन परम संतोष जाला. राजश्री जनार्दन रायाजीहि येऊन सामील जालेच आसतील आथवा आकलेसरपावेतों येऊन सामील होतील. आकलेसरापुढें थोडक्या सामानानसी न यावे. सर्व फौज येकत्र होऊन बुणगे मागे ठेऊन सडे होऊन यावे. रेवेचा उतार जो सोईस पडेसा आसेल तेथे उतरोन रातवा[1] खपून जलद येऊन पोहचावें. बुणगे व्यारे सोनगड या रानात आथवा राजपिपलेकर भेटलीया त्याच्या रानात चारापाणी याची सोये पाहोन ठेवावें. दोनहि फौजा मिलोन यांचा जथ तुम्हापेक्षा भारी, यास्तव खडे होऊन रातवा खपून यावे, हे सूचना लिहिली आसे. मग तुमच्या विचारे ठराव होईल तो खरा. राजश्री हरिपंत तात्या यांची पत्रे छ २७ सवालची आली. त्यांतील मजकूर राजश्री गबाजी बलाल यास लिहिला आहे त्याजवरून कळ्ू येईल. ते समीप आले, यैसी वदंता श्रीमंताच्या लस्करातहि आहे व आम्हाकडेहि आहे. चापानेर प्रांतीचे लोक गुरेढोरे पलवितात. परंतु आमचे कासीद गेले आहेत ते पत्रें घेऊन आलिया तुम्हास लेहोन पाठऊ. साष्टीस इगरेज आहे इतके मात्र आपण लिा होते, परंतु त्याने बिघाड करून साष्टी घेतली किंवा उगाच येऊन ठरला आहे हे सविस्तर ल्याहावे. वरचेवर पत्री कुषल वृत लेहोन संतोषवीत आसावें. तुमचे पत्र हरिपंतास लिहिले ते त्याजकडे रवाना केल. कलावे. रा छ ६ माहे जिलकाद. बहुत काय लिहिणे कृपा आसो द्यावी हे विनंति [मोर्तब]

¶*Fatesing Gaikwad to Naropant Keskar, communicating to him the route by which he should enter Gujarat.*

---

No. 74] [12-12-1774

श्रीशंकरप्रसन्न

श्रीमंत राजश्री तात्या

स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक राजाराम खंडेराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ८ सवाल मुा नामपूर जाणौन स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष.

---

[1] रात्रीं.

5995

आमची माणसे बातमीस नवापुरास रा। शकराजी खंडेराव याजकडे गेली होती, ती काल आली. बजिनस पत्र त्याचे आले ते सेवेसी पा। आहे. प्रा। होईलच व पालेकर सिपाई मुजरद फकीर होऊन श्रीमताचे लस्करात गेला होता. लस्कर झाडून पाहून आला. त्याण सांगितले की दाहा हजार फौज आहे. सरदार मानाजी फाकडा व सखाराम हरि व मानाजी गाईकवाड वगैरे आठ दाहा हजार आहेत. इंग्र(ज) दोन हजार आहे. खासा इंग्रज सुरतेस गेला आहे. लग्नाचे निमित्य करून सुरतेस जाऊन बसला आहे. हे त्याचा मार्ग पाहातात. फौजेचा मुकाम व्याऱ्याहून पलीकडे साता कोसावर मांडवीचे सदेंत कडोदचे आसपास आहे. व्यारियावर आद्याप कोणी आले नाही. फौजेतील बोलवा की, इंग्रजाचे याचे आंत:करण शुध नाही, म्हणौन लग्नाचे निमित्य करून सुरतेस गेला. दोन हजार याजवल रखवालीस ठेविले आहेत. त्याची चौकी श्रीमंताचे गोटासभोवती आहे. आलीकडे पाय द्यावयाचा विचार नाही. याप्रो बोलवा माणसाने सांगितली. आपणास कलावे. तळेगावाने कोकणचे मार्गे च्यार पलटणे गेली म्हणौन आपले लस्करात बाजारी वर्तमान आहे, तें खोटे येणेप्रा। सेवेसी कलावे म्हणौन विनंतीपत्र लि। आहे. बहुत काय लिहिणे कृपेची वृधि करावी हे विनंती.

¶*Rajaram Khanderao writes to Haripant Tatya, communicating news acquired by spies from the camp of Raghoba.*

---

*No. 75*] [*14-12-1774*

**श्री**

सेवेसी रावजी अनंत. चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना यैसी जे. सेवकाचें वर्तमान छ १० सवालपावेतों येथास्थित असें. अज्ञा घेऊन निघालों तो छ २४ रमजानीं हातगडास पावलों. आज्ञेप्रमाणें घाटाचा बंदोबस्त करून मौज राहुडें येथें राहून मार्गाचें नाकें धरून बसलों असों. रहदारी गेल्या आल्या माणसाचा झाडा चौकशी * * * * * रहदारी पुणें नाशिक [दोन ओळी मजकूर फाटला आहे.] कागद गुजराथी मारवाडी यांचे अतिशये सांपडतात; वाचत नाहीत, म्हणून सेवेसी पाठविले असेत. वरकड उदमी वाणी चांदवड धोडप नाशिक प्रांतींहून सुरगाण वासदें रामनगर जव्हारपावेतों लमाणदेखील ह्याच मार्गें जातात येतात. वरकड गांव अठवडे बाजारकरी नेहमीच जात येत आहेत. श्रीमंत दादासाहेब कडोद तापी तीरानें आहेत. गोविंदराव गाइकवाड पेटलादेसच आहे. फत्तेसिंग बडोदियास आहेत. तिकडील मारवाडी येतात ते

सांगतात. सेवेसी कळावें. अवरंगाबाजेहून नबाबाकडून हत्ती दोन सुरतेस गेले होते. त्याजबराबर सरकारचे जासूद राजश्री जिवाजीपंताकडील व दस्तकें आपलीं होतीं ते सुरतेहून ह्याच मार्गें गेले. इकडे चिमणरायाचा दंगा आहे. दो गांव जाहाडून नेले. कावनईकडे कोलियाचा दंगा आहे म्हणून यैकतों, त्यास सेवेसी कळावें. जासूदजोडी व गाडदी येक रोजमुऱ्याकरिता पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*" Dadasaheb is at Kadod on the Tapti, Govindrao Gaikwad is at Petlad and Fatesing Gaikwad at Baroda," writes Ravji Anant.*

---

*No. 76]* *[15-12-1774*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे शेवेसी

पो कोनेर रघुनाथ कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ११ सवाल गुरुवार प्रहर रात्र जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. दौलतराव घाटपार जाला. याउपर त्याचे मागे लागू नये. आता उलटून सुरतेचे नजीक यावे. इकडे आल्यावर जसी मसलत करणे त्याप्रमाणे केली जाईल. तूर्त तापीपार पाचसे स्वार पाठऊन नरोतमाचा पाठिलाग करून उधळून द्यावा आणि आपण खासा स्वारी फौज सुधा सुरतेकडे यावे. चहूकडे धावधाव केल्यास मसलत लांबणीखाली पडती. आधी तापीपार पाचसे स्वार पाठविले म्हणजे नरोतमाचे खूळ मोडलेसे होईल; म्हणजे सुरतेची मसलत कलेल; तैसी केल्यास गुंता नाही. दुसरे माहालचा बंदोबस्त होऊन तूर्त रुपया हातास येईल. हांगामाचा दिवस गेल्यावर रुपया येणे कठिण पडेल; यास्तव सर्व वेध टाकून सुरतेचे नजीक येऊन माहालचा बंदोबस्त व सुरतेची मसलत करावी यात उतम पक्ष आहे; तर आधी तापीपार पाचसे स्वार रवाना करावे. आपण खासा इकडेस यावे. पुढे येकदोन पथके चांगली निवड करून पुढे पाठवावी. ते धोबी घाट व छिपा घाट लुटून शहरचे आसपास झाडझपट करून माघारा उलटून च्यार कोस मुकाम करावा, याप्रमाणे तूर्त केल्यास उतम आहे. वरकडी मार आपणासी बोलिलो त्याप्रमाणे पत्रे लिहून पाठविले आहे. त्याचे

उतर आल्यास लिहून पाठऊ. आपण नजीक आल्यावर आम्हीच येऊन पोहचतो. कलावे बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

*¶Koner Raghunath to Naropant, proposing to him the steps to be taken to arrest the progress of Narottamdas and defeat him when he crosses the Tapti.*

---

No. 76A] [15-12-1774

**श्री**

**राजश्री नारो आपाजी स्वामी गो यांसी**

विनंती उपरी. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब पलोन जात आहेत. दरमजल जातात. आपल्या फौजा सव्या होऊन जात आहेत. त्यांजकडील मंडळी झाडून त्यांजबा गेली. त्यास सदाशिव रामचंद्र व भिडे व काणे व आबाजी महादेव, नातू वगैरे मंडळीची मुलेमाणसे पत्र पावताच किलोकिल्यास बंदोबस्तीनें रवाना करणे. सदाशिव रामचंद्र याची किले रायगडावरी घालणे. आधी काम हे करणे. कोणाची रदबदल न आईकतां काम करून कोणाची कोठे माणसे रवाना केली त्याचा जापता लेहून पाठविणे. +पत्र पावतांच भीड न धरतां करणें. जाणीजे. छ ११ सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

*¶Nana Fadnis orders Naro Appaji to arrest and imprison at different forts the families of Sadashiv Ramchandra and other helpmates of Raghunathrao, who had accompanied him in his flight into Gujarat. The paper supplies the names of the principal adherents of Dadasaheb.*

---

No. 77] [16-12-1774

पौ छ १२ सवाल
खमस सबैन

**श्री**

विनंती विशेष. आपण लिहिले की तुम्ही व मोगल मिलोन नरोतमास शहरांत येऊ न देणे. यैसियासी हे सामर्थ्य आम्हास असल्यास आम्ही प्रतिबंधात कशास बसतो? चातक पक्षाप्रमाणे फौजेची प्रतीक्षा करीत होतो; त्यास आवर्षणाचा प्रकार दिसोन आला. इंग्रेज व मोगल सरकारचे ममतेत असते, तर सरकारची मामलत काढून नरोतमाचे स्वाधीन मामलत काये म्हणून करिता? आणि नरोत-

+ येथून अक्षर नाना फडणिसाचें.

मास उतेजन काये म्हणून देते? तुमचे मामलतीविसी मोगल इंग्रजास पत्रे पाठवितो म्हणून आपण लिहिले. त्यास केवल पत्र पाठविल्यानेच मोगल दहशत खाऊन मामलत स्वाधीन करितो यैसे दिसोन येत नाही. येविसीचे हुजुरचेहि पत्र मोगलास व इंग्रजास आलेच होते; परंतु घडोन आले नाही. हा प्रकार जाणून फौजेची रवानगी जाली आहे. आपणास विदितच असेल. लिहावेसे नाही. नरोतमदास हसोटचे मैदानात आहे तो फौजेचा जोर पोहचाऊन हस्तगत होईल. दौलतराव या प्रांती होते तेव्हा त्यास नरोतमदास आपले मदतीस बोलावीत होते, परंतु त्यानी मान्य केले नाही. कूच करून गेले. नरोतमास फौजेसी लडावयास सामर्थ नाही हे जाणून नरोतमाने च्यार दिवसाचा कासीद अजुरदार अजुरा सेंभर रुपये करार करून श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडेस पाठविला आहे. दौलतराव यानी मदतीस सामील व्हावे याप्रमाणे दौलतराव यास पत्र आणविले आहे. मारनिले तो कूच करून गेले. त्याचा मोकाम काल बुधवारी सोनगडचा होता यैसे यैकतो. कदाच श्रीमंताचे पत्र दौलतराव यास मार्गी येऊन पोहचल्यास माघारे फिरतील यास्तव तिकडील बातमीत असावे. काल येथे बाजारी वर्तमान आले आहे की उभयेता श्रीमंताची लडाई होऊन जेष्ठाचा मोड जाला. जेष्ठानी काढावा काढून पिंपलनेराचे रोखे निघोन आले आहेत. पाठीवर सरकारची फौज आहे, यैसे वर्तमान आले आहे. सत्यमिथ्य न कले. वर्तमान आले ते लेहून पाठविले आहे. आमचे विचारे आपण अद्यापि गायेकवाडाचे परगणियाचे जफ्तीचाच प्रकार चितात आणून त्या खोऱ्यातच मोकाम आहे हे उपयोगी नाही; यास्तव आपले विचारास येईल तर शहरानजीक दुकोसी तीकोसी येऊन मोकाम करावा. येणेकरून मोगल इंग्रेज याजवर इब्रत पडोन जाबसाल करतील. येथोन जफ्तीचा जो बंदोबस्त करणे तोहि घडोन येईल; यास्तव आधी हसोटाकडेस फौजेची रवानगी करून व रासे कुंभारी येथे येऊन मोकाम करावा हे उपयोगी आहे. मग जे आपली मर्जी व धण्याची आज्ञा ते प्रमाण. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

पो गोविंद रघुनाथ व गंगाधर रघुनाथ सा नमस्कार विनंती. लिा परिसोन सविस्तर ध्यानास येईल. फौज हे प्रांती आलयासारखे सरकार तालुकेचा बंदोबस्त शत्रूचे पारपत्य होऊन आपला नक्ष व्हावा म्हणोन विस्तरें लिहिले असे. मनन करून जे कर्तव्य ते करावें. बहुत काये लिा. कृपा केली पाा हे विनंती.

¶*The writer reports that Narottamdas of Hasot has sent an appeal for help to Raghoba. He also refers to a skirmish between the Peshwa's troops and those of Raghoba.*

No. 78] [16-12-1774

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यास

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फत्तेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही व राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव फौजसुधा छ ८ सवालीं प्राा चिखली येथे आलेस. कसबे घणदेवीनजीक मुकाम केला यैसे उभयेतानी लिहिले होतें परतु आपले पत्र नव्हतें. यैसे नसावे. सदैव पत्रीं कुशलवृत लेहोन संतोषवीत असावे. हे कासीद तातडीने रवाना केले. आपल्याकडील पत्रास उशीर लागेल याजमुले रवाना केले किंवा आपल्याकडूनच पत्र ल्याहावयास आलस आला हे न कले. याउपर जो कासीद येईल त्याजसमागमे आपले पत्र आगत्य पाठवीत जावे. कितेक आर्थ उभयेतास लिहिले आहेत ते निवेदन करतील त्याजवरून कलो येईल. साराप कोणेविसीं गुंता न करितां दालभ्ये मार्गी टिकोन राहिले तर त्याजपासीं येऊन त्यांचे पारपत्य करावें. कदाश्चित तापीतीरी न टिकले आणि व्यारे सोनगड याच्या [शिक्का] आसरियास जाऊन टिकले तर तेथे जाऊन त्यांचे पारपत्य करून तो वेध तोडावा. तो वेध तुटल्याविना मुलूकचे जमीदार येऊन रुजू होणार नाहीत यास्तव ते कार्य आविलंबे करावें अथवा ते टाला देऊन सोनगडची सरद टाकून नवापूरच्या सरदेत गेले मग त्यांचा पाठिलागहि करावयाचें प्रयोजन नाही. तो आर्थ दोहीतून येका प्रकोरं जालिया आविलंबे रेवातिरास यावे. इकडीलहि सामान रेवातिरी येऊन सामील होईल. जथहि पडेल. शत्रूचे पारपत्यहि होईल. यैवजहि प्रविष्ट होईल. यैवजाविसीं चिंता न करावी. आपल्यासी राजश्री गोपाळ नायेकांनीं मान्य केलें आसेल तेणेप्रमाणे यैवज दोन दिवस आगे मागे प्रविष्ट होईल यांत आतर होणार नाही. आज आकरा महिने माहा संकटांत यास्तव आपल्यास इतके लिहिणे लागलें. आपणहि विवेकी आहेत विशेष काये लिहिणें. राा छ १२ माहे शवाल बहुत काय लिहिणे कृपा कीजे हे विनंती.

¶*Fatesingrao Gaikwad to Naropant Keskar asks him to oppose Daulat Baburao the Prabhu Sardar and punish him...*

No. 79] [13-12-1774

पौ छ २३ सवाल खमस
सबैन मार्गेश्वर मास

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ९ सावल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे. विशेष. राजश्री फतेसिंगराऊ गायकवाड याणी राजश्री आंतोबा बाबा याचे वधूस तस्ती देतात. आरबाच्या वराता केल्या आहेत म्हणौन कलले. त्याजवरून तुम्हास लिहिले आहे तर तुम्ही राजश्री फतेसिंगराऊ यास लिहून उभयेता बंधू मारनिलेचे तेथे त्याजवल आहेत त्यास आपणाजवल आणून आम्हाकडे पाठवावे. कदाचित सोडावयास दिकत करतील यास्तव तुम्हास लिहिले आहे, तर उभयेताची सुटका होऊन आम्हाकडे येत ती गोष्ट करावी. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal writes to Naropant Keskar asking him to release Antoba Baba and his brothers from the confinement of Fatesing Gaikwad and send them on to the writer.*

---

No. 80] [19-12-1774

पौ छ १९ साबान सुाा
खमस सबैन

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यांस

अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण फौजसुधा प्राा तेलाडी येथे येणें जाले. पुढे तापीतिरास आगमन जालेच असेल. तदनंतर सर्व कामे येकीकडे ठेऊन राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास फौजसुधा घेऊन आधी आकलेसरास येणे. नरोतमदास यानें श्रीमंताची ठाणी व कमाविसदार उठऊन श्रीमंत राजश्री

No. 78] [16-12-1774

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यास

ℰ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फत्तेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही व राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव फौजसुधा छ ८ सवालीं प्राा चिखली येथे आलेस. कसबे घणदेवीनजीक मुकाम केला यैसे उभयेतानी लिहिले होतें परतु आपले पत्र नव्हतें. यैसे नसावे. सदैव पत्रीं कुशलवृत लेहोन संतोषवीत असावे. हे कासीद तातडीने रवाना केले. आपल्याकडील पत्रास उशीर लागेल याजमुळे रवाना केले किंवा आपल्याकडूनच पत्र ल्याहावयास आलस आला हे न कले. याउपर जो कासीद येईल त्याजसमागमे आपले पत्र आगत्य पाठवीत जावे. कितेक आर्थ उभयेतास लिहिले आहेत ते निवेदन करतील त्याजवरून कलो येईल. साराप कोणेविसीं गुंता न करितां दालभ्ये मार्गी टिकोन राहिले तर त्याजपासीं येऊन त्यांचे पारपत्य करावें. कदाश्चित तापीतीरी न टिकले आणि व्यारे सोनगड याच्या [शिका] आसरियास जाऊन टिकले तर तेथे जाऊन त्यांचे पारपत्य करून तो वेध तोडावा. तो वेध तुटल्याविना मुलूकचे जमीदार येऊन रुजू होणार नाहीत यास्तव ते कार्य आविलंबे करावें अथवा ते टाला देऊन सोनगडची सरद टाकून नवापूरच्या सरदेत गेले मग त्यांचा पाठिलागहि करावयाचें प्रयोजन नाही. तो आर्थ दोहीतून येका प्रकारें जालिया आविलंबे रेवातिरास यावे. इकडीलहि सामान रेवातिरी येऊन सामील होईल. जथहि पडेल. शत्रूचे पारपत्यहि होईल. यैवजहि प्रविष्ट होईल. यैवजाविसीं चिंता न करावी. आपल्यासी राजश्री गोपाळ नायेकांनीं मान्य केलें आसेल तेणेप्रमाणे यैवज दोन दिवस आगे मागे प्रविष्ट होईल यांत आतर होणार नाही. आज आकरा महिने माहा संकटांत यास्तव आपल्यास इतके लिहिणे लागलें. आपणहि विवेकी आहेत विशेष काये लिहिणें. रा छ १२ माहे शवाल बहुत काय लिहिणे कृपा कीजे हे विनंती.

¶*Fatesingrao Gaikwad to Naropant Keskar asks him to oppose Daulat Baburao the Prabhu Sardar and punish him.*

6000

No. 79] [13-12-1774

पौ छ २३ सवाल खमस
सबैन मार्गेश्वर मास

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ९ सावल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे. विशेष. राजश्री फतेसिंगराऊ गायकवाड याणी राजश्री आंतोबा बाबा याचे वधूस तस्ती देतात. आरबाच्या वराता केल्या आहेत म्हणौन कलले. त्याजवरून तुम्हास लिहिले आहे तर तुम्ही राजश्री फतेसिंगराऊ यास लिहून उभयेता बंधू मारनिलेचे तेथे त्याजवल आहेत त्यास आपणाजवल आणून आम्हाकडे पाठवावे. कदाचित सोडावयास दिकत करतील यास्तव तुम्हास लिहिले आहे, तर उभयेताची सुटका होऊन आम्हाकडे येत ती गोष्ट करावी. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal writes to Naropant Keskar asking him to release Antoba Baba and his brothers from the confinement of Fatesing Gaikwad and send them on to the writer.*

---

No. 80] [19-12-1774

पौ छ १९ साबान सुाा
खमस सबैन

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यांस

(मुद्रा) अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण फौजसुधा प्राा तेलाडी येथे येणें जाले. पुढे तापीतिरास आगमन जालेच असेल. तदनंतर सर्व कामे येकीकडे ठेऊन राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास फौजसुधा घेऊन आधी आकलेसरास येणे. नरोतमदास यानें श्रीमंताची ठाणी व कमाविसदार उठऊन श्रीमंत राजश्री

6001

दादासाहेबांचे तरफेची ठाणी बसविली. वसूलहि घेत आहे. यास्तव आमचे काम राहिले तर च्यार दिवस आगेमागे होईल परतु हे सरकारचे काम आधी केले पाहिजे. नाहीतर दिवसगत लागल्या तो जमेल व कारभारी सरकारचे त्यांचा शब्द आम्हास व तुम्हास लागेल. म्हणतील की फौज सरकारची व तुमची जवळ असतां त्याचे पारपत्य कसे न केले. यास्तव आधी नरोतमाचे पारपत्य करून प्रा उरपाड प्रा हासोट व प्रा आकलेसर येथील ठाणी त्यानें उठऊन आपली ठाणी बसविली आहेत ते मारून काढून सरका [शिक्का] रची ठाणी बसवावी. जुने कमाविसदार सरकारचे नरोतमाने काढून दिल्हे आहेत त्यांची स्थापना करून त्यांची पत्रे उभयेता कारभारी यास लेहोन घेऊन राजश्री गोपाळ नायेकाकडे रवाना करणें ते प्रविष्ट करून उतरे पाठऊन देतील. या कर्मास च्यार दिवस लागतील तर लागोत परतु नरोतमाचे पारपत्य आगत्य करणे. त्याने चौदा माहाल श्रीमंताच्या विभागाचे तितकेच्या सनदा आंणिल्या आहेत तो फैला कामाचा नाहीं. कदाश्चित तुम्ही म्हणाल कीं आम्हास सरकारची आज्ञा नाही, आणि ते काम आम्ही कसे करावें? तर हा ठाणी घेईल हे काही भविष्य त्यास उमजले नव्हतें की त्यानी तुम्हास आज्ञा करावी. सरकारची ठाणी उठविली आणि वसूल माहालापैकीं घेतो. दिवसेदिवस सिबंदी अधिकच ठेवील. सर्व पैका सरकारचा सिबंदीस खर्च करील. तो बलावल्या राजश्री गोविंदराव गाईकवाडहि त्यांस साह्य होतील. तेव्हा फैलावाखाले गोष्ट पडेल. मग भारीच प्रेत्न करावा लागेल. यास्तव सरकारचे आज्ञेची वाट न पाहाता आधी त्याचें पारपत्य करणे. त्याने वसूल तुम्हादेखता न्यावा हे विहित नव्हे. उपहास-कारण आहे. यास्तव तो वसूल घेत असेल तो जफ्त करून तुम्ही व उभयेता येक विचारे वसूल घेऊन दोही फौजेस रोजमरा देणे. याचा जाबसाल सरकारात पडला तर आम्ही करूं परतु ते कार्यं आगत्य करावे. तो जातीने हास्तगत जाला तर फारच उतम आहे. तो निमकहराम धरून कारभारी याकडे पाठविल्या फारच संतोषी होतील ऐसे आहे. यास्तव सत्वर आकलेसरास यावें. ऐवजाकारितां गुंतोन न रावे. तेथे आलिया सुरत माहाल पाठीमागे पडेल. आमित्रावर दबाव बसला. जमीदारहि येऊन भेटतील. ऐवजाचीहि तरतूद करून आपल्यास देतील परंतु सरकारकाम न बिघडे ते आधी कीजे. सा छ १९ सवाल.

¶*Fatesing Gaikwad to Naropant: presses with urgency the chastisement, without loss of time, of Narottamdas of Hasot who he adds if neglected would prove a great source of trouble.*

6002

No. 81] [19-12-1774

पौ छ १९ साबान खमस सबैन

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यास

ॐ अखंडितलक्ष्मीआलक्रुत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंद लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपल्यास दोन च्यार पत्रे पाठविली परतु येकहि उतर न आले येसे नसावे. सदैव पत्रीं कुषळ वृत लेहोन संतोषवीत असावे. सविस्तर वृत राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास लिहिले आहे तो आर्थ ध्यानास आणून सत्वर रेवा उतरतिरास यावें म्हणजे सर्व घडोन येईल. कनिष्ठाकडील फौज रेवातिरास येणार येसा विचार आहे. ते रेवातिरास पोहोचली नाही तो आपण रेवा उतरले म्हणजे मसलत सिधीस गेली या प्रा आहे. यास्त(व) कोणेविसी गुंता न करिता रेवा उतर तिरास यावे हे तक[१] फार उतम आहे. येसी येणार नाहीं. कदाश्चित कनिष्ठाची फौज रेवातिरास आली तर मग उतरावयास गुंता पडेल. दिवसगत लागेल. शत्रु जमतील यास्तव पत्र पावताच रेवा उतरतिरास यावे. हे लग्न घटिका आहे तो समये चुको न द्यावा. इतका प्रेत्न उभयेता कारभारी यानी व राजश्री गोपाल नायेकानी करून तुमची रवानगी फौजसुधा केली त्याचे सार्थक हे आहे. तक चुकलिया मनसुबियास धका आहे. सूज्ञास न समजे येसे नाही. विशेष लिहिणे उपरोध आसे. आवसर चुको न द्यावा. आवसर गयो मेहुडा बरसे काह करेस येसा मासला आहे. तो आवसर हाच आहे. पैका न पावला म्हणवून हे तक जाऊ न द्यावी. पैका पावेल परतु हे तक गेलिया येणार नाही. आपल्या न कले येसे नाही. रवाना छ १९ माहे सवाल बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad to Naropant asking the latter to move immediately to the Northern bank of the Nerbudda.*

---

No. 82] [20-12-1774

श्री

श्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

सा। बहिरो रघुनाथ मेहदळे कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील क्षेम जाणोन स्वकीये कुशल ल्याहावयासी आज्ञा करून साभाल करीत असिले पाहिजे विशेष.

---

१ तक = संधि, वेळ; Opportune moment.

सुरतचे आमलाचे बदोबस्ताकरिता सरकारच्या सनदा स्वामीस आहेत त्या व आम्ही आपले पत्र आलाहिदा लेहून खेप्याबराबर रवाना करणार तो सास्टीस इंग्रेज आला. त्याणी मदतीस सुरतहून लोक आणिले आहेत म्हणौन सरकारात लेहून आले. त्यावरून सरकारची पत्रे आपणास व गाईकवाड याचे फौजेस परस्परे सामील होऊन सुरतेस बंदी करावी म्हणजे सास्टीस इंग्रजास मदत येऊन पावणार नाही याप्रो लिा आहे. त्याप्राा आपणास हे मातबर काम करण अवशक, त्यातच आमचे आमलाचा बदोबस्त होऊन जाबसाल उगऊन घ्यावयाची सोई आहे. मोगलाकडे दुसाला सरकारचा थैवज चालीस पनास हजार रुा येणे. त्याचा निकाल होऊन येई ते गोस्ट करावयाची सोईच आहे. बंदीचा मजकूर तरी शहरची बदी करालच. यासिवाये बंदर बलसाड व घणदेवी व नवसरी व उरपाड व जंबूसर इतक्या खाड्याचा बदोबस्त येक येक कारकून व से पनास माणूस ठिकाणी ठिकाणी पाटवाल तेव्हा येथास्तित "बंदी होईल. काडीमात्र जिनस शहरात जाऊ देऊ नये. येणेकरून आपली सलाबत टोपीकरावरी मातबर पडेल. येविसी सध्या येथहि इतकी बदी जाली म्हणजे सास्टीस कदापि मदत येणार नाही. पायेबद लागोन इकडील मसलतीस टोपीकराची कमर्ता पडोन आपला लौकी(क) चांगलाच होईल. सुरतचीच बंदी करू म्हटल्यास परिणाम नाही. सदरहू ठिकाणं लिहिली आहेत इतके स्थलाची बंदी जाली म्हणजे सुरतची जाली आसा विचार आहे. माहीतगारीने विनंती लिा आहे. आमचे कारकून आपण आपले जवल आणविले म्हणजे तेहि सविस्तर निवेदन करितील. आम्ही आपले खेप ठेऊन सरकारचे कासिदांबराबरच आम्ही आपली पत्रे रवाना केली आहेत. कृपा करून आमल सुरलित चाले ते गोस्ट केली पाो. बहुत काय लेहू हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath requests Naropant Nana to blockade the city of Surat and the creeks of Ghandevi, Orpad, Balsad and Naosari, to prevent succour reaching the English at Salsette.*

---

*No. 83]* *[22-12-1774*

**श्री**

श्रिया विराजित राजमान्ये राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

सेवक बहिरो रघुनाथ मेहदले मुाा पुणे कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १८ सवालपावेतो येथास्तित जाणून स्वकीये कुशल लिहीत

असिले पाहिजे विशेष. शहर सुर(त) येथील आमल आम्हाकडे आहे. त्यास नरोतमदास याणी श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडून सनदा आणून मामलेतीत बखेड केले. त्यावरून सरकारात बदोबस्ताविसी विनंती केल्यावरून आपणास सनद दिल्ही आहे त्या अन्वये स्वामीस पत्र पूर्वी लिा होते ; उतर आले की आपण यावे बदोबस्त करून देऊ. तेव्हाच यावे तरी शरीरी पधरा विसी दिवस समाध नव्हते. त्यानतरी निघोन यावें यैशास इग्रज सास्टीस येऊन मोर्चबदीचे उदेगात लागला आहे. आज दाहा दिवस जाले. सास्टीसनिध्य बेलापूर तालुका, त्याचा बदोबस्त होऊन लडवई सरंजाम सुध्धा खबरदार असिले पाो याजकरिता राहाणे जाले. यास्तव पेसजीचे सनदची नकल व प्रस्तुत लस्करातून दुसरी सनद स्वामीस आली ती पाठविली आहे, त्याप्राा नरोतमदास यासी तबी पोहचोन बदोबस्त स्वाम करितील, केला पाहिजे. सरकारचे कारकून दरकदार व आमचे निाचे कारकून शहरात आहेत त्यास मोगल इंग्रज याही अटकाव केला आहे. याजकरिता शहरानजीक मुकाम करून उभयेतास पत्रे लेहून कारकून आपले जवल आणवावे. सविस्तर निवेदन करून चाकरीत हाजीर राहातील त्या अन्वये आमल सुरत चाले, नरोतमदास ठिकाण लागे, हे येश स्वामीस येईल. आपण येशश्वी आहेत तेथे विस्तारे काये ल्याहावे ? दुसरा अर्थ की इंग्रज सास्टीस आला आहे. त्याणी सुरतहून मदत आणविला असे. याजकरिता शाहारची बंदी केल्यास तंबी पोहचोन तिकडे पायेबंद लागोन लोक येणार नाही. हे सरकारकाम मातबरच आहे. येणे करून दोन्ही कार्ये सिध्धांतांत येतील. तीहि सत्वरच सेवेसी येऊन दाखल होवे यैसा विचार आहे. परंतु इकडील मसलत कितीक लाबल हा प्रकार कळत नाही. टोपीकराचे पारपत्यास येथून सास्टीस हशमी लोक, गाडदी व विसाजी कृष्ण बिनीवाले मातबर फौज रवाना जाले आहेत. थोडकेच दिवसी श्रीकृपेने परीमर्द जाल्यास जलदच निघोन येतो. राजश्री नारो आपाजीची येथूनहि लस्करात सुरत व भडोज येथे पायेबद देण्याविसी पत्रे गेली आहेत. तिकडून फौज येईल. येणेकरून तिकडील माणूस इकडे इग्रजाचे कुमकेस येणार नाही व येथेहि पराभव होईल. स्वामींनी कृपा करून आमचे कारकून आणऊन शहराची बदी केल्यास बाहेर निघोन त्याच्याने लडाई करवत नाही. गैरा हरयेक दगा होणार नाही. बदोबस्त होऊन येईलच. नरोतमदास बाहेरचे आमलास बखेडा करीत होता तो पलोन शहरात गेलाच असेल. शहरचे आमलात बखेडे मात्र त्याणी माडिले असेल. त्याचा बदोबस्त जाला म्हणेजे त्या प्राती सलाबत पडोन दुसरा कोन्ही लबाडी करणार नाही. सरकारची पत्रे मोगले व इग्रजे यासी आहेत ती आपलेकडे

पाा आहेत. ती व आपण जरबची पत्रे लेहून बंदोबस्त जाल्यास उतम आहे. न होये नरी हरयेक प्रकारे तवी पोहचऊन कारकून आमचे आपलेजवल आणऊन ते माहीतगारीने विनती करितील त्या अन्वये कर्तव्यात आणिले पाहिजे. +बहुत काये लेहू हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath Mehendale asks Naropant Nana to attend promptly to the affairs of the city of Surat with which Narottamdas was interfering on the strength of the orders given him by Raghunathrao Dada.*

---

*No. 84]* [22-12-1774

पो छ २५ सवाल सन खमस सबैन.

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागाईत छ १८ सवाल पावेतों येथास्थित असें विशेष. साष्टीहून छ १६ सवालचीं पत्रें आलीं तीं व आनंदराव शिंदे यांचें पत्र रेवदंडीहून आलें तें व खेम सावंत भोंसलें वाडीकर यांचें व बालाजी गणेश तालुके देवगड व सुवर्णदुर्गहून पत्रें आलीं तीं पाठविली आहेत; त्याजवरून निवेदन होईल. श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडील मसलत लांबली यामुळें चाल करून शत्रूंनीं चाल केली. हिंदुस्थानांत सुज्यातदौले अंतरवेदींत येऊन यमुनेस पूल बांधतात, कर्नाटकांत हैदर नाईक बंकापुरास येतो म्हणऊन तिकडील वार्ता येतात. इंग्रेजांहीं साष्टीस मोर्चे लाविले. फिरंगी हबशी त्यांचे सामिलातीस; गुजराथेंत दंगा याप्रमाणें होते. आजिपावेतों सरदारांनीं लांबविले म्हणऊन म्हणावयास जागा होता. आतांच्या लांबण्यामुळें सरदार यांणीं लांबऊन बालगला (?) तऱ्ही होता. आतां इतकी फौज असोन कोणी जाऊन आडऊन गांठ घालून मसलत न लांबे असें होत नाहीं. ते गेले तेव्हां पुढें तऱ्ही याप्रमाणें फौजा नेहमी कोठवर राहाणार? तेव्हां प्रथम दिवसच आहे. खानदेश अवघा पायमलीखाले गेला व पैकाहि त्यानें घेतला. याप्रमाणें चहूंकडून रयतेस उपद्रव व खर्चाचें तोंड भारी. पैका सावकारींत कोणी कर्ज द्यावयासी दिकतच आहे. देशीं पांच हजार फौज असती तर इंग्रेज इतकें न करितां. नेमणूक फौजाची जाली ते कागदांपत्रांतच फार करून आहे. येऊन समयास पोहचऊन कार्य होणें ते श्रीमंताच्या प्रतापें होईलच. परंतु लौकिकांत नीट दिसत नाहीं. घुळपकडील अरमार अद्यापि येत नाहीं. तीन कागद त्यांस जलद जलद पाठविलें ते येत तरी इंग्रेजाचें पारिपत्य मुंबईस (सांप्रःय) करून व लोक आंत घालून चहुंकडून येलगार होता; परंतु येतील. स्वामीच्या प्रतापें

नसरुडाचें पारपत्यें होईलच, परंतु संधि पाहून त्यानें बेइमानी केली. याउपरी निकड केली असतां दादासाहेबांकडील मसलत आटोपली म्हणजे सर्व गोष्टी चांगल्याच आहेत. फार लिहिलें म्हणऊन रागास न यावें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Naro Appaji writes to Nana that enemies are raising their heads in several quarters owing to the long protracted affair of Raghoba. He therefore urges the necessity of dealing with Raghoba in a speedy manner.*

---

*No. 85]* [*23-12-1774*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

७ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. छ १९ सवालचे पत्र गल्याचे मुकामचें पाठविले ते पावोन लेखनार्थ आवगत जाला. राजश्री दौलत बाबूराव पलोन गेला. उभयेता कारभारी फौजसुधा आवरंगाबादेस आले. नवाबाची त्याची भेट झाली. सिंदे होलकरहि जाऊन कारभारियास भेटले. श्रीमंत राजश्री दादासाहेब प्रा बेटावद तापीतिरीं माघारे आले. तिकडील सलूख सत्वरच होईल म्हणऊन लिहिले ते कलो आलें. नरोतमदास साठोद्रा याने प्रा आकलेसर हासोट व उरपाड येथील ठाणी उठऊन आपली ठाणी बसविलीं होतीं त्याच्या पारपत्यास दीड हजार फौज व गारदी व तोफा पाठविल्या आहेत. त्याचा बंदोबस्त व सुरतेस कमाविसदार आटकेत ठेविले आहेत त्याची मुक्तता होऊन तेथील बंदोबस्त करावा हे दोन्ही कामे जाल्यावितरिक्त रेवातिरास येता नये, शब्द लागेल म्हणऊन लिहिले त्यास नरोतमदासाचे पारपत्य करावें. आकले (श्वर) व हासोट व उरपाड येथील ठाणी महताची उठऊन जुने कमाविसदार यांची स्थापना करून त्यांची पत्रे राजश्री बापूस व राजश्री नानास घेऊन रवा(ना) * * * * * * तुम्हास व राजश्री जना(र्दन) * * * * राजश्री गोविंद वासुदेव यांस * * * * आहे ते काम टाकून दुसरे करता नये [शिक्का] हे आम्हासहि उमजतें. त्याची पैरवी अगोधरच तुम्ही केली आहे उतम केले. आकलेसरचें ठाणें मजबूत ते फौजेच्या वाटेवर यास्तव ते सोडून हसोटास गेला. ते ठाणें कांहीं मज( बू )द नाही. त्याचा पाये सुटला. तो पलोन सुरतेस गेलाच आसेल आथवा जाईल. ते कार्य उरकलेच आसेल. सुरतेचा

विचार तर मोगलासीं व इंगरेजासीं गाठ, ते दिवसगतीचे कर्म. केवल फौजेच्या दबावानें करूं म्हणाल तर होणें नाही. त्या शहास फौज गुंतली म्हणेजे खराबीस मूल आहे. लोकांचे देणे माथा चढेल, इकडील मोठी मसलत बिघडेल. तेथील पारपत्य होणें नाही. श्रीमंत राजश्री दादासाहेब तीस पस्तीस हजार फौज व तीर्थरूप कैलासवासी दोन महिने बसले तेव्हां बंदी करून जो ज़ाबसाल जाला तो करून घेतला. त्याजवर राजश्री नागो राम दोन हजार फौज घेऊन आले. त्यानीं च्यार महिने बंदी केली तेव्हां धेंडे पलसे यैसा बंदोबस्त करून गेले. तेथील बंदी करून जो जाबसाल होईल तो करून घ्यावा लागतो. दुसरा उपाये चालत नाही. यास्तव राजश्री गोविंद वासुदेव याजपासीं काही आमचे व काही सरकार फौजपैकी मिलोन हजार श्वार ठेवावे ते बंदी करतील. दाणा, वांस, लकडी शहरात जाऊ देणार नाहीत म्हणजे कमाविसदारहि मुक्त होतील व आमलाचाहि बंदोबस्त होईल. नरोतमाचेहि पारपत्य होईल. वरकड फौज घेऊन आपण व रा। जनार्दन रायाजी यैसे रेवा उतरतिरास यावें. राजश्री गबाजी बलालहि येथून थोडेसें सामान देऊन पाठविले आहेत. त्याची आपली भेट जालियास विस्तार सागतील. राजपिपलीयाच्या मुलकांत फौज आली म्हणजे तेहि सामानसुधा सामील होतील. त्यास लिहीणें ते लिहिले आहे. रा। गोविंदराव गाईकवाड यांच्या पारपत्याची तक हेच आहे. राजश्री लालजी पा। महीपार आहे. तो तुम्ही रेवा उतरलेस म्हणजे राजश्री आपाजी गणेश व हाजू महता आम्हाकडील खेड्यास आहे तो रा। लालजी पाटलास इकडे येऊ देणार नाही. सर्व मदार आपल्या आगमनावर आहे. रा। छ १९ माहे सवाल बहुत काय लिहिणे.

¶*Fatesing Gaikwad advises Naropant Keskar to try a blockade rather than involve himself in an open engagement with the English at Surat to bring them round as it would require less number of troops.*

---

*No. 86*] [24-12-1774

पौ। छ २३ सवाल खमस
सबैन मार्गेश्वर मास

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यांस

॥ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणऊन श्वानंद लेखन करीत असिले पाहिजे विशेष.

सविस्तर वृत राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविद वासुदेव यास लिहिले आहे तो आर्थ पुरतेपणें ध्यानास आणून राजश्री गोविद वासुदेव याजपासी आपल्याकडील व आम्हाकडील हजार राऊत ठेवावे म्हणजे ते मुलकाचा व सुरतेचा व व्यारे सोनगड याचा बंदोबस्त करतील. वरकड फौज घेऊन आपण व राजश्री जनार्दन रायाजी थैसे सत्वर रेवा उतरतिरास यावें म्हणजे मसलत सिधीस पावल्यादाखल आहे. दिवसगत रेवा थैलतिरी यावयास लागली म्हणजे मसलतीसहि धका व खराबीस मूल थैसी तक आहे. राजश्री हरि उमाजी कनिष्ठाकडून शकटभेदास येणार की आम्ही राजश्री गोविदरायास फौजसुधा घेऊन कारभारी याकडे जातो, तुम्ही रेवा न उतरणे, थैसे सागोन तुम्हास गुंता करावयास आले आहेत. त्याच आतर्गत हाच कीं तुम्हास दिवसगत रेवा दक्षणतिरी लागली म्हणजे राजश्री लालजी पाा कदम सामानसुधा कनिष्ठापासी येतील. फौजेचा जथ होईल मग कनिष्ट रेवातिरास येऊन तुम्हास रेवातिरीच गोवतील. थैलतिरी उतरणे होऊ देणार नाहीत म्हणजे महसलतीस धका बसला. कनिष्ठाची बाजी सेर जाली. मग आपण दरबारी लेहोन त्याचा बंदोबस्त करून घ्यावा. काही पाऊ दिल्हे आसतील, काही पुढे देऊ थैसेहि बोलले आसतील याजवरून या कर्मास प्रवर्तले आहेत. परंतु ज्या कार्यास तुम्हास फौजसुधा कारभारी यानी पाठविले आहे त्या मसलतीस धका बसोन नामर्दी आमच्या तुमच्या पदरास येईल थैसे हे कर्म आहे. यास्तव त्या न थैकता रेवा उतरतिरास फौजसुधा यावे. आपली आमची भेट जालिया जो मनसुबा उतम दिसेल तो करावयास येईल रा॥ छ २० माहे सवाल बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶[*Fatesing Gaikwad importunes Naropant to cross to the North of the Nerbudda before his younger brother Govindrao steals a march on him.*

---

*No. 87*] [*25-12-1774*

**श्री**

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

७ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्नो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर येथील क्षेम जाणून श्वानदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. छ १९ सवालचे पत्र पाठविलें तें पावोन लेखनार्थ ध्यानास आला. नरोतम किशोरदास बंधुसहीत हस्तगत करून फिरोन गल्यास फौजसवर्तमान आलेत,

बहुत उतम जाले. नरोतमासमागमे खबरदार माणसें व श्वार देऊन उभयेतां कारभारी याकडे रवाना करावा आथवा त्यास वर्तमान लेहोन उतर आणऊन ते लिहितील त्याप्रमाणें करावें परतु तोवर त्यास पारनेरीयास पाठऊन बहुत खबरदारीने रक्षावा. तो बखेडिया आहे यास्तव सूचना लिहिली आसे. विशेष लिहिले कीं याउपर सुरतेस सरकारचे कमाविसदार आटकाविले आहेत यास्तव सुरतकराचे पारपत्य करून कमाविसदारास स्थापून मग तापी रेवा फौजसुधा उतरूं. त्यास सुरत हसोटाप्रमाणे नव्हे की वरचेवर पारपत्य होईल. यास्तव पूर्वी लिहीले आहे त्याप्रमाणें हजार राऊत•ठेवावे आणि सुरतेची बंदी करून तेथील बंदोबस्त करून घ्यावा. सर्व फौज घेऊन सत्वर रेवा उतरातिरास यावे. इकडील कार्य मोठें खराब होतें. येविसीचा विस्तार पूर्वी [ शिक्का ] राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास व तुम्हास लिहिले आहे तो आर्थ ध्यानास आणून ज्यात विशेष आर्थ साध्ये होये तें करावें. व्यारे व सोनगड या दोही स्थलांचा मजकूर उभयेतास लिहिला आहे तोहि ध्यानास आणून जे सोईस पडेल तेणेप्रमाणें योजून फौजसुधा सत्वर आगमन रेवा उतरातिरी होये तो आर्थ करावा. सुरतेच्या शहास येकरूप गुंतो नये. ते कार्य सावकासीचे आहे. बलेकरून साध्य होये यैसें नाहीं. तजविजेनेच तेथील बंदोबस्त पूर्वापासून होत आला आहे. त्याप्रमाणेच प्रस्तुतहि केलिया उपयोगी. त्या शहास गुंतलिया निघता नये. खराबीस मूल होईल. विशेष ल्याहावें तर आपण सूज्ञ असत. विस्तार काये लिहिणें. सुरतेस आडखाववयाचे तूर्त न करावें. बाहेरील मुलकी बंदोबस्त जालाच आसेल. त्वरेने यावयाचे करावें. रा। छ २१ माहे सवाल बहुत काये लिहीणे.

¶*Fatesing Gaikwad congratulates Naropant on the capture of the rebel Narottam and asks him to come to his assistance without involving himself in an attack on Surat which he thinks would be a protracted affair. He advises a blockade in its stead.*

---

*No. 88*]

[*23-12-1774*

**श्री**

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य दताजी नारायण कृतानेक साष्टांग दंडवत विनंती. येथील वर्तमान ता। छ १९ माहे सवालपर्यंत आपले कृपेकरून येथास्तित असे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले, नरोतमाचे रखवालीची चौकसी उतमच आहे. लौकरीच पर्वतवासी करितो म्हणून लिहिले. यैसियास आपण हे महतकृत्य संपादोन येश

घेतले तेथे कोणेविसी चौकसीस अंतर होणार नाहीं. वसई साष्टीकडील बातमी पकी लिहीत जाणे म्हणून आज्ञा. त्यास खुशकीने वर्तमान यावयाचा मार्ग बंद जाला. तरीहि बंद जाल्या. कासीद वगैरे बंदी जाली. माणूस व कागदपत्र कोणाचा येऊ पावत नाही. वसईकडून माणूस व कागदपत्र पोहचत नाही यैसा प्रकार घडला आहे. परंतु हा कालपर्यंत हस्तगत नाही. किला बेजरब लडत आहे. कालपासोन वर्तमान आले आहे की, इंग्रजाने तल्यावर मोर्चा लाविला होता तो तोफाचे मारगिरीने उठऊन मागे हटविला व काही लोकहि इंग्रजाकडील मारिले. किला खबरदार आहे. पुणियाहून सरकारची मदतहि येऊन पोहचलीच आसेल व वसईहूनहि मदत गेली यैसे वर्तमान चहूकडून आले आहे. जिनसाची यादीप्रमाणे आणऊन पाठवितो. कृष्णमूर्तिका[1] व सिसेगोल्या सचीन (?) सत्रा गावास पावते जाले. कृष्णमूर्तिका पके पाच मण व गोल्या पके दोन मण येणे प्रो महत येत्न करून पावते केले. आमची बहीण कोहजगोर येथोन रेवाश्नानास आली होती. लस्करचे हंगामा यैकोन येथे आम्हाजवल आली. हाली जाणार त्यास कृपा करून मार्गीचे दस्तक घोडी २ दोन स्वारीचे व वडतल माणसे यैसे दस्तक द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. दस्तक आले म्हणजे रवानगी करू. साष्टी शत्रूस हस्तगत जालियास येथें तोफा सरबती होईल हा येक प्रकार आहे तो प्रकार हा कालपर्यंत नाही. स्वस्त आहे. इंग्रजाचे विलायेती जाहाज लोक भरून साष्टीवर आले होते ते फुटले हेहि वर्तमान आले आहे. सारांष साष्टीचा किला खबरदार आहे. चौकीचे दोन बुरूज घेतले होते ते तोफाचे मारगिरीनें सोडविले. मोगलास आपण पत्र पाठविणार आहेत. आतां ते सहसा न पाठवावे. पत्र पाठविल्यास आपणाकडूनच जाबसाल लागला यैसे दिसोन येईल. नरोतमास हस्तगत केला. येणेकरून दबाव बराच पडिला आहे. यास्तव पत्र पाठविल्यास विलग दिसोन येईल. फौज शहरावर येईल हे येथे वर्तमान आहे. त्यास धोबी घाटाचे रखवालीनिमित्य चालीस पनास बरकदाज गाडदे दरवाज्याबाहेर धोबीघाटपर्यंत फिरत असतात. फौज आलियावर त्याचा टिकाव होणे नाही. परतु न कले. राऊता धाऊन येतील आणि येखादा राउतास जाया करून जातील. यास्तव सूचना लिा आहे. बहुत काय लिहीणे लोभ करावा हे विनती.

¶*Dattaji Narayan writes to Naropant Keskar complimenting him on the capture of Narottam. He also writes about the brave defence put up by the garrison of Salsette.*

---

१ कृष्णमृत्तिका=दारू, 1 Gunpowder.

6011

No. 89] [24-12-1774

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

पोष्य दताजी नारायेण कृतानेक साष्टांग दंडवत विनती. येथील वर्तमान ता। छ २० माहे सवाले पावेतो आपले कृपे करून येथास्तित असे विशष. आम्ही बाहेर लस्करात यावयाचा पैगाम मोगलासी लाविलाच होता. आपणासहि लिहिले होते. त्यास काल भृगुवारी मोगलाने अजम जफर याबखान याचे विद्यमानें आम्हास बोलाऊन रुबरू बहुत प्रकार समाधान करून सांगितले की, तुम्ही आपले ठाणियात जाऊन मामूलमाफीक मामलितीचे कामकाज करणे. आम्ही उतर केले की, तुम्ही श्रीमंताचे निसबतीची मामलत काढून जेष्ठ श्रीमंताकडेस मामलतीचा दखल दिधला हे वर्तमान आम्ही हुजूर श्रीमंतास लेहून पाठविले. श्रीमंतानी येविसीचे बंदोबस्तास फौज रवाना केली. सरदार फौजसुद्धा येऊन पोहचले असता हाली तुम्ही आम्हास म्हणता की, ठाणिया जाऊन आपला आमल करणे. त्यास हे गोष्ट आम्हास कसी घडल? श्रीमंतानी फौजसुद्धा सरदार येविसीचे बंदोबस्तास पाठविले. त्यास बंदोबस्ताची कोणे प्रकार आज्ञा आहे त्याप्रो। बंदोबस्त जाल्याविना आम्हास ठाणेयात जाता येत नाही. असो. तुम्ही म्हणता तर आम्ही लस्करात सरदारास लेहून पाठविती त्याचा जाब येईल त्याप्रमाणे घडेल. यैसे जाबसाल जाले. तेव्हा मोगलाने उतर केले की तुम्ही आधी ठाणियात जाऊन पत्र लिहिणे. त्यास आपले विद्यमान नाही. आम्ही ठाणियांत कसे जावे? त्यास येविसी मोगलाने फारच दुराग्रह केला तेव्हा त्याचीहि मर्जी रक्षून सरकारचेहि कामकाज बंदोबस्त होऊन यावा ये अर्थी आम्ही ठाणियात न जाता कारकून पांच माणसे ठाणियात पाठविली. ठाणे मात्र स्वाधीन करून घेतले आणि हे पत्र आपणाकडे पाठविले आहे. आपली काये मर्जी ते आज्ञा करावी. त्याप्रमाणे घडल. त्यास आमचे विचारे आपले मर्जीस येईल तर मोगलास पत्र लेहून पाठवावे की, तुम्ही सरकारचे ठाणे कमावीसदार याचे स्वाधीन केले, परंतु हुजुरून आज्ञा आहे की, आजतागाईत सरकारचे बाकीचा यैवज व मामलतीचा बंदोबस्ताविसी कितेक प्रकार श्रीमंताची आज्ञा आहे त्याप्रमाणे बाकीचा यैवज, झाडून फौजेच्या खर्चास देविला आहे तो, वसुलात आला पाहिजे. हा पुढील बंदोबस्त हुजूरचे आज्ञेप्रमाणे बंदोबस्त घडला पाहिजे. यास्तव आपणाकडील भला माणूस लस्करात पाठऊन देणे. जाबसाल होईल. हुजूरचे आज्ञेप्रो घडोन आलियास उतम. हे गोष्ट न घडल्यास शहरची बंदी

होईल आणि हुजूरचे आणेप्रमाणे अमलात आणावे लागल. यैसे पत्र उतम प्रकार दाब दबावणीचे पाठवावे. आम्हीं ठाण्यात जावे न जावे तेहि आज्ञा करावी. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Dattaji Narayan reports to Naropant Keskar that he has been released and sent back to his Thana by the Mughal Subha of Surat. He asks the addressee to demand peremptorily from the Subha the Peshwa's share of revenue.*

---

*No. 90]* *[25-12-1774*

**श्री.**

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सुा खमस सबैन मया व आलफ. इंग्रजाचा तह होता त्यास हाली इंग्रजाने साष्टीस मोर्चे लाविले सबब बिघाड जाला असे; तरी इंग्रजाचा माहाल भडोच जफ्त करून ऐवज बेजरब वसूल घेऊन पाठवणे; व माहालोमाहाली याचा ऐवजाची नेमनूक आहे तो ऐवज त्याजपासून घेऊन सरसुभ्याकडे देणे. ते हुजूर रवाना करितील. जाणिजे छ २१ सवाल आज्ञाप्रमाण.

¶*The Peshwa orders Naro Anandrao Keskar* to confiscate the share of revenue accruing to the English from the province of Broach since hostilities have been declared with them.*

---

*No. 91]* *[27-12-1774*

पाो छ २६ सवाल सन
खमस सबैन मार्गसीरष
मास

**श्री**

सेवेसी माहादाजी विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ २३ सवाल मुकाम किले सिहीगड वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींचे आज्ञापत्र छ १६ सवालचे सादर झाहलें ते छ मजकुरी पावलें. तेथें आज्ञा की "सखाराम हरि यांची मातुश्री व रामचंद्र विठल कारकून निसबत चिटणीस यांची मुलेमाणसे देखील भावाच्या बाइका व मल्हार येशवंतराव, विठल येशवंतराव यांचे बंधु यांची बाइको व मुलें मौजे उरवडे ताा मुटेखोरे येथे आहेत त्यास किले

---

* Related to the Panses.

6013

मजकुराहून लोक व शाहाणा कारकून पाठऊन कैद करून किले मजकुरी पके बंदोबस्तानें अटकेत नेऊन ठेवणें आणि पोटास सिधा मध्यम प्रतीचा देत जाणें. पत्र पावतांच लोक पाठऊन किले मजकुरी अटकेंत नेऊन ठेवणे" म्हणोन आज्ञा. त्याजवरून मौजे मजकुरास लोक व कारकून पाठविले आहेत कैद करून आणून किल्यावर आज्ञेप्रमाणें ठेऊन बंदोबस्त करितों. परंतु माणसे कैद करून आणलियावर त्याचे घरीं वस्तभाव दाणा असेल त्याचा तसनस होईल याजकरितां माणसे कैद करून आणविली, घरीं वस्तभाव जे असेल ते पाटील कुलकर्णी मौजे मजकूर यांचे हवाला करून यादी घेऊन येणें म्हणोन कारकुनास सांगोन बंदोबस्त करविला आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Vishvanath informs the Peshwa from Sinhagad that in accordance with instructions from him soldiers have been sent to seize the families of Sakharam Hari and Ramchandra Vithal.*

---

*No. 92*] [*28-12-1774*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री भवानजी लोखंडे दिमत राजश्री शाहाजी बावा भोंसले दंडवत विज्ञापना. तागायत छ २४ शवाल परियेंत येथास्थित आसे विज्ञति जे. कृपा करून पत्र पाठविलें तेथें आज्ञा निरोपिली जे छ २० रोजीं इंग्रेजानी मध्यरात्रीं हाला केली परंतु सरकारचे लोकानी हाला मोडून काडिली. इंग्रेजाचें माणूस दीडसेंपरियेंत ठार जाहालें. हाला केली परंतु त्यांचें तोंड चांगलें फुटलें, बेमोहर व्हावा परंतु बाहेरील लोक आजून पोचले नाहींत. त्यास निकडीचे कामांत निकड करावी म्हणजे त्याचें पारपत्य जलदीनेंच होईल. राजश्री विसाजी कृष्ण साष्टीस पोहोंचले व राजश्री राघोजी आंगरे सरखेल हेहि जाऊन पोहचले. तरी तुम्ही रात्रीचा दिवस करून साष्टीस जाऊन पोंहचणे. कामाचे उपयोगी पडणे याजकरितां जलद जाणें म्हणून आज्ञा. तर बहुत उत्तम आहे. आम्ही सोमवारी चिंचवडच्या मुकामास आलों. काल मंगलवारी नानेंमावल येथें आलों. छ मजकुरीं घाटा खालें गेला. उदईक जाऊन पोहोंचतों. आपले पुण्यें प्रतापें करून सर्व गोष्टी उत्तमच घडोन येतील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

¶*Bhavanji Lokhande as directed by the Peshwa proceeds to Salsette to reinforce Visaji Krishna.*

No. 93] [28-12-1774

श्री

राजश्री नारो आनंदराव गो। यांसी

सु॥ खमस सबैन मया व अलफ. तुम्हांबरोबर सा सात आठ हजार फौज देऊन गुथराथेतील कितेक कामेकाजे करावयाची आज्ञा करून रवानगी केली. त्यास तुम्ही जाऊन कोणती कोणती कामेकाजे बंदोबस्त केला व करणें राहिले काये, हे काहीच हा कालवरी लिहिलें नाही, हे कोण गोष्ट? यावरून तुम्हांस काये म्हणावे? इतकी चांगली फौज बरोबर असता कामाकाजाविसी सुस्ती होणे ठीक नाही. तरी प्रस्तुत कोणे ठिकाणी आहां? गेल्यापासून कामेकाज बदोबस्त काये केले व पुढें करणार कोणते ते सविस्तर लिहिणे व वरिचेवरी लिहितहि जाणे. इकडील मार तरी तीर्थस्वरूप हजार दोन हजार फौजेनसी पळून नर्मदेपार लांब गेले. त्याचे पाठीस सरकारची फौज उभयेता सरदार व राजश्री हरि बलाल मिळोन तीस पस्तीस हजार लागलीच आहे. सरकारचीहि स्वारी तापीपार आली. नवाबहि येऊन भेटले. समागमेच आहेत. जाणिजे छ २४ सवाल.

¶*Sakharam Bapu takes Naro Anandrao to task for not reporting his activities and movements.*

---

No. 94] [28-12-1774

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यास

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. तुमचे पत्र छ २१ सवालचे आलें तें पावोन लेखनार्थ ध्यानास आला. सुरतकराचा वकील उदईक येणार तो आला म्हणजे तेथील बंदोबस्त करून व व्यारे व सोनगड येथील बंदोबस्त करून फौजा घेऊन सत्वरच रेवापार येतो म्हणऊन लि॥ त उ(त)म आहे. व्यारे व सोनगडच्या बंदोबस्ताचे परियाये दोन, ते राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास लिहिले आहेत ते ध्यानास आणून तुमच्या त्यांच्या विचारे ठरेल तो विचार करून तिकडे आमित्राकडील श्वार आहेत त्याचा वेध तुटोन मुलकांत बखेडा न होये. सुरलीतपणें वसूल चाले येैस बंदोबस्त दोहीतून येका प्रकारे करून फौजसुधा आगमन सत्वर रेवा उतरतिरी होये तो आर्थ करावा. आमचे आज्ञेची मार्गप्रतीक्षा उभयेता करितात

मजकुराहून लोक व शाहाणा कारकून पाठऊन कैद करून किले मजकुरी पके बंदोबस्तानें अटकेत नेऊन ठेवणें आणि पोटास सिधा मध्यम प्रतीचा देत जाणें. पत्र पावतांच लोक पाठऊन किले मजकुरी अटकेंत नेऊन ठेवणे" म्हणोन आज्ञा. त्याजवरून मौजे मजकुरास लोक व कारकून पाठविले आहेत कैद करून आणून किल्यावर आज्ञेप्रमाणें ठेऊन बंदोबस्त करितों. परंतु माणसे कैद करून आणलियावर त्याचे घरीं वस्तभाव दाणा असेल त्याचा तसनस होईल याजकरितां माणसे कैद करून आणविली, घरीं वस्तभाव जे असेल ते पाटील कुलकर्णी मौजे मजकूर यांचे हवाला करून यादी घेऊन येणें म्हणोन कारकुनास सांगोन बंदोबस्त कराविला आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Vishvanath informs the Peshwa from Sinhagad that in accordance with instructions from him soldiers have been sent to seize the families of Sakharam Hari and Ramchandra Vithal.*

---

*No. 92]* *[28-12-1774*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री भवानजी लोखंडे दिमत राजश्री शाहाजी बावा भोंसले दंडवत विज्ञापना. तागायत छ २४ शवाल परियेंत येथास्थित आसे विज्ञाति जे. कृपा करून पत्र पाठविलें तेथें आज्ञा निरोपिली जे छ २० रोजीं इंग्रेजानी मध्यरात्रीं हाला केली परंतु सरकारचे लोकानी हाला मोडून काडिली. इंग्रेजाचें माणूस दीडसेंपरियेंत ठार जाहालें. हाला केली परंतु त्यांचें तोंड चांगलें फुटलें, बेमोहर व्हावा परंतु बाहेरील लोक आजून पोचले नाहींत. त्यास निकडीचे कामांत निकड करावी म्हणजे त्याचें पारपत्य जलदीनेंच होईल. राजश्री विसाजी कृष्ण साष्टीस पोहोंचले व राजश्री राघोजी आंगरे सरखेल हेहि जाऊन पोहचले. तरी तुम्ही रात्रीचा दिवस करून साष्टीस जाऊन पोहचणे. कामाचे उपयोगी पडणे याजकरितां जलद जाणें म्हणून आज्ञा. तर बहुत उत्तम आहे. आम्ही सोमवारी चिंचवडच्या मुकामास आलों. काल मंगलवारी नानेंमावल येथें आलों. छ मजकुरीं घाटा खालें गेला. उदईक जाऊन पोहोंचतों. आपले पुण्यें प्रतापें करून सर्व गोष्टी उत्तमच घडोन येतील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

¶*Bhavanji Lokhande as directed by the Peshwa proceeds to Salsette to reinforce Visaji Krishna.*

No. 93] [28-12-1774

श्री

राजश्री नारो आनंदराव गो यांसी

सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्हांबरोबर सा सात आठ हजार फौज देऊन गुथराथेतील कितेक कामेकाजे करावयाची आज्ञा करून रवानगी केली. त्यास तुम्ही जाऊन कोणती कोणती कामेकाजे बंदोबस्त केला व करणें राहिले काये, हे काहीच हा कालवरी लिहिलें नाही, हे कोण गोष्ट? यावरून तुम्हांस काये म्हणावे? इतकी चांगली फौज बरोबर असता कामाकाजाविसी सुस्ती होणे ठीक नाही. तरी प्रस्तुत कोणे ठिकाणी आहां? गेल्यापासून कामेकाज बदोबस्त काये केले व पुढें करणार कोणते ते सविस्तर लिहिणे व वरिचेवरी लिहितहि जाणे. इकडील मार तरी तीर्थस्वरूप हजार दोन हजार फौजेनसी पळून नर्मदे-पार लांब गेले. त्याचे पाठीस सरकारची फौज उभयेता सरदार व राजश्री हरि बलाल मिळोन तीस पस्तीस हजार लागलीच आहे. सरकारचीहि स्वारी तापी-पार आली. नवाबहि येऊन भेटले. समागमेच आहेत. जाणिजे छ २४ सवाल.

¶*Sakharam Bapu takes Naro Anandrao to task for not reporting his activities and movements.*

---

No. 94] [28-12-1774

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यास

७ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्रानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. तुमचे पत्र छ २१ सवालचे आलें तें पावोन लेखनार्थ ध्यानास आला. सुरतकराचा वकील उदईक येणार तो आला म्हणजे तेथील बंदोबस्त करून व व्यारे व सोनगड येथील बंदोबस्त करून फौजा घेऊन सत्वरच रेवापार येतो म्हण-ऊन लिा त उ(त)म आहे. व्यारे व सोनगडच्या बंदोबस्ताचे परियाये दोन, ते राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास लिहिले आहेत ते ध्यानास आणून तुमच्या त्यांच्या विचारे ठरेल तो विचार करून तिकडे आमित्राकडील श्वार आहेत त्याचा वेध तुटोन मुलकांत बखेडा न होये. सुरलीतपणें वसूल चाले यैसे बंदोबस्त दोहीतून येका प्रकारे करून फौजसुधा आगमन सत्वर रेवा उतरतिरी होये तो आर्थ करावा. आमचे आज्ञेची मार्गप्रतीक्षा उभयेता करितात

तेणे करून दिवसगत लागते ते उपयोगी नाही. तुमच्या त्याच्या विचारें उतम दिसेल ते करून सत्वर या प्रांते फौजसहवर्तमान यावे. इकडील विचार पूर्वी सविस्तर लिहिलाच आहे. कबिलें व बुणगे नडियादेस पाठऊन सडे होऊन राहिले आहेत. दोन च्यारसे श्वार व पाच सातसे पायेदल रेवातिरासहि पाठविले आहे. इतके दिवस कनिष्टास मुलकाची आषा होती यास्तव मारकूट करून वसूल वेत होते, परंतु मुलूक लुटीत नवते. तुम्ही फौजसुधा आलियाचे वर्तमान कललियापासून मुलूक लुटितात, गुरे ढोरे आणून सिबदीस देतात, तेणे करून गाव उज्याड होत चालिले. माल जोरी कपास वगैरे रबीचा रानात आहे तो चोरपोर लुटून खातात यैसा प्रसंग आहे. छाणी, पादरे दोन्ही मातबर गाव येथे दो लक्षाचा वेरा घातला आहे. तो मारकूट करून वसूल करितात तो रुपया फौजेस व सिबदी देऊन तुमचे सन्मुख जावे इतकियांत रा। लालजी पाटील आले तर बरेच जाले. जथ भारीच जाला. यैसाहि विचार करितात. इकडील खराबी या प्रकारची होते. तिकडाल मुलूक हाताखाले आला आहे, तिकडील वेध न तुटला तर तेहि खराबीस मूल आहे. यास्तव जो मुलूक हाताखाले आला आहे त्याचा बंदोबस्त करून इकडीलहि समये सांभालिला पाहिजे. यास्तव आमच्या पत्राच्या उतराची मार्गप्रतीक्षा इतक्याउपर न करावी. हेच पत्र सहश्र पत्राचे जागा मानून तुमच्या व उभयेताच्या विचारें जे आगत्य कर्तव्य ते सत्वर करून रेवा उतरतिरास फौजसुधा आगमन होये तो आर्थ करावा म्हणजे श्री महदयेश तुम्हास देईल. वारंवार तोच मजकूर किती म्हणोन ल्याहावा? इगरेज नरोतमदासास कुमक पाठऊन तो बखेडा लांबणार होते तो आपली फौज सत्वर पावली. नरोतमाचे पारपत्य जाले. हे कर्म श्रीमंतांच्या पुण्येप्रतापे जाले. तुम्हास येश श्रीने दिल्हे. इग्रजाची पत्रे सापडली ते सरकारांत रवाना केली, उतम केले. परंतु इगरेज व सुरतकर मोगल श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या लक्षात. निमित्य नरोत(म) * * * * * देऊन सरकार मुलकांत दाखला * * * * * हि भाव उभयेता कारभारी यास व राजश्री भीवरावजीस ल्याहावा. आम्हीहि लिहिले आहे. मुंबईकर इंगरेज यास लेहोन येविसीचा बंदोबस्त करवा की फिरोन यैसे बखेडिये न राहात. कनिष्टाकडील काकोबा परभू वगैरे सुरतेत राहून कुचाली करितात. याजविसीहि सूचना ल्याहावी की त्यास सुरतेतून काढून देत हे मुबईकरास लेहोन त्याचे पत्र सुरतकरास येविसी येते कीजे रा। छ २४ माहे सवाल.

*¶Fatesing Gaikwad writes to Naropant Keskar that Govindrao Gaikwad is getting bolder and levying contributions all round. He therefore requests the addressee to march to his assistance with all possible haste.*

6016

No. 95] [28-12-1774

## श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे
सेवेसी

सेवक नारो गणेश वाडदेकर कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। मार्गसीर वद्य दसमीपावेतो मुकाम बडोदे सुखरूप असो. यानंतर आपण कृपा करून पत्रे पाठविली ती पावली. लिहिले वर्तमान विदित जाहाले. इकडील समाचार तरी तूर्त फौज तिकडे न(?)येत. ताबेकराची फौजेने दाटी केली तरी तिकडे फौज येईल. नाही तरी येत नाही. सुखरूप राहाणे. फौज आली तरी तुमचे वाटेस कोणी जात नाही. आम्ही तिकडे येणार होतो परतु काही कार्यमुळे राहाणे जाहाले. यास्तव येणे जाहाले नाही. येथे आम्ही स्वार व प्यादे तयार करून ठेविले होते परतु तुमचे प्रतिउपर आले नाही. मग तैसेच राहिले. चिरंजीव भाऊस देसी रवाना करणार म्हणून लिहिले उतम आहे. आम्हाविसीहि तीर्थरूप दादास पत्र ल्यावे की सुखरूप आहेत म्हणून लिहिणे. रा। कचोपतानी पत्र लिहीले आहे त्याजवरून कलो येईल. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

चिरंजीव रा। भाऊ यासी आसीर्वाद. पत्र लिहिले आहे त्यावरून कलेल. हे आसीर्वाद.

*¶Naro Ganesh Vadadekar communicates to Naropant his own arrangement of forces at Baroda, and says that the forces even though they proceed to the addressee will in no way molest him.*

---

No. 96] [29-12-1774

## श्रीम्हाळसाकांत

राजश्री सुखानंद मेहता गोसावी
यासी

@ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री गोविंदराऊ गायेकवाड सेनाखासखेल समसेरबाहादर दंडवत सु॥ सन खमस सबैन मया व आलफ. राजश्री रणा भगवंतसिंगजीस व तुम्हास पूर्वी पत्रें पुणेकडील फौज आली तिचें पारपत्य करावयास राजश्री त्र्यंबकराव गायेकवाड तुम्ही येके विचारे जमाव करून

त्या फौजेचें पारपत्य रात्र[शिक्का]वित करून करणे, चैन पडों न देणें म्हणून लिा होते. त्याप्राा तुम्ही करीतच आसाल. खासा स्वारी वीस हजार फौजेनसी मार्गसीर्ष श्रद्ध १३ मुहूर्ते त्या फौजेचे पारपत्य करावयास येत आहे. त्या फौजेचे मुकाबला. रात्रवित करून उपद्रव करीत जाणें. इतकियांत फौज येऊन खासा स्वारी पोहचली जाणावें. रा छ २९ माहे सवाल.

¶*Govindrao Gaikwad requests several Chieftains in Gujarat to check the advance of the Poona army and to harass it in all ways.*

---

*No. 97]* [*29-12-1774*

## श्रीम्हाळसाकांत

राजश्री त्रिंबकराव गायकवाड
गोसांवी यांसी

८ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो गोविंदराव गायेकवाड सेनाखासखेल समसेर बहादर राम राम. सुहूर सन खमस सबैन मया आलफ. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लेखनार्थ सविस्तर ध्यानास आला व राजश्री रंगो बलवंतराव यांचे जबानी वरूनहि कळले. तुमच्या लिहिल्याप्रमाणे राजश्री भगवंतसिंग रणा वगैरे यांसी पत्रे लिहून पाठविली आहेत. पाठऊन पागा सरंजाम आणऊन फौजेच्या तोंडावर राहाणे आणि रात्रदिवस हुलड करून चैन पडू न देणे. खासा स्वारीहि त्रयोदसीच्या मोहूर्ते निघान तिकडे येत आहे. तुम्ही हिंमत धरून सरजाम जथून आसावें. वर्तमान वरचेवरी लिहीत जाणे. वरकड रंगोपंतास समक्ष आज्ञा केली आहे. त्याप्राों तुम्हास लिहितील त्याजवरून कळेल. रा छ २९ [ शिक्का ] माहे सवाल.

¶*Govindrao Gaikwad asks Trimbakrao Gaikwad to lose no time in harassing the hostile forces.*

---

१ याच तारखेचीं व याच मजकुराचीं पत्रें त्रिंबकराव धारे, कृष्णाजी चवाण, भगवंतराऊ गायेकवाड, भगवतसिंग रणा यांस आहेत. त्यापैा एकांत 'तांबवेकराची फौज सुरत माहालांत आली आहे' हा व धारे याच्या पत्रांत 'तुम्ही भीलवास कोली वगैरे घेऊन, राजश्री त्रिंबकराव गायेकवाड यांजकडे जाऊन त्या फौजेच्या तोंडावर राहाणे' हा मजकूर जास्त आहे.

No. 97A] [31-12-1774

**श्री**

सेवेसी विज्ञापना. गोविंद नरसिह सा। नमस्कार विनंती. येथील कुशल छ २७ सवाल दर जागा नवापूर सुखरूप असो. यानंतर इकडील वर्तमान श्रीमंत दादांचा हा काळपावेतो मु।।च आहे. फिरंगी सुरतेहून आला म्हणऊन सोनगडीहून मात्र वर्तमान आले. लस्करास बातमी आमची गेली आहे. अस्तमानपावेतो येईल. आली म्हणजे तहकीक सेवसी लिहून पाठऊ. सौ आनंदीबाईहि आंकलेश्वरावर आली म्हणऊन वर्तमान आले आहे. सते मिथ आमची माणस लस्करातून आलियावर कलल. बखतराम येऊन आज पोहचला. उदईक पुढे लाऊन देतो. डोकेचे जासूद पाठऊन देतो म्हणऊन लि। तर उतम आसे. ते आले म्हणजे येथील अजारी सेवसी पाठऊन देतों. वरकड वर्तमान येथास्तित असे. बहुत काये लि। हे विज्ञाप्ति.

¶*Govind Narsinha writes news about Raghunathrao, the English and Anandibai.*

---

No. 98] [December 1774

**श्री**

सेवेसी नारो गणेश कृतानेक सा। नमस्कार विनंती यैसीजे. श्रीमंत राजश्री दादासाहेब यानी राजश्री नरोतमदास यास पत्र पाठविले व गोविंदराव गायकवाड यासहि पत्रे हाती. त्यास जे दिवसी ठाणे बसवावयास गेले ते घालमेलीत आले. तो नरोतमदास याजकडील भावदास याजकडे दिल्हा. दक्षणी म्हणून वाचावयास घेतला. ठाणेयातून ते निघाले. कासीद इतकेयात गोविंदराव गायकवाड याजकडे गेले. त्यास कागद बजिनस पा. हा वाचून पाहून श्रीमंत राजश्री बापूकडे रवाना करावा. यात सर्व पुढील ब (म?) न सबा श्वदस्तूरचा आहे. बडोदयास माणसे बातनी आजच रवाना केली आहेत. श्रीमंत रा। सयाजी गायकवाड यास स्वामीनी पत्र दिल्हे ते पावते केले. परंतु त्याचे मानस कूच करावयाचे साफ नाहीत. गावात दाहा पाच हजार रु। मागतात आणि लुटितात. जर जबरदस्ती पोहचली तरच जातील. हे गेलेविना गावात कोणी येत नाही. परगणेयातहि राहात नाही. याची तजवीज करणार आपण आहेत. सत्वर तजवीज जाली पा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. नेहमी दोनसे राऊत तीन च्यारी घाटास आसेल तर कागदपत्र सापडेल हे विनंती.

¶*Naro Ganesh refers to the proposals made by Raghunathrao to Govindrao Gaikwad and Narottamdas and further asks for severe action to be taken against Sayajirao who has been harassing the ryots.*

No. 99]

[December 1774

श्री

विनंती विशेष. सुरतकर इंग्रेज याची खासगत खरिदी खादी व कापूस सालाबाद दोन लक्ष रुपयाचा माल परगणे जंबूसर व पाा अमोद व पाा देहेजबर व पाा डबई वगैरे खरिदी आगाऊ होऊन सरसाल[1] माल गाडियावर भरून भडोच व जंबूसरचे बंदरी होडीत भरून सुरतेस येतो व खुशकीचे मार्गेहि सुरतेस येतो. त्या मालाची चौकसी मनास आणून सरकारात जफ्त करावा. याचा प्रकार जागा जागा परगणे मजकुरी खादीकर वणवाट व खरिदीचे दलाल आहेत ते जकातीचे कमाविसदारास ठाऊक आहेत. यास्तव जकातीचे कामाविसदाराचे हाते मालाचे खरिदीचा ठिकाणा लाऊन माल जफीत (जफतीत?) आणावा. मालाचे जफ्तीचा बोभाट पडालियावर दलाल लबाड व जकातीचे कमाविसदार जकाती करिता इंग्रजाचा माल सावकाराचे नावे काढितील. यास्तव खादी व कापूस दरोबस्तदेखील साऊकार अटकाव करावा म्हणजे सहजच इंग्रेजाचा माल ठिकाणी पडेल. जरूर या कामाची चौकसी करावी. दोन लाख रुपयाचा माल इंग्रजाचा सापडेल. कादारहि कृत्रिम करितील. पुरतेपणे चौकसी होऊन माल जप्त जाल्याने इंग्रजाचे नुकसान बहुत होईल. येविसीचा बोभाट शहरांत पडेल. लोभ करावा हे विज्ञापना.

¶*Certain measures to be adopted for confiscating the merchandise of the English at Surat and thus bring them in loss are suggested by the writer.*

---

No. 100]

[December 1774

श्री

सेवेसी साा दंडवत विनंती. येथिल वर्तमान तर मोगलाचा आमचा करारदाद जाला की, वकील समागमे घेऊन गुरुवारी लस्करात जाणे. त्याप्रमाणे आपणास लिहून पाठविले आणि काल बुधवारी रात्रीस चंद्रोदई ठाणियातोन बाहेर ब्राह्मणाचे घरी प्रस्तानी आलो. प्रात:काली मोगलाकडेस वकील समागमे घ्यावयास चोपदार पाठविला. त्यास मोगलाने सागोन पाठविले की, इंग्रजाकडून कोसले येणार आहेत त्या गडबडीत आम्ही आहो. कौसल येऊन गेले म्हणजे वकील पाठवितो घेऊन जाणे. वकील आल्याविना न जावे येैसे सागोन पाठविले यास्तव वकिलाची प्रतीक्षा करीत बसलो. इंग्रजाचे कौसलदार दरबारास येऊन गेले.

[1] वर्षभर.

हे बातमी आणऊन फिरून चोपदार पाठविला तो जाब दिधला की आता दोन प्रहर जाले. आजचा दिवस मोकाम करून उदईक प्रातःकाली जाणे. कागदपत्र सर्व सिध जाले आहेत परंतु उदईक जाणे थैसे चोपदाराबराबर आम्हास सांगोन पाठविले. आम्ही लस्करास येणार. सरंजामाचा गाडा जलदीने पावणार नाही यास्तव सामानाचे गाडा भरून पुढे रवाना केला. गाडा दरवाज्याबाहेर निघाला. तो फिरून दरवाज्यावरून मोगलाची माणसे जाऊन मावारा फिरून आणिला याचा विचार काये तो पुर्ता कलो आला नाही. समई याजप्रमाणे प्रकार घडला यास्तव आज राहाणे जाले. येविसीचा भावगर्भ काये असल तो उदईक कलेल. उदईक जाणे म्हणून सांगोन पाठविले आहे. त्यास उदईक येतो. येऊ न देत तर काये प्रकार दिसोन येईल त्याप्रमाणे आपणास लेहून पाठऊन. येथे इंगरजाचे प्राधान मोगल त्याचे ताबे आहेत. इंगरजाकडून कौसलदार दरबारास मोगलाकडे येऊन काये मसलत करून राहाविले हे समजत नाही. आम्ही यावयाकरिता तर्तूद करावयासी आलस करीत नाही. परंतु निर्वीउपाये यांचे प्रकार (?) लिहावे. आलीकडे खूळ जाल्यापासोन आपले पक्षास खातरेत आणीत नाहीत. साष्टीवर मोहीम केलीच आहे. त्याचें निवारण अद्यापि जाले नाही तेव्हा दुसरा आर्थ चितात कसा आणितात? सांप्रत याचे चितात विशम दिसतें भेटी अंती सविस्तर निवेदन करून. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer (Dattaji Narayan) regrets that he is delayed owing to the dilatoriness of the Nawab who first agreed to allow his Vakeel to accompany the writer but who tried to put it off on some plea or other. He is therefore—he says—sending his things and will soon follow when the Vakeel is ready to accompany him. He refers to the great influence the English wield at the Court of the Nawab.*

---

*No. 101*] [*Dec. 1774?*

**श्री**

+विनंती विशेष. आपण पूर्वी पत्र लिहिले तेथें लिहिलें होते की, नरोतम हस्तगत जाला नव्हता तेव्हा लोक तुम्हास हासत होते; हाली काये म्हणतात? त्यास बदनक्ष पाहून भाषण करीत होते. श्रीमंताचा नक्ष व इबरत सर्वत्र आहेच. त्याप्रमाणे आपणा येश या स्थली प्राप्त होऊन इबरत फौजेची बसावी हे इच्छा धरून आपणास विनती करीत होतो. ईश्वरकृपेने आपण आमचा मनोदये

---

+ पत्र दत्ताजी नारायण यांचें.

सिधीस पाववेिला येणेकरून बहुत समाधान. आज ता। श्रमाचे दिवस काढिले त्याचे त्याचे विस्मरण जाले. याउपर येथील ग्रहस्थाचे पारपत्य येथास्तित होऊन येई हे इच्छा धरितो. ईश्वरकृपेकरून हेहि इच्छा पूर्ण होईल तो सुदिन हे विनती. नालदबे व मेणा पा। म्हणून लि। त्याचे उतर पेशजी लि। आहे. येथे बाजारात. पुणियाप्रमाणे मिलत नाहीत. नालबंद येथील आहेत तेच नालमेख लोहार येक आहे त्याजपासोन करऊन तेच नालबंदी करितात. दुसरेयास देऊ देत नाहीत. त्याचा इजारा आहे यास्तव लोखंड बाहेर नेऊन परगणियाचें लोहार आणऊन नाल मेख तयार करवावे ते सोईस पडतील हे विनंती. पालखीचे व झालरी सरंजाम तयार करविला आहे तो आला म्हणजे रा। करून हे वि।।.

¶*Dattaji Narayan compliments Naropant Keskar on his success over Narottam of Hasot.*

---

*No. 102*] [*1774*

[ पहिला बंद गहाळ. ]

२

श्रीमंत नानाचे सेवसी

+वांचलो. त्यास आता तो आपण व बापू हे मजला वडील. उभयेताचे पाये कैसेहि येकदा मजला दिसावे हे च्यातकन्याये आहे. याचा साक्ष श्रीहरि आहे. स्वधर्मावर पुन्यावर आपन उभयेतानी मसलत उचलली, श्रीहरि याचा सेवट करीलच यांचे जे विभागी काया-वाचा-मने आसतील त्यांच श्रीहरि उतम करील. आनि जे नसतील त्यांचा येहपर उतम होनार नाहीच. त्यास मसलतीचे आरंभी प्रथम मामाजवळ मी आहे. ते वेळेचा जो प्रकार तो तिघा जनाचे मातबराचे साक्षीने सांगेन आगर आपरोक्षि आपन पुसावा. त्यावर मग मी नाहीसा जालो. हे मी काये लिहू? परंतु उतम आचेरण केले त्याचे फळ उत्तम होईल. मधे ग्रहदशा आनी मामा गेले यास उपाये नाही, त्यास विस्तार काये ल्याहावा? श्रीमंत बापूचे पत्री मजकूर येथील कचा जो आहे तो लिहिला. श्रेमास आळस करणार नाही. परतु येथील कामाची खराबी हे आपणास कोन लिहिलेच नाही. मी ल्याहावे तर तर आपले कारभाराकरिता आगर कसेहि कारभारात सिरावयाकरता लिहितात हे चितात येईल. परंतु मी तात्यास बरानपुरावर साफ सागितले होत आनि येथून

+ पत्र दिवाकर पुरुषोत्तमाचें.

साफ लिहिले होत. यासहि अंतर केले नाही. दवलतकरण सावधाई आनि समये कसा, देशकाल जानून जलदी आगर आळस करावा ते काहीच नाही तूर्त पेच. आमनेरावर सेनाधुरंधर आलेत आनि येथे येक मनुशाचा आला नाही. मोकाबला पंचेवीस कोस राहिला. याची तजवीज आपण तेथून करावी. सात आठ हजार फौज आगर ज्याबतजेग वराडात जलेद दर मजल यावा. नाहीतर येजमानाची यासी येत (?) सिपाईगिरी त्याहीवर सेनाधुरंधर व याची जागा नास होता विलंब नाही बाबूरावजी सर्व लिहितील उभयेता बधू येक ( अपूर्ण )

¶*This fragmentary letter of Divakar Purushottam gives the good wishes of the writer for the successful undertaking of the Barbhais.*

---

*No. 103*] [*1-1-1775*

**श्री**

**राजश्री नारोपंत गोसावी**
**यांस**

७ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. पूर्वी तुम्हास पत्र लिहिले आहे कीं श्रीमंत राजश्री दादासाहेब चापानेरास आले. त्रयोदसीस मंदवारी राजश्री गोविंदराव गाईकवाड भेटीस सुक्रवारी रात्रौ भेटीस जाणार म्हणऊन लिहिलें होते. त्यास तो विचार न ठरला. मग श्रीमंत राजश्री दादासाहेब मार्गसीर्ष वद्य १३ मंदवारी बडोदियापासून गाव मौजे कोटंबी प्रा वोघोडे येथे येऊन मुकाम केला. त्रयोदसी मंदवारी संध्याकाळीं राजश्री गोविंदराव गाईकवाड हजार स्वार व चिरंजीव राजश्री मल्हारव गाईकवाड येसे गेले. आमचे पित्रव्य व त्याचे कारभारी राजश्री कुसाजी सिंदे यास लस्करात ठेऊन गेले. रात्रौ इष्ट ठरलिया भेटी घेणार. श्रीमंतासमागमें फौज थोडकीच आहे तेहि थकली आहे. माळव्याचा घाट चढले त्यादिवसापासून नवे दिवसीं चांपानेरास आले. दिसा पंचविसा कोसाच्या मजली करीत आले. तेणेकरून मनुष्ये घोडे मृतप्राये जाले आहे. पाठीमागें सिंदे होलकर व राजश्री हरिपंत फडके येशा फौजा आहेत परतु लांब आंतर त्यासी व श्रीमंतासी पडले आहे. परतु त्या फौजा सत्वरच येतील. यास्तव तुम्हापासी जितकी फौज आसेल तितक्यानसी तुम्ही व राजश्री गबाजी बलाळ येसे श्वार होऊन येणे. राजश्री जनार्दन रायाजी व्याऱ्याचा बंदोबस्त करून माघारे आले आसले तर त्यासहि

घेऊन येणे. उतमच जालें. कदाचित ते आले नसले तर त्यांची वाट न पाहाणे. ते मागाहून येतील परतु तुम्हापासी जे सामान आसेल तितकेच घेऊन रेवातिरास येणे. रोजची रोज तुमचे वर्तमान आम्हास व आमचे तुम्हास कले यैसे करणें. इकडील वर्तमान वरचेवर आम्ही लिहीतच आहो. परतु तुम्हाकडील ल्याहावयाव्यास आलस न करणें. सुरतेचा वंदोबस्त काही बाकी राहिला आसिला तर पुढे करूं परतु पत्र पावतांच स्वार होऊन येणे. राजश्री बापू व राजश्री नाना फौजसुधा पिंपलनेरासमीप आले यैसे वर्तमान कनिष्ठाच्या लस्करांत उठले आहे. यास्तव उभयेतास पत्र लिहिली आहेत. तुम्ही पत्रें लेहोन रवाना सत्वर करावीं. याउपर दुसऱ्या पत्राचा मार्ग न पाहाता कूच करून लांब लांब मजली करून रेवातिरास येणे तो इकडीलहि वर्तमान कलेल. येथून लेहो त्याप्रा करावयास येईल. र्‍ाा छ २८ माहे सेवाल बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad to Naropant Keskar communicating the movements of Raghunathrao and of his pursuers and asking the addressee to hasten to his assistance to oppose the forces of Raghunathrao.*

---

*No. 104*]

[*2-1-1775*

**श्री**

**राजश्री नारोपंत गोसावी**

**यांस**

ॐ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्रो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे. विशेष. श्रीमत राजश्री दादासाहेब दाहा हजार फौज व गाडदी हस्ती डेरे दांडे व बाजार बुणगेसहीत मार्गेश्वर वद्य आमावाशा रविवारी बडोदिया नजीक मुकाम केला. पुढे कर्तव्यार्थ तो सविस्तर राजश्री गबाजी बलाल व राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यांचे पत्री लिहिला आहे ते ध्यानास आणून फौजसुधा रेवातिरास सत्वर यावे. आनमान न करावा. आपले आगमन फौजसुधा जालिया बहुत उपयोगी पडेल. यास्तव जलदीने यावे. उभयेता कारभारी व राजश्री भीवरावजी यास पत्रे लिा आहेत. ते आवलोकन करून आपणहि पत्रे त्रिवर्गास ल्याहावी आणि सत्वरच लाख जोडी बरोबर रवाना करावी. आम्हाकडील कारकून राजश्री राघो बावाजी व राजश्री भिकाजी लक्षुमण लस्करात पावले नसले तर राजश्री भीवरावजीस सूचना ल्याहावी की उभयेता कारकुनास

आम्ही पत्र लिा आहे ते उभयेता कारभारीयास वाचून दाखऊन फौजा सत्वर या प्रांते येत तो आर्थ करावा व फौजा रवाना केलियाचे वर्तमान आम्हास सत्वर प्रविष्ट होये येसे करावे. येसे आगत्य ल्याहावें. वरचेवर आम्हाकडील पत्रे येऊन आपल्यास वर्तमान कलेल. आपणहि पत्राची उतरे सत्वर पाठवीत जावी. रा। छ २९ माहे सेवाल बहुत काये लिहीणे लोभ करावा हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad reports to Naropant Keskar that Raghoba has arrived near Baroda and asks him to lose no t me in jcining him (the writer).*

---

*No. 105*] [*4-1-1775*

**श्री**

**राजश्री नारोपत गोसावी**
**यांस**

ॐ अखंडितलक्षुमीआलंक्रुत राजमान्ये श्री। फतेसिंगराव गाईकवाड दडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिलें पाहिजे. विशेष. श्रीमत राजश्री दादासाहेब बडोदियास आले हे वर्तमान तीन च्यार पत्रीं वरचेवर लिहिले आहे. तुम्हापासी जितकी फौज आसेल तितक्यानसी रेवातिरास येणे म्हणऊन लिहिले, परतु तुम्ही तेथून कूच केलियाचें वर्तमान लिहिलें नाही. या उपर तुम्ही सत्वर कूच करून पत्र पावताच श्वार होऊन यावे. रेवातिरास आलिया मग जसें लेहों तसें करावयास कार्यास येईल. तुम्हापासीं थोडकें सामान तेवढ्यानसीं कसें यावें यैसा विचार कराल, न करावा. इकडील फौज रेवापार येत नाहीं. यास्तव तुम्ही सत्वर कूच करून रेवातिरास येणें. येविसी संशये येकरूप न धरणें. राजश्री जनार्दनपंत मागाहून येतील. इकडील वर्तमान तर श्रीमंती आम्हाकडे खिजमतगार व कारकून पाठविले होते कीं भेटीस येणें. तुम्ही सागाल तेणेंप्रा। मान्ये होऊन सनदा देऊं. अंतस्ते घाटितात कीं हला करून स्थल घ्या(वे). हाहि विचार खरा. दुसरे दगा करून धारेचा किला घेतला, तेथे कुटुंब ठेविले, तैसेहि बनल्यास करावे हाहि हेत खरा परतु श्रीसतेनें घडेल तें खरे. परतु तुम्ही तेथे राहिल्या कनिष्ट वर्तमान उडवितात कीं वसई व माहीम व साष्टी श्रीमंत इगरेजास दिल्ही. त्यानीं वसईकडे दंगा केला यामुलें फौज सुरत माहालांत आली होती ते वसईकडे जाणे म्हणऊन कारभारी यांचीं पत्रें आलीं त्याजवरून फौज वसईस गेली. यास्तव तुम्ही श्वल्प सामानानसी रेवातिरास आलेस म्हणजे शह बसेल. मागाहून राजश्री जानर्दन रायाजीहि

सत्वरच येतील चिंता नाहीं. दुसरे प्रा। जंबूसेर व आमोद येथे श्रीमंताचे कमाविसदार गेले. राजश्री आपाजी गणेश यांसहि भेटीस बोलाविलें आहे. येतील न येतील हे न कले. प्रा। डबईचे कमाविसदार व किलेदार यासहि पत्रें लेहोन भेटीस बोलाविले आहेत. त्याचा कारकून आम्हास पुसावयास आला होता त्यास आम्ही सांगितलें आहे की आपली फौज ये तोंवर दम धरणें. यास्तव तुम्ही सत्वर रेवातिरास आलिया त्यासहि धीर होईल आथवा त्यानीं आंत घेतल्यास दोन च्यारसे श्वार पाठऊन तेथील बंदोबस्त करावयास कार्यास येईल. तेंहि कार्य मातबर व नाजूक आहे. यास्तव जलद आलिया उपयोगी फार आहे. जागा जागा कमाविसदार पाठविले. डबई घेऊन राजश्री गोविंदराव गाईकवाड यांस कबिला ठेवावयास स्थल देणार, हे वर्तमान आगत्य कारभारी यास ल्याहावें. †रा। छ १ माहे जिलकाद बहुत काये लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad to Naropant Keskar communicating the troubles started by Raghunathrao and asking him to come immediately.*

---

*No. 106*]

[*4-1-1775*

**श्री**

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

पोष्य गोविंद रघुनाथ व दताजी नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ १ माहे जिलकाद बुधवार प्रात:का(ल)पर्यंत आपले कृपेकरून येथास्तित असे. विशेष. आपण पत्र पाठविले ते काल संधाकाली पावले. तेथे लिहिले की, श्रीमंताच्या व राजश्री गोविंदराव गायेकवाड याच्या भेटी जाल्या. यामुले येथे मोकाम उपयोगी नाही यास्तव येथोन कूच करून रेवातिरास मोकाम होईल म्हणून लिहिले ते सविस्तर कलले. आपण लिहिले ते प्रमाण. ऐसियास आपले पत्रापूर्वी श्रीमंताचे वर्तमान काल प्रात:काली येथे आले त्यावरून आपणास पत्र लेहून मुजरत सरकारचा जासूद आपणाकडस पाठविला तो पावलाच असेल. असो. जे समई जसा प्रसंग घडोन आला त्याप्रमाणे करावेच लागेल. त्वरा करोन तुम्ही आपला जाबसाल, त्याची समजुती व आपले कार्य घडोन येई ते करणे. त्यास हे लबाड, सुप्रवृत्तीने जाबसाल करितील ऐसे पहिल्यापासोन याचा मनोदये नाही. आ(ता) तो बखेडा श्रीमंताचे आलियाचा त्यास दिसोन आला. काल त्रितीये प्रहरी आम्हास बोलाऊन नेऊन जाबसाल

करावा यैसा प्रकार होता. त्यास हे वर्तमान आलियावर कालचा दिवस घालविला. याप्रमाणे याचे फैल आहेत. हाली आपणास तो कूच करून रेवातिरी जाणे प्रात जाले आणि गेलेच पाहिजे. हे वर्तमान आइकोन पुढे कोणता मनसबा करितील हे न कले. असो. आपले आज्ञेप्रमाणे तूर्त सामदाम आपले कार्य घडोन येईल आणि त्याची समजुती होय त्याप्रमाणें जाबसाल करितो. मग घडोन येईल ते खरे. आपणास लेहून पाठऊ. यैसे असता येथास्तित घडोन न आल्यास चिता काये आहे? श्रीमंताचा पुण्यप्रताप समर्थ आहे. श्रीमंत या प्राती आले यामुले सरकारतर्फेच्या फौजा चाकरीस येतलिच. ते समई सर्व मनोदयानरूप घडल, चिंता नाही. आताच वर्तमान आले की, श्रीमंतासमागमे दाहा हजार फौज व सोला हती आहेत म्हणून कासी(द) आला त्याणे मोगलाकडील वर्तमान सागितले व मागाहून सरकारच्या फौजा येतात हेहि सागितले. सिसे दोन मण तूर्त पाठवणे. राहिला जिनस मागाहून पाठवणे म्हणून लिहिले. सिसे दारूची बंदी फार आहे परतु येत्न करून तजविजेने बाहेर काढून गाडा भाडे करून कामरेजस पावता करितो. आपण कामरजकर कमाविसदार यास पत्र पाठवावे कीं सिसे सुरतेहून येईल त्यास गाडी देऊन जेथ लस्करचा मुकाम असेल तेथे पावते करणे. याप्रा पत्र पाठवावे. साष्टीचे वर्तमान अद्यापि तथ्य आले नाही. आलियावर लेहून पाठऊ. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Naro Anandrao is informed of the developments in the affairs of Gujarat especially with reference to the relations between Raghunathrao and the Gaikwads and also of the possible changes that will have to be made in the line of action to be followed there.*

---

*No. 107]* *[14-1-1775*

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे

सेवेसी

पोष्य गोविंद रघुनाथ व गंगाधर रघुनाथ व दताजी नारायेण कृतानेक साष्टाग नमस्कार व दंडवत विनंती. येथील वर्तमान छ ११ माहे जिलकादपर्यंते मुा कामरज यथास्तित असे विशष. आपण पत्र पाठविले ते काल भृगुवारी संध्याकाली वराछियासी पावले. श्रीमंताकडील कारकून सुर्तेस आले आहे, येविसीचा मजकूर लिहिला तो सविस्तर कलला. त्यापूर्वी आम्ही उभयता सुर्तेस असता जलमार्गे भडोचहून कारकून सुर्तेस आलियाची बातमी आम्हास आलीच होती, परतु कोण ठिकाणी येऊन उतरले हे ठिकाणाचा शोध लागला नव्हता. शोध

6027

मनास आणिता भडोजेस होडीत बसोन इग्रजाचे वाडीत जंगी बंदरात उतरले हे ठिकाण लागले. दोन दिवस गुप्तरूप होते, यास्तव सदेहात होतो. त्याजवर येविसीचे पत्र आपण राजश्री गंगाधरपंत यास येविसीचा मजकूर लेहून पाठविला. त्यावरून मारिनिले याचेंहि पत्र सविस्तर आम्हास येऊन पावले. त्यावरून निश्चयात्मक होऊन आमची माणसे नजरेने पाहून आली. आम्हासी बदमामली करावी, करणार, हे बातमी आम्हास गुरुवारी प्रहर रात्रीस कळली. त्यावरून आम्ही शुक्रवारी तापीश्नानाचे निमित्य करून आम्ही उभयेता व राजश्री कृष्णराव यैसे त्रिवर्ग प्रात:काली स्वार होऊन सडे पण घोडी मात्र घेऊन प्रहर दिवसास वराछियास आलो. तेथोन आज मंदवारी प्रहर दिवसास कामरजेस स्वामीचे आज्ञेप्रो आलो. येथे राजश्री गंगाधरपंत होते त्याची भेट जाली. नंतर राजश्री गोविंदपंत आणा याचीहि भेट जाली. मोगलाकडील जाबसाल म्हणता साल मजकूरचे यैवजाची मात्र रजा जाली. त्याचे वसुलास येक मास पाहिजे. मोकातीचे[१] यैवजाविसी व कलमबंदीचा जाबसाल करून द्यावा येविसी बहुत येत्नामध्ये जाबसाल करीतच होतो. परंतु श्रीमंतांचे येणे बडोदियास जाले. सरकारच्या फौजा पाठीवर नाही. गुजराथ प्रांती श्रीमंतानी आपली ठाणी बसविली ही पत्रे सावकारी आलियावर आमचे जाबसालास दिसगत काढो लागले. मोकातीचा यैवज द्यावा कलमबंदीचा फडशा करावा यैसे नाही. हे पुर्ते वर्तमान दिसोन आले. येविसीचे जाबसालास, च्यार दिवस राहून करून द्यावा तर श्रीमंताचे कारकून येऊन पोहचले. आम्हासी बदमामली करणार हे पुर्ती बातमी कळली. यावर शहरात राहाता न ये. हे चितात आणून सर्व जाबसाल सोडून निघावे लागले. निघोन वरासियास आलो तो आपलेहि पत्र पावले की निघोन येणे. त्या प्राच आलो. आम्ही निघोन आलियावर मोगलास व इंगरजास नरोतम याचे पुत्रास कळले. त्यावरून आम्हाकडील चोपदार यास बोलाऊन त्याजवर मोगलाने फारच हंगामा केला. याचे कारण इंग्रजास वर्तमान कळले. त्यावरून इंग्रजाने मोगलास सागोन पाठविले की, हा प्रकार कसा घडो दिधला? यास्तव लौकिकार्थे आमचे चोपदारावर फार कोपायेमान होऊन सिवीगाल केली. बेआबरू केला नाही. आम्ही प्रात:काली निघालो नसतो तर प्रहर दिवसास आम्हास हस्तगत इग्रजाने करवावे यैसा प्रकार घडला होता, परतु श्रीमताचे पुण्यप्रतापे व आपले कृपेकरून निघोन आलो. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Naro Anandrao is informed how the writers foiled the attempts, made by Raghoba, to capture them.*

---

१ मक्ता.

6028

No. 108] [5-1-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गोसावि यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार मुा खमस सबैन मया व आलफ. तुम्ही फौजसुधा कोणे ठिकाणी आहा? काये वर्तमान? तिकडील कामेकाजे बंदोबस्त करावयाची तुम्हास आज्ञा होती त्याचे कस कसें हे काहीच लिहिलें नाहीं. यावरून तुमचे कर्तुत्वास काये म्हणावें व हे रीत काये कामाची? याउपरी सविस्तर वर्तमान हुजूर लेहून पाठवणे. इकडील वर्तमान तरी तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब मालव्यात गेले. पाठीस राजश्री तुकोजी होलकर व माहादर्जी सिंदे व हरि बलाल पंचवीस तीस हजार फौजेनसी लागलेच आहेत. प्रस्तुत तीर्थरुपाचे जाण्याचा रोख गुजराथचा दिसतो म्हणून बातमी आहे. त्यास तिकडे जातात तेव्हा राजश्री गोविंदराव गायकवाड याचे भरवशावरी, दुसरा तिकडे जाण्यास आश्रा आधार नाही. त्यास ते तिकडे येतात न येतात याची बातमी राखून बहुत खबरदारीने असणे. इंग्रजासी बिघाड जाला याजकरिता सुरतेकडील बंदी करावयाविसी पेशजी तुम्हास येक दोन पत्रे सादर जालीच आहेत. त्याप्रमाणें तो बंदोबस्त करीत असिल्यास तिकडे तीर्थरूपाकडील पेच पडावयाचा नाही. हरि बलाल फौजसुधा त्याचे पिछावर आहेत. त्याजकडेहि तुम्ही आपलेकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे. जर त्याणी तुम्हास आपलेकडे बोलाविले तरी त्याजकडे जाणे. बातमी राखणे. वरचेवरी वर्तमान हुजूर लिहिणे. गोविंदराव गायकवाड दादासाहेबास मिळून ते ते पुढे चालल्यास तुम्ही सुरतेकडील पेशजी लिहिल्याप्रमाणे बदीचे वगैरे कामास दीड दोन हजार फौज ठेऊन वरकड फौज सुधा तुम्ही हरि बलाल फौजेनसी त्याचे पाठीवरी आहेतच त्याजकडे जाऊन मिलणे. जाणिजे. छ २ जिलकाद आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa to Naro Anandrao asking him to be on the look-out for Raghoba who is proceeding to Gujarat to join Govindrao Gaikwad and not to relax the blockade of Surat. He further says that Raghoba is already being pursued by Hari Ballal accompanied by Sindia and Holkar and enjoins upon the addressee to join the latter.*

---

No. 109] [5-1-1775

श्री

राजश्री नारोपत गोसावी
यांस

ॐ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्नो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष.

6029

राजश्री हरिपंत फडके धारेआलीकडे आले. तेथून छ २४ सवालची पत्रे आली. मौजे नाणसे धारे आलीकडे आठ कोस आहे म्हणऊन जासुदाने जबानी सागितले. राजश्री जयेवतराव यानी तुम्हास पत्र लिहिले आहे तेंच बजिनस पाठविलें आहे त्याजवरून सर्व आर्थ कलो येईल. सारांष आपल्यास पाच पत्रें लिहिलीं की सत्वर कूच करून रेवातिरास फौजसुधा यावे परंतु येकहि उतर आपले न आले हे आपूर्व आहे. याउपर तऱ्ही पत्र पावताच कूच करून सत्वर यावें. आनमान न कीजे. विशेष लिहिणे उपरोध आसे. रा छ २ माहे जिलकादे [शिक्का] बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad expresses his exasperation with Naro Anandrao for not replying his urgent messages.*

---

*No. 110]* *[5-1-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पो कोनेर रघुनाथ कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ३ माहे जिलकाद मुा ठाणे सचीण पा सत्रागाव जाणौन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. इकडील वर्तमान येथास्तित आसे. साष्टीकडील वर्तमान सुरतकर इंगरजाचे घरीचे वर्तमान साष्टीचा किला घेतला म्हणौन आफवा उडविली आहे. साहुकारी लिहिले कोण्हाचे आले नाही. त्यावरून खोटे वर्तमान आहे यैसे आहे. मागाहून दुसरी बातमी आल्यावर आपणाकडेस लिहून पाठऊ. श्रीमंत दादासाहेब बडोद्यास आले. उभयता गाईकवाड श्रीमंतास भेटले म्हणौन वर्तमान यैकतो, ते पत्री लिहिले पाहिजे. श्रीमंत बापू व हरिपंत फडके हे कोणे स्थली आहेत ? बडोद्याकडील विचार याउपर काये आहे ते सविस्तर वृत. लिहून तोषविले पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Koner Raghunath enquires about the outcome of the meeting between Raghunathrao and the Gaikwads.*

6030

No. 111] [7-1-1775

श्री

श्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

सो बहिरो रघुनाथ मेहेंदळे मुा बेलापूर साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ ४ जिलकाद जाणौन स्वकीये कुशल ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. 'साष्टी इंगरजाने घेतली याचे वर्तमान आपणास कळलेच असेल. येणार यैसे वर्तमान होते, त्याअन्वये सरकारच्या सनदा दोन आपलेकडे बंदीविसी रवाना जाल्या आहेत की सुरतेस पायबंद देवोन जरबेची बंदी करावी त्याप्रो आपण केले असेल. सरकारचे कासिदाबराबर आमचीहि पत्रे स्वामीस आहेत. प्रस्तुत सरकारात बातमी आली आहे की, इंग्रेजास साष्टीस सुर्तेहून मदत येणार. लडाईचे सामानाची तर्तुद होत आहे. त्याजवरोन आम्हास निकडीने आज्ञा जाली आहे की, तुम्ही हजार पाचशे माणूस नवे देऊन माारनिल्हेकडे जलद जावोन ते व तुम्ही येक विचारें रस्ते बंद करोन शहरची बंदी यथास्तित करावी. शह चांगला द्यावा. इंग्रेजाकडे मदत येऊन न पोहेचे येविसी आपणास व गाईकवाडास व माहालकरी यासी ताकीदपत्रे आहेत. मीहि जलदच सेवेसी येऊन पोहोचतो. भेटीनंतर सविस्तर विदित होईल. सरकारकामाचे लक्षाप्रमाणे स्वामींनी कार्य केलेच असेल. मलाहि निकडीने आज्ञा आपणाकडे जावयाची जालेयावरोन निघोन बेलापुरास आलो, तो इतकेयांत साष्टीचे वर्तमान या प्रकारें जालें. त्यावरोन सरकारात विनंतीपत्र लिहून पाठविले होते. पुन्हा आज्ञापत्र आपणास व आम्हास सादर जाले आहे की, 'साष्टीस मोर्चेबंदी करावी लागते, तरी तुम्ही उतमप्रकारे पूर्वीचे आज्ञेप्रमाणे बंदी शहरची करावी. ते आज्ञापत्र व पूर्वीचे आज्ञापत्राची नकल सेवेसी पाठविली आहे त्याजवरोन कळेल. साराश सरकारचे लक्ष आधी हे काम करावे. गाईकवाडीकडील मसलत राहू द्यावी. आपण तो केलेच असेल. मी येथील बंदोबस्त जाला म्हणजे निघोन येतो. आमचे कारकून शहरात आहेत त्यासी आणवावे, म्हणजे बंदीची माहीतगारी निवेदन करितील. तिकडे शह बसला म्हणजे इंग्रेजाकडे कुमक येऊ पावणार नाही आणि आपला लौकिक होऊन सरकारचे काम होईल. मोगलाई अमलाची जफ्ती माहाली अमल आहे त्याची कर्णे, त्याजविसी गाईकवाडास माहालकरी यासी सनदा घेतल्या आहेत. समागमे घेवोन येतो. आल्यानंतर माहीतगिरीने अपल्ये विचारे बंदोबस्त होईल. सारांश सरकारचे आज्ञापत्र पावताच उतम प्रकारे बंदी होय ते केले पाहिजे. तेथील सरकार चौथाईचा अंमल आम्हाकडे आहे.

येशास सालमजकुरी नरोतम किशोरदास याणे श्रीमंत दादासाहेबाच्या सनद आणोन बखेडा केला आहे. त्याजविसी पूर्वी विनंतीपत्र आपणास लिा होते त्याजवरोन ध्यानात आलेच असेल. त्याप्रमाणे बंदोबस्त होऊन अमल आपणाकडे चालला पाहिजे. मोगलाकडे सरकारी यैवज पनास साठ हजार पर्यंत यैवज येणे आहे. तोहि वसुलात आला पाहिजे. येविशी शहरांत कारकून आमचे आहेत त्यास पत्र लिहून पा आहे. पावते करविले म्हणजे सेवेसी येऊन हाजीर होतील. सहश्रप्रकारे हाजीर जालेच असतील. नरोतमास आपण कैद करोन बिडी घातली म्हणौन सरकारात वर्तमान आले, परंतु आपले लिहिले आले नाही त्याजवरोन आपणास सरकारातोन लिहिलेच आहे. तिकडील गायकवाडाकडील वगैरे वर्तमान ल्याहावयासी आज्ञा करावी. लस्करचे वर्तमान तिकडोन कळतच असेल. हालीं साष्टीवर मोर्चेबंदी होणार. टोपीकराचे पारिपत्य वरे वजेन होणार येविसी सरकारचे लक्ष बहुतच आहे. मुंबईची बंदी जाली आणि लौकरच पारिपत्य होईल. तोफा व गाडदी वगैरा फौजा फारच रवाबनगी होत आहेत. इतकेयात आपणाकडील बंदी जालेयाचे वर्तमान आलेयाजवर फार संतोष होईल. सरकारचे जासूद सनद घेवोन आले तेच बजिनस स्वामीकडे रवाना केले आहेत. सरकारचे उतर व पत्राचे उतर पा पाहिजे. उतर लौकर पाठविले पा. बहुत काय लिा लोभ करावा हे विनंती.

*¶Bahiro Raghunath communicates to Naro Anandrao the Peshwa's instructions regarding the blockade to be effected round about Surat and to stop succour being sent to the English at Salsette from Surat. He congratulates the addressee for having captured Narottam and requests him to write what steps he has taken in collecting the dues from the province.*

---

*No. 112]* *[8-1-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ १० सवालची पत्रे राजश्री भिवराव येसवंत यास पाठविली ते पावली, लिहिले वर्तमान सविस्तर विदित जाहाले. नरोतम किशोरदास यास धरून बेडी घातली म्हणौन लिा ते सर्व कळले. मोठे कास केले. त्यास विसा सेराची बेडी घालून खबरदारीने ठेवणे. किले त्रिंबकास पोहचाविल्यास फार उतम आहे. जेथे ठेविला असाल तेथून चौकसीने त्रिंबकास पोहोचवणे. कदाचित न पोहचे

तर तुम्ही आपणाजवळ मोफजतीने[१] खबरदारी करून ठेवणे. तुम्ही सुरतेची बंदी करून गायिकवाडाकडील माहालचा यैवज वसूल घेणे. तीर्थस्वरूप दादासाहेब मालव्यातून गुजराथेस आले. त्यास गोविंदराव ते येक होतील तर राजश्री हरि बलाल व उभयता सरदार याच्या भेटी जाहाल्या, ते त्याचे मागाहून येत आहेत, आलेच असतील. त्याचे आगोधर तुम्हावर त्याची फौज आलियास तुम्ही बातमी राखोन टाला देणे. हरि बलाल याजवळ काम पडिले आणि त्याचे पत्र आले तर त्याजकडे जाणे. येथून दोन तीन हजार फौज तुम्हांकडे पाठविली आहे. लौकरच येऊन पोहचेल. हरिपंत जवल आसिलियास त्याजकडे जातील. नाही तर तुम्हापासी राहातील. सास्टी इंग्रजाने घेतली. याउपर पुढे काय करितो हे बातमी राखोन वरचेवर लिहीत जाणे. तीर्थस्वरूप दादासाहेब इंग्रजाचे घरीं आले तर मोठे कामच जाहाले. तेच ठिकाण धरावयास येईल. सुरतेची बदी तुमच्याने होईल तितकी करणे. आजपर्यंत पाच सात पत्रे तुम्हाकडे पाठविली परंतु उतर येकहि आले नाहीं. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे.+ त्रिंबकास पाठवावयास लांब पडिले तरी पारनेरा किला विसाजी केशवाकडे आहे तो सुरतेजवल आसपास आहे तेथे ठेवणे. जाणिजे छ ९ जिलकाद बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa after congratulating Naro Anandrao for effecting the capture of Narottam Kishordas instructs the latter to send the prisoner to the fort of Trimbak with heavy chains. He also informs that Dadasaheb has descended into Gujarat with Sindia, Holkar and Haripant hotly pursuing him.*

---

*No. 113]* *[8-1-1775*

**श्री**

श्रीमंत राजश्री नारोपंत दाजी
स्वामीचे सेवेसी

सेवक हरि उमाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता। छ ९ जिलकादपरियेंत येथास्थित आसो विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविले ते पावले. सविस्तर वर्तमान कलले. श्रीमंत राजश्री दादासाहेब येथे आले. रा। गोविंदरावबावा याच्या त्याच्या भेटी जाल्या. कोसाच्या आंत्रे राहिले आहेत. समागमे फौज बुनगेसमेत दाहा हजारपरियेत आहे. आमची बातमी त्याजला कलली. त्याणी आम्हास धरावयाचा येत्न केला होता. त्यास आम्ही पेशजी

---

१ काळजीपूर्वक. + या पुढील मजकूर सखाराम बापूच्या हातचा.

येथे आलो ते समई रा गोविंदरावबावा याजपासून बाहदर+ घेऊन मग लस्करात आलो. याजमुळे आम्ही स्वस्त होतो. साहेबानी आम्हास धरून कैद करावे हे त्याचे मानस व त्याच्या कारभारियाचे मानस होते. रा गोविंदराव याजला सांगितले. त्याणी सांगितले की याणी आम्हापासून बाहदर घेऊन राहिले, त्याजला बोलता येत नाही. मग रा गोविंदरावबावा याणी लस्करात जाऊन सांगितलें. त्यावरून त्याणी आम्हास भेटीस बोलाविले. आम्ही लस्करात जाऊन भेटलो. त्याचे मुत्सदी रा सखाराम हरि व आबाजी माहादेव व सदासिव रामचंद्र वगैरे कितेक ग्रहस्त समागमे आहेत ते भेटले. आमचे समाधान केले. यावर आम्हास लस्करात श्रीमंत रा बापू व श्रीमंत रा नाना याजकडे जावे लागते. दो तीं रोजानी येथून कूच करून आपली भेट घेऊन सर्व वर्तमान निवेदन करून जाऊ. रा हरिपंत फडके व सिंदे व होळकर यांच्या फौजा चाळसा कोसावर आल्या. आपण बहुत सावध राहावे. यांचा व इंग्रजांचा विश्वास किमपि न धरावा. बहुत बहुत सावध राहावे. रो हरिपंत तात्या व सिंदे होळकर आले यामुळे तुम्हावरी येत नाहीत. परंतु सावध असावे हेच उचित. वरकड वर्तमान सेवेसी लिहलिया निवेदन करू. सर्वज्ञास बहुत काये ल्याहावे हे विनंती.

¶*Hari Umaji reports to Naro Anandrao his meeting with Dadasaheb in the camp of Govindrao Gaikwad and the efforts that he made to capture the writer. "Haripant and Sindia and Holkar are also drawing quite near" says he.*

---

*No. 114*] [*9-1-1775*

**श्री**

**अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य**

**राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी**

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. नरोत्तम किशोरदास तुम्हांकडे सापडला आहे, त्यास त्याजला पके बंदोबस्ताने वाटेचे खबरदारीने किले त्रिंबक येथे रा नारो माहादेव गजरे याजकडे पोहचावणे. ते न होये तरी किले पारनेरा येथे आटकेत ठेऊन तेथील अंमलदारास खबरदारीविसी चांगली ताकीद करणें व तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याजकडील कागदपत्र चिठ्या राजकारणी नरोतमदासाजवळ सापडल्या म्हणून लिहिलें. त्यास त्या चिठ्याच्या व कागदपत्राच्या नकला करून हुजूर पाठवणें. तीर्थस्वरूप बडोद्याकडे आले आहेत त्याचे पाठीवरी राजश्री हरि बलाल फौजसुधा

+ बाहदर=जामीन.

आहेतच, त्याजकडे तुम्ही आपलेकडील वर्तमान व कोठे ठिकाणी आहा ते लिहीत जाणे. सुरतेची बंदी जरूर करणे. तीर्थरूपाकडील बातमी राखून खबरदारीने असणे. जाणिजे छ ६ जिलकाद आज्ञा प्रमाण. नरोत्तमदास मारास पारनेरावरून किले कोहज येथे राजश्री भिकाजी गोविंद याजकडेहि पाठविल्यास उतम आहे जाणिजे छ मार.

*¶The Peshwa instructs Naro Anandrao to send Narottam Kishordas to fort Trimbak with a strong escort. Hari Ballal has followed Dadasaheb to Baroda and the addressee is expected to keep in communication with Haripant.*

---

*No. 115]* *[9-1-1775*

पौ छ ८ जिलकाद
पौष मास.

६११५

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत दादा
स्वामीचे सेवेसी

पौ हरि उमाजी कृतानेक सा नमस्कार विनंती. उपरी, येथील ता छ ६ जिलकाद जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष. येथून जासूदजोडी श्रीमंत बापू व नाना याजकडे रवाना केली आहे. आपल्यापासी येतील ते समई दस्तक आपण करून देऊन त्याची रवानगी सत्वर करावी. मागाहून दो ती रोजानी आम्ही येऊ तेव्हा सविस्तर विदित होईल. आपण सावधपण राहावे. बहुत काये लिहिणे, लोभाची वृधि करावी, हे विनंती.

*¶Hari Umaji informs Naropant that two messengers have been despatched to Sakharam Bapu and Nana Phadnis and requests the addressee to furnish them, on their reaching him, with the necessary permits for their journey onward.*

---

*No. 116]* *[10-1-1775*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यांस

८ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे. तुमचे पत्र छ २९ सवालचे व छ १ जिलकादचे येसी दोन छ ९ जिलकादी

सध्याकालीं पावली. लेखनार्थ सर्व ध्यानास आला. सुरतकर ग्रहस्ताचे पत्र आलें तें पाठविलें तेहि पावलें. तोच अर्थ भडोचेस आमचे राजश्री रावो जिवाजी आहेत त्यानीहि लिहिला आहे. परंतु तिकडे जावयाचा आर्थ दिसत नाहीं. श्रीमंत ती कोसावर उतरले होते, ते काल पौष सुध ७ रविवारीं कूच करून बडोदियाचे उतरेस जेथे पूर्वी राजश्री गोविंदराव उतरले होते हरणीनजीक, तेथे येऊन मुकाम केला. ते या शहास गुंतले. पुढें विचारहि केला आहे कीं राजश्री हरिपंत फडके यांचा पराभव करावा हाहि हेत. ते जालियावांचून हे येथून उठत नाहींत यास्तव तुम्ही विचारितां की श्रीमंत सुरत मुंबईकडे जावयास आले तर यांच्या तोडावर आसावे. याजवरून दिसते की, रेवातीरी फौजसुधा तुम्ही राहावे, हा मनसुबा दिसतो. परंतु श्रीमंत येथून निवत नाहीत. यास्तव तुम्ही दुसरा विचार न करितां सर्व फौज [ शिक्का ] घेऊन बावाप्यारां, अथवा चाडोद करनाळी या दोही स्थली पार जाला आहे, दोहीतून तुमचे सोईस जे स्थली उतरायाचे येईल तेथे उतरून सावधतेनें सत्वर बडोदियास येणे. कदाश्चित लांब मजल कसी आटोपल यैसे म्हणाल तर मधे डभई मुकाम करावयास जागाहि आहे. परतु तेथे न जातां एक दिवस कसाला करून बडोदियास येऊन पोहोचणे होये तोच अर्थ जालिया उतम. दुसऱ्या पत्राची मार्गप्रतीक्षा न करिता सत्वर येऊन पोहचावे. राजापिपल्याच्या बंदोबस्ताकरितां गुंता कराल तर न करणे, ते काम दोन दिवस राहिलें तरी येईल. चिंता नाही. ते दंगा अथवा दुसरे काही करीत नाहीत. कर्नालीस मुकाम करून आसुदे होऊन आस्तमानी कूच करून माडवेवाले बरोबर घेऊन प्रहर रात्र आसतां येथे दाखल व्हावें. राजश्री गबाजी बलाल जातेसमई गेला आहे त्यास दखल आहे. येक क्षणाचा आवकाश न करावा. रा। छ ७ माहे जिलकाद बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad asks Naropant Keskar to proceed immediately to Baroda to face the mischievous activities of Raghunathrao and mentions the routes and fords by which the addressee should march.*

---

No. 117] [12-1-1775

श्री

पु॥ राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी आपण नरोत्तमदास यांस धरून किले माहुली येथे पाठविला. तो किले मार येऊन पोंहचला. आम्ही येथून मामलेदारास ताकीद करून त्यास व त्याचे लेकास मोठ्या मोठ्या बेड्या घालून किल्यावर निराले निराले ठेवावयाविसी

तर्तूद करविली, त्याप्रमाणे अमलदारानी किल्यास ताकीद करून येकास किले मारावर व येकास त्याच किल्यावर भंडारदुर्ग आहे तेथे, याप्रमाणे दोहो जागा दोघास ठेऊन कोठडीत घाळून त्याजबरोबरची माणसे दूर ठेऊन दुसरे लोक सरकारममतेचे चौकीस ठेविले असेत. तुम्हास कलावे म्हणोन लिहिले असे. तुम्ही नरोत्तमास धरिले मोठी गोष्ट केली. रा गोविंदराव गायेकवाड याची फौज कोणीकडे गेली ? राजश्री फत्तेसिंग गायेकवाड कोठे आहेत ? आपल्या फौजा हरीपंत तात्या व रास्ते व वामनराव व सिंदे होलकर गुजराथेत आले आहेत, ते कोठे आहेत ते लिहावे. आम्ही वर्तमान यैकतो की श्रीमंत दादासाहेब भडोचेत इंग्रजाकडे गेले. तेथे सर्व टाकूण जलमार्गे मुंबईस येणा(र) म्हणोन यैकतो. तरी तहकीक वर्तमान आसेल ते लिहून पाा. आपण जवल आहा याजमुले आपणास कलेल म्हणोन लिा आहे. रा छ १९ जिलकाद बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनती.

¶*Letter addressed to Naropant Nana (Keskar) informing him of the close confinement in which Narottamdas was kept at fort Mahuli and inquiring news of the various Commanders on duty in Gujerat.*

---

*No. 118]* *[12-1-1775*

**श्री**

**आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य**
**राजश्री नारो आनदराव गो यासी**

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुाा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही राजश्री भिवराव येशवंत यांस छ ३० सवालीची पत्रे पाठविली ते छ ७ जिल्कादी बऱ्हाणपुरास पावली. लिहिले वर्तमान सविस्तर विदित जाहाले. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड याची पत्रे पाठविली ते पावली. तीर्थस्वरूप दादासाहेब तेथे आले. राजश्री गोविंदराव गायेकवाड यांच्या भेटी जाहाल्या. आतां ते जमीन फत्तेसिंग गायकवाड याजवर शह बसलेयासुळे ते दहशत घेतील असे म्हणावे तर सिंदे होलकर व हरिपंत येक होऊन मागाहून येतात, हेहि वर्तमान त्यास कललच आहे. त्यापक्षी उभयता येक जाले तरी चिंता नाही. आजपर्यंत मागाहून येतात ते पोहोचलेच असतील. तुम्हांस मदतीस बलाविले आहे. त्यास विचार प्रसंग पाहून तुम्ही जाणे. सरदार हरिपंतामागाहून आलेच असतील, त्यापक्षी फिकीर आहे आसे नाहीं. ते येऊन पोहचत तो मध्ये

ह्मावकास्यांत गोविंदरायांनी काय केले ? फत्तेसिंग कसे ठरले ? काय जाले ? हे सर्व तुम्हास समजलेच आहे. वरचेवर बातमी येत जाईल तसें तुम्ही जाण्याचे करणे. जाणिजे छ ९ जिलकाद.

¶*The Peshwa informs Naro Anandrao that Dadasaheb has reached Baroda and effected union with Govindrao Gaekwad. The addressee is instructed to keep in readiness to join Haripant who is pursuing Dada.*

---

*No. 119*] [*14-12-1774*

पौ छ १३ सवाल मंद्वा-
सर मार्गेश्वर मास खमस
सबैन.

**श्री**

**राजश्री नारोपंत गोसावी**
**यास**

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फत्तेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपले पत्र मार्गसीर्ष सुध २ चे आले. पावोन परम संतोष जाला. दर कूच सुरत माहालात येतो म्हणऊन लिा. त्यास आलेच आसाल. राजश्री दौलत बाबूराव तापी दक्षणातिरी आहेत म्हणऊन बातमी आली होती. तुमच्या आगमनाचे वर्तमान थैकोन टाला देऊन गेले आसले तर उतमच जाले. कदाश्चित खमखम चितात आसली तर तुर्म्ही व राजश्री जनार्दन रायाजी येकदील होऊन सर्व लोकांचा दिलासा करून त्यास सिक्षा करणे म्हणजे राजश्री बापू व राजश्री नाना यासी तुमचे चाकरीचा मुजुराहि होईल व राज्यांत लौकिक होईल. येवसी राजश्री जनार्दनपंतासहि लिा आहे, परंतु बहुधा दालभ्ये ठरणारच नाहीत. ते बेदील होऊन गेले आहेत व श्रीमत राजश्री दादासाहेबांकडे जावयाची उत्कंठा त्यास विशेष आहे. तथापि ठरले तर पारपत्यास आंतर न करावे. तो गुंता नसलियास सत्वर रेवातिरास यावे. मध्ये गुंता करू नये. रेवातिरास आलेस म्हणजे सुरत आठाविसी मागे पडली. रेवाउतरतीर [शिक्का] च्या माहलास दबाव बसतां ते येऊन रुजू होतील. राजश्री गोविंदराव गाईकवाड यांजपासी सामान थोंडके राहिले आहे तेहि बेदील आहे. सिबदीचा गवगवा विशे(ष) आहे व आम्हीहि त्यास येथून हलो देत नाही. कदाश्चित येथून निघाले तर आम्ही पाठलाग करितो. दोहोकडील शह त्यास सोसवणार नाही व सिबदी त्यास येथून निघो देतच नाही.

येविसी चितात संकल्प विकल्प न आणितां सत्वर रेवातिरास यावें. रेवातिरास आलियां यैवजाचीहि तरतूद होईल. यैवजाकरतां गुंतो नये. हे तक येणार नाहीं. येविसी विशेष काये ल्याहावे ? कार्तिक वद्य त्रयोदशी मोहुली नजीक माहालक्षुमीचे मुकामची पत्रे पाठविली ती पावली. सविस्तर कलले. त्याची उतरे साद्यात मागाहून लिहू. परतु दिवसगत न लागता तापितिरी येखादा दुसरा मुकाम करून रेवातिरास जावयाचा विचार आसावा. सोनगड वगैरे कोठेहि गुंता नसावा. रा छ १० माहे शवाल बहुत काय लिहीणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad writes to Naropant Keskar asking him to take account of Doulat Baburao, Sakharam Hari's nephew, and in case the latter takes flight he asks the addressee to join him near the Nerbada.*

---

*No. 120*] [*14-1-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी

पो विसाजी केशव सा। नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसले पाहिजे विशेष. राजश्री बहिरोपंत सुरतचे कमावीसदार याची रवानगी हुजुरून जाली. त्यास आपलेकडील फौज सुर्तेचे बंदीस याजकडे देविली आहे. तरी हे आपणास सांगतील त्याप्रमाणें बंदी फौज देऊन करावी. यात सरकारकाम फार आहे. इकडे मुंबईची बंदी केली, साष्टीस मोर्चे दिल्हे. आपणहि सुर्तेस पायबंद चांगला द्यावा. सविस्तर राजश्री नारोपंतनाना याणी आपणास पत्र लिहिले आहे त्यावरून कलेल. नाना, बंदी जरूर करावी. रा छ ११ जिलकाद. बहुत काये लिहिणे, लोभ करावा, हे विनंती.

¶*Visaji Keshav Lele, the Sar-Subha of Konkan, instructs Naro Anandrao to blockade Surat.*

---

*No. 121*] [*15-1-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो अनंदराव गो यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ खमस सबैन मया व अलफ. राजश्री हरि बलाल फौजसुधा बडोदेयास आलेच असतील व तुम्ही नर्मदातिराहून

आवकाशांत गोविंदरावांनी काय केले ? फत्तेसिंग कसे ठरले ? काय जाले ? हे सर्व तुम्हास समजलेच आहे. वरचेवर बातमी येत जाईल तसें तुम्ही जाण्याचे करणे. जाणिजे छ ९ जिलकाद.

¶*The Peshwa informs Naro Anandrao that Dadasaheb has reached Baroda and effected union with Govindrao Gaekwad. The addressee is instructed to keep in readiness to join Haripant who is pursuing Dada.*

---

*No. 119*] [*14-12-1774*

पौ छ १३ सवाल मंदवा-
सर मार्गेश्वर मास खमस
सबैन.

**श्री**

**राजश्री नारोपंत गोसावी**
**यास**

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फत्तेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपले पत्र मार्गसीर्ष सुध २ चे आले. पावोन परम संतोष जाला. दर कूच सुरत माहालात येतो म्हणऊन लिा. त्यास आलेच आसाल. राजश्री दौलत बाबूराव तापी दक्षणातिरी आहेत म्हणऊन बातमी आली होती. तुमच्या आगमनाचे वर्तमान येकोन टाला देऊन गेले आसले तर उतमच जाले. कदाश्चित खमखम चितात आसली तर तुम्हीं व राजश्री जनार्दन रायाजी येकदील होऊन सर्व लोकांचा दिलासा करून त्यास सिक्षा करणे म्हणजे राजश्री बापू व राजश्री नाना यासी तुमचे चाकरीचा मुजुराहि होईल व राज्यांत लौकिक होईल. येवसी राजश्री जनार्दनपंतासहि लिा आहे, परंतु बहुधा दालम्ये ठरणारच नाहीत. ते बेदील होऊन गेले आहेत व श्रीमत राजश्री दादासाहेबांकडे जावयाची उत्कंठा त्यास विशेष आहे. तथापि ठरले तर पारपत्यास आंतर न करावे. तो गुंता नसलियास सत्वर रेवातिरास यावे. मध्ये गुंता करू नये. रेवातिरास आलेस म्हणजे सुरत आठाविसी मागे पडली. रेवाउतरतीर [शिका] च्या माहलास दबाव बसतां ते येऊन रुजू होतील. राजश्री गोविंदराव गाईकवाड यांजपासी सामान थोंडके राहिले आहे तेहि बेदील आहे. सिबदीचा गवगवा विशे(ष) आहे व आम्हीहि त्यास येथून हलो देत नाही. कदाश्चित येथून निघाले तर आम्ही पाठलाग करितो. दोहोकडील शह त्यास सोसवणार नाही व

नं. ३ नं.
ता.

येविसी चितात संकल्प विकल्प न आणितां सत्वर रेवातिरास यावें. रेवातिरास आलियां यैवजाचीहि तरतूद होईल. यैवजाकरतां गुंता नये. हे तक येणार नाही. येविसी विशेष काये ल्याहावे ? कार्तिक वद्य त्रयोदशी मोहुली नजीक माहालक्षुमीचे मुकामची पत्रे पाठविली ती पावली. सविस्तर कलले. त्याची उतरे साद्यात मागाहून लिहू. परतु दिवसगत न लागता तापितिरी येखादा दुसरा मुकाम करून रेवातिरास जावयाचा विचार आसावा. सोनगड वगैरे कोठेहि गुंता नसावा. रा छ १० माहे शवाल बहुत काय लिहीणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad writes to Naropant Keskar asking him to take account of Doulat Baburao, Sakharam Hari's nephew, and in case the latter takes flight he asks the addressee to join him near the Nerbada.*

---

*No. 120*] [*14-1-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी

पो। विसाजी केशव सा। नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसले पाहिजे विशेष. राजश्री बहिरोपंत सुरतचे कमावीसदार याची रवानगी हुजुरून जाली. त्यास आपलेकडील फौज सुर्तेचे बंदीस याजकडे देविली आहे. तरी हे आपणास सांगतील त्याप्रमाणें बंदी फौज देऊन करावी. यात सरकारकाम फार आहे. इकडे मुंबईची बंदी केली, साष्टीस मोर्चे दिल्हें. आपणहि सुर्तेस पायबंद चांगला द्यावा. सविस्तर राजश्री नारोपंतनाना याणी आपणास पत्र लिहिले आहे त्यावरून कलेल. नाना, बंदी जरूर करावी. रा छ ११ जिलकाद. बहुत काये लिहिणे, लोभ करावा, हे विनंती.

¶*Visaji Keshav Lele, the Sar-Subha of Konkan, instructs Naro Anandrao to blockade Surat.*

---

*No. 121*] [*15-1-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो अनंदराव गो। यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ खमस सबैन मया व अलफ. राजश्री हरि बलाल फौजसुधा बडोदेयास आलेच असतील व तुम्ही नर्मदातिराहून

आवकारांत गोविंदरायांनी काय केले ? फत्तेसिंग कसे ठरले ? काय जाले ? हे सर्व तुम्हास समजलेच आहे. वरचेवर बातमी येत जाईल तसें तुम्ही जाण्याचे करणे. जाणिजे छ ९ जिलकाद.

¶*The Peshwa informs Naro Anandrao that Dadasaheb has reached Baroda and effected union with Govindrao Gaekwad. The addressee is instructed to keep in readiness to join Haripant who is pursuing Dada.*

---

*No. 119*] [*14-12-1774*

पौ छ १३ सवाल मंदवा-
सर मार्गेश्वर मास खमस
सबैन.

**श्री**

**राजश्री नारोपंत गोसावी**
**यास**

८ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फत्तेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपले पत्र मार्गसीर्ष सुध २ चे आले. पावोन परम संतोष जाला. दर कूच सुरत माहालात येतो म्हणऊन लिा. त्यास आलेच आसाल. राजश्री दौलत बाबूराव तापी दक्षणातिरी आहेत म्हणऊन बातमी आली होती. तुमच्या आगमनाचे वर्तमान यैकोन टाला देऊन गेले आसले तर उतमच जाले. कदाश्चित खमखम चितात आसली तर तुम्ही व राजश्री जनार्दन रायाजी येकदील होऊन सर्व लोकांचा दिलासा करून त्यास सिक्षा करणे म्हणजे राजश्री बापू व राजश्री नाना यासी तुमचे चाकरीचा मुजुराहि होईल व राज्यांत लौकिक होईल. येवसी राजश्री जनार्दनपंतासहि लिा आहे, परंतु बहुधा दालम्ये ठरणारच नाहित. ते बेदील होऊन गेले आहेत व श्रीमत राजश्री दादासाहेबांकडे जाययाची उत्कंठा त्यास विशेष आहे. तथापि ठरले तर पारपत्यास आंतर न करावे. तो गुंता नसालियास सत्वर रेवातिरास यावे. मध्ये गुंता करू नये. रेवातिरास आलेस म्हणजे सुरत आठाविसी मागे पडली. रेवाउतरतीर [शिक्का] च्या माहलास दबाव बसतां ते येऊन रुजू होतील. राजश्री गोविंदराव गाईकवाड यांजपासी सामान थोंडके राहिले आहे तेहि बेदील आहे. सिबदीचा गवगवा विशे(ष) आहे व आम्हीहि त्यास येथून हलो देत नाही. कदाश्चित येथून निघाले तर आम्ही पाठलाग करितो. दोहोकडील शह त्यास सोसवणार नाही व सिबदी त्यास येथून निघो देतच नाही.

येविसी चितात संकल्प विकल्प न आणितां सत्वर रेवातिरास यावें. रेवातिरास आलियां यैवजाचीहि तरतूद होईल. यैवजाकरतां गुंतो नये. हे तक येणार नाहीं. येविसी विशेष काये ल्याहावे ? कार्तिक वद्य त्रयोदशी मोहुली नजीक माहालक्षुमीचे मुकामची पत्रे पाठविली ती पावली. सविस्तर कलले. त्याची उतरे साद्यात मागाहून लिहू. परतु दिवसगत न लागता तापितिरी येखादा दुसरा मुकाम करून रेवातिरास जावयाचा विचार आसावा. सोनगड वगैरे कोठेहि गुंता नसावा. रा छ १० माहे शवाल बहुत काय लिहीणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad writes to Naropant Keskar asking him to take account of Doulat Baburao, Sakharam Hari's nephew, and in case the latter takes flight he asks the addressee to join him near the Nerbada.*

---

*No. 120*] [*14-1-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी

पो विसाजी केशव सा नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसले पाहिजे विशेष. राजश्री बहिरोपंत सुरतचे कमावीसदार याची रवानगी हुजुरून जाली. त्यास आपलेकडील फौज सुर्तेचे बंदीस याजकडे देविली आहे. तरी हे आपणास सांगतील त्याप्रमाणें बंदी फौज देऊन करावी. यात सरकारकाम फार आहे. इकडे मुंबईची बंदी केली, साष्टीस मोर्चे दिल्हें. आपणहि सुर्तेस पायबंद चांगला द्यावा. सविस्तर राजश्री नारोपंतनाना याणी आपणास पत्र लिहिले आहे त्यावरून कलेल. नाना, बंदी जरूर करावी. रा छ ११ जिलकाद. बहुत काये लिहिणे, लोभ करावा, हे विनंती.

¶*Visaji Keshav Lele, the Sar-Subha of Konkan, instructs Naro Anandrao to blockade Surat.*

---

*No. 121*] [*15-1-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो अनंदराव गो यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु खमस सबैन मया व अलफ. राजश्री हरि बलाल फौजसुधा बडोदेयास आलेच असतील व तुम्ही नर्मदातिराहून

जाऊन त्यास सामील जालेच असाल. नसाल गेला तर तुम्ही व राजश्री फतेसिंगराव गाईकवाड मिलोन जाऊन मारनिलेस सामील होऊन कर्तव्यार्थ आहे तो करणे. तिकडील बातमी सत्वर कलत जावी यास्तव सोनगडास डाक सांडणीस्वाराची व जासुदाची बसविली आहे, तरी हरिपंताकडील पत्रे सोनगडास पोहचावीत जाणे व तुम्हीहि तिकडील वर्तमान लिहीत जाणे. जाणिजे छ २२ जिलकाद आज्ञा प्रमाण.

¶*Naro Anandrao is asked to join Haripant Phadke along with Fatesing Gaikwad and to help him in the work undertaken.*

---

*No. 122*]

[*15-1-1775*

**श्री**

**राजश्री नारोपंत गोसावी**

**यांस**

॥ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. तुमचे पत्र छ ९ जिलकादचे आले ते पावोन लेखनार्थ आवगत जाला. तुम्हास इकडील कचेपकें वर्तमान लिहीत गेलों, परंतु तुम्हास यावयास आनकूल न पडले. राजश्री हरिपंत तात्या यांचे पत्र छ १० जिलकादचें चापानेराच्या आलीकडे आलियाचें आलें. त्याची नकल बजिनस पाठविली आहे त्याजवरून सर्व आर्थ ध्यानास येईल. सारांष आज त्रयोदसी शनवारी राजश्री तात्या बडोदियानजीक येणार. कदाच्छित आज न आले तर उदईक तो खामखा रविवारी येतील. श्रीमंत राजश्री दादासाहेब व चिरंजीव राजश्री गोविंदराव गाईकवाड आज शनवारी कूच करून येकायेकीं गेले. आपण यापूर्वी येऊन आम्हास उपयोगी पडावें येविसीं बहुत [ शिक्का ] प्रकारे बहुत वेला लिहिलें, परंतु आपल्यास यावयास आनकूल न पडलें. तथापि राजश्री तात्याची आमची भेट उदईक रविवारी चतुर्दसीस होणार. त्या समयासहि आपले आगमन न जालें. उतम आहे. जे गोष्ट आपल्यास उतम दिसोन आली आसेल तेच आपण केली आसेल. आथपर विशेष काये ल्याहावें ! पेसजी तुम्ही सुरतकर कमाविसदाराचे पत्र हरीपंत तात्याकडे रवाना करावयास पा। होतें ते पावतें करून उतर आलें ते तुमचे नावचा लाखोटाच बजिनस पा। आहे पावल. रा। छ १२ माहे जिलकाद बहुत काय लिहीणे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad to Naropant Keskar communicating the movements of Haripant Phadke and of Govindrao Gaikwad.*

No. 123] [17-1-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी.

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सैबन मया व अलफ. तुम्ही छ १ जिलकादचे विनंती पत्र पाो ते छ १३ मिनहूस पावलें. नरोतमदासास कैद करून कोहजेस पाठविला. सुरतकर मोगलाचा वकील आला आहे. तेथील वंदोबस्त करावा तों श्रीमंत बडोद्यास आले. गोविंदरायास भेटल्याचें वर्तमान राा फतेसिंगराव गाईकवाड याणी लिहिलें, त्यावरून रेवातिरी घाटबंदी करावयास जात आहो. उदैक कूच करितों. सुरत शहरातील सरकारअमल चालता करून बहिरो रघुनाथ यांजकडील कारकून मोकले केले. बाकीचा जाबसाल करावा तों श्रीमंताकडील मनसबा प्राप्त जाहाला म्हणून लिहिलें तें सांद्यंत विदित जाहालें. यैशास तीर्थस्वरूप तिकडे आले. त्यांच्या पाठीवरी राजश्री हरि बल्लाल व सिंदे होलकर मातबर फौजेनसी आले आहेत. त्यास तुम्ही हरि बलाल यास लेहून पाठऊन तिकडून फौज आणऊन भडोजची व सुरतेची बंदी करणे. हरदू जागाची बंदी जाहाल्यानी फार उपयोगी पडून टोपीकरास चांगला ताण बसेल. साा जरूर जरूर हे काम आधी करणे. सुरतेचा सरकार आमल च्यार रोज न चालल्यासहि कामास येईल. चिंता नाहीं. पुढें सर्व समजोन घेतले जाईल. जाणिजे छ १४ जिलकाद बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa pays Naro Anandrao a compliment for what he did and asks him to strengthen the blockade of Surat and Broach and to defer if necessary the work of administering the province round about.*

---

No. 124] [18-1-1775

श्री

राजश्री नारो आनंदराव गाो यासी

सुा खमस सबैन मया व अलफ तुम्ही फौजेविसी लिा त्यावरून राजश्री हरि बलाल याजकडील फौजेतील लोक येथे आले होते ते हुजरात व सरंजामी मिळून अडीच हजार फौज चिंतामण माधवराव व महिपतराव नरसी धायेगुडे याजबरोबर तुम्हाकडे रवानगी केली आहे. लौकरच येतील. सोनगडच्या मार्गें येतील. तुम्ही यांजकडे पत्र पाठऊन मार्गाचा सुमार लिहिणे. जाणिजे छ १५ जिलकाद.

¶*This is an intimation to Naro Anandrao of contingents being detached to strengthen his position.*

No. 125] [18-1-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ १ जिलकाद व छ २ जिलकादची दोन पत्रे पाठविली तीं वऱ्हाणपूरचे मुकामी पावली. लिहिले वर्तमान सविस्तर विदित जाहाले. सोनगड व व्यारें दोनी ठाणी घेतली म्हणौन लिा उतम केले. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब बडोद्याजवल आले, थकले. त्याचे जाणेयेण्याचा व इंग्रजाकडील मसलतीचा प्रकार विस्तारे करून लिहिले ते सर्व कलले. दादासाहेब बडोद्यासमीप आले. सरदार मालव्यात राहिले. मागाहून हरि बलाल मालव्यात गेले. त्याचे भेटीकरितां च्यार मुकाम जाहाले. भेटी जाहाल्या आसे कलताच दादासाहेब जलदी करून बडोद्यास गेले. पुढील त्याचा मनसबा राजश्री गोविंदराव मिलून करितात की येकटेच करितात? इंग्रजाचे घरी गेल्यास सडे जातील. फौज आगदीच राहिली किंवा फौजसुधा बाहेरच फिरतात याचा विचार काय केला? हा निश्चये जाहालाच आसेल. सरदार व हरिपंत येऊन पोहचलेच आसतील. राजश्री फतेसिग गायकवाड बडोद्यात आहेत. त्याची मजबुदी चांगली आहे. त्याचे लिहिण्यात बरे आहे. आपली फौज येऊन पोहचलियावर चिंता नाही. मध्ये आवकाशांत कसे जाहाले असेल ते पाहावे. गोविंदरायांची दादाची भेट जाहाली, परंतु त्यास सामील जाले किंवा भेट मात्र घेऊन राहिले? गोविंदरायाजवल हरि उमाजी आहेत त्याणी बोलूनचालून गोविंदरायास इकडील लक्षांत आणिले आहे. येविसीची पत्रेहि त्याची निखालसतेची आली होती. परंतु दादा आल्याच्या पूर्वी आलीकडे कसे जाहाले याचे वर्तमान तुम्हास वरचेवर कललेच आहे. तुम्ही तिकडील बातमी पाहून आजपर्यंत करावयाचे रितीने केले असेल. कदाचित आजपर्यंत लाबणीवर पडिले आसिले तरी हरिपंत कोठपर्यंत आले? कोठे आहेत? गोविंदराव कोठे आहेत? दादासाहेब काय करितात हे सर्व बातमी राखोन विचार पाहून करणे. तुम्ही थोडक्या सामानानिसी फार मेहनत करून सरकार कामे केली उतम केले. पुढेहि विचार पाहून चहूकडील बातमी राखोन करीत जाणें. तुम्ही थोडक्या सामानात मेहनत केली हे ध्यानात आहे. जाणिजे छ १९ जिलकाद.

¶*Peshwa's letter to Anandrao seeks information of the developments of Dadasaheb's plans after his meeting with Govindrao Gaekwad.*

6042

No. 126] [20-1-1775

पौा छ २९ जिल्हेज

खमस सबैन.

**श्री.**

**राजश्री पंत प्रधान साहेबाचे सेवेसी**

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित फत्तेसिंगराव गायेकवाड कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वानंदवैभवलेखन करावया आज्ञा केली पाहिजे, विशेष. कृपाकरून बराणपूरचे मुकामींहून पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाला. श्रीमंत राजश्री दादासाहेब इकडे आले. चिरंजीव राजश्री गोविंदराऊ गायकवाड भेटून सरंजाम सुद्धां कूच करून मही-उत्तरतिरास गेले. राजश्री हरिपंत फडके सर्व फौजांसुद्धां पूर्णिमेस दाखल जाले. आज्ञेप्रमाणें आम्ही सरंजाम सुद्धां बाहीर निघोन मशारनिलेबरोबर प्रतिपदेस कूच-करून महीतीरीं वांकानेरास आलों. तृतीयेस त्याचा आपले फौजेचा मुकाबला+ जाला. सायंकाळ पाा लढाई जाली. त्यांनीं महीच्या खल्या पारचे कांठीं धरल्या आहेत. आपल्या फौजा दक्षिणतीरीं कायेम असों. येका दो दिवसांत पारपत्य किंवा येथून निघोन पुढें पळतील, त्यासारखी पैरवी होऊन सेवेसी विनंती मागाहून लेखन होईल. निरंतर पत्रीं सांभाळ करावयास साहेब समर्थ. रवाना छ १७ जिलकाद[१]. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हें विनंती.

¶*Fatesing Gaikwad to the Peshwa reports a battle between Dadasaheb assisted by Govindrao Gaikwad and Haripant Phadke assisted by the writer at Vakaner on the Mahi.*

---

No. 127] [20-1-1775

पौा छ २२ जिलकाद सन

खमस

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य**

**राजश्री बाळाजीपंत दादा स्वामीचे सेवेसी**

पो बगाजी रघुनाथ कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १७ जिलकाद मुा शहर बराणपूर जाणोन स्वकीये लिहीत जावें विशेष. आपण भास्करपंताचे लाकडाविसी श्रीमंतास पत्र दिल्हे होते त्याजवर श्रीमंतानी

---

+ येथें शिक्का आहे. १ महीची लढाई फेब्रुवारींत झाली. जिलकादऐवजीं जिल्हेज पाहिजे. पैवस्ती जिल्हेज महिन्याचीच आहे.

विनंती करावयासी येक रोज अनमान केला होता. मग दुसरे दिवसी पत्रावर विनंती करून घेऊन जयरामपंतास पत्र देऊन त्याची चिठी घेऊन भास्करपंताचे भावाकडे पाठविली असे. कळावे. इकडील वर्त(मान) तरी श्रीमंत बडोद्यास गोविंदराव गाईकवाड याजपासी गेले. भेटी जाहाल्या. तात्यासी श्रीमंतासी चालीस कोशाचे अंतर आहे. गाठ घालितो म्हान तात्याची पत्रे छ ६ जिलकादची छ १४ जिलकादी आली. धोसा कालच तात्याकडून आला. नबाबाचे लस्करात दाखल जाहाला. उभयेता श्रीमंतास नबाबाची मेजमानी छ १९ जिलकादी जाली. नबाबास येथे मजमानी उदईक होणार. मेजमानी जाली म्हणजे मजल दरमजल पुण्यास येणार. तहवरजंग यास विडाकडे मुधोजी भोसले याची फौजे येऊन दगा केला आहे म्हणौन नबाबानी रवाना केला. त्याजबा। सरकारची फौज दीड हजार दिल्ही. बा। सरदार खंडेराव दरेकर याचा पुत्र दिल्हा. श्रीमंतानी मजला येथे ठेऊन घेतले. रा। गंगाधरपंत व सिवरामपंत याची रवानगी छ १४ जिलकादी केली. वा। फौज तीन हजार तात्याकडे जावयाची होती ते दिल्ही. चिरंजीव कोनेरपंताचा समाचार घेत जावा. आम्ही लवकरच आपल्यापासी येऊ. वरचा समाचार घेत जावा. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*The movements of Raghunathrao, his meeting with Govindrao Gaikwad, the interviews between the Nabab and Nana Fadnis and Sakharam Bapu and their mutual entertainments are reported by Bagaji Raghunath to Balajipant.*

---

*No. 128]*

*[21-1-1775*

**श्री**

**अखंडितलक्ष्मीआलं कृत राजमान्य**
**राजश्री नारो आनंदराव गोसावी यांसी**

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा। खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ ९ जिलकादचे पत्र पाठविले ते छ १४ जिलकादी पावले. लिहिले वर्तमान विदित जाहाले. राजश्री हरि बलाल फौजसुधा कोठे अहेत त्याची बातमी देखील नाही म्हणौन लिा। ते कळले. यैशास सरदार सुधा दाहोद्याहून कूच करून पायागडचे मार्गे बडोद्याकडे जातो म्हणौन त्याची पत्रे आली. ते आलेच आसतील. तुम्ही त्याजकडील वर्तमान वरचेवर आणवीत जाणे. सखाराम हरि याचे पत्र बाळाजी येमाजी यास आले ते पाठविले ते पावले. तुम्ही चहूकडील बातमी राखोन सावधगिरीने राहात जाणे. फौज येथून तुम्हाकडे

पाठविली आहे ते लौकरच पावेल. येथून जासुदाची व सांडणीची डाक सोनगडेपर्यंत बसिवली आहे. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. चिंतामण माधवराव व महिपतराव धायेगुडे याजबरोबर तीन साडे तीन हजारपर्यंत फौज पाठविली आहे. लौकरच पावेल. जाणिजे छ १८ जिलकाद.

¶*The Peshwa asks Naro Anandrao to secure news about Haripant who he promises must have reached Baroda. The Peshwa also sends him some forces under Chintaman Madhavrao and Mahipatrao Dhaygude.*

---

*No. 129*] [*21-1-1775*

**श्रीगजानन**

**श्रिया विराजित राजमान्ये राजश्री**

**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो बहिरो रघुनाथ मेहदळे सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १८ माहे जिलकाद जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आम्ही पौश सुध्य सतमीस बेलापूराहून स्वार जाहालो, ते वसईचे मार्गे मजल दरमजल छ १७ जिलकादी को बलसाड येथें अस्तमानी दाखल जालो. यैसियासी आज छ मजकुरी को वणदेवी येथें येतो. तेथोन मजल दरमजल कामरेजपर्यंत येऊन उपरातिक तैसाच निघोन आपले भेटीस येतो. त्यास आपण फौजसुधा रेवापार जाणार म्हणौन वर्तमान कलले. त्यास साष्टी इग्रजाने घेतली याजकरिता पुन्हा साष्टी घ्यावी या मसलतीस राजश्री विसाजी कृष्ण व राजश्री विसाजी केशव या उभयताची हुजुरून रवानगी जाली आहे. त्यास साष्टीस मोर्चेबंदी करावी व मुंबईस शह द्यावा, क्षेपनिक्षेप साष्टी घ्यावी याप्रो हुजूरची मर्जी आहे. याअन्वये इग्रेज ज्या ज्या ठिकाणी आहे त्या त्या ठिकाणी शह देऊन चहूकडोन हगामा करावा म्हणौन हुजुरून आज्ञा व उभयेतानीहि सागितले आहे की, आध्धी सुरतेची बंदी करावी. येविशीची पत्रे आपल्यास हुजूरची आहेत. त्यास हुजूरचे पेसजी पत्र आपणाकडे रवाना केले ते पावलेच आसेल. त्यास आपले आगमन मजल दरमजल मुख्याचे शहास्तव होत आहे. त्यास आपण तिकडे लांबल्यास इकडील शहास वेध पडतो यास्तव सेवेसी विनंती लिहिली आहे. तरी आपण रेवापार न जावे. येक दुसरा मुकाम केला पाहिजे. इतकीयांत मी मजल दरमजल येऊन सेवेसी पोहचतो. तदनंतर इकडीलहि बंदीचा बंदोबस्तास (अपूर्ण)

¶*Bahiro Raghunath Mehendale to Naro Anandrao communicating to him the Peshwa's instructions about checking the aggressive attitude of the English and recapturing Salsette from them. He urges him to effect the blockade of Surat.*

No. 130] [21-1-1775

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यासी

श्नो माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरी. पदाजी सेलके इकडील सिलेदार त्याचा बंधू दौलत बाबुराव याजवळ होता. त्याचे स्वार देशी जाताना आपणाकडील लोकानी घोडी घेतली म्हणून कळले. त्यावरून आपणास लिा आहे तरी पदाजी सेलके याची घोडी आसतील ते सोडून देवावी. घोडी सा व उटे दोन घेतली आहेत ते देवावी. रा छ १८ जिलकाद हे विनंती.

¶*Mahadaji Sindia requests Naro Anandrao to restore to Padaji Shelke the horses captured by the men of the addressee.*

---

No. 131] [22-4-1775

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी.

पो विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. उपरी, येथिल कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपण गुजराथ प्रांते गेलियावर बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाही. तरी प्रस्तुत तुम्ही कोठे आहा, काय वर्तमान ? श्रीमंत राजश्री दादासाहेब ते प्रांते बडोद्यास गेले, राजश्री गोविंदराव गायकवाड याच्या व त्याच्या भेटी जाहाल्या, त्यांचे पाठीवर राजश्री हरिपंत फडके होलकर सिंदे सुधा आहेत म्हणोन लस्करातून सरकारचे लिहिले आलें. त्यास, गोविंदराव गायकवाड श्रीमंतास किती फौजेनसी भेटले, श्रीमंतासमागमे किती फौज आहे, हरिपंत होलकर सिंदे सुधा कोठे आहेत, श्रीमंत व गायकवाड कोठे आहेत ? तुम्हास राजश्री फतेसिंग गाईकवाड भेटून ते व तुम्ही येके जागा जाहालांच असाल. श्रीमंत तिकडे गेले याजमुळे तुम्ही नर्मदेचे वाटबंदीस गेला म्हणोन वर्तमान ऐकिले. त्यास, नर्मदातीरास गेला की काय ? वाटबंदी कसी कसी केली ? साष्टिस इंग्रेजानी दगा करून बेइमानीस येऊन किला घेतला याजमुळे इकडील माल मुंबईस जावयाची बंदी केली आहे. आपणास गुजराथ प्रांतीचा माल सुरतेस जातो त्याची बंदी करावयाविसीं लस्करातून व पुण्याहून आपणास लेहून पाठविले आहे. त्यास आपण फौज व गादडी पाठऊन

6046

नाकेबंदी केलीच असेल. ते कसी केली? कोण्हे कोण्हे ठिकाणी चौक्या ठेविल्या? माल जावयाची बंदी अगदी जाहाली किंवा नाही? आपणाकडून बंदी जाहाली असल्यास आणिखी कोण्हेकडून सुरतेस रस्त पोहचती किंवा काय ते सविस्तर लेहून पाठवावे. आम्हाकडील वर्तमान तरी साष्टीस लागावे, टापूत फौजा व लोक घालून टोपीकराचे पारपत्य करावे असी सरकारची आज्ञा आली व राजश्री सिवाजी विठल व आपाजी हरि वगैरे पथके फौजसुधा लस्करातून रवाना केली ती येऊन पोहचली. पुण्याहून फौज व गाडदी वगैरे पायदल व माहाकाली व मार्तंड तोफा येत आहेत. आमचा मुकाम साष्टी व कल्याणचे दरम्यान आहे. वसईस वगैरे ठिकाणोठिकाण स्वार व लोक पाठऊन इतके दिवस बंदोबस्त करविला. याउपरी साष्टीस लागोन टोपीकरास तंबी पोहचवावी हेच तरतूद होत आहे. तुम्हास कळावे म्हणोन लिहिले असे. सविस्तर लिहावे. तिकडील आधिकोतर आढलेल ते लिहीत जावे रा छ १९ जिलकाद सन खमस सन सबैन. बहुत काये लिहिणे, लोभ असो दिल्हा पा हे विनंती.

*¶Visaji Krishna inquires of Naro Anandrao how far he has succeeded in effecting the blockade of Surat and reports his own disposals round about Salsette.*

---

*No. 132]* *[26-1-1775*

श्री

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब

साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक रावजी अनंत चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना यैसिजे छ २२ सवाल पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री फतेसिंगाकडील राजश्री रुद्राजीपंत व कुशाबा छ ११ सवाली तिकडून येक पाणक्या मात्र समागमे तेथू(न)पाई श्रीमंत दादासाहेबाचे पेचात येऊन दंग्यामुळे निघोन ते राजश्री कुशाबा चौकीवर आले. मी गैरमाहित तिकडून निभावले म्हणोन व पाये सुजले, फोड आले, चालावयाची शक्ती नाही, च्यार रोजाचे उपासित यैसे जाणून घोडी मनुष्यें देऊन त्याचे कुलकर्णपणाचा गाव तेथे पावते केले. सेवेसी लस्करात जाईन म्हणून बोलले आहेत. तिकडील साद्यंत निवेदन करितील. श्रीमंत दादाचे लस्कर तापीतिराहून पार गेले. मुकाम महिना आहे. पुढे सोनगडचे मार्गे जाणार. उनहईस फौज आली म्हणोन आवई इकडे जाली होती ते सर्व अफवाच. कही

आसपास बावीस कोस आली. त्याणी दोनतीन गाव वासदेकराचे लुटले. वासद्यास ठाणे बसले. आनंदराव कोण आहे तो पनास माणसानसी तेथे आहे. त्याणी कोसी दोकोसी चौक्या बसविल्या आहेत. इकडील तिकडे कोणी जाऊयेऊ देत नाही. आनंदराव दलवी रामनगराकडे वासदेकराचे सेपनास माणूस घेऊन गेला आहे. कोणते कार्यास गेला हे कलले नाहीं. बातमी लागलियावर सेवेसी लिहून पाठवितो. सांप्रत सावकारी वर्तमान आले आहे की तापीपार होऊन पायागडाचे रोखे जाणार. कावनईकडे कोल्याचे मलईत त्याचे दोन खिजमतगार व त्रिंबक सूर्याजीचे पुत्र व भाऊ समागमे आहेत. छ १७ सवाली परगणे चांदवड मौजे नादुरडीकर भले माणूस श्रीमंत दादाचे लस्करात जात होते. दोन तटे व आकरा आसाम्या त्यात दोन भले माणूस आहेत. राहुड्याचे गढीत तीन दिवस होते. न पुसता गेले. कमाविसदाराने वाटाड्या देऊन श्रीमंत दादाचे लस्कराकडील दिल्हे असतां प्रातःकाली आम्हास कलता जासूद पाटोपाट पाठविले. सुरगाणात गाठ पडली तेथून मावारे आणून सेवेसी रवाना केले असेत. जाले वर्तमान राणू जासूद निवेदन करील. सेवेसी कलावे हे विज्ञाप्ति.

¶*Raoji Anant reports to Haripant that Dadasaheb has crossed the Tapti and is heading towards Payagad.*

---

*No. 133*] [*27-1-1775*

**श्री**

श्रिया विराजित राजमान्ये राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

पोष्ये बहिरो रघुनाथ मुकाम कामरेज तापीतीर सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २४ माहे जिलकाद जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आम्ही छ ७ जिलकादी पुणियाहून स्वार जाहालो ते मजल दरमजल मुकाम मजकुरी छ २० मिनहूस दाखल जालो. यैसियासी सुरतेची बंदी जलद करावी म्हणौन हुजूरची आज्ञा. त्यास येविसीची पत्रे आपणास होती ती आम्ही पाठविली ती पावलीच असतील. त्याजवरून मजकूर ध्यानास आलाच असेल व हालीहि आपणाविशी विनंतीपत्र श्रीमंत राजश्री हरिपंत तात्या याणी लिहिले आहे तरी आपण यावयाचे लवकर केले पाहिजे. मार्गप्रतीक्षा करीत असो. बेलापूरचे मुकामीहून राजश्री कृष्णराव आपणाकडी वकिलीस आलें होते. त्याजबराबराबर आमचे कारभारी याणी पत्रे पाठविली ती व बलसाडचे मुकामीहून पत्र

पाठविले ते यैसी पत्रे आपल्यास पावलीच असतील. सहश्र प्रकारे आपण आले पाजे. कदाचित तिकडील वेधामुळे आपणास यावयासी विलंब असिला तरी हजार फौज चांगली जलदीनें रवाना करावी. सारांश इंग्रेजाची या प्राती ठिकाणे सुरत व भडोज. त्यास सुरतेहून सर्व सरंजाम मुबईस जातो. मातबर शहर, यास्तव यांसी पायेबंद लौकर बसल्याने सरजाम, लोक, दाणा जिनस मुबईस पोहचणार नाही. येविशी सरकारची मर्जी निक्षूण आहे. सारांश साष्टी हस्तगस्त लौकर व्हावी या मजकुरास इकड पायेबंद जरूर बसला पाहिजे. स्वाम सर्वज्ञ आहेत. विस्तारे काय ल्याहावे. सारांश लौकर स्वारी आपली आली पाहिजे. सेवेसी श्रृत होय हे विनंती.

*¶Bahiro Raghunath to Naropant Keskar from Kamrej, points out the necessity of closing the port of Surat to checkmate the English at Salsette.*

---

*No. 134]* *[27-1-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामींचे सेवेसी

पो गणेश हरि कृतानेक सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल छ २४ जिलकाद मुा गल्हे नजीक तापी दक्षणतीर जाणोन स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. पत्री लिा कीं, बुणग्यासमागमे रेवापार येणे. त्यावरून आम्ही सरभुवनीहून कूच करून मुकाम मजकुरी बुणग्यात आलो. आठ दिवस जाले, बुणगे राहिले, तापपार येत नाही, त्यावरून आम्ही येत होतो. त्यास पर्वाचे दिवसी राजश्री बहिरो रघुनाथ कािदार शहर सुरत हे पुण्याहून आले. त्याणी सरकारची पत्रे आणून दाखविली त्यांतील अन्वयें पाहाता बंदी सुरतेची करावी, सरकारकाम सोडून यावे हे ठीक नाही व येविसी आपले बोलणेहि जाहाले होते, त्यावरून राहिलो. तर आपण तेथून हजार स्वार रोजमरेयाची वगैरे बेगमी करून जलद पाठऊन द्यावे. आपणास सरकारची पत्रे आहेत त्याचा अर्थ राजश्री बहिरोपंत लिहितील त्यावरून कलेल. सरकारचे पत्राचा अन्वय श्रीमंत राजश्री तात्यास आम्ही लिा आहे व फौज पाठवावयाविसी लिा ते आपणास स्वार पाठयाविसी सांगतीलच. आमचे मानस फार

करून तिकडे यावयाचें परंतु रा। बहिरोपंतापुढें, उपाय नाहीं. फौज आली, तेथील बंदोबस्त जाहला म्हणजे तिकडे येऊ. उतर सत्वर पाठवावे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Ganesh Hari writes to Naropant that he would join him as soon as the blockade of Surat, according to instructions from Poona, is effected.*

---

*No. 135*]

[*28-1-1775*

**श्री**

**श्रियांविराजित राजमान्ये राजश्री**
**नारोपंतनाना स्वामींचें सेवेसी**

पो बहिरो रघुनाथ मुकाम कामरेज सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २९ माहे जिलकाद जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आम्ही पुणियाहून सुरतेस यावयासीं निघाल्यानंतर आपणास पत्रें पाठविली ती पावलीच असतील. त्याजवरून सर्व अर्थ आपले ध्यानांत आलाच असेल व हालीं आपणाकडेस राजश्री गंगाधरपंत मजमदार यांसी पाठविले आहेत. भेटीनंतर इकडील मजकूर निवेदन करितील त्याअन्वये आपण यावयाचे सत्वर केले पाजे. दिसगत लागल्यांस कामास बल पडेल यैसा विचार आहे. सविस्तर विनंती मा।रनिल्हे करितील त्याजवरोन कलेल. श्रुत होय हे विनंती.

¶*Bahiro Raghunath, writing from Kamrej, asks Naro Anandrao to come and join him soon. Delay on the part of the addressee, the writer adds, will render the task more difficult.*

---

*No. 136*]

[*17-2-1775*

**श्रीगणपति**

विनंती उपरी. आज श्रीमंताचा मुकाम येथून तीन कोसांवर जाहाला तेव्हा उद्या महीवर वांकानेरावर अथवा वासदचे आरेस (?) जातील. मधें पाणी नाही. आपले बुनगे थोरले वांकानेरचे आऱ्यास गेल्याने त्यास फार जवळ पडेल. यास्तव प्रातःकाळींच अंधार असतां त्यास चिठ्ठी पा। आणि ते लांब जाय तें करावें. वासदचें आऱ्यास गेल्यानें मग कांहीं चिंता नाही. आपली तयारी फार पाहाटेस होऊन पुढें जावें. उद्यां नदी पावेतों प्रातःकालापासून मेहनत करावी. फलदाता ईश्वर आहे. गायेकवाड व होळकर यांसहि सूचना आसावी. आपले बुनगे

स्वत्र पत्र ३. नं.

येथेंच असूं द्यावे. श्रीमंताचा रोख महीचा कोणीकडे गेल्याचा समजेल त्याप्रमाणें येथून कूच करऊन न्यावासी येईल. आज तीन कोसाचें अंतर आहे. रात्रीची सावधगिरी असावी. गणेशपंत बरे जाहले. दोन तीन टोल्या हजारा दो हजाराच्या करून उद्यांचा दिवस तीहींकडून लगट करून पाहावा. सुचला प्रकार लिहिला आहे. लोभ कीजे. हें विनंती.

¶*Letter of Vamanrao Patwardhan giving news that Dadasaheb will probably move towards Vankaner on the Mahi and asks the addressee to advance rapidly in the early hours of the morning and close upon Dadasaheb.*

---

*No. 137*] [*January 1775 ?*

श्री

पुरवणी : साल मजकुरीं नको म्हणत असतां माहालचें काम गळीं पडलें. शेटसाहबाचा लोभ पूर्ण. त्यास कसेंहि करून पार पाडिलें पाहिजे. येविसीं तुम्हांस लिहून तुम्ही करावें असें नाहीं. माझी खातरजमा आहे. नाना काका व गारदी काल गोसावीपुऱ्याहून धरून आणिले. पाहाऱ्यांत आहेत. भाटाचें ठिकाण लागत नाहीं. पेस्तर सालीं कबूल करावयाचें नाहीं. सालगुदस्ताप्रमाणें कसेंहि करून साल मजकूर पार पडलें पाहिजे. आमोदचे काम सालमजकुरीं काढावयाचें शेट साहेबाची व इंग्रजाची पत्रें घेऊन येऊन जंबुसरचें गिरासे वगैरे याचा बंदोबस्त ठेऊन येक पैसा त्याच्या हातास न जाई तो करावा. रवाना छ मजकूर हे विनंती. राजश्री मानसिंग जोगीदास यास रामराम विनंती उपरी. तुजला यजमानानी पोशाख दिल्हा आहे; घेऊन येतों. सविस्तर लक्ष्मणपंतास लिहिलें आहे त्याप्रमाणें करावें. हे आसीर्वाद.

¶*The writer asks for proper defence of some places in Gujarat—Jamboosar and Amod.*

---

*No. 138*] [*January 1775*

श्री

सेवेसी केसो माहादेव साष्टांग नमस्कार विनंती. काल आपली आज्ञा घेऊन निघालों तें लस्करांत पावलों. आपलें पत्र मागाहून आलें कीं जगथापाची पागा व भोंसले व आमची पागा तीनीं पतकें व टोक ! असें मिळोन वारसे याजकडेस जावें. त्यास आज प्रात:काळीं पत्रें पाठविली आहेत. उदयिक आले म्हणजे तिकडेस

पाठवितो. राजश्री हरिपंतनाना सरलस्कर याजकडील देऊळघाटांतून मुजरद माणूस आलें कीं मानाजी शिंदे व सटवोजी भोंसलें ऐसें आजिणठाचे घाट उतरोन खालीं आले आहेत; सुरतेकडे यावयास निघाले आहेत. त्याजकडील देऊळ-घाटी ग्रहस्त आहे त्याणें मुजरत कागद राजश्री हरिपंतास पाठविला आहे. आम्हींहि उदईक पागा आली म्हणजे राजश्री लक्षुमणपंत पिंपळनेरकर याजकडे पाठवितो. शोधास माणसें पाठविलीं आहेत. तीहिं बातमी घेऊन येतील, व सुरतेहून परशा निसबत भावसिंग याजकडील माणूस गेला होता. आपाजी शिंदे याची आई व बायको व बहीण घेऊन आला. त्याणें सुरतेकडील वर्तमान भाले-राव श्रीमंताजवळ होता तो वासदे याचे घाटानें निघोन गेला. श्रीमंताजवळ तीनशें माणूस कवाइती मात्र आहे व पन्नास स्वार आहेत; बाकी सरंजाम कांहीं नाहीं, याप्रमाणें वर्तमान आहे. पलटणें च्यार आहेत, व तोफा आठरा आहेत. सलेयाचें बोलणें लागलें आहे. व सरकारचा कारकून श्रीमंत दादासाहेब याज-वळ आला आहे. राजश्री माहादाजीपंत करमरकर श्रीमंताजवळ होते, त्यास देवाज्ञा जाहाली म्हणोन परशा आला त्याणें वर्तमान सांगितलें. आपणाकडील वर्तमान ध्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. आज दो दिवसाचें वर्तमान कळलें नाहीं, त्याजवरून चिंता लागली आहे; तरी कृपा करून पत्र पाठवीत जावें. बहुत काये लिहिणें हें विनंती. राजश्री अंताजीपंत नाना व माहादाजीपंत व कृष्णाजीपंत व धोंडोपंतास नमस्कार. वर्तमान वरचेंवर लिहीत जावें; कृपा लोभ करीत आसावा; बहुत ल्याहावें असें नाहीं. मानाजी फांकडा वेतालवाडीस आला आहे, याची बातमी पकी आहे. माणूस त्याचें लस्करांतून आला आहे. हा वर्तमान सांगता कळो येईल. बहुत काय लिहिणें (हें विज्ञापना.)

¶*Keso Mahadeo writes about the movements and the strength of the forces of Dadasaheb and his accomplices in Gujarat.*

---

*No. 139*]

[*January 1775*

**श्रीशंकर प्रा**

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पो राजाराम खंडेराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करावे विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविले ते उत्तम

स(म)ई पावोन भेटीसमान लाभ जाहाला. यैसच सदैव पत्र पाठऊन परामर्ष करीत जावा. यानंतर नरोतम व आंबादास येथून दोन मजला पावल्याचे वर्तमान आले. पुढे ज्या ठिकाणी रवानगी केली आहे तेथील पावल्याची पत्रे आली म्हणजे आपणाकडे पाठवितो. मार्गी कोणेविसी चिंता नाही. सरकारचे ठाण्यानी पाठविला आहे. रात्री ज्या ठाणियासी जातील त्याणी चवकीपाहारा देऊन प्रात:काली कबज घेऊन रवानगी करावी. याप्रो किलेदार व कमाविसदार यासी पत्रे लेहून दिल्ही आहेत. कोणेविसी चिंता नाही. सुरक्षित पावेल. कदाचित दगाफटका जाला आणि त्याचे संरक्षण न होये, हातचा जातो, यैसेच जाल्यास रो कमलाकरपंत यासी आपली आज्ञा निक्षूण आसेल त्याआन्वये वर्ततील; परंतु हातचा जाईल हे घडणार नाही. जाब आल्यावर प्रा होईल. आपण या प्रांती आहात इतकियात वसूल झाडून घेतो. मोगलास यैवज पावला तो पावला, बाकी राहिला यैवज देत नाहीं. श्रीमंत बडोद्यास आले. सरकारचे माहाली नवे कामदार पाठविले व सरजामी माहालातहि पाठविले यैसे परस्परे यैकिले व आपले पत्री आर्थ कलला. त्यासी आम्हास तूर्त काही चिंता नाही. आपण दरम्यान आहात तो पंधरा दिवसात गुता उरकून घेतो, मग चिंता काये आहे. इकडील गुंता उरकून मीहि लौकरच सेवेसी येतो. दुसरे वर्तमान, इंग्रजाचे येथे कौसल जाले. तेथून भडोचकर मिस्तर शाहा यासी लिहिले की तुम्ही श्रीमंताची भेटी घेऊन पंचविसा स्वारानसी भडोचेस घेऊन येणे. तेथू(न) ममईस पावते करू. याप्रो वर्तमान आपणास कलावे. साष्टीचा कि(ला) मार्गेश्वर वद्य १० बुधवारी घेतला. माणूस फार मेले. रा आनदराव रामाजी सापडले. ते ममईस पाठविले. किलेदार मृत्य पावला. त्याचा पुत्र सांपडला. राजश्री विसाजी कृष्ण जवल होते परंतु तोंड पाहात राहिले. मदत न केली. किलेदार जातीने लढून सोला दिवस शर्त केली. सेवटी बुरूज आगदी भोईबरोबर पाडून हाला केली याप्रो जाले. उभयेता विसाजीपंत वसईस आहेत. याउपरी साष्टी घेतली याजमुलें इंग्रज मोगल शेर जाले. वसई घेतो म्हणौन आवई घातली आहे. त्यास वसईस सामान राजश्री विसाजी केशव याणी चांगले केले आहे. फौजहि जमा जाली आहे. बहादरपुऱ्याच्या हावेल्या पाडून मैदान केले. झाड तोडली याप्रो केले आहे परंतु परिणाम काये करितील ते पाहावे. नाना, साष्टी गेली हे फारच वाईट जाले. याउपरी साष्टी माघारे घेऊन ममईची तजवीज श्रीमंत करितील तरीच दाब बसेल आणि इंग्रजाचे पारपत्य होईल. ईश्वर काये करील ते पाहावे. सांप्रत्य गुजराथ प्रांती अरिष्ट उभे राहिले आहे. कैसे होईल ते पाहावे. साष्टीचे वर्तमान खोटे नाही. तेथून मुजरद माणसे तेथील

पाठवितो. राजश्री हरिपंतनाना सरलस्कर याजकडील देऊळघाटांतून मुजरद माणूस आलें कीं मानाजी शिंदे व सटवोजी भोंसलें ऐसें आजिणठाचे घाट उतरोन खालीं आले आहेत; सुरतेकडे यावयास निघाले आहेत. त्याजकडील देऊळघाटी ग्रहस्त आहे त्याणें मुजरत कागद राजश्री हरिपंतास पाठविला आहे. आम्हींहि उदईक पागा आली म्हणजे राजश्री लक्षुमणपंत पिंपळनेरकर याजकडे पाठवितो. शोधास माणसें पाठविलीं आहेत. तीहिं बातमी घेऊन येतील, व सुरतेहून परशा निसबत भावसिंग याजकडील माणूस गेला होता. आपाजी शिंदे याची आई व बायको व बहीण घेऊन आला. त्याणें सुरतेकडील वर्तमान भालेराव श्रीमंताजवळ होता तो वासदे याचे घाटानें निघोन गेला. श्रीमंताजवळ तीनशें माणूस कवाइती मात्र आहे व पन्नास स्वार आहेत; बाकी सरंजाम कांहीं नाहीं, याप्रमाणें वर्तमान आहे. पलटणें च्यार आहेत, व तोफा आठरा आहेत. सलेयाचें बोलणें लागलें आहे. व सरकारचा कारकून श्रीमंत दादासाहेब याजवळ आला आहे. राजश्री माहादाजीपंत करमरकर श्रीमंताजवळ होते, त्यास देवाज्ञा जाहाली म्हणोन परशा आला त्याणें वर्तमान सांगितलें. आपणाकडील वर्तमान ल्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. आज दो दिवसाचें वर्तमान कळलें नाहीं, त्याजवरून चिंता लागली आहे; तरी कृपा करून पत्र पाठवीत जावें. बहुत काये लिहिणें हें विनंती. राजश्री अंताजीपंत नाना व माहादाजीपंत व कृष्णाजीपंत व धोंडोपंतास नमस्कार. वर्तमान वरचेंवर लिहीत जावें; कृपा लोभ करीत आसावा; बहुत ल्याहावें असें नाहीं. मानाजी फांकडा वेतालवाडीस आला आहे, याची बातमी पकी आहे. माणूस त्याचें लस्करांतून आला आहे. हा वर्तमान सांगता कळो येईल. बहुत काय लिहिणें (हें विज्ञापना.)

¶*Keso Mahadeo writes about the movements and the strength of the forces of Dadasaheb and his accomplices in Gujarat.*

---

*No. 139*]

[*January 1775*

**श्रीशंकर प्रा**

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पो। राजाराम खंडेराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करावे विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविले ते उतम

स(म)ई पावोन भेटीसमान लाभ जाहाला. यैसच सदैव पत्र पाठऊन परामर्ष करीत जावा. यानंतर नरोतम व आंबादास येथून दोन मजला पावल्याचे वर्तमान आले. पुढे ज्या ठिकाणी रवानगी केली आहे तेथील पावल्याची पत्रे आली म्हणजे आपणाकडे पाठवितो. मार्गी कोणेविसी चिंता नाही. सरकारचे ठाण्यानी पाठविला आहे. रात्री ज्या ठाणियासी जातील त्याणी चवकीपाहारा देऊन प्रात:काली कबज घेऊन रवानगी करावी. याप्रो किल्लेदार व कमाविसदार यासी पत्रे लेहून दिल्ही आहेत. कोणेविसी चिंता नाही. सुरक्षित पावेल. कदाचित दगाफटका जाला आणि त्याचे संरक्षण न होये, हातचा जातो, यैसेच जाल्यास रा कमलाकरपंत यासी आपली आज्ञा निक्षूण आसेल त्याआन्वये वर्ततील; परंतु हातचा जाईल हे घडणार नाही. जाब आल्यावर प्रा होईल. आपण या प्रांती आहात इतकियात वसूल झाडून घेतो. मोगलास यैवज पावला तो पावला, बाकी राहिला यैवज देत नाहीं. श्रीमंत बडोद्यास आले. सरकारचे माहाली नवे कमादार पाठविले व सरजामी माहालातहि पाठविले यैसे परस्परे यैकिले व आपले पत्री आर्थ कलला. त्यासी आम्हास तूर्त काही चिंता नाही. आपण दरम्यान आहात तो पंधरा दिवसात गुता उरकून घेतो, मग चिंता काये आहे. इकडील गुंता उरकून मीहि लौकरच सेवेसी येतो. दुसरे वर्तमान; इंग्रजाचे येथे कौसल जाले. तेथून भडोचकर मिस्तर शाहा यासी लिहिले की तुम्ही श्रीमंताची भेटी घेऊन पंचविसा स्वारानसी भडोचेस घेऊन येणे. तेथू(न) ममईस पावते करू. याप्रो वर्तमान आपणास कलावे. साष्टीचा कि(ला) मार्गेश्वर वद्य १० बुधवारी घेतला. माणूस फार मेले. रा आनदराव रामाजी सापडले. ते ममईस पाठविले. किल्लेदार मृत्य पावला. त्याचा पुत्र सांपडला. राजश्री विसाजी कृष्ण जवल होते परंतु तोंड पाहात राहिले. मदत न केली. किल्लेदार जातीने लढून सोला दिवस शर्त केली. सेवटी बुरूज आगदी भोईबरोबर पाडून हाला केली याप्रो जाले. उभयेता विसाजीपंत वसईस आहेत. याउपरी साष्टी घेतली याजमुलें इंग्रज मोगल शेर जाले. वसई घेतो म्हणौन आवई घातली आहे. त्यास वसईस सामान राजश्री विसाजी केशव याणी चांगले केले आहे. फौजहि जमा जाली आहे. बहादरपुऱ्याच्या हावेल्या पाडून मैदान केले. झाड तोडली याप्रो केले आहे परंतु परिणाम काये करितील ते पाहावे. नाना, साष्टी गेली हे फारच वाईट जाले. याउपरी साष्टी माघारे घेऊन ममईची तजवीज श्रीमंत करितील तरीच दाब बसेल आणि इंग्रजाचे पारपत्य होईल. ईश्वर काये करील ते पाहावे. सांप्रत्य गुजराथ प्रांती अरिष्ट उभे राहिले आहे. कैसे होईल ते पाहावे. साष्टीचे वर्तमान खोटे नाही. तेथून मुजरद माणसे तेथील

राहणार आली त्याणी कचे वर्तमान सांगितले. आपणाकडील सविस्तर वृत लिहीत जावे. आपण तिकडे आहां याजमुले आम्ही इकडे स्वस्त आहोत. बरा वाईट प्रकार आसिल्यास आम्हास तेच क्षणी ल्याहावे. नेहमी दोन माणसे आमची राजश्री महिपतराव याजवल ठेविली आहेत. सुरत संमधी जाबसाल काये ठरला ते ल्याहावे. आपणाकडून वकील गेला होता त्याचा जाबसाल कलला नाही ते ल्याहावे. बहुत काये लिहिणे कृपा लोभाची आभिवृधि करावी हे विनंती. मिस्तर शाहा भडोचकर पनास माणसानी बडोद्यास गेला. कलावे हे विनंती.

¶*Rajaram Khanderao reports to Naropant Nana the safe despatch of Narottam and Ambadas in proper custody and assures him that there was no fear of their escape. He also writes about the development of affairs of the English. The writer regrets the capture of Salsette by the English in spite of the valiant efforts of the Killedar and is afraid that Bassein may soon follow the same fate.*

---

*No. 140*]

[*January 1775*

**श्रीगजानन प्रा**

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री

**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो राजाराम खंडेराव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विश(ष). आपले आज्ञेप्रमाणे नरोतम व आंबादास याची रवानगी सुक्रवारी केली. समागमे पनास माणसे दिली. सुक्रवारी आर्जुनगडचा मुकाम, मंदवारी बलालगडचा मुकाम, रविवारी चिंचल्याचा मुकाम, सोमवारी गोरे कोहज येथे जातील. तेथून पुढे जेथे स्वामीची आज्ञा आसेल तेथे सरकारच्या ठाण्याठाण्यानी पाठविले. तमाम ठाण्यास पत्रे लिहिली आहेत. आर्जुनगडास भगवंतराव व दाहा स्वार आम्ही आपले पावते करावयासी दिल्हे होते ते मदवारी स्वार होऊन तिकडे गेले आणि भगवतराव माघारे आले याप्रो त्याची रवानगी केली. दुसरे आपले जासूद पुणियासी गेले त्याणे जबानी सागितले कीं श्रीमत साहेब बडोद्यास आले. रो गोविंदराव व फतेसिगराव यैसे येक जाले. श्रीमंतास भेटले म्हणौन वर्तमान सागितले. त्यासी सत्यमिथ्य काये ते ल्याहावे. जोपर्येंत आपला या प्राती टिकाव आहे तोपर्येंत आमचाहि आहे. तैसाच प्रकार आसिल्यास आम्हासहि सूचना करावी. उभयेता बंधू गाईकवाड येकत्र जाले असिले तेव्हा आपण काये विचार केला ते ल्याहावे. श्रीमंत राजश्री बापूस हा मार आम्ही लिा आहे. आपली पत्रे गेलीच आसतील.

6054

तेहि समीप थालनेरावर आहेत. बांञ्याचे तारखेडे घेतले. माधवराव भिलाणात पलोन गला. आपणाकडील मसलत बरी वाईट आम्हास सुचवीत आसावी. सूज्ञाप्रति विस्तारे काये ल्याहावे. आम्ही आपले आधारावर आहोत. साष्टी इंग्रजानें घेतली. कलावे बहुत काय लिहिणे ? कृपावृधि करावी हे विनंती.

*¶Rajaram Khanderao to Naropant Nana writing about Narottam and Ambadas having been sent to Kohaj as directed. The writer enquires whether the two Gaikwads have joined Raghoba and settled their differences.*

---

*No. 141]* *[1-2-1775*

पौ छ १ जिल्हेज सुा

खमस माघ

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी

गोसांवी यांसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. हैदर नाईक याजकडील ऐवजापैकी आपाजी राम याचे मारफातीने कृष्णाजी नाईक दातार यांचे हवाल्याबाबत दोन लक्ष रुपये येणे. त्याजविसी बाजीराव गोविंद बर्वे याणी कर्णाटकातून तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यासी व चितो विठल यांसी पत्रे लेहून पाठविली, ती चौकीवर सांपडली, ती पुरंधरास दफ्तरी आहेत. त्याचा शोध करून पुणियासी पाठवावयाविसी तुम्ही लिहिले त्याजवरून चिंतो विठल यांचे पत्र दोन बंदावर व तीर्थस्वरूपाचे नावाची च्यार पत्रे पांच बंदावर येणेप्रमाणे दफ्तरी होती ते पाठविली आहेत. पावतील. सदरहू ऐवज बदामीकरांचे हातून आणविला होता तो आला की नाही याचा मार तपसीलवार लेहून पाठवणे. जाणिजे छ २९ जिलकाद सुा खमस सबैन मया व अलफ हे विनंती.

*¶The writer sends to Naro Appaji a few intercepted letters of Bajirao Barve's intrigue with Haidar.*

---

*No. 142]* *[2-2-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना

स्वामीचे सेवेसी

सेवक नारो गणेश सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १ जिल्हेज जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष. आपणाकडून पत्र येऊन परामृष

होत नाही त्यास यैसे नसावे. सदैव पत्र पाा संतोषवीत असावे. यानंतर राजश्री आनदराव यास पाा होते की बुणगे येईल त्यासमागमे येणे. त्यास बुणगे आद्यापि येत नाही. आपणाकडूनहि येणे म्हणून उतर नाही त्याजवरून दुग्धा पडली आहे. आपण फौजसुधा येणार म्हणून वर्तमान आईकिले. त्यास सविस्तर मजकूर लेखन केला पाहिजे. बहुत काय लिहिणे. श्रीमंत राजश्री विसाजीपंत बिनीवाले यानी जासूदजोडी साष्टीहून पाा आहे. पत्रावरून सविस्तर भावगर्भ ध्यानास येईल. लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*Naro Ganesh to Naropant Nana asking information of his whereabouts.*

---

*No. 143*]

[*3-2-1775*

पौ छ १० जिल्हेज सुाा
खमस सबैन माघ मास

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २ माहे जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व किले पारनेरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ १७ जिलकादचे सादर जालें तेथें आज्ञा की तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब गुजराथ प्रांती आले, त्याची बातमी लिहीत जाणें म्हणोन आज्ञा. त्यास श्रीमंत राजश्री दादासाहेब बडोद्यास येऊन दाखल जाले. राजश्री हरिपंत फडके फौजसुधा चांपानेरास येतांच राजश्री गोविंदराव गायेकवाड यासी बराबर घेऊन श्रीमंत महीपार गेले. राा हरिपंत फौजसुधा महीआलिकडेस इकडील काठ्यास आहेत. महीचे घाट त्याणी बंद केले आहेत. नित्य याची त्याची टपाटपी होतच आहे. उभये पक्षीचें युद्ध होणार आहे. राजश्री फतेसिंगराव गायेकवाड बडोद्याहून निघोन तोफखाना वगैरे सरंजाम घेऊन राा हरिपंतास सामील जाले. महीपलीकडील मवास श्रीमंतास सामील जाले आहेत. श्रीमंत बडोद्यास आले होते, ते समई भडोचकर इंगरेजाकडेस लक्षुमणपंत नातू बोलीचालीस पाठविले होते. सरंजाम वगैरे साहित्य माघा ध्यावयाचा करार जाला होता. त्याप्रोा इंगरेजाकडून जावें तों सरकारची फौज येऊन पावली, त्यामुलें काहींच घडोन आलें नाही. रामचंद्र नारायेण व आपाजीराम कारकून जव्हेर घेऊन सुतेंस गाहाण ठेऊन किंवा विकोन यैवज न्यावयाअर्थें श्रीमंताकडून आले होते; परंतु सुतेंत सावकारानी

जव्हेर ठेऊन यैवज दिल्हा नाही. कारकून फिरोन गेले. सुर्तेहून दारूगोली वगैरे सरंजाम इंगरेजाकडून पोचला नाही, याप्रो इकडील वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

*¶Visaji Keshao reports to the Peshwa Raghoba's flight beyond the Mahi with Haripant Phadke closing on him.*

---

*No. 144]* *[4-2-1775*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य**

**राजश्री अंताजीपंत स्वामीचे सेवेसी**

पोष्य धोंडो बलाल कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुषल ता। माघ शुध ४ चतुर्थी मंदवारपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. तुम्हाकडील वर्तमान कलत नव्हते. त्यास तिकडून जासूद आले त्याणी मुखजबानी सविस्तर सांगितलें त्यावरून कललें. यानंतर इकडील वर्तमान तर चिरंजीव राजश्री कृष्णराव श्रीमंत बापू व नाना यांच्या लस्करांत सुखरूप आहेत. ते उदईक पंचमीच्या मुहूर्ते पुरंधरास उभयतां येणार त्याजबरोबर हेहि येतील. तुमच्या घरचे वर्तमान तर सर्व सुखरूप आहेत व काल्याकडील वर्तमान तर जी मुले देवी यावयाची होती त्यास देवी येऊन वारली. अनंत व राघोबा व मथुरा व वासुदेव इतकी चौघे मुले गत जाहाली. होणारास उपाय काय? आणखी सर्व क्षेम आहेत. तुम्हाकडील वर्तमान कलत नाही. तर सविस्तर लिहित जाणे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

पोष्य जगनाथ धोंडदेव कृतानेक सां। नमस्कार विनंती लिखितार्थ परिसोन कृपा करीत जावी. बहुत काये लिहिणे कृपा कीजे हे विनंती.

*¶Dhondo Ballal Phadke (brother of Haripant) informs Antajipant of Krishnarao enjoying good health in the camp of Nana and Bapu.*

---

*No. 145]* *[8-2-1775*

**श्री**

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना

स्वामीचे सेवेसी

सेवक नारो गणेश कृतानेक सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। माघ शुा। ८ सौम्यवार मुा। आंकलेश्वर येथे स्वामीचे कृपावलोकनेकरून क्षेमरूप असो

विशेष. आपणाकडून पत्र येऊन परामृष होत नाहीं यैसे नसावें. सदैव पत्रद्वारे कुशलतेचे वृत लेहून सांभालीत असावे. यानंतर राजश्री बलवंतराव धोंडदेव व राजश्री बालाजी खंडेराव याणी श्रीमंताचे पत्र आम्हास साहित्याविसी आणिलें. त्यास आम्हाकडून जे साहित्य होणे ते आपले आज्ञेप्रमाणे होईल. परंतु आपण फौजसुधा आल्यावितरिक्त इकडील बंदोबस्त यथास्थित होणार नाही. पांच सातसे राउतानसी दोही ठिकाणची बंदी कसी होईल? जेव्हा बंदी करणे तेव्हा नाक्याच्या नाक्यास राऊत ठेऊन बंदोबस्त करावा तेव्हां रस्ता जाऊ पावणार नाही. परगण्याचा रुपया थोडाबहुत मामलेदाराकडून पेसजी पावता जाहाला आहे. बंदी होऊन जफ्ती जाहाली म्हणजे रुपया पोहचणार नाही. यास्तव आपण येत तोपर्यंत राजश्री बलवंतराव धोंडदेव व राजश्री बालाजी खंडेराव फौजसुधा कामरजेचे मुकामी जाऊन राहणार. त्यास आपण सत्वर यावे. दिरंगावर गोष्ट घालू नये. या मागेच बंदीचा बंदोबस्त जाहाला असता तर फार उतम होते. बरे, आतां तरी आपण फौजसुधां यावें म्हणजे सर्व गोष्टी अनकूल होतील. आम्हास आज्ञा कराल त्यांत सेवेसी अंतर होणार नाही. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विनंती. बंदी करावयाचे दिवस फार करून गेले. पुढें आठ पंधरा दिवस पावेतो हंगाम आहे. इतकियात बंदी जाहालियानें सामान जावयाचे राहील. नाके भडोजेचे आहेत. त्याची बंदी पोख्त पकी केली पाहिजे. नाहींतरी परगणेयासी मात्र उपद्रव यैसा प्रकार आहे व सुरतचे बंदीचेहि दिवस हेच आहेत. यास्तव मुख्य गोष्ट सत्वर यावे. येण्याचा प्रकार लौकर जाहल्यास कामकाज होऊन येईल. ते पंधरा दिवसानंतर घडावयाचे नाही. तरी आपण यावयाची सिद्धता सत्वर करावी. हे विनंती.

¶*Naro Ganesh requests Naropant Nana to go to the succour of Balwantrao Dhondadeo and Balaji Khanderao. Without his arrival, he says, it is impossible to arrange for the proper defence of Ankaleshwar and send help to them as well.*

---

*No. 146*] *[11-2-1775*

पैवस्ती छ १५ जिलकाद सन खमस सबैन

पौष मास.

**श्री**

शेवेसी. येथील तागायत छ १० जिलकाद पावेतों येथास्थित असे विशेष. स्वमीनी पत्र पाठविले तें पावलें. तेथें आज्ञा कीं परांड्याचे वाटेंत हैदर नाईकाकडील कारकून व लाला कायेत जाऊन राहिले आहेत. त्याजपासी कसबे

बारामती येथील लोक चाकरीस राहातात व पांगरीस लोक कांहीं जमा जाले आहेत म्हणोन विदित जाले. त्यास हैदर नाईकाकडे लोक जाऊन चाकरीस राहतात, हे बातमी राखून बंदोबस्त करीत नाहीं, व वर्तमानहि हुजूर लिहून पाठविले नाहीं हें आपूर्व आहे! हलीं हें पत्र लिहिलें आसे, तर तुमचे प्रांतांतील लोक त्याजकडे जाऊन राहिले व राहावयास जातात, त्याची पुर्ती चौकसी करून जे गेले आसतील, आथवा जे जाणार आसतील, त्यांची घरें व मुलें माणसें वतनदेखील जफ्त करणें. मुलांमाणसांस तसदी देऊन जे गेले आसतील, ते माघारे येत, त्याजकडे न राहात यैसे करून, तपसीलवार नांवनिसी जे गेले आसतील त्यांची लिहून हुजूर पाठवणें म्हणोन आज्ञा केली. त्यास येविशी पूर्वी पत्र पाठविले होतें. त्याजवरून कसबे मजकूरची व परगण्याची ताकीद करून जे गेले ते माघारे आणविले. व जे जाणार त्यांस ताकीद केली हें वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिलेंच आहे. हलीं पागरीविशीं लिहिलें तेथेंहि पूर्वी ताकीद केली व हलींहि आज्ञेप्रमाणें ताकीद लिहिल्याआन्वयें करवितों. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

*The writer is desired by the Peshwa to take severe measures against those who have deserted to Haidar Naik.*

---

*No. 147]* *[16-2-1775*

छ १९ जिल्हेज.

**श्री**

विनंती. राजश्री फतेसिंग गायेकवाड यांजकडून बडोद्याहून सरकारांत पत्रें आलीं आहेत त्यावरून सर्व आर्थ ध्यानात येईल. आम्हासहि पत्र आलें. गोविंदराव गायेकवाड यांची व त्यांची लढाई होऊन फतेसिंगबाबा बडोद्यास गेले. तेथे त्याचा जमाव बराच जाला आहे. गोविंदराव यांचे व त्यांचें सख्ये करावे येविसीची मध्येस्ती राजश्री खंडेराव गायेकवाड करितात. त्यास फतेसिंगबाबा इकडील लक्ष धरून सख्याचा प्रकार करीत नाहीत. त्यापक्षी सरकारांतून फतेसिंगबाबाकडील पुस्तपन्हा केल्याने पुढे मसलतीस उपयोगी आहे. गोविंदराव याजबराबर सरकारची फौज गेली आहे त्या सरदारास व गोविंदरायांकडील पथके आहेत त्यास सरकारची जरबेची पत्रे गेलियाने तेथे दाब पडोन फतेसिंगबाबा याजकडील बलाबल विशेष होईल याजकरितां तिकडे येविसीच्या साधनाचीं पत्रें व फतेसिंगबाबा यांसहि हिंमत चढे अशा रीतीची पत्रें लौकर जावी हे उत्तम + + + +

---

+ पत्र नारो आपाजीचें.

मजकूर काये आहे? याउपरी लिहिल्याआन्वये सरदारास, गोविंदरावाबा आहेत त्यांस पत्रे दिल्हियाने निमे बल मोड होईल व नरसिंगराऊ गोविंद व दौलत बाबूराऊ याजकडील तरी बोलणीच आहेत. कांही दाब व काही समाधान आशा आन्वये पत्र द्यावी. आज्ञा आलियास पत्रे देऊ. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Naro Appaji writes to Poona about a battle that took place between Fatesing and Govindrao Gaikwad and requests the Barbhais to support the cause of Fatesing as he was favourably inclined to the Peshwa.*

---

*No. 148*]

[*18-2-1775*

**श्री**

राजश्री तमापा' स्वामीस

विनंती. येथील क्षेम तागाईत माघ वद्य ३ मंदवार प्रात:कालपर्यंत मुकाम महीतीर येथें बुणग्यांत असों. श्रीमंत तात्या व तमाम फौजा व * * * * गबाबा ऐसे येकत्र होऊन सल्ला बिघडला. लढाईचा सिद्धांत करून शुक्रवारीं काल कूच करून महीवर आले तों श्रीमंत दादासाहेब पैलतीरीं फौजसुद्धां आले. तृतीय प्रहरीं आम्ही समस्त फौजसुद्धां महीपार जालों तों त्याच्या याच्या गांठी पडल्या. च्यार घटिका लढाई चांगली जाहाली, त्यांचा मोड जाहाला. तोफा दाहा व हत्ती दाहा घोडीं उंटें सुतरनाला घेऊन आले. मानाजी फांकडा व सदाशिव रामचंद्र व सखाराम हरि यांस जखमा भारी लागल्या. ठार जाहाल्याचें वर्तमान आहे. त्यास तेथून श्रीमंत पळून मागें बुणग्यांत गोविंदराव खंडेराव, हरि भिडे वगैरे गेले. त्यांचे पाठीमागें सडी फौज गेली. मेले गेले धरले सर्वहि समजेल, मग उदयिक लेहून पाठऊं. शुक्रवारीं सायंकाळीं बुणग्यांत येऊन वर्तमान लिहिल असें. बाबूराव पाटणकर धरून आणिले.

कृष्णाजी नाईक कडु याचें पत्र त्याचे गुमस्त्यास आलें त्याची नकल आली तें छ २९ जिल्हेज सोमवार.

¶*A heavy engagement between Haripant and Dadasaheb on the Mahi is reported in this letter.*

---

*No. 149*]

[*22-2-1775*

**श्री**

राजश्री नारो आपाजी स्वामी गो

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. केशवराव बलाल याची स्त्री व पुत्र किले सिहीगड वर अटकेस आहेत. त्यास स्त्रीस फार बरे वाटत नाही

साखरपाणी मात्र घेत असत्ये. पका जामीन वेऊन खाली उतरावयाची असल्यास उतरू. येविसी आज्ञा येईल त्याप्रमाणे करू म्हणौन लिा ते कळले. त्यास किल्याखाली उतरावयाचे नाही. स्त्री साखरपाणी घेत्ये त्यास भोजन करणे म्हणौन सांगोन पाठवणें. जाणिजे छ २१ जिल्हेज सुा खमस सबैन मया व अल्फ हे + विनती.

¶*Naro Appaji is asked by Sakharam Bapu not to set at liberty the wife of Keshavrao Ballal kept in confinement at Sinhagad even though she is ill.*

---

*No. 150*]. [*26-2-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गो
यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अल्फ तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते पावले. राजश्री फतेसिगराव गाईकवाड व आपण राजश्री हरि बलाल यास भेटोन गाईकवाड व आपण येक विचारे चाकरी सरकारची करितो म्हणून लिहिले ते कळले. उतम असे. सुरतेच्या बंदीस रा बालाजी खंडेराव व बलवंतराव धोंडदेव आले. मागाहून तुम्हीहि येणार. त्यास सुरतेची बंदी गाईकवाड याणी कबूल केली. येविसी मागाहून पत्रे सादर होतील त्याप्रा करणे. तुम्ही तूर्त न येणे. जाणिजे छ २५ जिल्हेज आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa to Naro Anandrao complimenting him upon his having persuaded Fatesing Gaikwad to join Haripant.*

---

*No. 151*] [*27-2-1775*

श्री

वडिलाचे शेवेसी आपत्ये केसो नारायेण चरणावरी मस्तक ठेऊन सिर साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २६ जिल्हेज संध्याकाल पो मुाा कागले येथे सुखरूप आसो विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब काल येकादसीचे

---

+ पत्र सखाराम बापूंचें.

दिवशी संध्याकाली सुरतेस दाखल होऊन सलाबतपुऱ्याची बाग शहरात आहे तेथे येऊन राहिले. इंग्रज याचे बोलणे होऊन कोकणपटी दर्याकिनाराचे किलेकोट याच्या सनदा करून इंग्रजास दिल्या याप्रो बातमी शहरातून राजश्री गोविंद पंत आणा याजकडे आली. तेथे आम्हाकडून वसुलाबदल लिंगोपत हुकरीकर आहेत त्याणी लिहून पाठविले त्याजवरून वडिलास लिहिले आहे. वडिलाकडील बडोद्याचे मुकामाची पत्रे आली ती काल संध्याकाली पावली. येथील सुरतेचा बदोबस्त करणे, त्यास वीस हजार फौज व तोफा पाच सात असल्याखेरीज तापीतीरची बदी होणार नाही. शहराची बदी केल्यास परभारे तापीची खाडी उतरून बाहीर जातील. याजकरिता या बदोबस्ताविसी श्रीमंत राजश्री तात्यास पत्र लिहून बदोब (स्त) करावा. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

सेवेसी गोपाल गणेश याचे कृतानेक सा। नमस्कार. सर्व राजश्री केसोपत याणी लि। आहे त्याजवरून कलो येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. सेवेसी चिटको विठल व आपाजी हरि याचे सा। नमस्कार लि। परिसोन लोभ करावा हे विज्ञापना.

*¶Keso Narayan sends news of Raghunathrao having arrived at Surat and taken residence at Salabatpura.*

---

*No. 152]* *[27-2-1775*

**श्री**

**श्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो बहिरो रघुनाथ मु॥ वरिसे नजीक सुरत सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २६ जिल्हेज जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण साणीचे मुकामचे पत्र राजश्री बालाजी खंडेराव यासी पत्र आले की श्रीमंत राजश्री तात्यानी आमची रवानगी सुरत प्रातात केली. श्रीमत सुर्तेस आले म्हणौन वर्तमान भावनगराहून आले. आम्ही मजल दरमजल येऊन पोहोचतो म्हणौन रावजीस पत्र आले त्यावरून सविस्तर कलो आले. हिकडील वर्तमान तर श्रीमंताचा मोड जाल्यावर खंबाइतेस गेले. त्याणी घेतले नाही. भावनगरास पावते केले. भावनगरकर राज्याने च्यार जाहाजे देऊन सुर्तेस रवाना केले. हती व घोडी वगैरा सामान भावनगरास ठेऊन सडे जाहाजात बसोन बाऱ्यावर आले. छ २२ गुरुवारी सायंकाली दोन घटका दिवसास येऊन दाखल जाले. सुरतकर इंग्रजाकडून दुसरे दिवसी येक कोशल्या गेला. सामान सरजाम

सर्व भाडीसुधा सुर्तेहून गेली. पाच सातसे माणूस आजपरयंत जमा जाले आहे. मुजरद दोन जोड्या आपणाकडे सविस्तर लिहून पाठविल्या. ती पत्र पावलीच असतील. साप्रत त्याच्या व इंग्रजाच्या चितात आहे की येक वेल या फौजेवर घालावे ऐसे त्याचे चितात आहे. बातम्या रोज येतात. आपण जलदीने येऊन पोहोचावे. भेटीअंती सविस्तर निवेदन करू. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती. काल श्रीमत वाऱ्यावरून उतरोन शहरासमीप वाडी पश्चमेस आहे तेथे येऊन राहिले. आज इदुवारी शहरात येऊन राहिले. यैसी पकी बातमी आली. कलावे हे विनंती.

¶*Bahiro Raghunath informs Naro Anandrao that Raghunathrao after his defeat proceeded to Cambay and from thence to Bhavnagar. At Bhavnagar he embarked for Surat and has taken asylum with the English.*

---

*No. 153]* *[27-2-1775*

**श्री**

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसी

पो बालाजी खंडेराव क्रतानेक सा। नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन ता। छ २६ माहे जिल्हेज पावेतो मु। वरासे वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान काल संध्याकालपावेतो जी बातमी श्रीमंताकडील वरचेवर जी आली ती कालच लिहिली आहे. हालीच्या लिहिण्याचे सारांश हाच की, जितकी जलदी होईल तितकी उतम आहे. सुरतेबाहेर होते ते आज आत येणार असी बातमी आताच गायेकवाडाकडील का। सुरतेत आहे त्याचे पत्र आले त्याजवरून लिहिले आहे. तरी सत्वर यावे. आपले पत्र छाणीच्या मुकामीहून आले ते आजच पावले. पावोन संतोष जाहाला. भेटीअंती सविस्तर परस्परे कलेल. बहुत काये लिहिणे, विनंती.

पो सदासिव रघुनाथ व गोपाल त्रिंबक क्रतानेक सा। नस्कार विनंती. लि। परिसोन सत्वर येणे होईल ते उतम आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Balaji Khanderao reports to Naro Anandrao that Raghoba has arrived in the City and asks him to come quickly to his help.*

No. 154]

[February 1775

श्री

+
पुा नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी आपण दर पत्रीं लिहितात कीं मनसुबा कलेल तसा आटोपणे. त्यास लवकर आटपावे हे सर्वांचे मानस, परंतु गायकवाडानी लांबविलें त्यास इलाज नाहीं. सेवट काय करितात कलत नाहीं. काल पत्रें आली कीं येक मजल कूच केलें, दर मजल येतो. त्यास इकडून पत्रे निकडीची गेली आहेत. लौकर यावेसे आहेत. होईल ते लिहून पाठऊ. श्रीमंत खबाइतात आहेत, फौजेची मार्गप्रतीक्षा करितात. आम्ही येथे असतां फौज जात नाही. जसे गायकवाडानी म्हटले तसे ऐकिले. भेटावे या तजविजेत आसो. हे भेटले म्हणजे श्रीमंत काय करितात हे समजेल. तसे पुढे करावयास येईल. होईल ते लिहून पाठऊ. पैका नाहीं. मसलत लांबली. ईश्वर परिणाम लावील तो खरा. नाना, मोठे संकट येऊन पडले आहे. इतका प्रकार इंग्रजाचे पक्षामुले जाला आहे. श्रीकृपेने प्रात लागेल तो खरा. आपण मजबुदीने असावे. हे विनंती.

¶*Haripant to Naro Appaji communicating the troubles created by the Gaikwads and hoping that the undertaking would prove successful.*

---

No. 155]

[February 1775

श्रीगजानन

स्वामीचे शेवेसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. राजश्री हरि रघुनाथ भिडे काली बुधवारी आले. यावरी मुतसदी यांस बोलाऊ पाठविले, ते दोन घटका रात्र गेल्यावरी आले. जाबसाल बहुत जाले. कांही निश्चयाची गोष्ट आज्ञेप्रमाणे व्हावयाचा ठराव जाला आहे तो राजश्री केशो गोविंद शेवेसी येतील ते विज्ञाप्ति करिता सविस्तर श्रवण होईल. शेवेसी आंबे पिकले सुमार १०० येकसे पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Probably Wamanrao Patwardhan to Haripant writes that Hari Raghunath Bhide has opened negotiations with the Barbhais on behalf of Raghunathrao.*

---

+ पत्र हरिपंतांचें आहे.

No. 156] [February 1774

**श्रीगजानन**

**राजश्री माणको(जी) पंत स्वामी गोसावी यास**

विनंति उपरी. तुम्ही चिठी पा। ते पावली. श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांचा मुक्काम लष्करापासोन चार कोसावर आहे. प्रातःकाली मुक्काम व्हावयाचा मजकूर लि।. येशास श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे कूच आज पंधरा कोसाचे जाले. एक मुक्काम जाल्यास आणखी पंधरा कोस जातील तेव्हां सात आठ गांवाची तफावत सहजात पडत्ये. नवाब कूच लांब होते म्हणोन आधीच पाय खोऊन बोलतात. त्याहीमध्यें आज त्याचा निश्चये ठरला आहे जे परंडेचे मुक्कामास लांब कूच करून आज जावे. तेथें बुणगे टाकून सडे व्हावे; आणि श्रीमंत दादासाहेबाचा पाठीलाग बेजरब करावा याप्रमाणें ठरले आहे. याजकरितां बहुत प्रकारें श्रीमंत प्रतिनिधीस सांगोन कूच करून यावें. राजश्री हरिपंत तात्या व आम्ही सारे फौजसुधा तलावर पंताची वाट पाहत बसलो आहो. लष्करापासोन कोसाचे सुमारे याल तेव्हां आम्हाकडे एक स्वार पाठवून देणे. पंत आल्यासिवाय आम्ही कोणी जात नाहीं. +बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Dadasaheb is marching on with his army and is being pursued by Haripant and Pratinidhi.*

---

No. 157] [1-3-1775

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामींचे सेवेसी**

पोष्य हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २८ जिल्हेज मुकाम नजीक कपाटबंद जाणौन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. पो। आमोद येथे श्रीमंत राजश्री दादसाहेब यांची जफ्ती आली तेव्हा पो। मजकूरच्या जमिनदारानी तेरा हजार रुपयाची पटी करून दिल्ही. त्याचा हवाला भडोचकर इग्रजाच्या गुमस्त्याने घेऊन तेरा हजार रुपयाच्या येवजास पो। मजकूर गावगना सतावीस हजार रुपयाचा कापूस लेहून घेतला. त्यावर सरकारच्या फौजा या प्रांती आल्यावर श्रीमंताची जफ्ती उठून गेली. तेरा हजारापैकी त्यास काही पावले नाही, आसे असता इग्रजानी सतावीस हजार रुोचा कापूस लेहून घेतला

---

+ येथून अक्षर निराळे वळणाचें.

No. 154] [February 1775

श्री

+ पुा नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी आपण दर पत्रीं लिहितात कीं मनसुबा कलेल तसा आटोपणे. त्यास लवकर आटपावे हे सर्वांचे मानस, परंतु गायकवाडानी लांबविलें त्यास इलाज नाहीं. सेवट काय करितात कलत नाहीं. काल पत्रें आली की येक मजल कूच केलें, दर मजल येतो. त्यास इकडून पत्रे निकडीची गेलीं आहेत. लौकर यावेसे आहेत. होईल ते लिहून पाठऊ. श्रीमंत खबाइतात आहेत, फौजेची मार्गप्रतीक्षा करितात. आम्ही येथे असतां फौज जात नाही. जसे गायकवाडानी म्हटले तसे ऐकिले. भेटावे या तजविजेत आसो. हे भेटले म्हणजे श्रीमंत काय करितात हे समजेल. तसे पुढे करावयास येईल. होईल ते लिहून पाठऊ. पैका नाहीं. मसलत लांबली. ईश्वर परिणाम लावील तो खरा. नाना, मोठे संकट येऊन पडले आहे. इतका प्रकार इंग्रजाचे पक्षामुले जाला आहे. श्रीकृपेने प्रात लागेल तो खरा. आपण मजबुदीने असावे. हे विनंती.

¶*Haripant to Naro Appaji communicating the troubles created by the Gaikwads and hoping that the undertaking would prove successful.*

---

No. 155] [February 1775

श्रीगजानन

स्वामीचे शेवेसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. राजश्री हरि रघुनाथ भिडे काली बुधवारी आले. यावरी मुतसदी यांस बोलाऊ पाठविले, ते दोन घटका रात्र गेल्यावरी आले. जाबसाल बहुत जाले. कांही निश्चयाची गोष्ट आज्ञेप्रमाणे व्हावयाचा ठराव जाला आहे तो राजश्री केशो गोविंद शेवेसी येतील ते विज्ञाप्ति करिता सविस्तर श्रवण होईल. शेवेसी आंबे पिकले सुमार १०० येकसे पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Probably Wamanrao Patwardhan to Haripant writes that Hari Raghunath Bhide has opened negotiations with the Barbhais on behalf of Raghunathrao.*

---

+ पत्र हरिपंतांचें आहे.

No. 156] [February 1774

**श्रीगजानन**

**राजश्री माणको(जी) पंत स्वामी गोसावी यास**

विनंति उपरी. तुम्ही चिठी पा। ते पावली. श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांचा मुक्काम लष्करापासोन चार कोसावर आहे. प्रात:काली मुक्काम व्हावयाचा मजकूर लि॥. येशास श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे कूच आज पंधरा कोसाचे जाले. एक मुक्काम जाल्यास आणखी पंधरा कोस जातील तेव्हां सात आठ गांवाची तफावत सहजात पडत्ये. नवाब कूच लांब होते म्हणोन आधीच पाय खोऊन बोलतात. त्याहीमध्यें आज त्याचा निश्चये ठरला आहे जे परंडेचे मुक्कामास लांब कूच करून आज जावे. तेथें बुणगे टाकून सडे व्हावे; आणि श्रीमंत दादासाहेबाचा पाठीलाग बेजरब करावा याप्रमाणें ठरले आहे. याजकरितां बहुत प्रकारें श्रीमंत प्रतिनिधीस सांगोन कूच करून यावे. राजश्री हरिपंत तात्या व आम्ही सारे फौजसुधा तलावर पंताची वाट पाहत बसलो आहो. लष्करापासोन कोसाचे सुमारे याल तेव्हां आम्हाकडे एक स्वार पाठवून देणे. पंत आल्यासिवाय आम्ही कोणी जात नाहीं. +बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Dadasaheb is marching on with his army and is being pursued by Haripant and Pratinidhi.*

---

No. 157] [1-3-1775

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामींचे सेवेसी**

पोष्य हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २८ जिल्हेज मुकाम नजीक कपाटबंद जाणौन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. पो। आमोद येथे श्रीमंत राजश्री दादसाहेब यांची जफ्ती आली तेव्हा पो। मजकूरच्या जमिनदारानी तेरा हजार रुपयाची पटी करून दिल्ही. त्याचा हवाला भडोचकर इग्रजाच्या गुमस्त्याने घेऊन तेरा हजार रुपयाच्या यैवजास पो। मजकूर गावगना सतावीस हजार रुपयाचा कापूस लेहून घेतला. त्यावर सरकारच्या फौजा या प्रांती आल्यावर श्रीमंताची जफ्ती उठून गेली. तेरा हजारापैकी त्यास काही पावले नाही, आसे असता इग्रजानी सतावीस हजार रुोचा कापूस लेहून घेतला

---

+ येथून अक्षर निराळे वळणाचें.

आहे, यासाठी पो मजकुरी जफ्ती पाठऊन जमिनदारास भडोचेत नेऊन बसविले आहेत व तहसीलहि चालीस लाविली आहे म्हणोन माधव सेट याणी लिहिले होते. त्यास तुम्ही त्या प्रांती गेला आहा. साराच बंदोबस्त तुम्हाकडे लागला. मग आमोदची कालजी कशास करावी? बंदोबस्त आमोदचा आधीं करून देऊन आम्हास लिहून पाठवावे. वरकडहि सरकारचे माहालचा बंदोबस्त करावा. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal to Naro Anandrao asking him to adjust all the disputes and losses caused by Raghunathrao in the district of Amod.*

---

*No. 158*] [*2-3-1775*]

**श्री**

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरि. येथील कुशल तागायत छ २९ जिल्हेज मुकाम नजिक कपटवंद प्रांत गुजरात यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा सल्लूक सिंदे होलकर याचे विद्यमाने येक महिना पावेतो बोलणे होऊन होत होता, परंतु ठरावांत येऊन फडशा न जाला. तेव्हां छ १६ जिल्हेजीं लढाई संध्याकालपर्यंत होऊन श्रीमंताचा मोड जाला आणि पलोन गेले. पाठलाग करावा तो अंधारी रात्र त्याजमुळें न केला. श्रीमंत से दोनसें लोकांनसी खंबायतावरून घोग्या बंदरास जाऊन तेथे पंनास पाऊणशानिशीं गलबतांत बसोन मुंबईकडेस गेले या प्रमाणे वर्तमान आहे. राजश्री वामनराव व रास्ते व आणखी पथके ऐसी दाहा पंधरा हजार फौज त्यांच्यामागें रवाना केली आहे. लढाईत तोफखाना व व दाहापंधरा हती पाडाव जाले. बाबूराव पाटणकर व गणेश विठल जखमी होऊन पाडाव जाले. सखाराम हरि व मानाजी सिंदे व सदाशिव रामचंद्र वगैरे मंडली व सरकारचे कारखाने राजश्री गोविंदराव व खंडेराव गायकवाड या समागमें आहेत. गायेकवाड कडी म्हणोनु ठाणे आहे त्या प्रांती आहेत. आम्हांपासून पंचवीस कोसावर आहेत. गायेकवाडाचा कारकून राजश्री आपाजी गणेश याजकडे येऊन कांहीं सलुकाचे सूत्र लाऊन आपाजी गणेश याचा कारकून व आमचीं पत्रें खातरजमेचीं घेऊन गेले आहेत. आद्याप उत्तरें आलीं नाहींत. आल्यावर काये मजकूर असेल तो समजण्यांत येईल. आपणांकडील बहुत

दिवस पत्र येऊन परामर्ष होत नाहीं तर सदैव पत्रीं कुशल वृत्त व इकडील वर्तमान लिहून पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा करावी हे विनंती.

¶*Hari Ballal writes to Naropant Nana of an encounter which he had with Dadasaheb when the negotiations that were opened with him through Sindia and Holkar had failed. He reports that Dadasaheb having been defeated in the fight was proceeding towards Bombay.*

---

*No. 159]* *[3-3-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**

**नारोपंत नाना स्वामीचे सेवसी**

पो हरि बलाल नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २० जिल्हेज मुकाम नजीक कपटवंद प्रांत गुजराथ जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंत लढाई जालियावर पलोन घोग्याकडेस गेले होते. त्यास त्याजकडील वर्तमान घोग्या पलीकडे जाऊन समागमे हती वगैरे सरंजाम होता तो भावनगरास ठेऊन आपण चालीस पनासानिसी व पाच सात घोडी याप्राा गलबतात बसोन सुरतेस गेले. सुरतवाल्याने राहावयास वाडा देऊन ठेविले. हे वर्तमान मुमइवाल्यास कलल्यावर त्याणीहि दोन हजार गाडद सुरतेस रवाना केले. याप्राा बातमी छ २९ मिनहूस आमदाबादेहून व खंबायताहून व घोग्याहून कमाविसदाराची लिहिली आली. तुम्ही त्या प्रांती याच मनसब्याच्या राजकारणास गेला आहा. श्रीमंत छ २० जिल्हेजी गलबतात बसोन गेले, तेव्हा या गोष्टीस आठ दाहा दिवस जाले. तुम्हास वर्तमान कलोन इकडे लिहून पाठविलेच असेल परंतु जासुदाचा निभाव होऊन आम्हापासी पावले नसतील. याजउपरी श्रीमताची बातमी पुरती सुरतेस पावलेयाची बारकाईने लाऊन मुजरत जासूदजोडी समागमे आम्हाकडे लिहून पाठवणे. दुसरे वर्तमान राजश्री साबाजी भोसले व मुधोजी भोसले यांची लढाई नागपुरानजीक होऊन मुधोजी भोसले याचा मोड जाला. दोन हजार गाडदी कापून काढिले. महमद इसफ यास पाच जखमा लागल्या. मुधोजीची फौज सिकस्त होऊन मुधोजीस धरून आणून आंबारीत घातला आणि आंबारी साबाजीबावा याणी आपले आंबारीजवल आणून पाव कोस पावेतो सोबती बाजवीत माघारे गेले, तो मुधोजी भोसले याचे कमरेस पिस्तुल होते ते काढून साबाजीबावा याजवरी गोल्या चालऊन ठार मारिले. यााप्रा दगा केला, तेव्हां सहजातच फौजा साबाजीच्या पलाल्या. हे वर्तमान नवाबास कलताच सटवाजी

भोसले यास पत्र पाठऊन आपणापासी बोलाऊन आणिले व आपणहि आलजपुराहून कूच करून पुढे गेले. तमाम साबाजीबावाकडील सरदार होते त्यास कौल पाठऊन आपणापासी आणून सात आठ हजारपावतो जमा केले. त्याजबराबर जावितजंग यास देऊन मुधोजीवर रवाना केले. त्याचा पाठलाग चादेपावेतो खामखा करावा याप्रा नवाबाचा मनसबा आहे. तमाम साबाजी भोसल्याचे लोक होते त्यास वराड प्रांती भोसल्याचा मुलूक होता तो जागीरसुधा सरंजाम करून देऊन आपले फरमाने करून दिल्हे आणि पाठ थोपटन सागितले की मुधोजीचे पारपत्य चागले करावे. याप्रा नवाबानी करून आपणहि त्याच प्रांती आहेत. साबाजी भोसले याचे वर्तमान श्रीमतास कलल्यावर सुरतेहून मुधोजी भोसले याजकडे नाना प्रकारे राजकारणें करून कागदपत्र खेलवितील, खटपट करावयास चुकणार नाही. परंतु नवाब वराड प्रांती असल्यास राजकारणेहि केली तर तरी तूर्त येणे जाणे कलतच आहे, परंतु प्रेत्नास चुकणार नाहीं. तुम्ही जागा जागा वाटाच्या नाकेबंद्या असतील त्याची चौकशी राखोन कागदपत्र न जात याप्रा बदोबस्त करून बारीकसारीक वातमी राखोन वरचेवर वर्तमान लिहून पाठवीत जाणे. राजश्री गोविंदराव गायेकवाड व खंडेराव गायेकवाड याजकडील सलूकाचा प्रकार राजश्री आपाजी गणेश याजकडून लागोल(ग) कागदपत्र गेले आहेत परंतु आद्याप उतर आले नाही. गायेकवाडास व आम्हास पनासा कोसाचे अंतर आहे. राजश्री वामनराव व रास्ते व आणखी पथके मिलोन दाहा पधरा हजार फौज पुढे खंबायेताकडे रवाना केली आहे. तुम्ही गेल्यापासून पाच सात पत्रे पाठविली आहेत पावली असतील. श्रीमंत सुरतेस राहिले तर तिकडे दंगाच आहे, त्यापक्षी तुम्ही बहुत सावधपणें सुरत भडोचचा बंदोवस्त करावा. वर्तमान लिहीत जावे. पुण्याकडे ल्याहावें. मुंबईहून कांही सरजाम सुरतेस आला की काय ते ल्याहावे. साराश सावध असावे. इकडील गुता उरकता तर आम्ही सुरत प्रांती येतों, परंतु गायकवाडचे होय नाही कलल्याखेरीज कसें करावे? जलदी करावयाची ती करीतच असो. श्रीकृपेने घडेल तें खरें. साष्टी वसईकडील वर्तमान कलत जाईल ते लिहीत जावे. तुम्ही बदोबस्त कसकसा केला ते ल्याहावे. राजश्री गणेशपंत पेठे सरसुभेदारांकडील यास ऐवजाविसी लिहिले होते त्यास काहीं तर्तूद केली की काय तें ल्याहावे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant writes to Naropant full details of the flight of Raghunathrao from Cambay to Ghoga and from thence to Surat and of the fight between Mudhoji and Sabaji Bhosle and warns him to be always careful and circumspect since the troubles were on the increase. The letter is important for the full details it contains.*

6068

No. 160] [4-3-1775

पौ छ ६ मोहरम खमस
सबैन फालगूण मास

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता छ १ मोहरम मुा नजीक कपडबंद जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेस दाखल जाले. याप्रो पत्रे राजश्री बालाजी खंडेराव व बालाजी धोंडदेव व बहिरोपंत व गणेश हरि यांची छ २६ जिल्हेजची आम्हास व तुम्हांस आली तीं छ २९ मिा पावली. दोन्ही पत्रे वाचून पाहिली. वर्तमान कलले. डुमस पाा सत्रागांव येथे खुसकीस येऊन मुकाम केला. श्नान संध्या करून दुध प्राशन केले. वरकडानी भोजने केली. इग्रजानी भांडीकुंडी पाठविली. हजार माणसाची चौकी इंग्रजाची आहे. मेस्त्र गंभीर भेटीस गेला होता. बहुत खुसीची बोलणी जाली. शहरांत येणार, परंतु मोगल इंग्रजास म्हणतो कीं माझे घरास अरिष्ट आणू नको; त्यावरून मुंबईस इंग्रजानी पत्रें पाठविली आहेत. जाव येईल त्याप्रो मुबईस जातील अगर येथे राहातील. इकडे फौज पांच हजार येती तर फैसला होता म्हणोन लिहिले होते. त्यास पहिली फौज त्या प्रांती आहे व तुम्ही फौज घेऊन गेला ते पावलाच असाल. तुम्ही जा तोंपर्यंत खुसकीस असेल तर पांच हजार फौज तुम्हाजवल आहे. निकड करावी. शहरांत गेले आसिले तर बंदोबस्त करावा. सुरतकर मोगलास ही गोष्ट मानली नाहीं असे लिहिण्यात आहे. त्यास मोगलाचे मानस आपल्याकडे मिलावें असें असल्यास त्यासी संधान लावावे. सरकारचे पत्र मोगलास द्यावी. पत्रांत इतकेंच लिहिलें आहे कीं, तुमचा श्नेह पहिल्यापासून सरकारांत चालत आला आहे. दादासाहेब तेथे आले आहेत, चिंता काय? आपलेच घरीच आहेत, अटकाव करून ठेवणे, असे लिहिले आहे. तुमचे विचारास आल्यास द्यावें. नाही तर ठेवावे. पांच हजार फौज तुम्हाजवल आहे व तुमची तर्तूदहि अधिक आहे. त्यास ज्या गोष्टीने सरकार काम होय ती गोष्ट करावी. जर श्रीमंत सुरतेत राहिले तर बंदी करावी. आम्हास वर्तमान लिहून पाठवावे. दुसरी फौज पाहिजे तर पाठऊ. आम्हास इकडे गायकवाडाचे कारभारामुले गुता आहे. हा उरकल्यावर आम्ही तिकडे येतो. पुण्याकडे वर्तमान वरचेवर लिहीत जावे; आम्हास लिहीत जावें. भडोच

सुरतची बंदी करावी. जितकी तर्तूद होईल त्यास तुम्ही चुकणार नाहीं. खातरजमा आहे. बहुत काय लिहीणें लोभ असों दीजे हे विनंती.

*¶Haripant asks Naro Anandrao to watch the movements of Dadasaheb and not allow him to escape. He also asks him to induce the Mughal Governor of Surat not to give shelter to Dadasaheb there.*

---

*No. 161]* *[9-3-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामींचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ६ मोहरम मुकाम नजीक कपटबंद जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. राजश्री माधोजी नानासेट आमोदकर याणी आम्हास पत्र लि। की राजश्री नारोपत नाना यास आम्हाविसी पत्र पाठवावे त्याजवरून तुम्हास लि। आहे. त्याणी पेशजी तुम्हाकडे पत्र व कारकून पाठविला आहे. त्यास ते सागतील त्याप्रमाणे त्याजकडील कामकाज करीत जाणे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

*¶Hari Ballal to Naro Anandrao recommending to his notice one Madhoji Nanaset of Amod.*

---

*No. 162]* *[9-3-1775*

पौ छ १४ मोहरम
सन खमस सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामींचे सेवेसी.

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ ६ मोहरम मुकाम नजीक कपडबंद च्यार कोस जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही गेल्यापासून पत्र येत नाही व आम्ही दोन च्यार पत्रे पाठविली त्याचेहि उतर येऊन काहीच तिकडील वर्तमान कळत नाही. ऐसियास प्रस्तुत तुम्ही कोठे आहा, तिकडील वर्तमान काये? श्रीमंत कोठे आहेत? हे सविस्तर ल्याहावें.

तिकडील बंदोबस्त कसकसा केला हे कलावे. इकडील वर्तमान तरी राजश्री गोविंदराव व खंडेराव गायकवाड पुढे येडुरास गेले होते तेथून राजश्री आपाजी गणेश याचे मारूफातीने येत आहेत. येथून तिसा कोसावर आले आहेत. तेथून त्याणी कुसाजी सिंदे व खंडे आवजी यास रवाना केले आहेत ते आज येऊन पोहचतील. आलियावर तह ठरेल त्याप्रों लेहून पाठऊ. तुम्हाकडील काहीच वर्तमान कलत नाही याजकरिता मुजरद कासीद जोडी रवाना केली आहे. त्यास तुम्ही तिकडील व पुण्याकडील व साष्टीकडील सविस्तर ल्याहावे. श्रीमंतानी सात हती व शे दीडशे घोडे वगैरे काही सरंजाम भावनगरास टाकून गलबतात बसून सुरतेस गेले म्हणोन कलले, त्यावरून राजश्री वामनराव बाबा फौजसुधा भावनगरास गेले. सरजाम हातास लागला तरी घेऊन लवकरच येतील कलावे. तुम्हाकडील दिनचर्येचे वर्तमान कलावे याजकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal from Kapadwanj to Naropant inquiring where he was and how he was faring and informing him of the intended meeting of the writer with Govindrao Gaikwad.*

---

*No. 163*] [*10-3-1775*

पौ छ ९ मोहरम

**श्री शंकर**

**श्रीमंत राजश्री नारोपंत नाना**

**स्वामीचे शेवेसी**

सेवक राजाराम खंडेराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ७ मोहरम मुाा कसबे बलसाड जाणोन स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीचे आगमन सुरत प्रांती जाले. यैकून परम समाधान जाले. पारचोलचे मुकामीहून पत्र पाठविले ते प्रविष्ट जालेच आसेल. पत्रोतरी पाठऊन सांभाल केला पाहिजे. यानंतर साष्टीकडील वर्तमान तरी प्रथम दिवस आहे. राजश्री विसाजी केशव चिरंजिवाचे लग्नानिमित्य पुणियास गेले आहेत. धारावीचे बुरजास इग्रजाने काम लाविले आहे. वसईचे बरोबरीस काम आणून मारगिरी करणार. दोह चौ रोजी पांच सात गोले टाकितो. विशेष लागू नाहीत. याप्रों वर्तमान आहे कलावे. सुरतकराचा वकील भांजगडीस आला आहे म्हणोन यैकिले. त्यास बलसाडचा तह करून घ्यावा, दरसाल पांच हजार रुा आहेत त्याप्रमाणे घ्यावे यैसा करार यादीत आणावा. मौ सारोली पो सत्रागाव येथील तह ताा

राजश्री कोनेरपंत आबा सांगतील त्याप्रो करारात आणावे. आपणाकारणे सेवगियाच्या सेगा सुमार ९० पाठविल्या आहेत, प्रा होतील. आम्ही आपले पदरचे कुटुबातील जाणौन कलल तैसा सांभाल करावा. बहुत काय लिहिणे कृपेची वृधि करावी हे विनंती.

¶*Rajaram Khanderao supplies news about Balsad, Salsette, Dharavi and other places in Konkan.*

---

*No. 164*] [*10-3-1775*

**श्री**

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे
सेवेसी

पोष्य हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ७ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. हरिभक्ती याजपासून मालव्यांत आलो तेव्हां दोन लक्ष रुा घेऊन आपणावर चिठी दिली. कारण समयास यांणी ऐवज दिला. आपण देतील असे समजोन सावकाराची खातरजमा करून चिठी दिली, परंतु ऐवज पावला नाही म्हाणौन सांगितले. त्यास येथील वोढीचा प्रकार आपणांस ठाऊक आहे. राजांत सावकाराची मिनत करावी लागते. खर्च भारी कसे करावे. सर्व प्रकार आपले ध्यानात आहेत. आमची पत राखणार आपण आहेत. चिठीप्रो ऐवज पावे, याचा बोभाट न ये ती गोष्ट करावी. आपले भरोशावर बेफिकीर आसो बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Hari Ballal to Naropant Keskar asking him somehow to make payment to Hari Bhakti of the loan which he unhesitatingly gave when it was most urgently wanted.*

---

*No. 165*] [*14-3-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पो हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ११ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ४ मोहरमचे पत्र

वराशाचे मुकामचे पा ते छ १० रोजी सायंकाली पावले. लिहिले वर्तमान सविस्तर कलले. श्रीमंताकडून कुकाजी सिवराम आले होते त्याणी बारा सरदारांचीं नांवे लेहून दिल्ही आहेत. याणी पत्रे लेहून देऊन आम्हास न्यावे. करार प्रो अर्थ घडोन आल्यास आमचे जिवाचे सोबती व्हावे असे भाषण जाले म्हणोन लिहिले व नावनिसीची याद पा ती पावली. त्यास सरदारानी पत्रे लेहून देऊन न्यावे असे म्हणतात, त्यास नेऊन करावे काय? द्यावे काय? हे काहीच नाही. मोघम लिहिले यांत काय समजावे? कुकाजीपंताचे भाषणांत आले नाहीं. आले नासिलें तर बोलण्यात काय हे मनास आणावें. दाहा लक्षाची जागीर द्यावी. गंगातिरी राहावे. फौज जवल असणे ती आमची असावी, तो प्रकार जाला नाही. आतां जागीर देणे तर पांच लक्षांची निखालसपणें राहिले तर द्यावी ही गोष्ट मनांत ठेऊन त्यांचे बोलण्यांचा भाव काढून लेहून पा. सरदारानी पत्रे पाठवावावी म्हणोन लिा त्यास श्रीमंतानी कसे वर्तावे हा आशय कलल्यावर पत्रे लिहून द्यावयास येतील. पुर्ते मनास आणून लिहिणे. श्रीमंतानी हजार पंधराशे माणूस इंग्रेजाकडील जमा केले आहे व मुबईहून दोन अडीच हजार माणूस तोफा आल्या. येथे जमाव पाडून बाहेर निघावे, छापा घालावा या उद्योगात आहेत. आम्ही सावध असो. फौज दाहा पंधरा हजार पुढे लौकर पाठवावी. तिकडील गायकवाडाचा गुता उरकून आपण लौकर यावे म्हणौन लिा. त्यास ते जमाव करितील. राजकारणे करतील. छापा घालावयास चुकणार नाहीत. तुम्ही सावधपणे असावे. बातमी चहूकडील राखावी. फौज पाठवावयाचा प्रकार तर उभयतां गायकवाडांची समजावीस करावी तर खंडेरायाचे सुधे आहे. गोविंदराव निमे वाटणी मागतात यास काय करावे? सोडता नये, धरता नये, असे प्राप्त जाले आहे. बोलतच आहो. प्रसंगानरूप जसे ठरेल तसे करून भेटीस बलावयाचे करितो. हे खूल ठेवणे ठीक नाही. जसें म्हणतील तसे ऐकून इकडील खूल मोडतो. बामनराव भावनगराकडे गेले आहेत ते तिकडे आहेत, लौकर येण्याविसी पत्रे पा आहेत येतील. तुम्हाकडे फौज लौकर रवाना करितो. मुधोजीकडे श्रीमंतांची पत्रे गेली आहेत त्यास या काली मुधोजीनी यांची कुमक करावी असे दिसत नाहीं. श्रीमंत बापूची पत्रे येतात त्यांत नबाब व मराठी फौज साबाजीकडील येकत्र होऊन तमाम वराडांत ठाणी घातली. मुधोजीजवल जमाव फार नाही. त्याचे पारिपत्य करणार असें आहे. त्यापक्षी मुधोजीस आपली गाड साभालतां पुरे होईल. तुम्ही लिहिले की नबाब भागानगराकडे गेले ही गोष्ट प्रमाण नाहीं. वरचेवर पुण्याची लिहिली

येतात की नबाबानी जमाव चांगला केला. मुधोजीचे पारपत्य करतात असें असतां भागानगराकडे गेले असे कसे होईल? श्रीमंत गपा उठ (अपूर्ण)

¶*Hari Ballal to Naro Anandrao discussing the terms of an agreement with Raghunathrao and asking him to ascertain definite details of those terms and cautioning him against a surprise attack.*

---

*No. 166*] [*15-3-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे शेवेसी

पो कोंनेर रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १२ मोहरम मु॥ मौजे बलसाड नजीक ठाणे सचीण पा। सत्रागाव जाणून स्वकीये कुशल लेखन करावे विशेष. आज छ मजकुरी दोन प्रहरा आम्हाकडील ग्रहस्त डुमसेहून आला. श्रीमंत कूच करून गेले. रा। गोविंदराव गाइकवाड यासी सामील व्हावे हे वर्तमान आहे. दुसरे बडोदियासी जाणार. तिसरे वसईस जाणार याप्रमाणे आवई आहे. खरखोटे न कले. इंग्रजास आठाविसीच्या सनदा करून दिल्ह्या. सुरतेची चौथाई काकोबा परभू यासी सनद करून दिल्ही. येणेप्रमाणे वर्तमान आहे. आम्ही आपले ठाण्यास यावे किंवा कोठे आसावे हे ल्याहावे. तुम्ही नजीक असल्यास आम्ही ठाण्यास जाऊ. नाहीतर आमच्याने ठाण्यात राहावत नाही. कारण की, सुरतेचे नजीक, रात बिरात दगा करितील. दोन च्यारसे स्वार नेहमी तुम्हाकडील नवसरी रस्त्यावर चौकी राहील तर आम्ही ठाण्यात राहू. याचा विचार काय तो लिहून पाठवावे. बहुत काये लिहिणे कृपा वृ(धी) कीजे हे विनती.

¶*Koner Raghunath sends news to Naro Anandrao about the movements of Raghunathrao.*

---

*No. 167*] [*15-3-1775*

श्री

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गो। यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ खमस सबैन मया व अलफ तुम्ही छ ४ मोहरम व छ ५ मोहरमचे पत्रे पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान

विदित जाहाले. तुम्ही लिहिला मजकूर तूर्त काही करावयाचा नाही. आपली खबरदारी करून सावधगिरीनें राहाणे. तुम्हापासी कोणी बोलावयास म्हणून येईल तो तुमची बातमी घेऊन जाईल अगर लेहून पाठवील, याकरितां सावधगिरीने राहाणे. सुरतेपासून दोन तीन कोसावर मुकाम करून राहाणे. हरिपंत तिकडून आलियावर बनेल तसे केले जाईल. तूर्त सुरतेची व भडोचची बंदी चांगली करणे. जाणिजे छ १२ मोहरम

¶*The Peshwa asks Naro Anandrao to encamp near Surat and to continue the blockade of Broach and Surat. He is further asked to allow no news to be filtered to the enemy.*

---

*No. 168*] [*15-3-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १२ मोहरमपर्यंत मुा नजीक कपटबंद प्रां गुजराथ वर्तमान येथास्थित असो विशेष. सुभानजी नाईक याजबारार पनास जासूद तुम्हाकडे पाठविले आहेत. त्याचे रोजमरेयाची याद आलाहिदा पाठविली आहे. येक रोजमरा येथे दिल्हा आहे. पुढे दीड माही भरल्यावर यादीप्रो रोजमरा तेथे द्यावा आणि कामकाज घेत जावे. बंदोबस्त चांगला करावा बहुत काय लिहीणे लोभ कीजे हे विनती.

¶*Hari Ballal sends fifty messengers to Naropant Nana and asks him to remunerate them according to their service.*

---

*No. 169*] [*16-3-1775*

पौ छ २० मोहरम खमस
सबैन फाल्गुण मास गुरु-
वार सायंकाल.

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पा ते पावले लिहिले वर्तमान कळले. बारा जणांची नावनिसी पा ती पावली त्याचे उतर पा आहे, ते पावलेच असेल. चांगोजी

---

\+ पत्र हरिपंत तात्याचें.

कदम यांस फौजसुधा तुम्हाकडे पा। आहेत, पावतील, काल येथे वर्तमान ऐकिले की सुरतेतून तोफा व पायचे माणूस बाहेर निघाले. तुमची त्यांची गाठ पडली. तुम्ही हटून आठ कोस माघारे गेलेस त्यावरून चिंता लागली आहे. लिहून पा। चांगोजी कदम याजबा। सुभानजी नाईक व पंनास जासूद पा। आहेत. आम्हास बातमी कलविणे व तेथील बदोबस्त करणे यास उपयोगी पडतील. वामनराव भावनगराकडे गेले. तेथे सात हतीं व पाऊणसे घोडे हाती लागले. त्यास येथे बलाविले आहे. लौकरच येतील. उभयतां गायकवाडाचे कारभारी आले. त्यांसी खातरजमेचे बोलणे बोलून भेटीस आणावें असे केले. पत्रे गेली येतील. भेट जाल्यावर कांही फौज इकडे ठेऊन आम्ही तुम्हाकडे येतो. वर्तमान वरचेवर लिहीत जावें. बहुत सावधपणे असत जाणे. देशातील कोकणांतील वर्तमान कलेल ते लिहीत जावें. रा। छ १३ मोहरम, बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal inquires of Naro Anandrao details of a fight which the latter had with Raghoba's troops. He also informs him that the Vakils have been sent to him by the Gaikwad.*

---

No. 170] [18-3-1775

पौ छ १९ मोहरम दोन
प्रहर सन खमस सबैन पत्रे.

**श्री २**

[पहिला बंद गहाळ.]

पुा। राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी वीत असतील असो. कसेहि असले तरी इकडील गुता उरकून लौकर येणे प्राप्त आहे. येतो. पुढे फौज पाठविता. तुम्ही सावध राहात जावें. येथून पनास जासूद व जासूद नाईक तुम्हाकडे रा। करितो. बातमी व नाकेबंदी करावी. बातमी चागली राखावी. ही मोठी गोष्ट आहे. सरदारानी निरोपाचे लाविले आहे. काय करतील पाहावे. काल फतेसिगाकडे वर्तमान आले की सु(रते) तून तुम्हावर छापा घालावयास लोक आले होते. तुम्ही मारून काढिले व कुकाजी सिवराम बापूकडे गेले. तुम्ही लिहिले नाहीं. त्यास दिनचर्येचे वर्तमान आम्हास लिहून पाठवीत जावे. श्रीमंत बोलतात वगैरे वर्तमान तेथे आढलत जाईल ते पुण्यास डाकेवरावर लेहून पाठवीत जावे. बहुत काय लिहिणें लोभ

असो दीजे. सुरतेत कागदपत्र बाहेरील माणूस जाईल याची चौकसी पुर्ती करावी. कांही पायाची माणसे ठेऊन बाहेरील नाकेबंदी केल्यास कागदपत्र जाऊ पावणार नाहीं. हे विनंती.

¶*Haripant to Naro Anandrao writing that he would soon be coming to him and asking him to supply him details about the skirmish which he had with troops from Surat. He advises him to communicate to Purandar every now and then news about Dadasaheb.*

---

*No. 171*] [*19-3-1775*

**श्री**

...ार बल

ां तुम्हीहि पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

...ंता माहालचा...साष्टीकडील वर्तमान व फरासिसाकडील वकील पुरंदरी नेऊन विन...

त्यासी राजक...र... केले. वसईस दोन वेला इंग्रजाने मारगिरी केली. त्यास किल्यांतून सरंजाम बाहेर निघोन लागू होऊ दिल्हे नाहीं. इंग्रजाची गलबते माघारी गेली. खर्चाचे वोढीचा प्रकार लिहिला तो कलला. त्यास तुम्ही गेल्यावर फौजेस येक रोजमरा मोठे प्रेत्ने करून वाटिला. पैशास ठिकाणा नाहीं. श्रीमंत खंबाइतास आले तेव्हा फिरून मसलत पडली असे दिसते. ऐवजाचा सजकूर श्रीमंताकडे लिहून तेथून तर्तूद करून आणावी. गायकवाडाचे फौजेस पोटास नाही. उठून जातात म्हणौन लिा. त्यास तुम्ही जातेसमई खर्चाचा प्रकार गायकवाडास पुसून घेतला असेल. माहालचा वसूल घेऊन द्यावा. तुम्ही लिहिले की दोन चार दिवस ज्वर येत होता, आता आरोग्य आहे म्हणौन लिा ते कलले. सुरतकर मोगलास तूर्त पत्र ल्याहावयाचे प्रयोजन नाही म्हणौन लिा ते कलले. चहूकडे अडचणीचा प्रकार दिसतो, ईश्वर प्रात लावील तो खरा. पुरंदराहून पत्र आले होते कीं दाहा हजार फौज देसी पाा. त्यास इकडे असा प्रसंग तेव्हा फौज कसी पाठवावी. असो, होईल ते खरे, पत्र पाठवित जावे. राा छ १६ मोहरम हे +विनंती.

¶*Haripant gives instructions to Naropant on the points referred to him, pertaining to the movements of Dadasaheb, the attitude of Gaikwad and the payment to the armies.*

---

\+ पत्र हरिपंताचें.

6077

No. 172] [20-3-1775

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत

नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १९ मोहरम जाणोन स्वानंद लेखन करावयास आज्ञा केली पाा विशेष. स्वामींनीं कृपा करोन पत्र पाा ते पावले. लिाा वर्तमान कळले. पाा वसराई येथे हरयेकविसी आमच्याकडून उपसर्ग लागतो म्हणोन यैकिले. यैसियास पाा मारास येकदर उपसर्ग न लागे ते करणे म्हणौन आज्ञा. त्यास आम्हाकडून उपसर्ग वसराईकडे कोणी येक माणूस जात नाहीं. वसराईचे गावचे भील येऊन हासोट पााचे गाव व पाटील ठार मारला हे वर्तमान पेशजी आपणास लिाच आहे. या- प्राा तिकडून दंगा या दोही महालास होतो आणि आपणाकडे कोणी जाऊन खोटे वर्तमान सांगोन आपण पत्रे लिहीतात तरी हे वर्तमान आपण, *fight which* आम्हास बोलाऊन याची वाजीपुसी करावयाची सेवेसी उचित आसे. *that the V*... काय लिहावा, सर्व तिकडील इकडील वर्तमान सेवेसी विदितच आम्हांकडून कांही वसराई पोायात माणूस उतरत नाही आणि आमचे [illegible]णूस वेकैदी नाही. त्याकडीलच भील रोज उठोन दंगे करितात. येविशी मुदे परभारे रतनपूरकर पुंजाजी वाघेला यानीच पाा वसराई येथिल बरेदराव, भरण व दिणोद या तिही गावांस मागहि नेऊन लाविले आहेत आणि त्यांचे मुदेहि शाबूत आहेत. यैसे असोन तेच पत्रे धमकावणीची लिहीतात व आपणहि आज्ञापत्र पाो सिरसा वंद्य आहे. परंतु याचा विचार आपणच मनास आणावा. रतनपूरकर पुजाजी वाघेला याजकडे आम्ही त्याजकडेच माग लाविला. माग नेऊन बाजिनस तेथील पत्रे पाो आहेत. ती पेसजी बजिनस पोचहली, आपण पाहिलीच आसतील. कळावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*On being asked to stop plundering the province adjoining Vasrai from whence complaints were made to the addressee by the ryots, Naro Ganesh explains that it was the Bhils and not his men who were responsible for the harassment of the people.*

---

No. 173] [21-3-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुाा खमस सबैन मया व अलफ. राजश्री गोपाळ नाईक तावंवेकर यांजपासून सरकारांतून तुमचे मारफतीने फौज-

ठेऊन राजश्री फतेसिंगराव गायकवाड याचे कुमकेस तुम्हाबरोबर फौज देऊन रवाना केले. त्याप्रमाणे त्या प्रांती तुम्ही जाऊन आमल बसविला. रेवा उतर तीर भडोच निकोरेसुधा व सिनोर व कोरेल व राजपिंपले व दक्षणतीर सोनगड-पावेतो दरोबस्तदेखील सुरत आठाविसी येथील सरकारांतून जती तुम्हाकडे सांगितली आहे. तरी फौजेचे देणे व सरकारचे कितेक लढे गायकवाडाकडून उगऊन येणे. सबब सदरहू माहालची वैवाट सरकारतर्फेने गोविंद वासुदेव याचे गुजारतीने करणे. राजश्री गोविंदराव गायकवाड याजकडे वसूल काय पडिला व फत्तेसिंगराव याजकडे काय पडिला व फौजेस काय पावले, माहाली बाकी साल मज-कूरपैकी काय येणे, फौजेचा पैका काय देणे हा अजमास समजोन लेहून पाठवणे. फतेसिंगराव याजकडून वराता जाल्या असतील ते मना करविल्या आहेत. दिकत पडणार नाही. वरातदार दिकत करतील तर त्याचे म्हटले न आइकणे. येविसी रा। हरि बलाल यांस लि। आहे. तेहि तेथे सागोन निवारण करितील. येवि[illegible] तुम्हीहि त्यास लिहीत जाणे. गायेकवाडाकडे सरकारचा यैवज येणे [illegible] महालचा बंदोबस्त करून यैवज जमा करणे; जाणिजे छ १८ मोहरम आज्ञा [illegible]

¶*The Pe[illegible]a appoints Naro Anandrao to administer the Surat province and asks him to recover arrears from Fatesing Gaikwad.*

---

*No. 174*] [*23-3-1775*

पौ छ २६ मोहरम फालगून
मास खमस सबैन.

**श्री**

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गो यांसी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ खमस सबैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र छ १२ मोहरमचे पाठविले ते छ १९ तारखेस प्रविष्ट जाले. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेहून जलमार्गे भडोज खबाईताकडे गेले. समागम इंग्रजाने लोक वगैरे सरंजाम दिल्हा आहे. येविसीचे बातमीचे वर्तमान लिहिले ते सविस्तर विदित जाले. राजश्री हरि बलाल यास व वसईस वगैरे जागा बातमी लिहून पाठविली. उतम केले. याउपरीहि तीर्थस्वरूपाकडील बातमी वर्तमान लिहीत जाणे. गायकवाडाकडील फौजबंदी पुरती आहे, आम्हास आज्ञा होईल

तर येऊ, येकिसीचा व खर्चाचे आडचणीचा प्रकार लिहिला. त्यास तुम्हास तेथून येता नये. तूर्त तेथेच असिले पाहिजे, तरी यावयाचे येकंदर न करणे. सुरतचे मोगलाचा व इंग्रेजाचा ऐवज नेमणुकेचा माहाली आहे तो बेजरब वसुलात आणून खर्चाकडे लावणे. छ ९ मोहरमचे वगैरे येक दोन पत्रे बातमीची पाठविली तीहि पावली. मुंबईसहि आल्याची बातमी इकडून आली. तथ्य कोणती होईल पाहावी. जाणिजे छ २० मोहरम आज्ञा प्रमाण.

¶*Naro Anandrao is asked not to leave the place but keep on watching the movements of Raghunathrao who is reported to have reached Bombay.*

---

*No. 175*] [*23-3-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत

नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २० मोहरम जाणौन स्वानंदलेखन करावयास आज्ञा केली पा। विशेष. मौजे जालंदी पा। आकलेश्वर येथील गुरे आपले लस्करात गेली आहेत. पाटील मा।र याणी वोलखली. त्यास पाटील व येथून माणूस दिल्हा आहे तरी कृपा करून गुरे सोडून देवावी. पाटलानी वोलखली आहेत. पायगुडे याचे लस्करात आहेत. ती मा।रनिलेस सांगून सोडून देवावी. बहुत विस्तार काये लिहिणे, लोभाची वृधि केली पा। हे विनंती.

¶*Naro Ganesh to Naropant Keskar requests cattle being released which had been captured and kept confined.*

---

*No. 176*] [*25-3-1775*

पौ छ २६ मोरम खमस
सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पोष्य हरि बलाल कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २२ मोहरम मु।। खेडा येथे येथास्थित असे विशेष. तुम्हाकडील छ ८ मोहरमचे

ता. ............
ता. जे.

पत्र आले होते त्याज आलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही हे अपूर्व आहे. इकडील वर्तमान तरी श्रीमंत खबाइतास आहेत. लढाईची तरतूद करीत आहेत. येथून वीस कोश आहे. राजश्री वामनराव भावनगराकडे गेले होते ते माघारे आले. श्रीमंत सुरतेस जातेसमई घोडी व हाती तेथील राज्यापासी ठेऊन गेले होते, ते घेऊन आले. उदईक येथे दाखल होतील. उभयेता गायकवाड याजकडून खंडो आवजी आले हे वर्तमान पेशजी लिा होते त्याजवरून कललेच असेल. साप्रत त्याजकडे निखालस्तेची पत्रे पाठविली त्याचे प्रतिउतर आद्यापि आले नाही. येका दो रोजात येईल. तुम्ही कोणे जागा आहा वर्तमान काय हे काहीच लिहिले नाही यावरून अपूर्व वाटले. सुरतेचे व भडोचेचे बंदीचे काय केले, तिकडील वर्तमान काय ते लिहीले पाहिजे. तुम्ही दिनचर्येचे वर्तमान लिहावे असे असता पंधरा दिवस कागद नाही यावरून काय समजावे? इकडील प्रकार तर उभयता गायकवाड भेटणार, त्यांचा अद्यापि येक प्रकार नाहीं. काय भेटतात किंवा श्रीमंताकडे जातात हे काही समजत नाहीं. तूर्त लाबणीखाली गोष्ट पडली आहे. श्रीकृपेने घडेल ते खरें. सुरतेहून श्रीमंत सरजाम घेऊन निघाले. त्यास गोरा किती व वरकड गारद किती, तोफा वगैरे सरंजाम काय, पुस्तपन्हा कसकसा करणार, खर्चाची तजवीज काय केली, जो पैका लागेल तो इंग्रज देणार किंवा श्रीमंत जवाहीर देऊन घेणार, याचा मुली मनसुबा कसकसा जाला आहे याचा शोध सुरतेत करून कचे वर्तमान लिहून पाा. देशचे वर्तमान नवल विशेष आढलत जाईल ते लिहीत जावे. आम्ही कसकसे करावे ते सुचवावे. मुख्य गोष्ट दररोज येक पत्र तुमचे यावे ते येत नाही ये गोष्टीचा अचंबा आहे. वरचेवर लिहीत जावे. बहुत काय लिहीणे; लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant reprimands Naro Anandrao for not sending him constant communications about the movements of Raghunathrao, the English and the blockade of Surat and Broach. He informs him that the attitude of the two Gaikwads is not yet decided.*

---

*No. 177*] [*29-3-1775*

पौ छ ८ सफर मुा ना
काा उरपाड डाकेबराबर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २६ मोहरम मुकाम कोतरा नदी नजीक खेडे कोस च्यार. येथास्थित जाणौन स्वकीय

कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही कसबे कामरेज तापीतीर येथील मुकामीहून पत्रे येणे प्रा

१ छ ९ रोज
१ छ ११ रोज
१ छ १२ रोज
१ छ १६ रोज

येकूण सदरहू तेरखाची मोहरमची पत्रे पाठविलीत तीं छ २९ मिनहूस पावली. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेस आले, तेथून मुमईस पत्रे पाठविली. उतर येईतोपावेतो इकडे आम्हाकडे राजश्री कुकाजी सिवराम यास पाठऊन सलुकाचा सदर्भ लाऊन बारा सरदार दरम्यान घ्यावे याप्राा बोलणे लाविले आणि आंतरयामी दोन च्यार हजार इंग्रज व गाडदी व तोफा याप्राा जमा करून छापाहि घालावयास सांगितले. छापा आला तो आम्ही राखोन सावध होतो. साभाळून निघोन गेले हा मजकूर याप्राा जाला. मुमईहून इंग्रजाने फिरगी व गाडदी व इंग्रज व तोफा वगैरे जंगी सामान रवाना केले ते येथे पोहोचताच भडोजेचे वगैरे माणूस मिळाले. आवघे पाचसात हजार व तोफा वगैरे सरजाम घेऊन वसईस जाणार असी आवई होती परंतु तिकडील मसलत राहोन खंबाइतास गेले आणि गायकवाड यास व त्याजकडील कारभारी आहेत त्यास पत्रे लिहून पाठविली की तुम्ही येकंदर सलूक न करावा, आम्ही खंबाइतास दाखल जालो, तुम्ही आम्हापासी येऊन पोहोचावे या प्राा जाले. सलुकाचा प्रकार राहिला. आपणाकडे गायकवाडाकडील कारभारी सलूक करावयाकरिता आले होते त्यास कोणेक प्रकारे समजूत पाहून गायकवाड आपले करावे म्हणजे गुंता लवकर उरकेल. तिकडील गुंता उरकून लौकर देशी यावे यात उतम. श्रीमंतानी इंग्रेजेयास पधरा लक्ष्याची जागीर देऊन सनदा करून दिल्या. तुम्हासी लढाई करून मग श्रीमतास पुणियात नेऊन बसवावे, च्यार हजार माणूस नेहमी जवल असावे, दरमाहाचा दरमाहा देत जावा. गोविंदराव गायकवाड याची व श्रीमताची गाठ पडली नाही तो गायकवाडाच्या भेटी होऊन फडशा करावा. नागपुराकडील वर्तमान साविस्तर पेशजी कललेच आहे. नवाब तिकडे आहेत मुधोजीचे पारपत्य करितील परंतु तो लाढाई समोर देणार नाही, देशी उपद्रव करील. कर्नाटक प्रांती धारवाडाकडे पालेगारानीहि काही उपद्रव माडिला आहे. तिकडे तूर्त फौजा पाठवावयास सोये नाही. हैदरखानहि बल्हारी वगैरे इकडे उपद्रव देत आहे. वसईकडील व साष्टीकडील मजकूर तरी आद्यापि काही सरकारचे मोरचे साष्टीस बसले नाही. धुलप व राघोजी आगरे व सिवाजी विठल व राजश्री विसाजीपंत दादा पाच सात हजार फौज व काही पायेचे माणूस याप्राा समोवते

6082

उतरोन राहिले आहेत. राजश्री विसाजीपंत लेले याणी वसईचा बंदोबस्त चागला केला आहे. श्रीमंत सुरतेस आले, याजकरिता आणखी दोन हजारपावेतो फौज आम्हाकडे रवाना करावी म्हणोन पेशजी लिा होते परंतु श्रीमत खंबाइताकडेस गेले तेव्हा मसलत तिकडे पडली. आम्हाजवल फौज आहे त्यास रोजमरा पाहिजे आम्हाजवल तो ऐवज नाही. पुरंदरास श्रीमंत राजश्री नाना व बापू यास पत्रे पाच सात पाठविली परंतु ऐवज पाठविला नाही. बंदी करणे म्हणौन मात्र पत्रे येतात. आपली मार्गप्रतीक्षा करीत आहे. खर्चाविसी काही उपाये चालत नाही. खर्चाची बेगमी जाल्यास महिनाभर राहावयास येईल. सरंजामी फौज दोन हजार इकडे पाठवावी व त्यासमागमे दोन तोफा सरजामसुधां पाठवाव्या. खबइताकडे सरकारच्या फोजा आहेत त्यास पत्रे पाठऊन आपणापासी आणवाव्या. रातबिरात छापा घालितील. सारांश प्रकार हाच की आपण तिकडील गुता उरकेल तसा उरकोन घ्यावा आणि देशी लौकर यावे म्हणजे सर्व गोष्टी ठीक होतलि. ऐसे कितेक प्रकारे तपसिले लिा ते अक्षरशा कलले. त्यास श्रीमंत सुरतेस गेले. इकडील गायेकवाडाकडील सलुकाचे राजकारण राजश्री आपाजी गणेश आम्हास येऊन भटले आणि गायेकवाडाकडे कारकून व पत्रे त्याणी पाठविली त्याजवरून गायकवाडाकडून राजश्री खडो आवजी वगैरे दोन तीन ग्रहस्त आले. उपरांतिक आठ च्यार दिवस बोलता बोलता राजश्री माहादजी सिंदे व तुकोजी होलकर याचे विद्यमाने ठराव होऊन कागदपत्र गेले. बोलण्याचा गुंता काही राहिला नाही. खडो आवजी व आणखी ग्रहस्त आले होते ते आम्हापासीच आहेत, परंतु अद्याप त्याजकडील कागदाचे उतर व तेहि आले नाही. खडो आवजी मात्र खातरजमा करितो की काही गुता पडणार नाही. करारप्राा येतील. परंतु कागद पाठविले त्याचे उतर नाही व तेहि समीप येत नाही व श्रीमतानी त्याजकडे पत्रे पाठविली, तेव्हा चितात आंदेशा करितात किवा श्रीमंताकडीलहि ग्रहस्त तेथे आहेत त्याणी अडथला त्याच्या येण्यास केला हे काही समजत नाही. बरे असो. आपल्ये तर्फेने जे करावयाचे ते करीत असावे. सिधीस नेणार श्रीगजानन आहे. राजश्री वामनरावबावा व रास्ते वगैरे फौजा भावनगराकडे गेल्या होत्या त्या आवघ्या छ २३ मोहरमी आम्हापासी येऊन दाखल जाल्या. राजश्री माहादजी सिंदे डाकोरास श्रीच्या दर्शनास गेले आहेत ते अद्याप आले नाही. पुढे लोणावाड्याकडे गेले. त्यासहि पत्रे लौकर येण्याविसी गेली आहेत येतील. खर्चास नाहीं म्हणौन जाण्याची उतावली कराल तर न करावी. आगेमागे खर्चास पोहचेल. गायकवाडाचे माहाल आहेत. सरकारचे आहेत. तजविजेने काम चालवावे. चांगोजी कदम यास

इकडे बलाविले होते. त्यास फिरोन लिहिले कीं नारोपंताकडे जाणे. त्यास तुम्ही व ते मिलोन सुरत भडोचची जफ्ती बंदी जरूर करावी. आम्ही इकडे आहो तजविजेस कमी करीत नाही. श्रीमंत खंबईताबाहेर येक डेरा देऊन दोन च्यार हजार माणूस समागमचे आहे ते घेऊन बसले आहेत. आपले फौजेची वाट पाहातात. आम्ही फौजसुधां मधी आहों, तेव्हां खंबइतास फौज त्यांची जाते कसी? गायकवाड आम्हाकडे येऊन मिळाले तर मग दिकत पडत नाही. आम्हास खर्चास नाही, मोठा पेच येऊन पडला आहे. प्रांत ईश्वर लावील तो खरा. तुम्ही तिकडे आहा यामुळें आम्ही स्वस्थ असो. उतावली न करावी. वर्तमान वरचेवर लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

राजश्री बालाजीपंत स्वामीस साां नमस्कार पत्र पाा ते पावलें वर्तमान लिहीत जावें हे विनंती.

¶*Hari Ballal to Naro Anandrao communicates the news about the negotiations carried on with the Gaikwads—Govindrao and Fatesing through Mahadaji Sindia. He also advises him to raise money from the Gaikwad's province for the maintenance of his army and to tighten the blockade of Surat and Broach with the help of Changoji Kadam.*

---

*No. 178]* *[March 1775 ?*

**श्री**

**राजश्री महिपतराव खवडे गो-**
**सावी यांसी**

৶ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो हरि बलाल आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. तुम्ही आम्हाजवल आला तेणेकरून बहुत संतोष जाहाला होता. हलीं तुम्ही गेला त्यामुले चितास परम वाईट वाटलें आहे. तुम्ही आम्हापासून जाऊं नये. सध्या दिवस वोढीचे आले आहेत. तुम्ही जाणतच आहां. तशांतहि तुमची सोय थोडी बहुत करून यादी पाठविली आहे. वरकड गोष्टी चितांत आणितां तुम्ही आले पाहिजे. तुमच्या करण्यास दुसऱ्याने कोणी सांगावे लागणार नाही. प्रसंग वोढीचा याजकरितां उपाय नाही. सर्वथैव पुढें न जावे. चाकरीच्या प्रसंगी तुमचे स्वरूपानरूप करून चाकरीची योजना घडेल. तुम्ही मोठेपणे असावे हीच इच्छा आहे. परंतु प्रसंग वोढीचा याजकरिता थोडे बहुतानें

च्यार दिवस गुजराणी करावी. श्रीकृपेने अनकूलता सर्व होईल. जरूर यावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal urges upon Mahipatrao Kavade the necessity of his presence in the army and assures him that he would try to meet his demand for funds as far as possible.*

---

*No. 179*] [*March 1775*

**श्री**

पु॥ राजश्री नारोपंत नाना स्वामीस +

विनंती उपरी. येथील वोढीचा प्रसंग आहे. तो काय लिहून? सर्वत्र असीच गत जाली आहे. तथापि आपण आम्ही येकत्र जालो असतां कांही तोड काढितो. परंतु येथून पाय निघेना. याजकरितां गुंतलों. लोकांची धरणी पारणी नित्य लागली आहेत. असो. श्रीमंतांचे प्रतापेकडून सर्व पार पडेल. श्रमाचे दिवस सर्वकाल राहाणार नाहीं. रास्ते येकीकडे वोढितात. कोणास बोलता येत नाही. ते तुम्हांत मिलोन असते तर आज सुरतेकडे गेला असता. असो जे आहे ते बरेच आहे. इतके दिवस तुंम्ही दम धरला तसा च्यार दिवस धरावा. माझी तुमची भेट जाल्यावर करणे तसे करू. गुजराथची बातमी पकी राखावी. मजकडे लिहीत जावी. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant asks Naro Anandrao to pull on somehow or other with the hard times which he assures will not continue long. The writer complains of the attitude of Rastia.*

---

*No. 180*] [*March 1775*

**श्री**

विनंती[१] विशेष. रा दौलतराव हरी[२] रा गोविंदराव गायेकवाड यासमागमे श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे निसबतीने बडोद्याचे मसलतीस, तेथोन रुसवा तलाबेमुले करून श्रीमंताकडस जावे या उदेश नर्मदा उ(त)रून तापीतिरास आले. पुढे श्रीमंताकडस जावे, त्यास दक्ष(ण) दिशेहून श्रीमंताचे पत्र माारनिलेस पहिले

---

\+ पत्र हरिपंताचें. १ पत्र गोविंद रघुनाथ व दताजी नारायण यांचें.

२ 'हरी' नको 'बाबूराव' पाहिजे लेखकाचा हस्तदोष आहे.

6085

आलेच होते तिकडस जावे, तों उतर दिशेस श्रीमंताकडेस चुलता सखाराम हरि आहेत त्यास प्रतिबंध होऊन येईल यास्तव दक्षणेस जाता नये. उत्तर दिशस जावे तर बाबुराव हरि दक्षणेस अटकस आहेत त्यास उपद्रव होईल यैसा प्रकार दौलतरायास घडला आहे. यास्तव उभयेता श्रीमंताचा प्रकार कसा घडोन येतो, तोंपर्यंत आठ पधरा रोज याच प्रांती दिवस काढावे. उपरांत ज्या पक्षी जाणे तिकडस जावे, यैसा विचार होता. त्यास आपण फौजसुधा या प्रांती आला. लटका हर्शामर्ष कही काबाडामुले घडल हे जाणून कूच करून गेल्यावर गेले. तेथे मोकाम आहे. दौलतराव याजसमागमे दोन अडीच हजार कमीच फौज आहे. यासिवाये हजार बारासे पाहुणे आले होते ते निघोन गेले. कदाप आपले चितात दौलतराव याचा संदेह असेल तर तो प्रकार त्याचे चितात नाही. याप्रमाणे वर्तमान आहे कळावे हे विनंती.

¶*The writer communicates news about Doulat Baburao and Sakharam Hari and their movements.*

---

*No. 181*]

[*1-4-1775*

**श्री**

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। छ २९ माहे मोहरम येथास्थित कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. मी आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते आज दोन प्रहरी ठाणे मारी दाखल जाहलो. येथील वर्तमान तर भडोचकराचा फार दंगा आहे. येका दो रोजानी आकलेस्वरी चढाई करावी यैसा इत्यर्थ ठरला आहे. तेथून बातमी तथ्य आली आहे; तर आपल्याकडील शंभर स्वार उदईक पा। द्यावे. येक दोन रोज ठेऊन घेऊ. दो चौ रोजानी पा। देऊं, कलावे; तर खामखा शंभर स्वार पा। द्यावे, अनमान करू नये. बातमीहि तथ्यच आली आहे; आणि तो उपद्रवहि करावयास चुकणार नाही; तर राऊत पा। द्यावयास अनमान करू नये. दुसरे श्रीमंत तात्या खंबाईतास आले म्हणून बातमी आली आहे; व आपणाकडून सांडणीस्वार आले ते दाहा राऊत व दोघे सिपाई देऊन आज रवाना केले. त्यानी वर्तमान सांगितले

की राजश्री नारो आपाजी यास देवआज्ञा जाहाली म्हणून स्वार मारानें सांगितले. आपल्यास कळलेच असेल. इकडील वर्तमान नवल विशेष आल्यावर लिहित जाईन. कळावे, सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Ganesh informs Naropant Keskar of the hostile attitude of the Subhedar of Broach. He further gives news of the arrival of Haripant Phadke at Cambay, and refers to the death of Naro Appaji Tulsibagwale.*

---

*No. 182]* *[2-4-1775*

पौ छ ७ सफर मुा परिया

पाा उरपाड शनवार

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवसी

पो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १ सफर मुकाम साबरमती प्राा गुजरात जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २१ मोहरमचे पत्र पाठविले ते पावले. श्रीमंत खंबइतास गेले. त्यास पोहोचवावयास सुरतकराची गलबते गेली ती माघारी आली. सुरत शहरात इग्रज माणूस ज्याजती ठेवींत आहे. मातबर जमाव करणार, पुढे काय करणार हे कलत नाही. रातबिरात आम्हावर गलब करणार, आम्ही तो खबरदारीनेच आहों. आपण तिकडील गुंता गायकवाड याचा उरकून काही फौज आमदाबादे- लगती टाकून आपण फौजसुधा इकडे यावे. श्रीमंत कदाचित सुरतेकडे आले तरी भारी पडेल. दोन च्यार हजार फौज तूर्त आम्हाकडे पाठवावी. चागोजी कदम यास तो रवाना आपण केले ते बडोद्यानजीक राहिले आहेत. त्यास पत्र पाठवावे म्हणजे लौकर येतील. आम्हाबराबर राजश्री फतेसिंगराव गायकवाड याजकडील फौज होती, त्यास तिकडे अताजी नागेश कारभारी जाले साा तजावजा होऊन काही देशास गेले. काही आहेत त्यास खर्चास ऐवज नाही. आठा- विसीच्या माहालांत बाकी होती ती वसुलात येत नाही. बंदीमुले खराबी जाली. यापुढे त्या फौजाचा भरवसा चाकरीचा येत नाही. सरकारची फौज आहे ते आपणास विदितच आहे. सुरतेस स्वदेश वराड व खानदेश तिनी नाक आहेत. श्रीमत आले तरी कोणीकडे राजकारण करितील ते कलेना. उरपाड व आकलेस्वर वगैरे सुरत आष्टाविसीतील माहाल दाहा लक्ष्याची जागिर श्रीमंतानी इंग्रजास देऊन सनदा करून दिल्या. इंग्रज ठाणी बसिवणार आसे वर्तमान आहे. श्रीमतानी

दाहा लक्षाचे जवाहीर इग्रजाजवल ठेविले होते त्याजपैकी तीन लक्ष रुपये घेऊन गेले. श्रीमंतास पुरंदरास फौजेच्या खर्चाविसी लिा होते. त्यास उतर आले की मोगलाई आमल सरकारचे माहाली आहे तो वसूल घेऊन खर्च करणे. त्यास मोगलाई आमलाचा वसूल मागेच झाडून त्याणी नेला. हा प्रकार सर्व आपल्या ध्यानात आहे. साराश आम्हास चहूकडून आडचण याचा परिणाम करणार आपण आहेत. ऐसे कितेक प्रकार लिा त्याजवरून सविस्तर कळले. त्यास गायकवाडाकडील प्रकार तरी रा खडो आवजी येऊन बलोन ठराव होऊन कागदपत्र गेले, परंतु आद्याप आले नाहीत. श्रीमंतहि खंबइतास येऊन त्यास पत्रे पाठविली आहेत हाहि प्रकार आहे. तूर्त आसा प्रकार असता तिकडे यावयाचे घडत नाही. रा चागोजी कदम तुम्हाकडे रवाना केले होते ते बडोद्यापावेतो गेले. तेथून माघारे येणे म्हणौन पत्र गेले होते+ परंतु ते आम्हापासी आले. पत्र पावले नाही. माघारें आणावयाचे कारण हेच कीं राजश्री वामनराव काठेवाडाकडे गेले. आम्हाजवल फौज नाही. राजश्री माहादजी सिंदे लोणवाडाकडे गेले आहेत. याजकरितां चागोजी कदम (अपूर्ण)

*¶Haripant notes the contents of a letter from Naro Anandrao regarding the journey of Dadasaheb to Cambay under English protection and the assembling of English troops at Surat and gives him instructions regarding the line of conduct he should adopt. He also explains why Changoji Kadam was asked to return from Baroda.*

---

*No. 183*]

[*2-4-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनती उपरी. येथील कुशल जाणूम स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. रा सटवोजी आटाले व हिरोजी आटाले हे राजश्री गोविंदराव गायकवाड याजकडे होते ते दौलत बाबूराव यासमागमे देशी जात होते, तेव्हा तुम्ही स्वार लुटिले. त्यास तुम्ही येथे आला होता त्यासमई घोडी द्यावी असा करार जाला तेव्हा काही घोडी येथे होती ती दिल्ही. बाकी तेरा राहिली ती द्यावी याप्रा करार जाला आहे. त्यास जे घोडी व उटे पाच

---

\+ व मागती तिकडे जाणे म्हणोन पत्र गेले होते.

याची यास देणे. करार जाल्याप्रो निभावावे. याउपरी हिसका देऊ नये. रा छ १ सफर बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal asks Naropant to return the horses to the Atoles who were deprived of them when going from Govindrao Gaikwad to Daulat Baburao.*

---

*No. 184*] [*5-4-1775*

पौ छ ८ जोवल

सीत आषढ

**श्री**

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ४ रबिलेवल वर्तमान येथास्थित, असे विशेष. रा मनोहर भिवराव दि॥ निबाजी पांढरे हे राजश्री गोविंदराव गायेकवाड यांजकडे होते. मधी गोविंदराव इकडे येणार तेव्हां बोलण्यांतहि होते; परंतु ते यांस दगा देऊन गेले. मा॥रनिले राजश्री खंडोपंतासमागमे आम्हाजवल आले. यांचे मुलामाणसास तगादा होऊन जामीन घेतला आहे म्हणोन ऐकिले. त्यास मा॥रनिले येथे आहेत. सरकार लक्षाखेरीज नाहीं. याजकरितां याचे वरी कोणेविसी अडथला न करावा. जामीनकतबा घेतला असेल तो माघारा देवावा. हे स्वामीचे सेवक आहेत. दुसरा विचार नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs Nana Fadnis not to molest the family of Manohar Bhivrao who has of late deserted Govindrao Gaikwad's party and joined the Barbhais.*

---

*No. 185*] [*9-4-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो॥ हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ८ सफर मुकाम नजीक ढवलके जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ २३ व छ २४ व छ २६ व छ २७ मोहरमची व छ १ सफरचीं पत्रे पाठविली तीं पावली. श्रीमंत खंबाइतास गेले ते समई गोरे व गाडदी मिलोन पाच हजार माणूस व तोफा चालीस पनास वगैरे लढाईचा सरजाम घेऊन गेले.

6089

उरपाड व हासोट व आकलेस्वर तीन परगणे इग्रजास जागीर देऊन सनदा करून दिल्या. इग्रजाने तूर्त कुमक करावी, खर्चास मागो नये, आपली लढाई फते करून पुणियासी नेऊन बसवावे, च्यार हजार सरंजाम नेहमी श्रीमंतापासी असावा, त्यास रोजमरा द्यावा, उपरातिक सुरत आठाविसी झाडून द्यावी. हाली सरजाम इग्रजाचा समागमे आहे त्यास खर्चास दाहा लक्ष रुपयाचे माहाल उरपाड, हासोट व आकलेस्वर येथील सनदा करून दिल्या. तेथे आमल बसवावे या उदेशे बाहेर निघणार. श्रीमंतानीं तीन लक्ष रुपये आपले फौजेस व गोविंदराव याजकडील मिलोन पाठविले. बडोद्याहून सा लक्ष्याचे जवाहीर इग्रजाकडे पाठविले होते ते श्रीमंत समागमे घेऊन गेले. गायकवाडास व आपले कारभारी यास आगोधरच पत्रे पाठविली होती की आम्ही खंबाइतास जातो, तुम्ही हर तजवीज करून आम्हापासी येणे. येकत्र होऊन येकदा लढाई करून याप्रा मनसबा केला आहे. आवघे येकत्र जाल्याने भारी पडेल. तूर्त इंग्रजास येक पैसा श्रीमंतानी खर्चास दिल्हा नाही. माहालच्या सनदा मात्र दिल्या. नख्त तीन लक्ष रुपये श्रीमंतापासी खर्चास आहेत. आपण हरतजवीज करून उभयता गायकवाडाच्या भेटी घ्याव्या म्हणजे मनसबा लांबणार नाही. श्रीमंत माघोरे सुरतेस येतील. आपण दाहा हजार फौज छावणीस ठेऊन सुरत प्रांती यावे. श्रीमत राजश्री बापू नाना याजकडील पत्रे छ २० मोहरमची आली होती. देशी स्वस्त आहे. नवाब चाद्यावर गेले. मुधोजी भोसले याणी दर्याबाई वगैरे छतीसगडी ठेऊन आपण सडे होऊन मुलूक मारणार. वसई साष्टीकडील वर्तमान आहे त्याप्रा आहे. छ ८ मोहरमापासून नित्य वर्तमान लेहून पत्रे पाठवीत जातो, परंतु पावतात न पावतात हे कलत नाही. डाकेचा बदोबस्त चागला करावा. आम्ही इकडे राहोन आपणास पत्रे वरचेवर पोहोचत नाही तेव्हा आमचा उपयोग काये? शब्द लागतो. मल्हार बाबूराव व जासूद यास येक रोजमरा देऊन बंदोबस्त करविला. चौहूकडील बातमीचा बदोबस्त वरचेवर करीत आहे. रिकामा बसत नाही. हाली सुरतेत जमाव होत आहे. बाहेर आमल बसवावयास निघणार. बंदी राहून माहालची कालजी, कमाविसदार चहूकडून वर्तमान आणून घाबरे करितात. याजकरिता येक जागा जमा होऊन बातमी राखोन आहो. ठाणियावर आल्यावर बेजरब गला पडून येक वेल त्याचे पारपत्य केल्यासिवाये परिणाम नाही. आपण राजश्री चागोजी कदम रवाना केले तेहि माघारा नेल ऐसेहि वर्तमान ऐकिले. आम्हापासी फौज किती, काम मातबर, इंग्रजासी संमध, स्वदेश समीप, येथे वाकडी गोष्ट पडली म्हणजे ठीक नाही. नाना प्रकारे वदंता उठोन आपल्याकडील कागदपत्र डाक बातमी काहीच

चालणार नाही. येथील मजबुदी चागली आसावी. बहुत वेला लिहिले, परंतु फौज न आली. आह्मी इतक्यानिसी रात्रदिवस श्रमास अंतर करीत नाही. बापूजी जनार्दन परभू, थोपटे, सूर (?) वगैरे पथके दिा फतेसिंगराव गायकवाड याजकडे होती. त्याची कारकुनी करीत आसतां सखाराम हरि याजकडे सूत्र सुरतेहून केले. कागदपत्र सापडले त्याजवरून कैद केला. त्याजपासी काही कागदपत्र सखाराम हरि व आबाजी माहादेव व विठलदास रामदास सावकार याजवर हवाला इदुरी सिंदे होलकर याच्या मारफतीने ऐवज पावला. त्याजपैकी बाकी ऐवज पाऊण लक्ष्यपर्यंत गुमस्ते याजकडे राहून गुमस्ता उठोन पुणीयास गेला म्हणौन उभयतानी सराफ श्रीमंताच्या बाजारात होता त्याने पत्रे व हुंड्या पाठविल्या त्या सापडल्या. कागद पाहून पुरंधरास रवाना केले. ऐवज हातास लागला तरी उतम. पतेवार आहे. ऐवज पावला नाही असे स्पष्ट बापूजी जनार्दन याच्या पत्रात आहे. चौहूकडून सावधगिरीस अतर करीत नाही. सुभानजी नाईक पाठविले ते पावले. जागा जागा नाकेबंदी पाहोन कागद (प)त्राच्या चवकसीस ठेवितो. खर्चाची मोठी आडचण आहे. आपण तिकडील मसलत आटोपून येतील तो सुदिन. दोन हजार फौज जरूर पाठऊन द्यावी. आनमान केल्याने मसलत भारी पडेल. मार्ग सुरक्षित होणार नाहीं. आम्हावर नाकारेपण येईल. सखाराम हरि याची स्त्री व चिरजीव मुबईहून सुरतेस आली. मुंज चैत्र सुधात होणार. आज छ १ सफरी सुरतेतील सरंजाम बाहेर निघणार. निघाला. उरपाडास जाणार किवा आम्हावर येणार पाहावे. स्वार बातमीस पाठविले आहेत. श्रीमताची पत्रे पुरंदराहून येतात की बंदी करून इग्रजास व मोगलास तबी पोहोचवणे. आमचा भ्रम आजपावेतो या प्रांती आहे. गाई कुणबिणी वगैरे चागोजी कदम याणी रवाना केल्या. त्यासमागमे स्वार देऊन पुढे रवाना केल्या. सिंदे होलकर निरोप घेऊन जाणार ऐसे ऐकितो. गायकवाड व सखाराम हरि वगैरे उदेपुराकडे गेले म्हणौन ऐकितो. खर्चाविसी पुरंदरास लिा होते त्यास उतर आले, की मोगलाईचा ऐवज वसूल घ्यावा. त्याजवरून मामलेदारास आणून ऐवज मोगलाई वसूल घ्यावा तरी माहाली बाकी राहिली नाही. आपली मार्गप्रतीक्षा करितो. गायकवाडमधील फौज आहे. त्यास सिवरात्रा येकादशी आहे. आम्हास परिछिन्न पुरदराहून ऐवज येत नाही. मोगलाई आमलाचा प्रकार तरी समजलाच आहे. यात आपण काये बुधिवाद सागोन लिहावयाचे ते लेहून निभावणी होये ते केले पाहिजे, म्हणौन तपासिले सविस्तर वर्तमान लिा ते कलले. त्यास मोगलाई आमलातील वसूल हात पोहोचेल तितका करून पैका घ्यावा. इकडील वर्तमान तरी श्रीमंत सुरतेहून खंबाइतास दाखल जाले. जमाव

करीत आहेत. गायकवाडास व सखाराम हरि वगैरे यास पत्रे पाठविली की येकदर सल्लक न करणे, आम्हापासी येणे. हे वर्तमान आम्हास कलताच कपटबंद येथून कूच करून साबरमतीवर ढवलक्यानजीक मुकाम करून राहिलो. खंबइतास आम्हास बारा कोसाचे अंतर आहे, तेव्हा मध्ये असतां ते येऊ सकणार नाही. राजश्री खंडो आवजी गायकवाडाकडील येऊन भेटोन बोलोन करारमदार ठराऊन कागदपत्र गेले त्यासहि फार दिवस जाले. आद्याप येत नाही. खडोपत म्हणतात की गुंता नाही, येतील. परंतु त्याचा प्रकार लाबणीचा दिसतो. आम्ही येथून भगवतराव, आपाजी गणेश याजकडील गायकवाडाकडे पाठविले आहेत. त्यास साहा सात दिवस जाले. गायकवाड आम्हापासून चालीस कोसावर आहेत. होलकर तो आम्हापासीच आहेत. सिंदे लोणवाड्याची खडणी आपली घ्यावी म्हणौन गेले आहेत. महीतिरी बडासीपूर ग्रेथे आहेत. लौकर येतील. मसलत सिधीस गेल्याप्रा त्यास निरोप देत नाहीं. तुम्ही बहुत सावधगिरीने चौकसी करून बातमी राखत जाऊन खबरदारीने राहाणे. तुम्हाकडे फौज पाठवावी खरी, परंतु इकडे श्रीमंत खंबाइतेस, गायकवाड येकीकडे, यामुले जागाजागां नाकेबंदी करावी लागली. आपली पत्रे निकडीची आली याजकरितां फौजेची तयारी केली आहे. रवाना करितो. तुम्ही तिकडे आहां म्हणून आम्ही निश्चित आहो. वर्तमान रोजचे रोज डाकेबराबर लिहीत जावें. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal notes the contents of a long letter from Naro Anandrao about the state of affairs in Gujarat and gives his instructions about them. " Raghunathrao has proceeded to Cambay from Surat. Negotiations have been opened with Gaikwad but are not progressing well. Holkar is in the camp. Sindia has gone to Lunawada for collecting his dues ", writes Haripant in the letter.*

---

*No. 186*]

पौ छ १९ रबिलोवल खमस सबैन वेशाख. [*10-4-1775*

**श्री**

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक भागोजी बलकवडे मुकाम किले डबई कृतानेक विज्ञापना. तागायत छ ९ सफर पावेतों सेवकाचें व किले मजकूरचें वर्तमान यथास्थित असे निशेष. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री दादासाहेब खंबाइतेस आहेत व राजश्री गोविंदराव

6092

व खंडेराव गायकवाड हे कडीवर आहेत. राजश्री हरिपंत तात्या कविटेनजिक खेड येथें आहेत. खंबाईतेपासून दाहा कोशावर आहेत. व भडोजकर इंग्रज याणे परगणे हसोट व उरपाड व परगणे जंबुसर व आमोद येथें ठाणी बसविलीं. राजश्री नारोपंत केसकर गल्याकावल्यावर आहेत. आम्हांपासून भडोज वीस कोश आहे. त्यास येथें भरती आहे ती स्वामीस कलतच आहे व जकीराही आहे तो विदितच आहे व आसपासचे मवासी याणी उपद्रव मांडिला आहे. स्वामीचे पुण्येकरून बंदोबस्त आहे, विस्तारे काय लेहूं. सेवेसीं श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Bhagoji Balkavade to Nana Fadnis writes about the movements of Dadasaheb, Gaikwad, Haripant, etc.*

---

*No. 187*] [*12-4-1775*

पौ छ १६ सफर
सन खमस सबैन.

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. छ १ सफरचे पत्र तुमचे आले त्याजवर पत्र आले नाहीं. उरपाडेस इंग्रजाने ठाणे घातले वगैरे ठाणी बसवितो. जबूसरास ठाणे घातले म्हणौन ऐकिले, तुम्ही काही लिहिले नाहीं, ल्याहावें. गायकवाड तीन कोसावर आले. काल पत्रे आली. भेटीस येतात. लिहिण्यांत संशय नाही. श्रीमंत खबाइतास आहेत कलावे. फौजेविसी दोन च्यार पत्रीं लिहिले त्यावरून राजश्री गंगाधरराव रास्ते पथकसुधा आजच येथून रा। केले, पोहचतील. याची मर्जी बहुतां प्रकारे रक्षावी. आपण वाकीफ आहेत. तिकडील वर्तमान लिहीत जावें. गायकवाडानी लौकर भेटावे या प्रेत्नास असो. श्रीकृपेकडून घडेल ते खरे. रा। छ ११ सफर बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant communicates to Naropant news about Raghunathrao, Gaikwad and the English and requests him to corroborate the last item especially pertaining to the English capturing Olpad and Jambusar.*

---

*No. 188*] [*13-4-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता। छ १२ सफर मुकाम नजीक ढवलके प्रा। गुजरात येथास्थित जाणोन स्वकीय कुशल

लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ४ सफरचे उरपाडचे मुकामीहून पत्र पाठविले ते पावले. श्रीमंतानी इंग्रजास दाहा लक्ष्याचा मुलूक उरपाड व हासोट व आंकलेस्वर हे माहाल दिल्हे, त्यात ठाणी इंग्रज बसविणार, सरंजाम करीत आहेत, येविसीं पेशजी लिहिले. काही फौज पाठवावी त्यास इंग्रजाने उरपाडास दोन हजार गाडदी व तोफा पाठऊन उरपाडचे ठाणे घेतले. कमावीसदार उठोन आम्हाकडे आले तेव्हा सडे होऊन ठाण्यानजीक आलो. आम्हाजवल तोफा नाहीं, त्याजपासी तोफा आहेत, याजकरिता ठाण्यावर जावयाचा लाग नाहीं. सभोवती गिर्दनवाई करीत आहो. बाहेर निघाले म्हणजे पारपत्य करावयास चुकणार नाहीं. या प्रांती त्यांचा आमल जाला म्हणजे वाटा चालणार नाही याजकरिता पत्र आपणास लिा आहे. फौज जलदीने पाठऊन द्यावी म्हणजे मग काहीं गुंता पडणार नाही. खर्चाचाहि मोठा पेच आहे. सर्व प्रकारे नाकारेपण मजकडे पावे ऐसा प्रसंग प्राप्त जाला आहे म्हणोन कितेक प्रकारे लिा ते कलले. त्यास, मागेच तुमची पत्रे आली होती त्याची उतरे व राजश्री आनंदराव रास्ते याची फौज तुम्हाकडे रवाना केली आहे. काल छ ११ सफरी येथून कूच करून गेले. लौकरच येऊन पोहोचतील. आलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिलें आहे त्याप्रा करावे. वर्तमान वरचेवर लिहीत जावें. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Hari Ballal writes to Naro Anandrao Keskar that a detachment under Anandrao Rastia has been despatched to help him to recover Olpad from the English.*

---

*No. 189]*

*[13-4-1775*

**श्री**

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. तुम्ही पत्रीं लिहिले की फौजेविसी अनास्था केली. त्यास त्याची कारणे प्रथम तुमचे पत्र आले तेव्हां चांगोजी कदम रा केले. त्याजवर श्रीमंत खंबाईतास आले. वामनराव वगैरे पंधरा हजार फौज काठेवाडांत गेली. सिंदे लोणवाडियाकडे गेले. आम्हाजवल ऐवज किती राहिला याजकरितां चागोजी कदम माघारे आणविले. आठा दिवसी वामनराव आले. फिरोन चागोजी कदम पेटलादेस पाा. रास्ते याची तयारी करून आपणाकडे राा केले. तों आज वर्तमान आले की, जबूसर इग्रजाने घेतले, तेव्हा चागोजी कदम जबूसरास पाा. रास्ते येक मजल गेले होते, त्यास पेटलादेस राहावयास सांगितले.

कारण आद्यापि गायकवाडाची भेट नाही. श्रीमंत खंबाइताहून तीन कोस पुढे पायदलसुधा आले, याजकरितां रास्ते पेटलादेस ठेविले. फतेसिंगाकडील काही राऊत व गारदी बडोदियास उदैक रा। करूं. तोफाविसी लिहिले. त्यास फतेसिगास सांगून बडोद्याहून दोन तीन तोफा आपणाकडे रा। करितो. तुम्ही नर्मदेपलीकडे आहा. बडोदे व जबूसर डबई याजवर शह पाहिजे याजकरिता चागोजी कदम व गायकवाडाकडील फौज या सुमारे राहील. गायकवाडाचे भेटीचा प्रकार तर तीस कोसावर आले आहेत. पत्रे काल आली, भेटीस निश्चयरूप येतात. खडोपंत येथे आहेत त्याचे बोलणे निखालस आहे. लक्ष प्रकारे भेटतील असे आहे. पंधरा कोसावर आल्यावर खडोपंत पुढे जाऊन खातरजमा करून घेऊन येतील. भेट जाली म्हणजे रास्ते आपणाकडे रा। करितो. फौज तुम्हाकडे पाठविण्यास आलस होईल की नाही याचा विचार करावा. करावे काये ? चहूकडे अडचण यामुले असे होते. उरपाड त्यांणी घेतले. तुम्ही भोवते राहिल्याने आटापाणी बंद होईल. इतकियांत जबूसरचे पारपत्य चांगोजी कदम याणी केले तर मग इकडे काम नाही. तुम्हाकडे येतील, नाही तर इकडेच राहातील. गाईकवाड भेटले म्हणजे रास्ते तुम्हाकडे पाठवितों. तिकडील वर्तमान लिहीत जावें. रा। छ १२ सफर बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

*¶Haripant mentions the difficulties in his way in sending succour to the addressee Naropant which he was in great need of. " Changoji Kadam will be despatched after recovering Jambusar from the English or Rastia will be asked to go after the meeting with Gaikwad ", he writes further.*

---

*[15-4-1775 ?*

*No. 190]*

**श्री**

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो गणेश सां। नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। छ १४ माहे सफर मु। आंकलेस्वर येथास्थित जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. स्वामीनी कृपापत्र पा। ते उत्तम समई पावले. लि। मा।र कलो आला. यैसेच निरंतर पत्री सांभाल करीत गेले पा। विशेष. आपण लि। की बावापिराचे घाटावर फौज कोण्हाची आली व सरदार कोण बा। आला म्हणून पत्री आज्ञा. त्यास बावापिराचे घाटांवर काही फौज

6095

आली नाहीं. आवई ऐकिल्यांतहि नाहीं. जंबुसरावर मात्र फौज आली; त्या फौजेने जंबुसरचे ठाणे घेतले. तेथील गाडदी मारून इंग्रजाकडील सरदार मिस्तर पारट तेथे होता तो जातीने मात्र पलाला. सर्वच लुटून घेतले. जातीने मात्र येकला भडोचेस आला. तेथून फौज जंबुसर पा ठाणे गोधरा येथे इंग्रजाकडील हजार बारासे गाडदी आंत आहेत त्याजभोवताला वेढा घालून बसले आहेत. हेहि येका दो रोजानी हस्तगत करितील. आमोदचेहि ठाणे सोडून इंग्रज पलाले, याप्रमाणे वर्तमान बातमीचे आलें ते सेवेसी दोन तीनदा पा आहेत. पावतील; परंतु बावापिराचे घांटावर फौज आली आसती तर सेवसी बातमी वरचेवर पोहचती करितो; परंतु आली नाही. कलावे उरपाड वगैरे तिकडील वर्तमान सेवकास लिहीत जावे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh from Ankalesar to Naro Anandrao while denying the report of the advance of a Maratha force at Bawapir ford says that Amod and Jambusar have been evacuated by the enemy and that Godhra is being invested.*

---

*No. 191*]

[*15-4-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो गणेश सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता छ १४ माहे सफरपर्येंत मुा ठाणे आंकलेस्वर येथास्थित जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आज प्रात:काली बातमी आली जे, श्रीमंत तात्याकडील फौज नारो शंकर याची फौज, चांगोजी कदम वगैरे च्यार हजार फौज घेऊन येऊन जंबूसर ठाणे चढाघोड्यानसी घेतले. इंग्रजाकडील मिस्तर पारट हा मात्र जीव घेऊन पळून भडोचेस आला. चीजबस्त त्याजकडील झाडून लुटली गेली व पो मार ठाणे गोधरा येथे हजार बारासे गाडदी ठाणियात आहे, त्याजभोवताले फौज पडली आहे. त्याचे कामहि येका दो रोजानी करितील. वीस पचवीस हजार रुा लुटले गेले. मिस्तर पारट याचे टोपीदेखील पडिली. इतकी आवस्ता होऊन जातीनसी पळून गेला आहे. कलावे. याप्रमाणे बातमी आली आहे कलावे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh informs Naro Anandrao that Jambusar was captured by the combined forces of Haripant Tatya and Naro Shankar and that Mr. Perrot had to run away for his life.*

No. 192] [17-4-1775

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी.

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता। छ १६ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ८ सफरचें पत्र उरपाडचे मुकामचे पाठविले ते पावले. या प्रांती आपला निरोप घेऊन आलो, त्याजपासून काही फौज आणखी पाठवावी म्हणोन वरचेवर पत्रे पाठवितो, परंतु आद्याप फौज रवाना न केली. सांप्रत इंग्रजाने सुरतेत व भडोजेत जमाव करून उरपाडचे ठाणे येऊन घेतले. हे वर्तमान आम्हास कलताच सडे फौजेनिसीं उरपाडास येऊन ठाण्याभोवता तलावा करीत आहो. मोर्चे बसवावे तरी फौज थोडी, तोफाहि नाहींत. आहे फौज यानिसी जीवादारभ्य श्रम करीत आहो. आपण आमची आनास्ता करून कुमकहि पाठवीत नाही, पुरंदराहूनहि कुमक येणे कलतच आहे. आपणा खो। कुमक व केले चाकरीचे श्रमपरिहार कोणे करणार? आमचे लक्ष सर्व आपलेजवल आहे. आद्यापि तरी कुमक पाठवावी म्हणजे इंग्रजाचे पारपत्य आपले कृपेकरून होईल म्हणोन तपसिले लि॥ ते सविस्तर कलले. ऐशास, तुमची पत्रे मागे आली, तेव्हाच रा। चांगोजी कदम यास फौजसुधा रवाना केलेच होते. त्यास बडोद्यापावेतो गेले, परंतु इकडे काहीयेक काम पडले याजकरिता माघारे आले. दुसरी पत्रे तुमची येताच राजश्री गंगाधरराव रास्ते यास फौजसुधा तुम्हाकडे रवाना केले ते बडोद्यास जाऊन पोहोचले. आजच पत्र आले. लौकरच तुम्हापासी येऊन पोहोचतील. तुम्ही ते येकत्र होऊन इंग्रजाचे पारपत्य करून येकादे ठाणे कापून काढिले म्हणजे सहजातच उठोन जातील. रा। चांगोजी कदम जंबूसराकडे फौजसुधा जाऊन जंबूसरचे ठाणे इंग्रजाने घेतले होते ते घेतले. आमोदचेहि घेतील. येकदोन ठाणी घेतली म्हणजे सहजातच जे ठाणी त्याणी घेतली आहेत ती टाकून जातील. वरकड आनास्तेचा मजकूर तरी कागदीपत्री लिहून आस्ता आनास्ता आहे नाही हे समजल्यात यावी असा प्रकार नाही. तुम्ही सरकार कामकाजे मागे केलीच आहेत व पुढेहि कराल यात दुसऱ्याने सांगणे काये आहे? सारांश, तूर्त प्रसंग येकतरेचा पडला याजमुले उपाये नाहीं. इकडील वर्तमान तरी गायेकवाडाच्या भेटी आठा चौहो रोजात व्हाव्या असा मजकूर आहे. रा। खंडो आवजी यासहि छ १५ सफरी त्याजकडे रवाना केले आहेत. खंडोपंतानी निशा केली आहे कीं, खामखा घेऊन येतों. लोक वदंता आहे की, श्रीमंताकडे जातील. प्रत्न केला

6097

आहे; श्रीकृपेने घडेल ते खरे. रास्त्यांचे फौजेचा मजकूर तुम्हांस लिहिला होता की, तूर्त पेटलादेस राहावितों. चांगोजी कदम जंबूसराकडे गेले आहेत त्यास आम्ही रास्ते [पुढील बंद गहाळ].

¶*On being requested by Naro Anandrao to send forces, Haripant sends two contingents, one under Changoji Kadam and the other under Gangadharrao Rastia, and asks him to check the progress of the English at Urpad.*

---

*No. 193*]

[*18-4-1775*

**श्री.**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसीं

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १७ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ११ सफरचे पत्र पाठविले ते पावले. उरपाडच्या ठाण्यात इग्रजाकडील लोक होतेच. दुसरे लोक व गाड्यावरून सरजाम सुरतेहून कुमक येत होती. त्यास आम्ही बातमी राखोन बालाजी खडेराव याजकडील छबिना होता त्याणी गाड्या लुटिल्या व टोपीवाले दाहा पाच ठार मारिले. याप्रा पारपत्य जाले. आम्हाकडील दाहा पाच स्वार जखमी जाले. त्याच दिवसी राजश्री आणाजी आबाजी दिा गायकवाड याचा छबिना सुर(त) शहरा नजीक होता त्याजवर रात्रीस छापा येऊन दाहा पाच घोडे गेले. दाहा पाच माणूस जखमी जाले. जबूसर व आमोद येथील ठाणी घेतली. आणखी सात आठशे माणूस भडोजेहून बाहेर निघाले आहेत, कोणीकडे जाणार हे कलेना. आपण कोठे आहा? तिकडील काये वर्तमान आहे, काही कुमक पाठवावी म्हणोन लिा ते कलले. इग्रजाचे लोक टोपीवाले कुमकेस येत होते ते मारिले व गाड्या लुटिल्या, याणेकरून दहशत पडोन पैसाव करणार नाही. राजश्री गंगाधरराव रास्ते फौजसुधा तुम्हाकडे रवाना केले ते लौकरच येऊन पावतील. जबूसरचे ठाणे रा चागोजी कदम याणी घेतले. इग्रज मारून काढिले, कलावे. वरकड वर्तमान तरी श्रीमत खंबाइतास आहेत. गायकवाड आद्यापि भेटीस आले नाहीत. येतात आसा मजकूर आहे. आमचा मुकाम दवलक्यानजीक आहे. पुढे होईल वर्तमान ते लहून पाठऊ. घाटावर फौज राजश्री वामनराव व मलबा बापू पा आहेत. खडोपत गायकवाडास आणायास गेले आहेत येतील. भेटतील तेव्हा खरे. आपणाकडील वर्तमान लिहीत जावे. छ ८ सफरचे पत्र

पाा तेहि पावले. रास्ते पाा. आतां जनार्दन रायाजीचे काय प्रयोजन व प्रस्तुत घाटाचे चाकरीवर आहेत, कलावे बहुत काय लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*The capture of the two places—Urpad and Jambusar—from the English by Naro Anandrao and Changoji Kadam is referred to in this letter.*

---

*No. 194*] [*21-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राज-
श्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोा हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २० सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ १४ सफरचे पत्र पाठविले ते पावले. वसईकडील व नागपुराकडील व उरपाड वगैरे सुरत प्रांतातील वगैरे बातमीचे वर्तमान लिाा ते कलले. राजश्री गंगाधरराव रास्ते फौजसुधा तुम्हाकडे रवाना केले आहेत ते येऊन पावलेच असतील. तुम्ही व ते येकत्र होऊन इग्रजाचे पारपत्य करून तिकडील बदोबस्त करावा. इकडील वर्तमान तरी श्रीमताकडील मंडळी निराली होऊन खबइतास गेले याप्राा वर्तमान आहे. उभयता गायकवाड निराले होऊन विरमगावाकडे आहेत. येथून राा खडो आवजी व भ(ग)वतराव त्याजकडे गेले आहेत. त्याच्या भेटी होऊन आद्यापि उतर आले नाहीं. आपणाकडील वर्तमान लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal deputes Gangadharrao Rastia to help the addressee against the English. The news about the movements of Raghunathrao and Gaikwad is also communicated. "Khando Avaji and Bhagvantrao have been sent to Gaikwad", he adds.*

---

*No. 195*] [*23-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत दाजी स्वामीचे शेवेसी

सेवक बाजी बलाल परांजप्ये कृतानक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा चैत्र वाा आष्टमी रविवारपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नवतें. त्यांस हाली स्मरण होऊन छ १४

सफरचे पत्र उर्पाडचे मुक्कामीहून पाठविले ते छ २० सफरी पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कळलें. ऐसेच हमेशा पत्र पाठऊन संतोषवीत असावें, इष्टत्वास उचित आहे. राजश्री हरिपंत तात्याकडील फौज आणविली, परंतु येऊन कुमक होत नाही म्हणोन लिहिले. त्यांस तुम्हाकडेस फौज रवाना च्यार हजार जाली आहे. इतक्या रोजात येऊन पावलीच असेल. आम्ही सर्व मंडली येकदील आहो म्हणून लिहिले ते कळले. योग्य हेच आहे. तुम्हावर तेथील लोकांचा भार सरकारातून ठेविला आहे, त्यापक्षी येकदील आहा यांत अपूर्व नाही. तुम्ही खावंदशेवेसी कोणे गोष्टीस चुकणार नाही येविसी लिहून कलवावेसे काय आहे? तिकडील सविस्तर लिहून पाठवीत असावे. इकडील अधिकोतर वर्तमान ल्याहावेसे नाही. राजश्री भिवराव आबा व सर्व मंडली सुखरूप आहेत. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ करावा, हे विनंती.

¶*Baji Ballal Paranjpe informs Naro Anandrao that a contingent of 4,000 men has been sent to him as succour.*

---

*No. 196*]

[*24-4-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २३ सफरपावेतो वर्तमान येथास्तित असे विशेष. छ १८ सफरचे पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान कळले. इंग्रजाची आमची लडाई जाहाल्याचे वर्तमान आइकण्यात आल्याचा प्रकार लिहिला तो कलला. त्यास आजपावेतो त्याची आमची गाठ पडली नाही. श्रीमंताची मंडळी गोविंदराव गायकवाडसुधा येऊन मिळाली. याउपर त्याचा इरादा लडाईचा आहे, तेव्हा आम्हासहि त्याचे समोर होणे प्रातच आहे. श्रीमत रावसाहेब याचे पुण्यप्रतापेकडून येथास्तितच होईल. बुणगे पाठीमागे टाकून सडे जाहालो. गनिमी कावा करितो. सुरतेतील सलुकाचा प्रकार जाहाल्यास त्याचा पर्याय लिहिला, यैशास काही साधन हाती लागत असल्यास जरूर करावे; आतील आर्थ समजोन घेऊन लेहून पाठविल्यावर कर्तव्य न कर्तव्य लेहून पाठऊ. गायकवाडाकडील माहालचे जफ्तीच्या सनदा पुरंधराहून आल्या. त्याची याद पाठविली ती पाहिली. त्यास तूर्त जफ्ती करून पैसा प्रात होणे कलत आहे. त्यात राजश्री फतेसिंगास वाईट वाटेल, याजकरिता आठच्यार दिवस दम धरल्याने उतम आहे. बात (इतकी?) की

इकडीलहि मजकूर समजेल तैसे आपणास लेहून पाठऊ. खंडेराव गायकवाड इकडे येतात, अमदाबादेकडून येणार येतील. गोविंदरायानी नादी लाऊन सेवटी दगाबाजी केली, चिंता काय आहे. श्रीकृपेने सर्व उतम होईल. नाना रास्ते यांची भेट जाली असेल. सरंजाम चागला जाला. तिकडील खूल मोडावे. आलीकडे चांगोजी कदम आहेत. आम्ही इकडे सभालीतच आहो. माहादजी सिंदे लोणवाडांत आहेत. लवकर येतो असी पत्रे येत असतात, येतील तेव्हा खरे. श्रीमंत् इंग्रजाचे बलावर हावभरी जाले आहेत. असो घडेल ते खरे. तुम्ही इग्रजासी राजकारण करून भोक पाडाल तर मोठेच साधान आहे. जसे होईल तसें लिहून पाठवावे. बहुत काय लिहीणे लोभ दीजे हे विनंती.

सेवेसी बाजी गोविंद सां नमस्कार लिा परिसोन लोभ कीजे हे विनंती.

*¶Haripant complains about the treachery of Govindrao Gaikwad in going over to the side of Dadasaheb and the dilatoriness of Sindia in joining the writer. He also advises the addressee to seduce the English and thus weaken the side of Dadasaheb. This, he says, will be a great achievement.*

---

*No. 197]* *[24-4-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साा समस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ताा छ २३ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही येकदोन पत्रे पाठविलीं होती ती पावोन त्याची उतरे गेली आहेत ती पावलीच असतील. इकडील वर्तमान तरी गायकवाडाचा सलुकाच्या मजकूर होत होता. आम्हाकडेस बाहेत्कारी सलुकाचा भाव दाखऊन अंतरंगी श्रीमंतांकडे सूत्र राखोन श्रीमंतांकडील कारभारी याच्या मसलतीने आजपावेतो आपली काबू साधून सेवटी निबडी जवल येतो म्हणोन आवघे येकत्र होऊन आले. काही बोलणे आणखी होते साा राजश्री खंडो आवजी व सिवरामपंत व भगवंतराव यास येथून रवाना केले. ते जात तो आगोधरच श्रीमंताकडील मंडलीसीं येक प्रहरपावेतो खलबत करून गायेकवाडानी त्यास माहितगारीने तरलापूर म्हणोन नदीचा आरा आहे त्या आऱ्याने पार करून दिल्हे, ते खंबाइतास जाऊन दाखल जाले. उभयता गायेकवाड मागे राहिले होते, त्यास दुसरे तिसरे दिवसीं राजश्री गोविंदराव गायेकवाडहि निघोन गेले. खंडेराव मात्र राहिले आहेत ते निबडापासी आहेत. ते येणार, भेटणार म्हणोन त्याची

पत्रे येतात. परंतु भेटतात किंवा तेहि खंबाइतास जातात हे कलत नाही. श्रीमंताकडील मंडली जाल्ये, हे बातमी कासिदानी येऊन मुखजबानी सांगितल्यावरून राजश्री वामनराव व राजश्री मलबा बापू व हुजरात याप्रो रवाना केले होते, परंतु गाठ पडली नाही; निघोन गेले. सारांश की सलुकाचे बोलणे बोलोन सेवटी परिणाम याप्रा केला. बरे; ज्या गोष्टी जाल्या त्या उतमच जाल्या. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापे सर्व गोष्टीचा बंदोवस्त होणे तसा होतच आहे. तुम्ही व रास्ते येकत्र होऊन तिकडील बंदोबस्त येथास्थित करून इंग्रजाच्या लोकांचे पारपत्य करावे. याउपरी इकडील होईल मजकूर तो लिहून पाठऊ. दगाबाजी करून गेले खरे. इतकी फौज आम्हाजवल असतां त्याणी जावे ही गोष्ट लाजिरवाणी आहे. परंतु गैरमाहितीमुले गांठ पडली नाहीं. आपणांकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. सावध असावें. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Hari Ballal vehemently denounces the treachery of the Gaikwad who, rejecting the negotiations with the writer, went over to the side of Dadasaheb whom he allowed a free and safe passage to Cambay. He asks the addressee—Naro Anandrao—to watch carefully the movements of the English.*

---

*No. 198*]

[*25-4-1775*

**श्री**

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य

राजश्री नारो अनंदराव गोसांवी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही पत्रे छ १४ सफरची पाठविली ती पावली. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबाकडील ऐवज रामदास विठलदास साहूकार याजकडे येणे, त्याविसीं मारनिलेचे गुमास्ते रूपचंद मोतीचंद याणी बडोद्यास तीर्थस्वरूप होते ते समई लस्करांतून लिहिले तो ऐवज वगैरे मिलोन रुपये ७९१७०॥। येकूण असी हजार येकशे पावणेयेकाहातर रुा याच्या हुंड्या गुजराथी लिपीच्या व ज्याचा ऐवज त्याचे कागद बापूजी जनार्दन परभू सखाराम हरि याचे आतविषई याजवल होते. त्याचा मुदा लाऊन धरिले. कागदपत्र झाडून घेऊन त्यास अटकेंत ठेवावयास व्याहरे किला येथे पाठविले. हा गोपाल नाईक तांबवेकर याजकडील फौजेत धोपटे वगैरे याजकडील कारकुनी करीत होता. फितुरी त्वरेने धरिला, यामुले सर्व कागदपत्र हातीं लागले. हा सदरहू ऐवज तेथे घेऊन येथील फौजेचे

खर्चास पाठवावयाची आज्ञा व्हावी म्हणोन लिहिलें ते सविस्तर विदित जाहालें. बापूजी जनार्दन फितुरी याचा पता पाडून धरून कैद करून त्याजवलील कागदपत्र घेऊन इकडे पाठविले फार गोष्ट चांगली केली. ऐवज सावकारापासून घेऊन हिकडे पाठवावा म्हणोन लिा, त्यास सर्व कागदपत्र पाहातां भरण्यापैकी बतीस हजार रुो रामदास विठलदास याजकडे निघतात. बाकी ऐवजाचे जाबसाल पुसोन घ्यावयाचे आहेत. त्यास दामोदरदास येथे आलियावर याची व रामदासाची रुजुवात करून समजोन काही निघाल्यास तो ऐवज व ऐनबतीस हजार त्याचा यैवज देणे आहे त्यांत रदकर्ज ल्याहावयाचे, सबब यैवज घ्यावयाचा राहिला. वरकड इग्रजाची तरांडी थोर सुरतेच्या बाऱ्यावर च्यार हजार माणसानिसी आहे येविसींचा व आपल्याकडील माहालचा मजकूर लिहिला तो सविस्तर विदित जाहाला. जाणिजे छ २४ सफर.

*¶Raghoba had deposited heavily with Ramdas Vithaldas, a money-lender in Poona ; papers in this connection were secured from a spy of Raghoba by Naro Anand Keskar who requested that the amount to be recovered from Sabhowkar be made over to him for disbursement. The Peshwa replies that the moneys will go to settle his own debts and Naro Anand was not to use the money.*

---

*No. 199]* *[29-4-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरी बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २८ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २० सफरचे पत्र पाठविले ते पावले. राजश्री गंगाधरराव रास्ते फौजसुधा रवाना केले ते पावले. ते आम्ही येकत्र होऊन इकडील बंदोबस्त करितो, परंतु तोफा दोन असल्या म्हणजे ठीक पडते. गायकवाडाकडील मजकूर कसाकसा जाला. पुरदराहून मोगलाई आमलाचा वसूल घेऊन फौजस खर्चास घेणे म्हणौन पत्रे आली आहेत. श्रीमंत खंबाइताहून गलबतात बसोन माघारे सुरतेस येणार असी बातमी आहे. इंग्रजाकडील वकील आम्हाकडे आला होता. आम्ही आपलेकडील येक कारकून त्यासमागमे देऊन ते गेले. पुढे होईल वर्तमान ते लेहून पाठऊ म्हणौन लिा ते कळले, उतम आहे. तिकडील बंदोबस्त करून वर्तमान वरचेवर लेहून पाठवीत जाणे. श्रीमंताकडील मंडली व गायकवाड येकत्र होते. आम्हासी सलुकाचे

बोलत, परंतु आवघ्या गोष्टी लबाड. शेवटी गोविंदराव व श्रीमंताकडील मांडिली निघोन श्रीमंतास जाऊन मिळाली. आवघे येकत्र होऊन साबरमतीवर येऊन मुकाम करून राहिले. आम्ही सडे होऊन सा कोसाचे तफावर्तीनें तकवे करितो. येक दिवस थोडीसी छ २७ सफरी गोलागोली जाली. याप्रा। वर्तमान आहे. रा। खंडेराव गायकवाड याची व आपाजी गणेश याची भेटी जाली. येका दोहो रोजानी आम्हाकडे येणार आहेत. भेटी जाल्यावर लेहून पाठऊ. रा। खंडो आवजी येथून पाठविले होते, परंतु त्याचे आगोधरच गोविंदराव निघोन गेले. याजमुळे मा।रनिले खंडेराव यासमागमे आहेत. काल श्रीमंत साबरमतीचे पलीकडून चालले. तोफांची मारागिरी आम्ही आलीकडील काठी उभे होतों तेथे केली. पंचवीसपर्यंत घोडी जाया जाली. येक नगाऱ्याचा हती ठार पडिला. आम्ही आपलेकडील तोफाची मारागिरी केली. त्याचे गटांत गोले पडून से पनास माणूस जाया जाली व आपले तोफानी गारद्याचे गोल फोडिले. त्यांचा मुकाम साबरमतीचे संगमावर जाला. आम्ही पांच कोस अंतरानें राहिलों. आज शनवारी तयार होऊन आलो तो मुकामच आहे. कुचाचे दिवसी लागभाग पाहून करणे ते करूं. कूच जाल्यावर अमदाबादचा रोख धरितात किंवा कोणता हे कलेल. लिहून पाठऊ. तुम्ही लिहिले कीं सुरतेत कारकून नेला आहे. काय बोलण्यात येईल ते लिहून पाठऊ. त्यास काय बोलणे जाले ते लिहून पाठवावे. बहुत काय लिहीणे; लोभ कीजे हे विनंती.

¶*Hari Ballal informs Naro Anandrao of the negotiations opened with him by Govindrao Gaikwad on behalf of Dadasaheb. The negotiations were abruptly terminated and Govindrao joined forces with Dadasaheb and attacked Hari Ballal. The skirmishes on the Sabarmati between the two forces are further described.*

---

*No. 200*] [*April 1775*

**श्री**

पु॥ राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. इकडे आणविले व श्रीमंत खंबाईतास आले तेव्हां तिकडे फार फौजेचे प्रयोजन नाहीं असे वाटले याजकरितां आणविले. तुम्ही खर्चाची तंगचाई म्हणोन लि॥. त्यास मोगलाचा ऐवज माहाली बाकी असेल ती निकड करून घेतल्याने दोन महिने चरितार्थ चालेल. गायकवाडाचे फौजेचा प्रकार तर त्याचे खर्चापुर्ता ऐवज गायकवाडाचे माहाली मिळेल. तुम्हास आम्ही

त्याहावें असें नाही. हर तजवीज करावी. सुरत भडोचची बंदी करावी. इकडे श्रीमंत आले आहेत पाहावे काय मसलत होते. तूर्त लाबले खरे. तुम्ही तिकडे असला म्हणजे आम्हास कालजी करावी नलगे. तुम्ही लिहिले जे वर्षप्रतिपदेपावेतो वाट पाहू. नाही तर पुण्याकडे जाऊ. त्यास ही गोष्ट ठीक नाहीं. कस्त करावी. राहावे. म्हणजे आम्ही इकडे निश्चित राहू. पैक्याचा तोटा सर्वत्र जाला आहे. येथे कर्जदेखील मिलत नाही. श्रीकृपेने प्रांतें[1] लागेल तो खरा. वामनराव फौजसुधा आले. कलावे. तिकडील वर्तमान लिहीत जावे. उतावली जाण्याची करू नये. इंग्रेजास माहाल श्रीमंतानी लिहून दिल्हे आहेत खरे, परंतु तुम्ही तिकडे असता ते काय करणार. आम्ही ढवलक्याचे अलीकडे च्यार कोस साबरमतीचे काठी आहों. श्रीमंताकडे फौज जाणार ती वाट येथे राहिल्याने बंद होते असें पाहून राहिलो आहो. देशचे वर्तमान आढलत जाईल ते लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant learns the monetary difficulties of Naro Anandrao and points him how he could raise money. He explains he has encamped on the Sabarmati to block the way of Raghunathrao.*

---

*No. 201]* *[2-5-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ २२ सफरचे पत्र पाठविले पावले. राजश्री गंगाधरराव रास्ते येऊन दाखल जाले. त्याची मर्जी रक्षून सरकारकाम करितो. उरपाडचे बोलणे लागले आहे. सलुकाने ठाणे उठऊन नेले तरी उतम. नाही तरी व्यारे येथील तोफा येका दोहो रोजात येतील त्या आणून पारपत्य करितो. गायेकवाडाच्या भेटी जाल्या म्हणजे बहुत काम जाले. मुमईहून इंग्रेजाकडील दोन वकील पुरंदरास जाऊन तेथून दोन कारकून घेऊन गेले आहेत. तेथे आपल्याकडेहि बोलतात. इकडे आम्हाकडेहि मोगलाच्या विद्येमाने बोलणे आहेच. ऐसे ती जागा बोलो लागले आहेत. त्यास आपल्यापासी मुदे कोणते घातले ते ल्याहावे म्हणजे त्या आन्वये बोलावयास येईल. मोगल आपली ममता धरून बोलतो. त्याचे विद्येमाने जाबसाल

---

१ प्रांत=शेवट.

6105

जाल्यास पुढे ठीक पडेल. आपल्याकडील व पुरंदराकडील बोलण्याचा ऊर्ता धरून बोलतो. साष्टीचा जाबसाल, दुसरा श्रीमंताचा बंदोबस्त, तिसरा १० लक्ष्याचा मुल्क दिल्हा, हा न द्यावा, त्यात तोड मोड करावी. हे तीन साल जाब मातबर. वरकडे किरकोल. सरकारी मसलत जाऊ देत नाही. पत्राचे उतर सत्वर पाठवावे म्हणौन लिा ते कलले. उरपाड येथील सलुकाने काम जाल्यास उरकून ठाणे बसवावे, न जाल्यास पारपत्य करून ठाणे घ्यावे. इग्रजाकडील सलुकाचा मजकूर तरी पुरदराहून काये बोलणे होते ते कलले नाही. तुम्हाकडेस बोलतात त्यातील खुलासा काढून लेहून पुरदरास पाठवावे म्हणजे ते तुम्हास लिहितील. आम्हाकडील बोलण्याचा मजकूर तरी वकील आला होता, परंतु त्या बोलण्यात जीव नाही. येक दिवस राहून माघारा गेला. श्रीमंताकडील मडली व गोविदराव गायकवाड ऐसे श्रीमतास मिलाले. श्रीमत त्यासह इग्रेजसुधा खंबाईताहून कूच करून साबऱमतीच्या पाण्यावरून आज छ मजकुरी खेड्यानजीक तीन कोसावर वात्रा नदीच्या पाण्यावर आले. साबरमतीवर आले. त्या दिवसी आम्ही सडे जातो. नित्य तलावे त्याच्या आसपास करितो. येक दिवस गोला गोली जाली. आमच्या तोफा दीडखे पावेतो त्याच्या लस्करावर मारिल्या. त्याच्याहि जाल्या. याप्रो होऊन दोहीकडील काइमी राहिली. रा खडेराव गायकवाड छ २९ सफरी येऊन भेटले. त्यासमागमे खडो आवजी आहेत. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*On being asked by Naro Anand about the particular lines of negotiation with the English, Haripant advises the addressee to refer the matter to the authorities at Purandar and to await their decision. He also asks him to capture Urpad from the English either by negotiation or by fighting.*

---

*No. 202]* *[3-5-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २ राा॒वल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावोन त्याचे उतर अलाहिदा पत्री लिा आहे त्यावरून कलेल. इकडील वर्तमान तरी श्रीमत राजश्री दादासाहेब व गोविदराव गायकवाड, सखाराम हरि

वगैरे मडली येकत्र होऊन इग्रजसुधा कूच करून साबरमतीवर आले. तेथून पुढे पाण्याच्या आश्रयाने चालतात. त्यास येक दिवस त्याची व आमची गोलागोली होऊन दोहीकडील काइमी राहिली. आम्ही च्यार कोसाच्या आंतऱ्याने त्याचे आघाडीस सडे होऊन राहात असतो. ते साबरमतीचे पाणी टाकून वात्रा नदीच्या पाण्याने खेड्यानजीक आले. छ १ रोवली त्याची आमची लढाई जाली. ते नदीपलीकडेस होते. आम्ही आलीकडेस होतो. त्याणी तोफा व पायेचे माणूस व फौजा याप्रा सरंजाम घेऊन आलीकडे आले, तेव्हा त्यांची आमची लढाई होऊन त्यास मोडून नदीपलीकडे घातले. से दोनसे घोडी आपल्या लस्करात आली. दोन हाती आले. कुकाजी सिवराम पाडाव सापडले. नदीपलीकडे जावे तरी नदी फार आवघड. घोडी घालावयास सोये नाही. याजमुले जाली तितकी जाली. ते त्या मुकामींचे काईम, आराबा पसरून राहिले आहेत. पुढे होईल वर्तमान ते लिहून पाठऊ. तिकडील वर्तमान लिहीत जावे. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal describes to Naropant Nana the encounter which he had on the river Vetra with the combined forces of Dadasaheb, Govindrao Gaikwad and the English in which the latter were repulsed with loss.*

---

*No. 203]* *[6-5-1775*

**श्री**

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ १९ माहे रोवल मुा ठाणे आंकलेस्वर येथास्थित आसो विशेष. स्वामीकडून छ १४ तारिखेचे पत्र पाो ते आस्तमानी येऊन पोहोचले. लिहिले वर्तमान कलल. यैसियांस आपण लिहिले कीं जासुदास दोघे माणसे बाा देऊन भालोदास पार करून देणे म्हणून पत्री आज्ञा. त्याजवरून रतनापुरावरून जासूद लाऊन दिल्हा आहे. पार होऊन जाईल कलावे. दुसरे श्रीमंतांनी नडियादेवर मुा केला आहे व राजश्री हरिपंत तात्या यांचे फौजेचा मुा खेडियावर आहे. त्यांची यांची जुझे दोनतीन मातबर जाहाली. आतांहि नाडियादेहून श्रीमंताचे कूच जाहाले तरहि यांचा त्यांचा मोकाबला होणार म्हणून बातमी आली आहे. भडोचकराचा प्रकार तो आम्ही आपल्यास पत्री

यैसे ठेविले आहेत. याप्रमाणे रस्ता तो बंद केला आहे. त्यास आपण राजपिंपलावाल्यास पत्र लेहून जाबसाल आणवावा व रस्ताचा प्रकार कांहीं आपल्या सोईस पडला तर याचा बंदोबस्त करावयाचा आसिला तर दोनचारसे राऊत वाटावर ठेवावे म्हणजे रस्ता चालेल. नाही तर यांची तो बंदोबस्ती फार कठिण केली आहे. आपणहि परस्परे यैकितीलच. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh assures Naro Anandrao that he did not open letters addressed to Haripant and advises measures being taken against the ruler of Rajpipla, who was favouring Raghunathrao.*

---

*No. 207]* *[9-5-1775*

पौ छ ११ रावल खमस
सबैन वैशाख

श्री

राजश्री जनार्दन आपाजी गोसावी यासी

सुा खमस सबैन मया व अलफ. खरगसिंग याचे घर पुण्यांत काल्या वावरात आहे ते लक्ष्मणसिंग यास देविले असे. तरी ते घर याचे स्वाधीन करणे. जाणिजे छ ८ रावल.

¶*Janardan Appaji is asked to hand over Khargsing's house to Lakshmansing.*

---

*No. 208]* *[9-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २७ रावल जाणन स्वकीये लिहीत जावे विशेष. पा आकलेश्वर हसोट बलसाड हे माहाल श्रीमंत राजश्री माधवराव नीलकंठ याजकडील. त्यास तुम्हाकडील कहीचा उपद्रव फार लागतो. गाव मोडिता म्हणोन येथे बोभाट आला. त्यास सरकार तालुका असता रखवाली करावी ते उपद्रव लाविता हे काय? तर यांचे गावची रखवाली करावी. श्रीमंत येऊन लुटतील या अर्थें आधीच आपण लुटून टाकावे येसे असेल तर केवल आपणच आपली रयेत लुटावी हे

ठीक नाहीं. मग ते करितील तर करूत. तुम्ही बंदोबस्त न केला तर राजश्री आन्याबा रागे भरतील असें न करावे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

*¶Hari Ballal administers a strong reprimand to Naro Anandrao for plundering the villages belonging to Madhavrao Nilkanth—Peshwa's partisan.*

---

No. 209]

[10-5-1775

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पोष्ये हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ९ रावल जाणौन स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. तुम्हाकडून आलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सविस्तर लेहून पाठवावे. इकडील वर्तमान तर श्रीमंत इग्रजसुधा नडयादेस परवाचे दिवसीं आले. काल त्याचा मुकाम तेथेच जाला. आजहि अद्यापि कूच जाल्याची बातमी आली नाही. आमचा सडे स्वारीचा मुकाम नडयादे आलीकडे च्यार कोसावर आले. दोन तीन लडाया त्यांच्या आमच्या जाल्या. श्रीकृपेने त्याजवर जरब चांगली बसली परतु इंग्रजाचे पायचे माणूस, आगीचे बल भारी, यामुले फिरोन जमतात. नडियादेहून कूच जाल्यावर कोणता रोख तो समजेल. मसलत लांबली. लस्करांत पैसा नाहीं. च्यार रोजमरे तटले आहेत. लोक गवगवा करितात. ईश्वर प्रांत लावील तो खरा. तुम्ही कोठे आहा, तिकडील वर्तमान काय, ते लिहून पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

राजश्री बालाजीपंत केलकर स्वामीस सां नमस्कार लिा परिसीजे हे विनंती.

*¶News about the skirmishes which the writer had near Nadiad with the combined forces of the English and Raghunathrao is despatched to Naro Anandrao by Hari Ballal.*

---

[11-5-1775

**श्री**

सेवेसी बालाजी बापूजी केलकर सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। छ १० रबिलोवल गुरुवासर मुकाम कसबे कामरेज तापी दक्षणतीर येथास्थित असे विशेष. येथे सुरत शहरातुन बातमी आजच आली [illegible]

जाली. त्याआलीकडे लढाई श्रीमंताचे फौजेची आपली होऊन इंग्रेज हजार पांचशे मारिले. यापुढे इंग्रेज खंबाइताहून श्रीमंतास घेऊन शहर सुरत येथे येणार. खंबाइतास राहन परिणाम नाही. पर्जन्यकाल जलमार्ग मोडतो, यास्तव सुरतेस यावे असा त्याची बातमी आली आहे. दुसरियाने इंग्रेज मोडला ही बातमी आपणाकडील पत्रे अद्याप आली नाही. आपणाकडील पत्रे आली म्हणजे सविस्तर कलेल. श्रीमंत सौ पार्वतीबाई शरीरी समाधान नाही यास्तव पुण्यांत आली आहेत. सौ दुर्गाबाई बरोबर आली आहेत. याप्रो जासूद येथे आले ते सांगत होते. लिहिले वर्तमान आले नाही. दोन तोफा ब्यारे निा गायकवाड यांच्या आणिल्या. गाडदी वगैरे शेपनास माणूस येथे जदीद करार केले. सुरत शहरातून दारू गोळी आणविली. येणेप्रो सरंजाम तयार होत आहे. उरपाडास यापुढे जावे असे सर्वांचे मानस आहे. राजश्री गणे(श)पंत पेठ्ये दिा सरसुभा व राजश्री बहिरो रघुनाथ मेहेंदळे कादार चौथाई शहर सुरत बरोबरच आहेत. सरकारचे कामकाजास फारच उपयोगी पडतात. गणेशपंत आपणास पत्रे लिहीत असतात. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Bapuji Kelkar writes news about the battle with the Eng. fought on the river Mahi.*

---

*No. 210*]

[*11-5-1775*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पोष्ये हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १० रावल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. राजश्री अंताजी रघुनाथ यास लस्करांतून पुण्यात पाठविले आहेत. हे तुम्हापासी आल्यावर यासमागमे माणसे व स्वार देऊन मोल्हेरीस पोहचाऊन द्यावे. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal asks Naro Anandrao to arrange for the safe journey to Mulher of Antaji Raghunath who is asked to proceed to Poona.*

---

*No. 211*]

[*12-5-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता छ ११ रौवल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २७ सफरचे पत्र पाठविले

ते पावले. छ २३ सफरचे पत्र पाठविले ते पावोन त्यात लिा की, गोविंदराव गायेकवाड श्रीमंताकडील मंडलीसुधा श्रीमंतास मिलाले. विस्वास देऊन हे गोष्ट केली. इंग्रजाकडील वकील येऊन बोलणे लागले आहे. त्यास उरपाड व आमोद येथील ठाणी उठऊन त्याणीं न्यावी आणि पके बोलणे बोलोन श्रीमंतास खंबाइताहून माघारे आणावे, सुरतेस आले म्हणजे बोलणे पके असे ठरल्यावर लेहून पाठवितो. आपण बहुत सावध राहून मसलत करणे ते करावी. सडी स्वारी जाली त्यापेक्ष्या बुनग्याचा बंदोबस्त कोल्याच्या दंग्याविसी चांगला करावा म्हणोन व आणिखी कितेक मजकूर लिा तो कलला. त्यास गोविंदराव वगैरे मंडली येऊन मिलाल्यावर ते कूच करून नड्यादपावेतो आले. तीन वेल त्याची आमची तोफाची मारगिरी जाली. येक वेल आम्ही मोडून नदीपार घालून दोनअडीचसे घोडी व कुकाजी सिवराम पाडाव व गोविंदरायाचे जरीपटक्याचे निशाण याप्रा आणिले. त्याजकडील आगीचा मार फार, याजमुले निकड करिता येत नाही. लागभाग पाहोन जे करणे ते करीत आहो. सावध राहाणे वगैरे कितेक मसलत करणे ते युग्तीने करीत आहो. सिधीस नेणार धण्याचे पुण्य. तुम्ही तिकडील बंदोबस्त हरयेक कामकाजाचा करणे तो पोख्तपणे करून वरचेवर लेहून पाठवीत जाणे. चार वेला त्यांची आमची गांठ पडली. त्यासच जरब बसली. परंतु आगीचे सामान भारी यामुले ज़मतात. नडियादेस प्रस्तुत आहेत. तेथे कांही पैका घेतात. पुढे महीतीरास जावे असे ऐकतो. त्यास हे मही उतरल्याखेरीज आम्हांस उतरता येत नाही. नडियादेहून कूच जाल्यावर आमचे पाठीमागे येतात किंवा महीतीराकडे जातात पाहावे. आम्ही सडे चहू कोशाचे अंतरे असतो. सुरतकराचा वकील तुम्हासी बोलत होता त्याचे बोलणे सिधांताचे काय ते कलले असेल; लिहन पाठवावे. आम्ही सावधगिरीस चुकत नाही; मग श्रीसता प्रमाण. मसलत लांबणीस पडली. ईश्वरी इच्छेने घडेल ते खरे. पैका नाही; वोढ मोठी पडली आहे. गायकवाडाचे माहालचा मजकूर लिहिला तो कलला. त्यास. तूर्त जप्ती न केली, फार चांगले केले. महीकाठी कोलवण जाले आहे. कागदपत्र निभावत नाही. तुम्ही हरकसा कागद आम्हांस पोहचे असा पाठवीत जावा. सलामसलत लिहीत जावी. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Hari Ballal informs Naropant that three engagements were fought near Nadiad, between his army and the combined forces of Raghunathrao and Govindrao Gaikwad, in one of which a number of horses and the ensign of the latter were captured.*

No. 212] [15-5-1775

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ १४ रावल मुा ठाणे आंकलेस्वर येथास्थित आसो विशेष. इकडील वर्तमान तर भडोचकर इंग्र(ज) व राजपिंपलेकर पुंजाजी वाघेला हे येकत्र जाहाले व गोविंदराव गायकवाड यांजकडील भडोचेत काादार जीवन गोलचिया रजपूत तेथे आहे. हे येकत्र होऊन हजार पाचसे भील जमा केले व गाडदी यैसे जमाव केला आहे आणि काही या भाटियात उतरले आहेत. त्यांची बातमी यैसी आहे की, आपल्यावर रात्रीस यावे. याप्रमाणे मनसबा करून तेथे बसले आहेत. आणि डाकहि बंद केली आहे. त्यास आपण सावधता राखावी. हे त्रिवर्ग येकत्र तों जाहाले, यांत संशये धरूं नये. त्यास येथे काठ्यावर काही आपले राऊत आसले तर बातमी पकी राखून वरचेवर सावधगिरीत आसावे. रस्ता तो केवल बंद जाहाला आहे. कलावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पुंजाजी वाघेला याजला आपणाजवल बोलाऊन आणून त्यांजला सांगून रस्ता घाटाचा बंद जाहला तो सुरलीत चालता करावा हे विज्ञापना. दुसरे जंबूसरचे ठाणे इंग्रजाने घेतले व तेथे आनाजीपंत वगैरे फौजा होत्या त्या उठोन गेल्या. दिवसे दिवस इंग्रजाचे बल आधिक होते. तरी याचा विचार करणे तो करावा. परंतु पुंजाजी वाघेला याजला बोलाऊन आणून राजवाडियाकडील बदोबस्त करावा व नदीस उतारहि गुढग्याइतकेच पाणी आहे. उतारहि जाला आहे; आणि नित्य उठोन सिबंदीची जारी भडो(च)कर नवी ठेवितो. कलावे हे विज्ञापना. सावकारी कासीद येथे आले. त्यानी वर्तमान सागितले की, श्रीमंत नडियादेवर मुा आहे व राजश्री तात्याचा मुकाम खेडीयावर आहे. पांच साहा रोज जाहाले. कलावे. पुढे तिक[डी]ल काही बातमी आली नाही. कलावे हे विनंती.

¶*Naro Ganesh informs Naro Anandrao that the English at Broach, Punjaji Vaghela of Rajpipla and Govindrao Gaikwad have all made a common cause and propose a night attack on his post against which he is asked to be on his guard.*

6114

*No. 213]* *[15-5-1775*

पौ छ २४ रावल सन श्री
खमस (स)बैन वैशाख वा ११
मु॥ कामरेज.

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सां नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता॥ छ १४ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ७ रावलचे पत्र पाठविले ते छ १२ मिनहूस पावले. इंग्रज लोक रातबिरात दगा करावयास चुकणार नाही. आपण सावध असावे. गोविंदराव श्रीमतास भेटल्यामुले इग्रजास चढ लागला आहे. तूर्त स्वस्त बसले आहेत. मोगलाने मुबईस पत्रे पाठविली आहेत, त्याजवर द्रिष्टी आहे. व्यारे येथील दोन तोफा आणिल्या. फर्माबा॥ गोले पाहिजेत. त्यास सुरतेत गुतरूपे खो॥ केली. येका दोहो रोजात दारू गोली आली म्हणजे उरपाडास तोफा घेऊन जातो, म्हणौन लि॥ व मुधोजी भोसले याजकडील मजकूर लि॥ तो सविस्तर कलला. तोफा घेऊन जाऊन युग्तीने उरपाडचे ठाणे घेऊन तंबी पोहोचवावी. इकडील वर्तमान तरी श्रीमंताचा मुकाम नडयादेनजीक आहे. नडयादेपासून काही खडणी घेतली म्हणौन वर्तमान आहे. आम्ही सडेच च्यार कोसाच्या अंतराने आहो. पुढे होईल वर्तमान लेहून पाठऊ. काल नडियादेहून येक कोस कूच केले. याउपरी कोणता रोख धरतील तो लिहून पाठऊ. पैक्याचा तोटा भारी पडला आहे. तिकडील वर्तमान लिहीत जाणे. बहुत काय लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke asks Naro Anandrao to attack Olpad with the cannons he has secured from Vyara.*

---

*No. 214]* *[15-5-1775*

पौ छ २४ रावल वैशाख
वा॥ ११ सन खमस सबैन
मु॥ को॥ कामरेज.

**श्री**

**पु॥ राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

विनती उपरी येथील कुशल ता॥ छ १४ रावल जाणौन स्वकीय लिहीणे विशेष. राजश्री नारो गणेश याणी आकलेस्वराहून पत्र लिहिले की भडोजकर

व राजपिपलेकर येकत्र होऊन बावापिराचा घाट कोली मेलऊन बंद केला. त्या मार्गाने स्वार वगैरे कोणी येकदर जाऊ देऊ नये याप्रा कलेले आहे. येविसी राजश्री नारोपंत व रा गगाधरराव रास्ते यास लिहून बदोबस्त करावा म्हणजे मार्ग चालेल. त्याजवरून आपण लिा आहे तरी सर्व कामे येकीकडे आणि मार्गाचा मजकूर येकीकडे. मार्ग चालोन कागदपत्र निभावला पाहिजे, याजकरिता राऊत पाच सातसे पावतो घाटाच्या बदोबस्तास ठेऊन मार्गास कोणेविसी दिकत न पडे ते करावे. हे गोष्ट आधी आधी करावी. घाट त्याणी बंद केलियावर ठीक पडणार नाही. घाटाचा बदोबस्त करून उतर पाठऊन देणे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Naro Anandrao is instructed to capture and keep open for transmission of news the ford of Babapir.*

---

*No. 215*]

पौ छ २४ रावल वैशाख [15-5-1775

वा ११ सन खमस सबैन

मुा को कामरेज तापी

दक्षिणतीर

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**

**नारोपंत स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १४ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. भडोजकर इग्रज व राजपिपलेकर येकत्र होऊन कोली मेलऊन बावापिराचा घाट बंद केला. त्याचा बदोबस्त केल्यासिवाये मार्ग चालणार नाही. याजकरिता रा नारोपंत नाना व राजश्री गगाधरराव रास्ते यास बदोबस्ताविसी लिहावे म्हणौन लिा ते कलले- त्यास येविसीच्या बंदोबस्ताचा मजकूर उभयतास लिहिला आहे. तुम्ही लिहून आधी ये गोष्टीचा बदोबस्त करणे. वर्तमान लिहीत जाणे. श्रीमंत नडियादेआलीकडे येक कोस आले. पुढें कोणीकडे जातात पाहावे. नित्य गोलागोली होतच आहे. श्रीसतेने घडेल ते खरे: बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*"Naropant Nana and Gangadhar Raste have already been asked as desired to defend the Babapir ford against the combined attack of the English, the Raja of Rajpipla and the Kolis", writes Hari Ballal to Naro Ganesh.*

नं. ३ ... ४९८ ता. ........

*No. 216]* *[21-5-1775*

## श्री

### श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
### स्वामीचे सेवेसी

सेवक नारो गणेश सां नमस्कार विनंती येथील कुशल ता छ २० रावल मुा कसबे अकलेश्वर येथे स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. राजश्री गोविंदपंत अणानी आम्हास पत्र लिा त्यात मार की मौजे बोरादरा पो वसराई हा गांव लुटिला, ते समई तुमचे सिपाई दिा धानासिंग याणी बैल आणिले ते विकले. त्यास बोरीयाचे बैल सोडिले. त्यास तीन बैल सिलेदाराजवल वोलखिले ते सरकारास सोडून घेतले. ते तोफखान्यास दिल्हे. त्यास सिलेदाराचे रुपये देवणे म्हणौन पत्री लिहिले. त्यास सिलेदार येथे आले. धानसिगास बोलाऊन आणिले. चौकशी मनास आणिता मौजे सारंगपूर पो मजकूर येथील कुणब्याचे तीन बैल गोपालभट मौजे मजकूर याचे मारफतीने व धानसिंगाचे गुजारतीने कुणब्यानी सिलेदारास विकत दिल्हे. बोरीयाचे बैल नव्हत ऐसी पुरती चौकशी करून सारगपूरकर कुण(बी) भटजी व सिलेदार सेवेसी पाठविले आहेत. हे कुणबी आपले बैल म्हणौन बैलाचे सेपूट वोरपतील, नसले तर न वोरपतील. स्वामीपासी कुणब्यानी क्रिया केली म्हणजे सरकारात बैल पाहिजेत तर सिलेदारास रुा देवऊन बैल सरकारात ठेवावे किंवा सिलेदारास बैल माघारे द्यावे. सिलेदारास बैल नकोत तर बैल पाठऊन द्यावे. आम्ही कुणबियाचे हवाली बैल करून सिलेदारास रुा देवऊ. यास स्वाम सर्वज्ञ आहेत. सरकारात बैल पाहिजेत तर गोविंदपंत आणाकडून आणवावे. खरे लटके ते म्हणतात त्याची चौकसी स्वामीनी करावी. सेवेसी श्रुत होय बहुत काये लिहीणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Ganesh reports to Naro Anandrao his findings in a case of an inquiry of bullocks taken away by men in the army.*

---

*No. 217]* *[23-5-1775*

## श्री

### श्रीमंत राजश्री नारोपंत
### नाना स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक नारो गणेश कृतानेक सा नमस्कार विनंती येथील कुशल ता छ २२ रबिलावल मुा आकलेस्वर वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीनी

आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा की, आकलेस्वरापुढे डाक चालत नाही. पत्रे माघारी आली. त्यासी त्याचा शोध करून लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास पुणियांहून डाकेचे कागद घेऊन येथे आले. ते येथील रामजी कासीद याणे उब्रर्याचे डाकेस गेला तो तेथे डाक नाही. गावकरी यासी विचारले त्यानी थाक लागू दिल्हा नाही. रेवीपलीकडे च्यार कोस उब्रे आहे. त्यापलीकडेहि माहा कोसावर डाक आहे, तेथेहि गेला. तो तेथेहि डाकीचा ठिकाण नाही. तेहि गाव भडोच परगणियाचे आहे. तेव्हा माघारा आला. लोकिकात वदंता आहे की भडोचकराने जासूद येते जाते कैदेत घातले आहे त्यामध्ये हेहि नेले की काये हे न कले. स्वामींनी आज्ञा केली की स्वार देऊन डाक पावती करणे. त्यासी दाहा वीस स्वाराचा निभाव व्होणार नाही. याजकरिता जासूद स्वामीकडे आले आहेत त्यास च्यार पाचसे स्वार देऊन डाकेचा बदोबस्त करावा. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh complains about the difficulties in the way of keeping communications and suggests means to remove them. He asks for military help.*

---

*No. 218*]

[*24-5-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य**

**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २३ रावल मुकाम गोरवे नजीक बडोदे दोन कोस जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष. तुम्ही पत्रे छ १५ छ १६ रावलची पाठविली ती छ २२ मिनहून पावली. प्रथम येक लढाई इंग्रजाची जाली त्याचे वर्तमान लिा ते कलले. त्याजवर आणिखी येक दोन लढाया जाल्या म्हणौन परस्परे एकितो, परंतु पत्र येत नाही तरी लिहावे. नवाब निजाम आलीखान याजकडील व रुकनुतदौला व इस्मालखान याजकडील व कितुराकडील व साष्टी वसईकडील वगैरे कितेके वर्तमान लिा ते सविस्तर कलले. ऐशास नवाब निजाम अलीखान याजकडील वर्तमान तरी तुम्ही लिाअन्वये दोहो चौहोकडील वर्तमान आलेच आहे. धारवाडाकडे कोनेरराव याची रवानगी पाच हजार फौजेनिसी जालीच आहे. राजपिपलवाला यास परभारे राजश्री फतेसिगराव गायकवाड याचे पत्र गेले आहे. बदोबस्त करितील. इकडील वर्तमान तरी छ १७ रावली श्रीमंताच्या

लढाई जाली. आम्ही तोफा लाविल्या होत्या. तोफावर फिरंगी यानी चालून घेतले तेव्हा आपल्याकडील लोकानी घोडे चालऊन हजार दीड हजार फिरंगी तुडऊन टाकिला. त्यात काही ठार व काही जखमी पाच सरदार ठार जाले. याप्रा होऊन मोडून माघारे घातले. आपलेकडीलहि लोक व थोडी जखमी व ठार जाली. नापाडचे मुकामी जुज जाले. तेथून श्रीमंत कूच क(रून) भडोजेच्या सुमारे दरकूच चालले. आम्हीहि पाच कोसाचे अंतरानें पिछावर आहो. आज त्याचा मुकाम पादरे म्हणौन गाव बडोद्यापासून आठ कोस आहे त्याजवर आहे. आम्ही लागभाग पाहोन सोये पडल्यास येक वेल गाठ घालतो. हरीपंत भिडे यांस फितुरी असे फिरंग्यानी ठराऊन जिवे मारिले. श्रीमंत रजबद्दल करीत होते, परंतु ऐकिले नाही. मराठे लोक भयाभीत आहेत. आम्ही मेहेनत करावयास चुकत नाही. श्रीकृपेने घडेल ते खरे. तिकडील वर्तमान लिहीत जावे. रुकनुदौला दग्याने मारले गेले. त्याजवर नवाबानी पुरंदरास खातरजमेने लिहिले की इमान येक आहे. जो करार तुम्हासी केला आहे त्यात अंतर होणार नाहीं. राजश्री मुधोजी भोसले नवाबास भेटले, अलजपूरकर भेटले, मुधोजीची ... व बोलावया ( अपूर्ण )

¶*Haripant Phadke describes the engagement which he fought with Dadasaheb at Napad and says that even after the severe fighting he has not slackened in the pursuit of the enemy. The execution of Haripant Bhide by the English for treachery and the murder of Ruknudaula and the assurance of good will by the Nizam to the Peshwa and Mahadji's fight at Ujjain are some of the items reported by the writer. (For the concluding portion see letter No. 227.)*

---

*No. 219]* *[25-5-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २४ रावल मुाा ठाणे अकलेस्वर वर्तमान येथास्तित असे विशेष. कोा मजकूरचा गाव मौज बोहलाव व प्राो हासट येथील गाव मौजे चाजरोली व मौजे परवत येकूण तीन गाव आपले लस्करचे कहीने लुटले. आम्ही तो गावास लावणीचा कौल देऊन वस्ती करितो आणि स्वामीच्या लशकरची कही मन माने तिकडे जाती आणि गाव मारितात. मग आम्ही येथे बसून काये करावे. आम्ही जे वर्तमान होते ते स्वामीस श्रुत करितो. प्राो याची वसाहात व्हावी यैसी

आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा की, आकलेस्वरापुढे डाक चालत नाही. पत्रे माघारी आली. त्यासी त्याचा शोध करून लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास पुणियांहून डाकेचे कागद घेऊन येथे आले. ते येथील रामजी कासीद याणे उबर्याचे डाकेस गेला तो तेथे डाक नाही. गावकरी यासी विचारले त्यानी थाक लागू दिल्हा नाही. रेवीपलीकडे च्यार कोस उबरे आहे. त्यापलीकडेहि साहा कोसावर डाक आहे, तेथेहि गेला. तो तेथेहि डाकीचा ठिकाण नाही. तेहि गाव भडोच परगणियाचे आहे. तेव्हा माघारा आला. लोकिकात वदंता आहे की भडोचकराने जासूद येते जाते कैदेंत घातले आहे त्यामध्ये हेहि नेले की काये हे न कले. स्वामींनी आज्ञा केली की स्वार देऊन डाक पावती करणे. त्यासी दाहा वीस स्वाराचा निभाव व्होणार नाही. याजकरिता जासूद स्वामीकडे आले आहेत त्यास च्यार पाचसे स्वार देऊन डाकेचा बदोबस्त करावा. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh complains about the difficulties in the way of keeping communications and suggests means to remove them. He asks for military help.*

---

*No. 218*]

[*24-5-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य**

**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ २३ रावल मुकाम गोरवे नजीक बडोदे दोन कोस जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष. तुम्ही पत्रे छ १५ छ १६ रावलची पाठविली ती छ २२ मिनहूंन पावली. प्रथम येक लढाई इंग्रजाची जाली त्याचे वर्तमान लि॥ ते कलले. त्याजवर आणिखी येक दोन लढाया जाल्या म्हणौन परस्परे एकितो, परंतु पत्र येत नाही तरी लिहावे. नवाव निजाम आलीखान याजकडील व रुकनुतदौला व इस्मालखान याजकडील व कितुराकडील व साष्टी वसईकडील वगैरे कितेके वर्तमान लि॥ ते सविस्तर कलले. ऐशास नवाब निजाम अलीखान याजकडील वर्तमान तरी तुम्ही लि॥अन्वये दोहो चौहोकडील वर्तमान आलेच आहे. धारवाडाकडे कोनेरराव याची रवानगी पाच हजार फौजेनिसी जालीच आहे. राजपिपलवाला यास परभारे राजश्री फतेसिगराव गायकवाड याचे पत्र गेले आहे. बदोबस्त करितील. इकडील वर्तमान तरी छ १७ रावली श्रीमंताच्या फौजेची व आमची

लढाई जाली. आम्ही तोफा लाविल्या होत्या. तोफावर फिरंगी यानी चालून घेतले तेव्हा आपल्याकडील लोकानी घोडे चालऊन हजार दीड हजार फिरंगी तुडऊन टाकिला. त्यात काही ठार व काही जखमी पाच सरदार ठार जाले. याप्रा होऊन मोडून माघारे घातले. आपलेकडीलहि लोक व थोडी जखमी व ठार जाली. नापाडचे मुकामी जुज जाले. तेथून श्रीमंत कूच क(रून) भडोजेच्या सुमारे दरकूच चालले. आम्हीहि पाच कोसाचे अंतरानें पिछावर आहो. आज त्याचा मुकाम पादरे म्हणौन गाव वडोद्यापासून आठ कोस आहे त्याजवर आहे. आम्ही लागभाग पाहोन सोये पडल्यास येक वेल गाठ घालतो. हरीपंत भिडे यांस फितुरी असे फिरंग्यानी ठराऊन जिवे मारिले. श्रीमंत रजबद्दल करित होते, परंतु ऐकिले नाही. मराठे लोक भयाभीत आहेत. आम्ही मेहेनत करावयास चुकत नाही. श्रीकृपेने घडेल ते खरे. तिकडील वर्तमान लिहीत जावे. रुकनुदौला दग्याने मारले गेले. त्याजवर नवाबानी पुरंदरास खातरजमेने लिहिले की इमान येक आहे. जो करार तुम्हासी केला आहे त्यात अंतर होणार नाहीं. राजश्री मुधोजी भोसले नवाबास भेटले, अलजपूरकर भेटले, मुधोजीची [illegible] व बोलावया (अपूर्ण)

¶*Haripant Phadke describes the engagement which he fought with Dadasaheb at Napad and says that even after the severe fighting he has not slackened i[n] [t]he pursuit of the enemy. The execution of Haripant Bhide by the English for treachery and the murder of Ruknudaula and the assurance of good will by the Nizam to the Peshwa and Mahadji's fight at Ujjain are some of the items reported by the writer. (For the concluding portion see letter No. 227.)*

---

*No. 219]* *[25-5-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २४ राबल मुाा ठाणे अकलेस्वर वर्तमान येथास्तित असे विशेष. कोा मजकूरचा गाव मौज बोहलाव व प्रोा हासट येथील गाव मौजे चाजरोली व मौजे परवत येकूण तीन गाव आपले लस्करचे कहीने लुटले. आम्ही तो गावास लावणीचा कौल देऊन वस्ती करितो आणि स्वामीच्या लशकरची कही मन माने तिकडे जाती आणि गाव मारितात. मग आम्ही येथे बसून काये करावे. आम्ही जे वर्तमान होते ते स्वामीस श्रुत करितो. प्रोा याची वसाहात व्हावी यैसी

स्वामीच्या मर्जीस असले तरी वस्ती राहील. नाही तरी तैसेच आम्हास आज्ञापत्र आले म्हणजे आम्ही स्वामीजवळ येऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाति. प्रा मजकूरचे रखवालीस राऊत सुमार २५ पाठविता तर बंदोबस्त होतो. यास्तव राऊत पाठवणे. बहुत काय (लिा) हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh complains against the raiding activities of the men in the army and requests the addressee Naropant Nana to stop them, otherwise it will go very hard for the writer to settle the province.*

---

*No. 220]*

*[29-5-1775*

**श्री**

**श्रीमंत राजश्री नारोपंत नाना०**
स्वामीचे सेवेसी

सेवक नारो गणेश साा नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १९ रावल पावेतो मुाा कोा अकलेश्वर येथे स्वामीचे कृपेकरून सुखरूप जसो विशेष. आपण लिाा की नर्मदातिरी बंदोबस्ताकरिता फौज आली आहे. त्यास नर्मदातिरी काही फौज आली नाही. दुसरे इकडील वर्तमान तरी भडोचकर इंग्रज याणे पोा जंबूसर व पोा आमोद ऐसे दोनी ठाणी बसविली आणि नारो शंकर याची फौज मौज सारग पोा बडोदे येथे आहे. त्याणी जबूसर परगण्याची व अमोद परगण्याची खराबी केली. यानतर तवऱ्याचे बेटात इंग्रजाचे माणूस च्यार पाचसे आले होते, त्यामुले मार्ग बंद जाहाला होता. प्रस्तु नारो शंकर याचे फौजेने भडोच परगण्याचे दोन च्यार गांव मारिले. जरबेने इंग्रजाची माणसे उठून गेली. अलीकडील तिरीचा मार्ग मोकला जाहाला. लोक येऊ जाऊ लागले. परतु पलीकडचे तिरी दिकत पडती. त्यास केसोपंतास आपण पत्र पाठवावे की भडोचे भवताले गांव मारणे आणि झाडेश्वरावर मुकाम करणे त्यामुले पलीकडीलहि मार्ग चालता होईल आणि भडोचवाल्यासहि जरब पोहोचल. त्यास आपण लिाा की नर्मदातिरी बदोबस्ताकरिता हजार राऊत पाठविती. त्यास फार उतम आहे. त्यास फौजेमधे जो सरदार असेल त्यास सागावे की परभारे वसराई परगण्यातून जावे आणि रेवातिरी कडव्या वडावर मुकाम करावा म्हणजे मार्गाचा बदोबस्त होईल. यानतर श्रीमंत राजश्री तात्याकडील अजूरदार कासीद.पाईक कालचे दिवसी आला. तो पुण्यास साहा रोजाचा करार करून पुण्यास कागद घेऊन गेला. त्याणे मुखजबानी वर्तमान सागितले की श्रीमंत राजश्री दादासाहेब महीपलीकडे दाहा

कोसावर व नडियादेच्यामधे मुकाम आहे. सोभोवोती आपली फौज चौ पाचा कोसावर आहेत. पावसामुले फौजेचा कूच जाहला नाही. राजश्री तात्याकडून फौज मार्गाचे बंदोबस्ताकरिता रवाना केली आहे म्हणून त्याणे सांगितले. त्या-वरून आम्ही जासूद बावापिराचे घाटास पाठविला आहे. वर्तमान आले म्हणजे आपणाकडे पत्र लिहून पाठऊ. त्यास आपण केसोपंतास पत्र लिहून पाठवावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. दुसरे थोरले लस्करचे वर्तमान तरी श्रीमत राजश्री दादासाहेब याचे लस्करात तीन पायेलीची धारण आहे आणि आपले लस्करात पाचा पायेलीची धारण आहे. आपले फौजेत खर्चाची तगचाई आहे यामुले अमदावादेस पटी केली आहे. यानतर भडोचे सेजारील गांव आपले फौजेने मारिले म्हणजे तो आपोआप दोही परगणियाची ठाणी टाकून पलेल आणि माघारा भडोचेस येईल येविसी केसोपंतास पत्र ल्याहावे. बहुत काये लिहीणे लोभ असो दीजे हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh communicates to Naro Anandrao the real state of affairs at Broach and asks for reinforcements to capture the posts occupied by English.*

---

*No. 221*] [*30-5-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २९ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २५ व छ २६ रावलची पत्रे पाठविली ती पावली. हाली श्रीमंत व इग्रज कोणीकडे जाणार, आपण कोठे आहेत, छावणी कोण्या ठिकाणी होणार म्हणौन व नवाबाकडील व इग्रजाकडील व पुरंदराकडील वगैरे कितेक वर्तमान तीन च्यार बंद लिहिले व राजश्री जैवंतराव याची जखम कसकसी आहे हे लेहून पाठवावे म्हणौन लि।. त्यास नवाबाकडील वर्तमान तरी छ २८ रावली पुरंदराहून पत्रे आली. त्यात लि। आहे की इस्मालखान आलजपूरकर यास नवाबानी धोशा व तहवरजंग यास सागोन मारून टाकिले. वरकड इकडील वर्तमान तरी श्रीमत भडोजेनजीक छ २७ रावली येका कोसावर जाऊन राहिले आहेत. पुढे नावा मेलऊन नर्मदापार होणार ऐसी बातमी आहे. आमचा मुकाम नर्मदा उतर तिरी बावा-पिराचा घाट पाच कोस टाकून जाला आहे. तेथून भडोज दाहा बारा कोस

आहे. श्रीमंत नर्मदापार जाले म्हणजे आम्ही पार जाऊ. कडावदाच्या वाटावर आम्ही जाणार होतो, परंतु तेथे पाणी फार आहे याजकरिता गेलो नाही. पुढें ते कोणीकडे जातील त्या सुमारे आम्हासहि जावे लागेल. रूकनुदौला मारले गेल्यावर मोगलाकडील व भोसल्याकडील संशय होता, परंतु नवाबाची पत्रे पुरंदरास खातरजमेची गेली व मुधोजीसी करार केला जे दादाचे लक्ष धरू नये. मुधोजी-कडील बोलणे व शफत घेऊन पुरंदरास गेले आहेत. पुरंदरीहून आम्हास लिहिले की मोगल भोसले आपले लक्षांत, इकडील कालजी न करणे. अलजपूरकर मोठा कुफर होता. मारला गेला, मोठी गोष्ट जाली. आपणास कलावे म्हणौन लिहिलें असे. इंग्रजाची दोन गलबते धुलपानी धरली असे वर्तमान. त्याजवर इंग्रजाचा जावई व कन्या सांपडली. खासा कोपीनीची म्हणून श्रीमंताचे लस्करातून तुलाजी आगरे याचे पुत्र संभाजी आगरे पलोन आले ते सागत होते. असे वर्तमान आल्यास सुरतेस आधी यावे. याची चौकसी करून लिहावे. संभाजी आगरे म्हणत कीं आम्ही इंग्रजाचे येथे तहकीक ऐकिले. सत्यमिथ्य ईश्वर जाणे. पुण्याहून काही लिहिले नाही. सरसुभा कोकणचा विसाजीपंत लेले यांस सांगितले सात हजार माणूस पायचे त्याचे हवाली केले. साष्टीचे टापूत उतरणार यसे लिहिले होते. कलावे बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती. सुरतकर मोगलाचा स्नेह होऊन कांही सरकारकाम होयसें असल्यास भोक पाडावे, हे विनंती.

¶*Haripant Phadke answers some of the queries of Naro Anandrao about the Nizam, the Bhonsle and the English. "Ismailkhan of Ellichpur has been done away with and therefore there is no fear from that side. The Nizam and the Bhonsle have promised to stand by the Peshwa. Dhulap has captured two English ships carrying important personages on board." These are some of the items mentioned by the writer in this letter.*

---

*No. 222]*

[*27-5-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २६ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. तुम्ही छ २२ रावलचे पत्र पुरवणीसुधा तीन बंद लेहून पाठविले ते पावले. प्रस्तुत आपण

कोठे आहेत, इंग्रज कोठे आहे, इग्रज भडोजेस जाणार म्हणौन ऐकितो. नवाब व मुधोजी भोसले अजपुरावर म्हणौन वर्तमान आहे. सरकारातहि बिघाड दाखवीत नाही. परंतु, खानदेशात येणार. त्याजकडील कागदपत्र श्रीमंताकडे येत जात असतात म्हणौन सुरत शहरातील बातमी आहे. व आणखीहि कितेक देशची अनुसंधाने मागील पुढील ध्यानात आणून नर्मदा पार व्हावे आणि बुलगे तापीपार करावे म्हणौन बहुत तपसिले वर्तमान लिहिले ते सर्व आक्षरशा वाचून पाहिले. त्यास आपण लिहिले मजकूर हे सर्व यथार्थच आहेत. परंतु नवाब व मुधोजी भोसले याजकडील राजकारणे पुरंदरच्या लक्ष्यात आहे. दुसरा प्रकार व्हावयाचा नाही असे वाटते. त्यात हे दिवस अखेरचे आले, याजमुळे तूर्त घडावयाचे नाही. इकडील वर्तमान तरी नापाड नजीक लढाई जाली. यावर श्रीमत इग्रजसुधा मही उतरोन दरकूच भडोजेच्या सुमारे आले. येका दोहो रोजात दाखल होतील. आम्हीहि त्याच्या पाठीवर तीन कोसाच्या अंतराने आहो. भडोजेस दाखल जाल्यावर पुढे मनसबा करून कोणीकडे जातात तो प्रकार समजात आल्यावर पुढे त्याप्रमाणे आपणास मनसबा करावा लागेल. तूर्त बुलगे नर्मदापार करून प्र...वे असा मजकूर आहे. याजकरिता आपण व रास्ते फौजसुधा नर्मदा दक्षण तिरास यावे आणि पत्र पाठवावे म्हणजे बुलगे समागमे फौज देऊन रवाना करू. आपण सडे मात्र राहो. पुढे जसी जसी सोये दिसेल तसे करावयास येईल. तुम्ही येऊन घाटाचा बदोबस्त जलद करावा. राजश्री जैवतराव यास गोळीची जखम लागली आहे, परंतु बरी होत आहे. काही चिंता न करावी. तुम्हांस नर्मदा तिरास यावयास लाब पडेल परतु काही राऊत पाठऊन बंदोबस्त बावापीरचे घाटाचा जाल्यास करावा. नाही तर तर आम्ही इकडून करू. उरपाडचे बोलणे मोगलाचे व तुमचे जाल्याचे वर्तमान लिहिले ते कळले. मोगलास मायेत घेऊन त्यास काही लालूच दाखऊन आपले मायेत येई, इंग्रजास च्यार गोष्टी सांगून दादाचा पक्ष सोडीत असे जाल्यास जरूर करावें. तुम्ही देसचे वगैरे वर्तमान लिहिले व नदीपार व्हावयाचे प्रकार लिहिले ते प्रमाण आहेत. भडोचेस गेल्यावर नदी उतरावयाचा विचार करितो. कळावें बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*On being informed by Naro Anandrao of letters passing between Dadasaheb and the Barbhais' allies Mudhoji Bhonsle and the Nizam, Haripant Phadke assures Naropant of their firm loyalty to the Peshwa. The writer further refers to the engagement with Dadasaheb at Napad and asks the addressee to start negotiations with the Mughal Subha of Surat and the English to induce them to leave Dada's side.*

No. 223]

[29 May 1775

**श्री**

**राजश्री हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी**

विनंति उपरी. आपण दोन पत्रे पाठविली ती पावली. आम्ही काल महीतिरास उत्तरतीरी वासदा नजीक मुक्काम केला. आज पुढें जावयाविसी बहुत येत्न केला, परंतु राजश्री बाबाचे विचारें आपले येणे जाहाल्यासिवाय येत नाहीं. श्रीमंताचा मुक्काम काल उडेरा काइली नजीक छाणी साहा कोशावर येथून मुक्काम होता. आज पुढें कूच करून भाइली गोत्री तले विहीरीचे पाणी चार कोसावर आहे तेथें जाणार. प्रात:काली कुचयाची तोफ जाहाली, आणखी चार पांच घटिका दिवस आल्यावर वीस पंचवीस तोफाचे बार जाहाले. मग बडोद्या-जवल गेले कीं कोठें गेले हे कलले नाहीं. श्रीमंताचे लष्करांतून बातमीचा जासूद आला त्याणें सांगितले कीं घर फौजेचा व इंग्रजाचा सुटला. पलतात, लवकर भडोजेस जाणार. पाठलाग कराल तर गांठ पडोन सर्व काम होते येसें आहे. परंतु सुस्तीमुलें उपाय नाहीं. पांच असामी इंग्रज मातबर ठार पडे हरिपंत भिडे यांस इंग्रजानें फितुरी ठराऊन जिवे मारिले. लडाईचे वेलेस फौजेस सर्वांस तुरे लावावयास सांगितले होते. याणें तुरा लाविला नाहीं. त्यास आमचे लष्करचा असेल म्हणून गोल्या देऊन मारले असेल. परंतु सर्वावर इभरत बसोन दहशत पडली आहे. आमचा पाठलाग होत नाहीं इतकाच मात्र कमी पक्ष पडला. या उपर आपण आलियावर जो ठराव होणे तो होईल. कलावे. रवाना इंदुवार दीडप्रहर दिवस सकाळचा हे विनंति.

*¶Haripant Tatya is informed of the movements of Raghunathrao and is further advised to pursue him as far as Broach where it is expected he would be completely overcome. Haripant Bhide was taken to be a traitor and was shot by the English.*

---

No. 224]

[May 1775 ?

**श्री**

सा। नमस्कार विनंती. आपली आज्ञेप्रमाणे काल सांकाली शहरी प्रविष्ट जालो. आजी भेट सकाली प्रहरा दिवसा जाली. साद्यंत वर्तमान सांगितलें. सरंजामाविषई आज्ञा होती ती सांगितली. त्याचे उत्तर उदईक सांगो. घोडी अरबी येथे सवदागराच्या घरी दाहापाच आहेत ते त्यानी पाहावयासी आणिवले आहेत. बकसीच्या मर्जीस चांगला आला तर लेहू; अथवा आपला परीक्षक

 8602210

चांगला असेल तर पाठवावा. कागद जरी आहेत ते झाले (के?) आहेत. कारण की दोचौ महिन्याचे आहे. तयास्तव (ब)कसिजीनी * नत्रे सध्या करविले आहेत. त्याच्या तयारी पाचा दिवसात होईल. वरकड कितीक तोफा-तिफी जिनस सर्व फराचिसाच्या कोठीत आहे. तेथेच आम्हास आजी पाठविणार आहेत. पाहोन सर्व लेहून पाठवितो. मुमईची पत्रें आद्याप आली नाही. आज उद्या येतील असे सांगत होते. दुसरे आज खेड्याचे मुकामचा कासीद आला त्याचे वर्तमान यांची त्याची त्रितियेस लडाई जाली. सा घटका राजश्री हरिपंत तात्या होते. मग महमदाबादेवर गेले. खेड्याचा किला इंगरजाने घेतला. राजश्री फतेसिंगबावाहि मागे गेले, असे वर्तमान आहे. पहिली लडाई तरतूद व मागील तरतूद असली (?) आली आहे ते जबानी श्रुत करीन. पहिल्या लडाईच्या तिसऱ्या दिवशी दुसरी लडाई जाली; व मिस्तर बेचर काल रात्री स्वार होऊन रातोरात उरपाडेस गेला. शे दीडशे माणूस आणिक घेऊन गेला. कळावे; यानी दोन पत्रे मुमईस पाा आहेत. उतर आलियावर सर्व कळेल. वरकड वर्तमान जासूद जबानी सांगता कळेल. दालचिनीचे तेल तेरा चवदा रुपया प्र तोळा आहे त्याप्राा रुपया पाठवाल तितके घेऊ. लवंगाचे रुपयी दीडा रुपयी तोळा मिळते. दालचिनी सा रुपयाची शेर मिळते. यंदा दालचिनीचा तोटा आहे. वरकड सर्व मिळेल हे विनंती.

¶*The letter refers to some skirmishes between the English and Haripant Tatya and Fatesing Gaikwad in Gujarat near Kaira and Mehmedabad.*

---

*No. 225]* *[May 1775*

## श्री

साां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. आज मंदवारी दोन प्रहर रात्रीस पुरंधराकडून डाकेन येथे पत्रे आली. सेवकास सरकारचे छ २० सौवलचे आज्ञापत्र आहे. त्यांत मजकूर की, रुकनुंदौला यांस दगा गाडद्यानी केला. नवाबाचा व मुधोजी भोसल्याचा सल्लख जाला. येथून उभयेतासी सल्लख आहे. तिकडून खातरजमेची पत्रें आली. कोणेविसी दिकत नाही. इस्मायेलखान आलजपूर न देई यास्तव हला करून मारले. जाबतजंगास सांगोन इसमालखानाचे डोके कापिले. इस्मायेलखानाने रुकनुदौलास दगा केला यास्तव इस्मायेलखानास मारले. मुधोजी भोसले नागपुरास गेले. नवाब आलजपूरचा बंदोबस्त करून छावणीस जातील याप्रो वर्तमान तहकीक आले. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे पुण्यप्रतापे दुष्टाचे

पारपत्य आपले आपूणच होत आहे. काही चिंता नाही. स्वामीसहि सरकराचे पत्र आहे ते जासुदाबार पाठविले आहे. प्रविष्ट होऊन श्रुत होईल हे विज्ञापना. आपणाकडे आंकलेस्वरापुढे डाक वसवायास जासूदजोडी म्या काल रात्रौ पाठविली होती. स्वामींनी येक जोडी देऊन चौकडा[1] तेच क्षणी लस्करातून ताकीद करून पाठवायाचे होते. त्यास जासूद प्रहर दिवसास लस्करातून घोरपड घेऊन येथे आले. कठोर पैकी जोडी देविली आहे. हे जासूद दिकत घेतील आधीच सांगितले होते. सेवटी येथून येक जासूद देऊन दोन प्रहर दिवस चढता येथून डांकेवर रवाना केले जासूद. हे विज्ञापना.

*¶The letter mentions Ruknudaula being put to death by Ismailkhan who in turn was murdered by Jabitjang (Dhausha). Later on the letter also refers to a compromise between Mudhoji Bhonsle and the Nizam.*

---

No. 226]

[May 1775

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. यास पत्र पाठविले ते पावले परंतु पेटलादेस राहिले नाहीं. नदी उतरोन पलीकडे गेले. असो पलीकडे गेले हे कामच जाले. त्यास लेहून पाा आहे. आपणहि त्यास पत्रे पाठऊन आपल्याजवळ घेऊन जावे आणि बंदोबस्त करावा. जबूसर चागोजी कदम याणी ठाणे वसविले म्हणोन पत्रे आले. त्याजकडे पत्र वरचेवर पाठऊन बंदोबस्त राखावी. इकडील जसे द्रिष्टीस पडेल तसे लिहून पाठऊ. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. उतावली कोणे गोष्टीची न करावी. तजविजेने लाग पाहून येकाधे जागा निकड करून पारपत्य करावे म्हणजे फिरोन लबाडी करू पावणार नाहीत. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

*¶Haripant Phadke informs Naro Anandrao that Jambusar has been captured by Changoji Kadam and advises him to proceed very cautiously.*

---

No. 227]

[May 1775

श्री

पुा[2] राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. स कारकून गेले आहेत. बहुत नरमाईनें पत्रे लिहिली होती. स्नेहच करू. रुकनुदौला गेल्यामुळें कांही वाकडे पडत नाहीं म्हणौन श्रीमंतांचे

१ चहूंकडे. २ पत्र हरीपंतांचें.

पत्र पुरंदराहून आले. आपणास कळावे म्हणौन लिहिलं असे. श्रीमंताचे मानस भडोचेस जावयाचं. तोच मार्ग धरला आहे. भडोचेस गेल्यावर तुमची आमची भेट होईल. मग जसा विचार करणे तसा करूं. राजश्री माहादजी सिंदे उजनीस गेले. चतुर्थीस लडाई जाली. याची जरब त्याजवर चांगली बसली. आपलेकडील लोकांनी शर्त केली. राजश्री जयवंतराव बाबास गोली लागली हे वर्तमान पेशजी लिहिले आहे. गोली आंत राहिली आहे परंतु चिंता नाही. आपण काळजी न करावी. मालोजी घोरपडे जखमानी जेर होते परंतु वाचायाचे पंथास लागले. चिंता नाहीं. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*This is the concluding portion of letter No. 218.*

---

*No. 228*] : [*5-6-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**

**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो॥ हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथिल कुशल ता॥ छ ६ रबिलाखर मुकाम बावापिराचा घाट रेवा उतर तीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २९ रावलचे व छ ४ रबिलाखरचे येकून दोन पत्रे पाठविली ती पावली. बावापिराचा घाट मोकला आहे. राजपिपलेकराचे भील पलोन आपल्या जाग्यास गेले. श्रीमंत नर्मदा उतरले म्हणजे आपण उतरोन यावे. इंग्रेज यांजकडील व साहुकारी मिलोन येकशे येकवीस गलबते वादलाने बुडोन काही बंदरोबंदरी जागा जागां लागली तेव्हां काही धुलपासहि सापडली असतील. गलबते साहुकारी बुडाली याजमुले कितेक सावकाराची दिवाली निघाली. सुरतकर मोगलाचा सरकारात स्नेहच आहे, परंतु परस्वाधीन यास्तव त्याचा उपाये नाही. मी प्रेत्नास आलस करीत नाहीं. मिस्तर मुष्टीन पेशजी पुणियास गेला होता तोहि लवकरच येत आहे. इंग्रजाचे मानस सलूक करावा ऐसे आहे. परंतु सुरतकर हरामज्यादा आहे. सुरतेत ग्रहस्थ आहे तेथून बातमी आम्हास येत्ये. मिस्तर मोष्टीन आलियावर होईल वर्तमान ते लेहून पाठऊ म्हणोन वगैरे कितेक वर्तमान लि॥ ते सविस्तर कलले. रास्ते बुनगे पोहोचवावयास गेले. रा॥ आनंदराव निबाजी व कृष्णाजीपंत हजार स्वारानिसी येथे आहेत म्हणौन लि॥ ते कलले. इकडील वर्तमान तरी श्रीमंत इग्रेजसुधा झाडेस्वरावर उतरतीरी मुकाम करून राहिले आहेत. उतरोन जावे असी बातमी आहे, परंतु आद्याप दम धरिला आहे. याचा भाव काये आहे हे समजत नाही.

आम्ही आज छ मजकुरी घाटावर आलो. पुढे होईल मनसबा तो लेहून पाठऊ. तुम्ही तिकडील बारीक मोठे वर्तमान चौकसीने वरचेवर लिहीत जाणे. बुनगे पोहचवावयास खासा रास्ते गेले याचे कारण काय व बुनगे पलीकडे का लाविले ? छावणी करणें तेव्हा बुनगे माघारे आणतील की काय ल्याहावे. नदीस पाणी दोन दिवस आले आहे. उतार पाण्यास लागला आहे. उतार जाला म्हणजे पलीकडे उतरतो. श्रीमंत भडोचेस छावणी करितील किंवा सुरतेस येतील हे समजत नाही. बोलवा तर नदी उतरावयाचा आहे. घडेल ते लिहू. आकलेश्वराकडे पायेगुडे व रास्ते यांजकडील हजार राऊत बुनगे उतरले ते सांभाळून आणावयास पाठविले आहेत म्हणौन लिहिले ते कललें. नदीचे पाणी दोन दिवस वाढले आहे. आज उतार लागला आहे. उतरावयाजोगे जाले म्हणजे उतरून तुम्हाजवल येऊ. पुढे करणे तसे करूं. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*The havoc done by a storm to the English ships and other cargo ships and the consequent bankruptcy of some of the merchants is communicated to Naropant by Haripant Phadke. "Raghunathrao is at Zadeshwar along with the English and intends shortly to cross the river. It is not certain whether he will encamp at Broach or come down to Surat", says the writer.*

---

*No. 229*]

[8-6-177

**श्री**

**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. दोन च्यार दिवस तुम्हाकडील वर्तमान कलत नाही, लिहावें. श्रीमंत दादासाहेब झाडेश्वराजवल होते ते शुक्लेश्वरावर आले. आम्ही बावापिराचे घाटी आहो. पाणी आले होते त उतरत चालले. येक दोन दिवस पाऊस नाही पडला तर उतार होईल. कालपासून कांही पथके उतरावयास लाविले आहे. तुम्हाकडील फौज रास्ते याजकडील आनदराव व पायेगुडे आले आहेत ते आकलेश्वराजवल आहेत. त्यास आम्ही राहिला या सुमारे दक्षणतिरी बलाविले आहे. येतील. श्रीमंतांचा उतरावयाचा बोलवा आहे. कधी उतरतील पाहावें. बडोदे डबई वगैरे माहालचे रखवालीस फौज ठेवणे, त्यास तुमची भेट जाल्यावर रवानगी करूं. रास्ते बुनगे लावावयास गेले होते ते आले की नाही ते ल्याहावे. तुम्ही राहिला तेथे रास्ते अगर बालाजी खंडेराव ठेऊन तुम्ही सडे आम्हांस येऊन भेटतां तर कितेक गोष्टी बोलण्यांत येत्या, त्याप्रों करावयास

येईल. तेथील बंदोबस्त करून जरूर पुढे दक्षणतिरास यावे. मुष्टीन मुंबईहून सुरतेस येणार होता. आला कीं नाही ते लिहावे. नवल विशेष वर्तमान लिहीत जावें. रा छ ९ रबिलाखर दोन प्रहर दिवस बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

*¶Haripant Phadke gives his own movements and also of Raghunathrao—especially the possibility of his crossing the river. He further enquires whether Mostyn has arrived at Surat from Bombay.*

---

*No. 230]* *[22-6-1775*

**श्री**

**राजेश्री राणोजी नाईक निंबालकर**

**गोसावी यांस**

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो सिदोजी नरसिंगराव सितोले देशमुख प्रा पुणें रामराम विनंति उपरी मुकाम डबई नजीक नदीवरी येथें जेस्ट वद्य ...पर्यंत सुखरूप असो विशेष. आपणांकडोन बहुत दिवस पत्र येऊन ...न कलत नव्हतें. सांप्रत्ये पत्र आलें त्यावरोन सविस्तर कलों आलें. ...तरी आपण लिहिलें जे आपण तेथें जावोन बसला आणि येथें नानाप्रकारचे ...द्रव जाले आणि अपाये जाला. त्यास येविसई गुदस्तां आपणांजवळ दोन ...हिणे बसलों. परंतु आपणांस ती गोष्ट अणकूल न पडली. बरें असो. आपण लिहिलें जे आपण येथें यावें, सर्व बंदोवस्त होऊन येईल. त्यास इकडे सांप्रत्ये प्रजेण बहुत लागला आहे. अस्विन कार्तिक मासीं येऊन पोहोंचतों. कलावें. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांसी हरिपंत फडके याणी सात आठ लढाया घेतल्या. परंतु मोडले गेले. हजार दोन हजार घोडे माणूस पडले त्याकडील. यानंतरी बावापिराचे घाटावरी खासा हरिपंत उतरत होते ही बातमी श्रीमंतास कललियावरी रात्रीचे भडोचेहून कूच करोन प्राथकालीं दिवस दोन तीन घटका येतांच उतारावरी गाठले. त्यास दोन तीन हजार घोडे पाणियांत बुडाले. माणसें बुडालीं. पलीकडे बुनगे व दारकोजी निंबालकर वगैरे सरदार उतरले ते कोलियानी लुटले. हजार पांचसें घोडे व तोफा सात आठ लूट लस्करांत आली. हरिपंत पलोन मालवियाकडे गेले. कलावें. श्रीमंतांनी तमाम ठाणी या प्रांतीं बसविलीं. फतेसिंग व खंडोजी गायेकवाड याच्या आज उद्यां भेटी होणार. फौज तीस बत्तीस हजार व फिरंगी वीस बावीस हजार पाईचा व पांच सात हजार घोडीं पावील (?) व तोफा संभर सवासें

बरोबर आहेत. डबई बडोदियांत ठाणी वसलीं. कलावें दुसरें वर्तमान शाहाजी नाईक निंबालकर गोला लागून पडले. राजश्री मालोजी घोरपडे वगैरे सरदार फार जखमी जाले व पडले याप्रमाणे वर्तमान आहे. आपण कागद देऊन माणसें पाठविलीं तीं आम्हांपासीं आलीं. त्याची याची गाठ न पडली. कलावें. आम्ही अस्विनमासीं खामखा ये देशास आलों. कलावें. वरकड जबानी माणूस सांगतां कलों येईल. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*The skirmishes between Raghunathrao and Haripant Phadke in Gujarat and the defeat and woeful plight of the forces of the latter are communicated by Sidoji Shitole to Nimbalkar.*

---

*No. 231*]

[*22-6-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सा। नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता। छ २३ रबिलाखर मुकाम धर्मपुरी नर्मदा उतर तीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्हाकडून पत्रे आली ती पावोन त्याची उतरे गेलीच आहेत, पावतील. इकडील वर्तमान तरी आजच आम्ही मुकाम मजकुरास आलो. पुढे नावा जमा करावयाविसी पत्रे गेली आहेत. ज्या घाटास नावा जमा होतील त्या घाटाने रेवा उतरावी असा मजकूर आहे. काही फौज व बुलगे तिकडे उतरोन तुम्हाजवल आले आहे. त्यास बुलगे आधिक उणे असले ते लावावे. फौजानी राहावे म्हणौन राजश्री मलबा बापू यास सागितले आहे. त्यास बुलगे लाविले की न लाविले, फौज आहे त्याजपैकी राहिली किती, गेली किती, हे वर्तमान सविस्तर लेहून पाठवावे. आम्ही रेवा उतरोन दक्षणतिरास आलो म्हणजे तुम्हास लिहून पाठऊ. सोनगडास गोविंदराव यांचे ठाणे आहे. त्याणे मार्गास अवरोध होतो. त्यास मलबा तुम्ही मिलोन सोनगड घेऊन तेथील बदोबस्त व सयाजी गायकवाड आपले स्वाधीन राहात असे करावे. सुरतेची बंदी आहेच. चांगली आसो द्यावी. वर्तमान लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal informs Naropant Keskar of his arrival at Dharmapuri and of the arrangements that he made for crossing the river Narbada. He advises a strict and close blockade of Surat.*

No. 232] [23-6-1775

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो। हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. सुरत प्रांतचे माहाल गायकवाडाकडे आहेत. त्यापैकी कांही माहाल फौजेस त्याणी दिल्हे आहेत. तेथील अमल चालविण्याविसी सरकारचे पत्र आपल्यास आहे. येथून मामलतीचे कामास रा। लक्ष्मण रघुनाथ पा। आहेत. हे आपल्यास भेटतील. यांचा अमल बसऊन द्यावा. सिलेदार फतेसिंगबावा बराबर जात नवते. मोठ्या प्रयासें करून हा प्रकार काढून त्याजबा। लाऊन दिल्हे. याजकरितां आपण बंदोबस्त करून द्यावा. भाणा धनजी व कल्याणजी नथू देसाई परागंदा जाले आहेत. त्यास हे कौल देऊन आणितील. तुम्ही त्यास दिलासा देऊन ते येऊन आबादी होय ती गोष्ट करावी. अगत्यवाद धरून कार्य करावे. रा। छ २४ रबिलाखर बहुत काय लिहीणे लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal asks Naro Anandrao to help Lakshman Raghunath in settling and assessing the rent from the province round about Surat given by the Gaikwad for the maintenance of the army.*

---

No. 233] [27-6-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो। हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २८ रबिलाखर मुकाम नजीक धर्मपुरी नर्मदा उतर तीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. आम्ही बावापिराच्या घाटावरून कूच करून इकडे आलो. काही फौज व बुलगे नर्मदा उतरोन तापीतिरास गेले. त्यापासून तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान काहीच कलत नाही. आम्ही इकडून येक दोन पत्रे पाठविली होती ती पावली न पावली हेहि कलले नाहीं. तुम्हीहि पत्रे पाठविलीच असतील, परंतु मार्ग दुर्घट झाडी बहुत, माणूस निभावत नाही, याजमुले कागद पावत नाही. आम्ही धर्मपुरीनजीक जाऊन तेथे उतरावयास नावा जमा फार जाल्या तरी तेथे उतरो. नाही तरी बडव्यास जाऊन तेथे उतरोन तुम्हास लेहून पाठऊ. बावापिरावरून माणूस निभावत नाही याजकरिता तिकडून आमच्या सुमारे कागदपत्र पाठवीत जावे म्हणजे पावतील. राजश्री मलबा बापू व तुम्ही मिलोन तिकडील बंदोबस्त

राखावा. सोनगडचा बंदोवस्त करून आपले हवाली करून ठेवावा. उपयोगी पडेल. मधीच खूल कामाचे नाही. तुम्ही बदोबस्त केलाच असेल. लिहून पाठवावे. आम्ही फार लांबलो, इलाज नाही. नदी उतरून येत आसो. पाऊस फार. च्यार दिवस अधिक लागतील. चिंता नाहीं. वर्तमान वरचेवर लेहून पाठवीत जावे. सविस्तर बापूचे पत्रांत लिहिले आहे त्यावरून कलेल. वहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal complains about the difficulties in the way due to jungles, etc., which is responsible for the delay in correspondence. The writer suggests some measures to be adopted for the defence of Surat and for wresting Songad from Govindrao.*

---

*No. 234*]

[*27-6-1775*

**श्री**

**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. आपण छ १८ राखरचीं पत्रें पा ती पावली. वर्तमा कललें. राजश्री मलबा बापू बुनगेसुधा पावले म्हणौन लिा ते कलले. उ २ इकडे आल्यामुले थोडेसे विस्कलीत पडेल, चिंता नाहीं. आम्ही निकड करावे नदी उतरून येत असो. तुम्ही बापू फौजसुधा सोनगडाजवल राहून सोनगडचे व सुरत आठाविसीचे माहालचा बंदोबस्त करावा. आम्ही निकड करून येतो. सर्व भरवसा तुमचा आहे. रा छ २८ राखर हे विनंती.

¶*Haripant Phadke asks Naropant to make proper arrangements for the defence of Songad and Surat district till his arrival there.*

---

*No. 235*]

[*26-6-1775*

**श्री**

यादी नावनिसीवार. येणेप्रमाणे कुटुंबे धरून किल्यात कैद करावी घरे लुटावी बिा

१ लक्षुमण नरसी कुळकर्णी वोतूरकर. जर कुटुंब वोतुरी नसेल तरी जुनरात बालाजी नाईक पांडे सावकार यांचे येथे. जर तेथेहि नसेल तरी मौजे आंबेगव्हान खदारमाल नादुरापासी मुळखळीस आंबेघारगावाचे आसपास. तिन्हीतून येके जागा आसेल.

१ बाळाजी नाईक पांडे सावकार जुनरकर यांचे कुटुंब हवेली जुनरात आहे. मारनिले श्रीमंत दादासाहेबाचे लस्करात दुकान घालून आहे. पेशजी खरगसिंगानी श्रीमतास पुन्यात दगा केला, त्याजला नाइकानी दाहा हजार रुो कर्ज दिल्हे होते. हाली धारेचे किल्यात बाईसाहेबास कर्ज देतो. कारभार करितो.

१ त्रिसाजी हरि बाम नि॥ आंताजी माहादेव मेंदळे याचे कुटुब कल्यानात आहे.

१ आंताजी माहादेव मेंदळे विसाजी हरीचे धनी यांचे कुटुंब कल्यानात आहे. धारेची मामलत मारनिलेची आहे. विसाजी हरि मेंदळ्याचा कुलकुला कारभारी आहे. घरचा सुखी आहे. सधन आहे.

१ नारो बापूजी रिसबूड यांचे कुटुंब मुरूड सोनदुर्गापासी आहे.

१ आपाजी गणेश भागवत यांचे कुटुंब कोकनात आहे. स्त्री शांत जाली. भावाची कुटुंबे व मारनिलेचा पुत्र आहे. यांचे घर राजश्री सिवराव माहादेव यांसी पुसावे. ठीक लागेल.

१ नेतोजी जगताप पागया यांचे कुटुंब मौजे सरकळ तुळापुरापासील, तेथे नसले तरी डोळस नेवाळेश्वरे पोखरीपासील तेथे आसेल.

७

ये॥ सात जनांची कुटुंबे धरून घरे लुटून उतम प्रकारे पारपत्ये होईल तरी धारेचे किल्यात बाईसाहेब आहेत ते मसलत पुढे हालकी पडेल. नाही तर मसलत भारी पडेल. झाडून माळव्यात खुळ मातेल. पुढे जड जाईल रा॥ छ २७ माहे राखर.

¶*This is a list of persons whose families were put into confinement and properties confiscated for being accomplices of Raghoba.*

---

*No. 236]* *[29-6-1775*

## श्रीशंकर

### श्रियाविराजित राजश्री नारोपंत दादा

पोष्ये खंडेराव बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ आशाढ शुद्ध २ जाणून स्वकीये लेखन करीत आसिले पा॥ विशेष. नवाब याचे कूच आलजपुरीहुन होऊन आलीकडे आले. औरंगाबादेस छावणीस येणार

याप्राा लस्करातून पत्र राजश्री जिवाजीपंत वकील याचे आले. महमद इसब गाडदी राा भोसले याजकडे होता. त्याजपासून गेला म्हणून यैकिले. राजश्री मुधोजी भाो हे निरोप घेऊन नागपुरास जाणार म्हणून यैकिले. सेवेसी श्रुत होये. विशेष काये लिहिणे लोभ आसो द्यावा हे विनंती.

¶*Khanderao Ballal to Naropant, informing him that the Nizam has left Ellichpur and is expected to encamp at Aurangabad. He also writes about Muhammad Isaf having left the Bhonsles.*

---

*No. 237*] [*June 1775*

श्री

+पुाा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. इंग्रेजाचा काही जमाव मुंबईस जाऊन तेथून पुण्याकडे गडबड करावी, दुसरे त्रिबकाकडे गडबड करावी असी बातमी पुण्यास आहे म्हणौन आम्हास लिहिले होते. त्यास तुम्ही घाट चढोन वरते आलेत. आम्हाकडे यामुले बातमी ठीक कलत नाही. त्यास तुम्ही जवळ आहा. सुरतेत सारी बातमी कलते. तेथे हर कोणाचे द्वारे पकी बातमी राखोन आम्हाकडे व पुरंदरास लिहीत जावे. बातमीविसी आलस करू नये. च्यार रुा खर्च पडला तरी करावा परंतु खामखा बातमी राखावी. नाना, काल येक प्रकारचा आला आहे, सावध असावे. आम्ही तापी उतरून लौकर येतो. परंतु इकडे आपा वामनराव कामगारीस गेले आहेत. ते आले म्हणजे तापी उतरून येतो. आपण तेथे मंडली आहे त्याणी सर्वांनी येकमते असावे. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant writes to Naro Anandrao asking him to keep a good look out for the English who are reported to be planning an attack on Poona or Trimbak.*

---

*No. 238*] [*2-7-1775*

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पाो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ राखर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २७ रावलचे पत्र पाठविले

+ पत्र हरिपंत तात्याचें.

ते छ १ राखरी पावले. बापूजी हरि याजबराबर पाच सातसे गाडदी व हशमी माणूस व देवजी आवधूतराव जठारकर यैसे येऊन गंभीरगड कोल्यानी घेतला होता तो माघारा घेतला, व बालाजी विठल फडके याचे घरावर जजीरकर शामलाने दरवडा घालावयासी लोक पाा होते. ते दिवसी बालाजीपत कुटुबसुधा वसईस गेले. बचाव जाला. वरकड कोणाचे वाटेस गेले नाहीत. सरकारचे पत्र इस्मालखान नवाबाने मारल्याचे आले. त्याची नकल पाठविली आहे त्यावरून कलेल म्हणौन लिा ते कलले. इकडील वर्तमान तर श्रीमंत इग्रजसुधा आद्यापि भडोजेसच आहेत. उतरावयाच्या विचारांत आहेत. ते नदी उतरले म्हणजे आम्ही उतरू. श्रीमंत भडोचेस छावणी करूत किंवा सुरतेस जाऊत. बडोदे प्रांती गायकवाडसुधा दाहा हजार फौज ठेविली पाहिजे. त्यास गायकवाडाचे फौजेचा गवगवा, आमचे कोणी ठेवावे तर नाही नाही म्हणतात. तदोतर नदी उतरावे. तापीपलीकडे यावे, तुमची भेट होईल मग करणे तसे करावे असे आहे. तुमचे मते कसा विचार करावा ते लेहून पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनंती.

¶ *"Raghunathrao is at Broach along with the English but thinks of crossing the river", writes Haripant Phadke to Naro Anandrao, promising him that he would also push beyond the river after Dadasaheb.*

---

*No. 239]* *[4-7-1775*

पौ⁺ छ २१ जोवल

सीत

**श्री**

सेवेसी हरि बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ९ जमादिलोवलपावेतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री कोनर झिमदेव याणी श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडे ग्रहस्त आहेत, त्या ग्रहस्ताची याद लेहून पाठविली ती स्वामीकडे पाठविली आहे. पावल्यावर यादीप्रमाणे बंदोबस्त जाला पाहिजे. पवाराचे माहालचा बंदोबस्त त्रिंबकराव सिवदेव यांचे विद्यमाने व्हावा म्हणून कोनेर झिमदेव लस्करांतून पाठविले. स्वामीनीं चिंतो कासी पाठविले ते व कोनेर नाईक येक होऊन बंदोबस्त करीत आहेत. धारेस मातुश्रीजवल पवाराकडील ग्रहस्त आहेत. फार करून त्रिंबकराव शिवदेव याचे

---

+ पैबस्ति नाना फडणीसाचे हातची.

मारूफातीचे परंतु बखेड्यास अनकूल जाले आहेत. त्याची याद पाठविली आहे, त्याप्रो जफ्ती करावयास आज्ञा करावी. तिकडील जफ्तीचा बोभाट इकडे आला म्हणजे सारी मंडली कोनेर नाईकाकडे मिलोन सरकारचे काम होईल. बंदोबस्त लौकर करावा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

*¶Haripant encloses a list of the names of certain individuals who were committing treason and asks the addressee to get them properly punished. The list is probably the one printed at No. 235 above.*

---

*No. 240*] [*6-7-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत
नाना स्वामीचे शेवेसी

पो मल्हार जगजीवन सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ ७ जोवल मु॥ गलनिंत्र प्रवरातीर जाणून स्वकीयें कुशल लि॥ जावें विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावलें. राजश्री हरिपंत तात्या फौजसुधां आलीमोहनचे रानातून महेश्वरचे सुमारें आले. रेवा उतरण्यास चिखलदे व आकबरपूर येथे आले, ऐसी बातमी रनाल्याहून यादवराव रघुनाथ याचे कारकुनानी लि॥ म्हणौन लि॥, उतम आहे. त्यास आम्ही मजल दरमजल तिकडेच येतों. तुम्ही पिंपलनेराजवल मुकाम करून राहाणे. पोटास नाही, सबब बुणगे झाडून लोकाचे देसास गेले. कोन्ही कोन्हास पुसले नाही. लोकहि फार गेले. थोडे राहिले ते तशात तुम्ही पत्र लि॥ हे पाहून माघारे फिरले. मजल दरमजल येतो. पुरंधरचीहि आज्ञा आली. आपण पिंपलनेरा आलीकडे पलीकडे राहावे तो आम्ही येतो. येक सांडणीवर पोटासच पागेच्या चंदीबद्दल सात हजार रु॥ पाठवावे. आम्ही आले वाटेने माघारे येतो. तात्यासहि लेहून मुजरद पाठवावे. भेटीनंतर सर्व वर्तमान कलेल. हे विनंती.

पो सदासिव अनंत सा॥ नमस्कार विनंती. लिहिले परिसोन सदैव पत्र पाठवावे. आम्ही आपले पत्रावरोन माघारे फिरलो. दरमजल येतो. बातमी लिहिली ते कलली; आणखी कलेल ती लिहावी. लोभ करावा हे विनंती.

राजश्री बालाजीपंत स्वामीस सा॥ नमस्कार. लोभ कीजे हे विनंति.

*¶Malhar Jagjivan learns from Naro Anandrao the arrival of Haripant and his army near Maheshwar and says that he will also soon proceed to meet the addressee.*

No. 241] [7-7-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो। हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल छ ९ जमादिलाखर मुकाम नजीक बऱ्हाणपूर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ २ जमादिलाखरचे पत्र पाठविले ते छ जमादिलाखरी पावोन लि। वर्तमान सविस्तर कळले. श्रीमत इग्रजसुधा रेवा उतरोन आकलेस्वरावर आले म्हणौन वर्तमान बातमीचे आले. येक मनसबा कोकणातून जावे, येक मनसबा सोनगडच्या सुमारे यावे असाहि मजकूर आहे. त्यास आपण तापी उतरोन लौकर यावे म्हणजे ठीक पडेल. आम्हास आपण लिहितात की राजश्री गंगाधरराव रास्ते व तुम्हीं नवापुराकडे जाऊन ठाणे घेऊन पुढील बदोबस्त करणे, तो आम्हीहि येणे, म्हणौन लि। त्यास फौजेचा प्रकार तो वारंवार आपणास लिहीत गेलो. तिकडे कोणत्या ऐवजावर जावे ? गेल्यासासारिखे कामकाज जाले म्हणजे उत्तम. नाही तरी बदलौकिक. ऐसे कितेक तपसील लि। ऐशास सोनगड प्रांतींहून तुम्ही येकदर न येणे म्हणौन पत्रे जात आसता तिकडील शह टाकून आला, त्याजमुले तिकडे दगा होऊन नवापूरपावेतो देशमुखाने ठाणी बसविली. तुम्ही असता तरी दगा न होता. आसो ज्या गोष्टी जाल्या त्या उत्तम जाल्या. याउपरी तरी तुम्ही व रास्ते मिलोन नवापूरचे ठाणे घेऊन तिकडील बदोबस्त करणे. राजश्री आपा व वामनराव आले म्हणजे आम्ही लौकरच तिकडे येतो. आपाची व महमद इसफ याची आद्याप गाठ पडली नाही. साता कोसाचे आतर आहे. आम्ही तुम्हाकडे लवकर यावें. तुम्ही आम्ही येक होऊन तिकडील मसलत करावी हेच मानस, परंतु इसफाचे काम मधी पडले यामुले दिसगत लागली. त्वरा होईल तितकी करीतच आहे. लवकर येतो. आपण तिकडील बातमी राखोन वरचेवर लिहीत जावे. सावध असावें. सावधगिरीविसी आपणास ल्याहावें असे नाही. पत्रांच्या सिलसिला वरचेवर असावा. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke notes the lines of action suggested by Naropant Nana to meet the contingencies arising from Dadasaheb's plan either to go to Konkan or to go to Songad after having crossed the Nerbada with the English. He asks the addressee to return to Navapur as his absence there has enabled the Deshmukh of that place to reoccupy some of the posts.*

No. 242]

[9-7-1775

**श्री.**

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना केसकर स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १० जमादिलोवल मुकाम नजीक मडलेश्वर नर्मदा तक्षणतीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. छ ३९ राखरचे नवापूरचे मुकामीहून पत्र पाठविले ते पावले. बावापिराच्या घाटास नर्मदा उतरोन बुलग आले ते तापी उतरोन देशी रवाना केले. आपण डबईच्या सुमारे गेले. तिकडे जासूद पाठविले परंतु निभाव जाला नाही. परतोन आले. आलीमोहनच्या रानातून महेस्वरच्या सुमारे नर्मदा उतरावयास गेले असे वर्तमान जासुदाने सांगितले, त्यास आपण कोणे ठिकाणी आहा, रेवा कोणत्या घाटाने उतरणार हे लेहून पाठविले पाहिजे; बुलगे तापीतिराहून देशी रवाना केले. आम्ही तापीतिरी राहिलो, परंतु प्रज्यन्य बहुत, छावणीस जागा चागली नाही याजकरिता पिपलनेरास मुकाम केला. आपले पत्र येईल त्याप्रा पुढे करू. सिलेदाराची वगैरे गुरे व किरकोल बुलगे देशी जाईल. राजश्री मलबा बापू व दोन तीन पागा आहेत ते व राजश्री सदासिवपत करमरकर मालगावासमीप राहावे असा त्याचा आमचा करार आहे. राजश्री गोविंदराव सदासिव पागा व आणखी सिलेदार आपल्या खर्चास ऐवज काही नस्त काही हुड्या ऐसा आला आहे. आपली बातमी पकी कलल्यावर त्या सुमारे रवानगी करू, या आन्वये पुरंधरांस वर्तमान लिहिले आहे. आपण बहुत सावधपणे नर्मदा उतरावी. राजश्री विसाजीपंत जोगदंड याचे पत्र बातमीचे आले तेच आपलेकडे पाठविले आहे त्याजवरून सर्व वर्तमान ध्यानात येईल. सारांश आपण कोठे आहेत, काये वर्तमान हे तपसीलवार लेहून पाठवावे म्हणौन लिा ते सविस्तर कलले. त्यास आम्ही मंडलेस्वरानजिक दोहो कोसावर नर्मदा उतरावयास आलो. नर्मदा दक्षणतिरास फौजसुधा उतरोन आलो. थोडी बहुत फौज राहिली ती आज संध्याकालपावेतो उतरेल. राजश्री तुकोजी होलकर यास निरोप देऊंन आशाढ सुा त्रयोदशीस कूच करून ब्न्हाणपूरच्या सुमारे तापी उतरावयास यावे असे मानस आहे. महमद इसफ गाडदी आलजपुराहून दोन तीन हजारानिसी नर्मदा उतरावयास बडव्याच्या घाटास येत होता, तो आमचे फौजेची बातमी कलल्यावर हाड्याच्या घाटे उतरावयास गेले असी बातमी आहे. त्याजवर हाड्याच्या घाटापावेतो फौज काही पाठवावी असा मनसबा आहे. तोफखाना पुढे ब्न्हाणपुरास रवाना केला. दोन दिवस जाले. तुम्ही व रास्ते सोनगड

6138

नं. ३ ... नं. ७९९

प्रांती राहून सुरतेची बंदी राखावी आसे असतां आगदीच सोडून आलीकडे आम्ही हे कसे केले ? सुरत अठाविसीचा बंदोबस्त कसा राखिला हे कळत नाही. आमचा मनसुबा फिरोन फौजेनसी सोनगड प्रांती छावणी करावी असा होता. हा मजकूर राजश्री मलबाचे बोलण्यात आले होते तथापि (अपूर्ण).

¶*On being asked by Naro Anandrao as regards his whereabouts, Haripant Phadke informs him of his arrival at Mandaleshwar after having crossed the Nerbada. He asks the addressee for a contingent being sent against Muhammad Isaf. He also inquires as to what arrangements were made by the addressee for the defence of Surat.*

---

*No. 243*] [*12-7-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना केसकर स्वामीचे सेवेसी**

पो॥ हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ १२ जमादिलोवल मुकाम नर्मदा दक्षणतीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशष. तुम्ही छ ३ जमादिलोवलचे पत्र का॥ दहीवले नजीक पिपलनेर येथील मुकामीहून पाठविले ते छ ११ मिनहून पावले. बुलगे व पागा राजश्री मलबा बापू व राजश्री सदासिवपंत करमरकर मालेगावासमीप आहेत. त्यास आम्ही आलीकडे आणविले आहे. राजश्री गोविंदराव सदासिव पागा व सिलेदार हजार बारासे स्वार पुरंदराहून खर्चास घेऊन आले आहेत ते उदईक आम्हापासी येतील. आपले पत्र येताच बुलगे व खर्चाचा ऐवज रवाना करितो म्हणौन व भोसले नवाब याजकडील वगैरे कितेक वर्तमान लि॥ ते सविस्तर कळले. इकडील वर्तमान तरी आम्ही फौजसुधा दक्षणतिरास नर्मदेच्या आलो, ब्र्हाणपूरच्या सुमारे येत आसो. राजश्री कृष्णराव बलवंत यासमागमे पाच हजार फौज देऊ(न) हाड्याचे सुमारे महमद इसफ गाडदी आलजपुराहून धारेस जावयाकरिता आले आहेत म्हणौन त्याजवर रवाना केले आहेत. गाठ पडल्यास पारपत्य होईल. आपण व राजश्री नाना रास्ते यांणी सुरतेचा बंदोबस्त करून राहावे असे असता अगदीच उठोन पिंपलनेराकडे आलां हे कसे केले ? तिकडे तुम्ही असतां तर फार चांगली गोष्ट होती. चहूकडील बातनी येती. नाना, तिकडून आला हे ठीक नाही. खजिना आला तो मलबाकडे पाठविला असेल. मलबा बापूनी बराणपुरचे सुमारे यावे म्हणौन लिहिले आहे. येतील. आपण सुरतेकडील बंदोबस्त करावा. आम्ही मलबा

6139

बराणपुरी येकत्र जाल्यावर छावणीचा ठराव होईल तो आपणास लिहून पाठऊ. तिकडील वर्तमान आपणाकडे येत असेल ते लिहून पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती."

¶*Haripant Phadke to Naro Anandrao reporting his arrival on the southern bank of the Nerbada. He further writes that he himself is proceeding to Burhanpur having deputed Appa Mehendale against Muhammad Isaf. He expresses surprise as to why the addressee proceeded to Pimpalner instead of guarding Surat.*

---

*No. 244]*

*[13-7-1775*

**श्री**

पुा राजश्री नारोपंत नाना केसकर स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १४ जमादिलोवल जाणौन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे. राजश्री फतेसिंगराव गायकवाड यासी व राजश्री खंडेराव गायकवाड या उभयेतासी बोलोन दोघाची गोडी करून दिल्ही. फतेसिंगराव याणी बडोद्यात राहून बंदोबस्त करावा. खंडेराव याणी नडियादेत राहून आमदाबाद येथील कितेक कामकाज असेल त्याचे साहित्य हरयेकविसी करावे, याप्रो बोलोन आण शपत क्रिया होऊन निरोप दिल्हा. सुरत प्रांते फतेसिंगराव याजकडील माहाल आहेत. त्याजपैकी दोन लक्षाचे माहाल सिलेदारास त्याणी लाऊन द्यावे. बाकी माहाल राहातील तेथील बंदोबस्त सरकारातून करावा, आणि ऐवज त्याजकडे पाठवावा. याप्रो करार आहे. त्यास तुम्ही सुरत प्रांती राहोन मारनिले याजकडील माहालचा बंदोबस्त करावा म्हणजे तिकडील कितेक राजकारणेहि समजण्यात येतील. फतेसिंगराव बडोद्यास गेल्यावर श्रीमंत राजश्री दादासाहेब फौजमुधा जाऊन नजीक उतरोन मोर्चे लावणार असे कलल्यावर फतेसिंगराव याणी सलुकाचा पेगाम लाविला आहे म्हणौन वर्तमान आहे. त्यास बहुतकरून ते सलुकाचा मजकूर करणार नाही. तुम्ही सुरत प्रांती असल्याने तिकडील मजकूरहि कसकसे होतात हे कलतील आणि बंदी केली आहे त्याचा बंदोबस्त राहील. याप्राा प्रकार आहे. हा तुम्हास कलावा म्हणौन लिा असे. +बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant informs Naropant Keskar of an agreement having been effected between Fatesing and Khanderao Gaikwad.*

---

\+ पत्र हरिपंत तात्याचे.

No. 245] [13-7-1775

श्री

सेवेसी बहिरो रघुनाथ सां नमस्कार विनंती. ता छ १४ जमादिलोवल गुरुवासर दोन प्रहर येथास्थित असे विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालो ते आज दोनप्रहरा येथे ठेंगोडेयास दोन प्रहरां आलो. सायंकाळीं चांदवडबारीखाली मुकामास जातो. उदईक चांदवडबारी चढोन कोकमठाणावर गंगा उतरावयास जाऊ. मदनेश्वरचे नांदुरावर गंगा उतरोन झोळीचंदनचे घाटे जावे तर मार्ग ठीक नाही. यास्तव निंबदेव्हारेयाचे घाटे जाऊ. दोन मजला अधिक पडतील. दौलताबादचा किला नबाबास दिल्हा. त्याचे लोक वर चढले म्हणौन वर्तमान आहे. नबाबाचे बुनगे औरंगाबादेस आले. मागाहून सडेहि औरंगाबाजेस छावणीस येणार म्हणौन येथे वर्तमान औरंगाबाजेकडील भला माणूस आला त्याणे सांगितले. कलावे. गुजराथेस वर्तमान कलत नाही म्हणौन आपण कोंडाइबारी व घोडेघाटचा बंदोबस्त कागदपत्र कासीद धरावयाचा करोन मल्हार बाबूराव कारकून ठेविले आहेत. त्यास गुजराथेतील माणूस त्या दोही घाटे येत नाही. वरसेयास घाटाखाली येऊन वरसेयाचे घाटे वर चढोन पिंपळनेर गावातोन किंवा पिंपळनेर डावे टाकून कासीद, जासूद ब्राम्हण वगैरे ताहराबादेस येतात. आमदाबाद, भडोज, बडोदे चोहोकडील व सुरत देखील माणसे त्या मार्गे येतात, त्यास पिपळनेर आथवा ताहाराबादेस चौकी व कारकून ठेऊन कासीद व कागद धरावे, म्हणजे तिकडील श्रीमंताकडील वगैरे वर्तमान वरचेवर कलत जाईल. आद्याप बडोदे श्रीमंतानी घेतले नव्हते. फतेसिंग बडोद्यात आहेत. राजकारण लागले आहे. महीपार श्रीमंताकडील कोणी आद्याप गेले नाही म्हणौन महीपारचे ब्राम्हण सुतेंवरून आले, कालच विरमगावी भेटले, त्याणी जबानी वर्तमान सागितले. कलावे. सदरहू कागदपत्र कासिदाचा बंदोबस्त जाला म्हणजे आपणास वर्तमान वरचेवर कलेल. नवापुरास चिमणराव हजार माणसानिसी मंगळवारी गेला आहे कलावे. जाणे ते पकी बातमी आणऊन जावे. श्रुत व्हावे हे विनंती. राजश्री बालाजीपंत फडणिसास सा नमस्कार विनती. लिा परसोन सदैव पत्री तोषवावे हे विनंती.

¶*Bahiro Raghunath writes about the dangers that people had to face when coming down from Gujarat and therefore suggests another safer path. He further informs that none from Raghoba's side has so far been able to cross the Mahi.*

No. 246] [19-3-1775

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही छ ६ मोहरम छ ८ मोहरमची पत्रे पाठविली ती पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कलले. श्रीमंतानी शहरांत राहून माणूस जमा केले. पाईचे माणूस व तोफ शहराबाहेर निघाल्या आहेत. आम्ही सुरतेची नाकेबंदी केली आहे. आणखी फौज दाहा हजार पाठवावी म्हणजे सर्व बंदोबस्त होईल. भडोचची बंदी झाली पाहिजे म्हणौन लि॥. त्यास तुमचे लिहिल्यावरून चांगोजी कदम याची रवानगी तुम्हाकडे केली. मागाहून दुसरी फौज पाठवावी तों काल शनवारी खंबईतहून पत्रें आली की श्रीमंत गलबतात बसून शुक्रवारी खबइतेस दाखल जाले. पंनास साठ गलबत सरंजाम भरून आली. त्यावरून खंबाईतचा बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां आंम्ही फौजसुधा ह्या सुमारे जातो. राजश्री वामनराव भावनगराहून फिरले. आम्हाकडे येणार. त्यांसि लेहून पो आहे की तुम्ही खबाईतचे सुमारें राहावें. चांगोजी कदम यास लिहिले आहे जे तुम्ही बडोद्याचे सुमारे राहाणे. गायकवाडाकडील मजकूर तर उभयतांचे कारभारी आले. त्याची निशा पकेपणे केली. त्याणी भेटीस यावे असा निश्चय जाला. येऊन भेटावे असे आहे. मग ईश्वरी सता. श्रीमंत खंबाईतीस आले तेव्हा आम्हांस तिकडे जाणे प्राप्त. तुम्ही सुरत भडोचची बंदी चांगली करावी. वर्तमान वरचेवर लिहीत जावें. सुरतेहून छापा घालावयास तीन हजार माणूस व तीन च्यार तोफा निघाल्या होत्या, परंतु आम्ही सावध होतो, माघारे गेले म्हणौन लि॥ ते कललें. तुम्ही रात्रदिवस बहुत सावधपणें राहात जाणे. श्रीमंतांचे कागदपत्र त्या प्रांती जातील येतील याची चौकसी जितकी होईल तितकी करीत जावी. तुम्ही सावध आहा, फार ल्याहावेसें नाही. देसचे वगैरे वर्तमान अधिक आगलें आढलेल ते लिहीत जावे. रा छ १६ मोहरम बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke informs Naro Anandrao that he has detached Changoji Kadam to his assistance and that he himself is following Raghoba to Cambay. He reports favourably about the negotiations with the Gaikwads and asks the addressee not to slacken in his vigilance.*

---

+ पत्र हरीपंताचें.

No. 247] [22-7-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना केसकर स्वामीचे सेवेसी

पो। हरि बलाल सा। नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता। छ २३ जमादिलोवल मुकाम नजीक आशेर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ १३ जमादिलोवलचे को। दहीवेल पा। मजकूर येथील मुकामीहून पत्र पाठविलें तें पावले. पाच सात पत्रे लेहून जासूदजोड्या आपणाकडे पाठविल्या परंतु पावोन उतरे आली नाहीत. नर्मदा उतरोन कोणत्या सुमारे येणार? छावणी कोणत्या ठिकाणी होणार? राजश्री मलबा बापू बुलगे घेऊन गंगापार गेले होते. त्यास पुरंदराहून पत्रे आलियावर फिरोन माघारे साखरीवर येऊन मुकाम केला आहे. आपले पत्र येईल त्याप्रा। करितील. राजश्री गोविंदराव सदासिव ऐवज घेऊन पुरदराहून आले ते आम्हापासी आहेत. राजश्री मलबा व गोविंदराव ऐवज देऊन आपणाकडे रवाना करितो. पत्राची मार्गप्रतीक्षा करीत आहो. सुरत शहरात आठरा लक्ष्याची पटी जाली आहे. निकडीने वसूल होत आहे. सरंजाम करावयास लागले आहेत. श्रीमंत बडोद्यास जाऊन मोर्चे लाविले आहेत. फतेसिंगराव याजकडून भानगडहि लागली आहे. बहुतेक करून गुता उरकला असेल. तेथून आमदाबादेस जाणार व दुसरा मनसबा सुरत प्राती यावे, सोनगडी जमाव होत आहे. आपण सोनगडाकडे छावणीस (जा)वे ऐसे पुरदराहून लि॥ आले आहे. आपण येत * * आम्हास येथेच मुकाम करावयास सागितले आहे. आपली मार्गप्रतीक्षा करीत आहो म्हणोन लि॥ ते कलले. ऐसियास आम्ही येका दोहो रोजानी बऱ्हाणपुरास येतो. तेथे आलियावर लेहून पाठऊ. राजश्री मलबा बापू व खजिना बऱ्हाणपुरच्या सुमारे पाठऊन द्यावा. छावणीस तुम्हाजवल यावे, तुमचे विचारे होईल तेथे महिना दोन महिने राहावे आसे आहे. मलबा बापू बा। बुनगे होते ते देशास गेले ही गोष्ट वाईट जाली. असो कसेहि करून तुम्हाजवल येतो, मग करणे तसे करू. तुम्ही गुजराथची बातमी राखोन वरचेवर आम्हास व पुरंदरास लिहीत जावी. मा। इसुफ भोसल्यापासून रुसकत होऊन धारेस जात होता. सरकार माहालास उपद्रव करू नये आसा करार, त्यास माहालास उपद्रव फार केला, पैका घेतला. हांड्याकडे आहे असे वर्तमान आम्ही नर्मदा उतरत असतां कलले. त्याजवर नर्मदा उतरून राजश्री आपा व वामनराव आठ हजार फौज रा। केली आहे.

गांठ पडल्यास पारपत्य करतील. नदी उतरला तर माघारे येतील. आम्ही बराणपुरास येतो. तेहि मागाहून येतील मग तापी उतरूं. आम्ही व मलबा बापू बा। फौज आली ती सुरत प्रांती राहातेस म्हणजे मोठे काम होते. बापूचे फौजेस पोटास नाही म्हणून आले. तुम्ही मागाहून आला येणेकरून तिकडील (अपूर्ण).

*¶Haripant Phadke informs Naropant Nana that he would soon proceed to Burhanpur as desired by the writer and that Appa Mehendale and Wamanrao Patwardhan have both been sent against Muhammad Usaf who, while on his way to Dhar, ravaged the country. He further asks the addressee to send Malba and the treasures from Poona to Burhanpur.*

---

*No. 248]* *[24-7-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २९ जमादिलोवल मुकाम नजीक आशेर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही को। दहिवले येथील मुकामीहून छ १९ व छ १६ जमादिलोवलची पत्रे पाठविली ती छ २३ मिनहूस पावली. राजश्री मलबा बापू यास सोनगडच्या सुमारे राहावयास सांगितले आहे. ते तुम्ही मिळून सोनगड घेऊन बंदोबस्त करणे म्हणोन लि। त्यास खर्चाची वोढ भारी, याजकरितां मलबाची फौज देशी गेली. मागून थोडी बहुत राहिली ती घेऊन राजश्री मलबाहि घेऊन गंगापार गेले होते. त्यास पुरंदराहून पत्रे आली की माघारे जाणे. त्याजवरून राजश्री सदासिवपंत व मलबा माघारे आले ते साखरांवर आहेत. ब्र्हाणपूरच्या सुमारे येणे म्हणोन आपली पत्रेहि आली. त्याजवरून तिकडे खजिना घेऊन येत आहेत. पुरंदराहून आज्ञा आम्हास आली आहे कीं नवापूर येथील बंदोबस्त करून सोनगडावर दबाव घालणे. तोपर्यंत राजश्री हरीपंतहि येतील. तिकडे छावणीस येतील. हली आपणहि लि। त्याजवरून चाकरीस बेउजूर असो. जे येतील तितक्यास घेऊन नवापूरचा बंदोबस्त करून देऊन सोनगडाकडे स्वारी येक दुसरी करितो. तोपर्यंत आपण लौकरच यावें. अशांत निकड केल्यास सोनगड हस्तगत होईल. शत्रूचा थारा मोडेल; लौकर न येणे जाले तरी दाहा हजार फौज व तोफखाना रवाना करावा. पुढें सोनगड येणे कठिण पडेल.

जमाव होईल. सोनगडचे पारपत्य जाले म्हणजे सयाजी गायकवाड सहजच येतील. आपली मार्गप्रतीक्षा नवापुरी करितों म्हणोन कितेक तपसिले वर्तमान लिा ते कळले. ऐसियास सुरत अठाविसी येथील • बंदी आजपावेतो राखिली असतां तिकडील अगदीच शह सोडून आला हे गोष्ट, आजपावेतों जाली ते निर्फळ. आम्ही तिकडे येतों ऐसी पत्रे वारंवार जात असतां शह सोडून अलीकडे आला त्याजमुळें तिकडे रान मोकळे जाले. असो जे जाले तें जाले. आतां तुम्ही नवापुराकडे जाऊन तिकडील बंदोबस्त करून सोनगडाकडे दवाव देणे. आम्ही लवकरच येतो. परंतु राजश्री वामनराव व राजश्री आपा फौज देऊन महंमद इसफ याजवर रवाना केले आहेत त्यास आठ च्यार दिवस लागतील. ते आले म्हणजे तिकडे छावणीस येतों. राजश्री मलबा बापू व सदासिवपंत यास बऱ्हाणपूरच्या सुमारे वलाविले आहेत. येतील. तुम्ही तिकडे असतां आम्हा काळजी करावीसे नाहीं. वर्तमान वरचेवर लिहीत जावें. आम्ही लौकरच येतों. बहुत काय लिहिणें. गुजराथची बातनी पकी राखोन लिहीत जावें. बहुत काय लिहिणें, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal to Naropant Keskar reprimanding him for leaving his station and asking him to go and capture Navapur, which was easy to be attacked as Dadasaheb had retired.*

---

*No. 249*] [*26-7-1775*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २७ जमादिलावल मुकाम आशेर जाणौन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ १८ मिनहूचे पत्र पाठविले ते पावले. सुरतेची बंदी करून राहिलो होतो. त्यास सोबती राहिनात, कूच करून जाऊ लागले, व आम्हाबराबर फौज आहे त्यास खर्चास नाही. पुरंदराहून सत्रा हजार रुो मात्र पाठविले. लोकाचा पोटाचा गवगवा मोठा याजमुळे तेथोन निघोन मुकाम मजकुरास आलो. मागे सोनगड-करानी नवापूर वगैरे ठाणी घेतली, कमाविसदारांचे बोभाट येतात याजकरिता घाटाखाली गेल्याखेरीज आब राहात नाही. सोबती घाटाखाली येत नाहीत यास्तव राजश्री जनार्दन रायाजी ठेऊन घेतले. त्याचे सात रोजमरे चढले. त्याचे बेतालीस हजार रुो जाले ते तीन महिनियाने दरमाहा चवदा हजार रुा द्यावे,

याखेरीज पुढे सरकारचे फौजेबराबर पुढे रोजमरा देत जावा, ऐसा करार करून ठेऊन घेतले आणि तूर्त वीस हजार रुो दिल्हे तेव्हा समजाविसी जाली. येक दोन दिवसी घाटाखाली जाऊन ठाणी सोनगडकरानी घेतली आहेत ती घ्यावयाचे मनसब्यात आहो. आपले येणे जाल्यास उतम. नाही तर सात हजार फौज व पाच तोफा पाठऊन द्याव्या म्हणजे सोनगडचाहि समाचार घेऊ म्हणौन विस्तारे लिहिले ते कलले. ऐसियास तुम्हास दोनतीन पत्रे गेलीच आहेत की नवापुरास जाऊन ठाणे हस्तगत करून तेथे मुकाम करावा आणि पुढे जसजसी सोये जाण्याची पडत जाईल तस तसे जाऊन तिकडील बंदोबस्त करावा आणि तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. राजश्री आपा व राजश्री बामनराव बाबा महमद इसफ याजवर रवाना केले आहेत ते आले म्हणजे आम्ही तिकडे सोनगडच्या सुमारे छावणी करावयास येतो. तुम्ही तिकडील शह सोडून रान मोकले न पाडणे. नवापूरचे ठाणे घेऊन बंदोबस्त केला म्हणजे सहजा-तच पुढे शह पडत जाईल. तो आम्ही मागाहून येत आहो. आलो म्हणजे सोनगडासहि पायेबद यावयास येईल. नवाब छावणी करावयास औरंगावादेस छ १९ जमादिलोवली दाखल होणार. छ ९ मिनहूचे पत्र जिवाजीपंत याचे आले. मोगलाकडील व भोसल्याकडील राजकारण ठीक आहे. श्रीमंताकडील बातनी चागली राखोन आम्हाकडे व पुरंदरास लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke notes the contents of a letter from Naropant Nana about his movements and some monetary difficulties and advises him to plan an attack on Nawapur which only—he says—would check the movements of Dadasaheb. He further says that he himself would march to Songad.*

---

*No. 250*]

[*28-7-1775*

## श्री

### राजश्रियाविराजित राजमान्य
### राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो गणेश हरि साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ २९ जमादिलोवल मुकाम पुरंदर जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन पुण्यास आलो. श्रीमत राजश्री नानाचे दर्शन घेतले आपल्याकडील सविस्तर सांगावे तो पुरंदरास आले. समागमेच येणार होतो परतु कामामुले राहाणे जाले. पर्वाच्या दिवसी पुरंदरास आलो. श्रीमत

राजश्री बापूचेहि दर्शन जाहालें. आपल्याकडील सविस्तर वर्तमान निवेदन करितो. आपण म्हणतील की, तुम्ही आम्हासी करार केला असता दिवसगतीवर कसें घातलें.? त्यास आम्ही पुण्यात आलो त्याचे दुसरे दिवसी राजश्री चिमाआपाची भेट घेतली. आपले पत्र त्याजला दिल्हे. वर्तमान सागितले. त्याणी जाबसाल केला त्याजवरून सावकासीवर धरिलें. त्याणी आपल्यास लिहिलेच असेल. स्वामीचे बोलणे असे होते की तुम्हास आम्ही वर्तमान डाकेबरावर लिहीत जाऊ. आपलियापासून स्वार जाहालियास येक मास जाहला, परतु विस्मरणच जाहाले. असोत. भरवसा होता. याउपर तरी लिहिले पाहिजे. आम्ही आपल्यास पत्रे मार्गाहून च्यार पाठविली ती पावलीच असतील. इकडील वर्तमान नवल विशेष ल्याहावेसे नाही. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती. रा बहिरोपंत मेहदले यास पत्र लिा आहे. पावते करावे हे विनती.

राजश्री बालाजीपंत दादा स्वामीचे सेवेसी साां नमस्कार विनंती उपरी लिा परिसोन लोभ करावा. आपली फार पत्रे आम्हास आली. दादा, आपणास स्मरण आमचे फार राहिले. बोलल्याप्रोच केले. असोत. अत:पर तरी पत्र पाठऊन परामर्ष करावा. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनती.

¶*Ganesh Hari goes to Purandhar and communicates the message from Naro Anandrao to Bapu and Nana. He also explains that it was his visit to Chimaji Appa that caused delay in his way.*

---

*No. 251]* *[31-7-1775*

पौ छ ६ जमादिलाखर

**श्री**

**श्रीमंत माहाराज राजश्री तात्या**
**स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक माधवराव बहिरव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ २ जमादिलाखर पावेतों माहाराजाचे कृपेकडून येथास्थित आसोन विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत दादासाहेब याजकडून मातुश्रीस व राजश्री तुकोजीबावांस पत्रें आलीं, त्यांतील आर्थ कांहीं कलला नाहीं. श्रीमंत बडोद्यावरच आलीकडे साता कोसावर आहेत. त्याजकडे याणी आपलाहि काल छ १ रोजीं वकील पाठविला. राजश्री फत्तेसिंग गाईकवाड याचें व गोविंदराव गाईकवाड या उभयताचे सख्यत्व करून दिल्हें म्हणोन बोलवा आहे. निमे मुलकांत उभयेताणी आसावें. बाकी सरकार हिसा निमे राहिला, त्याचेंहि कामकाज

गोविंदरायाकडेच सांगितलें म्हणतात. पंचवीस लक्ष रुपये फतेसिंगबावापासी घेतले हेंहि वर्तमान आहे. तिकडील बंदोबस्त करून धारेस पुत्रमुख पाहावयास येणार. महमद इसफ धारेस आलियानंतर सौभाग्यवती मातुश्री आणंदीबाई हेही देकारास ? याचमार्गें जाणार. परस्तुत त्याजकडून कुक्षी धर्मपुरीच्या बंदोबस्ता-करितां राजश्री लक्षुमणपंत पागा सरंजाम घेऊन मांडव्यास आलेत. तेथून धर्मपुरीस पागा पाठविल्या आहेत. आपली पत्रें येथें राजश्री तुकोजीबावास व बाईस आलीं. त्याचीं उतरें राजश्री यादोपंतीं घेऊन सेवेसीं पाठविलीं आहेत, त्यावरून स्रुत होईल. याणी तमाम आपल्या लोकांस निरोप दिल्हा. बेदिल होऊन देशास गेले. सिंदेहि उजणीस आहेत. त्याजकडेहि दादासाहेबाचा वकील आला आहे. याजकडेहि आला परंतु शोध लागत नाहीं. सुज्ञाप्रति विशेष काय लिहिणें हे विज्ञप्ति.

¶[*Madhavrao Bahirav writes to Haripant Tatya news from the court of Indore and informs him of the intended journey of Raghunathrao to Dhar to meet his newly born son.*

---

*No. 252*]

[*July 1775 ?*

**श्री**

**पु॥ राजश्री नारोपंत नाना स्वामीस**

विनंती उपरी. दाव कमी पडला. मलवा बापू नदी उतरले ते दिवसी आमचे बोलणेंहि जाले होते की तुम्ही पलीकडे जाणे. इंग्रेज चालोन आले तर नदीस उतार नाही. याजकरितां आम्ही लांब उतरावयास जाऊ. च्यार दिवस अधिक उणे लागतील परंतु तुम्हाजवल येऊ. परंतु पैका नाही म्हणून न राहिले. तुम्ही ते मिलोन कर्जवाम करून येक महिना दम धरतेस तर मोठीच गोष्ट होती, परंतु होणार त्यास इलाज नाहीं. असो. तुम्हीं आम्ही येक जाल्यावर फिरोन आत्र याल, चिंता नाही. मोगल छावणीस शहरास गेला. भोसले नागपुरास गेले-होते. तुम्हांकडे लिहिले येत असेल. चिंता न करणे म्हणौन पुरंदराहून पत्र आले हा संशय आहे. बाबूराव हरि भोसल्याकडे गेला आहे त्याचा परिहार भोसल्यानी लिहिला कीं मजकडे आला तो हाती कसा द्यावा? याचे आवरूस खता नाहीं, याचे चालवावें, असे येका मातबराचे विद्यमाने जाले तर पाठऊन देतो असे लिहिले होते. आम्हास जिवाजीपंतानीं लिहिले होते. आम्ही पुरंदरास लिहिले की कसेहि करून बाबुराव हरीस आपल्या-जवल न्यावा. मग कसे करितील पाहावें. तुम्ही आहा तेथेच राहून तिकडील

बातमी लिहीत जावी. असा प्रकार आहे. यांत सोनगडचा बंदोबस्त होता तर फार उपयोग पडता. आम्हासमागमे फौज आहे. यास रोजमरा नाही. पैका समयास येऊन पोहचला नाहीं. कर्जवाम काही मेळऊन थोडे थोडे खर्चास देतो. खजिना येऊन पोहचला म्हणजे उस्तवारी होईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke to Naropant Nana saying that a tactical advantage would have been gained had the addressee remained round about Surat. He informs him that Baburao Hari has taken refuge with the Bhonsle of Nagpur.*

---

*No. 253*] [*July 1775*

**श्री**

सेवेसी बहिरो रघुनाथ सां नमस्कार विनती विशेष. आज्ञापत्र पावले. जंबूसरचे ठाणे राजश्री चांगोजी कदम याणी इंग्रजाचे लोक कापून काढोन घेतले. ओलोदचे ठाणे आपधाकेच टाकोन इंग्रजाचे लोक पळाले. गजरे याचे ठाणेहि येका दोहो रोजा घेतील म्हणौन वर्तमान लिा, ते कळोन फार संतोष जाहाला. उरपाडचे ठाणे आद्याप हस्तगत होत नाही म्हणौन आपण चितामध्ये बहुत खिन, पुरंदरास व राजश्री तात्याकडे काय ल्याहावे म्हणौन कित्येक प्रकारे पर्याये लिा. त्यास प्रेत्न मेहनतीविसी स्वाम कमी करितात की काय? वरकड आपले मर्जीप्रो ईश्वर कृपा करोन येशहि आपणास लौकरच येईल. इंग्रज मांडवीहून आद्याप येत नाही म्हणोन लिा. त्यास इंग्रज मांडवीकर सिध आहे. परंतु विना तोफाचे येण्याचे निश्चयासिवाय त्यास आणोन तोफाचे आनकूल न जाहाले तर माघारे त्यास जा म्हणावे. आला आणि माघारा गेला तरी आपल्यास पैका येकमाहा उगाच कार्याविगल द्यावा लागेल आणि तोफासिवाय त्याणे च्यालीस पंनास माणसानिसी काय करणे तो विचार कलतच आहे. या आर्थे आगोधर त्यास बोलाविला नाही. तोफा येण्याचा निश्चय होताच वरचेवर इंग्रेज जलद येईल. गुंता नाही. सिध आसण्याविसी त्यास सूचना केलेली आहे. तोफा सोनगडास पत्र रा आणानी लिा परंतु त्यांचे यख्तयारीत नाहीत. व्याहारेयास आहेत त्या लाहान. बिलिमोरेयास तोफा उपयोगी आहेत त्या गलबतावर याजकडील लोकानी चढविल्या आहेत. तेथे राजश्री गोविंदपंत आणाची मुजरत माणसे पाा आहेत. परंतु गलबताचा सरदार घासीखान आहे तो तोफा देईलसा निश्चय नाही म्हणौन आणा म्हणत होते. काय उतर बिलीमोहरेयाचे येईल ते सेवेसी लेहून पाठऊ.

गोविंदरायाकडेच सांगितलें म्हणतात. पंचवीस लक्ष रुपये फतेसिंगबावापासी घेतले हेंहि वर्तमान आहे. तिकडील बंदोबस्त करून धारेस पुत्रमुख पाहावयास येणार. महमद इसफ धारेस आलियानंतर सौभाग्यवती मातुश्री आणंदीबाई हेही दैकारास ? याचमार्गें जाणार. परस्तुत त्याजकडून कुक्षी धर्मपुरीच्या बंदोबस्ता-करितां राजश्री लक्षुमणपंत पागा सरंजाम घेऊन मांडव्यास आलेत. तेथून धर्मपुरीस पागा पाठविल्या आहेत. आपली पत्रें येथें राजश्री तुकोजीबावास व बाईस आलीं. त्याचीं उत्तरें राजश्री यादोपंतीं घेऊन सेवेसीं पाठविलीं आहेत, त्यावरून स्रुत होईल. याणी तमाम आपल्या लोकांस निरोप दिल्हा. बेदिल होऊन देशास गेले. सिंदेहि उजणीस आहेत. त्याजकडेहि दादासाहेबाचा वकील आला आहे. याजकडेहि आला परंतु शोध लागत नाहीं. सुज्ञाप्रति विशेष काय लिहिणें हे विज्ञप्ति.

¶*Madhavrao Bahirav writes to Haripant Tatya news from the court of Indore and informs him of the intended journey of Raghunathrao to Dhar to meet his newly born son.*

---

*No. 252]*

*[July 1775 ?*

**श्री**

**पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस**

विनंती उपरी. दाव कमी पडला. मलवा बापू नदी उतरले ते दिवसी आमचे बोलणेहि जाले होते की तुम्ही पलीकडे जाणे. इंग्रेज चालोन आले तर नदीस उतार नाही. याजकरितां आम्ही लांब उतरावयास जाऊ. च्यार दिवस अधिक उणे लागतील परंतु तुम्हाजवल येऊ. परंतु पैका नाही म्हणून न राहिले. तुम्ही ते मिलोन कर्जवाम करून येक महिना दम धरतेस तर मोठीच गोष्ट होती, परंतु होणार त्यास इलाज नाहीं. असो. तुम्हीं आम्ही येक जाल्यावर फिरोन आव वाढ़, चिंता नाही. मोगल छावणीस शहरास गेला. भोसले नागपुरास गेले. याजकडील राजकारण ठीक आहे. चिंता न करणे म्हणौन पुरंदराहून पत्र आले होते. तुम्हांकडे लिहिले येत असेल. बाबूराव हरि भोसल्याकडे गेला आहे हा संशय आहे. त्याचा परिहार भोसल्यानी लिहिला कीं मजकडे आला तो हातीं कसा द्यावा? याचे आवरूस खता नाहीं, याचे चालवावे, असे येका मातबराचें विद्यमाने जाले तर पाठऊन देतो असे लिहिले होते. आम्हास जिवाजीपंतानीं लिहिले होते. आम्ही पुरंदरास लिहिले की कसेहि करून बाबुराव हरीस आपल्या-जवल न्यावा. मग कसे करितील पाहावे. तुम्ही आहा तेथेच राहून तिकडील

वातमी लिहीत जावी. असा प्रकार आहे. यांत सोनगडचा बंदोबस्त होता तर फार उपयोग पडता. आम्हासमागमे फौज आहे. यास रोजमरा नाही. पैका समयास येऊन पोहचला नाहीं. कर्जवाम काही मेळऊन थोडे थोडे खर्चास देतो. खजिना येऊन पोहचला म्हणजे उस्तवारी होईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

*¶Haripant Phadke to Naropant Nana saying that a tactical advantage would have been gained had the addressee remained round about Surat. He informs him that Baburao Hari has taken refuge with the Bhonsle of Nagpur.*

---

*No. 253]* *[July 1775*

**श्री**

सेवेसी बहिरो रघुनाथ सां। नमस्कार विनती विशेष. आज्ञापत्र पावले. जंबूसरचे ठाणे राजश्री चांगोजी कदम याणी इंग्रजाचे लोक कापून काढोन घेतले. आमोदचे ठाणे आपधाकेच टाकोन इंग्रजाचे लोक पळाले. गजरे याचे ठाणेहि येका दोहो रोजा घेतील म्हणौन वर्तमान लि।।, ते कळोन फार संतोष जाहाला. उरपाडचे ठाणें आद्याप हस्तगत होत नाही म्हणौन आपण चितामध्ये बहुत खिन, पुंरदरास व राजश्री तात्याकडे काय ल्याहावे म्हणौन कित्येक प्रकारे पर्याये लि।।. त्यास प्रेत्न मेहनतीविसी स्वाम कमी करितात की काय? वरकड आपले मर्जीप्रा।। ईश्वर कृपा करोन येशहि आपणास लौकरच येईल. इंग्रज मांडवीहून आद्याप येत नाही म्हणोन लि।।. त्यास इंग्रज मांडवीकर सिध आहे. परंतु विना तोफाचे येण्याचे निश्चयासिवाय त्यास आणोन तोफाचे आनकूल न जाहाले तर माघारे त्यास जा म्हणावे. आला आणि माघारा गेला तरी आपल्यास पैका येकमाहा उगाच कार्यावेगल द्यावा लागेल आणि तोफासिवाय त्याणे च्यालीस पंनास माणसानिसी काय करणे तो विचार कलतच आहे. या आर्थे आगोधर त्यास बोलाविला नाही. तोफा येण्याचा निश्चय होताच वरचेवर इंग्रेज जलद येईल. गुंता नाही. सिध आसण्याविसी त्यास सूचना केलेली आहे. तोफा सोनगडास पत्र रा। आणानी लि।। परंतु त्यांचे यखतयारीत नाहीत. व्याहारेयास आहेत त्या लाहान. बिलिमोरेयास तोफा उपयोगी आहेत त्या गलबतावर याजकडील लोकानी चढविल्या आहेत. तेथे राजश्री गोविंदपंत आणाची मुजरत माणसे पा। आहेत. परंतु गलबताचा सरदार धासीखान आहे तो तोफा देईलसा निश्चय नाही म्हणौन आणा म्हणत होते. काय उतर बिलीमोहरेयाचे येईल ते सेवेसी लेहून पाठऊ.

6149

आणि तोफा बिलीमोरेयाच्या येतात येसे जाले तर इंग्रजास वरचेवर जलद आज्ञेप्रो आणवितो. तोफा जरूर आल्या पाहिजेत. येविसीची सेवकासहि निकड आहे. तर्तुदीस आंतर करीत नाही. परंतु परस्वाधीन कारभार त्यास उपाय काय? आपण लि॥ की तोफा येत नसल्यास ईश्वरावर हवाला टाकोन उरपाडावर गोडे सामानानसीच हला लगट करू. यैशास आपण सर्वज्ञ आहेत, परंतु तोफा आथवा दुसरी कांहीं फौज आल्यासिवाय आपले सामान आहे इतक्यानिसी लगट करू. कार्य जाले तर बरे नाही तर ठीक नाही पुर्तेपणे करावे. आपणास ल्याहावेसे नाही, परंतु लगट हला करावयास सामान . आपले जवळ थोडके आहे. उतावली करू नये. पारचाळेस जंबुरे आहेत. गाडे देखील सिध परंतु लाहान आहेत. कलावे हे विनती.

¶*Bahiro Raghunath expresses his delight at the news of some places being captured from the English and further says that unless he secures good guns he should not call the English from Mandvi. The writer does nct approve of the plan of the addressee to attack Urpad without siege guns.*

---

*No. 254*]

[*July 1775*

श्री

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक बहिरो रघुनाथ सां॥ नमस्कार विज्ञापना. आज्ञापत्र पावले. तोफा आणावयासी आपणाकडील व रा॥ गोविंदपंत आणाकडील कारकून व्याहारेयास गेले आहेत. मांडवीसहि पत्रे इंग्रजास आणावयासी लेहून पा॥ आहेत. आज्ञेप्रो तर्तूद केली आहे. राजश्री गोपाळराव रास्ते पथकसुधा तिकडोन आपणाजवल येत आहेत म्हणौन लि॥ फार उतम. उरपाडेकडे रात्री स्वारी जाली होती, त्याचे वर्तमान कलले नाही. श्रीमंतास खंबाइताहून मावारे आणावयासी होड्या इंग्रजाकडील च्यालीस पनास गेल्या म्हणौन वर्तमान आहे. कलावे श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath says he has arranged to bring guns as desired by Naropant Keskar. He also informs him that some boats have been despatched by the English to bring Raghunathrao from Cambay.*

No. 255] [January 1775

श्री

पुरवणीपत्र.

विज्ञापना विशेष. श्रीमत राजश्री दादासाहेब बडोदियासी आले. राजश्री गोविंदराव गायेकवाड व खंडेरावबावा गो यांच्या भेटी जाल्या. त्यास पिछावरी आपली फौज आली, याजकरिता श्रीमंत व गायेकवाड मंडलीसुधा महीपार जाऊन मुकाम करून राहिले आहेत. महीकाठा कोंतारे[१] भारी आणि अवघड ठिकाण पाहून वाटा रोखोन बसले आहेत. आपणाकडील फौज अलीकड सावली परगणियाचे सर्देने मुकाम करून राहिली आहे. राजश्री फतेसिंगराव गो बडोदियाचा शह उठतांच बाहेर निघोन तात्याकड जाऊन सामील जाहाले आहेत. फौजेची जमयेत इकडील भारीच आहे. पुढे याचा त्याचा रंग कसाकसा होईल तो पाहावा. श्रीमंताकडील दोघे कारकून जवाहीर विकावयासी बंदर सुरत येथे आले आहेत. जवाहीर अद्यापि विकले नाही. कारकून सुरतेसच आहेत. कुमकेविशीं इंग्रजास श्रीमंताकडून संदर्भ आला आहे. त्यास त्याणे उतर केले कीं, तूर्त मजला साष्टी मुंबईस शह मातबर बसला आहे व सुरतेची बंदी करणार व भडोजेस शह देणार, याजकरिता मजला कुमक करावयाची सोई बनत (ना)ही, म्हणोन जाबसाल कारकुनासी करीत आहे. कारकून अद्यापि शहरात बसले आहेत. मद्राज बंगाला येथोन लोक आणविले आहेत. ते आल्यानंतरी कुमक द्यावयाची सोई पडेल. ऐसे भाशण त्याजकडील होत आहे. पत्राची उतरे सत्वर द्यावयासी आज्ञा केली पाहिजे, कारण की बंदीचा हंगाम जातो. माल तमाम शहरात विकावयासी नित्यानित्य जात आहे. कलावें यास्तव लौकर पत्राची उतरे पा आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath reports that the forces of Dadasaheb and of Govindrao Gaikwad have combined and encamped beyond the Mahi and that Fatesing has joined Haripant who is pursuing Dadasaheb. The English could not promise any help to Dadasaheb as their attention was directed towards Salsette and Surat.*

---

No. 256] [1-8-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ २ जमादिलाखर मुकाम बऱ्हानपूर जाणोन स्वकीये कुशल लिहित जावे विशेष.

---

\+ पत्र बहिरो रघुनाथ याचें. १ कोंतारे=काठावरील खाचखळगे.

आपण छ २९ जमादिलावलचे पत्र पाा ते पावले. आम्ही व रास्ते याणी सुरत प्रांती बंदोबस्तास राहावे त्यास आम्हाजवल सरंजाम किती आहे हे आपणास ठाऊक आहे. आपण त्या प्रांतीहून आला. श्रीमंत तिकडे सनिध. सुरतेतहि जमाव होऊ लागल. पाऊस भारी याचे वर्तमान मलबानी पाहिले. ते भेटीनंतर सागतील यास्तव येथे आलो. पुरंदराहून यैवज खर्चास न ये. माहाल सरंजामी तेव्हा यैवज कोठून आणावा? याजकरिता वाटमाथा येऊन राहिलो. आपण सोनगड प्रांती छावणीस आल्यास भेट होईल. आम्हास पत्र आल्यास आम्ही वराणपुरास येऊ. तावेकर याजकडील लोक करार करून ठेविले होते. त्यास करारापेक्षा आधिक मागो लागले सा निरोप दिल्हा. जनार्दनपंतास घेऊन गेले. पाच हजार रुा मात्र खर्चास दिल्हे होते. राजश्री फतेसिगराव गायकवाड श्रीमंतास भेटले म्हणौन बडोद्याहून माणसे आली ती सागत होती म्हणोन लिहिले ते सविस्तर कलले. आपण तिकडे आहेत त्यास पायगुडे व बालाजी खंडेराव व बलवंतराव धोडदेव मिलोन राऊत किती आहेत व रास्त्यांची फौज किती आहे ती लिहून पाठवावी. हुजरातचे पथकाची गणती घ्यावी. गणतीखेरीज रोजमरा देऊ नये. वरकड पुरवणी पत्रावरून कलेल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke learns why Naro Anandrao left the vicinity of Surat despite orders and encamped near Navapur.*

---

*No. 257*]

[*16-8-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्रि नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १८ जमादिलाखर मुा नजीक बऱ्हाणपूर जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही छ १२ जमादिलाखरची पत्रे पाठविली ती छ १७ मिनहूस पावली. जयराम नाईक रघुनाथ हरि याजकडील व दुसरे कारकून व मनाजीपंत वगैरे

डबईस श्रीमंतास सापडले त्याजवरून गुन्हेगारी घेऊन सोडिले ते आले. त्यांतील जयराम नाईक यास समक्ष आणून पुसिले, त्याणी बातमी वर्तमान सांगितले.

फतेसिंग गायकवाड इंग्रेजाचे विद्यमाने भेटोन पंचवीस लक्ष रुपये श्रीमंतास चहू वाईंयानी द्यावेसे कबूल केले आणि वडोयास गेले. गोविंद-राव गायेकवाड याचे जाबसालात मानाजी फाकडा व सदासिव रामचंद्र व आबाजी माहादेव, सखाराम हरी होते, ते रुष्ट आहेत. गोविंदराव कूच करून छाणीचे तलावरी गेले. महीपार जाणार आमदाबाद सुरत आठाविसी मिरज याच्या सनदा देत होत त्या त्याणी घेतल्या नाही. म्हणौन लिा ते कलले.

आमदाबाद व्यावयास आमीन साहेब कबूल होऊन पाचसे स्वार व पाचसे गारदी देऊन रवाना जाला. मागाहून अमृतराव यासमागमे फौज देऊन रवाना करणार. आपाजी गणेश सरजाम पोख्त करून आठ नव हजार आरब सिदी वगैरे ठेऊन खबरदार आहेत. कादार माहालातील आणून आपले जवल ठेऊन लढाईची उमेद चागली आहे म्हणून लिा ते कलले. आपाजीपंतास येथून पत्रे पाठवीत असतो. घडेल ते खरे.

श्रीमंतानी डभईत ठाणे घातले. भागोजी बलकवडे मिलोन बालाजीपंत कैद करून पंचवीस हजार खंडणी केली. डभईत जमिदार वगैरेसुधा चहू लक्षाची पटी करून ऐवज इंग्रेज मानाजी फाकडे हिशेब करून मागतात. ऐवज द्यावयास नाही. म्हणौन सिवाजी विठल व त्रिंबकराव सिवदेव याच्या सरजामाच्या सनदा करून देत होते तो घेत नाही, निरोप मागतो व गोविंदरायाकरि(ता) कारभारी नाउमेद होऊन उठोन येणार म्हणौन लिहिले ते कलले.

धारेस श्रीमंत सो मातुश्री आनंदी-बाई आहेत. त्याणी खंडेराव पवार याची सिबंदी तेथील बाहेर काढून आपला बंदोबस्त केला यामुले खंडेराव श्रमी आहेत. सरकारात संधान करितील म्हणून लिहिले ते कलले.

सुरत आठाविसी व गुजराथींतील इंग्रेजास दाहा लक्षाची जागीर जबूसर हसोट वगैरे पाच माहाल दिल्हे. बाकी महाल रसद घेऊन कामाविसदारास देतात म्हणून लिा ते कलले.

होलकर सिंदे यास सरजा(म) सुधा येण म्हणौन श्रीमंताची पत्रे गेली आहेत म्हणून लिहिले ते कलले. त्यास आम्ही आपले बुधीने सरदारांचे मनोधारण करितो. त्यास ईश्वर बुधी देईल तसे करतील.

फतेसिंग पुरतेपणे श्रीमंतास मिलोन गोविंदराव तूट खाऊन गेले ते सधान सरकारात करितील. येविसी आपाजी गणेश यास पत्र यावे म्हणून लिा ते कलले. आपाजीपंतास लिहिले आहे.

6153

व श्रीमंत दीड दीड लक्ष घेऊन बाकी फौजेस रोजमरा दिल्हा म्हणौन लिा ते कळले.

सोनगड फतेसिंग याजकडे द्याव-याविसी गोविंदराव सोडचिठी न देता गेले. याजकडील भिवराव कड्डू व शकजी किलेदार जमाव करून लढाई करितील. तूर्त बखेडा आहे. दोहीकडील सूत्रे येतील म्हणौन लिा ते कळले. आम्ही खंडेराव यास व आपाजीपंतास गोविंदरायाविसी लिहितो. तेथे घडेल ते खरे.

कर्नाल किटण इंग्रेज मुबईस जाऊन मनसबा ठराऊन कार्तिक मासापासून मसलत करणार. डबई पासष्ट हजार रसद घेऊन भागोजी वलकवडे यास सागितली म्हणौन लिा ते कळले.

वैरागी गुजराथ प्रांती बातमीस पाठविले आहेत म्हणून लिहिले ते कळले.

पुढेहि नवल विशेष वरचेवर लिहीत जावें. हे विनंती.

बहुत काय लिहीणे लोभ आसो दीजे

*¶The movements and plans of Dadasaheb, his agreements and negotiations with the Gaikwads and the English are communicated by Naro Anand to Haripant who in this letter gives his own views and instructions on them.*

---

No. 258]

[16-8-1775

**श्री**

**पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. ताा छ १८ जमादिलाखर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. राजश्री फतेसिगराव गायकवाड इंग्रजाचे विद्येमाने श्रीमतास भेटोन आपले मुलकाचा वगैरे बदोबस्त केला. रा खडेराव गायकवाड याजकडील कुसाजी सिंदेहि श्रीमतास भेटले. राजकारण करून पुढे खडेरावहि भेटतील. गोविदरायानी खडेराव याजकडे काही सूत्रहि सलुकाचे लाविले आहे म्हणौन कितेक तपसिले लिा ते कळले. ऐसियास राजश्री फतेसिंगराव श्रीमंतास भेटले, परंतु नाईलाज साा बच्याव त्याणीं केला. त्याजकडील पत्रे आली होती त्यास पधरा दिवस जाले. सर्व लक्ष त्याचे श्रीमत राजश्री रावसाहेब याच्याच मसलतीवर आहे. खडेरावहि सरकार लक्ष्यात आहेत. कुसाजी सिंदेहि भेटले तरी चिंता नाही. समये पाहोन बच्याव करून घेतील, परतु आह्मासी बोलिले आहेत

त्यात आतर होणार नाही, याप्रा खातरजमेचे बोलणेहि जाले आहे. तत्रापि न कले. काळ येक प्रकारचा आहे. त्यास कोणाची बुध कसी कोण्या समई होईल हा तो भरवसा नाही. बहुत करून दुसरा विचार त्या उभयताच्याणे सरकारकामाविसी होणार नाही. असो जे वर्तमान तुह्मास आढळले ते लिा उतम केले. याप्रा पुढेहि लिहीत जावे व गोविंदराव सूत्र करितील परतु परिणामास जाणे कठीण. फतेसिगानी लिहिले होते त्यावरून तुह्मास लिहिले आहे. आपले मतलबासाठी माणूस लिहीतच आहे. परिणाम लागेल तो खरा. आपण खबरदार असलियावर सर्वेहि आपलेच आहेत. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke writes to Naro Anandrao that though Fatesing avowed allegiance to Raghoba his heart was with the cause of the Barbhais He however expresses doubts about his sincerity.*

---

*No. 259]* *[16-8-1775*

श्री

पुरवणी राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी तुम्ही पत्र पा ते प्रविष्ट जाहाले.

सोनगडाकडील व गोपालराव व जनार्दन अनंत व लक्ष्मणपंत फडर्नीस पिपलनेरकर आपली पत्रे घेऊन आले आहेत. आम्ही घाटाखाली गेलो म्हणजे समागमे येतील. त्यास तिकडील मजकूर येक प्रकार दृष्टीस येतो. आपण आज्ञा करितील तैसी रवानगी त्या प्रांती करावयास येईल म्हणौन लिहिले ते कलले. तूर्त तुम्हीं घाटावर तेव्हा रवानगीचा प्रकार कलला आहे. आंम्ही तिकडे येऊ तेव्हा काय करणे ते करू. तूर्त तुम्हाजवलच असतील.

आम्हास हिदुस्थानात पाच वर्षे छावणी जाहाली. पुढे आम्हास निरोप ममता येऊन देतील. भेटी होये

नवापूरचे ठाणे व्यावयास सिबंदी च्यारसे प्यादे व आरबा करार करून ठेविले. लौकरच नवापुरास जातो. आणि आणखी काही गाडदी व दोन तोफा आपणाकडून येते म्हणजे दिकत ठाणी व्यावयास न पडती म्हणून लिहिले ते कलले. त्यास तुम्ही मनसबा करितां तोच उपयोगाचा, परंतु इसफामुले आम्ही इकडे गुंतलो. दोन तोफा तिकडे गेल्या आहेत. आपणाकडे दोन तोफा पाठवाव्या तर फौज समागमे पाहिजे. फक्त तोफा दोन पाठवा म्हणाल तर पाठवितो. लिहून पाठवावे.

पुरंधराहून पत्रे आली की गणती घेऊन रोजमरा देणे. त्याजवरून

तोपर्यंत दम धरितो म्हणौन लिहिले ते कळले. त्यास हे मला ठाऊक नाहीं असे नाही. परंतु मसलत पडली यास इलाज काय? आपणासारखे कृतकर्मे मसलतींत असले म्हणजे आम्हांस काहीं अवघड नाहीं.

येथील फौजेस अर्जबाब येक रोजमरा दिल्हा ते जमादिलोवलचे दोन रोजमरे देणे त्यात वजा करणे म्हणौन श्रीमंताची आज्ञा जाली आहे. त्यास फौजेस नालबंदीपैकी काही पावले नाही यास्त(व) तो रोजमरा नालबंदीत पावेल म्हणून लिहिले ते कळले. रोजमरा आधिक पावला तो नालबंदीत धरावा.

गणतीस प्रारंभ केला. तेसमई आपाजी पायेगुडे गणती न देता नगारा करून मजलीस गेले. यामुळे गणती झाडून फौजेची राहिली म्हणौन लिहेले ते कळले. लोक लबाडी फार करितात, इलाज नाही. तजविजेने गणती घ्यावी.

आमदाबादेस गोविंदराव गायेकवाड व खंडेराव याजकडील राजकारण आपाजी गणेश यास पत्रे पाठऊन पके करवावे. सरकार लक्षात येतील गुता पडणार नाहीं म्हणौन लिहिले ते कळले. लिहिल्याप्रा करितो.

रा छ १८ जमादिलाखर बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Hari Ballal gives to Naro Anandrao instructions on the points referred to by the addressee, e.g. the muster and the remuneration of the army.*

---

*No. 260*]

[*18-8-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २० जमादिलाखर मुा नजीक बऱ्हाणपूर जाणून स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. महमद इसफ याचे पारपत्यास राजश्री आपा व वामनरावबावास फौजसुधा रवाना केले होते. तो झाडीत होता. त्यास सरकारचे फौजेने त्याजवर येक दोन वेळ घालोन अडचणीत असता त्याकडील पंचवीस तीस ठार व काही जखमी होऊन तीसच्यालीस घोडी व गुरे बल च्याली(स) पंनास आणिली. त्या दहशतीने पळून गोंडवणच्यां सुमारे गेला. पाठीमागें सरकारची फौज गेली आहे. ते येई तावत्काल येथे मुकाम आहेत. आपण नवापूरचे उद्योगास पुढे जाणार होतेस ते पुढे

गेला न गेला, श्रीमंत कोठे आहेत, त्याजकडील सरदार मुछदी व इंग्रेज याची पैरवी प्रेरणा कसकसी आहे हे सविस्तर बातमी पकी लेहून पाठवावी. बहुत काय लिहीणे कृपा लोभ कीजे हे विनंती.

*¶Hari Ballal informs that Muhammad Isaf was hard pressed by Appa Balwant and Wamanrao Patwardhan and fled in the Gond forest for his life.*

---

No. 261] [26-8-1775

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**

**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पोष्य हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २८ जमादिलाखर मुकाम नजीक बऱ्हाणपूर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. आलीकडे तुह्माकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी सविस्तर सुरतेकडील व श्रीमंताकडील लेहून पाठवावे. इकडील वर्तमान तरी राजश्री आपा व वामनराव बाबा फौज घेऊन महमद इसफ याजवर गेले होते. त्यास त्याची याची गाठ पडोन थोडीबहुत झटपट जाली. उपरांतिक तो पलोन झाडीत गेला. पाठीमागे फौजा गेल्या आहेत. दोनच्यार मजली पाठलाग करितील. फारच झाडी, उपाये नाही, तरी माघारे येणे म्हणौन पत्रे गेली आहेत तेहि लौकरच येतील. गणेशचतुर्थीपावेतो येथे मुकाम होतील. उपरांतिक कूच करून तापी उतरोन सोनगडच्या सुमारे यावे असा मनसबा आहे. तुह्मी तिकडील वर्तमान वरचेवर लेहून पाठवावे. गणतीविसी लिहिले होते, जालीच असेल, ल्याहावे. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दिजे हे विनंती.

राजश्री बालाजीपंत स्वमीस सा। नमस्कार विनंती उपरी लि। परीसोन लोभ असो दीजे हे विनंती.

*¶Hari Ballal communicates to Naropant Nana the news of a skirmish between Muhammad Issaf and a contingent under Appa and Wamanrao, after which Issaf disappeared in the forest.*

---

No. 262] [28-8-1775

**श्रीमार्तंड**

**राजश्रिया विराजित राजमान्य**

**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

सेवक नारो लक्षुमण व लक्षुमण गोविंद सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १ रजब मु॥ रनाले जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असावे

विशेष. अहमद व नूर नारोगी बेपारी हे सुरतेहून हरजिनस आणितात. सालावादचे बेपारी आहेत. साप्रत नवापूरचे दग्यामुले वसवास खाऊन अमदनी बंद आहे. त्यास हे कुले सालावाद रनाले नदुरबार येथे माल आणितात. त्यास आपले ठाणे नवापुरी बसले आहे. मार्गाची सुमेता जालियाने हे अमदनी अणीत जातील. त्यास येविषई आपला कौल बेपारीयासी देऊन येक वेल याचा माल सुरक्षित नवापुरीहून नदुरबारेस पावता करून दिधल्याने यासी पत राहून दरमाह अमदनी आणीत जातील. येणेकरून आपणासहि नवापूरची अमदनी आहे याजकरिता लिाअन्वये बेपारीयाचे नावे कौल आपला लिहून द्यावा व मार्गात सुरक्षित येत येस येक वेल वदोबस्त जाल्याने मार्ग चालेल. आमदनी होईल. येंदा सुरतचे बदीमुले आजपावेता मार्ग बंदच राहिला. हाली आपल्या कौलाने अमदनी येत आसल्यास करावी यास्तव लिा आहे. तरी लिाअन्वये बंदोवस्त करोन अमदानी ये ते केले पाहिजे. बहुत काये लिहिणे. श्रीमंत राजश्री तात्याचा मुकाम बराणपुरानजीकच आहे. तिाा राजश्री यादवराव रघुनाथहि लस्करात गेले. गुजरात प्रांतीचे वर्तमान नवल विशेष लिहीत जावे. आपण नवापूरचे ठाणे घेऊन पुढे व्याऱ्यापावेतो काही फौज गेली म्हणौन येकिले. उतम आहे. राजश्री शंकराजी खंडेराव याचे सुटकेविसीचा विचार काय केला तो लिहावा. बहुत काय लिहीणे लोभ करावा हे विनंती.

¶[*Naro Lakshman and Lakshman Govind request Naropant Nana to allow free passage and a guard to Nandurbar to two Boharis, Ahmad and Noor Narogi, and their merchandise.*

---

*No. 263*]

[*July 1775*

**श्री**

**पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस**

विनंती उपरी. फौज फार, पोटास नाही म्हणून मलबा बापू आदीकरून मडली आलीकडे आली, बरे केले. तुम्ही अगदीच सोडून आलीकडे आला हे कांही समजत नाहीं. पुरंदराहून आज्ञा जाली म्हणौन आला किंवा कसे हे ल्याहावे. मलबा मालेगावाजवल राहातील म्हणौन लिा. त्यास आमची पत्रे वरचेवर जातच आहेत. मग राहातील किंवा देशास जातील कलत नाहीं. आपण तरी पुढे येऊ नये. सुरतेचे बंदीची तर्तूद असल्यास मग चिंता नाही. कसा विचार केला तो ल्याहावा. आम्ही बराणपुरास येतो. छावणी कोणे स्थली करावी असे पुरंदरास लिहिले आहे. तेथील आज्ञा कसी येते पाहावे. आम्ही इकडे आलो. मलबा

वगैरे फौज तिकडून गेली इतकाच प्रकार. दुसरे कांही कोणाचे नेलें गेले नाहीं. मडलेश्वराजवल आल्यावर बढव्यास उतरावयास जावे त्यास पाऊस नाही. रेवेचे पाणी दिवसेंद्विवस उतरू लागले तेव्हां येथेच उतारा लाऊन उतरलो. हती पायाब आले. आतां उतरावयाचा गुता राहिला नाहीं. खजिना आपणाजवल आला असल्यास बराणपुरास पाठऊन द्यावा. खर्चाची हैराणगत फार आहे. होलकराचे मते छावणी बुराणपुरास करावी म्हणजे चहूकडे दबाव. आमचा पहिला मनसुबा सुरत आठाविसीतील होता. तुमचे मते कसें करावें ते लिहून पाठवावे. नवाबाकडील व भोसल्याकडील वर्तमान विसाजीपंताचे पत्रावरून कलेल. असो आम्ही बुराणपुरास येतो. मोगल छावणी शहरास करणार असे आहे कलले. आपणाकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. तुम्ही सुरत प्रांती असतां म्हणजे तिकडील वर्तमान दिनचर्येचे कलते. अगदी रान सोडून आलेत कीं कसे केले हे समजत नाही. जलद. लिहून पाठवावे. राजश्री बापू पानसी तोफखाना घेऊन बराणपुरास गेले. समागमे आन्याबा व चांगोजी कदम आहेत. कलावें. सुरतेची बंदी राखोन तुमची आमची भेट होती तर बरे होते. होलकर सांप्रत काली भजनात निखालसपणें आहेत असें दिसते. सिंदे उजनीस आहेत. त्यांचे लक्ष दुसरीकडे असे भासते. श्रीसतेकडून घडेल ते खरे. या मसलतीस मोगल पुर्तेपणे मेलऊन पुढें करून लडाई घेतली तर परिणाम लागोन सेवटास जाईल. मुधोजी सुरलीत चालतील असें दिसते की काय हाटेबाज आहेत. आम्ही इकडे आलो यामुलें मसलतीस हिसका बसला. असो सर्व येकरूप असल्यास अगाध आहे असे नाही. फीतूतराचा (फितुराचा?) प्रकार तर स्वतसिधच आहे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant gives Naro Anandrao a mild rebuke for giving up the blockade of Surat and moving up the Tapti. He further explains to him the indifferent attitude of Sindia and Holkar towards the campaign against Dadasaheb.*

---

*No. 264*] [*6-9-1775 ?*

पो. छ १६ रजब

**श्री**

श्रीमंत हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पो विठल बलाल सा‍ा नमस्कार विनंती. येथील कुशल ता‍ा भाद्रपद शुध १२ मु‍ा पेट उबरावती जाणोन स्वानंद लेखन केले पाहिजे विशेष. श्रीमंत

सेनासाहेबीं आम्हास बिदा केलें त्यापासोन निघालियानंतर सेवेसी पत्रें पाठविली त्याचे उत्तराची प्रतीक्ष्या करीत असों. जैसे पत्र येईल त्याप्रमाणे वर्तणूक करो. कृपा वृधि(यु)क्त पत्रे येत असावी. बहुत काय ल्याहावे हे विनंती.

¶*Vithal Ballal informs from Umraoti Haripant of his departure according to the instructions of Bhonsle and solicits orders for further action.*

---

*No. 265*]

[*Sept. 1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाळ सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावे विशेष. विजयादशमीचे पोशाग रास्ते याचे दोन व आपाजी पायगुडे याचा येक व तुमचा येक, येकूण च्यार पोशाग पाठविले आहेत. त्याची याद आलाहिदा असे त्याप्रमाणे जिकडील तिकडे प्रविष्ट करून पावलियाचे उतर पाठवावे. +बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Haripant sends the Dasara costumes for Naropant Nana, Rastia and Apaji Paygude.*

---

*No. 266*]

[*2-10-1775*

**(श्री)**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी**

सेवक अंताजी नागेश साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा आस्विन श्रुा ८ मी मुकाम मालपूर जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडन पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सविस्तर ल्याहावें. आम्हाकडील वर्तमान तर पेशजी श्रीमंत राजश्री फतेसिंगराव बावा यांस श्रीमंत राजश्री हरिपंत तात्यानी उकसीच्या मुकामीहून बडोदेस जावयास निरोप दिल्हा. मागाहून च्यार रोजी आमचीहि रवानगी केली. आम्ही झांबव्याच्या सुमारें गेलो. तों वर्तमान यजमान म्लेछास भेटले. बडोदेनजीक इंगरेजाच्या फौजा आल्या. नाइलाज. न भेटता इलाज नाही. आम्ही

येकायेकी जावे हेहि ठीक नाही. इकडे राजश्री तात्यास लिहिलें तों यजमानाचीहि पत्रे आम्हास व तात्यास आली कीं, आविलबे उपराला जाहाल्यास उतम. आपण दिवस काढितो. आमचेहि पत्री हेच की तुम्ही राजश्री तात्याकड मजल दरमजल जाऊन शैन्य आगमन अविलंबे होये ते करणे. त्यास * * * * * तात्यास पत्रे लिहिली येणे म्हणौन * * * * त्र आम्हास आली. त्यावरून बढवाणीच्या मार्गे मुकाम मजकुरीं आलो. येथूनहि शैन्यात पत्रे पाठविली. भेटीस लौकर यावें म्हणौन उतरे आली. विजयादसमी जाहालेयावर जाऊ. आपण नवापुरीहून फौजसुधा माघारे कूच करून आले म्हणौन कलले. त्यास शाहावरील फौज येकायेकीच कूच करून आली याचे कारण ल्याहावें. श्रीमंत राजश्री तात्याचे पत्री मजकूर कीं, आम्हीच सुरत प्रांताच्या रोके येतो. तेव्हा राजश्री रास्ते व आपण आले याचा मजकूर सविस्तर ल्याहावा. रा जनार्दन आनंत आपले श्वार समागमे घेऊन गेले म्हणून कलले. ते कोणीकडे आहेत? त्याचे वर्तमान काये? श्रीमंत व इगरेज कोणत्या ठिकाणी आहेत? सुरत प्रांती तूर्त बखेडा फार कोण करितो? श्रीमंताकडील सुभा आला त्याचे मिलणीस कोण आहेत? चिमणराव कोठे आहे? ह्या सर्व बातम्या आपणाकडे आहेतच. इकडेहि सविस्तर ल्याहाव्या. आपली आमची भेट व्हावी हा हेत फार आहे. भेटीहि लवकरच होतील. बहुत काय लिहिणे कृपा लोभ करावा हे विनंती.

¶*Antaji Nagesh tries to justify the visit of his master—Fatesing Gaikwad—to Raghoba and the English. He explains he had to pay the visit being surrounded by enemies.*

---

*No. 267]* *[6-10-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १० साबान मुकाम जैनाबाद जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र छ १ साबानचे पाठविले ते छ ६ मिनहून प्रविष्ट जाहालें. फौजेचे देणे रोजमरे दुमाही मिलोन पंचावन साठ हजार ऐवज चढला यास्तव नवापुराहून कूच करून आपणाकडे यावयास भादडच्या मुकामास आलो. आपण दसरियास कूच करून इकडे येणार तेव्हा हेलपटा पडेल याजकरितां येथून शंकराजी खंडेराव

6161

सेनासाहेबीं आम्हास बिदा केलें त्यापासोन निघालियानंतर सेवेसी पत्रें पाठविली त्याचे उत्तराची प्रतीक्ष्या करीत असों. जैसे पत्र येईल त्याप्रमाणे वर्तणूक करो. कृपा वृधि(यु)क्त पत्रे येत असावी. बहुत काय ल्याहावे हे विनंती.

¶*Vithal Ballal informs from Umraoti Haripant of his departure according to the instructions of Bhonsle and solicits orders for further action.*

---

*No. 265*]

[*Sept. 1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावे विशेष. विजयादशमीचे पोशाग रास्ते याचे दोन व आपाजी पायगुडे याचा येक व तुमचा येक, येकूण च्यार पोशाग पाठविले आहेत. त्याची याद आलाहिदा असे त्याप्रमाणे जिकडील तिकडे प्रविष्ट करून पावलियाचे उतर पाठवावे. +बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Haripant sends the Dasara costumes for Naropant Nana, Rastia and Apaji Paygude.*

---

*No. 266*]

[*2-10-1775*

**(श्री)**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी**

सेवक अंताजी नागेश साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा आस्विन शुाा ८ मी मुकाम मालपूर जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडन पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सविस्तर ल्याहावें. आम्हाकडील वर्तमान तर पेशजी श्रीमंत राजश्री फतेसिंगराव बावा यांस श्रीमंत राजश्री हरिपंत तात्यानी उकसीच्या मुकामीहून बडोदेस जावयास निरोप दिल्हा. मागाहून च्यार रोजी आमचीहि रवानगी केली. आम्ही झांबव्याच्या सुमारें गेलो. तों वर्तमान यजमान म्लेछास भेटले. बडोदेनजीक इंगरेजाच्या फौजा आल्या. नाइलाज. न भेटता इलाज नाही. आम्ही

येकायेकी जावे हेहि ठीक नाही. इकडे राजश्री तात्यास लिहिलें तों यजमानाचीहि पत्रे आम्हास व तात्यास आली कीं, आविलबे उपराला जाहाल्यास उतम. आपण दिवस काढितो. आमचेहि पत्री हेच की तुम्ही राजश्री तात्याकड मजल दरमजल जाऊन शैन्य आगमन अविलंबे होये ते करणे. त्यास * * * * * तात्यास पत्रे लिहिली येणे म्हणौन * * * * त्र आम्हास आली. त्यावरून बढवाणीच्या मार्गे मुकाम मजकुरीं आलो. येथूनहि शैन्यात पत्रे पाठविली. भेटीस लौकर यावें म्हणौन उतरे आली. विजयादसमी जाहालेयावर जाऊ. आपण नवापुरीहून फौजसुधा माघारे कूच करून आले म्हणौन कलले. त्यास शाहावरील फौज येकायेकीच कूच करून आली याचे कारण ल्याहावें. श्रीमंत राजश्री तात्याचे पत्री मजकूर -कीं, आम्हीच सुरत प्रांताच्या रोके येतो. तेव्हा राजश्री रास्ते व आपण आले याचा मजकूर सविस्तर ल्याहावा. रा जनार्दन आनंत आपले श्वार समागमे घेऊन गेले म्हणून कलले. ते कोणीकडे आहेत? त्याचे वर्तमान काये? श्रीमंत व इगरेज कोणत्या ठिकाणी आहेत? सुरत प्रांती तूर्त बखेडा फार कोण करितो? श्रीमंताकडील सुभा आला त्याचे मिलणीस कोण आहेत? चिमणराव कोठे आहे? ह्या सर्व बातम्या आपणाकडे आहेतच. इकडेहि सविस्तर ल्याहाव्या. आपली आमची भेट व्हावी हा हेत फार आहे. भेटीहि लवकरच होतील. बहुत काय लिहिणे कृपा लोभ करावा हे विनंती.

¶*Antaji Nagesh tries to justify the visit of his master—Fatesing Gaikwad—to Raghoba and the English. He explains he had to pay the visit being surrounded by enemies.*

---

*No. 267]* *[6-10-1775*

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १० साबान मुकाम जैनाबाद जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र छ १ साबानचे पाठविले ते छ ६ मिनहून प्रविष्ट जाहालें. फौजेचे देणे रोजमरे दुमाही मिलोन पंचावन साठ हजार ऐवज चढला यास्तव नवापुराहून कूच करून आपणाकडे यावयास भादडच्या मुकामास आलो. आपण दसरियास कूच करून इकडे येणार तेव्हा हेलपटा पडेल याजकरितां येथून शंकराजी खंडेराव

यास सोडऊन आणण्याची विचारणा पाहातों. महमद इसफास भूपालकरानी धरिला म्हणौन वर्तमान. चंदरराव पवार पाच सातसे स्वारानसी श्रीमंतानी सुरत प्रांतीं रवाना केले ते आंकलेश्वरास आले. जनार्दनपंत मांडवीस आहेत. लक्ष्मणपंत त्रिंबकराव गायेकवाड याणी धरून नेले, ते कामरजेस आहेत. फौजेच्या देण्यास तूर्त पंचवीस तीस हजार रुपये पाठवावे. आपण कोणत्या सुमारें येतां ते ल्या म्हणोन लिहिले ते कळले. ऐशियास आम्ही येथून विजयादशमीच्या मुहूर्ते कूच करून तिकडेच दरमजल येत असो. तुम्ही इकडे न यावें. शंकराजी खंडेराव याचे सुटकेचा उद्योग करणार तो करावा, तों आम्ही लौकरच येऊ. भेटीहि तिकडे आल्यावर होतील. पैक्याचा मजकूर तरी तेथे आम्हांस पैक्याचा वहुत वोढा आहे. फौजेचे रोजमरे देणें चढले आहेत. पुरंदराहून पैका येणार आहे तो लौकरच येईल. आल्यावरी तुम्हासहि देऊं. मह( मद ) इसफाचा मजकूर, त्यास तो पळोन जाऊं लागला तेसमई सरकारची फौज माघारे आली. त्यास धरून पाठवावयाविसी राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर यास लेहून पाठविले होतेच. त्याणी आपलेकडील पटा ताजखान रोहिले आडवे पाठऊन त्यास धरून आणून सिवण्यात ठेविला होता. बहुतस्री अटक असता येक दिवसी रात्रीस दग्याने पळोन गेला. दुसरे दिवसी ताजखान यास कळताच बारा खासे दर आसामीस दोन तीन राऊत घेऊन बारा जण बारा वाटेने शोधास गेले. त्यातून फतेखान रोहिला याणे च्यालिसा कोसावर दुसरे दिवसी गाठिला. त्याची त्याची लढाई बरीच जाली. फतेखानास त्याच्या तीन च्यार जखमा भारी जाल्या. याच्या इसफावरी तीन जखमा चढल्या. त्या हलक्या, यामुळे इसफ नव कोस पळोन गेला. तेथे गोंडानी धरिला. मागाहून फतेखान व ताजखान जाऊन पोहचले. त्याणी त्यास चतुर्भुज करून छपारेयाचे ठाण्यात शृंखला घालून ठेविला आहे. सेनाधुरंधर त्यास इकडे रवाना करणार. इकडूनहि पाच सातसे राऊत जाऊन आणितील. आम्ही काल जैनाबादेहून कूच करून आठ कोस मजल केली. येथून च्यार कोस येदलाबाद आहे. पौर्णिमा येदलाबादेस करून दरमजल तुम्हाकडे येतो. भेटीनंतर सविस्तर कळेल. शंकराजी खंडेराव सुटोन आले म्हणोन लिहिले ते कळले. उतम गोष्ट जाली. बहुत काय लिहिणे लोभ असो हे विनंती.

¶*Hari Ballal writes to Naro Anandrao about the movements of Dadasaheb and Muhammad Issaf. He describes the thrilling chase of Muhammad Issaf by a contingent of Mudhoji Bhonsle sent under Tajkhan. He advises the addressee that he should not move but await his arrival there.*

6162

२२९ ठाणे.

No. 268] [6-10-177

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बाळाजीपंत स्वामीचे सेवेसी

पो॥ हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ १० साबान जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. मुख्य इंग्रेज श्रीमंताबराबर आहे. त्यास मुंबईहून बोलावणे आले. त्याजबाार लक्ष्मणपंत नातू मुंबईस रवाना केले आहेत. राजश्री फतेसिंग गायेकवाड यासी व इंग्रेजासी सख्य आहे. चंदराव पवार पांच सातसे स्वारानसी आकलेश्वरी आले. लक्ष्मणपंत नेले ते कामरजेस आहेत. श्रीमंत व राजश्री गोविंदराव गायेकवाड छाणीवर आहेत म्हणोन लिहिले ते कलले. ऐशास आम्ही आज विजयादशमीचे मुहूर्ते तेथून कूच केले. दर मज(ल) त्याच प्रांते येत असो. तिकडे गेल्यावर पवार वगैरे किरकोलीचा पराश्रम होणार नाही. लक्षुमणपंत नातू गेले ते मुबईकरासी बोलोन पुढे काये मजकूर करितात, श्रीमंत कोणीकडे जाण्या करण्याचा विचार करितात, बातमी सविस्तर लेहून पाठवावे. जैनाबादेहून शुक्रवारी कूच केले. पौर्णिमा येदलाबादेस करून तुम्हाकडे दर मजल येत असो. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶[*Haripant to Balaji Pant making enquiries about the English and Dadasaheb and especially about the outcome of negotiations between the English and Lakshmanpant Natu, Dada's envoy who had gone to Bombay.*

---

No. 269] [10-9-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो॥ हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ १४ रजब जाणौन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहालें. श्रीमंतानी राजश्री फतेसिंग गायेकवाड याजकडे ऐवज करार केला तो मुदतीस न ये म्हणोन इंग्रेजसुधा येऊन बडोद्यास मोर्चे लाविले. फतेसिंगराव बाहेर येऊन दाहा लक्ष रुा सोने रुपे काही नखत देऊन बडोद्यास गेले. बाकीच्या

ऐवजास वोला मानाजी नाईक व आरबाचे जमातदार ठेविले. ऐवज देणे प्राप्त. आपले येण्याची मार्गप्रतीक्षा करितात. आपाजी गणेश यांणी श्रीमंताकडे कारकून पाठऊन सात लक्ष रुापर्यंत कबूल जाले, परंतु ठराव ज़ाला नाही. श्रीमंतानी आमदाबादेत बारा चौदा लक्ष पर्यंत पटी करून ऐवज घेतला तो मागतात, तह न पडे म्हणोन कारकून उठोन गेला. आमदाबाद घेऊन गोविंदराव गायेकवाड यास देणार, ते मात्र घेणार नाही म्हणतात. श्रीमंताचे मानस आमदाबाद घेऊन धारेकडे जावे. इंग्रजाचे मानस तिकडे न जावे, समुद्रकिनाराने घाटाखालून पुण्यास जावे. लक्ष्मणपंत जनार्दन अनंत याजबराबर आपाजी पायेगुडे देऊन व्याहारीयास पोहचाऊन दिल्हे. तेथे चढी लागोन पुढे ठाणी सोडवीत गेले. तिकडून श्रीमंताकडून विश्वासराव परभू व त्रिंबकराव गायेकवाड सरसुभा होऊन आले. दोन प्रहरा मोह्याच्या ठाण्यात लक्ष्मणपत व जनार्दन अनंत व आपाजीबावाकडील केसो कृष्ण शंभर सव्वासे स्वार होते याजवर चालून आले. केशो कृष्ण बाहेर पडोन येक दोन वेला चांगली झटपट जाली. सात आठ जखमी जाले. च्यार पांच घोडी पडली. ते भारी हे थोड यामुले हे निघोन व्यारीयास आले. आपाजीबावा बलसडेस होते तेहि येऊन येकत्र जाले. लक्ष्मणपंत सोबत सोडून निराले नदी उतरून गेले ते परभारे त्याणी धरून नेले. माडवी व वासदे येथील वरात आम्हाकडे पाठविली होती. ते उगवावयास आपाजीबावा गेले होते. परंतु ते हालाखी दाखऊन कालहरण करितात. पैका उगवत नाही तेव्हा आपाजीबावा निघोन आले. जनार्दनपंत व्याहारीयात राहिले. आम्हाजवल फौज थोडी भारी सामान असिल्यासिवाये अबरू राहाणे कठीण. रोजमरे देणे चढले, गवगवा बहुत. फौज उठोन जावयास सिध जाली. सोनगड घ्यावा म्हणोन लिहिली येतात, कुमक व खर्चास येत नाही. तेव्हा सोनगड घ्यावयाची उमेद राहून नवापूर वगैरे ठाणी कसी राहातील? लौकर या प्रांती येणे जालिया स्तित राहील. नाही तर उपाये नाही म्हणोन लिहिले ते सविस्तर कलले. ऐशास आम्ही तुम्हाजवल मागेच यावे परंतु राजश्री आपाचे येण्यामुले दिसगत लागली. प्रस्तुत आपा आले. लस्करांत त्यांचे दुखणे फार जाले आहे. याउपरी येथे कांही काम नाही. लौकरच येत असो. तिकडील वर्तमान लिहीत जावे. लक्ष्मणपंत धरून नेला तो कोणीकडे घेऊन गेले ते शोध करून ल्याहावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke learns from Naro Anandrao's letter that Fatesing capitulated after putting a feeble defence and that Raghoba proposes to march upon Ahmedabad.*

6164

No. 270] [10-10-1775

पो ३ रमजान
सुा सीत

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वमीचे सेवेसी

विनंति. सेवक नारो बलाल भुसकुटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १४ माहे शाबान पावेतो सेवकाचे व सरकार हांडे येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. सेवकास राजश्री हरिपंत तात्या याही महमद इसफ गारदी याचे पारपत्यासी पाठविले. सरदार तिघेजन सात आठ हजार फौज घेऊन गेले. परंतु गारदी मोठा मर्द माणूस आहे. हा या फौजेने बुडण्हार नाहीं ही धशत सरदारास आणि काही माया येत असे. परंतु सेवकाच्याने जेथवर सरदारास समजावयाचें तें समजाऊन गाठ घातली. खावदाचे प्रतापें गारदी पलोन सडा गेला, तो सिवणी सोपारें मंडेल्या अलीकडे तेथे धरला गेला. पायांत बेडीहि पडल्या. मोठा मर्द होता. तो खावंदाचे प्रतापें लये पावला. फौजा घेऊन मागती लस्करांत आलो. हांडे सरकारचे गांव खराब केले. गुरें वगैरे आणिलीं, सेतें चारिलीं तें सविस्तर वर्तमान राजश्री हरिपंत तात्यास निवेदन केलें. त्याण्ही आज्ञा केली कीं गारदी याणें नगदी यैवज घेतला आहे तो आम्हीं फडशा करितो. मग सेवकानें कबूल केलें. मग जें त्याचे विचारास आलें तैसा फडशा केला. तो सेवकानी मान्य केला, परंतु रयतेवरी रुपये साधावे यैसें सांगितलें. यैसियासी प्रांत मजकूर पाऊस कमी, त्यांत दीड महिना तो पडलाच नाहीं. त्यामुलें ज्वारी बंडी (?) व दुसरी पायेमाली जाली, जेथवरी साधतील तेथवरी साधून घेतों. शेवेसीं आलियावरी सर्व निवेदन करीन. त्याचा निर्वाह करण्हार खावंद समर्थ आहेत. राजश्री हरिपंत तात्या यांहीं पायेमालीची चवकसी करून यैवज रयेतीस मजरा द्याल तो यैवज वाजवी सरकारांतून मजरा देऊं यैसें बोलले, तेहि सेवकानी मान्य केले. जमिदारीचे चौकसीस राजश्री सर्वोत्तम शंकर सर सुभेदार याजकडोन राजश्री त्रिंबक गोविंद कारकून माहालीं आले. त्यासी गारदी याचे कामकाज करून आलियावरी त्याजला जमिदारीची जैसी त्याणी तमाम प्रगणियाची चवकसी केली त्याप्रमाणें सेवकानें करून दिल्ही. सरमंडल सुद्धां कागदपत्र घेऊन सेवेसीं आले आहेत. ते निवेदन करितील. जुज जमीदारास खर्च किमपि मजुरा दिल्हा नाहीं. आकार करून आणिला आहे. जमिदार नेमाड प्रांतींचे आहेत. यासी कांही खर्च न दिल्हा तरी सेवकाची विपत्य पाडितील, पळून जातील, तरी याचा निर्वाह करण्हार खावंद समर्थ आहेत. मी त्याहावेसे नाहीं. जमाबंदी

पैकीं खर्च सन आर्बा व सन खमस दोन्ही साला पायेमाली सूट दिल्ही. ते सर्व जैसा कागद चवकसी करून घेतला तो दिल्हा याप्रमाणें परगणें वरई व परगणें कान्हापूर व परगणे भामगड व परगणे मुधी सुधां दिल्हा. हाडे सरकारचा इजारा आहे परंतु आमीन याही चवकसी जमाखर्च याची पाहिली त्याप्रमाणें कागद दिल्हे आहेत. हे सर्व निवेदन करितील त्यावरून सर्व ध्यानास येईल. हांडे सरकारची पायेमाली फौजेची जाली तोहि आकार जाहाला तो कागद यासी दिल्हा. याप्रमाणें साल मजकुरीं रयेतीस वाजबी पायेमली मजरा रयेतीस देऊन रयेत राखितों. खावंदाचे प्रतापे हांडे सरकार बुडालेच होते, परंतु प्रतापें राहील. गारदी याचे पारपत्य भगवंतानी उत्तम केले. सरकारहि खावदाचे प्रतापें राहिले. परंतु हांडे सरकारास गारदी याचे दगियामुलें यैवज सावकारापासून घेतला आहे आणि रयेतीवरी तसदी बहुत जाली आहे, यांस्तव सेवकास तेथे जाऊन सर्वाची खातरजमा करून यैवज घेतला आहे तो द्यावा आणि रयतीची खातरजमा करावी. सालहि आफतीचें आहे. सालमजकुरीं पाउसाची कमती बहुत, याजमुलें जमाबंदी करून यैवज ध्यावयाचे बंदोबस्तास दोन तीन महिने लागतील. यास्तव विनंति सेवेसी लिहिली आहे. सरकारची आज्ञा येईल कीं जमाबंदी करून रयेतीचा बंदोबस्त करून यावे, तर येथील कामकाज करून येईन. येनदा सेवकानें चाकरी येथें राजश्री हरिपंत तात्या याजवल येथाशक्ति जाली ते केली. सरकारचीं कामें केलीं तीं सविस्तर राजश्री हरिपंत तात्या सेवेसी लिहितील. मी सेवक पदरींचा चरणरज आहे. माझी निष्ठा स्वामीचे चरणापासीं आहे. जमीदार यांचाहि यैवज वसूल घेतला पाहिजे. येथें राहिल्यानें मामलतीचा बंदोबस्त होईल. मग स्वामीची जैसी आज्ञा सादर होईल त्याप्रमाणें यावयाची आज्ञा जाहली तरी माघमासी येईन. येथें राहिल्यानें सरकारकाम येथास्थित होईल. मग जैसी आज्ञा येईल तैसी वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ballal Bhuskute writes to the Peshwa how he helped the Peshwa's troops to overcome Muhammad Isaf. He asks for a remission of a part of the revenue from the district as much of it was laid waste by the soldiery.*

---

*No. 271*]

[*10-10-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.**

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १४ साबान मुकाम नजीक येदलाबाद जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष.

तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. कुकरमुंढेकर शंकराजी खंडेराव सुटोन आले म्हणोन लिहिले ते कळले. ऐशास त्याची निष्ठा श्रीमंताच्या चरणासीं होतीच त्या पुणेंकडून ते सुटोन आले. फार उतम गोष्ट जाली. आम्ही जैनाबादेहून कूच करून येथे आलो. पुढे सोनगड सुमारे लौकरच येत असो. तुमचीहि भेटी लौकरच होईल. तिकडील वर्तमान ल्याहावें. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

राजश्री बाळाजीपंत स्वामीस साा नमस्कार लोभ कीजे हे विनंती.

¶*Hari Ballal learns with pleasure the news communicated to him by Naro Anandrao of the release of Shankraji Khanderao. He says that he has just arrived near Edlabad and will soon proceed to Songad.*

---

*No. 272]* *[11-10-1775*

पौ छ ३९ साबान शुाा खमस

**श्री**

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान**

**स्वामीचे सेवेसी**

विनंती. सेवक येसाजी सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ साबानपावेतो स्वामींचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष. छ २६ रजबचे आज्ञापत्र सादर जाले ते छ ८ साबानी पावले. तेथे आज्ञा की, रा माधवराव बेलोसे याचे तुमचे न बने, यावरून तुम्ही लोक नाके आहेत तेथे चौक्यास ठेऊन बंदोबस्त केला व अर्नालियाचे बंदरावर च्यारपाचसे माणूस नेहमी ठेऊन मोर्चेबदी करून गोळागोळी करीतां त्यास याप्रो करावयाचे नव्हते. शत्रू संनिध असता आपणातच कलह वाढऊन ठिकाणास मोर्चेबंदी करून माहीतगारी करून द्यावी हे उत्तम न केले. हुजूर ल्याहावयाचे होते. बंदोबस्त करून दिल्हा असता. याउपरी चौक्यास व मोर्चेबंदीस लोक ठेविले असतील ते उठऊन नेणे. किले अर्नाळा येथील लोकाच्या नेमणूक बाा रोजमुऱ्याचा ऐवज * * त्याप्रो देत जाणे व रा माधवराव बेलोसे यास कलह न वाढवा येविसी हुजूरून पत्र लिहिले आहे. तरी रा गंगाधर बलाल यास अर्नालियास येक गलबत देऊन समागमे पत्र पावते करणे. ऐसी कितेक प्रकारे सेवकास शब्द लाऊन आज्ञा आली. ऐशास येविशीचे कचे हरद्र पूर्वी लिहिले आहे. त्यावरून सेवकाकडे कलह वाढवावयाचे कारण अथवा शब्द कोण तो हे सर्व समजण्यात आलेंच असेल. रयतीचा बच्याव व्हावा याअर्थे

लोक ठेऊन बंदोबस्त केला. त्यावरून त्याणी लोक पाठऊन नि:कारण कलह केला. उपरांत नित्य गोले लोकावर मारावे, गोल्यानी काही जखमी व ठार जाले, इकडून गोलागोली तिलमात्र न करिता लोक नाना प्रकार समजावितात. आसो. राजश्री गंगाधरपंत निवेदन करिता निष्ठापूर्वक वर्तणुकीचा प्रकार विदित होईल. आज्ञेप्रो मारनिलेस येक गलबत व बराबर माणसे देऊन जंजिरा रवाना केले व चौक्यास व नाकेबंदीस लोक ठेविले होते ते उठविले. रोजमुऱ्याचा वगैरा आकार सेवकाकडे आल्यावर इकडून ऐवज अथवा गला द्याव * * * * किमपिहि नाही हे विनंती. पेशजी * * * * होती. राजश्री माधवराव बेलोसे याकडून जंजिऱ्याहून आकार येईल, त्यास सालाबादचे अन्वये ऐवज व गला आज्ञेप्रो बेगमी करून देत जाईन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶*Yesaji Shivdeo writes to the Peshwa why it was that a discord had arisen between him and Madhavrao Belose at Arnala.*

---

*No. 273*] *[16-10-1785*

पो छ २६ जिल्हेज
आश्विन सीत समानीन
गारपीर

**श्रीसीताकांत**

**राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांसी**

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसावे विशेष. भीमा उतरोन राक्षेसवाडी ताा कडेवाळीत येथे येणे जाले. त्या मुकामीहून आपणाकडे पत्रे पाठविण्यात आलीच. त्याजवरून कळले असेल. तेथून कूच केलें ते सीणा नदीवर मुकाम केला. तेथे काही फौज व कारखानेजात राजश्री बळवंतराव विष्णु व भवानी नागनाथ याचे समागमे ठेऊन आम्ही स्वारीणसी गंगेवरी आलो. उंट वोझ्यासुधा पाण्यातून उतरावयाचे होते म्हणोन कुल सडे स्वारीचे कारखान्यासुधा यैल तीरी येऊन मुकाम केला. तेथून लांब लांब मजलीने छ २९ तारखेस व्यालयास येणे जाहले. चिरंजीव राजश्री बापू व चिरंजीव राजश्री चिमणाबापू यासी वराडात येणियाविसी पूर्वी पत्रे पाठविण्यात आलीच होती त्याजप्रो त्याचे येणे वर्धेवरी जाले. भेटीचा दिवस आस्विन शुध्द द्वितियेचा, यास्तव उभयेता चिरंजीव वर्धेहून येके दिवसात पनास कोस मुहूर्ताची संधि

आटोपून त्याल्यास आलेत व सुमुहूर्त भेटले. चिरंजीव राजश्री बाबा व राजश्री भवानी काळोजी आदिकरून कुरूंदखेडास आले होते. आम्ही व उभयेता चिरंजीव येथेच आलो. त्याच्या आमच्या भेटी जाहाल्या. बलवंतराव विष्णु व भवानी नागनाथ हे उभयेता मशारनिले कारखाने जात, व फौजसुधा विजयादशमीस आम्हांजवळ येऊन पोहचलें. आम्हीं पुण्यांत आसता गावेलगडाकडील काहींयेक वर्तमान आले होतें त्याचा इतला आपणास दिल्हाच होता व इतक्या त्वरेनी इकडे येण्याचे कारणहि हेच. याजकरिता त्या सुमारे जात आसो. पाहावे कैसा प्रकार घडतो. इकडील लक्ष तो सर्वप्रकारें बोलण्यास आले त्याजवर व दिवसाची अवधि दिसत नाही. मध्येंतरी हा प्रकार व घरचा बंदोबस्त व मंडळे वगैरे याजकडील रवानगी करणे त्यास मोरो गोविंद तिखे व नानको कृष्ण तेथून रवाना जाहले आहेत. परंतु ते आले नाहीत. ते आलियावर तिकडील रवानगी करणियात येऊन सत्वरच बोलल्याप्रमाणे तयारी व सिध्धता येणियाची होत असे. चिरंजीव राजश्री मनाबापू यासी येथून पूर्वीं लिहिण्यात आले होतें की पुण्याहून येण्याविसी पत्रे आली म्हणजे तुम्ही जावे त्याजप्रमाणे आपणाकडून पत्रे चिरंजीवाकडे जाऊन त्याचे येणे येथे घडलेच आहे. येतद्विषयी ल्याहावेसे नाही. रा छ १२ माहे जिल्हेज बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mudhoji Bhonsle writes to Haripant Tatya of his arrival as far as the river Sina. He also says that he has asked his son Chimna Bapu to come and see him (the writer).*

---

*No. 274*] [*26-10-1775*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १ रमजान जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही दोन पत्रे पाठविली ती प्रविष्ट जाली. फौजेचे देणे आठवडे दुमाही मिलोन पंचावन साठ हजार रुा चढले. त्यास परभारे मांडवी बाा व पाा नंदुरबार वगैरे मिलोन पंधरा हजार मिलोन बाकी देणे, त्याबदल व नागोपंत आपणाकडून आले त्याबरोबर नख्त ऐवज न आला यामुले लोक गवगवा करितात. आपलेकडे यावे त्यास त्यासुमारे लौकर येतो म्हणोन पत्रे आपली येतात व पुरंधराहून आज्ञा सुरत प्रांती न जाणें ऐसी आली, त्यावरून तूर्त येथे मुकाम केले. लोक येथेच राहिल्यास सडे भेटीस येऊन म्हणोन लिहिले

ते कळले एसियास येथे तूर्त पैका नाही, वोढ आहे, यास्तव राजश्री नागोपंत याजबरोबर कापड देऊन रवाना केले. ऐवज येणार. आल्यावरी तुम्हांकडे पाठऊ. तुम्ही यावयाचे न करावें. आम्हांस समाधान नाही. यामुळें तीन च्यार मुकाम जाले. आरोग्य होताच येथून कूच करून सोनगडचे सुमारे लौकरच येत असो. तुमची भेट सत्वरच होईल. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*On being informed by Naro Anandrao of his monetary difficulties, Haripant writes to him saying that money will soon be sent on to him when received from Purandar. He further says that he would soon proceed to Songad when free from illness.*

---

*No. 275*] [*26-10-1775*

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. भेटीस मुहूर्त मध्यम प्रतीचा मगलवारचा व शनवारी द्वादशीस रात्रौ मुहूर्त चागला आहे. त्यास कोणते दिवसी भेटीस यावे म्हणून लिहिले ते कळले. ऐसियास फौज तेथे ठेऊन तुम्ही सडे भेटीस यावे. उदैक मगलवारी आमचा येथे मुा आहे. आपण सडे यावे. रा छ ४ रमजान बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke gives Naro Anandrao time and place for a meeting.*

---

*No. 276*] [*27-10-1775*

पाो छ ४ रमजान कार्तिक
मास सीत सबैन

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही बाहालेस आला म्हणौन कळले. त्यास तेथेच मुकाम राहावे. आम्ही कूच करून त्याच सुमारे तुम्हाकडे येतो. परगण्यास कहीचा वगैरे उपसर्ग लागो न द्यावा. रा छ २ रमजान बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant informs Naro Anandrao that he would soon be there at Bahal, and asking him to see that the province does not suffer from any ravages at the hands of the army.*

No. 277] [29-10-1775

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. पाा बहाल येथील जागिरीचा अमल राजश्री रामचंद्रराव पवार यांजकडे सरंजामास आहे. त्यास तुमचा मुकाम पाा मजकुरी आला आहे. यास माहालास काडीमात्र उपसर्ग लागो न द्यावा. सेतास हिरवे दाणा खेरीजकरून गवत कडबा मात्र आणावा याप्रो ताकीद लस्करास करावी. यांचे सरंजामाचा ऐवज येवढाच आहे. आणा समागमे चाकरीस येणार यास्तव बंदोबस्त जरूर करावा. राा छ ४ रमजान हे विनंती.

¶*Naropant Nana is asked by Haripant to see that the jagir lands of Ramchandrarao Powar do not suffer owing to the camping of his army there.*

---

No. 278] [20-11-1774

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी.

पो बहिरो रघुनाथ मुाा पुरंधर कृतानेक साां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ माहे रमजानपर्यंत जाणौन आपणाकडील कुशल ल्याहावयासी आज्ञा करावी विशेष. प्रांत गुजराथ येथील बंदोबस्तास फौजेसुध्धां आपली खासा स्वारी जाली आहे. ऐशास शहर सुरत येथील चौथाई सरकार तर्फेची मामलत आम्हाकडेस आहे. तेथे नरोतम किसोरदास याणी श्रीमंत दादासाहेबाकडील सनदा आणोन मोंगल व इंग्रेज साह्य करून घेऊन आमचे तर्फेचा अमल उठऊन त्याणी आपला बसविला, हे वर्तमान साांत सरकारांत निवेदन केले. त्यावरून येथील बंदोबस्ताविसी आपणास पत्रें द्यावयाची आज्ञा जाहाली आहे व मजलाहि स्वामीचे समागमे जावे यैसी आज्ञा आहे. त्याप्रो पत्रें घेऊन वगैरे कामकाज उरकोन सेवेसी येतो. पुढें बंदोबस्त करून देणार आपण आहेत. त्यास स्वामीचे जावयास अवकाश किती दिवसाचा आहे, फौजेची वगैरे जमीयत होणे त्यास दिवसतगत किती लागेल, स्वारी मजल दरमजल जलदीने जाईल किंवा किती मुकाम पडतील ते सविस्तर ल्याहावयासी आज्ञा करावी. त्याप्रो येथील कामकाज

6171

ते कळले एसियास येथे तूर्त पैका नाही, वोढ आहे, यास्तव राजश्री नागोपंत याजबरोबर कापड देऊन रवाना केले. ऐवज येणार. आल्यावरी तुम्हांकडे पाठऊ. तुम्ही यावयाचे न करावें. आम्हांस समाधान नाही. यामुळें तीन च्यार मुकाम जाले. आरोग्य होताच येथून कूच करून सोनगडचे सुमारे लौकरच येत असो. तुमची भेट सत्वरच होईल. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*On being informed by Naro Anandrao of his monetary difficulties, Haripant writes to him saying that money will soon be sent on to him when received from Purandar. He further says that he would soon proceed to Songad when free from illness.*

---

*No. 275]* *[26-10-1775*

**श्री**

**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवसी**

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. भेटीस मुहूर्त मध्यम प्रतीचा मगळवारचा व शनवारी द्वादशीस रात्रौ मुहूर्त चागला आहे. त्यास कोणते दिवसी भेटीस यावे म्हणून लिहिले ते कळले. ऐसियास फौज तेथे ठेऊन तुम्ही सडे भेटीस यावे. उदैक मगळवारी आमचा येथे मुा आहे. आपण सडे यावे. रा छ ४ रमजान बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke gives Naro Anandrao time and place for a meeting.*

---

*No. 276]* *[27-10-1775*

पाो छ ४ रमजान कार्तिक
मास सीत सबैन

**श्री**

**राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. तुम्ही बाहालेस आला म्हणौन कळले. त्यास तेथेच मुकाम राहावे. आम्ही कूच करून त्याच सुमारे तुम्हाकडे येतो. परगण्यास कहीचा वगैरे उपसर्ग लागो न द्यावा. रा छ २ रमजान बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant informs Naro Anandrao that he would soon be there at Bahal, and asking him to see that the province does not suffer from any ravages at the hands of the army.*

No. 277] [29-10-1775

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. पा बहाल येथील जागिरीचा अमल राजश्री रामचंद्रराव पवार यांजकडे सरंजामास आहे. त्यास तुमचा मुकाम पा मजकुरी आला आहे. यास माहालास काडीमात्र उपसर्ग लागो न द्यावा. सेतास हिरवे दाणा खेरीजकरून गवत कडबा मात्र आणावा याप्रो ताकीद लस्करास करावी. यांचे सरंजामाचा ऐवज येवढाच आहे. आणा समागमे चाकरीस येणार यास्तव बंदोबस्त जरूर करावा. रा छ ४ रमजान हे विनंती.

¶*Naropant Nana is asked by Haripant to see that the jagir lands of Ramchandrarao Powar do not suffer owing to the camping of his army there.*

---

No. 278] [20-11-1774

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी.

पो बहिरो रघुनाथ मुा पुरंधर कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १९ माहे रमजानपर्यंत जाणौन आपणाकडील कुशल ल्याहावयासी आज्ञा करावी विशेष. प्रांत गुजराथ येथील बंदोबस्तास फौजेसुध्धां आपली खासा स्वारी जाली आहे. ऐशास शहर सुरत येथील चौथाई सरकार तर्फेची मामलत आम्हाकडेस आहे. तेथे नरोतम किसोरदास याणी श्रीमंत दादासाहेबाकडील सनदा आणोन मोंगल व इंग्रेज साह्य करून घेऊन आमचे तर्फेचा अमल उठऊन त्याणी आपला बसविला, हे वर्तमान साद्यंत सरकारांत निवेदन केले. त्यावरून येथील बंदोबस्ताविसी आपणास पत्रें द्यावयाची आज्ञा जाहाली आहे व मजलाहि स्वामीचे समागमे जावे यैसी आज्ञा आहे. त्याप्रो पत्रें घेऊन वगैरे कामकाज उरकोन सेवेसी येतो. पुढें बंदोबस्त करून देणार आपण आहेत. त्यास स्वामीचे जावयास अवकाश किती दिवसाचा आहे, फौजेची वगैरे जमीयत होणे त्यास दिवसतगत किती लागेल, स्वारी मजल दरमजल जलदीने जाईल किंवा किती मुकाम पडतील ते सविस्तर ल्याहावयासी आज्ञा करावी. त्याप्रो येथील कामकाज

6171

उरकोन सेवेसी येऊन हजर होतो. स्वामीचे जाण्यास आठपंधरा दिवसाचा अवकाश असिल्यास येथील कामेंकाजे सर्व करून घेऊन येऊ. जाण्यास जलदी असिली तरी जे कामकाज होतां होईल तेच करून येईन यैसे आहे. याकरितां पत्रोतरी सविस्तर आज्ञा लेखन करावी त्याप्रों निघोन येतो. मजला कसकशा (?) होऊन सुरतेचे आसममंता सुरत आठाविसीत पोहचावयास विलंब कितीक दिवसगत लागेल ते सविस्तर ल्याहावयास आज्ञा करावी, त्याजप्रो निघोन सेवेसी येईन; तर उतर काय ते लिा पाहिजे. सर्व प्रकारे स्वामीचा असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath communicates to Naro Anandrao the Peshwa's instructions about proceeding to Surat where the collection of Chauth dues assigned to the writer was being appropriated by Narottam by the orders of Raghoba. The writer wants to know the addressee's programme of march so that he may also join him as instructed by the Peshwa.*

---

*No. 279*]

[*28-11-1775*

**श्री**

**श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामीचे सेवेसी**

विनंती सेवक श्रीनिवास त्रिंबक साष्टांग नमस्कार विज्ञापना. यैसीजे सेवकाचें वर्तमान ताा छ ४ सवालपावेतो मुाा मोजे भोडगाव प्रांत दहिवले येथे सुखरूप असो विशेष. कोंडाईबारीचा बंदोबस्त आपले आज्ञेप्रमाणे केला. कमाविसदारास पत्र छ १ सवालचे पाठविले ते त्यास दिल्हे. त्यावरून त्यानी गावोगाव दोनदोन माणसे करून दिल्ही आहेत. एकोण त्याची सहासात माणसे व आपली मिळोन रात्रंदिवस बारीवर चौकी देतो. आम्ही सकाळपासोन संध्याकाळपावेतो राहतो. संध्याकाळी गावात येतो. व राजश्री सदासिव रघुनाथ यास धनेरीस खाटक्या वडाचे बारीक दोन तीन वाटा आहेत तेथे राहिले. पलीकडे घोडेवाट दोन कोस आहेत. तिकडेस नित्य येक येरझारा करितात व या चौकीवर रात्रंदिवस असतात. त्याच्या हाताखाली गावकराची च्यार माणसे व आपले गाडदी मिळोन बंदोबस्त केला आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब अद्यापि खडक्याबेहऱ्याचे पलीकडे सात कोसावर आहेत. कांहीं फौज मात्र चार येक हजार अलीकडे तीन चार कोसावर आली आहे. त्याची खर्चाची तंगचाई आहे, व फिरंगी सुरतेस गेले आहेत, त्याची वाट पाहतात. गाईकवाड आद्यापि कोणी आले नाहींत, ऐसा विचार आहे. आपण शंकरोबास

बातमीस पाठविला तो आजी सकाळीच पहाटे उठोन गेला. आम्ही त्याजबरोबर येक मिल दिल्हा आहे. आजी नवपुन्यास जाईल. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणें. कृपा निरंतर सेवकावर करीत असिले पाहिजे, हे विज्ञापना.

*¶Shriniwas Trimbak writes to Haripant Phadke mentioning the measures that he took for guarding the pass of Kondai Bari and other villages. The writer also mentions the movements of Raghunathrao and his allies the Gaikwad and the English.*

---

*No. 280]* *[Received on 8-12-1775*

श्री

पैवस्ती छ १४ सवाल
सीत.

नाना फडणिसाचे हातची

सेवेसी माहादाजी बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. भिखनखान श्रीमंताजवल होते यास फोडावयाचा संदर्भ सिंद्यानी लाविला. तुमची तलब श्रीमंताकडे निघत असेल ती देऊं व कदीम जाहागीर व इनाम गाव आसतील ते सुदामतप्रमाणे चालतील व नवी आणखीं दोन हजाराची जाहागीर देऊं, याप्रमाणे करार करून वचनप्रमाण देऊन आणिलें. याणी सेज पाडिलें याजमुळें राजश्री मालोजी घोरपडे वगैरे मानकरी आले. खानाची तलब श्रीमंताकडे चौपन हजार रुपये निघत होते. त्यांत सिद्यांनी च्यार हजार रुपये वजा करून पनास हजार करार केले. सिंद्याकडील करार ठरला त्याजवरून खानानी कांहीं स्वाराचा हिसेब करून निरोप दिल्हा. यैवज निघाला त्याच्या चिठ्या घरीं औरंगाबादेस दिल्ह्या. त्यास पुढें राजश्री हरिपंत तात्यानी फडशा केला तेव्हां चौथाई सूट घातली. बाकी सदतीस हजार रुपये ठराविले, हें सविस्तर आपणास विदित केलें. त्याजवरून आपण बिडावर बत्तीस हजाराची वरात बाकीचे यैवजावर दिल्ही. त्याजवरून निरोप घेऊन शहरास गेले. घरीं गेल्यावर लस्करांतून वराता केल्या. त्यास यैवज पावला नाहीं. याजमुळें त्याचे तगादे व नेहमी पंनास साठ स्वार होते. त्याणी मागील तलबेविसीं व आलिकडील श्रीमंताचे लस्करांतून निघाल्यापासून चाकरी जाहली त्याजविसीं तगादे करूं लागले व सेंदुरणीस घोडीं गेलीं ते घोड्याविसीं तगादे करितात. सरकारांतून बतीस हजाराची वरात दिल्ही होती ती मना जाहली. त्याजवरून शहरांतून काल पुण्यास आले. बराबर चालीस पनास स्वार आहेत त्यास खर्चास नाहीं. मार्गी फाके करीत आले. लोकांचा तगादा बहुत आहे.

श्रीमंतास सोडून बरें होईल म्हणोन आले. त्यास अलीकडील चाकरीचे यैवजास ठिकाण नाहीं. मागील यैवजास हा हिसका पडला. इनाम व जहागीर गांव पेसजीचे आहे त्याची आद्याप मोकलीक नाहीं. नवी देणे त्याचा जाबसाल मोघमातच आहे. याजकरितां फिरोन आले त्यास वरात मना केली आहे. त्याची फिरोन चिटी द्यावयाची आज्ञा करावी व पेसजींपासून मौजे माल सावली परगणे फुलवरी हा गाव इनाम व मौजे पिंपळगांव काले त्यापैकीं दाभाडी हा जाहागीर गांव आहे त्यास सदरहू माहाल मोगलाकडे गेले. त्यास गांव मोकलें करावयाविसी नवाबास पत्रें देविलीं पाहिजेत व नवी जहागीर दोन हजाराची द्यावयाचा करार आहे त्याचा बंदोबस्त करून देविला पाहिजे. याप्रमाणे न जाल्यास ते आमची स्थित ठेवीत नाहींत, याजकरितां हे आपणांस विनंति लिहिली आहे. तपसीलवार ध्यानांत आणावे आणि घालघसरीखालीं न घालावें. स्पष्टच उत्तर ल्याहावे. मग आमचा जीव घेतील तर घेवोत. चाकरी वरवाज[1] आणि गुन्हा लाजम याप्रमाणे जाहलें. आपली प्रशस्त मर्जी असेल तसेंच ल्याहावें. आम्हीच यैवज द्यावासा असल्यास आम्हीच घरदार विकून याचा फडशा करून देऊं. उत्तर पाठवावें. पंचवीस तीस माणूस येऊन वरीं बसतें त्यास काय सांगावें? त्याजवल येक पैसा खावयास नाहीं. याजकरितां कराराप्रमाणें याचे यैवजाची सोये करून द्यावयाची असेल तर द्यावी. उत्तर पाठावायास आज्ञा करावी हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal writes that a settlement of compensation and of Saranjam to Bhikhankhan who was won over from the side of Raghoba by Sindia should be effected without loss of time.*

---

*No. 281*]

[*11-12-1775*

**श्री**

विनंती सेवक नारो कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १७ शवालपावेतो आपले कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. कलकतेकर इंग्रजांकडून करनेल इटफैन बाहादर वकालतचे कामास हुजूर जावयाकरिता आले. ते नर्मदा उतरल्याचे वर्तमान पेशजी लिा (पाठविलेच) आहे. त्या उपरी इंग्रेज मजकूर शहरास आले तों पुरंधराहून आज्ञापत्र सादर जाले की, इंग्रजाकडून येतात त्यास सामोरे पाठऊन आणून गोरपरदास्तर[2] करणे. किरकोळी साहित्य व पडतालाची उंटे तटे बैल थकले असतील ते अडो न देता, विशये थो(ड) का आहे देऊन कासारबारीचे मार्गे हुजूर रवाना करणे म्हणोन

[1] योग्य. [2] बरदास्त.

मुजरद जासूद जोडी पत्रे घेऊन आले. त्याजवरून सरकार आज्ञेप्रो वकिलास सामोरे ग्रहस्त पाठऊन सन्माने करून आणून जैनाबादेस उतरविले. ज्याफतीचे सामान रितीप्रो पाठविले. दुसरे दिवसी इंग्रजास दौलतखान्यांत आणून मेजवानी वस्त्रपात्र वगैरे त्याचे खुशीप्रो केली. त्यांस खर्चाची वोढ. वाराणशीहून हुंड्या आणिल्या त्या औरंगाबादेच्या, त्याचा कावादावा येथे साहुकारियांत न होय, याजकरिता औरंगाबादचे मार्गे जावे असा त्याचा विचार दिसोन आला आणि सरकारची आज्ञा की कासारबारीने रवानगी करावी. यास्तव ऐवज पुणियांत द्यावयाचा करार करून तीन हजार रुो येका ग्रहस्थाकडून देविले, आणि समागमे कारकून माणसे नेहेमी पुरंधरपावेतो देऊन कासारबारीचे मार्गे रवानगी केली असे. बातमी सेवेसी कळावी याजकरिता लिा असे. येथून छ १४ तेरखेस त्याचा मुकाम बाहादरपुऱ्याचा जाला. छ १९ रोजीं ऐनापुरास गेले. तेथून पुढे दरमजल जातील. सत्रा मजलीनी पुरंधरी पोहोचावे असा निश्चय जाला आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Krishna reports that arrangements are made for the safe journey of Col. Upton, the English ambassador proceeding to Poona and that he is provided with funds till his cheques are cashed at Aurangabad.*

---

*No. 282]* *[21-12-1775 ?*

## श्रीं

सेवेसी विज्ञापना गोविंद नरसिंह साा नमस्कार विनंती. येथील कुशल छ २७ शवाल तीन प्रहर दर जागा नवापूर सुखरूप असो. यानंतर इकडील वर्तमान तर तूर्त बातमी बारीयाहून आली. ते बजिनस पत्र पाठविले तें पाहावें. फिरंगी सुरतेहून सरंजामसुधां लस्करास आला. तेथून पुढे मनसुबा करण त करतील. चांदरात जालियावर कूचे होणार म्हणऊन लिा आहे. सौ आनंदीबाई पावागडानजीक आली. चांपानेरावर आली. लस्करास येणार म्हणऊन माणूस तोंडजबानी सांगत होता. सेवेसी कळावे. वरकड वर्तमान येथास्थित असे. बहुत काये लिा हे विज्ञाप्ति.

¶*Govind Narsinh writes that Anandibai has arrived as far as Champaner and will shortly be in the camp.*

No. 283] [30-12-1775

**श्रीनिवासो जयती**

**श्रीमंत राजश्री बापूसाहेब**
**स्वामीचे सेवेसी**

विनंति सेवक राजो तमाजी व आणाजीराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. येथील कुशल तागायत छ ९ जिलकाद मो सवणुर जाणून स्वकीये कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. कृपापत्रें न येतां बहुत दिवस जाहाले. सेवकावरी दया करून पत्रें पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान सेवेसीं नवाबाची जोडी समागमें सेवेसीं लिहून पाठवीत असतों, श्रुत होईल. प्रस्तुत वर्तमान तरी हैदरखान पटणांत दीपावलीच्या मुहूर्ते पेशखाना[1] बाहेर देऊन मोहिमेचे सरंजाम होत आहे. जवळी च्यारी पांच हजार फौज दाहा बारा हजार गाडदी आहे. कलिकोट प्रांतें मावें धामधूम कलीकोटकर यानी केली होती. हैदरखानानी फौज व गाडदी पाठऊन बंदोबस्त केला. तूर्त तिकडे जात नाहीं. बिदनुरास यावयाची बोली दाट आहे. किलेत थोर तोफा पैकीं तिनी तोफा थोर व लहान मधेम प्रतीचे पंचवीस येणेप्रमाणे किल्या बाहेर कावेरी अलीकडे फौज व पेशखाना दिल्हा आहे. तेथ तोफा पाठविल्या आहेत. पौश सुध दसमीचे मुहुर्तें डेरे दाखल होऊन बिदनुरास येणार. कडपेकर याजकडून वकील पटणास जाऊन आडीच लाखाची खंडणी केली. त्याच प्रमाणे कनोजकराकडील वकील जाऊन बोली लाविली आहे. श्नेहभावास्तव बसालतजंगानी वकिलासमागमे वस्त्र जवाहीर हैदरखानास पाठविलीं आहेत. रायेदुर्ग व चित्रदुर्ग व हरपनहली वगैरे पालेगाराचे वकील जाऊन रुजू जाहाले आहेत. रायेदुर्गची बोली पनास हजार रुपयावरी उरकली. चित्रदुर्गची खंडणी दीडलाख होनावरी बोली जाहली. येरडकेर दुर्गकराकडे आहे तें सोडून देणें, रायेदुर्गकरास देणे आहे म्हणून दुर्गकरास तगादा लाविला आहे. तुंगभद्रापलीकडे अरकाट परियेंत हैदरखानाचें राज्य जाहालें आहे. त्याचा हुकूम दुसरेचे गुज्यांसीं नाहीं. आरकाटकर महमद अलीखान चेनापटणांत आहे तो देखील हैदरखानासी सलुकेनें आहे. टिपूचीं रवानगी गुरमकोंडेस करिताना दाहा हजार फौज पंधरा हजार गाडदी. पंधरा तोफा देऊन पाठविले. गुरमकोंडा घेऊन कडपे प्रांतास गेले. कडपेची खंडणी करिता तगादा केला तेव्हा हैदरखानाजवळी वकील जाऊन आडीच लाखावरी बोली उरकून घेऊन

---

[1] तंबू वगैरे स्वारीचें सामान.

मनाचिठी टिपूस आली. इतकियांत बसालतजंग व कनोलकर हे साहा सात हजार फौजेनिसी कडपेकर याचे कुमकेस कडपेचे सरहदेस गेले. हें वर्तमान टिपूस कळून त्याजकडे शामराव इगळ त्या समागमें पांच साहा हजार फौज सिबंद वगैरे यास बसालतजंगावरी पाठविलें. हे दरमजल जाऊन बसालतजंगाचे लस्करापासून च्यार पांच कोसावरी जाऊन मोकाम केला. नित्य कहीवरी लढाई होत होती. बैदे[1] नित्य उंटे व बैल घेऊन जात होत आणि लोकांस तोडून जखमी करीत होते. येक दिवस बसालतजंग खूप तयार होऊन गेले. लडाई जाहाली, सिकस्त खाऊन माघारे सरले. इगल शामराव बैद वगैरे घेऊन चारा व दाणा बंद करूं लागला. माहागाई बसालतजंगाच्या लस्करांत जाहाली. तेव्हां कूच करून कर्नोळ प्रांतास आले. त्याच्या पाठी लागून इगल शामराव फौज सुधां लागला आहे. आदवानी प्रांतास बसलातजंग जाणार. टिपू कडपे प्रांताचे जमीदार मातबर त्याची खंडणी घेत फिरतो. कडपेकर हैदरखानासी रुजू जाहाले. कनोलकर रुजू नाहींत म्हणून टिपूस हैदरखानाचीं पत्रें जातात जे, कर्नोलेस ठाणें घालून मुलूक बांधणे. याप्रमाणें वर्तमान सेवेसीं कळावें करितां लिहिले आहे. राजश्री मुराररात्र घारपडे गुतीस आहेत. जवळी च्यारी पांचसें स्वार आहेत. स्वामीकडील फौजेची वाट पाहात बसले आहेत. प्रस्तुत कोठहि जाणेची मसलत दिसत नाहीं. पटणांत हैदरखानाजवळी बाजीराव बरवे व विठल विश्राम पांचसें स्वारा-निसीं पाटणाबाहेर कोसावरी उतरले आहेत. खर्चास देत आहे. आठा दिवसा येकदां भेटायास किलेस जाऊन येतात. त्याची मधेस्ती आपाजी रामाकडे आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब गोसावी यांजकडून कर्ज घेऊन हुंडी हैदरखानावर करितात त्याप्रमाणें चिटी घेऊन रुपये देत आहे. श्रीमंताकडील पत्रें हैदरखानास वरचेवरी बाजीराव याचे विद्येमाने जातात जे, तुंगभद्रापलीकडे बकापूर व धारवाड वगैरे ठाणी घालणें. त्यास हैदरखान स्वामीचे लक्ष पाहून उतावली न होतां तालामाला पाहतो. बिदनुरास हैदरखान आलियावरी बंकापुरास व धारवाडास उपद्रव द्यावेयाची दाट बोली आहे. निघून बिदनुरास आलियावरी सेवेसीं विनंति लिहून पाठवितों. सवणूर तालुकीयास तिनी च्यार महिने उजनी आपा बिदनुर देत होता, त्यावरून व बाजी तिमाजी राम म्हणून कारकून त्याला वकीलीचें काम सांगून वस्त्रें हैदरखानास देऊन पाठविलें. हैदरखानाजवळी आपाजी राम आहे त्याचे विद्येमाने बोली लाऊन दोनी लाख रुपये ऐन व दरबार खर्च पंचवीस हजार रुपये येणेप्रमाणें आपाजी

१ हैदराचे सैन्यांतील लुटारू लोक.

6177

रामाचे मारिफात बोली निवडली. पैक्याच्या खटपटींत येथील दिवाण आहेत. आम्हांकडील माघील दिवाण राजश्री माधराव भास्करराव यास कैद करून बसविलें आहे. पैका मागतात. सविस्तर निवेदन व्हावें याकरितां विनंति लिहिली आहे. पेशजी दोनी तीनी वेळां खंडेरायास स्वामींनी पत्र लिहिलें जे सरकारचें लक्ष धरून कार्यभाग करणें म्हणोन पत्र खंडेरायास आलीं, परंतु सरकारचें लक्ष न धरतां पटणकराचे लक्षांत आहेत. राजश्री बापूजीपंत हे बोदवटास येऊन पावले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापि.

¶*Rajo Tamaji and Anajirao supply Sakharam Bapu with information regarding the negotiations of Raghoba with Haidar carried on through Bajirao Barve and view with apprehension his growing power.*

---

*No. 284*]

[*1775*

श्री

विनंती विशेष. राजश्री सिवबा बाजी येथे येऊन देशी चालावयाचा निश्चय करून गेले. निघतात कधी पाहावें. आम्हासीं बोलून गेले कीं आम्हीं जाताच मुहूर्ताची त्वरा करून डेरेदाखल यजमानास करितों. आठ रोज यांची वाट पाहूं येतील बरोबर कूच करूं. न आल्यास आम्हीं कूच करून जाऊ, याप्रो बोलून गेले. या प्रो घडल्यावर यांस बोलावयास जागा राहणार नाहीं. पौष मासाचा अनमान केल्यास माघ आलाच, तों पावेतों आपणाकडून प्रसंग कसकसा निवडतो? सध्या आपण व श्रीमंत राजश्री दादासाहेब व फौज सज्य आहेत. इंग्रजाचा वकील किल्यास गेला त्याचा दारमदार ठरतो किंवा काय होतें हा पडदा दरम्यान आहे. दारमदार ठरला तर मुंबई व सुरतकर इंग्रज श्रीमंत दादासाहेबांचा पक्ष करणार नाहीत. यांचें बोलणें त्यांस पथ्यावर पडणार नाहीं, तेव्हा आणिखी विचार पाहतील, किंवा इंग्रजाचा जाबसाला पुरंदरी लागताच सावध जाल्यास रेवापार होऊन, गुजरातेत आल्यावर गाईकवाडास समागमें घेऊन या उभयता सरदारावर येतील तर हे सहजच निरोपाय होतील. याजवळ फौजाचे भरणे नाहींत. देशी गेल्यावर ठराव जाल्याप्रमाणे पुढे वर्तणूक करावी हा विचार, तेथें हजारो फौज आजच जमा कशास करितील? होत्या फौजा त्या हिंदुस्थानास रवाना केल्या. थोडथोडके राहिले तितक्यानसी घरी आसले आगर देशास गेले. इंग्रजाचा वकील पुरंदरास गेलाच आहे. इतकाच बशा[+] खाऊन श्रीमंत दादासाहेबानी रेवापार होऊन याच्याच चाहून आल्यास संकटच आहे, यैसी

+ दहशत.

पेचाटीच दिसते. उगीच कल्पना उठली त्यावरून लिहिले आसे. राजकारणाचे अनेक मार्ग आहेत. आपले ध्यानातच आहे; कदाचित लिहिल्याप्रमाणे गोष्टी घाडिल्या तर आपण तोडहि योजितील. जर करितां सांबानी+ जागा सोडून इकडे रोख धरिल्यास पाठीमागें दाहापांच कोसाचे अंतरेयाने आपण मुकाम करीत चाल-ल्यास सरदारांचा बचाव होईल. याजवर जड न पडे ते आपण करितीलच. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The English envoy having gone to Purandhar for carrying out negotiations with the Peshwa the plans of Dadasaheb after either the success or failure of the negotiations are further discussed in this letter.*

---

*No. 285*] [*1775*

**श्री**

विनंती उपरी. तुम्ही लिहिले की, इंग्रेजाकडील वकील तेथे बोलावयास आला होता. त्याचे बोलण्याचे भाव असतील ते आम्हास कळवावे म्हणौन लिा. त्यास आम्हाकडे वकील आलाच नाहीं. खंबाइताची बात कळावी म्हणौन फतेसि-गाकडील कारकून पाा होता. त्याचे इग्रजाचे बोलणे जालें. त्यांत भाव की दौलतीचा कारभार दादानी करावा. आम्ही इग्रेज दरम्यान पडून तह करून देतो. फतेसिंगानी पुढे येऊन भेटावे. त्यास यांत कोणती गोष्ट आम्हांस कबूल करणे की फतेसिंगानी पुढे जावे. ती गोष्ट राहिली. त्यांजकडील येक इग्रज आपलें लस्करांत आला होता. फतेसिगानी पुढे चलावे. इंग्रजास भेटावें ती गोष्ट काय म्हणून करावी? त्यास निरोप दिला, लिहिले याहून बोलणे कांहीच नाहीं. तुम्हाजवळ बोलतात त्यात भाव काय ? कसी स(म)जावीस पाडावी हे कांही बोलण्यांत आले तर त्यास होय नाही म्हणावे. त्यास मोगल आपलेकडील लक्ष धरून तह करावा असे असेल तर ते कसा तह करावा म्हणतात हे मनास आणून लेहून पाठवावे. या गोष्टी घडणे दुर्घट आहेत. तथापि शोध करावा हे विनंती. इंग्रजाचे बोलण्याचे भाव मनास आणून जरूर लेहून पाा हे विनंती.[१]

¶*Haripant Phadke refers to the attempts made by the English for opening negotiations on behalf of Raghoba.*

---

\+ दादासाहेबानी.

१ पत्र हरिपंत फडक्याचें.

No. 286] [1775 ?

श्री

पुरवणी राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. सुरतेच्या तहाचा मजकूर उरकल्यावरी आमोदाकडे जाऊन भडोजवाल्याचा बंदोबस्त व गिराशाचे पारपत्य करावे म्हणून आलाहिदा सरकारचे पत्री विस्तारे लिहि(ले) (आहे) (त्या) प्रमाणे तिकडे जाऊन ती कामे लौकर करावी हे[१] विनंती. पत्रे तुमची अक्षरशाहा वाचून पाहिली हे विनंती.

¶*Naro Anandrao is asked by Nana Fadnis to proceed to Amod after settling the Surat affair to treat with the Nawab of Broach and to quell disturbances created by marauders.*

---

No. 287] [1775

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत दाजी
स्वामीचे सेवेसी

सेवक हरि उमाजी कृतानेक रा। नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणन आपले स्वकुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब व राजश्री गोविंदराव गाईकवाड यांच्या भेटी जाल्या उपरी आम्हास भेटीस साहेबानी बोलाविले, त्याजवरून राजश्री गोविंदरावबावा यास समागमे घेऊन त्यांची भेट घेतली. आम्हासी कितेक भाशेन केले आणि उभयेतानी आम्हास सांगितले की, तुम्ही श्रीमंत राजश्री बापू व श्रीमंत राजश्री नाना याजकडे जाऊन सांगितल्याप्रो बंदोबस्त करून सत्वर येणे. त्याजवरून आम्ही येथे झाडेश्वरी आलो. पुढे रेवापार उतरून श्रीमंताकडे जाणे; त्यास ते कोठे आहेत हे बातमी आपणास ठावकी आसल ते सविस्तर ल्याहावी. आम्हास मजल दरमजल जाणे. आपण त्यांच्या लस्करचे मुकामाचे वर्तमान तेथे ल्याहावे व आपला आत्मिक कारकून आम्हापासी पाठवावा की त्याजपासी सविस्तर वर्तमान सांगू. पत्री लिहिता येत नाही याजकरिता बारीक मोठ वर्तमान मुखतरे सांगू व आंकलेस्वरापुढें आम्हास जाणे; तापीतीरी व सोनगडी आपले कोण्ही आसतील त्याजला पत्रे द्यावी. सोन-

---

१ पत्र नाना फडणविसाचें.

गडापुढे कोल्याचा उपद्रव फार आहे, आम्हास तो जरूर जाणे; याची सोये करून द्यावी. मी नवापुरास जाऊ पोहचे यैसे आपण करावे. मर्जीस आले तर काही स्वार आथवा पाईची माणसे सोनगडाहून नवापुरापावेतो देऊन आमची रवानगी करावी. येथून सोनगडापावेतो तर आपण पोहचते करतील. परंतु पुढे नवापूर-पावेतो पोहचो यैसे करावे. आपण सरदार आहेत. आम्हासमागमे कोण्ही फारसे सिपाई नाहीत. आपला आत्मिक कारकून पा॥. त्याजपासी नाजूक वर्तमान सांगू. आपणास कळले पाहिजे, यास्तव आनमान सहसा न करिता मंगळवारी दोन प्रहरपरियेंत पाठऊन द्यावे. आमचे रवानगीची सोये करून वाटेचे दस्तक देऊन आम्हाकडे पा॥. बहुत काय लिहिणे, लोभ कीजे, हे विनंती.

¶*Hari Umaji, who has got some message from Raghunathrao and Govindrao Gaikwad to be delivered to Sakharam Bapu and Nana Phadnis, requests Naro Anandrao to arrange for his safe journey up to Navapur.*

---

*No. 288]* *[1775*

**श्री**

**राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री**
**नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी**

पो॥ गणेश हरि कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी, येथील कुशल जाणोन श्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. पा॥ अमोद येथे इंग्रजाने बखेडा करून मालाची खली बंद केली. बंदोबस्तास फौज पाठवावयाविसी श्रीमंत राजश्री हरिपंत तात्यास पत्रे पाठविली. त्याणी उतर पाठविले की, रा॥ चांगोजी कदम फौजसुधा पाठविले आहेत, सर्व बंदोबस्त होईल. त्यास प्रस्तुत येथे फौज नसल्यास चिंता नाहीं. सरकारचा परगणा खराब होऊन लुकसानी होत्ये, याजकरिता चांगोजी कदम यास अमोद परगण्याचे बंदोबस्ताविसी पत्र ल्याहावे म्हणजे ते भडोच परगणियात राहिले म्हणजे सहजात बंदोबस्त होईल. जरूर लिहिले पा॥. येकादोहो दिवसी आम्हीहि सेवेसी येतो. बहुत काय लिहिणे, लोभ असो दिल्हा पाहिजे, हे विनंती.

¶*Ganesh Hari requests Naropant that Changoji Kadam should be despatched to protect the Pargana of Amod from the troubles created by the English.*

No. 289] [1775

श्री

स्वस्ति श्रीमत्सु

निरंतराभीष्टचिंतकाश्रित गंगाधर दीक्षित विहितानंताशीस्ततय:

सुमुझसंतु विशेषस्तु

विशेष कोंडाईबारीचे मुकामची पत्रे व कारभारी जमातदार याचे पत्राचे डौल पाठविली ती पावली. त्यास पावती केली त्याजवरून सर्व संतोष जाहले. आपले लिहिल्याप्रमाणे सर्वांस दिलासा दिल्हा. पुढेहि देत आहो. राजश्री गोविंदराव गाइकवाड सेनाखासखेल श्रीमंत बडोयास असतां रुसोन येऊन पेटलादेस सरंजामासुधा राहिले. राजश्री आपाजीपंत सुभेदार याजकडे राजश्री हिंमतबाहादर याचे मा॥ संधानहि लाविले. त्यावरून येथून त्याजकडे हिमतबाहादर याचे व सरकारचे कारकून पा॥ त्यासी भानगडीचे बोलणे बोलतच होते. श्रीमंत बडोयाहून कूच करून नर्मदापार सोनगडानजीक जात तोवर पेटलादेस होते. उपरांतिक कूच करून खेड्यास आले. तेथे मोर्चे लाविले. पठाणाने दोन चार वेळा येथील कुमकेस बोलाविले. त्यास सांगितले की आम्ही कुमकेस येत नाही. आपणाकडे यावयाचे संधान दाट लाविले, की गुदस्ता राश्रजी हरिपंत तात्या याणी करार केला आहे त्याप्रमाणे हाली सरकारातून आमचा बंदोबस्त करून द्यावा. येविसी बाहांदर[1] द्यावे म्हणजे आपण येऊन पठाणास उठऊन देतो. पठाणासीहि संधान ठेविलें की खेडे घेतल्यावर तुमचा उपराळा करून. त्याजपासून तोफा मागोन नेली. खेड्याचे मसलतीचे नाव करून तेथेच बसले. श्रीमंताची पत्रे पठाणाचे साहित्याविसी येतच होती. याणी श्रीमंतास उतर लिहीत गेले इकडे येकायेकीच उठोन यावे तर त्याजपासी इमान बेलभंडारी क्रियेस गुंतले. सरदार, पदरी नाव वडिलाचे, पुढेही सरदारीच करणे, तेव्हा निमित्याविना सोडून यावे कसे? बाट लागतो, त्याजमुळे इतके दिवस दोहीकडे संधान राखोन होते. हाली श्रीमंताकडे कितेक तपसिले वर्तमान लिहून आपले इमानाची सुटका करून घेतली. श्रीमंताचीहि त्यास पत्रे आली की पठाणाच्याने आमदाबाज घेवते असे नाही. त्यास आबरूने काढून महीपार करून द्यावा येविसी सेनाखासखेलास पत्रे आली. त्यावरून पठाणासी त्यासी बोलणे जाले. पठाणाने जाब दिल्हा की सिबंदी बहुत चढली आहे याचा फडशा करून द्या म्हणजे उठोन जाऊ. विना कसे जावे? गोविंदराव याचे मानस आपणाकडे येऊन मिळावे, परंतु आपलें जाबसालास धनी करून घेऊन मग यावे असा प्रकार. येथील प्रकार

१ जामीन.

तरी सिबंदीचे देणे बहुत चढले. पैशास + जागा नाही. आज आठ मास जाले. वेराहि (?) जाला. रयतेत जीव नाही. हुजरून कुमक आठ महिने होते त्यासहि आजवर ठिकाणा नाही. कसे करावे? तेव्हा सर्व मडली हिंमतबहादुर आदिकरून येकत्र होऊन विचार केला कीं गोविंदराव यास इमानप्रमाण देऊन त्यास तूर्त मुलेमाणसे ठेववयासी सरकार तालुकियात जागा देऊन आणावे म्हणजे पठाणहि उठोन जाईल. मुलकाचा वदोबस्त होईल. हुजरून फौज येऊन बंदोबस्त होणे त्यास पर्ज्यन्यकालहि जवल आला. फौज येते असाहि भरवसा कशावरून प्रमाण? आज आठ महिने कुमक फौजेची व येवजाची झाली, पुढेहि होतच आहे. तूर्तहि गुदस्ता कराररमदार जाहला आहे त्याप्रो आपण सर्वांनी मिलोन त्यास वचन द्यावे जे सराकारातून निभावणी करून देऊ, असे लिहून देऊन त्यास आणावे हेच उतम. याप्रो विचार करून सेनाखासखेलास कागद लिहून दिल्हे. त्याणी निखालसपणें सरकारकामासी अंतर न करू, येकपक्षी असावे याउपरी दुगधा नसावी. त्याणी इमानपूर्वक लिहून दिल्हे त्याजवरून त्याणी रा लाल पाटील यास येथे पा. त्याणी येऊन सामदाम करून पाहिला. जरबेविना उठत नाही, तेव्हा त्याणी खेड्यास लिहून पाठविले. त्यावरून सेनाखासखेल सरंजामसुध्या शहरापासून दोन कोसावर येऊन मोकाम केला. सुभेदाराची व आमची भेटी जाली. बोलणे जाले. समक्ष शपतक्रिया जाली पाहिजे, तेव्हा दुसरे दिवशी मागती सुभेदार व आम्ही गेलो. बेलभंडार होऊ लागला तेव्हा गोविंदराव याणी सांगितले कीं हुजूरचें दीक्षितबावा आहेत ते तात्याचे जागा आहेत. याचे हाते बेलभंडार द्यावा जे, गुदस्ता तात्यानी करार केला आहे त्याप्रमाणे निभावणी करू व तात्याचे तर्फेचा जिमा आपणाकडे, असा आड घातला. तेव्हा समयास मागे व्हावे तर सरकारकामास हिसका बसतो आणि सरदार दिलगीर होतात असा विचार करून आम्हीहि बेलभंडारात गुतलो. याउपरी गोविंदराव याचा गुंता राहिला नाही. फारच निखालस जाले. बहुत प्रकारे आम्हासी बोलणे जाले. लालपाटीलहि सरकारचाकरीत राहून कारस्ताई करून निखालसपणा केला व पुढेहि तेच कारस्ताईत राहून सरकारकाम करितील हे निशा पुरली. येक दोन दिवसात सलुकाने पठाण उठला तर उतम. नाही तर हला करून मारून काढावासा निश्चये जाला, गुंता राहिला नाही. इतक्यावर आपण इकडील बदोबस्तास फौज पाचे कारण नाही. चिंता न करावी. इकडील बंदोबस्त होईल, मग फौजेचे कारण काये? आमचे वचन गुतले आहे, याचे सार्थकता आपण केली पाहिजे. गोविंदराव येकपक्षी आहेत. श्रीमंताकडे होते तोवर त्याचे म्हणविले. हाली इकडे मिळाले तेव्हा तिकडील पक्ष क्रियापुरस्कर सोडिला. त्यास आपले बरे करून घेणे, तेव्हा चाकरी चांगली

करून दाखवितील हे आपली पुर्ती निशा असावी. आपण कृपापुरस्कर खातरजमेचे येक पत्र तूर्त पाठवावे. मागाहून करारमदाराच्या सनदा पाठवाव्या. सनदा येऊन उभयता भावाची वाटणी होऊन समजूत पडे तोवर त्याची मुलेमाणसे ठेवावयासी जागा बोरसदेचे ठाणे पठाणाने सरकाराचे घेतले तेथे लागोन ठाणे घेऊन त्याचे हवाला करावे. तूर्त खेड्याचे कुमकेस शभर स्वार व दोनसे माणसे द्यावी येसा करारमदार जाला आहे. बोरसदचे ठाण्यात सिबंदी त्याणी द्यावी, आमलदार सरकारचे. त्याचा बदोबस्त जाला म्हणजे ठाणे सरकारचे सरकारात घ्यावे. यास बहांदर हिमतबहादूर जाले आहेत. आम्हास शपतक्रियेचे दरम्यान पडावयास कारण आपली पत्रे सुभेदारास व हिमतबाहादर यास हमेशा येतात व सांप्रतहि अली कीं गोविंदराव अनकूल जाल्यास करून घेणे व गोविंदरायास श्रीमत दादासाहेबानी डबईचा किला द्यावयाचा करार करून सनदा देखील पाठविल्या असता त्याहि सनदा आमान्य करून इकडे येकनिष्ठेने मिलावे हा निश्चये पाहिला आणि सर्वांदेखताही शपतपूर्वक बोलिले की, यामुळे मी मध्ये पडून वेलभडार दिल्हा. विनोदार्थ त्यासी बोलले की तुमची तात्याची भेट जाल्यावर आम्हास पुसणार देखील नाहीत. त्याही तुम्हासारिखे मातबर सरदारासी स्नेहच संपादून राज्य करणे आहे. मग ते बोलिले जे मी तुम्हावाचून सरकारातील जाबसाल आन्येत्रासी करणार नाही. असे बहुत प्रकारे बोलले. इथपर निभावणी करणे आपले स्वाधीन आहे. याचे येण्याविशी बहुत प्रेत्न लागला. गोविंदराव आल्यावर पठाणास दबाव पडून दुसरे दिवशी पठाण बोलू लागला, मजला आबरूनिसी जाऊ द्यावे. त्याजवर तिसरे दिवशी कालूपूरचे दरवाजाचेसंनिध मसिदीत मोरचे सोडून सरसपुन्यात गेला. लढाई येक मातबर झाली. पुढे भानगड त्यासी लाविली आहे की पनास हजार रुपये द्यावे. तेहि त्यानी मान्य केले. वराता देणार. परतु तो सावकारी निशा मागतो. ते घडत नाही. येका दो दिवसी न आईकिल्यास हाला करून पारपत्य करणार आहेत. श्रीमंत बापू व नाना याण्ही याचे खातरजमेविशी आपले हाते पुर्ते देणे मिळाले असे लिहून पाठवणे म्हणजे निसंशये होईल. आपण छ २२ सफरची पत्रे पाती छ १ रबिलावली साइकाली पावली. ज्याची त्यास पावोन बहुत संतोषी जाले. याप्रो फौज पो तरी शहरच्या बंदोबस्ताविसी फौजेचे कारण नाही. मुलकी बंदोबस्त केवल कुमकी फौजेने होणार नाही, याअर्थे रवाना कर्तव्य ते करावी. अलमातिविस्तरेण किं बहुनेत्याशी:सहस्रं विलसतु.

¶*Gangadhar Dikshit writes how he persuaded Govindrao Gaikwad to give up Raghoba's cause.*

6184

मराठी ग्रंथ संग्रहालय. स्थळ प्रत सं. ........ नं. [3-1-1776 ता. ........ ठाणे.

*No. 290]*

पो छ २१ जिल्काद

**श्री**

**श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे सेवेसी**

विनंती शेवक गोपाल विश्वनाथ कृतानेक सा नमस्कार विज्ञापना. ता छ ११ माहे जिल्कादपावेतो मुा उजन जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपली पत्रे छ २६ सवालची आली ती छ २९ जिलकादी रात्रीस आली. राजश्री पाटीलबावा यास व रा नारो सिवदेव यास व गोविंदपंतास पत्रे पाठविली ती पावली. ज्याची त्यास पावती केली. सरकार पाटीलबावाचे पत्राचा जाब द्यावयास एकाद रोजाचा विलंब, विचार करून पत्र देणार. मागाहून विस्तारे कचे पके लिहून पाठऊ. छ १० मिाची पत्रे लिा त्यात विस्तारे मजकूर लिहिला आहे त्यावरून निवेदन होईल. राजश्री पाटीलबावा व रा सुभेदार याचा देसी यावयाचा मात्र येके मुहूर्ते यावे. माघ सुधात येण्याचा विचार आहे. कलकत्याहून वकील देसी पुरंदरास गेला. हा काय इत्यर्थ ठरतो हाहि विचार. कितेक सलुखाची तोड घडल्यास तोहि पक्ष आहे. यास्तव काही दिवस दिरंग आहे. राजश्री पाटीलबावाचे लक्ष की होलकरा अगोदरच यावे ऐसीहि सला घडेल ऐसा योग आहे. याविसीहि आम्ही प्रेत्नात आहों. राजश्री नारो सिवदेव देसी जाण्याकरिता पाटीलबावापासी निरोप मागत आहेत; परंतु हे समागमेच चालतील, आगोदर जाणार नाही. या नंतर रा गोविंदराम कारकुनाचा पत्ता लिहून पाठवणें. त्यास पंत मशारनिले पुरातन औरंगाबादकर माधवराव याचा भाचा, हे माधवराव गोविंदराम उज्जनीतच आहेत. वर्षे तेरा चवदा कुटुंबसुधा तेथे आहेत. आलीकडे पाच सात वर्षे रा पाटीलबावाचे दरबारी चाकरी रोजगार वगैरे किरकोल वकिली काम करीत होते. हाल्ली बेकार आहेत. कलावे. आमचा पता लिहून पाठवणे ऐसी आज्ञा; तरी पुण्यात रा बाजी बाबूराव पर्वतीवाले आमचे माऊसबंधु रोजगारनिमित्ये रा माहादाजी सिवाजी गर्जे याजसमागमे इकडे आलो. माहादाजी सिवाजी हे रा विष्णु माहादेव यांचे चुलतबंधु बाबाकडून मामलती इकडे पांच साहा वर्षे करीत होते. आलीकडे ते देवलोक जाले. आम्ही त्याचे पुतण्या रा आपाजी कृष्ण याजवल बेकार बसलो. इतक्यात देसीहून राजश्री गुरुजीबावा आले. त्यासी पूर्व परिचये, तेहि कृपा करू लागले. जातेवेलेस आपले म्हणोन त्याजकडील आसामी होती ते काम आम्हास सांगितले; परंतु हाल्ली सरकार तुम्हाकडील लोकावर विशेष कृपा आहे. आम्हा बेकार केले. कलावे. यानंतर आम्हाविसी विस्तर आम्ही लिहीत उपयोगाचे

6185

शेवक यक कार्यावर आल्यास शेवकावर नजर राखावी. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. गंगाजी आव्हाड स्वामीशेवेत सर्वदा मेहेनत करीत आहेत. बूज धणी करणार समर्थ आहा. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Gopal Vishvanath to Haripant Tatya giving news about Sindia and Holkar who the writer says, are watching the result of the negotiations started by the English envoy, before proceeding to the South, The writer also recommends to him Govindram for service.*

---

*No. 291*] [*17-1-1776*

पो छ २९ जिल्काद
सन सित सबैन पौष
मास बुधवार.

श्री

सेवेसी विज्ञापना. इंग्रजाचा वकील पुणियास गेला ते समयी श्रीमंत गडाखालते उतरत नवते, कीं तुझी भेट घ्यावी आणि तह न ठरल्यास काये करावें. त्यास त्याणे जाबसाल केला जे, आपण खालते उतरावें, तुम्हाकारणे जव्हाईर साता लक्षा रुपयाचे आणिले ते व हती यैसे नजर घ्यावे आणि आपण आज्ञा करतील त्याप्रमाणे सलुखाचा बंदोबस्त करून देईन. तेव्हां श्रीमंत खालते उतरोन भेटी जाल्या. त्यांचे यांचे बोलणे जाले. मग त्या वकिलानें ममईस पत्रे पाठविली. ममईकराने सुरतवाल्यास पत्रे पाठविली. सुरतवाल्याने श्रीमंत दादास पत्रे पाठविली. बोलण्याची भानगड लागली आहे. पहिले रावसाहेबाचे वेलेस ठरले होते त्याप्रमाणें ठरल. परंतु इंग्रेज म्हणतात कीं या मसलतीस दोन क्रोड रुपये आमचे खर्च जाले आहेत ते द्यावे. वरकड बोलणे निश्चयांत आले. परंतु रुपयाचा बंदोबस्त जाला म्हणजे निश्चयांत येईल. मग सर्वांही नासिक त्रिंबकापासी जमा व्हावे, तिकडोन त्याणीहि यावें, याप्रमाणें बोलण्यांत आहे यैसे पत्र पुरंधरचे आले. स्वामीस कलावें. हे वर्तमान यैकिलें त्याप्रमाणे स्वामीस लिहिले आहे. यैवज पुरंधरीहून येणार, आलियावर खर्चास मिलेल. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

सेवेसी धोंडो नारायण व शंकराजी रुद्र सां नमस्कार राजश्री नागोपंत यानी वर्तमान लिहिले त्याजवरून कलेल. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*The letter mentions negotiations carried on between the Peshwa and the English at Purandhar.*

No. 292] [23-1-1776

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना
स्वामीचे सेवेसी

पो विसाजी कृष्ण सांा नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ताा छ १ जिल्हेज मो मौजे कोढीत ताा करेपठार जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नवते. त्यास, सांप्रत पत्र व शंक्रमणाचे तिलशर्करा पाा ते पावोन संतोष जाहाला. ऐसेच सदैव पत्र पाठऊन संतोषवावे. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री बापू व नाना कोढितावरच आहेत. इंग्रजाकडील वकील आहेत. भेटी जाहाल्या. त्याजकडील बोलणे होत आहे. आम्ही फौजसुध्धा पुणियावर होतो. त्यास, येथें यावयाविसी पत्र आले त्यावरून तूर्त फौजसुध्धा श्रीमंताजवल आहो. आपण प्रस्तुत कोणे ठिकाणी आहेत, पुढे काये कर्तव्यता आहे, राजश्री हरिपंत तात्या कोणे ठिकाणी आहेत, ते साद्यंत लेहून पाठवावे. पूर्वस्नेहास ममतेस आविस्मर आसावे. वरकड इकडील वर्तमान राजश्री भिवराव आबा लिहितील त्याजवरून कलेल. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दिल्हा पाहिजे, हे विनंती.

पो महिपतराव विस्वनाथ सांा नमस्कार. बहुता दिवसी पत्र पाो ते पावोन संतोष जाहाला. याप्रो पत्र पाा आनंदवीत असावे हे विनंती.

¶*Visaji Krishna writes to Naro Anandrao of an interview that took place between Nana, Bapu and the English envoy.*

---

No. 293] [1-3-1776

पो छ २४ मोहरम
सन सीत सबैन फालगुन मास

श्री

राजमान्य राजश्री राजश्री रावो केशव यासी रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुाा सीत सबैन मया व अलफ. तुम्हीं विनंतीपत्र छ १२ जिल्हेजचे पाठविले ते छ २ मोहरमी येऊन प्रविष्ट जाले.

फितुरियाकडून रंगराव माहादेव हजार स्वारानसी आले, त्याचे कुमकेस सिंदे होलकर याणी पाचसे स्वार दिल्हे. ते राजाराम गोविंद याजवर

सिंदे होलकर फितुरियाकडे जाणार म्हणोन लिहिले तें कलले. याउपरीहि अधिकोतर बातमी आढलेल ती लेहून पाठवीत जाणे. कलम १

जाऊन जमीस खलेल करणार म्हणोन लिा ते विदित जाले. यैशियास येथून सिंद्यास व होळकरास पत्रे पाठविलीच आहेत. तथापि त्याचा आग्रह असल्यास करणे. त्याजविसी पेशजी मुजरद पत्र तुजला सादर केलेच आहे त्याप्रो करणे कलम

नारो तुकदेव व राजाराम गोविंद भेलसे व मल्हारगडावर आहेत म्हणोन लिा ते कळले. उभयेतापासी जमेती किती आहे, फितुरी त्याजवरी गेले, त्याचे काये वर्तमान ते लिहिणे कलम १

राजाराम व नारो तुकदेव याजपासी जमेत जबरदस्त असलियास याणी जाऊन काय करावयाचे आहे. कलम १

चिरंजिवाची प्रकृत उतम आहे म्हणोन लिा ते कळलें. जन्मकाल घटिका पळे लेहून पाठवणे कलम १

इकडील वर्तमान अधिकोत्तर नाही आहे तेच आहे. जनरालाचें बोलणे भरवसियाचे असे. श्रीकृपेने होणे ते होईल. कलम १

बाळाजी पांडुरंग काादार मौजे केसोदे याजकडून यैवज आणविला आहे म्हणोन लिा ते कळले. उत्तम आहे. यैवज सत्वर आणवणे कलम १

येकूण कलमें सात जाणीजे छ १० मोहरम आज्ञा प्रमाण.

¶ *This appears to be an intercepted letter of Raghunathrao to Ragho Keshav making enquiries about people who have joined the Barbhais against him.*

---

*No. 294]* *[9-3-1776*

पो छ २० मोहरम

सन सीत सबैन

**श्री**

सेवेसी बालाजीराम कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १८ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. कर्नेल आपटेन इंग्रजाकडील वकील यास द्यावयास आतर गुलाबी उंच सिलकेस असल्यास ते, नाही तर खरिदी करून पाच तोले पाठऊन देणे म्हणोन स्वामीचे पत्रीं आज्ञा. त्यास सिलकेस अतर नाही, याज-करिता राा बाबूराव जिनसखान्याकडील याजकडून चांगले अतराचा गावात शोध केला. तेव्हा दोन तीन प्रकारचे अतर आणिले, त्याप्रो तीन तोले अतर चांगले पेशजी राजश्री माधवराव जाधवराई याजकडून अतर आणऊन महमदअलीस पाठविले त्याप्रोच राहिले होते ते हाली पेशजीच्या दराप्रो दर तोला रुा ५५ पंचावन प्रो येकसे पासष्ट रुा द्यावयाचे करून कुपीत घालून कुपी सुधा वजन

तोले ४॥।॰ पैा कुपी वजन १॥।॰ बाकी तीन तोले अतर भवानजी जासूद जथे खंडोजी गुलदगड याज बा पुरंधरचे रवानगीस लिहून पाठविले आहे. प्रविष्ट जाहल्याचे उतर त्याहावयासी आज्ञा व्हावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

अत्तर जमा धरून
इंग्रजाचे नावे खर्च
त्याहावे. कलकतेकर.

*Attar of roses is purchased for the reception of Colonel Upton at Rs. 55 per tola.*

---

*No. 295]* *[12-3-1776*

पैवस्ति छ ११ मोहरम.

**श्री**

पुरवणी राजश्री गणेशपंत दादा स्वामीचे सेवेसी विनंति. संस्थान वासदे येथील सर्व * * * आपण समागमें आणिली आहे. परवतासिंग जो संस्थानीं बसला आहे त्याजला वारसा पोंचला नाहीं. परवतसिंग येथील राजेयाचे वंशीचा रणमल बारिया मियेकर याचा जावई. आपण परवतासिंग याजला बोलाऊन नेलें हें चांगली गोष्ट केली. येणेंकरून सरकार किफाईत आहे. त्यास व सत्या राठोड हा परवतासिंग याचे तर्फेनें तेथें गेला, हा कांहीं दिवस तेथें होता, याजकडे सरकारची बाकी अंताजी गबाजी याचे वेळची असावीशी वाटत्ये. त्याचा जाबसाल व अंताजी गबाजी सरकारचा कमाविसदार उदेसिंग याणें मारिला, त्याचा जाबसाल जो राजी असेल त्याजला पुसावा. अंताजी गबाजी याचे वेळची बाकी असल्यास त्याचा जाबसाल व सत्याकडें बाकी नाहीं म्हणोन व सत्या म्हणेल त्याजला माहालचा हिशेब पुसावा. राजश्री पांडुरंगपंत गडबोले यांणीं सरकारांत या मामलतीचें फाजील काढिलें आहे. सिबंदीखर्च फार केला आहे असें त्याजला जाबसाल पुसावयाचे, आपणास कळावें यास्तव लिहिलें आहे. त्यास परवतसिंगास स्वामीचें चित्तांत निश्चयरूप बसवावयाचें असल्या(स) आणि हें काम सेवकाचे हातून घ्यावयाचें असल्यास पत्र पाठवावें म्हणजे रणमलसिंग अथवा त्याचा कोणी भला माणूस स्वामीजवळ घेऊन येतों. सरकार किफाईतचे बाबीं चिंता नाहीं. दुसरें वांसदें गुजराथ तालुकियांतील यास्तव सेवकाचें हातून काम करवावें, याचें भूष(ण) आपलेंच आहे. या प्रांतीं असें आहे कीं गणेशपंत जें सांगतात तें आपण ऐकतात तो लौकिक राहील. आम्ही कामांत असल्यास स्वामीची सेवा चांगले प्रकारें होईल. रणमल बारिया ...

जाऊन जमीस खलेल करणार म्हणोन लिा ते विदित जाले. यैशियास येथून सिंद्यास व होळकरास पत्रे पाठविलीच आहेत. तथापि त्याचा आग्रह असल्यास करणे. त्याजविसी पेशजी मुजरद पत्र तुजला सादर केलेच आहे त्याप्रा करणे कलम

नारो तुकदेव व राजाराम गोविंद भेलसे व मल्हारगडावर आहेत म्हणोन लिा ते कलले. उभयेतापासी जमेती किती आहे, फितुरी त्याजवरी गेले, त्याचे काये वर्तमान ते लिहिणे कलम १

राजाराम व नारो तुकदेव याजपासी जमेत जबरदस्त असलियास याणी जाऊन काय करावयाचे आहे. कलम १

चिरंजिवाची प्रकृत उतम आहे म्हणोन लिा ते कललें. जन्मकाल घटिका पले लेहून पाठवणे कलम १

इकडील वर्तमान अधिकोत्तर नाही आहे तेच आहे. जनरालाचें बोलणे भरवसियाचे असे. श्रीकृपेने होणे ते होईल. कलम १

बाळाजी पाडुरंग कादार मौजे केसोदे याजकडून यैवज आणविला आहे म्हणोन लिा ते कलले. उत्तम आहे. यैवज सत्वर आणवणे कलम १

येकूण कलमें सात जाणीजे छ १० मोहरम आज्ञा प्रमाण.

¶ *This appears to be an intercepted letter of Raghunathrao to Ragho Keshav making enquiries about people who have joined the Barbhais against him.*

---

*No. 294*] [*9-3-1776*

पा छ २० मोहरम

सन सीत सबैन

**श्री**

सेवेसी बालाजीराम कृतानेक सा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १८ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. कर्नेल आपटेन इंग्रजाकडील वकील यास द्यावयास आतर गुलाबी उंच सिलकेस असल्यास ते, नाही तर खरिदी करून पाच तोले पाठऊन देणे म्हणोन स्वामीचे पत्रीं आज्ञा. त्यास सिलकेस अतर नाही, याजकरिता रा बाबूराव जिनसखान्याकडील याजकडून चांगले अतराचा गावात शोध केला. तेव्हा दोन तीन प्रकारचे अतर आणिले, त्याप्रा तीन तोले अतर चांगले पेशजी राजश्री माधवराव जाधवराई याजकडून अतर आणऊन महमदअलीस पाठविले त्याप्रांच राहिले होते ते हाली पेशजीच्या दराप्रा दर तोला रुा ५५ पंचावन प्रा येकसे पासष्ट रुा द्यावयाचे करून कुपीत वाढून कुपी सुधा वजन

तोले ४।।ऽ।ऽ पो कुपी वजन १।।ऽ।ऽ बाकी तीन तोले अतर भवानजी जासूद जथे खंडोजी गुलदगड याज बाा पुरंधरचे रवानगीस लिहून पाठविले आहे. प्रविष्ट जाहल्याचे उतर त्याहावयासी आज्ञा व्हावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

अत्तर जमा धरून

इंग्रजाचे नावे खर्च

त्याहावे. कलकतेकर.

*Attar of roses is purchased for the reception of Colonel Upton at Rs. 55 per tola.*

---

*No. 295]* *[12-3-1776*

पैवास्ति छ ११ मोहरम.

श्री

पुरवणी राजश्री गणेशपंत दादा स्वामीचे सेवेसी विनंति. संस्थान वासदे येथील सर्व * * * आपण समागमें आणिली आहे. परवतसिंग जो संस्थानीं बसला आहे त्याजला वारसा पोंचला नाहीं. परवतसिंग येथील राजेयाचे वंशीचा रणमल बारिया मियेकर याचा जावई. आपण परवतसिंग याजला बोलाऊन नेलें हें चांगली गोष्ट केली. येणेंकरून सरकार किफाईत आहे. त्यास व सत्या राठोड हा परवतसिंग याचे तर्फेनें तेथें गेला, हा कांहीं दिवस तेथें होता, याजकडे सरकारची बाकी अंताजी गबार्जी याचे वेळची असावीशीं वाटत्ये. त्याचा जाबसाल व अंताजी गबाजी सरकारचा कमाविसदार उदेसिंग याणें मारिला, त्याचा जाबसाल जो राजी असेल त्याजला पुसावा. अंताजी गबाजी याचे वेळची बाकी असल्यास त्याचा जाबसाल व सत्याकडें बाकी नाहीं म्हणोन व सत्या म्हणेल त्याजला माहालचा हिशेब पुसावा. राजश्री पांडुरंगपंत गडबोले यांणीं सरकारांत या मामलतीचें फाजील काढिलें आहे. सिबंदीखर्च फार केला आहे असें त्याजला जाबसाल पुसावयाचे, आपणास कळावें यास्तव लिहिलें आहे. त्यास परवतसिंगास स्वामीचें चित्तांत निश्चयरूप बसवावयाचें असल्या(स) आणि हें काम सेवकाचे हातून घ्यावयाचें असल्यास पत्र पाठवावें म्हणजे रणमलसिंग अथवा त्याचा कोणी भला माणूस स्वामीजवळ घेऊन येतों. सरकार किफाईतचे बाबीं चिंता नाहीं. दुसरें वांसदें गुजराथ तालुकियांतील यास्तव सेवकाचें हातून काम करवावें, याचें भूष(ण) आपलेंच आहे. या प्रांतीं असें आहे कीं गणेशपंत जें सांगतात तें आपण ऐकतात तो लौकिक राहील. आम्ही कामांत असल्यास स्वामीची सेवा चागले प्रकारें होईल. रणमल बारिया मातबर गिराशा आहे.

जाऊन जप्तीस खलेल करणार म्हणोन लिा ते विदित जाले. यैशियास येथून सिंद्यास व होळकरास पत्रे पाठविलीच आहेत. तथापि त्याचा आग्रह असल्यास करणे. त्याजविसी पेशजी मुजरद पत्र तुजला सादर केलेच आहे त्याप्रो करणे कलम

नारो तुकदेव व राजाराम गोविंद भेलसे व मल्हारगडावर आहेत म्हणोन लिा ते कलले. उभयेतापासी जमेती किती आहे, फितुरी त्याजवरी गेले, त्याचे काये वर्तमान ते लिहिणे कलम १

राजाराम व नारो तुकदेव याजपासी जमेत जबरदस्त असलियास याणी जाऊन काय करावयाचे आहे. कलम १

चिरंजिवाची प्रकृत उतम आहे म्हणोन लिा ते कलले. जन्मकाल घटिका पले लेहून पाठवणे कलम १ इकडील वर्तमान अधिकोत्तर नाही आहे तेच आहे. जनरालाचें बोलणे भरवसियाचे असे. श्रीकृपेने होणे ते होईल. कलम १

बाळाजी पांडुरंग कादार मौजे केसोदे याजकडून यैवज आणविला आहे म्हणोन लिा ते कलले. उत्तम आहे. यैवज सत्वर आणवणे कलम १

येकूण कलमें सात जाणीजे छ १० मोहरम आज्ञा प्रमाण.

¶ *This appears to be an intercepted letter of Raghunathrao to Ragho Keshav making enquiries about people who have joined the Barbhais against him.*

---

*No. 294*] [*9-3-1776*

पो छ २० मोहरम
सन सीत सबैन

**श्री**

सेवेसी बालाजीराम कृतानेक सा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ १८ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. कर्नेल आपटेन इंग्रजाकडील वकील यास द्यावयास आतर गुलाबी उंच सिलकेस असल्यास ते, नाही तर खरिदी करून पाच तोले पाठऊन देणे म्हणोन स्वामीचे पत्रीं आज्ञा. त्यास सिलकेस अतर नाही, याजकरिता रा बाबूराव जिनसखान्याकडील याजकडून चांगले अतराचा गावात शोध केला. तेव्हा दोन तीन प्रकारचे अतर आणिले, त्याप्रो तीन तोले अतर चांगले पेशजी राजश्री माधवराव जाधवराई याजकडून अतर आणऊन महमदअलीस पाठविले त्याप्रोच राहिले होते ते हाली पेशजीच्या दराप्रो दर तोला रुा ५५ पंचावन प्रो येकसे पासष्ट रुा द्यावयाचे करून कुपीत वाढून कुपी सुधा वजन

तोले ४॥।॰ पो कुपी वजन १॥।॰ बाकी तीन तोले अतर भवानजी जासूद जथे खंडोजी गुलदगड याज बा पुरंधरचे रवानगीस लिहून पाठविले आहे. प्रविष्ट जाहल्याचे उतर त्याहावयासी आज्ञा व्हावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

अत्तर जमा धरून
इंग्रजाचे नावे खर्च
त्याहावे. कलकतेकर.

*Attar of roses is purchased for the reception of Colonel Upton at Rs. 55 per tola.*

---

*No. 295]* *[12-3-1776*

पैवस्ति छ ११ मोहरम.

**श्री**

पुरवणी राजश्री गणेशपंत दादा स्वामीचे सेवेसी विनंति. संस्थान वासदे येथील सर्व * * * आपण समागमें आणिली आहे. परवतसिंग जो संस्थानीं बसला आहे त्याजला वारसा पोंचला नाहीं. परवतसिंग येथील राजेयाचे वंशीचा रणमल बारिया मियेकर याचा जावई. आपण परवतसिंग याजला बोलाऊन नेलें हें चांगली गोष्ट केली. येणेंकरून सरकार किफाईत आहे. त्यास व सत्या राठोड हा परवतसिंग याचे तर्फेनें तेथें गेला, हा कांहीं दिवस तेथें होता, याजकडे सरकारची बाकी अंताजी गबाजी याचे वेळची असावीशी वाटत्ये. त्याचा जाबसाल व अंताजी गबाजी सरकारचा कमाविसदार उदेसिंग याणें मारिला, त्याचा जाबसाल जो राजी असेल त्याजला पुसावा. अंताजी गबाजी याचे वेळची बाकी असल्यास त्याचा जाबसाल व सत्याकडें बाकी नाहीं म्हणोन व सत्या म्हणेल त्याजला माहालचा हिशेब पुसावा. राजश्री पांडुरंगपंत गडबोले यांणीं सरकारांत या मामलतीचें फाजील काढिलें आहे. सिबंदीखर्च फार केला आहे असें त्याजला जाबसाल पुसावयाचे, आपणास कळावें यास्तव लिहिलें आहे. त्यास परवतसिंगास स्वामीचें चित्तांत निश्चयरूप बसवावयाचें असल्या(स) आणि हें काम सेवकाचे हातून घ्यावयाचें असल्यास पत्र पाठवावें म्हणजे रणमलसिंग अथवा त्याचा कोणी भला माणूस स्वामीजवळ घेऊन येतों. सरकार किफाईतचे बाबीं चिंता नाहीं. दुसरें वांसदें गुजराथ तालुकियांतील यास्तव सेवकाचें हातून काम करवावें, याचें भूष(ण) आपलेंच आहे. या प्रांतीं असें आहे कीं गणेशपंत जें सांगतात तें आपण ऐकतात तो लौकिक राहील. आम्ही कामांत असल्यास स्वामीची सेवा चागले प्रकारें होईल. रणमल बारिया मातबर गिराशा आहे.

जाऊन जप्तीस खलेल करणार म्हणोन लिा ते विदित जाले. यैशियास येथून सिंद्यास व होळकरास पत्रे पाठविलीच आहेत. तथापि त्याचा आग्रह असल्यास करणे. त्याजविसी पेशजी मुजरद पत्र तुजला सादर केलेच आहे त्याप्रो करणे कलम

नारो तुकदेव व राजाराम गोविंद भेलसे व मल्हारगडावर आहेत म्हणोन लिा ते कळले. उभयेतापासी जमेती किती आहे, फितुरी त्याजवरी गेले, त्याचे काये वर्तमान ते लिहिणे कलम १

राजाराम व नारो तुकदेव याजपासी जमेत जबरदस्त असलियास याणी जाऊन काय करावयाचे आहे. कलम १

चिरंजिवाची प्रकृत उतम आहे म्हणोन लिा ते कळलें. जन्मकाल घटिका पळे लेहून पाठवणे कलम १

इकडील वर्तमान अधिकोत्तर नाही आहे तेच आहे. जनरालाचें बोलणे भरवसियाचे असे. श्रीकृपेने होणे ते होईल. कलम १

बाळाजी पाडुरंग कारदार मौजे केसोदे याजकडून यैवज आणविला आहे म्हणोन लिा ते कळले. उत्तम आहे. यैवज सत्वर आणवणे कलम १

येकूण कलमें सात जाणीजे छ १० मोहरम आज्ञा प्रमाण.

¶ *This appears to be an intercepted letter of Raghunathrao to Ragho Keshav making enquiries about people who have joined the Barbhais against him.*

---

*No. 294*] [*9-3-1776*

पो छ २० मोहरम

सन सीत सबैन

**श्री**

सेवेसी बालाजीराम कृतानेक सा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ १८ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. कर्नेल आपटेन इंग्रजाकडील वकील यास द्यावयास आतर गुलाबी उंच सिलकेस असल्यास ते, नाही तर खरिदी करून पाच तोले पाठऊन देणे म्हणोन स्वामीचे पत्रीं आज्ञा. त्यास सिलकेस अतर नाही, याजकरिता रा बाबूराव जिनसखान्याकडील याजकडून चांगले अतराचा गावात शोध केला. तेव्हा दोन तीन प्रकारचे अतर आणिले, त्याप्रो तीन तोले अतर चांगले पेशजी राजश्री माधवराव जाधवराई याजकडून अतर आणऊन महमदअलीस पाठविले त्याप्रोच राहिले होते ते हाली पेशजीच्या दराप्रो दर तोला रु ५५ पंचावन प्रो येकसे पासष्ट रु द्यावयाचे करून कुपीत घालून कुपी सुधा वजन

तोले ४।।।' पोा कुपी वजन १।।।' बाकी तीन तोले अतर भवानजी जासूद जथे खंडोजी गुलदगड याज बाा पुरंधरचे रवानगीस लिहून पाठविले आहे. प्रविष्ट जाहल्याचे उतर ल्याहावयासी आज्ञा व्हावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

अत्तर जमा धरून
इंग्रजाचे नावे खर्च
ल्याहावे. कलकतेकर.

*Attar of roses is purchased for the reception of Colonel Upton at Rs. 55 per tola.*

---

*No. 295]* *[12-3-1776*

पैवस्ति छ ११ मोहरम.

श्री

पुरवणी राजश्री गणेशपंत दादा स्वामीचे सेवेसी विनंति. संस्थान वासदे येथील सर्व * * * आपण समागमें आणिली आहे. परवतासिंग जो संस्थानीं बसला आहे त्याजला वारसा पोंचला नाहीं. परवतसिंग येथील राजेयाचे वंशीचा रणमल बारिया मियेकर याचा जावई. आपण परवतसिंग याजला बोलाऊन नेलें हें चांगली गोष्ट केली. येणेंकरून सरकार किफाईत आहे. त्यास व सत्या राठोड हा परवतसिंग याचे तर्फेनें तेथें गेला, हा कांहीं दिवस तेथें होता, याजकडे सरकारची बाकी अंताजी गबाजी याचे वेळची असावीशी वाटत्ये. त्याचा जाबसाल व अंताजी गबाजी सरकारचा कमाविसदार उदेसिंग याणें मारिला, त्याचा जाबसाल जो राजी असेल त्याजला पुसावा. अंताजी गबाजी याचे वेळची बाकी असल्यास त्याचा जाबसाल व सत्याकडें बाकी नाहीं म्हणोन व सत्या म्हणेल त्याजला माहालचा हिशेब पुसावा. राजश्री पांडुरंगपंत गडबोले यांणीं सरकारांत या मामलतीचें फाजील काढिलें आहे. सिबंदीखर्च फार केला आहे असें त्याजला जाबसाल पुसावयाचे, आपणास कळावें यास्तव लिहिलें आहे. त्यास परवतसिंगास स्वामीचें चित्तांत निश्चयरूप बसवावयाचें असल्या(स) आणि हें काम सेवकाचे हातून घ्यावयाचें असल्यास पत्र पाठवावें म्हणजे रणमलसिंग अथवा त्याचा कोणी भला माणूस स्वामीजवळ घेऊन येतों. सरकार किफाईतचे बाबीं चिंता नाहीं. दुसरें वांसदें गुजराथ तालुकियांतील यास्तव सेवकाचें हातून काम करवावें, याचें भूष(ण) आपलेंच आहे. या प्रांतीं असें आहे कीं गणेशपंत जें सांगतात तें आपण ऐकतात तो लौकिक राहील. आम्ही कामांत असल्यास स्वामीची सेवा चागले प्रकारें होईल. रणमल बारिया मातबर गिराशा आहे.

आणि प्रमाणिक सचोटीदार आहे. हा या कामांत असल्यास सर्वच गोष्टीचा बंदोबस्त होईल, असें आम्हास वाटतें. रणमलची गाठ पडल्यास सारें समजेल. परवतासिंग याचा जावई, याजकरितां आम्हास त्याणें दीनवाणें होऊन लिहिलें आहे. त्याचें काम आमचे हातून घेतल्यास सरकार उपयोगीं; आणि आपली कृपा आम्हावर आहे असें होईल. फार काय ल्याहावें. उत्तर पाठविलें पाहिजे. खाधी व खारवे खरेदी करावयास पाठविलें आहे; खरेदीकरितां नवार पक्या मणाची करविली आहे. पांच साहा दिवसांनीं येईल. तयार जाहाली म्हणजे समागमें घेऊन येतों; किंवा येक दिवस अगोधर पुढें रवाना करितों. आपणांस सरंजाम किती लागतो त्याची याद आतिसत्वर पाठऊन द्यावी. या गोष्टीस अलस करूं नये. पत्र पावतांच रवाना करावी. आपले भेटीस सत्वरच येतों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हें विनंति.[1]

¶*The claims of succession of Parvatsing to the Bansda State are discussed and reported to Ganeshpant Behere by some agent of his in Gujarat.*

---

*No. 296]* *[19-4-1776*

पौ छ १२ रावल.

**श्री**

**राजश्री हरिपंत तात्या गोसांवी यांसी**

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नौ खंडेराव गायेकवाड हिमतबाहादुर दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत आसिलें पाा विशेष. आपण छ ६ सफरचे पत्र पाठविलें तें छ १६ मिनहूस पावोन लेखनाभिप्राये ध्यानास आला. इंग्रजाचे वकील पुरंदरीं आले. त्यांचा तह पका जाला. मुमइहून इंग्रजाची पत्रे श्रीमंताजवल इंग्रज आहेत त्यांस आली कीं, उठोन येणें. इंग्रजाचा वकील श्रीमंताचेंहि बोलणे बोलत आहे. यैकिल्यास चांगले, न यैकिले तरी श्रीमंत निघोन जातील. कोणीकडे जातील हें न कले. तुम्ही हिमतीनें स्थलाचे संरक्षण केले तैसेंच करून आसावें. थोडक्याच दिवसांत बंदोबस्तांत येईल. श्रीमंत निघोन जातील, पाठीमागें फौजा लागतील. आपल्याकडेहि फौज रवाना करितों. आपण मेहनत केली याचे सार्थक श्री लौकरच करील म्हणून लिहिलें. यैश्यास येथेंहि बातमीं आली कीं, इंग्रेजाचा तह पका जालियामुळें सुरतेस गेले. श्रीमंतहि कूच करून शहराजवल मुकाम जाला. फौजासह

---

१ पत्र गणेश विश्वनाथ बेहरे गुजरात प्रांतीं असतां त्यांच्या कोणा हस्तकाचें.

आपण घाटमाथाच आहेत. इकडें फौज येणें त्यास गुंता होत गेला तो मार वेदशास्त्रसंपन्न राजश्री गंगाधर दीक्षित यांचे पत्रावलोकनें कळलें. त्यास स्थळाचे संरक्षण होय कीं श्रीमंत प्रभु दैववान आणि आपला सरळ स्वभाव त्यायोगे त्या मेहनतीस फळदाता ईस्वर प्रमाणच होये. दुसरें पत्र राजश्री नारो गणेश यांचे पत्रासहित चिरंजीव राजश्री गोविंदराव गायेकवाड सेनाखासखेल समसेरबाहादुर यांसी. आपले पत्रीं आशय कीं, राजश्री गोविंदरायांसी समजाऊन सांगोन मायेत घेऊन उतर ल्याहावें. त्यास आपण मौजे कडास लेवासण्याचे मुकामाहून देसीं जातेसमई हा मार सांगितलाच होता. त्यावरून श्रीमंताचा मुकाम बडोदियावरी आसतां कारकून पाठऊन चिरंजिवास आपले मायावादाचे व निखालसतेचे आर्थ सांगितलेवरून ये प्रांती स्थिरता जाली. लक्ष सोडिल्यामुळें समागम तुटला. पेटलादेस आले. कुटुंब लोणावाड्याहून आणविलें. तेथून खेड्याचे शहास गुंतले. हें वर्तमान पेशजी विस्तारें लिहिलेंच होते. चिरंजिवाजवळ कारकून ठेऊन या लक्षीं आनुसरावें, त्यांचे कल्याण आपण करावें, याचा करार रा। खंडो आवजी यांचे विद्यमानचा तह तुमचे आनुभवास आणावयाचा, आपले सल्याप्रमाणें रा। दीक्षितबावा व राजश्री आपाजीपंत आपा व आम्ही वचनी गुंतलों ते आपणच, यैसी त्यांची खातरजमा होऊन या लक्षाचा प्रत्यये पठाणाचे पारपत्य करावे, आमदाबादेहून उठऊन द्यावा, त्यावरून खेड्याहून कूच करून छ २३ सफरीं शहरानजीक श्रीनागनाथ आहे तेथे मुकाम जाला. येविशीचे विस्तारें रा। दीक्षितबावानी व आपानीं लिहिलें आहे त्यावरून आवगत होईल. इत:पर पठाणांचे पारपत्याचे आवघड नाहीं. फौज इकडे येण्याचा मोठा लोभ कीं, आंत बाहेर येवनमये, दक्षणी फौजेविना खातरखा काम न होये, तें तरी चिरंजिवचे आगमनें घडलें. आपलें वचन प्रत्ययास येणे म्हणून लिहिले आसे. तरी खंडोपंताचे विद्यमानचा कराराच्या सनदा आति सत्वर येऊन विभागांत किले स्थलें याची दखलगिरी होये तें लौकर केले पाहिजे. वरकड ये प्रांती पठाणाची ठाणीं महीउतरतिरीं माहालानिहाये होती तीं तरी सरंजाम बाहेर काढून पंचमाहाल व पेटलाद येथें सरकारची ठाणीं कायम जाली राहिली, महमदाबाद व बोरसद येक पठाणासच उठऊन दिल्हियानें तीं सहजांत स्वाधीन होतील. इकडील चिंता नाहीं. आपलेकडील सविस्तर सदैव लिहीत आसावें. रा। छ २९ माहे सफर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Khanderao Gaikwad expresses his gratification on hearing of the treaty of Purandhar and reports the subsequent movements of Raghoba. He further writes how he succeeded in bringing round Govindrao and requests that necessary Sanads should be sent without delay.*

Bk Ca 12—33 6191

No. 297 [21-4-1776

पो छ १२ रावल.

श्री.

राजश्री हरिपंत तात्या गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नौ खंडेराव गायेकवाड हिंमतबाहादर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपण छ २२ सफरचे पत्र पाा तें छ १ रावली पावोंन लेखनार्थी इंग्रजाकडील वकील कलकत्याहून पुरंदरी येऊन तह पका जालियामुळें श्रीमंताजवल इंग्रज होते त्यांस मुमईहून पत्रें आली कीं, उठोन येणें, त्यावरून निघोन सुरतेस गेले. श्रीमंतापासी सरदार आहेत त्यांची आंत्रे अली. त्यांस गौरवतेचींच पत्रें लिहिलीं. फुटोन येतील. श्रीमंत कारनेलसमवेत मुमईस जाणार. आपण मेहनत करून स्थळाचें संरक्षण केले तैसेंच थोडकेच दिवस करून आसावें. आपण स्थळ संरक्षणास्तव मेहनत बहुत करितात म्हणून राजश्री आपाजी गणेश यांणी लिहिलें आणि आम्हासहि भर्वसाच आहे. फौजेची रवानगी लौकरच होईल. भेटीहि आविलंबेंच घडोन मनोपूरित श्री सिधीस नेईल. राजश्री गोविंदराव यांजकडील संधान आसोन मायेंत घ्यावे म्हणून हाच माार रो आपाजीपंत आपा यांचे पत्री पाहून सर्व कलोंन आमीनखानाचेहि आंत्र आले. त्यासहि उतर लिहिलें आहे म्हणून लिहिले. यैश्यास श्रीमंतापासून इंग्रज सुटले त्या काली मसलत पस्तंच+ पडली. सरदारांस मायेत घ्यावयाची आपली गौर्यता[1] विशेषें त्या योगे श्रीमंतासीं विटले. स्थळाचे संरक्षणांमुळें मेहनतीची तारीफ रो आपानीं लिहिली. त्यास या प्रसंगात स्थळ रक्षण होये. आपला प्रभु सिकंदरताले, आपणा यैसे राजकारणीं, तेथे आमचे मेहनतीचे विशेष नाहीं. आपा पुण्यसील पुरूष आपले पदरीं, पहिले पेंचांत. हालीच्या फितुरामुळें आधिकच त्यांची ब्रम्हस्वापासून मुक्तता आणि आमचे मेहनतीचे पूरीतरूप करणें भर्वसा आपला. त्यापक्षी विस्तारें लिहिणें न लगे. भेटीची आपेक्षा श्री वडवील तो सुदिन. रो आपाचे पत्रीं व आम्हास चिरंजीव रो गोविंदराव गायेकवाड सेनाखासखेल समसेरबाहादुर यांसी मायेत घ्यावयाचे येथून लिहिलें. त्याचे उतर विस्तारे सुचविले. त्यांत सरकार नक्ष त्याप्रों गुदस्तां राजश्री खंडो आवजी यांचे

+ निःशेष; मसलतीचा जोर नाहींसा झाला.

१. गोडबोलेपणा.

विद्यमानें करार ठैरला आहे. तो चिरंजिवानी या लक्षीं वर्तावें म्हणजे सनदा आणऊन विभागाचे ठाण्यांची व स्थळांची दखल देवणें म्हणून वेदशास्त्रसंपन्न राजश्री गंगाधर दीक्षितबावा व राजश्री आपा व आम्ही व च्यार जमातदार दरमियान देऊन यादी ठैराऊन कारकुनास पाठऊन या लक्षीं वर्तावें. गुंता नाहीं. त्यांची यादी करार करून छ २३ सफरी खेड्याहून चिरंजिवानी सरंजामसह कूच करून शहरानजीक श्रीनागनाथासमीप मुा जाला. परस्परें यादीच्या आन्वयें श्रीभूषण दीक्षतबावाजवल देवऊन देविले. दिल्हे. उपरांतिक दोनच्यार रोज कुयेग जाऊन छ २८ सफरीं रात्रीस विचार केला कीं, प्रात:काली पुन्यावरी व मसिदींत मोर्चा होता त्याजवरी हला करावी यैसे ठरून सूर्योदये शहरचा सरंजाम बाहेर निघून चिरंजिवाकडीलहि स्वारी तयार करून चल द्यावा हे बातमी पठाणास कळून मोर्चे शेष रात्रीस उठऊन सरसपुन्यांत येकवटले. इकडून तोफा जारी जाल्या. त्याजकडूनहि यंत्रें चालू जाली. स्वार पदाती मुकाबल्यानें अले तों स्वलपच. जातीनसी पठाण सरसाई करून आले, तों इकडील सरंजामाने त्याहून आधिकाई करून येवनाचे स्वारचा घोडा ठार केला व मारनिलेचा बंधु व नसरतखान जखमीं, नसरतखानाचा जावाई व आणीक पठाण कामास आले. दांत खटे होऊन वकील पाठविला कीं, आम्ही जातो; परंतु गुजराथची सिबंदी मजला आबरूनें जाऊं देत याची पैरवी कांही खर्चास द्या. इकडून तरी उतर आनकूल पडत नाहीं. आपले मोर्चे त्याचे मोर्चे होते ते जागा कायम करून रदबदली आहे. परंतु इकडील बोलणें हेंच कीं देसीहून फौज येऊन तुमचे पारपत्यच करावें यैसी सरकार मर्जी. फौजेची मार्गप्रतीक्षा आहेच तों श्रीमंत प्रभु दैववान त्यायोगे चिरंजिवाचे आगमन जाले. त्यापक्षी तुमचा मुलाहिजा होणे नाहीं. यैसेहिकरितां आबरूची दरकार तरी सुखेनैव उठोन जावें यैसे बोलणे होत आहे. सारांश इत:पर श्रीकृपेकडून पठाणास उठऊन द्यावयाचे आवघड नाहीं. शिरोभाग चिरंजिवाकडून लक्षाची वर्तणूक प्रत्ययास आली. आपले सल्याप्रों रो दीक्षितबावा व आपा व आम्ही व जमातदार दरमियान होऊन वचनीं गुतलों तें पार पडायास्तव दीक्षितबावाहि व राजश्री आपानीं विस्तारें लेहून यादीहि कराराच्या पाा आहेत. त्याचे उतर सनदासहित दखल होये यैसे उतर आति सत्वर अलें पाहिजे. या करारास दरमियान दिल्हे आहेत. त्यांसी सचोटी जतन होऊन राज्यास सरदारांचा उपयोग तेंच आपण करितात म्हणून सविस्तरें लिहिल्याआन्वेयें चिरंजिवाचे माराची उतरें लौकर लौकर पाठवावीं. पठाण येथून निराष जाले. परंतु आपण उतर पाठविले आसेल त्या आधारें आपल्याजवल यावयास करील तरी न कले. आपल्याकडील सविस्तर लेहून चितास

6193

No. 297 [21-4-1776

पो छ १२ रावल.

# श्री.

## राजश्री हरिपंत तात्या गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो॰ खंडेराव गायेकवाड हिंमतबाहादर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपण छ २२ सफरचे पत्र पा। तें छ १ रावली पावोंन लेखनार्थी इंग्रजाकडील वकील कलकत्याहून पुरंदरी येऊन तह पका जालियामुळें श्रीमंताजवळ इंग्रज होते त्यांस मुमईहून पत्रें आली कीं, उठोन येणें, त्यावरून निवोन सुरतेस गेले. श्रीमंतापासी सरदार आहेत त्यांची आंत्रे अली. त्यांस गौरवतेचींच पत्रें लिहिलीं. फुटोन येतील. श्रीमंत कारनेलसमवेत मुमईस जाणार. आपण मेहनत करून स्थळाचें संरक्षण केले तैसेंच थोडकेच दिवस करून आसावें. आपण स्थळ संरक्षणास्तव मेहनत बहुत करितात म्हणून राजश्री आपाजी गणेश यांणी लिहिलें आणि आम्हासहि भर्वसाच आहे. फौजेची रवानगी लौकरच होईल. भेटीहि आविलंबेंच घडोन मनोपूरित श्री सिधीस नेईल. राजश्री गोविंदराव यांजकडील संधान आसोन मायेंत घ्यावें म्हणून हाच मार रो आपाजीपंत आपा यांचे पत्री पाहून सर्व कलोंन आमीनखानाचेहि आंत्र आले. त्यासहि उतर लिहिलें आहे म्हणून लिहिले. यैश्यास श्रीमंतापासून इंग्रज सुटले त्या काली मसलत पस्तं+च पडली. सरदारांस मायेत घ्यावयाची आपली गौर्यं[1]ता विशेषें त्या योगे श्रीमंतासीं विटले. स्थळाचे संरक्षणांमुळें मेहनतीची तारीफ रो आपानीं लिहिली. त्यास या प्रसंगात स्थळ रक्षण होये. आपला प्रभु सिकंदरताले, आपणा यैसे राजकारणीं, तेथे आमचे मेहनतीचे विशेष नाहीं. आपा पुण्यसील पुरूष आपले पदरीं, पहिले पेंचांत. हालीच्या फितुरामुळें आविकच त्यांची ब्रम्हस्वापासून मुक्तता आणि आमचे मेहनतीचे पूरीतरूप करणें भर्वसा आपला. त्यापक्षी विस्तारें लिहिणें न लगे. भेटीची आपेक्षा श्री घडवील तो सुदिन. रो आपाचे पत्रीं व आम्हास चिरंजीव रो गोविंदराव गायेकवाड सेना-खासखेल समसेरबाहादुर यांसी मायेत घ्यावयाचे येथून लिहिलें. त्याचे उतर विस्तारे सुचविले. त्यांत सरकार नक्ष त्याप्रों गुदस्तां राजश्री खंडो आवजी यांचे

---

\+ नि:शेष; मसलतीचा जोर नाहींसा झाला. १. गोडबोलेपणा.

विद्यमानें करार ठैरला आहे. तो चिरंजिवानी या लक्षीं वर्तावें म्हणजे सनदा आणऊन विभागाचे ठाण्यांची व स्थळांची दखल देवणें म्हणून वेदशास्त्रसंपन्न राजश्री गंगाधर दीक्षितबावा व राजश्री आपा व आम्ही व च्यार जमातदार दरमियान देऊन यादी ठैराऊन कारकुनास पाठऊन या लक्षीं वर्तावें. गुंता नाहीं. त्यांची यादी करार करून छ २३ सफरी खेड्याहून चिरंजिवानी सरंजामसह कूच करून शहरानजीक श्रीनागनाथासमीप मुा जाला. परस्परें यादीच्या आन्वयें श्रीभूषण दीक्षतबावाजवल देवऊन देविले. दिल्हे. उपरांतिक दोनच्यार रोज कुयोग जाऊन छ २८ सफरीं रात्रीस विचार केला कीं, प्रात:काली पुऱ्यावरी व मसिदींत मोर्चा होता त्याजवरी हला करावी यैसे ठरून सूर्योदयें शहरचा सरंजाम बाहेर निघून चिरंजिवाकडीलहि स्वारी तयार करून चल द्यावा हे बातमी पठाणास कळून मोर्चे शेष रात्रीस उठऊन सरसपुऱ्यांत येकवटले. इकडून तोफा जारी जाल्या. त्याजकडूनहि यंत्रें चालू जाली. स्वार पदाती मुकाबल्यानें अले तों स्वल्पच. जातीनसी पठाण सरसाई करून आले, तों इकडील सरंजामाने त्याहून आधिकाई करून येवनाचे स्वारचा घोडा ठार केला व माारनिलेचा बंधु व नसरतखान जखमीं, नसरतखानाचा जावाई व आणीक पठाण कामास आले. दांत खटे होऊन वकील पाठविला कीं, आम्ही जातो; परंतु गुजराथची सिबंदी मजला आबरूनें जाऊं देत याची पैरवी कांही खर्चास द्या. इकडून तरी उतर आनकूल पडत नाहीं. आपले मोर्चे त्याचे मोर्चे होते ते जागा कायम करून रदबदली आहे. परंतु इकडील बोलणें हेंच कीं देसीहून फौज येऊन तुमचे पारपत्यच करावें यैसी सरकार मर्जी. फौजेची मार्गप्रतीक्षा आहेच तों श्रीमंत प्रभु दैववान त्यायोगे चिरंजिवाचे आगमन जाले. त्यापक्षी तुमचा मुलाहिजा होणे नाहीं. यैसेहिकरितां आबरूची दरकार तरी सुखेनैव उठोन जावें यैसे बोलणे होत आहे. सारांश इत:पर श्रीकृपेकडून पठाणास उठऊन द्यावयाचे आवघड नाहीं. शिरोभाग चिरंजिवाकडून लक्षाची वर्तणूक प्रत्ययास आली. आपले सल्याप्रों रो दीक्षितबावा व आपा व आम्ही व जमातदार दरमियान होऊन वचनीं गुतलों तें पार पडायास्तव दीक्षितबावाहि व राजश्री आपानीं विस्तारें लेहून यादीहि कराराच्या पाा आहेत. त्याचे उतर सनदासहित दखल होये यैसे उतर आति सत्वर अलें पाहिजे. या करारास दरमियान दिल्हे आहेत. त्यांसी सचोटी जतन होऊन राज्यास सरदारांचा उपयोग तेंच आपण करितात म्हणून सविस्तरें लिहिल्याआन्वेयें चिरंजिवाचे माारची उतरें लौकर लौकर पाठवावीं. पठाण येथून निराष जाले. परंतु आपण उतर पाठविले आसेल त्या आधारें आपल्याजवल यावयास करील तरी न कले. आपल्याकडील सविस्तर लेहून चितास

6193

अनंदवीत आसावें. पठाणाचे पारपत्य जालियानंतर मुलुकगिरीस लौकरच निघणें होईल. रा छ २ रावल बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Khanderao Gaikwad to Haripant Tatya expresses his delight at the news that Raghoba lost the support of the English according to the treaty of Purandhar. An expedition to recapture the city of Ahmedabad has been planned in which Govindrao Gaikwad, recently won over to the Peshwa's cause, heartily co-operates.*

---

*No. 298]* *[1-5-1776*

पौ छ १६ रावल
सीत वैशाख

**श्री**

सेवेसी विज्ञापना, ता छ १२ रावल वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री गोविंदराव गायेकवाड अमदाबादेस दाखल जाले. त्यांजकडून पत्र आले तें व त्याजकडील नारोपंतास पत्र आले होतें त्याची नकल करून पाठविली आहे. त्यावरून सविस्तर ध्यानास येईल. गोविंदराव अमदाबादेस गेल्यामुलें मोर्चे उठले. शहर मोकले जाले. परंतु फतेसिंगास वाईट वाटले. त्यास समाधान करून लिहिले आहे. गोविंदरायाचे पत्रात भाव खेडे वगैरे फतेसिंगा * * * * * * येविसीं गोविंदरायास लिहिले आहे की ठाणी द्यावयाची उतावली न करणे. खंडोपंत येथे येतील त्यासी बोलोन तुम्हास लिहून पाठऊ याप्रो करावे. कसे होईल पाहावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. खंडोपंत देसी आहेत त्यास स्वामींनी बोलाऊन आणून त्याची खातरजमा करून तूर्त फतेसिंगाचे ठाणियासी कजिया करू नये याप्रों उपदेश करून लस्करांत लौकर पाठऊन द्यावें. नारोपंत गोविंदरायाचे येथे आले. त्याजवल आम्ही * * * * * * गुदस्ता करार केल्याप्रो चाल * * * * * त्याजकडे होतेच. नारोपंताचा कागद आतांच शहरास गेले. खंडोपतासी बोलावे कीं दादासाहेबाचा बंदोबस्त जाला म्हणजे तुमचा बंदोबस्त करून देऊ. असे बोलोन खातरजमा करून पाठऊन द्यावे हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke informs Nana Fadnis of Ahmedabad having been relieved by Govindrao Gaikwad.*

No. 299] [30-5-1776

पौ छ २१ राखर सन

सबा सबैन

**श्री**

विनंती उपरी. गणेशपंतानी अमदाबादेस जरूर जावे. (महीपार) मठी फार (?) आहेत. गुंता नाही. सुरत आठाविसीत काही फौज जावी. परंतु या दिवसात आठाविसीत फौज मोठी लावणीचे दिवस काहीच प्रयोजन नाही. श्रावणमासीपासून तजवीज करावी म्हणजे पोटासहि बरे, शहहि बसेल. सांप्रत उपयोग नाही. अमदाबादेस पोहचल्यावरी फतेसिगच येकेल. आंताजी नागेश आले आहेत. जाबसाल जाला तर होईल. गणेशपंत आपाजीपंत व गोविंदराव खंडेराव येक जाल्यावरी आमदाबादेचे काहीच होणार नाही. चिंता नाहीं. याप्रा ल्याहावे. रवाना छ १० रबिलाखर हे विनंती.

¶*Sakharam Bapu discusses the proposal of concentrating forces on Ahmedabad.*

---

No. 300] [2-6-1776

**श्री**

**राजश्री[१] मालेसिकारे मंडली**
**गोसावी यांसी**

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री रघुनाथ बाजीराव प्रधान आसीर्वाद सुा सीत सबैन मया व आलफ. तुम्ही पुरातन सरकारचे सेवक. बहुत दिवस निष्टेने सेवा करीत आला. कालवशात आडचणीस्तव फितुऱ्याकडे राहिला. आसो. जाले ते जाले. याउपरी तिकडे राहाणे उचित नाही तरी कोणेविसी वसवास न धरिता खातरजमेने निघोन येणे. सर्व प्रकारे तुम्हावरी कृपा करून चालविले जाईल. जाणिजे छ १४ राखर बहुत काय लिहिणे.

¶*Raghunathrao, in order to rally them round himself, gives assurances to many people about amnesty and good treatment even though they had for some time past joined the Barbhais.*

---

+ सबंद पत्र सखाराम बापूच्या हातचें.

१ याच मजकुराची व याच मितीची १ मानाजी कदम १ विरापा खताल वगैरे यांना पत्रें आहेत.

No. 301] [29-6-1776

पैवस्ती छ २३ जमादिलावल
सुा सबा सबैन
जेष्ठ+ मास.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बाजी गंगाधर मो बेलापूर चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १२ माहे जमादिलावलपर्यंत स्वामीचे कृपाद्रष्टी करून सेवकाचे व प्रांत मजकूरचें वर्तमान येथास्थित. असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडील कागद पत्र मुंबईहून इकडे येतात व इकडून मुंबईस जातात व शागीर्द वगैरे येतात जातात, म्हणोन हुजूर विदित जाले. यैशास येविसीची बातमी राखोन कागद-पत्र सांपडतील ते धरून हुजूर पाठवावे ते गोष्ट तुम्हांपासून न जाहाली; तरी या उपरी लिहिल्या अन्वये बारकाईनें बातमी येविसीची राखोन नाजूक कागदपत्र सांपडेल तो हुजूर पाठवीत जाणें; व शागीर्द वगैरे कोणी जाईल येईल त्यास जामीन घेऊन जाऊं न देणे, म्हणोन आज्ञा. ऐशास प्रांत मजकूरचे नाके याजवर चौक्या नेहेमी ठेऊन बंदोबस्त आज्ञेप्रमाणें केला आहे. यथेंही कारकून येविसीचे चौकसीवर नेहेमीच ठेविला असे. नाजूक कागदपत्र सांपडेल तो हुजूर पाठऊन देऊं. साष्टीस मार्ग काल्हेरचे तरीने चालत आहे, व उरणचाहि मार्ग परभारा चालतो. मेस्त्र मोष्टीन पुणेयासी गेलियापासोन त्याचे कागदपत्र बहुतेक उरणचे मार्गें जात असतात. तिकडून कदाचित श्रीमंत दादासाहेबांकडे कोणाचे कागदपत्र व शागीर्द वगैरे जात येत असती तरी नकले; वरचिल तालुके मजकूरचे चौक्या नाकेयाचा बंदोबस्त सेवकानीं उत्तम प्रकारें केला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Baji Gangadhar strongly refutes the charge of negligence in keeping a close watch on secret correspondence of Raghoba passing through his post Belapur. He suggests Kalher and Uran offer a more easy passage to Dada's communications.*

---

\+ पैवस्तींत जाौवल जेष्ठ लिहिले आहे परंतु आषाढ पाहिजे.

No. 302] [8-7-1776

पौ छ २९ जावल आषाढ

मास

श्री

सेवेसी माहादाजी रामचंद्र कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ २१ जमादिलोवल मुकाम कल्याण स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान आजच राजश्री सरसुभेदार यांस तल्याहून राजश्री गोविंदराव माणकर यांचें पत्र छ १४ जमादिलोवलचें आले. त्याणीं वर्तमान लिहिले आहे तेंच पत्रे बजिनस तीन सरसुभाहून सेवेसी रवाना केले आहे, त्यावरून ते प्रांतीचे वर्तमान विदित होईल. सरसुभाकडील जमाव रतनगड व कोथला येथे मोर्च्यास आहे. त्यास ते लोक अद्याप मोकले जाहाले नाहीं. गोपालपंत केतकर यांचे लिहिल्यावरून सरसुभाकडील कारकून मोर्चे उठवावयास पत्रें घेऊन गेले आहेत, की किले गोपाळपंताचे हवाली जाहालियावर मोर्चे उठऊन येणे. त्यास आद्याप तिकडील बंदोबस्त होऊन लोक आले नाहीत. तेथील गुंता कधीं उरकेल पाहावें. आणखी बातमीचे वर्तमान आल्यावर सेवेसी लिहीन. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ramchandra writes news about the force of the Sarsubha which was engaged in reducing the forts of Ratangad and Kothla.*

---

No. 303] [22-7-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री मल्हार जगजीवन गोसावी
यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा सीत सबैन मया व अलफ, तुम्ही विनती पत्र छ १२ जावलचे पाठविले ते छ १८ मिनहूस पावले. पिंपलनेरचे सुमारे जाऊन राहातो. राजश्री हरि बलाल याजकडे पत्रे पाठविली आहेत. बातमी आल्यावर लिहून पाठवितो म्हणौन लिहिले ते कलले. त्यास मारानिले याची पत्रे छ १० जावलची नर्मदा दक्षणतीरची आली. इतक्या रोजात आलीकडे आले असतील. तुम्हास बातमी लागलीच असेल. खजिना व बुनगे

6197

बंदोबस्ताने मारनिलेकडे रवाना करून तुम्ही व रा नारोआनदराव व राजश्री गंगाधरराव भिकाजी नवापुरास दंगा सोनगडवाल्यानें केला आहे त्याचे पारिपत्य करून तिकडील बंदोबस्त करणे. जाणिजे छ २३ जावल.

*¶The Peshwa asks Malhar Jagjivan to proceed along with Naro Anandrao to Navapur against the commandant of Songad.*

---

*No. 304]* *[August 1776?*

**श्री**

विनंती उपरी. तुम्ही गेल्यावर इकडे चहूकडून वरचेवर बातम्या आल्या की इंग्रेजाची गलबते साहा दीढ हजार माणूस जलालपुरास आज उदईक येणार, त्याजवरून आम्ही सारे रात निजलो नाहीत. चवकी पाहारे काठ्याची बंदोबस्ती करीतच राहिलो. याप्रो रात्रौ जाहाले. आज पाहावें कसे प्रसंग पडतो. वाऱ्यावर आमची गलबते आज आम्ही बातमीनिमित्य पाठविली आसेत. वर्तमान आल्यावर लिहू. सावधच आहोत. राजश्री महिपतरावजीस दोन दिवस लस्करात जाऊ न द्यावे. जवलच राखावे. बरे चिन्ह दिसत नाही. दुष्ट स्वप्न आहे. श्रीमंत कोणीकडे गेलेत ते समजत नाही. त्याजकडील वर्तमान पुर्ते कलल्यावर निरोप द्यावा. त्याची मसलत पार पडल्यास आपल्यास आवघड आहे. यास्तव तथ्य समजल्यावर जाऊ द्यावे. शहरातून बातमी आणून आम्हास लिहित जावे. रा भाऊ तूर्त येत नाहीत. आमची तुलसीची माल तुमच्या गवाल्यात आली आसली तर पाठऊन द्यावी. तुम्ही व रावजी तूर्त लस्करात न जावे. येक दोन रोज तेथेंच असावे. श्रीमंताची बातमी पकी कलल्यावर समयानरूप जें करणें ते करावे. आम्हास खाडीच्या वाटेचा मोठा घोर आहे. पाण्यातील बातमीहि लवकर कलत नाही. अस्तु; होतां होईल तें पाहातच आहों. तुम्ही उपराल्यास आसावें. बहुत काय लिा कृपा करीत जावी हे विनंती.

रा महिपतरावजी स्वामीचे सो सां नमस्कार लिा परिसोन कृपा करीत जावी. दोन दिवस सत्रागावींच आसावें हे विनंती.

*¶The news of Raghunathrao's flight to some unknown destination is communicated in this letter.*

No. 305] [August 1776

श्री

नवाब हैदरआलीखान बहादूर यास पत्र जे. आपण खते चार पाठविली ती पोहचली; ऐसेच हरवख्त आपले खैरखुषीचे वर्तमान कलमी करून दिलशादगी करीत जावे. दिगर आपण मुलुकाचे सनदेचा व ऐवजाचे पावतीचा मजकूर व मसलतीस करोडो रुपये खर्च लागतात ते लिहिला तो कलला; व बाजीराव गोविंद याचे खतावरून व त्याजकडील कारकून आला आहे त्याचे जबानीवरून मुफसले[1] जाहीर जाले. त्यास मागाहून तहनामा करार करून पाठऊन देत असो. लौकरच येऊन पोहचेल. इकडील वर्तमान तरी आम्ही सुरतेहून मोहिमेंस बाहेर निघालो. हमराह इंग्रजी पोख्त सरंजामा आहे. त्यास या वेलेस आपण आपली फौज व तोफखाना वगैरे भारी सरंजाम पाठवून बारभाईस मिरजपर्यंत शह द्यावा व आपले मनसब्यास आल्यास आपण मागाहून फौजेच्या पाठीमागे चाल देऊन आल्यास उत्तम आहे.

¶*Raghoba informs Haidar of his march from Surat accompanied by the English against the Barbhais and asks him also to march as far as Miraj with his army and attack them.*

---

No. 306] [1-9-1776

पो छ ४ साबान.

श्री

राजश्री गोविंदराव मोरे मुतालिक
हवालदार व कारनकू किले सिंहीगड
गो यासी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद व नमस्कार सुा सब्बा सबैन मया व अलफ. रा मल्हारराव भगवंत याचे बाईकोविसी व बाबूराव हरि व सखाराम हरि याचे मातुश्रीस हजीर जामिनकीचे राजश्री विठल येसवंतराव खासनिसी याचे कागद लेहून किले मजकुरी घेतले आहेत, त्यास उभयतांचे मुलामाणसाची व वस्तभावेची मोकलीक जाहली. साा मारनिलेचे जामीनकतबे तुम्हाजवल किले मजकुरी असतील ते याचे यास मावारें देणे, जाणिजे छ १७ रजब आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa releases the wife of Malharrao Bhagvant and the mother of Baburao and Sakharam Hari.*

---

१ तपशीलवार, सविस्तर.

No. 307] [17-9-1776

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ३ साबान जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २७ रजबचे पत्र नवापूरचे मुकामीहून पाठविलें ते छ २ साबानी पावलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब याजवळ इंग्रज आहे, त्यास मुंबईहून पत्रे आली की तुम्ही उठोन येणे. हे वर्तमान श्रीमंतास कलल्यावर लक्ष्मणपंत नातू व इंग्रजाकडील येक मातबर माणूस याप्रमाणे मुमईस रवाना केले. छ २१ रजबी सुरतेस आले. येथून मुमईस जाणार. इंग्रेज सामील जाल्यास बल धरितील. न जाल्यास धारेकडे जातील. अमदाबादेची खंडणी सात लक्ष रुपये जाली. सिवाय दरबार खर्च वसूल तीन लक्ष दिल्हा. बाकी ऐवज राहिला त्यास इंग्रजाचे वर्तमान ऐकोन टाळाटाळ करितात. गोविंदराव गायकवाड यास सुरत प्रांती सरकार हिशाचे माहाल आहेत ते श्रीमंतानी दिल्हे. ठाणी बसत आहेत. वसूल चालीस लागला. इंग्रजानी श्रीमंतास सोडिले तरी धारेस जाऊन उभयता सरदारास अनकूल करून घ्यावे या प्रमाणे लक्ष आहे. त्रयोदशीच्या पक्षाकरितां रेवातीरास आले. सुरत प्रांती कांही फौज रवाना करणार. आपण दसरापावेतो कूच करीत नाहीं असें दिसतें. येथील खर्चाची मोठी वोढ आहे याजकरितां आस्विन सुाा प्रतिपदेस कूच करून आपणाकडे येतो म्हणोन कितेक तपसिलें लिहिलें ते सविस्तर कललें. ऐसियास इंग्रजाचा मजकूर तरी पुरंदराहून मुमईवाल्याचे सलुकाचे बोलणे होऊन ठरावात आले, त्याजवरून श्रीमंताजवळ इंग्रेज आहेत त्याणी उठोन मुमईस जावें याप्रमाणें पत्रें गेलीच असतील. त्यास येकायेकीं उठोन कसे जावें याजकरितां श्रीमंतानी लक्ष्मणपंत नातू व इंग्रज़ाकडील मातबर माणूस पाठविला असेल. च्यार दिवस मसलतीवर घालतील. परंतु इंग्रजाचे बोलणे पके जाले असल्यास श्रीमंताजवळ इंग्रज राहणार नाहींत. इंग्रज गेले म्हणजे त्या प्रांती राहणार नाही. धारेकडे जातील अगर जिकडे त्यास सोय पडेल तिकडे जातील. या उपरी अमदाबादेकडेहि जाण्यास पेच पडेल. आपाजीाा गणेश यांणी खंडणी केली. कांही वसूल दिल्हा. बाकी ऐवज राहिला तो इंग्रजाकडील मजकूर ऐकिल्यावर टालाटाल करितात म्हणोन लिाा. त्यास खंडणी केली हेच खरें वर्तमान वाटत नाहीं. पूर्वी त्यास सूचना येथून इंग्रजाच्या राजकारणाची जालीच होती. तत्राप न जाणो पकी बातमी येईल ते खरे. गोविंदराव यास सुरत प्रांतीचे

सरकार हिशाचे माहाल श्रीमंतानी दिल्हे. वसूल चालीस लागला आहे. असा. सुने रान पडल्यावर स्वापदाची प्रबलता होते. आम्ही फौजसुधां त्या प्रांती आल्यावर सहज़ातच गोविंदराव याजकडील अमल उठेल.' चिंता नाही. फौजेस खर्चास नाहीं याजकरितां आम्ही आपणाकडे येतो म्हणोन लिा. त्यास आम्हीच तिकडे येत असतां तुम्ही इकडे माघारे यावे हे उत्तम नव्हे. येथें आल्याने रोजमरा मिलेल, तेथे असल्यानें न मिलेल असा अर्थ नाहीं. येथेहि खर्चाची वोढ आहे. ऐवजाची तरतूद केली आहे. आला म्हणजे तुम्हासहि पाठऊं. तुम्ही तिकडून न येणे. नाना तुम्ही इतके लिहीत असतां मी न यावें की काय, परंतु लाइलाजीस उपाय नाहीं. आपण तिकडून आल्यानें अगदी आब जाईल. यास्तव न यावें. दसरियास मुहुर्तेकरून कूच करून दरमजल आपणाजवळ येऊन पोहचतो. कापड पैठण·जालनांपूचें आणविले आहे. दसरियास येईल. कांही पाठवितो. (अपुरें).

¶*Hari Ballal explains the queries put forward by Naropant Keskar saying that the sudden change in the attitude of the English towards Raghunathrao is due to negotiations having been opened with the Peshwa by the English, that he (the writer) is not sure whether the revenue from Ahmedabad was realized by Raghunathrao and lastly that though the Peshwa's province round about Surat has been made over to Govindrao Gaikwad, there would be no difficulty in recovering it from him.*

---

*No. 308]* *[3-1-1767*

छ ३ साबान सबा

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पो अको सखाराम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा पौष शुध ३ पर्यंत जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाा विशष. किले वंदनगड येथील बेगमीस लाकडे जालाऊ वोंडे पाहिजेत त्यास असपास वोंडा कोठे मिलत नाहीं: यास्तव पत्र लिा असे. तरी मेढे खोरियांत कमावीशदारास पत्र द्यावे म्हणिजे तेथून मजुरीने तोडून आणऊ. जरूर पत्र देवावे (बहुत) काये लिहिणे लोभ असो दीजे हे विन(ती)

¶*Ako Sakharam, son of Sakharam Bapu, requests Nana to issue instructions to Kamavisdars of Medhe to supply fuel to Vandangad.*

6201

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तां छ ३ साबान जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २७ रजबचे पत्र नवापूरचे मुकामीहून पाठविलें ते छ २ साबानी पावलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब याजवळ इंग्रज आहे, त्यास मुंबईहून पत्रे आली की तुम्ही उठोन येणे. हे वर्तमान श्रीमंतास कलल्यावर लक्ष्मणपंत नातू व इंग्रजाकडील येक मातबर माणूस याप्रमाणे मुमईस रवाना केले. छ २१ रजबी सुरतेस आले. येथून मुमईस जाणार. इंग्रेज सामील जाल्यास बल धरितील. न जाल्यास धारेकडे जातील. अमदाबादेची खंडणी सात लक्ष रुपये जाली. सिवाय दरबार खर्च वसूल तीन लक्ष दिल्हा. बाकी ऐवज राहिला त्यास इंग्रजाचे वर्तमान ऐकोन टाळाटाळ करितात. गोविंदराव गायकवाड यास सुरत प्रांती सरकार हिशाचे माहाल आहेत ते श्रीमंतानी दिल्हे. ठाणी बसत आहेत. वसूल चालीस लागला. इंग्रजानी श्रीमंतास सोडिले तरी धारेस जाऊन उभयता सरदारास अनकूल करून घ्यावे या प्रमाणे लक्ष आहे. त्रयोदशीच्या पक्षाकरितां रेवातीरास आले. सुरत प्रांती कांही फौज रवाना करणार. आपण दसरापावेतो कूच करीत नाहीं असें दिसतें. येथील खर्चाची मोठी वोढ आहे याजकरितां आस्विन सुां प्रतिपदेस कूच करून आपणाकडे येतो म्हणोन कितेक तपसिलें लिहिलें ते सविस्तर कललें. ऐसियास इंग्रजाचा मजकूर तरी पुरंदराहून मुमईवाल्याचे सलुकाचे बोलणे होऊन ठरावात आले, त्याजवरून श्रीमंताजवळ इंग्रेज आहेत त्याणी उठोन मुमईस जावें याप्रमाणें पत्रें गेलीच असतील. त्यास येकायेकीं उठोन कसे जावें याजकरितां श्रीमंतानी लक्ष्मणपंत नातू व इंग्रज़ाकडील मातबर माणूस पाठविला असेल. च्यार दिवस मसलतीवर घालतील. परंतु इंग्रजाचे बोलणे पके जाले असल्यास श्रीमंताजवळ इंग्रज राहणार नाहींत. इंग्रज गेले म्हणजे त्या प्रांती राहणार नाही. धारेकडे जातील अगर जिकडे त्यास सोय पडेल तिकडे जातील. या उपरी अमदाबादेकडेहि जाण्यास पेच पडेल. आपाजीां गणेश यांणी खंडणी केली. कांही वसूल दिल्हा. बाकी ऐवज राहिला तो इंग्रजाकडील मजकूर ऐकिल्यावर टालाटाल करितात म्हणोन लिां. त्यास खंडणी केली हेच खरें वर्तमान वाटत नाहीं. पूर्वी त्यास सूचना येथून इंग्रजाच्या राजकारणाची जालीच होती. तत्राप न जाणो पकी बातमी येईल ते खरे. गोविंदराव यास सुरत प्रांतीचे

6200

सरकार हिशाचे माहाल श्रीमंतानी दिल्हे. वसूल चालीस लागला आहे. असा. सुने रान पडल्यावर स्वापदाची प्रबलता होते. आम्ही फौजसुधां त्या प्रांती आल्यावर सहज़ातच गोविंदराव याजकडील अमल उठेल.' चिंता नाही. फौजेस खर्चास नाहीं याजकरितां आम्ही आपणाकडे येतो म्हणोन लिा. त्यास आम्हीच तिकडे येत असतां तुम्ही इकडे माघारे यावे हे उत्तम नव्हे. येथें आल्याने रोज-मरा मिलेल, तेथे असल्यानें न मिलेल असा अर्थ नाहीं. येथेहि खर्चाची वोढ आहे. ऐवजाची तरतूद केली आहे. आला म्हणजे तुम्हासहि पाठऊं. तुम्ही तिकडून न येणे. नाना तुम्ही इतके लिहीत असतां मी न यावें की काय, परंतु लाइलाजीस उपाय नाहीं. आपण तिकडून आल्यानें अगदी आब जाईल. यास्तव न यावें. दसरियास मुहुर्तेकरून कूच करून दरमजल आपणाजवळ येऊन पोहचतो. कापड पैठण•जालनांपूचें आणविले आहे. दसरियास येईल. कांही पाठवितो. (अपुरें).

¶*Hari Ballal explains the queries put forward by Naropant Keskar saying that the sudden change in the attitude of the English towards Raghunathrao is due to negotiations having been opened with the Peshwa by the English, that he (the writer) is not sure whether the revenue from Ahmedabad was realized by Raghunathrao and lastly that though the Peshwa's province round about Surat has been made over to Govindrao Gaikwad, there would be no difficulty in recovering it from him.*

---

*No. 308]* *[3-1-1767*

छ ३ साबान सबा

**श्री**

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पाो अको सखाराम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा पौष शुध ३ पर्यंत जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाा विशष. किले वंदनगड येथील बेगमीस लाकडे जालाऊ वोंडे पाहिजेत त्यास असपास वोंडा कोठे मिलत नाही: यास्तव पत्र लिा असे. तरी मेढे खोरियांत कमावीशदारास पत्र द्यावे म्हणिजे तेथून मजुरीने तोडून आणऊ. जरूर पत्र देवावे (बहुत) काये लिहिणे लोभ असो दीजे हे विन(ती)

¶*Ako Sakharam, son of Sakharam Bapu, requests Nana to issue instructions to Kamavisdars of Medhe to supply fuel to Vandangad.*

6201

No. 309] [3-10-1776

पौ छ २९ साबान
सबा भाद्रपद मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

पो माधवराव नारायण साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ साबानपावेतो वर्तमान येथास्थित आसे. यानंतर राजश्री पतंगशाहा राजे सवस्थान जवार याचे पत्र तीाा राजश्री धोंडोपंत दादा यास आले कीं, श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचे ठाणे छ १३ साबानी तळाश्रीस आले. आम्हास पत्र आले की, जवारीस ठाणे येते. आल्यास आम्ही पुढे उपाये काय करावा? पेशजी आपणास लिहिले की, पांचसे लोक दारूगोलीसुधा पाठवावे, बंदोबस्त राखून ठासून राहू. त्यास लोक न आले. सांप्रत निकट येऊन लागली आहे. याचा विचार काये करावा, ते लिहावे. श्रीमंताचे ठाणे डाहाणूस आले म्हणून पत्र आले, त्याची नकल पाठविली आहे, त्यावरून कलेल. धोंडोपंती लिहिले आहे की, श्रीमंताचे ठाणे जवारीस आले तरी त्रिंबकापासून बारा पंधरा कोसावर शह आला. यास्तव जवारीस पांचसे लोक ठेऊन बंदोबस्त केला पाहिजे. नवे लोक ठेऊन पाठवावे तर त्यास यैवज पाहिजे. इकडे कर्ज घेईन म्हटल्यास लोक जिकडील तिकडे सावध जाले आहेत. कर्ज कोण्ही देत नाही. जवार जागा चांगली आहे. तेथे ठाणे येऊन बसल्यास पुन्हा लौकर हस्तगत होईल यैसे नाही. जवारीपासून बारा कोसावर श्रीमंताचे ठाणे येऊन बसले. श्रीमंत आर्जुनगडासच आहेत. परंतु रामनगरकर कोली वगैरे त्यास जाऊन भेटले यामुळे ठाणी बसवितात. येविसीचे वर्तमान हुजूर लेहून पाठवावे. ठाण्याचे बंदोबस्तीविसी सरकारची आज्ञा काये होते ते लिहून पाठवावे. सरकारची फौज शाहावर होती ते हाली कोठे आहे न कले. ते तोंडावर आसती तर इतका पेच न पडता म्हणौन पत्र आले. त्यास जवारीच्या ठाण्याचा बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां सरकारातून यैवजाची तरतूद होऊन धोंडोपंतास आज्ञा जाल्यास पांचसे लोक ठेऊन जवारीस पाठऊन बंदोबस्त करवितील. येविसी जसे उतर येईल त्याप्रमाणे त्यांस लिहून पाठऊ. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Madhavrao Narayan to Naropant Keskar writes, measures are being contemplated to strengthen Jawhar to remove the possibility of its falling into the hands of Raghoba, now moving in that direction.*

6202

No. 310] [8-10-1776

**श्री**

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री भिवराव येशवंत
गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा सबैन मया व अलफ. तुम्ही विनंती पत्र छ २१ शाबानचे पाठविले ते छ २२ मिनहूस पावले.

सिंदे याची फौज चिंचोलीवर आहे व होलकराची फौज तलेगावावर आहे. ते जऱ्ही आले तऱ्ही रास्ते वगैरे पथके आल्याविना खाली जात नाही. परकाले आले, मुसा नारज उद्या येईल म्हणून लिहिले ते कलले. रास्ते यास निकडीचे पत्र पाठविले असे तेहि लौकरच तुम्हाकडे जातील. वरकडासहि ताकीद होत असे. येतील ते वरचेवरी लिहीत जाणे.

कुरोंड्या घाटावर सुबराव बुरूडकर दोन तीन हजार लोकानसी आला. हे वर्तमान कळताच आम्ही तयार होऊन गेलो. बाण व गोले टाकिले. त्यास खाली जावयास गडबड जाली. उतरून गेले म्हणून लिहिले ते कलले.

इंग्रेजाचा बतेला सुरतेस जात होता त्यास गावी होऊन रेवदंड्यास सापडला. रेवदंडा हुशार आहे. आनंदराव सिंदे याचे पत्र राजश्री विसाजी केशव यास आल्याचा मजकूर लिहिला तो कलला. सिंदे यास हुशारीविसी विसाजी केशव याणी लिहिलेच असेल. इंग्रेजाचा बतेला धरिला आहे त्याविसी रदबदल पडेलच.

बोरघाटावर पांच सातसे माणूस आले होते. त्याजवर दोन पथके पाठविली तेव्हा तेहि खाली गेले. म्हणून लिहिले ते कलले.

सारांश तुम्हाजवल भरणा भारी होऊन खाली उतरल्यावर त्याच्यानें फौजेपुढे दम धरवेल असे नाही. रात्रीस बहुत सावधपणें राहून वर्तमान तिकडील वरचेवर लिहीत जाणे. ऐवजाचा मजकूर लिहिला तो कलला. ऐवजाची तरतूद होत आहे. जंगणिजे छ २४ शाबान बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa writes to Bhivrao Yeshwant that orders have been issued to Sindia, Holkar and Rastia to join him. Bhivrao Yeshwant was despatched against the Pretender.*

6203

No. 311] [17-10-1776

पो छ ४ रमजान आश्विनमास.

श्रीं

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री भिवराव येशवंत गो यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा सबा सबैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र छ ३० साबानचें पाठविलें ते प्रविष्ट जाले. छ २९ तारखेस बोरघाटाखाली जाऊन, तोतयाचे लोकासी लडाई जाली; व दोन प्रहरा फिरून घाटमाथा आल्यावर त्याचे दुसेरें दोन आडीच हजार माणूस आले त्यासीहि लडाई केली. संभाळून मुकामास आलों. सरकारचे लोक फार जाया जाले नाही. तिकडील नासाडी बरीच जाली म्हणून विस्तारें लिा तें विदित जाले. ऐशास घाटास आडचण होती ते मोकली करून, खाली जाऊन, गाठून झुंजला व संभाळून घाटमाथा आल्यावरीहि दुसरी लडाई मारिली. उतम केले. घाटाखाली व घाटमाथा जागजागा त्याचे लोकानी फैलाव मांडिला आहे. रातबिरात येऊन हुलड करावयास चुकणार नाहीत. याजकरिता चहूकडील त्याचे लोकाची बातमी रोजच्या रोज पकी राखून, आपले जागा बहुत खबरदारीने असणे. फौजेविसी लिहिले, त्याजवरून सिंदे याजकडील आणखी येक हजार फौज तुम्हाकडे रवाना केली आहे. लौकरीच येऊन पोहचल. यासिवाय दुसरी फौज पाठवावयाची तर्तूद होत आहे. वरिचेवरी रवानगी होऊन तुम्हाकडे येत जाईल. जाणिजे छ ३ रमजान. बहुत काय लिहीणे.

¶*The Peshwa Madhavrao Narayan compliments Bhivrao Yeshwant for having inflicted two successive defeats upon the Pretender and asks him to be on his guard against the marauding activities of the Pretender and his forces. The Peshwa promises him prompt succour.*

---

No. 312] [17-10-1776

पो छ ४ रमजान आस्विन मास

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी : पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. छ २९ साबानी घाटाखालीं व घाटमाथा तोतयाचे लोकासी लढाई जाहाल्याचा मार वगैरे वर्तमान लिा ते

सविस्तर कळले. लडाया मारून संभाळून मुकामास आला. राहिला, उत्तम केले. त्याचे लोकानी फैलाव केला आहे, याजकरिता त्याची बातमी चांगली राखून रातबिरात फार सावध असावें. सविस्तर सरकारचे पत्रावरून कळेल. रा[1] छ ३ रमजान हे विनंती.

¶*Nana Fadnis congratulates Bhivrao Panshe on the success attained by him over the Pretender of Sadashivrao Bhau.*

---

*No. 313]* *[25-10-1776*

पौ छ २७ रमजान सन
समान सबैन अस्विन

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक बालाजी गणेश तालुके देवदुर्ग कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता छ ११ माहे रमजानपावेतो यथास्थित असे विशेष. गलिमाचे लढाईचे वगैरे पेसजी विनंतीपत्री सविस्तर वृत लिहिले आहे, निवेदन जाहालेच आहे. हाली काल छ ९ रमजानी गलीम सात आठशे खाली श्रीलिंगाचे देवलात मोजे हिंगवले ता सालसी येथे येऊन राहिला. त्याचे पारिपत्याकरिता लोकसुधा आजच छ मजकुरी निघोन दोन कोश गेलो. इतक्यात किले भगवंतगडाहून बातमी आली की, राम परभू निा सिंधेदुर्ग जमावसुधा सर्ज्याकोटास आला आहे. अरमार दोन च्यार गलबते व माहागिऱ्या तयार आहेत. भगवंतगडचे लक्ष त्याचे बोलण्यात दिसते. बहीरवगडचा सूड घ्यावा. यात बाल सावंत भोसला देखील आहे. जलमार्गे सरज्याकोटाहून येक कोस भगवंतगड. भरतीचे समई बुर्जासी माहागिऱ्या आणून आडवाव्या यैसा मनसबा आहे. पाहाता हाहि मजकूर खराच. दुरोखे शह द्यावा. गलिमाचा रेट भारी. घाटावरून व दऱ्यातून येकवेल लगट करावा यैसे सर्व अमित्राचे मानस आहे. इतक्याचे कारण भगवंतगड जागा केवल नाजूक आणि मालवणकरास लगता, याकरिता गडबड करितात. भान सावंताचे स्वारीचा मजकूर मोघम पेसजी लिहिलाच आहे. हाली मनास आणितां राजश्री गंगाधरपंत सुभेदार याची आज्ञा नसतां दोनी स्वाऱ्या भान सावंत याणी मध्येच केल्या यैसे

---

१ अक्षर येथून नाना फडणिसाचें.

देखण्यातहि येत्ये व राजश्री सुभेदारानी याच अन्वये लिहिलेहि आहे. मुख्य गोष्ट या स्वारीमुळें गनीम सेर जाहाला. सालसी प्रांतावर कंप्रत[1] घालून बदनक्षा करून आपण जिवानिसी गेला. हाली गनिमाकडील लोक हावभरी होऊन गोविंदराव निा तोतया व माहादाजी राम व येसनाक म्हार वगैरा सरदार तोतयाकडील हजार माणूसपावेतो जमा होऊन घाटमाथा कसबा पाटगाव व ठाणे पाले येथे बसले आहेत. मालवणात त्याणी पका सरजाम करून पाचसे माणूस सिंद्याकडून नवे आले. अरमारकरी लोक हजार माणूसपावेतो व गलबते पराजू करून सिधतेत आहेत. भगवंतगड, देवगड दर्याकिनाराचे जागे येथे येऊन लागावे. बहीरवगडचा सूढ घ्यावा या आन्वये दुरोख शह दिला आहे. मुंबईकडील बीर[2] त्यास यामुले वलवल करितात. साहेबाचे पुण समर्थ आहे. मी त्याचा मगर धरीत नाही. साहेबी बेगगी मात्र करावी हे विज्ञापना.

¶*Letter of Balaji Ganesh to Nana Fadnis reports risings in the Konkan in behalf of the Pretender.*

---

*No. 314*]

*[1-11-1776*

नकल

**श्री**

**राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यासी**

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो महादजी सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जावें विशेष. तोतिया बेलापुराहून पळोन तराड्यांत बसोन ममईस जात होता ते बातमी राजश्री राघोजी आंगरे यास कं[3] * * * * शंभर माणसानसी तराड्यांत[4] * * * जाऊन मोठे मेहनतीनें तोतिया काल संध्याकाळीं गुरुवारीं धरिला. त्याच वेळेस भावसिंग चोपदार व रामरतन परदेसी या दोघांबराबर आपले कमरेचे पेशकबजं[5] खुणेस देऊन पाठविले ते आज भृगुवारीं दीड प्रहर दिवसास आले. त्याच समई रा बाळाराव गोविंद व राणेखान आंगरे याजकडे तोतियास आणावयासीं फौजसुधां पाठविले आहेत. आपणास कळावे म्हणून लिहिले असे. रा छ १८ रमजान. परांजपे वगैरे मंडळी सांपडली म्हणोन सांगतात. तपसीलवार मागाहून लेहून पाठविले जाईल. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia communicates to Nana Fadnis details of the capture of the Pretender by Raghoji Angria.*

---

१ कंप्रत—तेढ, तंटा. २ भर. ३ कळल्यावर. ४ बसोन.
५ कट्यार. × पत्र नानाफडणिसास.

No. 315] [27-11-1776

पौ छ २९ सवाल सबा
सबैन कार्तिक

श्री

श्रीमंत राजश्री नाना
फडनीस साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव धुलप मुा जंजिरे विजयदुर्ग दंडवत विनंती. येथील कुशल ताा छ १९ माहे शौवालपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित आहे विशेष. छ २ शौवालचें आज्ञापत्र छ १२ मिनहूस सादर जाहालें. तेथे आज्ञा कीं अरमारची तयारी सत्वर करून अरमारसुधा वसईस राजश्री विसाजी केशव यांकडे जाऊन सरकार काम बज्याऊन दाखवावें समय आहे. येविसीं राजश्री गंगाधर गोविंद यासी बोलावयाची आज्ञा केली आहे. बोलतील. अरमारची तयार करून निघोन जावें म्हणौन आज्ञा. यैसियासी पाहिल्यापासून श्रीमंताच्या चरणापासीं येकनिष्ठेन हा कालपर्यंत व पुढेहि येकसारिखेच आहे. तोतयाकडील सखाराम केशव तीन च्यार हजार माणसांनिसी देवदुर्ग तालुका बलकाऊन राहिला होता. त्याणें ब्राम्हणांस व रयतास बहुत उपद्रव दिल्हा. त्याचे पारपत्यास तीर्थस्वरूप राजश्री जानराव काका हजार माणसांनिसीं व राजश्री बालाजीपंत सुभेदार ताा देवदुर्ग उभयता येथून निघोन गेले. त्यांची आण यांची रामगडास गांठ पडोन मातबर लढाई जाहाली. त्याकडील पंधरा आसामी ठार व चालीस पंनास जखमी होऊन सखाराम केशव व सूर्याजी भाव्या वगैरे सरदार धरून कैदेत ठेविले आहेत. त्याच हल्यास रामगडावर निशाणहि चडविलें. वरकडहि किल्हा कोटांचा बदोबस्त करून लौकरच निघोन येतील. राजश्री गंगाधरपंत तात्या येथें आल्यावर सर्व यथास्थित बंदोबस्त तात्याहीं केला. अरमारची तयारी होऊन कुल सरंजाम सुधा सिध्ध आहे. आज्ञेप्रमाणें अरमारसुधा वसईस राजश्री विसाजीपंत सर सुभेदार याकडेस निघोन जातों. लोकास अडीसेरीस गला नाहीं व खर्चासहि द्यावयासी नाहीं. दर्यावर्दी याचा भरणा साल मजकुरी कमी व आहेत दर्यावर्दी यांसी आगाव पावलें नाहीं येविसीचे सविस्तर तात्यास समजाविलें आहे. बंदोबस्त करून देतील. तूर्त काही खर्चास व अडीसेरीस भाताची बेगमी करून दिल्यानंतर अरमारसुधा निघोन जातों. सेवेसी श्रुत होये +हे विज्ञापना.

¶*Anandrao Dhulap assures Nana Fadnis that he would, as desired by him, soon proceed to Bassein to assist Visaji Keshao. He further reports a skirmish between Janrao and a supporter of the Pretender at Ramgad where the latter sustained a defeat.*

---

+ हीं अक्षरें बाळबोध आहेत.

No. 316] [1776

श्री

सेवेसी विनंती. रामचंद्र नाइकाचे बायकोची आवस्ता फार कठिण आहे. याचा शोध परस्परे मनास आणावा, यैशास वाड्यात पाच माणसे चवकीस ठेविली म्हणजे पुरे. किलास रवाना करिता मार्गी निभावणार नाहीत यैसी अवस्ता जाली आहे. आठा पंधरा दिवसाचा प्रकार. आयुष्यमर्यादेकरून पुढे वाचल्यास कलेना. रात्रंदिवस मुले चढपढतात, काही जीव राहिला नाही. मेल्यात संख्या आहे. यास्तव विनंती लिहिली आहे. कृपा स्वामीचे ध्यानात आल्यास आहेत तैसीच ठेऊन. पाच माणसे चवकीस नेमून देविली पाहिजेत हे विनंती.

¶*The letter mentions the serious condition of the wife of Ramchandra Naik, the principal supporter of the Pretender.*

---

No. 317] [1776

श्री २

पुा सेवेसी विज्ञापना. आवजी यांस बलाऊन आणून गुदस्ता त्याजवल करार करून यादी दिल्या आहेत. त्या पाहून फतेसिंगाची त्याची वाटणी करणे ती कसी करावी याचा ठराव करावा. नाही तर उभयतानी स्वामीकडे यावे, मग वाटणी करावी. कोणताहि येक प्रकार ठरावात आणावा. फतेसिंग पहिल्यापासून लक्षांत, गोविंदरावहि समयास येऊन अमदाबादचें काम केले. तेव्हा त्याचेहि * * * * खंडोपंताचा * * * येक गोष्ट ठरावात आणिली म्हणजे गोविंदरायांजवल गुंता पडणार नाही. अम्ही गोविंदरायास लिहिले आहे जे, तुमचा बंदोबस्त करून देणे अम्हाकडे. खंडोपंत आल्यावर लेहून पाठऊ. तूर्त तुम्हाजवल फौज आहे व आपाजीपंताकडील फौज घेऊन काठेवाड प्रांती जाऊन मातबर पैका मेलवावा. फौज फेडावी. असे प्रकार लिहिले आहेत. विदीत जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to the division of Jahgeer between Fatesing and Govindrao Gaikwad.*

---

No. 318] [1776?

श्री

राजश्री जगंनाथ पंत स्वामीचे सेवेसी

पोष्य बाबूराव वल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. आमच्या शरीरीं स्वस्त नाहीं. मंबईचें पाणी माहा वाईट. आमच्या समागमें गडी होते त्यांतून येक

मलबारी मात्र उठतो; बाकी झाडून पडले. आम्हास वाकाच (वांखाच) आहे, यास्तव काय करावें, उपाय नाहीं. चिरंजीव बावास वरचेवर भेटावयास मात्र पाठवावें. भेटल्यानंतर दोनच दिवस राहून पुण्यास त्यास पाठऊं; येथें ठेवीत नाहीं. श्रीमंताची सलतनत राजश्री भिवराव यास भेटली. येथील ठराव होईपर्यंत आठ च्यार पंधरा दिवस पर्यंत आसपास मुंबईच्या ते राहतील. त्याजबरोबर तुम्ही असावें. वरचेवर त्यास सांगत जावें कीं बोलणें असतां जाऊं नये. त्यासहि समजत आहे. सरकारची आज्ञा याप्रमाणें येईलच; परंतु तुम्ही असल्यावर ठीक आहे. आठ च्यार दिवशीं येथील मजकूर कसकसा ठरण्यांत येतो त्याप्रमाणें तुम्हास लिहून पाठऊं. मग यावें. रावजीसहि सांगावें. श्रीमंतांकडील मंडळीची वस्तावाणी झाडून न सोडावी. बंदोबस्त करवावा, संभाळून असावें हें विनंती.

¶*Baburao Ballal complains about the unhealthy climate of Bombay. He advises Jagannathpant to protect vigilantly plunder recovered from Raghoba's camp as it has to be accounted for.*

---

*No. 319*] [*1776?*

श्री

सेवेसी राजश्री मोरोबादादा स्वामींचे सेवेसी

सेवक सटवाजी नाईक तुलसानाईकाचे फटनाईक साष्टांग दंडवत विनंती. विनवावया प्रार्थना ऐसा जे. माहाराजाच आसीर्वादे कडून सुखरूप आसो. सांप्रत रा। जगनाथपंत बराबर जासूद जोडी दिल्हे होता. आज्ञेप्रमाणे डाकचौकी बसवीत आल त्याप्रमाणे वत्रनुक करीत आलो. येथे कोलाहारास दाखल जाहल. दुसरे दिवशी महमद अलीखानचे भेट जाहलवर पुसल तुम्हासंग किती मानुस आहे? सांगितल दोनसहे मानुस आहे. यासी जे पाहिजे सरंजाम पाहिजे ते सर्वेहि पाठऊन दिल्हे. ते सर्वेहि ठेऊन घेतल. जासूद याणी पुसल, आम्हासी काही मिलल? बहुत राग भरल, रोजमरा खात आहे यामधे तुमच कडले देण काये म्हणून राग होऊ लागल. बर चिंता काये? आमचे प्रपति [ प्राक्तनी ] किती असेल ते मिलल. येताना गावागावी सर्वसी दानावैरण सर्व साहितसुधा घेत आला तेव्हां येक मानुसाचे सिदा न दिल्हे. येथील काही दिल्हे नाही. आम्ही बोलण सोडल. यावर महमद अलीखान पुसल साहेबच हुकुम डाकचौकी बसऊन बातमी लिहिणार पाठविले बहुत उतम जाहल. खुसाल आसा. पाच ६०० सहे रुपये खर्चास दिल्हेवर आम्हासी सांगितल, तुम्ही हैदरच लस्करास जाऊन आपल

देषाच फौज आहे. फितूर करून आणणे. आम्ही सांगितले आम्ही धणीचे मीठ खालल आस. आमच्याने हे काम घडणार नाही. त्याणे हे मुलकाचे येक ब्राह्मणास आणून दोन रुपये खर्चास देऊन पत्र लिहिलावर त्याचेहि पत्र आल. येथे पावेतो येऊन भेट घेत जाणे. येथून रातोरात दोन जोडी जासुदाचे घेऊन गेलावर हैदराणी वर्तमान ऐकूण येक भला ग्रहस्तास पाठवून बलाऊन लस्करामधे घेऊन गेल. ते वख्ती भेट जाहल. हकीकत पुसल. याणी सांगितल आम्ही श्रीमंत सहिबचे सोईरधारे आसो. चाकरलोक सारीख न देखण. आणखी किती येक येताती, चाकर मानुस होऊन येत आहे. आम्ही मांडीस मोडा देऊन बराबर बसणार. आमचे हुकमात सर्वहि आहे. तुम्ही काही चिंता न करणे. श्रीमंत साहेबचे हुकुम आहे, येथील काये हकीकत आहे ते ध्यानास आणून लिहून पाठवणे. फौज पाठवीत आसो. हे काम नाजूक आहे म्हणून आम्हासी पाठविल. आम्हास तुम्ही देतील ते साहेबास दिल्यासारीख होईल ऐसा गोष्टी बोलिला. हैदर खरेच आहे मानून येक मोतीचे माल ५००० हजार रुपयेचे, दोन साल जोडी, येक पागोटा, येक रुमाल, नगद ५०० होन नगद दिल्हे. आणखी तुम्हास देऊ बहुत भरवसा दिल्हे. तेथून मिरसाहेब येक साल जोडी, येक पागोटा तेहि दिल्हे/ हे घेऊन ठिकाणेस आला. मग हैदरास सांगितल कोलाहारामधे कोणी नाही. महमदअलीखान मुराररात्र दोघ हे समई घेण म्हणून सांगितल. याचे ऐकून विप कोष पासोन धावणी करून गेला. तेथ बहुत साहेबच आण खात आस हे बावा ब्राह्मण गोसाई अस सिपाई मानुस येकदा कामात येणार. धाव चालवीत नाही. साहेबास विज्ञंती करून खामखा आसामी करून पाठविणे. आपलासाठी येक बटीक पाटऊन देऊ.

¶*One Satvaji Naik deputed to Haidar to negotiate terms refers to the reception he was given by Haidar. The writing is incorrect in many places.*

---

*No. 320*] [*1776?*

**श्री**

विनंती. राजश्री बाबूराऊ हरि गोविंदराव गायेकवाड यांजबाा आहेत. त्याजकडील राऊत असतील ते व वरकडहि कारस्तानी तजविजेने होईल ते करून फौज फोडावयाची तजवीज करून यावे, याप्राा त्यांजकडील राजकारण आलें आहे.

त्यांचा वच्याव करावा. सखाराम हरि यांजकडील रदबदल करणार नाहींत याप्रा आहे. मर्जीस आल्यास मध्यस्तासी बोलून ते उठोन येत व फौजहि फुटे आसे मधस्तासी बोलून करू. उतर पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*The note mentions that Baburao Hari has been seduced from Dadasaheb's allegiance and that he was prepared to come over to the party of the Barbhais, leaving all connection with his brother Sakharam Hari. The writer asks a reply of approval of the plot.*

---

*No. 321*] [*2-1-1777?*

श्री

चिरंजीव राजश्री बालाजीपंत लेले यांसी

प्रति अनुबाई आसीर्वाद. उपरी, येथील कुशल ता। छ २१ जिलकादपर्यंत वर्तमान यथास्थित आसे विशेष. सांप्रत तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही, तरी सविस्तर लेहून पाठवावें. वरकड इकडील इचलकर्जीकडील वर्तमान तरी राजमंडळची फौज सात आठ हजार व तोफा यैसे येऊन ठाण्यानजीक उतरले आहेत. नित्य उठोन गोलागोली होत्ये. दररोज तोफाचा मार करिता चौहू-कडून मार्गदेखील बंद केले. सर्व प्रकारे आकर्शण केले. त्याकडील फौजा भारी आणि वरचेवर आणिखी फौज जमा करीत आहेत. आम्हाकडील फौज थोडी. ईस्वर काये परिणाम लागेल ते पाहावें. वरकड वर्तमान राजश्री नारोपंतनाना यांस लिहिले आहे. त्याजवरून कलल. येथे साहित्यपत्रे कुमकेविसी पाहिजेत, त्याची याद आलाहिदा पा। आहे. त्याप्रा। साहित्यपत्रे नानांस समजाऊन पत्र पावतांच लिहिल्याप्रमाणे राजश्री भास्कर वासुदेव व लक्षुमण माहादेव आपणा-कडे येतील त्यांचे स्वाधीन करणे म्हणजे आम्हाकडे जलद रवाना करितील. तुम्ही तेथे आहा तरी हरयेकविसी आम्हांकडील कामाकाजाविसी मा।रनिले सांग-तील त्याप्रमाणे करून देत जावे. भरोसा जाणौन लि।। आहे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Anubai requisitions help for the relief of Ichalkaranji besieged by forces of the Kolhapur Prince.*

6211

No. 322] [25-1-1777

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी
विनंती उपरी

भिकाजी नाईक कोलटकर याचें बोलण्याचा प्रकार लिा तो कळला; यैसियास त्याचे पोटाची सोय करावयाची आहे. करावी, परंतु तोतयाचें राजकारणांत पुर्ते होते, सखे बंधु तिकडे पाठविले होते.

श्रीमंत दादा मुबईत आहेत. त्यांणीं फिरंग्याकडे राजकारण केलें आहे. आंतून इंग्रजांनीं साध्य व्हावें आणि वसई घ्यावी याजप्रा निश्चये आहे: येविशीची बातमी कळल्याचा मजकूर लिा तो कळला. ऐशियास येविशीं तुम्ही राजश्री विसाजीपंतास पत्रें ल्याहावीं व राजश्री बापूस लेहून त्याजकडून पत्रें पाठऊन बंदोबस्तानें राहात असें करावें.

+रवाना छ १९ जिल्हेज हें विनंती

¶*Nana Fadnis learns from Haripant the plan of Raghoba for surprising Bassein with the help of the English and asks him to intimate it to Visaji Keshav.*

---

No. 323] [27-1-1777

श्री

राजश्री हरि बल्लाल स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. तुम्ही पुणें प्रांतांत मुक्काम केला आहे, त्यास फौजेमुळे बहुत खराबी होत्ये. दोवे कुणबी लष्करचे लोकांनीं तोडिले म्हणोन बोभाट आला आहे. यैशास तुम्ही प्रांत मजकुरांतून कूच करून पुढें फौजसुद्धा जाणे. पुणें प्रांतास उपसर्ग न लागे ते करणे. जाणिजे छ ११ जिल्हेज सुरसन सबा सबैन मया व अलफ हे विनंती

¶*Hari Ballal is asked to move his camp from the vicinity of Poona to save the ryots being molested by the army.*

+ येथून अक्षर नाना फडणिसाचें आहे.

No. 324] [January 1777

[पहिला बंद गहाळ.]

ये श्रीमंतीं येकोन तह करावा असी गोष्ट श्रीमंतांस आपण होऊन थोडीसी नेटून सांगितल्यास यैकतील; परंतु सरकारचें बोलणे वकिलासी आम्हांकडे येविसीचे मजकुराचें आगर पत्रही येत नाही, त्यापक्षीं कांहींका करीतना, आपल्यास गरज काय, असेहि दाखावितात. सारांश तहाविसीं मुंबई-कराचे नेट जाल्यावर श्रीमंत न यैक-तील आथवा कोणीकडे जातील असा पक्ष नाहीं. यास्तव हा प्रकार युक्ती-पर आसालियास तेथें वकिलासी बोल-ण्यांत येऊन त्यांचें पत्र मुंबईकरास येविसीं यावें, व आपलेकडील मुंबई-तील टोपीकरांचे रीतीस माहित वजनदार राजश्री बाजीपंत मेहेंदल्या-सारिखा आथवा दुसरा कोणी पाठवि-ल्यास युक्तविर मुंबईकर आणून तहास दिवसगत लागणार नाहीं असें वाटतें. यांतील कर्तव्य आसेल तें गुण दोष मनन करून करणें जाल्यास करावें. उगेच सुचला मजकूर लिहिला.

कलम १

तोतयाकडील च्यारपाशें लोक साष्टीतील कौल वचन देऊन आणिले त्यास भिवराव आबाचे समत घेऊन निरोप दिल्हे. श्रीमंत त्यास राहवीत होते; परंतु त्यांतील मुखमुख्य वचन कौल घ्यावयास आले ते कौल पाठऊन येथें गुंतोन पडले, त्या आर्थी सारे तिकडील लोभास न गुंततां उठोन आले. तेथील जड सोडली. घोर-पड्यां बाा हत्ती व पागेची घोडीं वगैरे तोतयासमधीचे गोसाव्याचें चेल्यानी दिकत पाडून श्रीमंताकडे नेलें, त्याजविसीं सरकारचें पत्र आम्हां-कडील गेलें आहे. काय घडेल पाहावें.

१

आम्हांस येथें राहावयाची आज्ञा त्या प्रमाणें येथें आहों. परंतु प्रयो-जन कांहीं दिसत नाहीं. आपणांस वरवर लिहून खर्चास आणून रिकामे पैका मात्र खावा. चाकरीचें फल आथवा सरकारकाम दिसत नाहीं. तथापि आज्ञेप्रमाणे आहों. स्वारी लवकर निघणार त्यापक्षीं आम्हांस आज्ञा येईल तसें करूं.

१

येकूण पांच कलमें शेवेसीं विदित होऊन तिकडील सविस्तर ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to the proposals of peace made by the Marathas to the English of Bombay. The other item mentioned herein is with regard to the men of the Pretender that were given protection at Salsette. The first sheet of the letter is missing.*

No. 325] [5-2-1777

### श्रीमंत राजश्री तात्यासाहेब[1]

रोजीं बापूजी नाईक दि॥ भावे हेहि विदा केले. बाळारायास घेऊन बेचोऱ्यांत[2] बसले. आम्ही बाहेर लागूनच बसलों होतों. बापूजी नाईक म्हणाले की, नारो सिवदेवानी काये लिहिले ? बाळाराव म्हणाले की, बापू म्हणत होते की पाटिलबावानी गडास यावें. आपला फडच्या करून कितेक कामें करणें तें करावीं. त्यांचे मुदे आसतील ते सांगावे. कोणतें करून देयाचें कोणते न देयाचें हें पाहावें. उगेच फिरतात ; इच्छा त्यांची. इतकें लिहिलें मग बापूजी नाईक बोलले की, तिसऱ्या बंदात काये लिहिलें. मग हळूच काये बोलले हें कळलें नाहीं. दुसरें म्हणाले की, वकील पुरंधरी होते ते गेले. मुमईवाल्याचा यांचा बिगाड जाला. श्रीमंत इंग्रेजास घेऊन परिस्छिन्न बाहेर निघणार. हैदर नाईकानी हे केली. बाजीपंत येसाजी सिंद्यावर गेले होते ते माघारे आले. येसाजी सिंदे फौज जमा करितात. मोगल यांचा नव्हे हे आम्हास परिस्छिन्न कळलें. सिंद्यासारका सरदार हातचा गमावला. वरसा सा महिन्यांत मुलुक किलेसुधां गेला हें बापूजी नाईक दि॥ भावे हें परिस्छिन्न जाणावें. नारो सिवदेव यानी लिहिलें की, प्रस्तुत मनसुबा काही करीत नाहींत, स्नानसंध्या करून निश्चित बसलेत. तस्मात राज्ये बुडावयाचें चिन्ह हेंच आहे. हें वर्तमान तों मोठ्यानें बोलले. मग हळूच येकांत दोन घटका होऊन विदा केले. शालजोडी पागोटे पाटीलबावानी दिल्हें, यानी निराळे दिल्हें. विदा केले. इतकियांत आंगऱ्याकडील कारकून आला. गोस्टी आणिक जाल्या. मग बोलला की, मीच मुमईस गेलों होतों. येके दिवसीं श्रीमंत व आबाजी माहादेव व मीं येैसे बसलों होतों. गोस्टी हरिपंताकडील निघाल्या की हरिपंत सरदारी लायेक आहे. च्याहता तर सुरतवाले सुधां आम्हास लुटून पस्त करून

[ अपूर्ण. ]

¶*This is only the fifth sheet of a long letter addressed to Haripant Phadke, and already printed at No. 86, Selection No. 5.*

---

[1] पे. द. नि. का. ५. ८६ चा पांचवा बंद. [2] राहुटींत !

No. 326] [18-3-1777

पो छ ९ सफर सवा फाल-
गुन मास

श्री

सेवेसी मोरो बापूजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ ८ सफरपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. सुवर्णदुर्गाहून बातमीची पत्रे आली त्यातील मजकूर

छ ३ सफरचे आली त्यातील मजकूर विलायतेस किरण करणेर इग्रेज गेला होता. तेथील पत्रे मुख्याची मुंबईस आली. भाव काही समजला नाहीं, परंतु बाहेरील तरांडे बंदरात व बंदरातील बाहेरील जाण्यायेण्याची दिकत फ़ार पडू लागली. सामान जलदीने करीत आहे. किटण मागाहून आठा दिवसी येणार याप्रो तेथील आले व बाणकोटवाल्याने सांगोन पाठविले. बाणकोटासहि सरंजाम करीत आहे. तस्मात् त्याचे मनोदयानरूप घडेल असे वाटते. बातमी पकी फुटली नाही.

मेस्त्र मोष्टीन पुण्यास वकिलीचे निमित्ये पाचसे माणोन (माणोस ?) घेऊन येणार आहे असे वर्तमान पत्रात आहे

छ ५ सफरचे पत्र आले. त्यातील मजकूर मुंबईस माहांगिरी बातमीस होती ते येके दिवसात आली. इंग्रजाकडील सात तरांडी मध्यम प्रतीची व थोर सरंजामसुधां काल प्रातःकाली हाकारून वसईचे रोखे गेली. मेस्त्र मोष्टीण सरदार वर गेला आहे. कोणे ठिकाणी गेला हे वर्तमात अद्याप नाही. तोडचे माहागिरीकराचे वर्तमान आहे. मुंबईचे बंदरांत सावकारा वगैरे चालीस पनासपर्यंत गलबते होती त्याची हावी (?) उतरोन घेतली आहेत. सुरतेहन येक पलटण नवे आणविले आहे व मुंबईत जाजती लोक सिबंदी ठेवति आहे.

सदरहू वर्तमानाची पत्रे आली त्याजवरून सेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Moro Bapuji (Phadke?) writes to Poona news from Bombay about Col. Keating returning shortly to India and about Mr. Mostyn proceeding to Poona on embassy with 500 men.*

No. 327] [6-4-1777

पो छ २७ सफर सन
सबा सबैन

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री लक्ष्मणपंत देशमुख स्वामीच सेवेसी

पो माहादाजी रामचंद्र सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ सफर मुा अमोद जाणून स्वकीय लेखन करावे विशेष. आपली आज्ञा घेऊन जंबुसरास जावयास आलों ते दरमजल सुरतेस आलों. तेथून पुढें आंकलेश्वर येथें आलों. तेथून भडोच दोन कोश आहे, तेथें इंग्रज मेस्तर गांभीर मामलेदार आहे, त्याचे स्वाधीन जंबुसरचा इंग्रज, याकरितां फर्नेल आपटेन याचें पत्र त्यांस होतें तें दिल्हे, व सुरतकरास श्रीमंताचे पत्र होते तें दिल्हे. त्यास काम जाहाले नाहीं इतकियात मुंबैहून जनराल कोर्णायेक[1] व सुरतवाला मेस्तर बाडेम[2] व रामसी[3] ऐसे तिवेजण इंग्रज मुंबैचे कोशली भडोजेस आले. त्यांकडे जाबसाल सारा कारभार इकडील करूं लागले, याकरितां त्याकडे कारकून पाठविले व पत्रेंहि पाठविलीं. तथापि तहाच्या कराराप्रमाणें काम जाहलें नाहीं. याकरितां मुजरद येविशींचे वर्तमान लिहून श्रीमंतास विनंतीपत्र पाठविलें, व आपणासहि पत्र पाठविलें होतें, व आनंदराव मुकुंद कारकून यास पाठविलें होते ते पावलेच असतील. याउपरी इकडील वर्तमान जनराल वगैरे इंग्रज भडोचेहून आमोदेस जाणार. तेथन जंबुसरास जाणार. आमोद व हासोट व देहजबारे इंग्रजास द्यावयाची नेमणूक सरकारातून जाहाली ते माहाल त्यांचे हवालीं करावयास राजश्री गणेश हरि दिा चिंतामण दीक्षित यांस सरकारची आज्ञा होती त्यामुळें तेहि अमोद येथें आज अडीच तीन महिने राहिले. त्यास तीन महाल तीन लक्ष तेहतीस हजार कमाल बेरीज जमा आहे. त्यास तीन लक्ष कमाल जमाबंदीप्रमाणे इंग्रजास माहाल द्यावे व ज्याजती ऐवज राहील तो त्याचे गाव सरकारात ठेवावे याअन्वयें यांस आज्ञा. त्याकारितां इंग्रजांसी यांचे बोलणे आजपावेतों होत आले. त्यास तीन लक्ष आज वसुली महाल नाहींत, याची कची माहितगिरी इंग्रजांस जाहाली, यामुळें ते माहाल घेईनात. वसूल आहे त्याप्रमाणें घेतों असे म्हणतात, यामुळे सरकारांत ही गोष्ट कबूल नाहीं. कमाल सालाप्रमाणें तो इंग्रजास द्यावयास अनुकूल पडेना, यामुळे आजपावेतों त्या कामाचा राडाच पडला. त्यास हालीं जनराल कर्णाइक वगैरे तिघे इंग्रज मुबैहून येख्तयारी होऊन आले आहेत. त्यांस ते इंग्रज आमोदेस

1 Gen. Carnac. 2 Boddam. 3 Ramsay.

6216

येणार. येथें आल्यावर फडशा पाडावा असे गणेश हरि याचें व त्यांचें बोलणें जाहालें. हा फडशा करून मग जंबुसरास जाणार, हे वर्तमान अगोदर आम्हास समजलें. याकरितां अमोद येथें आलो. गणेशपंताची भेट घेतली ; इतक्यांत जनराल वगैरे इंग्रज अमोदेस इकडे येणार होते ते न आले आणि परभारेंच जंबुसरास जावयास गेले. याकरितां गणेशपंती कारकून त्याकडे पाठविला, तेव्हां त्याणी सांगितले कीं तुम्ही व माहादाजी रामचंद्र ऐसे मिळोन जंबुसरास येणे. तेथें दोनहि जाबसालाचा फडशा करूं ऐसें कारकूनासमागमे सांगोन पाठविले; तेव्हां जंबुसरास जावें असा सिधांत गणेश हरि यांणी केला. आम्हासहि जावें लागलें. उभयतां मिळोन गेलों. इंग्रज सारे तेथे भेटले. प्रथम जाबसाल तीन लक्षाचे महाल त्यांस द्यावे त्याचा जाहला. त्यास वसुली ऐवज असेल त्या प्रमाणें घेऊं, कमाल बेरीज सांगतां ते आपणास कबूल नाही, याप्रमाणें त्यानीं सांगितलें. हलीं वसूल आले त्याप्रमाणें म्हटलें तर अंतर बहुत. इंग्रज म्हणतात तिन्ही माहाल सवादोन लक्षाचे. तेव्हां तो मजकूर फडशात न आला. मग-जंबुसरचा जाबसाल लागला. त्यास आम्हास पाठविलें तेव्हांचा करार जे जमाबंदी आम्ही करावी, ठाणे जकीरासुधां इंग्रजाकडे आहे ते आम्हाकडे द्यावें. वसुलाचा हवाला जर इंग्रजांनीं घेतला, तर हवाला कबज पावलियाचें लिहून घ्यावें. इंग्रजांचे बारा लक्ष रुपये सरकारांतून द्यावयाचे ठरले आहेत, त्यास जंबुसरचा ऐवज बारा लक्ष रुपये फिटत तोपावेतों वसूल त्याकडे द्यावा. मामलत अमल कारभार आम्ही करावा. ऐवज मात्र त्यांकडे देऊन, पावल्याचें कबज त्यांणीं आम्हास द्यावें, या तऱ्हेनें आमची रवानगी जाहाली. फक्त ऐवज मात्र इंग्रजाकडे वसूल जसा होईल तसा तसा देत जावा, याअन्वये करार. दुसरे तहाची तेरीख छ १० मोहरम सन सीतात तह जाला. त्या दिवसापासून आम्ही माहाली पैवस्ता होऊं तोपावेतों इंग्रजाकडे वसूल महालपैकीं घेतला असेल तो जमीदारांचे विद्यमानें रुजुवात करून त्याचेंहि कबज घ्यावें. हा पहिला करार होऊन सनद पत्र आम्हांस देऊन रवानगी पुण्याहून जाहाली. हा मजकूर आपणांस ठाऊकच आहे. त्या उपरी आम्ही इकडे आल्यावर, मागाहून दुसरा करार इंग्रजासीं जाहाला जे, जंबुसरचे ठाणें इंग्रजाकडे असावें, जमाबंदीचा ठराव आम्ही करावा वसूल घेणे तो इंग्रजांनीं घ्यावा. व जंबुसरचा इंग्रज व आम्ही मिळोन एका विचारें असावे. याअन्वयें श्रीमंताची सनद पुरंदराहून आली तेहि छ २ सफरी पावली. सारांश इंग्रजासी जंबुसरचा जाबसाल होता; ते बोलिले की ठाणे आम्हाकडे जमाबंदी आम्ही करून वसूल आपणच घेऊं. सर्व मामलत कारभार आम्हीच करूं. तुम्हास पावती, ऐवज पावेल, त्याची लिहून देऊं, यापेक्षां अधिक

नाहीं. या कामास एक कारकून छोटेखानी असला तर पुरे. तुम्ही मातबर माणूस, याकरितां कारकून ठेवावा. याप्रमाणे त्यांनीं जाबसाल केला. तेव्हां कांहींच या कामामध्यें स्वरूप राहिलें नाहीं, व सरकार कामाचेंहि नाहीं. ठाणे जमाबंदी वसूल कारभार त्याकडे, तेव्हां काय घेतलें हें आपणास कसें समजेल ? जमीदार रयत त्याच्या कबज्यांत, ते ज्याप्रमाणें बोलावयास सांगतील तसे बोलतील. अधिक बोलिल्यास पारपत्यास उसीर नाहीं असें त्याचे भय रयतेस आहे, तेव्हां आम्हास कांहीच कळणार नाहीं. याकरितां हलीं जो तह ठरला त्यास तो विरोध न यावा आणि काम सरकारचे स्वरूप राहून अमल दखल व्हावा अशा तऱ्हेनें यादी लिहून पाठविली आहे. त्या यादीप्रमाणें जर काम अमलात येईल तर सरकार-काम होईल. व त्यामध्यें इंग्रज काईल होईल असीच कलमें आहेत. त्याची यादी निराळी पाठविली आहे. ते आपण ध्यानास आणावें, म्हणजे सरकारकाम होते, व इंग्रजासी अलीकडे जो करार जाहला आहे त्यासहि विरुद्ध पडत नाहीं. ठाणें जंबुसरचे त्याकडे राहावें असा करार जाहला, त्याप्रमाणें ठाणे इंग्रजाकडे राहावें. वसूलहि त्याकडे हवाला देवावा, तोहि कराराप्रमाणें त्यांणी वसूल घ्यावा यांत गुंता नाही; परंतु जमाबंदीचा कारभार त्याकडे परिछिन नसावा. त्यामधें इंग्रज यांणी मन घातलें म्हंजे सरकारनुकसानी आहे. केवळ मी आपल्या स्वार्थाकरितां लिहितां असें नाहीं. यामध्यें आपण नीट उमजोन पाहावें. जबरदस्त इंग्र(ज) व ठाणे त्याकडे वसूल त्याकडे, जमाबंदीहि त्यांणीं करावी, असें जाहल्यास आपल्या सरकारात मग कोणताहि प्रकार राहिला नाहीं. याकरितां कांही साधकबाधक पाहून त्याणी व आम्ही कसें वर्तावें येविसीची कलमवार यादी लिहन त्याची तडजोड काढून याद लिहून पाठविली आहे, त्यास यादीप्रमाणें जर काम आम्हाकडे जाहालें तर अमल दखल होईल. जमाबंदीचा रुपया जाणार नाहीं ऐसे आहे. यामध्यें खावंदाची मर्जीस येईल तैसा बंदोवस्त करून पाठवितील. आम्हास जे सुचलें ते लिहावें म्हणून लिहिलें असे. तरी यादीची कलमें पुर्ती चितात आणून त्याप्रमाणें मुंबैकराचे पत्र व कर्नल आपटेन याचें पत्र याविसी जनराल वगैरे तिवे इंग्रेज आले आहेत यांस आले तर उतम आहे. पत्र न आले तर आमचे येणें व्यर्थ आहे. असो इश्वरइच्छा जसी असेल त्याप्रमाणें घडोन येईल. असा हिस्का पडेल हे कानीमनी नव्हतें. या कामास इंग्रजांनीं हिसका घातला आहे. पला लांबीचा, यास्तव बंदोबस्त करून सत्वर पाठवावा. येविसीं यजमान स्वामीस विनंती करून काम होई ते करावें. यादी कलमबंदीची सरकारच्या पत्रांत घालून पाठ-विली आहे. व दुसरी ते यादीची नकल करून आपणांस समजावयाविसीं आनंदराव मुकुंद कारकून यांच्या पत्रांत घालून पाठविली आहे. ते आपणास समजाऊन

माहीत करतील त्याप्रमाणे बंदोबस्त करून उत्तर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

बो।

हो। राजश्री बजाजीपंत भाऊ स्वामीस सां। नमस्कार विनंती लि।। तरी काम लौकर करून पाठवावें. राजश्री देशमुखास पत्र लि।। आहे त्यावरून ध्यानास येईल. लोभ करावा हे विनंती. हे।। राजश्री मल्हारपंत भाऊ स्वामीस सां। नमस्कार विनंती. साद्यंत वृत लि।। आहे यावरून ध्यानास येईल. सदैव पत्रीं संतोषवावें हे विनंती.

¶*Mahadaji Ramchandra informs that a difficulty has arisen over the districts to be ceded to the English in Gujarat according to the treaty. It is contended on behalf of the English that they are entitled to territories yielding a revenue of three lacs ordinarily and not assessed at their maximum value.*

---

*No. 328*] [*30-4-1777*

**श्री**

सेवेसी विज्ञापना. ता।। छ २० सफर मुकाम रेवदंडा वर्तमान येथास्थित असे विशेष. फरासिसांचे वकील हे मातबर माणूस आहेत. याणी वर्तमान स्वामीचे ऐकून बहुत संतोश जाहले आहेत. भेटी अंतीं फारच संतोष होतील. लवकर भेटी घ्यावी हें त्यांचे मानस आहे; परंतु पालख्या अद्याप आल्या नाहींत. दुसऱ्याने येथून आणीक जासूद पालख्या आणावयास पाठविल्या आहेत. पालख्या वगैरे सरंजाम दोन तीन दिवसात जमा जाला म्हणजे, कूच करऊन दरमजल येऊन येतो. घोडी उंट हती वगैरे सरंजाम लोकांचा जमा होईल त्यास खर्चाची बेगमी करून स्वामीनी पाठवावी. फरासिसाचे वकिलाचे वोझें शंभर संदुक वगैरे वोझें फार आहे. याची बेहेदी[१] झाली पाहिजे, याजमुळें दोन दिवस लागतील. फरासिसाचे वकील त्याणी आपला ठिकाणा सोडून सहा महिने तेरा दिवस आज जाहाले म्हणून सांगितले. तरांड्यातील दारू उतरून, फरासिसानी रेवदंड्याचे किल्यांत आणून ठेविली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent at Rewdanda requests him to arrange for a conveyance for the French envoy St. Lubin proceeding to Poona. He has guns and ammunition with him, adds the writer.*

---

१ तरतूद.

6219

No. 329] [May 1777

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

बाजीपंत जोशी स्वामीचे शेवेसी

पोष्य बालाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिणें विशेष. तुम्ही राजश्री चिमणाजी माहादेव याजवळ कितेक अर्थ पुढील कर्तव्याचें वगैरे सांगोन रवाना केलें, त्यास मशारनिलेनीं येऊन सविस्तर निवेदन केलें. फौजेस खर्चास नाहीं, अखेरीचे दिवस आले, फौज राहात नाहीं, शिंदे येणार तेहि येत नाहीं(त), छावणी करून परिणाम नाहीं म्हणोन, त्यास आजपर्यंत हरकसें करून दम धरून राहिला; त्याप्रमाणें पुढें महिना दोन महिने फौजसुद्धां जथ आहे तसा राखून असावें. राजश्री माहादाजी शिंदे श्रीगोंदे येथें आहेत. त्यांणीहि आपली फौज जमा केली. वैशाख शुद्ध त्रयोदशीस मजल दरमजल तुम्हांकडे येतात. तोफा त्यांच्या लिहिल्यावरून रवाना जाल्या. लौकरच येऊन पोहचतील. तूर्त चालीस हजार रुपये तुम्हाकडे रवाना केले आहेत. पुढें ऐवजाचे तर्तुदेत आहों. शिंदे यांच्या बोलण्यांत कीं करवीरकरांची मसलत पतकरली. हरकसें करून उलगड्यांत आणितों. याप्रमाणें लिहिण्यांत बोलण्यांत आहे, तेव्हां आजपर्यंत हालहवाल सोसून राहिला. थोडक्याकरितां जथ फोडल्यास शिंद्यास बोलावयास जागा होते. याजकरितां हरकसें करून राहावें. वरकड चिमणाजी माहादेव लिहितील त्याजवरून कळेल.

¶*Balaji Janardan Fadnis asks Bajipant who has been despatched against Kolhapur to pull on for some time more in spite of difficulties. He further says that Mahadji Sindia has promised to go to the help of the addressee.*

---

No. 330] [14-5-1777

पौ छ १२ राखर

सन सबा सबैन

वैशाख मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी आपाजी आठवले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ६ राखर मुकाम कवठे सातसैदाचे स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. संकाजी घोरपडे घाटगे वगैरे करवीरकर

येसाजी सिंद्यास मिळाले, याजकरितां तुम्ही फौजसुधा सध्या कर्नाटकांत न जाणें, राजश्री रामचंद्र गणेश यांस जाऊन मिळणें, म्हणौन पेशजी सरकारची आज्ञा सादर जाल्यावरून हिकडे आलों होतो. प्रस्तुत घाडगे घोरपडे वगैरे सरदार फौज त्यांजकडील उठोन आली. राहिले त्याचा बंदोबस्त करितां येईल. आत:पर विशेष फौजेचे प्रयोजन येथे नाही, याकरिता तुम्ही फौजसुद्धां राजश्री हरिपंत तात्याकडे जावे, आम्हीहि देशास सत्वरच जाऊ, म्हणौन राजश्री रामचंद्रपंत तात्या व बाजीपंत आणानी आज्ञा केल्यावरून निघोन तात्याकडे गेलो. येथे चाकरीस आस्तां वोढीमुळे पोटाची फौजेची हलाखी होतीच. हाली अखेरी आली आस्तां आणि पैसा खर्चास नाही, आणि कर्नाटकांत जाणें पडिलें याजमुळें लोकांचा गवगवा पडला, ते सविस्तर काय ल्याहावें? हरकसे करून जातों. वरकड राजश्री बाजीपंत आणा० शेवेसी लिहितील, त्याजवरून विदित होईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Apaji Athavle informs Nana Fadnis he has joined Haripant according to instructions and solicits funds to pay his troops.*

---

*No. 331*] [*9-6-1777*

पौ॥ छ ४ जोवल सन
समान सबैन जेष्ट मास

**श्री**

**श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी**

विनंती. सेवक नारायेणराव कृष्ण सां॥ नमस्कार विनंति विज्ञापना. ता॥ छ २ जमादिलावलपावेतो येथास्थित आसो विशेष. राजश्री बाबराव हरि याचे पुत्र दौलत बाबूराव किले चाकण येथे आटकेत आहेत, त्याजबराबर दाहा सिपाई देऊन हुजूर पाठवणे म्हणोन छ १९ रबिलाकरची सनद सादर जाली, त्यावरून आज्ञेप्रमाणे मा॥रनिलेस पाठविले आहे. प्रविष्ट होतील. उतर पाठविले पाहिजे, सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Daulat Bapurao confined at Chakan is sent to the Peshwa under escort.*

---

*No. 332*] [*9-7-1778*

**श्री**

**श्रीमंत राजश्री दादासाहेब**
**स्वामीचे शेवेसी**

विनंती. शेवक बाजीराव गोविंद कृ॥ सां॥ ना॥ वि॥. ता॥ छ १४ जमादिलाखर पावेतों मु॥ श्रीरंगपटण येथें सेवकाचें वर्तमान स्वामीच्या कृपावलोकनेकरून

येथास्थित असे विशेष. स्वामीकडून आज्ञापत्र येऊन तिकडील वर्तमान काहीच समजलें नाही. इकडील मजकूर तरी फालगुण वद्य पंचमीस उत्राजी नरसिंह रवाना केलें व वैशाखे पौर्णिमेस माहादजी जैना यास स्वामीकडे रवाना केलें. या उभयेतांजवल सर्व मजकूर समजाऊन सांगितला व पत्रीं लिहिला आहे तो, उभयेतां शेवेसी येऊन दाखल जाहाले असतील. सर्व अर्थ त्याणी निवेदन केलाच असेल. हालीचा मजकूर तरी नवाब आम्हांस खर्चास आजपर्यंत देत होते तें त्याणे बंद हली केलें. पावत्या व कबजें आणून देणें आणि निर्वोन जाणें येसे म्हणतात. खर्चास देत नाही तेणेकरून आम्हां उभयेतांचे विपत्य पत्रीं लिहितां येत नाही. याजवरून हें विनंतीपत्र शेवेसी लिहिलें आहे. उत्राजीपंतासमागमें यादी पाठविल्या, त्याप्रमाणें कबजें व पावत्या आम्हां उभयेतांच्या नावांच्या आल्यासिवाये येथून सुटका होत नाही. केवल प्राणावर येऊन गुदरले आहे. खर्चास देत नाही. टालाटाल करितात. आणि कबजासिवाये पावत्यासिवाये येथून मुक्तता नाही, यैसे परम संकटीं पडलों. घोडी दाण्यासिवाये खराब जाहाली. स्थीतें[१] वाचत नाही हें जाणून सेवेसी विनंतीपत्र लिहिलें आहे. त्यास उत्राजीपंताजवळील यादीप्रमाणें कबजे व पावत्या द्यावयासी आज्ञा करावी आणि मीं पुढें वर्तणूक कसी करावी ते आज्ञा पत्रीं निरोपिली पाहिजे, त्याप्रमाणें वर्तणूक करीन. याजउपरी येथे राहावयाचा अर्थ राहिला नाही. परतु कबजसिवाये व पावत्यासिवाये निरोप देत नाही यैसे साफ सांगितलें. खर्चास नाही. परम पेचीं घातलें. निदान जाणून शेवेसी विनंती लिहिली आहे. कबजें व पावत्या आल्या तर चरण दृष्टीस पडतील. नाही तरी आम्हांवर तों केवल प्राणसंकट येऊन गुदरलें आहे. याजकरितां सेवटील हे पत्रीं विनंती लिहिली आहे. येथे मानाजी सिंदे आल्यामुलें व आणखी मसलतीमुलें लहान थोर च्यार जमा केले होते त्यामुलें सवालक्ष रुपये साहुकारी कर्ज देणे आहे, त्याची पावती निरालीच नवाबाच्या नावें लेहून पाठवावया आज्ञा करावी. सोईस पाडिल्यास प्रसंगानरूप द्यावी लागल्यास देऊन मुक्त होऊन येऊ. नच देणे पडल्यास आम्हांजवल राहील ती हुजूर पाठऊ आणि कोणत्याहि मार्गे * * निर्वोन स्वामीकडे येतों. स्वाम मुंबईच्या मुकामी होते तेव्हा मसलत लौकर सिध होईल यैसा साहुकारास भरवसा होता, त्यामुले च्यार रुपये कर्ज देत होते. हालीं स्वामींचे जाणें हिंदुस्थानांत जाहाले. साहुकारास धीर पुरेनासा जाहाला, यास्तव कर्ज पैसा मिलेत नाही. सरकारातूनहि याणी खर्चास मना केले. तेणेकरून हाती व घोडीं झाडून खराबीत आलीं. माणसास अन्न चहू रोजां येक वेल संकटें करून कोणास मिलते कोणास नाही याप्रमाणें जाहालें

१ आब्रू, आब, प्रतिष्ठा,

6222

आहे. साहुकार तिकडील मसलत सिद्ध होईल म्हणोन आजपर्यंत धीर धरून राहिले होते. हाली त्यांच्या समजणियांत आलें, जे तूर्त मसलत लांबली त्यामुळें रोज सावकार दारीं येऊन बसतात. त्याणी धीर सोडिला आहे. रोज धरणें-पारणें सावकीराचे होते व पुढें पैसा मिलत नाहीं. सर्व स्वामीच्या भरवसियावरी येथें ठाकुरकी[1] होती. स्वामीची मसलत सिधीस जाईल याजमुळें नवाबानीच थोडें बहुत जे खर्चास दिल्हे तितकेंच घेतलें आणि सावकारी कर्ज घेऊन च्यार लोक नामी देसीहून आले ते पदरी बालगिले जे, लाख दोन लाग रुपये कर्ज जाहालें तरी स्वामीजवल येतांच परिहार होईल हा पूर्ण भरवसा होता, याजमुले च्यार माणूस नामी बालगलें. नवाबानी जें संतोषें खर्चास दिल्हें तेंच घेऊन च्यार रुपये कर्ज करून राहिलों. तिकडील मजकूर येकप्रकार[2] जाहाला व नवाबहि खर्चास देत होते तें टालाटाल करूं लागले. साहुकारी अडचण. चहूंकडून संकटें येकदाच प्राप्त जाहाली आहेत. परम संकटांत जाणून शेवेसी विनंति लिहिली आहे. तरी पावत्यां व पांच लक्षाचें कबज मानाजी सिंद्याच्या नावांचें व साहुकारी कर्ज सवालक्ष जाहाले आहे त्याजविसी नवाबास येक पत्र जे, 'सावकाराचे कर्ज बाजीराव याणी सवालक्ष रुपये तेथील सावकारांचे देणे आहेत, त्याचा हवाला तुम्ही घेऊन मारनुले यास निरोप देऊन पाठवावें. सावकाराचा यैवज तुम्ही द्याल तो अमचे सरकारातून मजुरा आहे, हे पत्र पावतीदाखल आहे, म्हणून पत्र लेहून पाठवावयासी आज्ञापिलें पाहिजे. नवाबानी मागेंच निरोप आम्हास दिल्हा असता, तरी कर्जहि बाहेरमार्गीं फेडून स्वामीजवल येऊन पोहचलों आसतो. पूर्वीं निरोपाविसी बहुतप्रकारें निकड करून बोलत गेलों, परंतु निरोप देईनात. याजमुलें संकटी पडलो आहे. यास्तव विनंतीपत्र लिहिले आहे. याजप्रमाणें पावत्या व कबजें पांचलक्षाचें व साहुकारी देणे सवालाख आहे त्याविसीचे पत्र पावतीदाखल यैसी द्यावयासी आज्ञा करावी. येथून निरोप घेऊन मार्गी (ये)तांच फेडून सेवेसी येऊन पोंहचतों. येथील कचे वर्तमान रामजी हुजरे शेवेसी निवेदन करील * सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

*¶Bajirao Govind Barve writes to Raghunathrao from Seringapatam of the hard straits to which he, Manaji Fakde and their followers were reduced on account of lack of funds, as Haider not only stopped advancing them any money but asked for Dada's guarantee for the amounts already advanced. The writer laments the suspicions entertained by Haidar since Raghoba's flight to the North and asks for more remittances.*

---

१ आब, प्रतिष्ठा, पत, २ सलताच, अनपेक्षित.

No. 333] [5-8-1777

श्री

राजश्री[1] गणेशपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पुरवणीपत्रीं बाजत बरसात मसलतीचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. तूर्त राजश्री विसाजी आपाजी उज्यनीकडून बऱ्हाणपुराकडे येतील. त्याणी फौजसुधां कोंडाईबारीकडे यावे. ते व आम्ही एकत्र व्हावें; दुसरे राजश्री खंडेराव त्रिंबक व खंडेराव पवार व कृष्णाजी जिवाजी पवार या तीही पथकानी कोंडाईबारीवर यावे. याखेरीज रामचंद्र पवार व नारोशंकराचे पथक यास आज्ञा व्हावी. आ(ण)खी या प्रांतीची सरंजामी पथकें असतील त्यांनीं तमाम कोंडाईबारीवर जमा व्हावें. म्हणजे पंधरा हजार फौज इकडून व दुसरी पंधरा हजार हुजरात तिकडून याप्रो येलगार करावा, आणि इंग्रज बुडवावा. राजश्री परशरामभाऊ कर्नाटक प्रांती आहेत. तसेच त्यानीं त्या तोंडावर असावें म्हणोन विस्तारे लिहिले ते सर्व कलले. मनसब्याचा मजकूर लिहिला हा चांगलाच आहे. येथेहि त्याचअन्वये तर्तूद होत आहे. रा। छ १ रजब हे विनंती.

¶*Nana Fadnis approves of the proposals of Ganeshpant Behere for posting the army at various centres against the English.*

---

No. 334] [15-9-1777

पौ छ १२ साबान भाद्रपद

मास मुा वोलवण ताा नाणेमावल.

श्री

राजश्री भिवराव येशवत गोसावी यांसी

सुाा सबा सबैन मया व अलफ. तुम्हीं विनंतीपत्रे छ ४ साबानची छ ९ मिाची पाठविली ती प्रविष्ट होऊन लिहिला मजकूर विदित जाहाला. तोतयाकडील बातमी लिहिली ती कलली. धोंडजी सिंदे व आनंदराव गोपाल आले नाहीत म्हणौन लिहिले ते कलले. त्यास उभयेतास ताकीद बरेवजेने जाली. जलद येऊन पोहचतात. मुसा नारंजहि येत आहे. वरकड फौजास ताकीद जलदीच्या होत आहेत, येतील. सिंदे होलकर याजकडील फौजा निघाल्या. दरमजल येतात. राजश्री विसाजी केशव याजकडील लोकांचा जथ पाडवणे.

---

१ गणेश विश्वनाथ बेहेरे ह्यास हें पत्र नाना फडणिसाचें आहे.

याउपरी जथाची निकड करणें. बातमी राखोन लिहीत जाणे. खर्चाची बेगमी व्हावी म्हणौन लिा. त्यास त्याची तर्तूद होत आहे. लौकरच ऐवज येईल. विसापुराहून सिसे व गोळे देविले आहेत. त्याविसी किलेकरी यानी तपसील लिा म्हणून लिा. त्याजवरून किलेकरी यांस ताकीदपत्र दिल्हे आहे. सामान देतील. जाणिजे छ ८ साबान.

¶*Bhivrao Yeshwant is informed of some contingents being despatched to him, so also money and ammunition.*

---

*No. 335*] [*21-10-1777*

श्री

श्रीमोरया+

पूर्वीचा संप्रदाय आपणांस विदितच आहे विशेष. येथील वर्तमान आश्विन बहुल पंचमी भौमवासरपर्यंत यथास्थित असे. स्वकीयानंद वर्तमान लेखन करून तोषवीत असिलें पाहिजे. यानंतर आपणांकडोन पत्र आलें तें प्रविष्ट जालें. "वेदमूर्ति राजश्री सदाशिव भट सिंत्रे यांस तोतयाचा संसर्ग जाला, यास्तव त्यांजला दोषानरूप प्रायश्चित च्यांद्रायणें चार येकूण प्राज्यापत्य बतीस तीळ होम ब्राह्मणद्वारा व दोनशत ब्राह्मण संतर्पण व मुंडणपूर्वक उतरांग करऊन प्रायश्चित जाल्याचें उत्तरलेखन करावे" म्हणोन लेखन केलें, त्यावरून लेखन केल्यान्वयें च्यार प्राज्यापत्य तीळहोम ब्राह्मणद्वारा व ब्राह्मणसंतर्पण व मुंडणपूर्वक उतरांग विधियुक्त यथाशास्त्रशिष्टविद्वज्जनब्राह्मणांच्या विद्यमानें श्रीसान्निध्य वेदमूर्तिपासून करविलें. वेदमूर्ति राजश्री बापुभट सिंत्रे आपणांकडे पाठविले आहेत. सविस्तर निवेदन करतील. पूर्ववतप्रमाणें यांजवर ममता केली पाहिजे. विशेष काय लिहिणें.

¶*The Dev of Chinchvad sends back Sadashivbhat Shintre after making him undergo the penance for having joined the Pretender of Bhausaheb.*

---

*No. 336*] [*23-12-1777?*

श्री

राजश्री तात्या स्वामीचे सेवेसी

साष्टांग नमस्कार विनंती. तागायत छ २२ जिल्काद येथास्थित आसे विशेष. राजश्री विसाजीपंत बापू व नरसिंगराव याचें पतक पाठवावें म्हणून सरकारचें पत्र पाठविलें त्यास आज्ञेप्रमाणें सिद्ध आहेत; परंतु इकडे प्रयोजन नाहीं; त्यापक्षीं

---

+ एवढीं अक्षरें बाळबोध आहेत.

बंदोबस्त सरसुभियाकडून करवावा. अगर कोणी शहाणा माहितगार कोणी पाठऊन नाजूक जागे आहेत त्याचा बंदोबस्त व सें पनास गाडदी लोक ठेवणें तेथें ठेवावे. सारी फौज वर न्यावी; दोन तीन हजार फौज संरजामी आगर कोणती ठेवणें ती वाटमाथां ठेवावी म्हणजे फौजेचा दवा राहातो. येकाणी येकाणी फौज न्यावी येथेहि खर्च ठेवावा हें ठीक दिसत नाहीं. मला सुचला मजकूर लिहिला, याचा पुर्ता विचार करून लिहिणें तें लिहावें. बापू सिद्ध आहेत, येतील, पत्राचें उत्तर तिसरे दिवशीं यावें. ज्याअर्थी दादासाहेब मुंबईस, त्याअर्थी फौजेचें प्रयोजन नाहीं. न कले प्रसंग कैसा पडतो, ज्या आर्थी फौज ठेवणें ती हे तोंडवाटावर ठेवावी म्हणजे मुलकाची वसात होईल. इकडील रयतेने फौजेची दहशत भारी घेतली आहे. सर्व अर्थ ध्यानांत आणून काय लिहिणें ते लिहावें. चाकरीस सिद्ध आहे, परंतु उपयोग गैरउपयोग ध्यानांत आणून जें करणें तें करावें. मुबईकराचें ठीकसें नसलिया च्यार दिवस साराच जमाव असावा हें खरें आहे. इभ्रत आहे ती सोडूं नये, सर्व अर्थ ध्यानांत आणून लिहावें त्याप्रमाणें करूं. बहुत काय लिहिणें कृपा असावी हे विनंती. सांप्रत मनसबा काय? आपण कधीं निघणार हें कांहीच आपण लिहीत नाहीं. उपयोगाचीं पतकें जवल न्यावीं. मी खर्च खात पोटास नाहीं, उपयोग नाहीं. उष्णकालीं माश्याही फार होतील. उगेच बसावें ही मर्जी दिसती. उपयोग आसलिया सरकारचाकरी आहे. जास्त गुंता नाहीं; नाहीं त्यापक्षीं त्या पावसाल्यांत निघालों तो दुसरा पावसाल्याची हाद पोहचे तो येथें न ठेवावे. दादाचे ससेटून घ्यावें, किंवा मुबईकराचें पुर्तें मेलवावें हें बरें दिसतें. हे अभिमानास फार आहेत. तिकडील गृहस्ताचे गुढगे फार. उश्यासी कटकट असा प्रकार दिसण्यांत दिसते; याचेवरचे दुसरे ठिकाणीं जातील तर बरें आहे. सर्व आपले चित्तांत येत असेल. सुचलें ते लिहिलें आहे हे विनंती.

¶*Haripant Phadke is advised to effect a reconciliation with the English and Raghoba as the safest course out of the present impasse.*

---

*No. 337*] [*1778?*

**श्रीगणपति**

पुा राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री नरसिंगराव धायगुडे याजकडील तीन गावची पुन्हा जफ्ती जाली म्हणौन आपणास पत्र लिहिल्यास आपण विस्तार पत्री फारच लिहिला. यैसियास ते सर्व प्रकारे आपराधी, त्याच्या आपराधास उपमा नाहीच. परंतु आम्ही आपल्या हवाली करून घेतल्यावर गावची रदबदली करून मोकलीक

6226

करून घेतल्यावर आमचे हवाली आसतां फिरोन जफ्ती जाहाली येणेकरून लौकीक वाईट. याजकरिता तिही गावची मोकलीक करून मोकलचिठ्या आम्हाकडे पाठवाव्या. नरसिंगराव आदीकरून वि[१]रकोल आपराधी बहुतच होते. आतां मोठ्या आपराधापुढें याजकडेच केवळ शब्द लावावासा नाही. सर्व आपल्या ध्यानात आहे. परंतु मागें राज्यांत चाकऱ्या करून इनामे मेळविली, मुलाबालास कामास येतील, ती तूर्तच नाही आसे होते, यास्तव विनंती ल्याहावी. नाही तर आपराधी यांजविसी नच ल्याहावें आसेच त्यांचे आपराधहि आहेत. आपण थोर आहेत, कृपा करावीच. बहुत काये लिहिणे कृपा निरंतर आसावी हे विनती.

¶*Nana Fadnis is requested by Parashram Bhau to release the villages of Narsingrao Dhaygude, confiscated for his support to the pretender's rising.*

---

*No. 338*] [*10-1-1778*

पौ छ २२ जिल्हेज
समान सबैन पौष मास.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी विनंती. सेवक धोंडो माहदेव सां नमस्कार विज्ञापना. ताा छ १० जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की, येशवंतराव म्हसके यास किले त्रिंबक येथे आटकेस ठेवावयास पायात बेडीसुधां गाडदी दिमत सैद अमद याजबरोबर पाठविले असेत. तरी यास किले त्रिंबकीं पक्या बंदोबस्ताने बेडीसुधा आटकेस ठेऊन पोटास सेर देत जाणे म्हणौन आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणे येशवंतराव म्हसके यास किले मजकुरी पक्या बंदोबस्ताने अटकेस पायात बेडीसुधा ठेऊन पोटास सेर देतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Mahadeo writes to the Peshwa that, as instructed, Yeshwantrao Mhaske will be kept in confinement at the fort of Trimbak.*

---

*No. 339*] [*15-1-1778?*

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. "होळकराकडील हिसेब निवडून नवलक्ष येकतीस हजार रुो ठरावात आले. काही मुदत मागतील ऐसे आहे. होळकरास किला व जाहागीर

---

१ येथून परशरामभाऊचें अक्षर.

देणे त्याचा निश्चयें जाला पाहिजे व किले सिहगड येथील बोलण्याप्रो निभावल्या-वर खटे राहाणार नाही" म्हणोन लिा ते कलले. ऐसियास ऐवजाचा ठराव केलात, उतम केलत. ऐवजाच्या मुदती लाब लाऊ नयेत. जवलच्या लावाव्या म्हणजे फार उपयोगी पडतील. किला व जागीर देणे तो कराराप्रमाणे द्यावयाचा आहेच. किला मोल्हेर तालुक्या पो व जागीर हिंदुस्थानात द्यावयाची. त्यास किल्यास गेल्यावर त्याची योजणूक करून देविली जाईल. तुम्ही त्याचे समाधान करून किल्यास रवाना करावे. त्याचे समाधान करून रवानगी केली जाईल. त्यानी सिहीगडाचा करार त्यानी केला त्याजप्रा निभावला जाईल, मग त्यानी वाकडे का मानावे? [१]सिंद्याचे पत्र नारो शंकर त्याकडील आहेत त्यास आले. ते त्याणी येथे पाहावयास पाठविलें. त्यांत लिहिलें आहे की "आम्ही तोतयास मारले, ब्राह्मण होते त्यासहि बिड्या घालून किल्यावर पाठविले आणि होलकरानी हारामखोरास वचनें देऊन वाचविले. तेव्हा आम्ही वाईट केले हा लौकीक व होलकरानी बरे केले असा जाहाला. पुढे सिवाजीपंत व धोंडोपंत होलकर सोडविणार. असें जालें तर उभयतां कारभाऱ्याची भेट फिरोन होणार नाही," असे फारच विस्तारें लिहिलें आहे. होलकराकडील फडशा लौकर करून पैका येई तें करावे. रा छ १९ जिल्हेज हे विनंती.

¶*Nana Fadnis approves of the settlement of the account of dues from Holkar made by Haripant Phadke. He also communicates to him Sindia's wrath at the lenient attitude taken up by Holkar towards the supporters of the Pretender whom he had seized.*

---

*No. 340*] [*25-1-1778*]

पौ ७ मोहरम समान
हस्ते सांडणीस्वार.

**श्री**

सेवेसीं विज्ञापना तागायत छ २९ जिल्हेज वर्तमान येथास्थित असे विशेष-लोकांस गांव द्यावयाचा करार केला.

१ सेलगांव मानाजी सिंदे यांजकडे होते ते दारकोजी निंबालकर याजकडे बदल मुा.

१ रावोपंत आइतोले यांस गांव मानसिंग मान्याचा दिला.

---

१ पत्र नाना फडणविसाचें असून यापुढील मजकूर खुद्द त्यांच्या हातचा आहे.

१ फकीरजी फडतरे यांस पागेकडे मानाजी सिंद्याचे पागेचा गांव.

१ .बाबूराव पाटणकर यांस यशवंतराव मान्याचा गांव देतो.

—

येणेप्रमाणें सनदा करून देतो. स्वामींनी चालवावयास आज्ञा करावी. गांव जप्त करावे, परंतु ज्यास कबूल केलें आहे त्यास द्यावे लागतील. विनंति लिहून पाठवीत असें. विनंतिपत्र पूर्वी लिहिलें आहे जे उपयोगी त्यास देऊन चालविलेंच पाहिजे. हरामखोरी केली त्याचें काढिलें, उपयोगी त्यास दिल्हें. दुसरें फकीरजी फडतरे यांस पाचशांचा गांव इना(म) स्वामीचे आज्ञेवरून दिला तो चालत नाहीं येविसीं विनंतिपत्र लिहिलें, परंतु चालत नाहीं. त्यास फकीरजी-बावा सारखा माणूस स्वामिकार्यास येकनिष्ठ, मामाची लढाई पंढरपुरावर बिघडली ते समईं फकीरजी फडतरे नीलकंठराव थोरात तोंडास उभे राहून झुजले, म्हणून आम्हीं पळणार वाचलों. फकीरजी फडतरे यास गांव अधिक नाहीं. यांचे जोडीचा सालसूद मिळणार नाहीं. या उपरी तरी कृपा करून गांव चालता केला पाहिजे. सटवोजी गावडे यास गांव देऊं केला आहे तो निश्चयांत आल्यावर लेहून पाठवीन. पत्राचे उत्तराची आज्ञा केली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. अशा वोढी ताणीचे दिवसांत सालसूदपणें वर्ततात त्यांचा परामर्ष स्वामी खेरीज कोण करणार ? हे विज्ञापना.

¶*The letter refers to the grant of some villages as inams to Manaji Sindia, Aitole and Fadtare, the last having played a heroic part in the battle of Kasegaon.*

---

*No. 341*] [*6-6-1778 ?*

**श्रीहेरंब**

**श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे सेवेसी**

विनंती. सेवक आबाजी महादेव सोवनी साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १० माहे जमादिलोवल जाणोन सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों ते श्रीमंत महाराज राजश्री दादासाहेबाचे चरणापासीं सुखरूप पावलों. महाराजांचे आज्ञेप्रमाणे राजश्री हरिपंततात्याहीं सेवकास रोजमरा दिल्हा. आपले आज्ञेप्रमाणें येथें आहे. विदित जालें पाहिजे. मी सेवक हा प्रकार तरी उघडाच आहे; परंतु केवळ पदरचा कुटुंबांतर्गत जाणोन माझा सांभाळ करणार महाराज समर्थ आहेत. विशेष काय लिहूं हे विज्ञप्ति.

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी, साष्टांग नमस्कार विनंती. लिा परिसोन सेवकाचा सांभाळ करीत जावा. पदरचा असे हे विनंती.

¶*Abaji Mahadev informs Moroba Dada of having reached the camp of Dadasaheb.*

---

*No. 342]* *[26-10-1776*

पो छ १३ रमजान

आस्विन मास

**श्री**

**राजश्री भिमराव स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. राजश्री माहादाजी सिंदे याची (तु)मची भेट जाली म्हणौन कळले. उत्तम जाले. तेथील बातमीचे वगैरे अर्थ पाटीलबावास तुम्ही सांगितलेच असतील. अशांत त्यासी बोलून कोकणात कोणी उतरावयाचा तो विचार करून लौकर उतरावे. पाटीलबावा उतरत असिले तर उतम, अथवा तुम्हांस सागितले तर तुम्ही उतरावे. ते वरते राहातील. तुम्हाजवळ पहिले सामान आहेच. त्याहून अणखी पाहिजे असिल्यास फौज मागोन घ्यावी. तोतयाजवळ च्यार पांच हजार माणूस आहे. अधिक (ना)हीं. त्यापक्षीं दोहीकडे जाल्यास चिता नाही. त्वरा केलियाने काम व्हावे असेच आहे. याकरितां लिहिले अर्थ त्यासी बोलून त्यांच्या तुमच्या विचारे होईल तसे करावे. कोकणांतील बंदी लौकर जालियाने कामच होते. धान्य वरते गेलियावर दिवसगतीवर पडेल. असा समय पुढे येणार नाही. रा छ १२ रमजान हे विनंती.

¶*Nana Fadnis writes to Bhivrao, discussing the proposals regarding the campaign against the Pretender.*

---

*No. 343]* *[4-12-1774?*

**श्री**

**राजश्री माधवराव सुभेदार**

**जंजिरे अरनाळा गोसांवी यांसी**

ᔕ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित बच्याजी बामन फडके रामराम विनंती. येथील कुशल तागाईत छ २९ रमजानपावेतों सुखरूप असों

---

+ पत्र नाना फडणविसाचें.

विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालों तों सा घटका रात्रीस पावलों. पाऊस पडोन हलाखी फार केली. कळावें. आजच बातमी आली कीं येणेप्रमाणें कलमें.

कोळी याणें दोन किल्ले घेतले त्यांची नावनिशी. मंदवारी घेतले किल्ले २

१ किल्ले जाग (?)
१ किल्ले मदगड

कलम १

२

मोकाशी गारावे (?) आपण सांगितलें, त्यास राजश्री येसाजीपंत तात्याचे कानावर घातलें. त्यास आपण सांगितलें त्याप्रमाणेंच सांगितलें. त्यास उत्तर केलें कीं गणपतराव यासी ताकीद करितों. त्यास त्या गावचें नांव व मोकाशी कोण त्याचें नांव लिहून पाठवावें. आपण लिहून दिल्हें होतें तें पावसानें भिजलें, याजकरितां लिहून पाठवावें. १

सोटेयाचे हटकिले, त्यास देतो म्हणोन बोलिले आहेत, मागाहून सनद घेऊन पाठवितों. कलम १

श्रीमंत दादासाहेब तापी उतरून पुणियासी येतात; याजकरितां पंधरावें दिवशीं राजश्री भिकाजीराव यांसी पाठवावयाचें करावें, प्रस्तुत न पाठवावें. १

श्रीमंत राजश्री सखाराम बापू यांसीं फार बरें वाटत नाहीं, याप्रमाणें वर्तमान कागदीं पत्रीं आलें. आपणांस कळावें.

कलम
१

आपण दोन गलबतें धरून आणिलीं, त्यांचीं पत्रें आज येथें आलीं. वेगळे हुजुरेहि आले कीं गलबतें इंग्रजांचीं सोडावीं. माल सुद्धां सोडावीं याप्रमाणें हुजूरचें पत्र आलें आहे, तेंहि आपणांकडेस हुजुरे घेऊन येतील. याजकरितां मालांची उतावली करावयाची नाहीं. इंग्रजांचा तह होतो याजकरितां आपणांस लिहिलें असे. १

राजश्री वेंकाजीराव सुर्वे यांसी पुणियासी न पाठवावें. वैकट(?)मात्र पाठवावी. मशारनिलेस न पाठवावे. मागाहून लिहून पो॰ —— कलम
१

गलबताचें रामप्रसाद याचे कानावर घातलें. त्यास उत्तर केलें कीं खासा बाहेर जाऊं नये. गलबत सोय पाहून आठांदिवशीं देतों; व अरमार, गुराबा व गलबते वसईपैकी आहेत

गलबत चोसरी तरती केली, कोठी उजरी केली, परंतु दोन गावडी पडली याजकरितां कांठी उतरली. गाबडी जाहाली म्हणजे तर मागती उजरी करितों. आज्ञा प्रमाणें दर्यावर्दी व सिपाई चढवितों. कलम १

आडेशेरी लोकांस पाहिजे त्याचे विचारिले ; त्यास साबानपैकी भात आणवावें. त्यास मागाहून जाबसाल घेऊन पाठवितों. कलम १

तींहि देतों. याप्रमाणें बोलले आहेत. जाब घेऊन पाठवितों. १

गला गणेश हुजरा (?) येतो कळावें. भात विकिलें म्हणोन येसाजीपंत पुसत होते. लागला नाही. (?) १

*¶Bachaji Vaman Phadke writes to Madhavrao, Subhedar of Arnala, some news of his place—particularly the capture of two forts by the Kolis, the rumour of Bapu's illness, the capture of two English vessels and of Dadasaheb proceeding to Poona etc.*

---

*No. 344*] [*6-11-1778*

**श्रीगजानन**

**श्रीमंत राजश्री तात्यासाहेब**

**स्वामींचे सेवेसी**

आज्ञांकित सेवक विठल सामराज चेरनावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. ता छ १६ सवालपरियंत मुा महेश्वर येथे वर्तमान येथास्थित आसे विसेष. इकडील वर्तमान पेशजी श्रीमंतास विनतीपत्री लिहिले आहे. सांप्रत श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेसच आहे. खानदेशातील तर सुलतानपुरीहून चेंदरराव पवार दसऱ्याचे दिवसीं निघून गेला. सुलतानपुरांत होळकराचे ठाणे बसले. होळकराची फौज हाजार आठसे जमली आहे. ते रा गणेशपंत बेहरे यांस जाऊन सामील होणार. ते ते मिलून नंदुरबारेस जाणार. येथे राजश्री बाळाराव गोविंद आहेत. त्यानी बाईसी बोलू(न) रा पाटीलबावास पत्रे व कारकूण पाठविले आहेत. तेथून उतर आलियावर काये ठरेल तें लिहून पाठवीन. मीहि काल बालारायास भेटायास बाईस पुसोन गेलों होतो. भेट जाली. कितीक मजकूर ते बोलिले ते श्रीमंताच्या विनंतीपत्री लिहिला आहे. रा चिंतो विठल पाटीलबावाजवलून निघून गेले होते, ते फिरून उजेनीतच कोनी

ब्राम्हणाचे वरीं सांपडले. त्यास व आणीख तिघेजन पेशजी पत्रीं लिहिले आहेत ते येकूण चौघाजनास पुण्यास पाठवणार. बालारावहि ल(व)करीच येथून उजेनीस जानार. वरकड वर्तमान पेशजी पत्रीं लिहिले आहे. सेवकाची खर्चाची फार विपते आहे. वारंवार लिहितो म्हणून स्वाम रागास येतील. मी तरी स्वामीसिवाये कोणास ल्याहावे? हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Samraj writes to Haripant news about Raghunathrao being at Surat, Holkar capturing Sultanpur and Balarao Govind sending communications to Mahadji Sindia about concentration of troops.*

---

*No. 345*] [*Dec. 1778*

**श्री**

दंडवत विनंती उपरी. आपली चिठी प्रविष्ठ जाली. इंग्रेज पंनवेली अलीकडे आहे. च्यार घटिका रात्रीस उदईक स्वारी निघावी म्हणौन लिा. ऐसियास आपल्या लिहिल्याप्रमाणे तयारी आसे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The English have left Panwel and are advancing, reports the letter.*

---

*No. 346*] [*11-12-1778*

**श्री**

**श्रीमत राजश्री तात्या**

**स्वामीचे शेवेसी**

पो विसाजी आपाजी सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २१ जिलकाद मुकाम नजीक बेलापूर सुखरूप असे विशेष. हिकडील वर्तमान यैकण्यात आढलात येते ते वरचेवर डांकेबराबर व मुजरत लिहून जाते, त्याचे उतर काहीच येत नाही. त्याजवरून पत्रे पावतात न पावतात याचा संदेह पडून हाली सविस्तर लिहिले आहे.

श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईत आहेत. तहाचे बोलणे बाबूराव काणे याचे विद्यमाने होत आहे. त्यांतील मजकूर आपणाकडे लिहून जात आसेल तो खरा. परतु मारनिलेची पत्रे येथे येतात त्यातील व

वसईचे किल्यांत राजश्री विसाजीपंत सरसुभेदार यांजकडील येसोबा चांगला माणूस आहे, परंतु उभय पक्षीं वैमनस्य पडून संशय वाटला आहे. आपलाले हुशारीविसीं उभयता सावध आहेत. विश्वास परसपरे नाही, असें

6233

ठिकाणची बारीक शोधा पाहातां हैदरखान, गोवेकर फिरंगी व हिकडे राजकारणांचे घाट घाटींतच आहेत. त्यातील बलकटी होये तों हिकडे तहाचे बोलणे लाऊन दीर्घसूत्रावर घालोन बनल्यास मसलत बसवावी. काहीच न बनल्यास तहाचा मजकूर प्राप्तच आहे. किटणास विलायतीस पा आहेच. तो येई तों मुंबईकर बाह्यात्कारे निस्पृत्व दाखऊन आपण होऊन आपले आश्रयास आला तो परसपरे आपण होऊन समजोन तह करून गेल्यास संतोष. तह न करी तर बलात्कार नाही. कोणीकडे जल-मार्गे खुषकीनें जाऊ लागल्यास मना नाही. यथाशक्ती पोंहचऊन द्यावे असाहि प्रकार दिस्तो. कदाचित राज्यांतील फितूर मोडून सरकारचे कलमाचे आन्व बीज वाढत आहे. शत्रूची संधी समीप. स्थल नामी. यास्तव येविसीची सावधता कर्तव्य आसेल ती करावी. यैकिला मार लिहिला आहे, परंतु खरा आहे. राजश्री भिवराव आबास सांगितला आहे व त्यास समजला आहे. त्याणीहि लिहिलेच आसल व येथे विसाजीपंत सुभेदारासहि त्याणीं सांगितले लिहिले आहे. काय घडेल पाहावे. कलम

१

राजश्री भिंवराव आबा येथे आले. लोभ कर्तात. प्रस्तुत ते मी येथेच आहों. हिकडील सदरहू लिहिल्या कलमाचा मजकूर त्यासहि सांगितला व समजला त्याणी लिहिलेच आसेल.

१

(अपूर्ण)

*¶Visaji Apaji writes to Haripant Tatya about Raghunathrao carrying peace negotiations with the Poona Government and at the same time intriguing against them with the Portuguese and Haidar. The writer also mentions the differences that had arisen between Visaji Keshav of Bassein and Yesoba who was formerly a very trusted man of his.*

---

*No. 347]* *[19.12-1778*

**श्री**

राजश्री भिवराव स्वामीचे शेवेसी[१]

विनंती उपर. आलीकडे दोन दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर मुकाम कोठे आहे, पुढील बातमीचें वर्तमान काय हे लिहून पाठवावे. लोहगडची बातमी काल आली की, श्रीमंत खोपवलीस आलें. सरंजाम लोक सांगतात इतका

१ सर्व पत्र नाना फडणविसाचे हातचें.

नाही. राजश्री बाळकृष्णपंतासहि लोहगडास लिहून पाठविले की, वर्तमान येईल ते तुम्हाकडे लिहून पाठवीत जावें. हुजूरचे गाडदीहि रवाना केले, पावलेच असतील. मुसा नारंजाचीहि रवानगी करतो. कापडहि थोडे बहुत तुम्हाकडे रवाना करविले. लौकरच पावेल. सिंद्यानी अलंदीहून कूच करून भोसरीवर मुकाम केला. होळकरहि आज कूच करून तेथेच गेले. उदईक आम्ही कूच करून तेथे जावें असा विचार आहे. तुम्ही पत्र पाठविलें ते पावलें व यादहि पावली. अमवास्या गेली, अतां चिंता नाही. रा। छ २९ जिलकाद हे विनंती.

¶*Nana Fadnis sends to Bhivrao Yeshwant, Gardis, Monsieur Noronha and also Sindia and Holkar.*

---

*No. 348*] [*20-12-1778*

पौ। छ ६ जिल्हेज तिसा

सबैन पौष मास.

**श्री**

राजश्री भिवराव येशवंत स्वामी

गोसावी यांसी

विनंती उपरी. हुजूर गाडदी दिमत हाय यांस तुम्हांकडे रा। केले आहेत. आ।

८६ दि। सेखलाल

५० दि। उमर चाहूस

५२ दि। इसफबेग

१९ दि। हाजी हुसेन

१२ दि। इमामखान

२८ दि। दरवेस ममद

११ दि। मोहिदीखान

६९ दिमत बाहादरजंग

२७ दि। नूरखान

१ विसाजी माहादेव कारकून कामकाजास

---

३४७

येकून तीनसे सत्येचाळीस आसामी पा। आहेत. याची हाजिरी घेऊन चाकरी घेत जाणे व यास दारूगोली लागल्यास पाहून देणे. जाणिजे[1] छ ३० जिलकाद सु॥ तिसा सबैन मया व अलफ हे[2] विनंती.

¶*This is a list of Gardis ordered to join Bhivrao Yeshwant.*

---

१ तेरीख नाना फडणविसाच्या हातची. २ यांपुढील मजकूर बापूच्या हातचा.

No. 349] [22-12-1778

पौ। छ ३ जिल्हेज तिसा पौष

श्री

राजश्री भिवराव येशवंत स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी तुम्ही पत्रें पाठविलीं तीं पावलीं. भोमवारी तलाव्यास[१] जाऊं म्हणौन लि॥ ते कळलें, व खर्चास छ १ जिल्हेजचे आठवड्याकरिता ऐवज पाठवावा म्हणौन लि॥ ते कळलें. त्यास फौजेचे आठवड्याचा आकार किती होतो ते तपसीलवार लेहून पाठवणें त्याप्रमाणे ऐवज रवाना होईल. कोंकणातील बातमीचा मजकूर व फौज कोंकणात रवाना व्हावी येविसीचा मजकूर[२] लिहिला तो कळला. त्यास फौज रवाना व्हावयाची तर्तूद होत आहे. जाणिजे छ २ जिल्हेज सु॥ तिसा सबैन मया व अलफ.

¶*Nana Fadnis asks from Bhivrao Panse weekly estimates of expenses of the troops under him.*

---

No. 350] [23-12-1778

पौ। छ ३ जिल्हेज तिसा सबैन

श्री

राजश्री बाजीपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविलें ते व बातमीचें पत्र कोंकणातून तुमचे कारकुनाचे आलें ते, ऐसीं पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळला. कोंकणांत फौज लौकर रवाना व्हावी येविसी लि॥ ते कळलें. त्यास फौज रवाना व्हावयाची तर्तूद होत आहे. राजश्री नागो राम तल्यानजीक आहेत, त्यासहि जांबुलपाड्याकडे लोक आले आहेत त्याचे पारिपत्याविसी लिहिलें गेलें आहे. रा॥ छ ३ जिल्हेज[३] हे विनंती

¶"*Forces are being dispatched to Konkan*", *writes Nana Fadnis to Bajipant Joshi.*

---

१ टेहळणी. २ पत्र नानाचें. ३ पत्र नाना फडणविसाचें.

No. 351] [23-12-1778

पौा छ ३ जिल्हेज

सन तिसा सबैन पौष

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. तुम्ही मंगलवारचे पत्र पाठविलें तें पावलें. सारे सरदार तयार करऊन इंग्रजाचे मोहल्यावर जाऊन तोफा व बाण लागू केले. पुढे आले होते त्यास माघारे घातले. प्रतिनिधींची फौज व गाडदी आले नाही. व खर्चास पाठवावे म्हणोन लिहिलें ते कळलें. इंग्रेजावर मारगिरी करून अजमास पाहिला, फार चांगले केले. पुढेहि मजबुदीनें सावधतेने जात जावे. प्रतिनिधीची फौज काल पावली असेल, अथवा आज तर पावेलच. गाडदी येथून रवाना केल्यास च्यार दिवस जाले पावले असतील. खर्चास ऐवज उदईक रवाना करतो. चिंता न करावी. वरचेवर वर्तमान लिहून पाठवीत जावें. आम्ही आज कूच करून चिंचवडापुढे दोन कोस पवनेवर येतो. होलकराकडील फौज तुम्हाकडे जावयाविसी त्यास ताकीद केली आहे. तेथे त्याकडील किती आहे हे लिहून पाठवावें. रा छ ३ जिल्हेज हे विनती.

¶*Nana Fadnis compliments Bhiwarao Panse for the first victory gained over the English and informs him that the Pratinidhi's contingents and Holkar's forces are being rushed to his assistance with all possible dispatch.*

---

No. 352] [24-12-1778

पौा छ ५ जिल्हेज

तिसा सबैन पौष प्रातःकाल.

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. तुम्ही छ ४ जिल्हेजची पत्रें पाठविली ती पावली. लोहगडकरी याकडील वगैरे व खर्चाविसीचे लिहिले ते कळले. त्यास तूर्त पांच हजार रुपये पाठविले आहेत. आम्ही, सिंदे, होलकरसुधा आज गुरुवारी तळेगाव येक कोस येथे आलो. प्रतिनिधीची फौज किती पावली हे लिहून पाठवावें हे विनंती.

¶*Nana Fadnis sends money to Bhivrao and says that he has advanced as far as Talegaon with Sindia and Holkar.*

---

\+ सर्व पत्र नाना फडणविसाचें.

No. 349] [22-12-1778

पौ॥ छ ३ जिल्हेज तिसा पौष

**श्री**

राजश्री भिवराव येशवंत स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी तुम्ही पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सोमवारी तळाव्यास[1] जाऊं म्हणौन लि॥ ते कळलें, व खर्चास छ १ जिल्हेजचे आठवड्याकरिता ऐवज पाठवावा म्हणौन लि॥ ते कळलें. त्यास फौजेचे आठवड्याचा आकार किती होतो ते तपसीलवार लेहून पाठवणे त्याप्रमाणे ऐवज रवाना होईल. कोकणातील बातमीचा मजकूर व फौज कोकणात रवाना व्हावी येविसीचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास फौज रवाना व्हावयाची तर्तूद होत आहे. जाणिजे[2] छ २ जिल्हेज सु॥ तिसा सबैन मया व अलफ.

¶*Nana Fadnis asks from Bhivrao Panse weekly estimates of expenses of the troops under him.*

---

No. 350] [23-12-1778

पौ॥ छ ३ जिल्हेज तिसा सबैन

**श्री**

राजश्री बाजीपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते व बातमीचे पत्र कोकणातून तुमचे कारकुनाचे आले ते, ऐसीं पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर सविस्तर कळला. कोकणांत फौज लौकर रवाना व्हावी येविसी लि॥ ते कळलें. त्यास फौज रवाना व्हावयाची तर्तूद होत आहे. राजश्री नागो राम तळ्यानजीक आहेत, त्यासहि जांबुलपाड्याकडे लोक आले आहेत त्याचे पारिपत्याविसी लिहिले गेले आहे. रा॥ छ ३ जिल्हेज [3]हे विनंती

¶*"Forces are being dispatched to Konkan", writes Nana Fadnis to Bajipant Joshi.*

---

१ टेहळणी. २ पत्र नानाचें. ३ पत्र नाना फडणविसाचें.

No. 351] [23-12-1778

पौ छ ३ जिल्हेज

सन तिसा सबैन पौष

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. तुम्ही मंगळवारचे पत्र पाठविलें तें पावलें. सारे सरदार तयार करऊन इंग्रजाचे मोहल्यावर जाऊन तोफा व बाण लागू केले. पुढे आले होते त्यास माघारे वातले. प्रतिनिधींची फौज व गाडदी आले नाही. व खर्चास पाठवावे म्हणोन लिहिलें ते कळलें. इंग्रेजावर मारगिरी करून अजमास पाहिला, फार चांगले केले. पुढेहि मजबुदीनें सावधतेने जात जावे. प्रतिनिधीची फौज काल पावली असेल, अथवा आज तर पावेलच. गाडदी येथून रवाना केल्यास च्यार दिवस जाले पावले असतील. खर्चास ऐवज उदईक रवाना करतो. चिंता न करावी. वरचेवर वर्तमान लिहून पाठवीत जावें. आम्ही आज कूच करून चिंचवडापुढे दोन कोस पवनेवर येतो. होळकराकडील फौज तुम्हाकडे जावयाविसी त्यास ताकीद केली आहे. तेथे त्याकडील किती आहे हे लिहून पाठवावें. रा। छ ३ जिल्हेज हे विनंती.

¶*Nana Fadnis compliments Bhiwarao Panse for the first victory gained over the English and informs him that the Pratinidhi's contingents and Holkar's forces are being rushed to his assistance with all possible dispatch.*

---

No. 352] [24-12-1778

पौ छ ५ जिल्हेज

तिसा सबैन पौष प्रातःकाल.

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. तुम्ही छ ४ जिल्हेजची पत्रें पाठविली ती पावली. लोहगडकरी याकडील वगैरे व खर्चाविसीचे लिहिले ते कळले. त्यास तूर्त पांच हजार रुपये पाठविले आहेत. आम्ही, सिंदे, होळकरसुधा आज गुरुवारी तळेगाव येक कोस येथे आलो. प्रतिनिधीची फौज किती पावली हे लिहून पाठवावें हे विनंती.

¶*Nana Fadnis sends money to Bhivrao and says that he has advanced as far as Talegaon with Sindia and Holkar.*

---

\+ सर्व पत्र नाना फडणविसाचें.

No. 353] [24-12-1778

पौ छ ९ जिल्हेज तिसा
पौष

श्री

विज्ञापना. ता। गुरुवार च्यार घटका दिवस सायंकालचा पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष, वडिली आर्सीर्वादपत्र पा। ते पावे लि। वर्तमान कलले. सरकारची पत्र आपण लि। ते पाहिले. मी आपलेहि दाखविले. आज कूच करून कानेवाडीस आलो. सविस्तर उदईक लिहीन. आणीक पागा वगैरे याची रवानगी उदईक करवितो हे विज्ञाप्ति.

¶*This is a despatch from the field of action intimating the arrival of a contingent at Kanewadi.*

---

No. 354] [25-12-1778

पौ छ ७ जिल्हेज तिसा
सबैन पौष मास.

श्री

**राजश्री भिवराव येशवंत स्वा-**
**मी गोसावी यांसी**

विनंती उपरी. तुम्हाकडील फौजेतील लोक मुलकात लूट करून उपद्रव करितात व सरकारची माणसे बातमीस जातात त्यास व आणखी वाटसरास लुटितात म्हणोन हुजूर बोभाट येतात. त्यास हे ठीक नाही. तरी तुम्ही फौजत ताकीद निक्षूण करून गावगना मुलकात व वाटसरास व सरकारचे माणसास कोण्हेविसी उपद्रव करू न देणे. बोभाट येऊ न देणे. जाणिजे छ ६ जिल्हेज. सुा। तिसा सबैन मया व अल्फ. [१] ताकिदीस आपण आलस करू नये हे विनती.

¶*Sakharam Bapu to Bhivrao Yashwant, asking him to enforce strict discipline in the forces under him so that there should be no complaint from the ryots.*

---

१ या पुढील मजकूर सखाराम बापूच्या हातचा.

No. 355] [28-12-1778

पौ छ १२ जिल्हेज तिसा
सबैन पौष

श्री

राजश्री बाजीपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्हाबरोबरचे फौजेत कहीस ताकीद नाही. ब्राह्मणाचे गाव उकसाण, करंजगांव वगैरे गाव कहीवाले लुटितात. घरोघरचा गला मनस्वी नेला. असे असोन रोजमरियाचा बोभाट लिहितां, यैशास फौजेत लूट गांवगना न व्हावी येविसी चांगली ताकीद करावी. गावगनाचा गला वगैरे लस्करांत लुटीस काय गेले याच्या यादी आणविल्या आहेत. त्या आलियावर ऐवज होईल तो त्या यादीप्रमाणे लोकांच्या रोजमरियांत वजा करावा लागेल. रा छ ९ जिल्हेज. [1]तुम्ही तेथे असता गावाचे गाव लुटून घरातील गला वगैरे झाडून नेले हे ठीक न जाले. याउपर तरी बंदोबस्ती चांगली करावी हे विनंती.

¶*Nana issues a sharp reprimand to Bajipant Joshi for the want of discipline in his forces.*

---

No. 356] [29-12-1778

श्री

राजश्री भिवराव येशवंत स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र छ १० जिल्हेजचे पाठविले ते पावले. चंदीचा मजकूर व खर्चाचा प्रकार व इंग्रजाचे पलेटणाचे चौकीचा अर्थ लिहिला तो कलला. त्यास चंदीविसी बापूजी वामन यास निक्षूण ताकीद जाहाली. त्याणे खर्चासहि ऐवज नोबतराव याजकडे पाठविला. चंदी त्यापासून घेत जाणे. खर्चास तूर्त तुमचे तसलमातीस लिहून पोतापैकी आबू मा। व उमरखान सांडणी-स्वार दिमत पागा हुजूर याबा। रुपये ५००० पाच हजार पाठविले आहेत, घेऊन पावल्याचा जाब पाठवणे. कोकणात फौज नेमिली निघाली. दरमजल जाईल. गरनालेविसी सागितले आहे. रवाना होईल. [2]जाणिजे छ १० जिल्हेज सुा। तिसा सबैन मया व आलफ. हे [3]विनती.

¶*Nana Fadnis and Sakharam Bapu communicate to Bhivrao Panse the arrangements made by them for the expenses of the army.*

---

१ यापुढील मजकूर नानाच्या हातचा. २ तेरीख नानाची.

३ 'हे विनती' बापूची.

No. 357] [4-6-1779

श्री

तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे तळेगावचे मुकामी इकडे आले. ते समई खर्चास द्यावयाचा ठराव माहादजी सिंदे याचे विद्यमाने जाला त्याप्रमाणे का बा सरंजामी सरदार वगैरे दरकदार यांजपासून घ्यावयाचा करार केला ते देविले. छ १८ जावल आखेर सन तिसा सबैन

रुा

२२९०००

पौ खंडेराव त्रिंबक सरंजामी यांजकडे करार केले २९००० रुा पैकी हरि बावाजी यांस पा इटावे येथील फाजिलाबा रदकर्जी देविले रुा ९००० बाकी वरात छ ६ सफरची आहे. परंतु यैवज पावला ना (अपूर्ण).

¶*Arrangements for paying off the expenses of Raghunathrao are mentioned in this paper.*

---

No. 358] [1779 ?

श्री

सारांष कीं जनराल माणसाची मनसबी करीत असल्यास आम्ही बोलतों तें शहरचे हजारों माणसांस ठाऊकच आहे; आणि जनराल याचे मनांत टाला द्यावयाचा असल्यास इनसाफ करावा असें जनरालास संकट घालीत नाहीं. गाडर्ड तेथें लटकें बोलतात, त्यास ते मातबर मनुष्य, तेव्हां त्यास आम्हीं खोटें म्हणावें हें उचित नाहीं; व त्याणीही कौशलांत लटक्या गोष्टी बोलाव्या यांत त्याची काय शानी? जर करितां आम्हीं मनसबीस राजी नसतो तरी तुम्हांपासी फिर्याद कशास करितों? त्यास हा मजकूर तुम्हीं जनराल यासी बोलणे छ १० जिल्हेज.

¶*This appears to be Raghoba's complaint against Goddard made to the General (Hornby).*

---

No. 359] [Jan. 1779 ?

श्री

विनंती विशेष. चिठी पाठविली ती पावली. रात्रीस इंग्रजाची तीन पलटणे छाप्यास येत होती. त्यास खिंडीत होळकराची चवकी होती, त्याजमुळे बातमी

कलताच मावारी गेली. त्यास छबिन्यास व गोटात सावधगिरी करावी म्हणोन लिा त्याप्रो केली. प्रात:काली भेटीस यावे म्हणौन लिा त्याप्रो येतो. हे विनती.

¶*The writer informs (Nana) that three English platoons that had come for a night attack had to retire before Holkar's guard posted at the mountain pass.*

---

*No. 360*] [*Jan. 1779*

**श्री**

**राजश्री भिमराव स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. तुम्ही होतां तेथून निघोन आमचे लस्कराजवल आला म्हणौन ऐकिले. त्यास तुमची भेट जाली पाहिजे याजकारिता तुम्ही व बाजीपंत यावें. हे+ विनंती.

¶*Nana asks Bhivrao Panse and Bajipant to see him.*

---

*No. 361*] [*1-1-1779*

**श्री**

**राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी**

विनंती उपरी. तुम्ही पत्र पो ते पावले. लिहिले वर्तमान कललें. आज इंग्रजास आम्हास अंतर फार पडले. उदैक कूच करून बाजूस जातो म्हणौन लिा ते कललें. येक दिवस अंतर पडले, चिंता नाही. आज सडी स्वारी करावी असा निश्चय जाला. उभयता सरदार पुढे गेले. आम्ही लौकरच निघोन येतो. कलावे. तिकडील वर्तमान वरचेवर कलवीत जावे. रा। शुक्रवार सा घटका दिवस हे[१] विनती.

¶*Nana acknowledges the receipt of military intelligence from Bhivrao Panse regarding the movements of the English army.*

---

\+ चिठी नानाची. १ अक्षर नाना फडणविसाचे.

No. 362] [3-1-1779

पौ छ १४ जिल्हेज सन
तिसा सबैन पौष

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही दोन तीन पत्रे पाा ती पावेोन लिहिले वर्तमान सविस्तर कळले. इंग्रज कूच करून दोही घाटाचे चिमध्यांत येऊन राहिले आहेत. आम्ही खबरदारीने आहो. खासा स्वारीचे कूच होऊन पुढे आले म्हणजे बुनगे पाठीमागे ठेऊन सडे पुढे राहू. फौजेची रवानगी होत असावी. कोकणांतील फौज जावी म्हणौन लिहिले ते कळले. त्यास कुचाचा मजकूर ठरत आहे. तुम्हाकडे लोक रवाना करितो. कोकणातील फौज रवाना जाली. तुम्ही नित्य गोळागोळी हिमत धरून करितां त्याजवर जरब आहे. रात बिरात सावध राहात जावें. राा छ १४ जिल्हेज हे[+] विनंती.

¶*Nana Fadnis to Bhivrao Panse that forces meant to operate in Konkan are on their way and reinforcements are being sent to him.*

---

No. 363] [4-1-1779

पौ छ १५ जिल्हेज
सन तिसा सबैन

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे शेवेसी.

विनंती उपरी. नित्य तुमचा व इंग्रजाचा प्रसंग होऊन तोफा होतात. त्या यैकण्यात हलक्या बाजेबाजे येतात. परंतु आज प्रातःकालापासून तोफाचे आवाज दाट यैकण्यात येतात. आपलेकडील बातमी काहीच आली नाही याजकरितां सांडणी स्वार पाा आहे तर सविस्तर लिहून पाठवावे. बातमी वरचेवर येत असावी. राा[१] इंदूवार बारा घटका दिवस हे विनती.

¶*Nana Fadnis hears distant cannonading and asks Bhivrao to send frequent news of the fighting.*

---

+ पत्र नाना फडणिसाचें.

१ पत्र नाना फडणबिसाचें.

No. 364] [6-1-1779

पौ छ १८ जिल्हेज

सन तिसा पौष.

श्री

+राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर छ १७ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावले. लिहिले वर्तमान कळले. गोवित्रीवर त्यांचा मुकाम जाहाला. वाटेने मारगिरी चांगली केली. उतम जाहाले. उद्या कूच करतात किंवा मुकाम करतात लिहून पाठवावे. गोवित्रीवर मुकाम वाकडासा वाटतो, याचे कारण काय लिहून पाठवावे. रा छ १७ जिल्हेज मध्यानरात्र हे विनंती.

¶*Nana congratulates Bhivrao Panse on the splendid work of his artillery and enquires why the English should have selected Govitri for camping as it lies rather out of the usual route.*

---

No. 365] [10-1-1779

पौ छ २१ जिल्हेज

श्रीमोरया प्रा

राजश्री बलवंतराव गोसावी

यांसी

दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. इंग्रेजाकडील व नबाबाकडील फौजेच्या कह्या तलेगांवचे आसपास होतात त्यास राजश्री नानासी बोलोन तलेगाव व इंदोरी या हरदू गावास कहीचा वगैरे उपसर्ग न लागे ऐसा बंदोबस्त करून घेऊन पत्राचें उतर पाठवावें. बहुत काये लिहिणे लोभ करीत जावा हे विनती.

¶*Balvantrao is asked by Holkar to see that Talegaon and Indori are not molested by the foraging parties of the English and the Nizam.*

---

No. 366] [13-1-1779

श्री

+राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. चिठी पाठविली ती पावली. लिहिला मजकूर सविस्तर कळला. आम्ही आता भोजनास जातों. राजश्री पाटीलबावाकडे तोफ लांब

---

\+ पत्र नाना फडणविसाचें.

पल्याची नाही. याकरता त्याकडे येक पाठविली, परंतु तिचा पला थोडा याकरता मारगिरी जाली नाही. सायंकाली सविस्तर लिहून पाठऊ. रा मंदवार अडीच प्रहर दिवस हे विनंती.

¶*Nana informs Bhivrao Panse that Sindia's fire proved ineffective owing to lack of long range guns.*

---

*No. 367*] [*13-1-1779 ?*

**श्री**

राजश्री भिवराव स्वामीचे सेवसी.

विनंती उपरी. तुम्ही आज कूच करून चिंचवडानजीक गेला म्हणौन कलले. त्यास उद्याचा दिवस तेथेच मुकाम 'करावा. मागील पुढील सारे जमू द्यावे. आज तुम्हाजवल पथके कोण कोणती आली हे सविस्तर लेहून पाठवावे. पुढील बातमीचे लक्ष वरचेवरी राखीत जावे. +सिंद्याची फौज किती आली व होलकराची पुढे आहे म्हणतात ती किती, हे लिहून पाठवावे. रा मंदवार हे विनंती.

¶*Nana Fadnis to Bhivrao Panse, making enquiries about the forces under him and advising him to encamp at Chinchwad.*

---

*No. 368*] [*14-1-1779*

**श्री**

यादी नारो गणेश यांस तुकोजी होलकर याची दिवाणगिरी सांगितली. सा सदरेस वस्त्रे वि बालाजी जनार्दन व सखाराम भगवंत छ २९ जिल्हेज सुा तिसा सबैन सनगे यो आख

| | |
|---|---|
| ८८ | तिवट १ |
| १४९ | जाफरखानी १ |
| ३६ | शेला धुवट १ |
| १०० | किमखाप .॥. |
| ३६९ | ३॥ |

¶*Robes of honour are conferred on Naro Ganesh on his appointment as Divan of Tukoji Holkar.*

+ पत्र नाना फडनविसाचें.

No. 369] [14-1-1779

श्री

बा। नारो गणेश दिमत तुकोजी होळकर यांजकडे नजरेचा ऐवज घ्यावयाचा करार केला. त्यास मानिलेचा ऐवज तुकोजी होळकर याजकडे येणे त्याचा हवाला आबाजी नाईक वानवले यांणी घेतला ते जमा सुा तिसा सबैन मया व अलफ

रुा

९००००० गुा आबाजी नाईक वानवले हवाल्यापौ

१४००० माहादेवभट शारंगपाणी यांजकडे मानिलेचा ऐवज अमानत होता तो सरकारांत घ्यावयाचा करार केला. ते नवा लक्षाखेरीज

९१४०००

यासी भरणा

८६४००० नख्त

८५६५०० जमा परभारे वराता

७५०० खासगीकडे

८६४०००

५०००० कापड जमा जामदारखा किंमत रुा

९१४०००

¶*The paper refers to the settlement of Nazar to be received from Naro Ganesh Shouche on the occasion of his appointment to the Diwanship of Holkar.*

---

No. 370] [28-1-1779 ?

श्री

स्वामीचे सेवेशी विनंती सेवक कृष्णाजीराम निसबत नारो कृष्ण सरसुभेदार सां जफ्ती सर कानगोई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ९ माहे मोहरमपावेतो मुकाम सुलतानपूर येथें सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री चिंतो विठ्ठल याजकडील सर कानगोईचे वतन सरकारात जफ्त

करून जफ्तीची सनद सरसुभा सादर जाली त्यावरून जागोजागा कारकून गेले. सुलतानपूर व नंदूरबार येथील काम आम्हाकडे सांगितले. त्यावर आषाढमासी दोहो महालचा सनदा घेऊन आपणास मौजे भातखेडे याचे मुकामी भेटोन नंदुरबारेस गेलो. तेथें गेल्यावर अठा दिवसानीं केसो कृष्ण दातार याची गर्दी जाली. एक महिना गांवांत भटकून राहिलो होतो. सोये पाहून बराणपुरास गेलो. कार्तिक मासीं राजश्री बाबूराव दामोदर निसबत राजश्री बाबूराव देवस्थले याणें सुलतानपूरची मामलत करून बराणपूरावरून आले. त्याचे समागमे आम्ही कानगोईचे कामावर आलो. ते समई चंदरराव पवार याचे लोकांनीं प्रगणियांत धामधूम फारच केली होती. रात्रंदिवस त्याचे स्वार व लोक गांव मारीत होते. त्यावरून मामलेदार आम्हास म्हणूं लागले जे, तुम्हाजवळ सरकार जफ्तीची सनद फत्तेपूरची आहे, त्यास आमचे दोनसे स्वार व लोक, आहेत, दारू गोळी लागेल ती आम्ही देऊ, परंतु हा सरंजाम घेऊन फत्तेपूरचे पारपत्य करून तुम्ही आपला आमल बसवणे, म्हणजे प्रगणियांतील दंगा तुटेल.' त्यावरून सदरहूप्रमाणें सरंजाम येऊन एक महिना रात्रंदिवस स्वारी फिरत होती. दोन तीन लडाया जाल्या. त्याजकडील सात आठ माणसे कामास आली. जागोजागा नाकेबंदी केली होती. तोफाची मारगिर फार होत असे, त्यामुले गांव लवकर हातास आला नाहीं. चदरराव लडाईत पडला हे वर्तमान ऐकोन गांव तजावजा जाला. ही बातमी राखोन पहाटेची स्वारी करून मागती जागोजागा नाकेबंदी केली. रात्रीं जाऊन छयापा घालावा ऐसी तयारी केली, तेच दिवशीं सायेंकालीं राजश्री तुकोजी होलकर याचे तीनसे स्वार व मकाजी गिते व मकाजी लाबहाते व आनंदराव व बलवंतराव परभू ऐसे आले. तेच रात्रींस गांव अगदीं पलोन गेला. लोकानीं घरातील वस्तभाव कांहीं नेली नाही. जीव मात्र घेऊन गेले. गांव भरले राहिला होता. गांव पलोन गेला व हे वर्तमान मध्यान रात्रीं कलले ते समई स्वारी करून फत्तेपुरास गेलो. आमचे अगोधर घटिका होलकराकडील भले माणूस व स्वार व पेंढारी ऐसे गेले. आम्ही गेलो तोपर्यंत * * मधे करूं लागले. आम्ही गढी राखून परवाने देऊन बसलो तो मकाजी गिते वगैरे आले. त्याणीं काठ्याचा मार करून आम्हास काढून दिल्हे. आम्ही श्रीमंताची द्वाही दिल्ही, परंतु कोण्ही मानले नाहीं. बेलासेक मारून काढले. त्याजवर बाहेर येऊन मागती चोरानीं एकटा गढीत गेलो आणि तोफा वीस मोजिल्या. बाकी सरंजाम नेला त्याची याद कोठवर धरावी. जे दृष्टीस पडेल त्याची याद अलाहिदा लिहिली आहे त्यावरून ध्यानास येईल. आम्हाजवल सनद होती ती घेऊन दुसरे दिवशीं होलकराचे लष्करात गेलो. त्यास सनद दाखविली. त्याणी सनद फेकून दिली आणि आम्हावर क्रोधायमान जाले आणि म्हणाले कीं आम्ही गांव

ठेवीत नाहीं आणि तुम्हास देत नाहीं. याप्रमाणें उत्तर केले. कासिबा होलकर पाठवून गांव जाळून निमे गढी पाडोन टाकिली. तोफा होलकरानीं झाडून नेल्या. जमीनीत पंचवीस तोफा आहेत म्हणून ऐकिले आहे. त्यास तेथें आपले ठाणें घालून रयतीस कौल देऊन गांवची अबादी केल्यास तोफेचा शोध येथास्थित लागेल. गांव बसल्यानें सरकारची नक्ष राहील. जमीनीचा झाडा पुरता निघाला नाहीं. वस्ती जाल्यास सोईसोईनें सर्व ध्यानास येईल तूर्त गांवचे रखवालीस दोनसे माणसे पाहिजे, तेव्हां रयेत येईल. रयेत सिद्ध आहे. ये विसींची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. आपले लस्करांत आले होतो भेट जाली नाहीं. हल्ली तापानें मजला हैराण केले आहे. कालपासून तफावत पडली आहे. पत्राचे उत्तर आले म्हणजे पाणी घेऊन भेटीस येईन. तेथे आल्यास सविस्तर निवेदन करीन. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram narrates the hardships which he had to encounter in suppressing the ravages of Keso Krishna Datar and Chandrarao Pawar in the province of Nandurbar where the writer had gone to attach the property of Chinto Vithal Rairikar.*

---

*No. 371*] [*After 2-2-1779 ?*

**श्री**

**राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री**
**गणेशपंत स्वामीचे सेवेसी**

पोष्य बालाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावें विशेष. तुम्ही छ १४+ मोहरमचे पत्र पाठविलें तें पावलें. केसो कृष्णाचें पारिपत्य होऊन येकटा पळोन गेला; तों समशेरखान कोंडाईबारीकडे होता, तें हे येकत्र कानपुराजवळ होऊन सुरतेस गेले. सुरतेचा बंदोबस्तास दोन पलटणें मांडवीस होतीं, त्याणी तयारी करून समशेरखान च्यार पांचशें रावतांनशीं मिळोन नवापुरास आले. आणखी सरंजाम सोनगडास येणार. तें हे मिळोन जमाव करून पुढें येणार. आठ तोफा समागमे आहेत, म्हणोन बातम्या आल्या. त्यास आम्हांसमागमें होलकराची फौज होती, ती होलकर घेऊन गेले. येक सरदार दोन हजार फौजेनशी ठेवावा व पेंढार ठेवावें तेहि न केलें, व दुर्गोजी भापकरहि आले नाहीत. त्यास पत्रें यावीं म्हणजे सारे मिळोन त्याचे रोखावर जाऊ. फौजेची खर्चाची बेगमी करावयास आज्ञा करावी म्हणोन

---

+ २-२-१७७९.

विस्तारेंकरून लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास केसोपंताचें पारिपत्य जालें. त्याचे दमानें तुम्ही फौजसुधा घांटाखालीं उतरतेस म्हणजे सुरतेकडे दगाण जाला नसतां. मध्यें मंद पडलें, याजमुळें त्यास सवड सांपडली. बारी चढोन वरते आले. फिरोन स्वराज्यांत दंगा होईल, याजकरितां भापकरास पत्रें तुम्हाकडे लौकर जाण्याविशीं पाठविली व भापकर व तुम्ही मिळोन फौजसुद्धां लौकर जावें, म्हणोन पेशजींच पत्रें पाठविलीं आहेत, त्याप्रमाणें तुम्ही फौजसुद्धां तिकडे लौकर जावें म्हणजे त्यासहि दहशत पडेल. भापकरहि फौजसुद्धां तिकडे जाऊन तुम्हांस भेटलेच असतील. सारांश तुम्ही त्याचा जमाव जहाला नाहीं, तों फौजसुद्धां जाऊन पोंहचावें. पेशजीं चालीस हजार रुपये तुम्हांकडे सांडणीवर घालून पाठविले तेहि पावलेच असतील. यास्तव लौकर सुरतेकडे हंगामा सुरू करावा, विलंब लागू नये, सावध फार असत जावें. रवाना छ २ सफर बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Nana Fadnis writes to Ganeshpant Behere : notes the contents of a letter from him about the joining of Keso Krishna with Samsherkhan and gives the addressee instructions to proceed against them along with Bhapker.*

---

*No. 372*] [*2-2-1779*

श्री

राजश्री[+] हरिपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. गुरुवारीं माहुलीस आलों. शुक्रवारीं ईश्वरीकृपेकरून कार्यसिधिहि जाली. इंदुवारी रात्रौ येथून निघावयास मुहूर्त आहे. शनिवारी पुण्यांतील घरांत यावयास मुहूर्त आहे. तुम्हास कळावें याकरितां लिहिलें आहे. पुण्यांत कांही गलबल असलियास पुरंधरासच जाऊं. नसली तर तसेंच लिहून पाठवावें. मुख्य घर पुण्याचे, तेथें जाऊन मग पुरंधरास जाऊं. राजश्री कृष्णराव बलाळ मध्यस्तीस आले आहेत तिकडील वर्तमान तुम्हास कळतच असेल. होळकराकडील फडशा करून तुमचे जाण्याचें कसे वर्तमान लिहून पाठवावें. रा छ १४ मोहरम हे विनंती.

¶*Nana Fadnis in his autograph letter to Haripant intimates to him that he has arrived at Mahuli and that he would shortly proceed to Poona and Purandhar.*

---

+ नाना फडणीस यांचे हातचें पत्र.

सं. ३ ... नं. ७८६
ता. ...
दा. जे.

No. 373] [3-2-1779

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
खंडेराव त्रिंबक स्वामी गो

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यास खर्चास द्यावयास सरंजामी याजवर ऐवजाची पटी घातली. पैकी तुम्हापासून घ्यावे ते बाा देणे ताा विश्वासराव येशवंत याजकडे राजश्री माहादजी सिंदे याचे विद्यमाने तीर्थस्वरूपास द्यावया बाा रुाो २५००० पचवीस हजार रुाो देविले असेत, तरी पावते करून पावल्याचे कबज घेणे. जाणिजे छ १९ मोहरम सुाा तिसा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

बार

सदरहू पंचवीस हजार पो पाच हजार रुाो हरि बावाजी यास इटावाचे फाजिलाबाा रद कर्ज देविले साा वजा ५००० बाकी दादासाहेब याजकडे २००००

याप्राा यादीस करावे.

¶*The Peshwa asks Khanderao Trimbak to pay 25,000 Rupees to Raghunathrao.*

---

No. 374] [7-3-1779

पौ छ २१ सफर फाल्गुन
मास सुाा तिसा सबैन.

श्री

राजश्री नरसीपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. घाटास जाऊन बंदोबस्त करून राहिलों आहों, येविशीचा व मुंबईस सलाबत पडल्याचा अर्थ लिहिला तो कळला. त्यास घाटाचा बंदोबस्त करून राहिला. उत्तम केलें. बंदोबस्त चांगला असों देणें. बाळाजी विश्वनाथ फाटक यास घाटास आल्याचा मजकूर लिहिला. उत्तम केलें. काम पडल्यास जावें न जावें म्हणोन लिहिलें; त्यास

त्याजवळ काम पडावयाचें नाहीं. न जाणें. रोजमरेयाविशी लिहिले त्यास बेगमी करून देविलीच आहे. वराताचा ऐवज पटेसा करून देविला आहे रवाना छ १८ सफर हे विनंती.

¶*Instructions are issued herein for protecting the Bombay-Poona passes (ghats) with the utmost vigilance.*

---

*No. 375*] [*4-4-1779*

पौ छ २७ रोवल

**श्री**

**राजश्री नरसिंह श्रीपत चौकी बोरघाट**
**गोसावी यासी**

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माहादजी, सिंदे दंडवत सुा तिसा सबैन मया व अलफ. इंग्रेज याकडील कासीद व माणसें इकडे येतात व इकडून मुंबईस जातात; त्यास तुम्ही दिकत करून अटकाव करिता म्हणून विदित जालें, त्याजवरून हें पत्र लिहिलें आहे; तर इंग्रेजाकडील कासीद इकडे येतील व इकडून मुंबईस जातील, त्यांस अटकाव येकंदर करीत न जावें. जाणिजे छ १६ रबिलावल. इकडून दस्तक घेऊन जातील त्यांस अडथळा न करणें. छ मजकूर बहुत काय लिहिणें.

¶*Mahadji Sindia to Narsinh Shripat, asking him not to detain the messengers of the English passing through the Ghat.*

---

*No. 376*] [*5-4-1779*

पौ छ २९ रोवल चैत्र
सन तिसा सबैन.

**श्री**

सेवेसी कृष्णराव अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ १७ रबिलोवलपर्यंत येथास्थित असे विशेष. तीर्थस्वरूप राजश्री-दादासाहेबाकडील बातमीचे ब्राम्हण असामी दोन व माणसे तीन एकूण पांच असामी राजेश्री हरि बल्लाल याणी स्वारीतून कैद करून सातान्यास पाठविले आहेत. ते हल्ली सोडावयाचा करार केला असे; तरी सदरहू पांच असामी सोडून देणे. याखेरीज बांदिवान सातान्यास असतील त्याची सबब लाऊन नावनिसीवार झाडा

लेहून पाठवणे म्हणोन आज्ञा. त्यास पांच असामीचा येथे शोध केला; परंतु येथें येऊन त्यास कैदेत ठेविले याचा कोठे पथा लागत नाहीं. बाकी किरकोल बंदिवान असतील त्याचा नांवनिसीवार जाबता लेहून मागाहून पाठवून देतो. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnarao Anant reports that five spies of Raghoba alleged to have been confined at Satara have not been traced at the fort.*

---

*No. 377*] [*9-4-1779*

पौ छ २१ रावल सन

तिसा चैत्र.

श्री

यादी बंदिवान किल्ले विसापूर येथें आटकेंत आहेत ते सुा तिसा सबैन मया व अलफ

१ तुळाजी आंगरे याची बायको.

१ बाबूराव आपाजी बावडेकर हा तोतयाकडे मिळोन खोपोली येथील वाड्याचे व गांवचे जप्तीस आला. तो तोतयाचें पारपत्य जाहाल्यावर आपटे येथील बंदरीं धरून किले करनाळा येथें आटकेंत होता, तो हुजूर नेऊन पुरंधर येथें ठेविला होता; त्याप्रमाणें बाबूराव सांगतो; व साल-गुदस्तां सनसमान श्रावणमासीं किले मजकुरीं हाजीर जामीन घेऊन, जामीनकतबा व बाबूराव यासी हुजूर पाठवणें म्हणोन आज्ञापत्र होतें, त्याप्रमाणें येथें चौकशी केली. येथें जामीन कोण्ही न मिळे, तेव्हां हुजूर लेहून पाठविलें. आज्ञा आली कीं जामीन न मिळे तरी पायीं बेडी घाळून किल्ले मजकुरीं ठेवणें, त्याप्रमाणें ठेविला आहे.

—
२

येकूण दोन बंदिवान किले मजकुरीं आटकेंत आहेत.

¶*Tulaji Angria's wife and Baburao Bavdeker are imprisoned and kept at the Visapur fort.*

No. 378] [Oct. 1779

श्री

विज्ञापना सुरतेहून सराफी कागद आले; त्यांत तिकडील वर्तमान श्रीमंत कडोदावरच आहेत. राजश्री गोविंदराव गाइकवाड आद्याप वर आले नाहींत, पेटलादेस आहेत. अमदाबादेस लढाई जाली. राजश्री आपाजी गणेश याजकडील सें दोनसें माणूस कामास आलें. बोहरल्याचे पांच्यारसें ठार जाले. सराफाचे कागदीं लिहिलें आहे, सेवेसी कळवें. श्रीमंतापासून फिरंगी सुरतेस अगदींच गेले. लग्नामधें दारूचा उपद्रव जाला. तेथें दोन तीनसें फिरंगी उडाला म्हणोन गावांत वदंता दाट आहे. आपले गालण्या आसपासच बहुत मुकाम जाले. यास कारण मागील पुढील सर्व येकत्र व्हावें व श्रीमंताचा रोख कोकणचे मार्गें जावयाचा व इकडे यावयाचा याअर्थी तेथें मुकाम असतील. त्यास भोंडगांवहि नजीक आहे. तेथें मुकाम जाल्यास हे आर्थ जात नाहींत; आणि तिकडेही दाब बसतो, आणि तृण काष्ट विपुल आणि चिमणरावहि पाये पसरूं पावणार नाहीं; येकूण या मुकामाहून दोनतीन आर्थ तेथें मुकाम केल्यानें अधिक होतात. यावर मर्जी. धोशा कोठें आहे, कोठवर आला, हे कृपापत्रीं लिहिली पाहिजे. आम्ही मागील फाजिलाकरितां सेवेसीं तीन महिने विनंती करीत होतो. त्यास कांहीं यैवज देविला नाहीं. पुढें खर्च उणा करावा तेंहि होत नाहीं. याची तरतूद जाली पा। तूर्त दाभाडियाचे इसमाचा मुकासा नंदुरबार परगणियांत आहे तो यैवज रुपये अठरा हजार होतो, त्याची नेमणूक राजश्री गोविंद हरिकडे आहे त्यास इतकारी (?) यैवज कृपा करोन लाऊन देविला पाहिजे; व बाळाराव याजकडोन यैवज परिछिन्न येत नाहीं, याजकरितां कृपा करोन पुण्यास चिटी देवावी. माझ्यानें मुरवतीकरितां बोलवत नाहीं; परंतु तात्या! चव महिन्याचा करार, त्यास येक वर्ष च्यार महिने होऊन गेले, आतां दम किती धरूं? हे ध्यानास अणोन यैवज देवावा. फार परीक्षा पाहिली. याउपर अंत न पाहावा. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A news-letter giving news about Ahmedabad being taken by the English from Apaji Ganesh who suffered a heavy loss. An explosion at Surat during marriage festivities is also reported. The writer finally asks for some monetary help.*

---

No. 379] [29-10-1779

श्री

सेवेसी कृष्णाजी नारायेण, दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १८ माहे सवालपावेतो, मुक्काम रनाळें क्षेम असो विशेष. आपलें

आज्ञापत्र आलें तें छ १७ सवाली, दोन प्रहरीं पावलें. बहुत संतोष जाहला. बातमीचा मजकूर आधिक उणा असेल तो लिहीत जाणें म्हणोन आज्ञा. त्या छ १६ रोजीं, आमदावाजेहून कासीद जोडी निघोन दादांचे लष्करांतून येथें येऊन पुढें बराणपुरास गेली. त्यांणीं जबानीं वर्तमान सांगितलें कीं, आमदा(बा)ज शहर बाहेरच्यानीं घेतलें. किल्यांत खंडेराव व आपाजी गणेश उभयेतां आहेत. हें वर्तमान चवदा रोजाच म्हणोन त्याणें सांगितलें. दुसरा मजकूर सुर्तेकडील साता रोजांचे कासीद सावकारी आले, त्याणी सांगितले इंग्रजानें बाहेर निघावयाचा मुहूर्त पाहिला होता. त्यांत दारूखाना उडालियावर बाहेर निघावयाचे तूर्त राहाविलें आणि दादासाहेबांस लिहोन पाठविलें कीं, कांहीं खर्चास द्यावे. नाहीं तर आमचें येणें तूर्त होणार नाहीं. याचे कारण आपले कुमकेस धोसा येतो. हा प्रकार खरा जर आहे तर आपण सुर्ते बाहेर निघो नये. नाहीं येत अशी बातमी इतक्यांत आलीतर मग सामील व्हावें. तोंपावेतों उगच भ्रमांत असावें. याप्रमाणें तेथें लोक बोलत होते म्हणोन, कासिदानें जबानीं सांगितलें तें लिहिलें. फत्तेसिंग यांस पत्रें गेलीं कीं, तुम्हीं तयार होऊन येणे. त्यास त्यांणीं लिहिलें कीं, गोविंदराव या प्रांतांतून आपणांकडे गेलियावर मीहि सत्वरच येतों. त्याजवरोन गोविंदराव यांस पत्रें गेली आहेत. परंतु येतां दिसत नाहीं. ऐसी खबर येथें लोक बोलतात. ते सेवेसी लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Narayan reports news from Gujarat, especially the attempts made by Raghoba to enlist the help of the Gaikwad and the English.*

---

*No. 380*] [*1-11-1779*

**श्री**

सेवेसी कृष्णाजी नारायेण दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २१ सवाल पावेतों, मुक्काम रनाळें क्षेम असो विशेष. आज्ञापत्र आले तें पावलें. त्यांत लिहिलें कीं, तोरखेड्याचें काम बहुत चौकशीनें करून राजश्री यादवराव यांजबराबर येणें. त्यास आज्ञेप्रमाणें बहुत चौकशी जोशी यांचे विचारें राजश्री यादवराव यांज * * * येतां, इकडील बातमीचा प्रकार रोज दहा रोज जाले, उज्यनीचा गोसावी सवदागर साल गुदस्ता उंटे घेऊन, दादांचे लष्करांत गेला. त्याचे उंट सरकारांत घेतले. शंभर उंट दर तीनसें प्रमाणें त्यापैकीं निमे रुपये दिल्हे. बाकी राहिले ते पुढें देऊं, याप्रमाणें करार केला.

तो गोसावी येथें आला. त्याणें जबानी सर्व मजकूर सांगितला. दादा सुरतेस तीन पलटणें बरोबर घेऊन गेले. बाकी लष्करांत आठ, दहा हजार फौज व चार पलटणें मानाजीबरोबर 'आहेत. मुक्काम गढे कांबळ्याचे अलीकडे आहे. सुरतेंत कांहीं नवी शिबंदीची तरतूद नाहीं. त्यांत आपली फौज गेली तर सुरतेंतून बाहेर निघावें आणि धोसा आलियास आपले जाग्याचा बंदोबस्त राखोन राहावें. याप्रमाणें त्याचा मजकूर आहे. वरकड पेशजी अमदाबाजेचें वर्तमान आले तें खोट; अलीकडे दुसरें कागदी येतात. परंतु कांहीं कोणी शहर घेतल्याची खबर सांगत नाहीं. अलीकडे उभयेतां गाईकवाड एकमत जाहले म्हणोन गोसावी सांगत होता. राजश्री गोविंदराव कूच करून आमदाबादेकडे राजश्री खंडेराव याचे सूत्रानें जाणार, हा मजकूर गोसावी यांणीं सांगितला, तो शेवेसी लिहिला आहे. मी रविवारी फिरोन तोरखेड्यास जातों. तूर्त तेथें काम चालावयाचें नाहीं. लोक सारे स्वारीस गेले, यामुळें काम राहिलें. स्वारी फिरोन आली म्हणजे काम लागेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Narayan reports that Dadasaheb proposes to advance into Gujarat from Surat, should the Peshwa's army retire from the province. He also refers to the siege of Ahmedabad.*

---

*No. 381*] [*2-11-1779*

**श्री**

सेवेसी कृष्णाजी नारायेण दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाइत छ २२ सवाल, प्रहर दिवस पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असें विशेष. छ २० सवालचें पत्र आलें, तेथें आज्ञा कीं बांड्यावर स्वारी गेली ती फौज कुकुडमुंढ येथें आहे. सरकारचे लोक आले त्यास कांहीं दारू-गोळी देऊन त्याजकडे रवाना केले (आहे)त. त्या फौजेंत सरदार व कारभारी आहेत त्यांस पत्रें गेलीं कीं, जिकडे बांड्या गेला असेल तिकडे पाठलाग करून पारपत्य करणें. त्याजवरून त्यांणीं कूच करून त्याचे मागें जातों म्हणोन पत्र आलें; तिकडील बंदोबस्त येथास्थित आहे. दुसरा मजकूर श्रीमंताचे फौजे-कडील बातमी राखोन लिहोन पाठवावयासी आज्ञा; त्यास येथून मुजरत राजश्री यादवराव भाऊ यांणीं दोन जोड्या रवाना केल्या आहेत. दोन तीन रोजेंत येतील. आलीयावर सविस्तर सेवेसी लिहितों. मागें लोकांचे कासीद श्रीमंताचे लस्करांतून येतात. इकडे बराणपुरास व नागपुरास जातात. वरकडही बहुत

सावकारांचे कागदीं येतात जातात, त्याचें वर्तमान मनास आणितों; परंतु अलीकडे कूच करून आले. तळ माजला होता याजकरितां कूच केलें; परंतु इंग्रेजांचे घरीं लग्नास श्रीमंत गेले हें निमित्य; परंतु इंग्रज तूर्त घोशाची बातमी आलिया-खेरीज पक्की मसलत येण्याची देत * * * * घोशा आपले कुमकेस येतो हा प्रकार खरा आहे, तर इंग्रज सुरत सोडून पुढें येत नाहीं. बाहेर सामान आहे तेंहि घेऊन जावें. असा त्याचा मजकूर आहे; याजकरितां मसलतीस तेथें श्रीमंत गेले आहेत. फौज तिकडे आहे व सरदार आहेत तेच आहेत. पोटभरू उगेच मिळाले आहेत, त्यामुळें तळ फौज फारशी वाटत्ये; परंतु दाहा हजारांअलीकडे आहे. वरकड प्यादे वगैरे पाईचे आहेत. मानाजी तूर्त फौजेंत आहे. श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Krishnaji Narayan supplies news about the Peshwa's army proceeding against Bande and also about future possibilities and relations between Raghoba and the English.*

---

*No. 382]* *[3-11-1779*

श्री

राजश्री दादासाहेबाचे

सेवेसी

श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये स्नो आज्ञाधारक चंदरराव पवार दंडवत विनंती. येथील कुशल तागायत छ २३ सवाल मुकाम अमोद येथें साहेबाचे कृपावलोकनेंकरून येथास्थित असो विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जालों ते रेवा उतरून कारवान प्रांत डबई येथें मुकाम केला. तो राजश्री फत्तेसिंग गायकवाड याणी सांगून पाठविलें, कीं डबई प्रगणियांत धामधूम न करणें. त्यांत आम्हांपासीं जमाव नवता. यास्तव कूच करून परगणे अमोदेस येऊन ठाणें बसविलें. जमाव स्वार प्यादे येतात ते ठेवितों; आणिकहि लोक बोलाविले आहेत, पुर्तेपणें जमाव करून डबईस जाऊं. आपल्या प्रतापेंकरून बंदोबस्त करूं. जे वेलेस आपलें आज्ञापत्र येईल ते वेळेस येऊन पोंहचू. निरंतर पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ कीजे हे विज्ञापना.

¶*Chandarrao Pawar informs Raghoba of his arrival at Karvan near Dabhai and of his efforts to mobilise army for him.*

No. 383] [8-11-1779

श्री

सेवेसी विनंती सेवक शंकराजी खंडेराव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल छ २८ सवाल दीड प्रहर दिवस आपले प्रतापेंकरून येथास्थित असो विशेष. श्रीमंताचा मुकाम आहे तेथेंच आहे. इंग्रज सुरतेहून लस्करांत आले. श्रीमंताचा व त्याचा विचार होऊन चांदरात जाल्यावर कूच मुकाम होणार, याप्रमाणे वर्तमान आहे ते सेवेसीं लिहिलें आहे. आणिखही माणसें बातमीस लस्करांत पाठविलीं आहेत, ते आलियावर जैसें वर्तमान येईल. त्याप्रमाणें लिहून पाठऊं. कृपा लोभ करावा हे विज्ञापना.

पेंढारी पूर्वी इकडे आले होते ते येथून पलीकडे गेले नाहींत. नवापूर परगणियाची येक दोन गांवें झांबडाझांबड करून मावरे लस्करांत आले, हे वर्तमान सविस्तर गोविंद नरसी यानी आपणास लिहिलें आहे त्याजवरून विदित जालें असेल; जर पेंढारियासी ताकीद होऊन वस्तभाव द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Shankraji Khanderao writes about the English having left Surat and joined the Raghoba's army.*

---

No. 384] [21-12-1779

मंजूर

श्री.

भास्कर भिमाजी व जिवाजी माहादेव यास पत्र जे. आम्ही कजियाची हकीकत मुंबईस लिहिल्यावरून मेस्तर बाडम आम्हावर बहुत दिक आहेत व जनरेल गाडर्ड मेस्तर बाडम याचे बहुत दोस्त, सबब तेहि रुष्ट होऊन तेथें पंचाइतीच्या कौसलांत बोलतात कीं, श्रीमंतांचे माणसाची बेज्या वर्तणूक अशी श्रीमंतांची खातरनिशा होऊन माणसाचें मेस्तर बाडम याणीं पारपत्य केलें. ते गोष्ट श्रीमंतांनीं मंजूर केली ऐसे जनराल हार्नबी याणीं आम्हास लिहिले आहे. यैशास हे गोष्ट आम्हास मंजूर असती तरी आम्ही मुंबईस कशास लिहितों? ऐसें असोन तेथें गाडर्ड कौसलांत हे गोष्ट बोलतात. तेव्हां मेस्तर बाडमाची गाडर्ड वोढ धरितात ऐसें आम्हास समजले. प्रस्तुत मेस्तर बाडम याणीं आम्हांस सांगोन पाठविलें कीं आपण मुंबईस जनराल कौसलास पत्र द्यावें कीं आम्ही आपल्या माणसाची हकीकत तुम्हास लिहिली होती, परंतु मागाहून चवकशी करितां आमचे माणसाचा

अन्याय; सबब मेस्तर बाडम याणीं माणसाचें पारपत्य केलें, ऐसें पत्र मागतात. त्यास आमची गोष्ट खरी असोन ऐसें पत्र आम्ही कसे द्यावे? यास्तव दिल्हे नाहीं. तेव्हां हल्ली मेस्तर बाडम बहुत भीड घालून आपलें नांवें चिठी मागतात त्याची नक्कल पाठविली आहे. ती पाहून जनराल हर्नबी यास समजावणें की अशी चिठी बाडम मागतात, त्यास वाजबी असतां याप्रमाणें चिठी देऊ तर नये. परंतु बाडम खरे राहून त्याकरितां जनरेल गाडर्ड नाखुष होऊन कोण्हे वेळेस काय पेच घालतील हे न कळे. गाडर्ड याजवर आमच्या कामाचा अखत्यार, सबब तुम्ही येविशी ज़नराल यास पुसणें कीं गाडर्ड याचा पेच आम्हावर न चाले अशी आपण आम्हास सलाह सांगावी. याप्रमाणें जनराल यास पुसोन ते काय उत्तर करितील तें जलद लेहून पाठविणें. जनराल याणीं सांगितले कीं बाडम पत्र मागतात तसें द्यावें तरी आम्ही देऊ आणि न द्यावे म्हणतील तरी देणार नाहीं. तरी हे तुम्ही त्यास समजाऊन उत्तर करितील ते लिहिणें. तोपर्यंत बाडम यास आम्ही थांबऊन राखतों. सारांष की बाडम पेचांत येत असल्यास मनसुबी सांगितल्याचा नफा आहे आणि ते पेचांत येत नसल्यास त्यांचे मुलुखांत राहाणें, तेव्हां त्यास नाखुष राखणें यांत फायदा नाहीं. तरी याचें उत्तर जनराल हार्नबी यास पुसोन लिहिणें. छ १९ जिल्हेज.

¶*Raghunathrao, regarding the rowdism of some of his followers seeks the advice of General Hornby with a view to avoid falling under the displeasure of General Goddard and Mr. Boddam.*

---

*No. 385*] [*23-12-1779*

२

[ पहिला बंद मिळाला नाहीं. ]

र्धी याणी स्वामीबद्दल बहुत श्रम दिल्हे ते कोठवर ल्याहावे. याचा परिहार सांब करणार समर्थ आहे. मागां गुंडो सयाजी व जयराम दिनकर व सदाशिव बाबूराव वगैरे आले गेले. त्या वेळचे बहुत करून श्रम व्यर्थच गेले. इस्माई-लखां व मोरो बाबूराव व शेरजंग वगैरे मंडळी उभी करून रुक्नुद्दौला मेल्यावर+ थोर मनसुबा रचोन उद्योग केला; परंतु काळ साह्य नसतां सिद्धीस न गेलें. यानंतर कालचक्रप्रयोगें येथपर्यंत नवबत पोहचली, कीं वैरी स्वहस्तें यादवन्यायें निमाले. बाकीहि त्यां मागेंच जाणार. आपण सुरतेस दाखल जाले ते समयीं इकडे एक आवस्था जाली होती. मग सुस्ती जाल्यावर यांजला फिरून जीव आला.

+ अक्टोबर १७७५

6257

आसों. आथ:पर आपणाकडे उद्योगहि जाला पाहिजे. एक एक दिवस रिकामा व्यर्थचा जातो. सखाराम भगवंत कोशकीटकाप्रो कैद जालेयावर राहिल्यांची केवळ आब गेली आणि इतबार राहिला नाहीं. फौजेस कपर्दिक देत नाहींत. जीव मात्र राजी नाहीं. आणि आश्चर्य करितात कीं या निर्मा-ल्याचा आंदेशा करून तांब्र आदीकरून दिवसगतावर घालितात. अपूर्व आहे. पैका पेश नाहीं. आहे त्यांत बंदोबस्त नाहीं. कांहीं मिळत नाहीं. सरदार राहिले नाहींत. फौज नाहीं. आहे त्यास खावयास मिळत नाहीं. पागेचीं घोडीं उंट बज्या जालीं. पव्याखालें वस्ती राहिली नाहीं. किलेदार सर्व बेदील. हजार पांचशें मनुष्य त्यांचें काय जें आहे त्याणीं काय कर्तव्य ? तेहि दैवहत बुद्धिहत जाले आहेत. सिंद्यासीं इद्रायेण[१] फलवत् श्नेह होता. आलीकडे बहुतच विटलें आहे. तूर्त तुळजापुराकडे जाऊन उजेनीचा उद्योग दर्शविला आहे. त्यांचें आचरन फंदावांचोन नाहीं; व आलीकडे त्यास बुधीनेंहि टाकिलें आहे. आपण त्याजकडे निरोप आदीकरून पाठवितां परंतु निरर्थक जाणावें. होळकराचा प्रकार तर जघन्य. कृष्णापारचा शहे तर यांजमागें लागलाच आहे. मोगलाकडील साहित्य व्हावें तर तिकडे त्यांचे सहोदरावर गाठ आहे, म्हणून तहवरजंग वगैरे दाहा पांच सहस्र स्वार पैदळ तिकडे गेले. मंडापलीचे धीटों कृष्णातीरीं पांच पलटनें आलीं आहेत. त्याजवर चिरंजीव व धवसा पाठवणार. गोलकुंड्यात द्रव्यादि करून संचये केला आहे. त्या * * * खंदक खोल रुंद आधिकोतर करितात. भोसले तर कोन्हीहि मोजूच नये. इकडील वर्तमान या प्रकारचें आहे. तेव्हां आपणाकडोन आलस्य व्हावा हे यांचे दैवा-वांचोन काय योजावें ! आस्तु.

सध्यां आपण बोरघाटावर शये देऊन खांसा स्वारी सुरतेहून सोनगडावर आली म्हणजे इकडे गर्भगळित होऊन कांहींचे बहींच होतें आणि फौजेची निगादास्त पन्नास सहस्रपर्यंत परिच्छिन्न करावी. हे गोष्ट ऐकतांच निंबाळकर मोगलाकडील घरीं बसले आहेत. ऐसेसे सरदार व चांगलचागले लोक सहस्रावधि स्वामीस येऊन भेटतील. खलक[२] चातकन्यायें लक्ष धरून आहे. आंगरेजांनीं आथ:पर दिरंग न करितां दाहावीस लक्ष तूर्तचे प्रसंगीं खर्चास मागे न पाहवे आणि त्याजला यावत्. * *

(पुढील बंद गहाळ; पुढें उलटून पाठीवर शेवटाकडून मागें.)

उद्भव बोरघाटीं काळिमा लागली आहे त्याचा डाग दूर करावा. येणेंप्रमाणें त्याचे कुनसल आदीकरून आपण खांसा बसोन विनंतिप्रा उद्योग करावा. जर

---

१ अत्यंत कडू असें एक लहान फळ आहे. पिकलें म्हणजे सुंदर दिसतें. २ दुनिया, रयत.

6258

आतां न होय मग कोणता समय येनार? जीवितेचा भरंवसा कासे? कोन्ही सहस्त्रायु नाहीं जे सें पंनास वर्ष आनीख वाट पाहवी. म्हणून लवनिमिष्य आलस्य न होतां कार्य घडलें पाहिजे. इकडील आंदेशा तिलप्राय न करावा. कोंपास त्रान नाहीं. सर्व निस्तेज आहेत. व यदारंभी (अशा समयीं) नवाबास व धवसा यांस येकयेक पत्र आपलें आणि येकयेक आंगरेजांचे भयेप्रीतियुक्त जबाणी सेवकाची आगत्यरूप पाठवावी. आणि येक पत्र आपले हैदर नाईक यांसी असावें. सेवक इकडील सर्व बंदोबस्त करून घेतों. पत्रें बहुत युक्तीनें तेथील येवन आधिकारी आहे त्याचे विद्यमानें आगर आन्य प्रकारें सेवकाजवळ पाठवावी. हें जे संकलित विनंतिगर्भी जालें त्याचा विस्तार यापूर्वी चिरंजीव आनंदराये सेवेसीं पाठविला आहे, तो विनंती करील. त्याचे पाठवावयाचें कारण हेंच कीं पत्रोत्तर कोठवर ल्याहावें? समक्ष विनंती करतील. आलीकडे आपली आज्ञा जाली आणि शंकराजी मोरेश्वरास हुकूम जाला म्हणून या युक्तीनें सविस्तर लेहून पाठविलें आहे. विदित होऊन कृपा करून मुरंबा श्वीकारिला पाहिजे. सखाराम भगवंत याजलाहि बहुत श्रम आहेत; आणि मोरो बाबूराव यांस कोठडींत ठेविलें आहे. फार श्रमांत आहेत. घरें दारें लुटलीं. नगद तर दोन अडीच लक्ष रुपे व वस्तभाव आदीकरून पांघुर्णे बहुत निघाले. सखाराम भगवंत यांचें द्रव्य म्हातारपणचे, वीस लक्ष साहुकारियांतून आणि घरांतून सोने व मोहरा तीसांचें निघालें. नानाचें द्रव्यतर सिंद्याचें कपाळीं होतें. आपणास विदितच आहे. +धंवसा छ १४ जिल्हेजेस डेरे दाखल जाले. हैदराबादेस जाणार विदित होय हे विज्ञापना.

¶*This is a long fragmentary letter with the first and some intervening sheets missing. It refers to the confinement of Sakharam Bhagwant, to the general hard times for all, to the attempts of the English in the Borghat and lastly to the confiscation of property of Moro Baburao and Sakharam Bapu.*

---

१ सल्ला?

+ येथून अक्षर निराळें. पत्र त्रुटित बंद २-५ सांपडलें. पहिला बंद गहाळ व पांचव्याचे पुढें आणखी एकादा बंद असावा. प्रथम एका बाजूनें सर्व बंद लिहिला जाऊन पुढें शेवटाकडून मागें पाठीवर लिहीत आणून बंद ३ वर पत्र पुरें झालें आहे. सखाराम बापू नुकता कैद झाल्याचा उल्लेख असून त्यानंतरचा १४ जिल्हेज म्हणजे पत्राची ता. २३-१२-१७७९ येते. रघुनाथरावाची तरफदारी इतक्या आतुरतेनें करणारा हा लेखक बहुधा पुण्याहून लिहीत असावा. रघुनाथरावाच्या पक्षाची व बारभाईच्या पक्षाची सन१७७९ अखेरची परिस्थिति या कागदांत फार चांगली दिसून येते. भाषा सुंदर व अलंकारिक आहे.

6259

No. 386]                                                                                    [1780 ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत काले स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री खंडोजी भोसले सेनाबाहादर याणीं ढेकानालास मोर्चेबंदी करून हाला करून ठाणे घेतलें. लोक जखमी व ठार जाले. त्याचा मजकूर इंग्रज बालेश्वरास आल्याची बातमी आल्यावर त्याचे तोंडावर गेले. त्याजकडील वकील आला. बोलणें जालें. त्यावर इंग्रजांनी कूच केलें. पांच पलटणें व बारासें तुरकस्वार चेनापटणाकडे दरमजल चालले आहेत. त्याचा मार पलटणे चिलकापार गेलीं म्हणजे मुलूख तारा(ज) करावा असा विचार आहे, व बेणिरामाचा भाऊ कलकत्यास रवाना जाला आहे. पुढें जाण्याचा विचार वैशाखमासीं जाला तर होईल म्हणौन लिो वगैरे विस्तारें सविस्तर मजकूर लिहिला, तो कलकत्यास (अपूर्ण)

¶*Hari Ballal to Naropant Kale, writing about Khandoji Bhonsle attacking Dhekanala and the English and about the latter proceeding to Chenapattan with their army.*

---

No. 387]                                                                                    [16-1-1780

श्री

राजाराम दिनकर व त्रिंबक दादाजी यास पत्र जे. तुम्ही विनंती पत्रे छ ११ सवालची पाठविली ती छ ८ मोहरमी हुजूर पोहोचली. हिष्टीन बहादुराची भेट होते ते दिवसी दक्षिणेकडील खबर पुसतात, तेव्हां यास येथार्थ वर्तमान सांगितलें पाहिजे, याजकरितां महिन्याचे महिन्यास हुजुरून पत्रे यावी म्हणोन वगैरे मजकूर लिहिला तो कलला व दुहेरी दुसरे पत्र पाठविले त्यातलिहि मजकूर समजला. ऐशास हुजुरून महिन्याचे महिन्यास हिकडील मजकुराची एक दुसरी रवानगी तुम्हाकडे होतच आली आहे व सांप्रत या महिन्यांत हे तिसरे रवानगी पत्राची तुम्हाकडे जाहली आहे. येथील वर्तमान तरी करनेल गाडर्ड याजबराबर चिरंजिवास दिल्हे आहे. त्यास हे डबईस गेलें. डबईचा किल्ला घेऊन इंग्रजानें आपले ठाणें बसऊन तेथून बडोद्यानजीक गेले. फत्तेसिंग गायकवाड गाडर्ड यास भेटले. पुढें आमदाबादेकडे जाणार म्हणोन आजच तेथोन वर्तमान आले

आहे. त्यास गायकवाड याणीं गाडर्ड यासी सल्ला कसा केला, करारमदार कोणत्या प्रकारे ठरला, हे समजण्यांत आलें नाहीं. समजल्यावर लेहून पाठवूं; परंतु गाडर्ड याणी साराच कारभार आपलेकडे वोढावा हा लोभ धरला आहे. मुलुकांत आपलीच ठाणी बसवावी हा पाया घातला असे. उचल्या हाते आम्हास खर्चास मात्र देतात, तेहि माफकच पोहोचते. देशांतून मातबर फौजेचे सरदार आणावे म्हणोन आम्हास सांगतात. त्यास लहान मोठे सरकार निष्ठेतील सरदार व फौज आहे त्याची खातरजमा कसे होती? साराच मुलुकांत अमल इंग्रेजाचा व किल्लेहि घेऊन तेच आपलेकडे ठेवितात ऐसे जाले, तेव्हां हिंमत करून जावे यात नफा काय? श्रीमंतापासून सेवानरूप गांव परगणे मिलावे हे समजतच आहे * * * उचल्या हाते श्रीमंतासच खर्चास मिलल यात आपण जाऊन फायदा तो काय? हा अंदेश सरदारास पडून इकडे कोण्ही यावयाचे तेहि येणार नाहींत. आजपर्यंत बारभाईच्या फौजा इकडे आल्या असता, परंतु होलकरासी व नानाफडणीस यासी वाकडे पडले आहे.

¶*Raghunathrao informs his agents (with Hastings) at Calcutta of the movements and the gradual subjugation of the province by Goddard.*

---

*No. 388*]

**श्री**

राजाराम दिनकर व त्रिंबक दादाजी

आम्हास फौजा मिलल. लहान मोठे सरदार कित्येक निष्ठेतील आहेत ते संशयांत पडणार नाहींत, येऊन मिलतील. मसलत सेवटास जाईल. यांत इंग्रेजाचे व आमचे नफेच आहेत; तरी हे पर्याय हिष्टीन बहादुरासी तुम्ही समजाऊन सांगोन आधी गुजराथेतीलच निमे मुलकास कबूल होऊन गाडर्ड यांस ताकीद दिलयास उत्तम; नाहीं तरी सेवटी दुसरा दस्त निमे मुलकाचा इंग्रेजाचा असावा. हा बलानें काम करून घेऊन गाडर्ड यांस त्याची ताकीद पाठवणे व मसलत करणे आमचे व गाडर्ड याचे विचारे ठेवावी. येविसी हिष्टीन बहादुरानीं गाडर्ड यास ल्याहावे. सारांश कीं,

कारभार चांगलाच
जाहाला.

¶*Raghunathrao asks his agents at Calcutta to sound Hastings whether a promise of half the territory of Gujarat would satisfy the English as a rich reward and urge them to exert in his behalf.*

6261

No. 389] [1775

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १० माहे मोहरम येथास्थित असो विशेष. आपण कृपा करून पत्र पाा ते पावोन पत्रार्थ लेखन आवगत जाहाला. आपण लिाें की इंग्रज छापा घालावयास आला होता, तो आम्हांस बातमी लागली तेव्हा सांभालून निघोन सा कोसावर जाऊन मुकाम केला. ईश्वरे आपली खैर केली. राजश्री आपाजी बावा पायेगुडे याचे राऊत शंभर येथे ठेविले; उतम आहे. आपण लिा कीं इंग्रजाचे यैवजी हे दोन हजार देणे म्हणून आज्ञा. त्यास इंग्रजाची बाकी आम्हाकडे तीन हजार राहिली आहे व त्यांजकडील वकीलहि ठाणे मारी आहे. इग्रजांचा बंदोबस्त जाल्यासिवाये आमच्याने काही इंग्रजाचा यैवज देवत नाही. सुर्तेहून इंग्रजाने भडोचकरास लेहून पाा आणि आम्हासी कजिया करावा हे उतम नव्हे. तूर्त येथे आपण राऊत ठेविले त्यांस खर्चास रुपये ६०० साहासे राजश्री केसोपंताची चिठी लेहून घेतली आहे आणि त्याजला हे दिल्हे. पेसजी आपण ठाणे मारचे तालावर होते तेव्हां पाा वेलासे येथील पाो मौजे बोरीदरा याचे पारपत्य केले असतां पाो हसार येथील मौजे इलाव येथील पाटलास जिवे भिलानी व सरावी पांतील गांव बोरीबरा व भरोन व दिणोद हे तीही गांवचे भिलांनी मौजे मारचे पाटलास जिवे मारिले आणि गाव लुटून नेला, याप्राा दंगा मांडला आहे. त्यास आपण राजश्री गोविंदपंत नानास सांगून पाो मारचे कमाविसदारास ताकीद करावी की पाो हसोट येथील गावचा पाटलास मारावयास कारण काये? यविशीची मागहि तीहि गावात नेऊन घातला आहे. त्यास आपण पूर्ती ताकीद केल्याविना कमाविसदार यैकणार नाहीं. तर निक्षूण ताकीद करावी नाही तर आम्ही याचे उसणे घेऊ कलावे; बहुत काये लिहिणे लोभ करीत जावा हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh writes to Naro Anandrao about some money transactions with the English.*

---

No. 390] [Feb. 1780?

श्री

बाजीराव गोविंद यास पत्र जे. तहनामा व ऐवजाची रसीद बलवंतराव भिकाजी व हरबाजी मुरार कारकून व महादू जायेनाक व कासीराम चोपदार याजबराबर

देऊन तुम्हाकडील अंबाजी सदाशिवसुद्धा रवाना केले आहेत. त्यास हल्ली लढाईचा मनसबा ज्यारी केला. चिरंजीव आमृतराव याचे हमराह इंग्रेजी पलटणे देऊन आमदाबाद प्रांती रवाना केले आहेत ; हे गुजराथ सर करऊन आला नंतर (आत्रानंतर) आम्हीहि बाहेर निघणार. अशा वख्ती तिकडून नवाब बहादुराची भारी फौज व पोख्त सरंजाम मिरजपर्यंत येऊन दुतर्फा बारभाईस शह द्यावा. दुसरे त्याचे मनसब्यास आम्हास नवाबानीहि चल देऊन फौजेच्या पाठीमागें यावे, म्हणजे दोहीकडून बारभाईस जबरदस्त ताण बसेल. बहुतकरून बारभाईच्या फौजा इकडेच तोंडावर येतील, त्यास बारभाईचेच पुढे आम्हासहि फौज धरावी लागते. तेव्हां त्यास फौजेस पैका दिल्हा पाहिजे. अगोधर खर्च करावा लागतो. जेव्हां पैका पाठवावा तेव्हां इकडील वोढा धरून फौज येईल. याजकरितां तुम्ही नवाब बहादुरासी बोलोन पंधरा लक्ष रुपयेपर्यंत ऐवज ठरावणे. कारकुनास कदाचित मार्गी द्रिवसगत लागतील, याजकरितां हे तुम्हास सूचना लिहिली आहे ; तरी अगोधर बोलून करारमदारांत आणोन ठेवणे. तहनामा व ऐवजाची रसीद येऊन पोहचताच सदरहू ऐवजाची हुंडी सुर्तेची करऊन समयास लौकर ऐवज येऊन पोहचे ते करणे. सारांश की फौजेनें व पैक्यानें या वेलेस नवाब बहादुरानीं साहित्य करावे हे त्यास उचित असे.

¶*This is a letter drafted by Raghoba to Bajirao Govind in which he gives out his plans of holding in check the forces of the Barbhais on all sides by forming alliances with the English and Haidar.*

---

*No. 391*] [*Feb. 1780*

## श्री

पुरवणी राजाराम दिनकर व दिनकर व त्रिंबक दादाजी यास पत्र जे. हिष्टीन बहादुर यास अंतस्थ पन्नास लक्षपर्यंत रुपये देणे पडले तरी कबूल करून सारी दौलत आमची आम्हास साधून द्यावी, हे त्यासी बोलोन काम करून घेणे म्हणोन पेशजी तुम्हास लिहिले होते. त्यास हल्ली गाडर्ड याणी साराच मुलुकांत अमल इंग्रजी बसवावयाचा डौल धरला आहे ; तेव्हा मराठी फौज आम्हास येऊन सामील होणार नाहीं. मसलतीस धक्का पोहचेल याजकरितां तुम्हास लिहिले आहे ; तरी अंतस्ताचा मजकूर तुम्ही त्यासी बोलला असाल व त्याचे विचारे आमची सारी दौलत आम्हास काईम करून द्यावी, हुकुम आमचा चालावा व मुलुकांत आमल आमचा बसावा, हे त्याचे विचारे करून जाले असल्यास आम्हास पत्र पाठवावे ; व

गाडर्ड यास त्याचा हुकुम यावा म्हणजे अतंस्त बोललो आहे ते कबूलच आहे. या शिवाय दौलतीचा बंदोबस्त जाल्यावर त्याचे फौजेस खर्चहि लागला असेल तो वाइद्या फुरसतीनें देऊ; तर अद्यापवर अंतस्ताचा मजकूर व फौजेचे खर्चाचा मजकूर बोलला नसाल तरी बोलोन गाडर्ड यास हिष्टीन बहादुराचा हुकुम घेऊन पाठविणें, मुलुकांत श्रीमंताचा अमल बसवावा; श्रीमंत व तुम्ही एकविचारे असावे. दौलत श्रीमंतास साधून द्यावी, याप्रमाणें करून घेणे. यांत त्याचे नफे व आमची कामे होतील. मसलत सेवटास पोहचेल. कदाचित साराच इंग्रजी अमल बसवावा असेच त्याचेहि चितात असेल तरी, मग अंतस्ताचा मजकूर बोलावयाचे कारण नाहीं. अंतस्त लिहिले आहे हे घेऊन आमचे लिहिलेप्रमाणें कबूल असल्यास उत्तम आहे; कारण कीं जेव्हां त्याचाच अमल जाहला, तेव्हां आम्हास पैका कोठोन मिळणार? व अंतस्तही काय म्हणोन द्यावे? फौजेखेरीज कामहि होणार नाहीं, तर हे मजकूर तुम्ही त्यासी बोलणे. +कदाचित अंतस्ताचेहि बोलल्यावरहि त्यास आमचा अमल बसवावा हे गोष्ट कबूल नसल तरी त्याची मर्जी; परंतु हे त्याच्या चित्तात नसल्या ठाणीं मात्र बसतील; परंतु बारभाईची फौज येऊन, अंतस्तातहि बोललो ते कबूल मान्य अमल बसवावा हे त्याचे चित्तात नसल्यास.

¶*Raghunathrao offers a bribe of Rs. fifty lakhs to Warren Hastings if, in return he would undertake to reinstate him in the Peshwaship.*

---

*No. 392*] [*11-2-1780*

**श्रीहेरंबसमर्थ**

अपत्ये आमृताने चरणावरी मस्तक ठेवून नमस्कार. विज्ञापना ताा माघ शुाा सष्टीपावेतो मुकाम आमदाबाद येथे वडिलाचे आसीर्वादेकरून सुखरूप असे विशेष. इकडील वर्तमान तरी आमदाबाद लढत आहे. पुढे काय होईल ते पाहावे. जमाखर्चाची आज्ञेप्रो याद पाठविली आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶ "*Ahmedabad is still putting up a fight,*" *writes Amritrao to Raghunathrao.*

---

*No. 393*] [*13-2-1780*

मंजूर.

**श्री**

राजाराम दिनकर व त्रिंबक दादाजी यास पत्र जे: येथील प्रस्तुत वर्तमान तरी जनरेल गाडर्ड आमदाबादेजवल पोहचले. चिरंजीव राजश्री आमृतराव समागमे

+ यापुढील मजकूर तुटक वाक्यांत लिहिलेमुळें विसंगत वाटतो.

आहेत. गाडर्ड याचा व फत्तेसिंग गायकवाड याचा तह जाहाला. त्याचा याचा करारमदार कसा काय ठरला हे पुर्तेपणे सारे समजले नाहीं; परंतु अमदाबाद प्रांत सरकारचा मुल्क फत्तेसिंग गायकवाडास दिल्हा. तेथें फत्तेसिंगाची ठाणी वसविली. सुरत अठाविसीत सरकारचे मुलुकांत इंग्रजानीं आपला अमल बसविलाच आहे व हल्ली फत्तेसिंगाकडील सुरत अठाविसीतील मुल्क आपण घेऊन तेथें आपली ठाणी बसवावी हे ठरले आहे. गायकवाडापासून पैकाहि घेतला. अमदाबाद सर करून फत्तेसिंगाचे हवाली करावी असे गाडर्ड याचे मानस दिसते म्हणोन ऐकतो. त्यास आमदाबाद घेतल्यावर जसे होईल ते लेहून पाठवूं. सध्या फत्तेसिंगानीं इंग्रेजास साधून घेतले आहे, व त्याचे नफ्याचीच गोष्ट इंग्रेजाकडून घडून येत असे. परंतु अशा मनसब्यानें परिणाम लागेल तो खरा. आमच्या कामाची यात तरी एक गोष्ट दिसत नाहीं. त्याचे मसलतीस येले ते करितात. आम्हास तरी इंग्रेज कोणतेहि गोष्ट पुसत नाहीं व आमच्या फौजेचाहि दरकार बाळगीत नाहीं. कांहीं कांहीं फौज चिरंजिवाकडे येते ते ठेवावी तरी इंग्रेजाकडून फौज-सारखे जाजती खर्चासहि मिळत नाहीं व थोडीथोडी फौज ठेवावयाचेहि काम नाहीं म्हणोन सांगतात. त्यास सध्या आम्हास इंग्रेज दरमहा सुरतेत वीस हजार रुपये देतात व चिरंजिवास तेथें तीस हजार रुपये पावतात, तेव्हां तितक्याचे आजमासे खर्च बाळगणे प्राप्त आहे. मातबर सरदार आणवावे म्हणोन गाडर्ड याचे सांगणे. त्यास फौजेच्या कामास अगोधरहि कांहीं पैका दिल्हा पाहिजे. आजपर्यंत थोडीथोडी फौज धरली असती तरी सात आठ हजार जमली असती. देशांतीलहि मातबर सरकारनिष्ठेंतील सरदार आसेत, त्याची राजकारणे हुजूर आहेत. त्यास पोटापुर्ता पैका पाठविला पाहिजे. दुसरा त्याचा मजकूर ते जेव्हां दाहा पांच हजार फौजेनसी येतील, तेव्हां त्यांच्या जाहागिऱ्या मागे बारभाई जप्त करतील. इकडे आल्यावर त्यास मुल्क परगणे लावून द्यावे, तरी मुलुकांत साराच अमल इंग्रजाचा व फौजेच्या खर्चासारिखे इंग्रेजाकडून खर्चास मिळणे तेहि कमतीच. तेव्हां जाऊन नफा ते काय? हे समजोन फौजेची यावयाविसी खातरजमा ते कसी होते? असा येथील मसलतीचा विचार आहे. देशाकडील वर्तमान तरी सिंदे होळकर याणी कूच करून खानदेशांत येऊन पोहचले. माळव्यातून पायागडच्या मार्गें इंग्रज अमदाबादेकडे गेले आहेत, तिकडे त्यावरी यावे. दुसरा बारभाईचा मजकूर पंधरा हजारपर्यंत फौज पुण्याहून रवाना जाहाली. कांहीं पारनेरा व अर्जुनगड येथें येऊन पोहोचली, व कांहीं सात आठ हजार फौज कोंडाईबारी उतरून मांडवीच्या मैदानांत येऊन पोहचली. सुर्तेपावेतो मुलुक उजाड करून घ्यावा हा त्याणी प्रारंभ केला आहे. दोतर्फा त्याच्या फौजा जाहाल्या आहेत. त्यास फतेसिंग गाईकवाड गाडर्ड

याणी साधून घेतले आहेत, याजमुळे आमच्या फौजेचा दरकार नाहीं असे समजोन मनसबा करितात. आम्हास फौज ठेऊ दिल्ही नाहीं. त्यास बारभाईच्या फौजा येऊन पोहचल्या, तेव्हां आतां गाडर्ड आपणच होऊन मसलत करितात. याचा परिणाम काय होईल ते पहावे. असो, जाहले वर्तमान ल्याहावे, कारण जे पुढें इंग्रेजास धक्का पोहचल्यास हिष्टन बहादूर आम्हाकडे शब्द ठेवू लागतील, यास्तव प्रसंग पाहून हे मजकूर तुम्ही यासी बोलत जाणे. फत्तेसिंग गाईकवाड काबूयार, त्याचे लक्ष बारभाईकडे. सध्या वख्तावर नजर देऊन इंग्रेजास मिळाले आहेत; परंतु बारभाईची दाटी होईल तेव्हां फत्तेसिंग बारभाईस मिळतील असे आमच्या तर्कानें दिसते. पुढें होणे जाणे ईश्वरसत्ता. त्यास हे पत्र तुम्ही तीन वेळ वाचून याचे कोशल करून जसा प्रसंग तुमच्या नजरेस पडेल तसे त्यासी बोलत जाणे. सारांश कीं त्याचा शब्द आम्हाकडे न लागावा, यास्तव हे मजकूर तुम्ही वरचेवर बज्याऊन ठेवीत जाणे. प्रसंग पाहून हिष्टन बहादूरासी बोलत जाणे, व प्रसंग पाहून कोसलदारासीहि बोलत जाणे; कारण कीं पुढें जर मनसबा बिघडला तरी गाडर्ड आमच्या मनसब्यानें चालले नाहीं हे त्यास समजले पाहिजे. सबब खोलून लिहिले आहे. +छ ७ सफर.

¶*Raghunathrao is dissatisfied with the way in which Goddard was conducting affairs in complete disregard to the writer's advice or interest. He urges his Calcutta agent to appraise Hastings of the situation and thus bring pressure to bear upon Goddard.*

---

*No. 394*] [*26-3-1780*

**श्री**

**राजश्री भगवंत मल्हार गोसांवी यांसी**

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित खंडेराव गायेकवाड हिमतबहादर दंडवत सुा समानीन मया अलफ. तुम्ही आज्ञा घेऊन श्रीदर्शनोदेशें गेलियावरी येक दोन पत्रें आलीं कीं कुळदेवतांचीं दर्शनें घेऊन लौकर येतो; परंतु अद्याप न आलेस हें कायें? इकडील वर्तमान शहर आमदाबाद इंग्रेजानी घेतलें. देशीहून राजश्री होळकर व सिंदे आले, त्यांणी वाटेचीं गांवें जालीतच रेवातिरीं आले, इतकियांत

---

+ हा शब्द राघोबाच्या हातचा आहे; यावरून व आंतील मजकुरावरून हें पत्र कलकत्त्यास राघोबाच्या तर्फेनें काम करण्यास लिहिलें आहे हें स्पष्ट ठरतें. बारभाईनीं रावोबाचे जासूद पकडून त्यांपासून हिराऊन घेतलेल्यांत या पत्राचा समावेश होईल.

इंगरेज इकडून बडोद्याचे सुमारें गेले. फौजा बडोद्याहून दाहा कोशी आहेत. अद्याप लढाई जाली नाहीं. परस्परें रहस्याचीं बोलणीं होत आहेत. सारांश फौजाचा उपमर्दामुळें मुलूक पायेमालीखाली आला. श्रीइछेने घडणार घडत आहे. तुम्ही इत:पर येक दिवस घरीं न राहता पत्रदर्शनीं लौकर येणे; तेथून निघतांच आमके मार्गें येतों यैसें पत्र पुढें पाठवणें म्हणजे इकडील शुभ[१] त्यासारिखें उत्तरीं लेहून. तुम्हास मार्गीं पत्र पावेल त्यामार्गें येणें. वरकड तुमचे कारकुनाचे लेखावरून कळलें. सारांश कामाचे दिवस आहेत; यास्तव अतिसत्वर येणे. जाणिजे छ १९ माहे रबिलोवल. बहुत काये लिहिणें.

¶*Khanderao Gaikwad informs Bhagvant Malhar of the English having captured Ahmedabad and having proceeded to Baroda. Sindia and Holkar have also arrived in Gujarat, but the two armies have not yet met, adds the letter.*

---

*No. 395*] [*19-5-1780*

**श्रीगजानन**

विज्ञापना छ १४ जमादिलोवलपावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी काल संध्याकालपर्यंत इंग्रजाचा मुकामच होता. आज प्रात:कालीच बातमीस शिपाई पाठविले आहेत. ते आलियावर बातमी येईल, ती लिहून पाठवीन. येथे लोकास तांदूळ वगैरे काहीच जिन्स मिलत नाही. दोन दिवस दोन सिपाई रुा देऊन पाठविले परंतु तांदूळ कोठें मिलत नाही. रिकामें परतोन आले तेव्हां आज लस्करांत सिपाई पाठविले आहेत. लोकास तांदूल वगैरे जिनस मिलावयाची तरतूद लौकर जाली तरी येथे राहाणे होईल. कुब्याची फुले भाजीस पाठविली आहेत पावतील. लोकाची खर्चाविसी फार तारांबळ आहे. कलावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer gives news about the English and complains about the scarcity of foodstuffs in the camp.*

---

*No. 396*] [*June 1780*

**श्री**

सेवेसी गणाजी चंद्रराव मोरे व हेराजीराव येरूणकर विज्ञापना यैसिजे. मौजे सिरढोणचा कुणबी यास कांहीं बक्षिस देऊं केले आणि त्याजिबरोबर एक सिपाई बातमी आणावयास पाठविले त्याची बातमी येणेप्रमाणे :

| | |
|---|---|
| तूर्त तल्यावर सडा आहे. आठा चौहू रोजीं उठोन जाणार. कलम १ | मद्रेचा इंग्रेज व सुरतकर सार्ष्टीस व केलवे येथें जाणार. कलम १ |

---

१ सुपथ.

मुंबईकर[1] इंग्रेज किल्ले उरण व बेलापूर येथें जाणार. कलम १

बाजारांत धारण

८।१॥ तांदूळ कैली सो मापे

८।.॥ गहूं कैली सो खारीक सुपारी पैशाच्या सुपाऱ्या ३ गुल तीन पैसे भार, तूप दीड पैसे भार खजूर वानगी पैशाची फुटाने वानगी

कलकत्यांचा[2] इंग्रेज याणी कल्याण वसई येथें रहावे म्हणावे बातमी आहे. कलम १

बातमीदारास पांच रुपये देऊं केले आणि त्याणे आपला सरकराचा सिपाई यास येक रोज लस्करांत राहून सारा कोठ दाखविला त्यावरून पांच रुपये रोख दिल्हे. फिरोन जावयास तयार आहे. कलम

सदरहू येनेप्रमानें बातमी आहे. त्याचा गोटांत रायाजी राव खोपकर सरदार पाठविले होते, ते सेवेसी पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter gives news brought by a spy about the English proceeding to Salsette, Uran, Belapur. It also gives the rates of some articles.*

---

*No. 397*] [*September 1780*

२ पुा श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे सो

झासी प्रांतीचे व ग्वालेरचे बंदोबस्ताकरितां फौज राजश्री पाटीलबावाही पूर्वीचे मान्याचे पथक रवाना केले ते सुरंजेपार गेले. हालीहि आणखी स्वार पाचेकशे राजश्री गिरमा मल्हार बोकील हिवरेकर श्रीमंत सखाराम बापूचे सखेवे[3] चुलतभाऊ यासमागमे स्वार व येक हत्ती निशाणास देऊन रवानगी करीत आहेत. पांचसात रोजात बिदा होऊन झाशीच्या सुमारे जाणार. पुढे मान्याचे पथक गेले तेहि याचे तैनातेस चाकरी करणे यैसी पत्रे याजवल लेहून देणार. श्रीमंत होलकर तुकोजीबावाही बापू होलकरासमागमे दोन पावणेदोन हजार फौज देऊन बिदा केले सुज्यालपूरनजीक गेले. तेहि व श्रीमंत पाटीलबावाकडून गिरमाजी मल्हार रवाना होत आहेत. हे येकत्र येकविचारे राहू झासी व कछवाधारेचा व गोरचे (?) मुलुकाचा बंदोबस्त करावा यैसे बोलण्यात आहे. जफ्ती धारेहून आष्टेइछावर प्रांतीची

---

1 Hartley. 2 Goddard.

३ सखले.

करविली. यावर माजी कादाराही गोविंदपंत म्हणौन ग्रहस्त येथे पाठविले. येथे सरदारास भेटोन वर्तमान सांगो धारेस गेले. श्रीमंत सौ आनंदीबाईस भेटोन त्यांचे मनोधारण रक्षून परगण्याची सोडचिठी जफ्तीवाल्याचे नावे घेऊन जाऊन येथूनही येक कारकून घेऊन गेले आणि रा। विठल सिवदेव याचे पांच परगण्याची जफ्ती उठऊन देऊन पूर्ववत आपला आमल बसविला. हाली जफ्तीवाले भेलशाचे परगण्यात गेले. भेलसेवाल्याने शहरचा बंदोबस्त चांगला केला. आहे. जफ्तीवाल्यास कोण्हीच वर्जता भय नाही. आपल्याकडून पांचच्यार हजार निदानी दोन हजार तरी फौज आल्यास इकडे कितेक आपले आहेत. कादार वगैरे येकत्र होऊन पारिपत्य करून परभारा खर्चहि निवेल. आलस जाल्यास गांठ जमेल. हाली जफ्तीवाले तुटपुंजी कसबती वरगु व फुटकळ बारा घरचे जमा जाले. कोणी कोणात नाही. आपल्याकडून फौज आल्यास उभयता सरदारहि आपला पक्ष करितील. परंतु निमित्यास आपला कोणी आसल्यास सर्व आर्थ होईल. केवल आपला कोणी न येता उभयता सरदार बदना मी घेता नये. धारेत नजीक बाई आहेत. दुरंदेशी पाहावी लागत्ये. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पत्रांतरी सर्व निवेदन होईल.

¶*Haripant Phadke is informed of fresh contingents being sent by Sindia and Holkar for restoring order in province round about Jhansi by taking over the management from Raghoba and his followers.*

---

*No. 398*] [*0-6-1780*

**श्री**

विनंती उपरी. इंग्रजाकडील च्यार आसाम्या आल्या त्या पाठऊन द्यावे म्हणौन आपण चिठी पाठविली. त्यास आपले चिठी अगोधरच पाठविले आहेत. पोंचले आसतील हे विनंती.

¶*The writer intimates that some four persons from the English have been already despatched to the addressee.*

---

*No. 399*] [*30-9-1780*

**श्री**

**राजश्री हरीपंत तात्या**
**गोसावी यासी**

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. आपण पत्र

पाठविलें तें पावोन लेखनार्थ कळला. येसियासी राजश्री तुकोजीबावा होळकर व आम्हीं इदुरी एकत्र होऊन देशीं जावें हाच निश्चये ठराविला. त्यास झांसीकडे फौज रवाना करून बंदोबस्त राखावा याकरितां फौजेची नेमणूक होऊन कांहीं फौज गेली, राहिली तेहि जात आहे. सांप्रत उदेपूर प्रांती चिरंजीव बहिरजी ताकपीर आहेत, तिकडे उदेपूरवाल्यानी बखेडा केला, यास्तव फौज तिकडे रवाना करावी लागली. झांसी व उदेपुराकडील बंदोबस्तास रवानगी करून लौकरीच आम्ही व तुकोजीबावा देशी येऊ. या उपरी येण्यांत गुंता पडणार नाहीं. वरकड राजश्री यैसाजी बलाल यास लिहिले आहे त्यावरून कळेल. रवाना छ १ सवाल +बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia writes to Haripant promising shortly to return to the South along with Tukoji Holkar.*

---

*No. 400*] [*15-10-1780*

श्री

सेवेसी आज्ञाधारक भास्कर भिमाजी व जिवाजी माहादेव चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १६ माहे सवालपावेतों साहेबाचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. छ १० रमजानचीं आज्ञापत्रें रवाना जालीं तीं छ १७ रोजीं पावलीं. सा पुरवण्या लिहिल्या आहेत. दोन तीन वेळां वाचून पुर्ता मजकूर समजोन घेऊन तुम्ही आपले समक्ष भवानजी विसाजी व शरीफ आली यांजकडून जनराल याची मर्जी व रंग पाहून बोलोन उत्तरें घेऊन पाठवणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणें या उभयतांचे जवळोन आपले समक्ष जनराल याचें बोलणें जालें, त्याचा तपशील :

जनरेल गाडर्ड येथें आल्यावर जे फौज हजर जाहाली आहे याचे खर्चाविशी त्यासी बोलत गेला; यास गाडर्ड याणी बडोद्यास जातेसमयीं वीस हजार रुपयाची चिठ्ठी मेस्तर ब्राडम याजवर दिल्ही, आणि मागाहून तेव्हांच सांगितलें कीं आपल्यास दरमाहा दाहा हजार रुपये देतों. त्यांत हे वीस हजार रुपये दोहा महिन्याचे आगाव

जनरेल गाडर्ड येथें आल्यावर प्रथम पांच च्यार रोज बोलत गेले कीं आपल्यांस फौज धरावयास पैका देतों व कांहीं मुलुकहि देतों, असा नाद लाविला. उपरांतिक तें बोलणें सोडून फौजेस द्यावयास अम्हांजवळ पैका नाहीं असें म्हणों ल ले व मुलुकहि आमचेकडे नाहीं. मुलुकाचा जावसाल पुढें बोला असें म्हणतात. सध्यां

---

+ येथून अक्षर निराळे वळणाचें, बहुधा महादजीचें.

दिल्हे आहेत. त्यास असें जेव्हां यांणीं सांगितलें तेव्हां हे दोहो महिन्याचे आगाव रुपये आजच घेऊन फौजेस खर्चास द्यावे हें ठीक नाहीं; कारण कीं दरमाहाचा ऐवज आतांच खर्च केल्यानें पुढें आमचें चालेल कसें? सबब आम्ही सकटांत आहों. याप्रमाणें जनराल यासी बोललों. याचें उत्तर जनरालांनीं केलें कीं माझी व श्रीमंताची भेट होईल तेव्हां समक्षच बोलो. १

जनराल याचे भेटसि यावयाची मर्जी होती म्हणोन सरकारचें पत्र जनरालास आलें होतें; त्याचें उत्तर दिल्हें तें सेवेसी रवाना केले आहे त्याजवरून विदित होईल. पत्रीं लिहिलें आहे कीं (ये)ण्याचा मजकूर गाडर्ड याचे मनसब्यानें चालावें म्हणोन लिहिलें आहे. याचें कारण सरकारचें पत्रीं लिहिलें होतें. जनरेल गाडर्ड याणी सांगोन पाठविलें कीं आम्ही बडोद्याहून येऊं तोंपर्यंत स्वारी मकूब असो द्यावी. आम्ही आल्यावर आपली मर्जी जावयाची असली तरी आम्ही व आपण समागमें जाऊं म्हणोन पत्रीं लिहिलें आहे, त्याजवरून यांणींहीं त्याचे मनसुब्यानें चालावें म्हणोन लिहिलें आहे. १

विश्वनाथ नारायण याजकडून सरकारचा ऐवज येणें, त्याजविशी आम्ही त्यास पत्र लिहिलें होतें कीं सरकारचा ऐवजा फडशा करीत असल्यास उत्तम; नाहीं तरी जनरालाचे कानावर घालावें लागेल. त्याजवरून विश्वनाथजींनीं राजश्री बाजीराव गोविंद व सटवाजा भोंसले हे दोन सरदार फौजसुद्धां येथें आले आहेत; याचेहि खर्चाचा बंदोबस्त नाहीं. आज तीन महिन्यापासून फौजेचीं सूत्रें राखावीं, आपले निष्ठेतील फौजेस इशारा करावा, हें राजश्री केसो कृष्ण याजबरोबर जनरेल कशास सांगोन पाठवित होते? याचें वचनांवर आम्ही लोकांशीं राजकारणें केलीं जें येथें फौज आली त्यास आजपर्यंत कर्ज काढून खर्च केला. तीस हजारपर्यंत रुपयांचा पेंच साहुकाराचा अंगावर पडून शेवटीं लोकांस निरोप देणें प्राप्त जाहलें. त्यास हे अगोधर आम्हांस सूचना करिते तरी या आम्ही खटपटींत न पडतों. वरकड फौजेच्या खर्चास मुलुक दिल्हा असतां अगर पैका देते तरी आठ दाहा हजार फौज जमती; मसलहतीच्या उपयोगीं पडती. त्यास हा कांहीं वख्त पुढें यावयाचा नाहीं. सध्यां जे लोक आले आहेत हे खराब होऊन उठून गेल्यावर दुसऱ्या फौजेनें कोणत्या उमेदीवर यावें? दोन तीन वेळां कांहीं लोक इकडे आले त्यास येथेंहि जागा नाहीं. देशांत जावें तरी बारभाईशीं दुस्मान जाले, तेव्हां मधेंच तरंगोन खराबींत आले. पुढें लहानमोठे सरदारांनीं इकडे कोणत्या भिस्तीवर यावें? असो. सध्यां हे आमची फौज चाहात नाहिंशी दिसते. सांप्रत गाडर्ड बडोद्याकडे गेले, पुढें काय करतील तें पाहावें. आयते वेळेस कार्तिक मासीं



6271

आम्हांस पत्र लिहिलें आहे कीं ऐवजाचा निर्गम करितों; परंतु सरकाराचा हिशेब लक्ष्मण रणसोड याचे रुजुवातीचा आम्हाकडे ऐवज किती व लक्ष्मण रणसोड याजकडे यैवज किती? व आम्हापैकीं वसूल वरातीचा लाऊन निकीबाकी राहिली किती, असा हिशेब आणवावा म्हणजे फडशा करितों म्हणोन पत्र लिहिलें, त्याजवरून शेवेसी विनंती लिहिली आहे; तरी लक्ष्मण रणसोड याचे रुजुवातीचा हिशेब व किल्ले इनप्रसाद ऊर्फ प्रबळ पैकी ऐवज नारोबा कोलटकर याचे विद्यमानें पावला असेल तो हिशेबीं जमा धरून हिशेब पाठवावयाची आज्ञा. १

माणसाचे कजियाचा मजकूर तरी सरकारचें पत्राची इंग्रेजी करून कोशलांत दिल्ही आहे. इनसाफ कोशलांत ठरेल तो सेवेसी लिहून पाठऊं. १

विश्वनाथ नारायण यांणीं सरकारांत पत्र लिहिलें आहे तें सेवेसी पाठविलें असें, त्यावरून विदित होईल. १

फौज धरावयाची तरतूद करूं लागल्यास ते वख्तीं दुपटहि पैका खर्च करणें लागेल, तेव्हां कांहीं फौज मिळेल. ज्येष्ठ आषाढ मासापासून फौजेची तरतूद केली असती तरी पैका थोडा खर्च होऊन काम होतें, तो कांहीं रंग दिसत नाहीं. याप्रमाणें जनराल यांसी बोलणें म्हणोन आज्ञा; आज्ञेप्रमाणें जनरालासी बोललों. याचें उत्तर जनरालांनीं केलें कीं फौज धरावी, पैका आम्ही देऊ, म्हणोन गाडर्ड याणीं पत्र लिहिलें होतें कीं काय? तेव्हां आम्ही उत्तर केलें कीं पत्र तों लिहिलें नाहीं, परंतु केसो कृष्ण यांजवळ बोलत गेले व हल्लींहि सुरतेस आल्यावर समक्षहि बोललें कीं फौजेस पैका देऊं, फौज ठेवावी व मुलुकहि देऊं. याप्रमाणें बोलत होते म्हणोन आम्ही बोललों. हें ऐकोन जनराल बोलले कीं माझी व श्रीमंतांची भेट होईल तेव्हां याचें उत्तर समक्ष बोलों. १

पांचा गांवचा मजकूर तरी भवानजी विसाजी हे म्हणाले कीं तूर्त हा मजकूर बोलावयाचा नाहीं, याजकरितां बोललों नाहीं. पुढें समय पाहून कांहीं मजकूर बोलतो. उत्तर होईल त्याप्रमाणें सेवेसी लेहून पाठवीन. १

सेवेसी श्रुत होय हें विज्ञापि.

¶*Bhaskar Bhimaji and Jiwaji Mahadev from Bombay inform Dadasaheb of the talks the writers had with the Governor regarding differences that had cropped between the addressee and Goddard.*

6272

ता. ..........

No. 401] [28-10-1780

श्री

राजश्री गणेशपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही छ १ सवालचे व छ २ मिनहूचे यां दोन पत्रें पाा ती पावली. राजश्री यादवराव भागवत यांचा ऐवज पावता करण्याविसी व गाडर्ड बडोद्यास गेला, उजनीकडे जाणार म्हणून व श्रीमंत राजश्री दादासाहेब अश्विनीकुमारावर आहेत, फौज व गारदी ठेवितात, दसरेयाचे मुहुत तीन पलटणे व दोन हजार फौज खानदेशांत येणार, याची तरतूद हंगामसीर करावयाचा मजकूर लिाा तो सविस्तर कळला. यादवराव याचा ऐवज काही देविला. राहिला तोहि तरतूद करून देवितों. गाडरचे वगैरे बातमीचा मजकूर तर, कलकतेवाला खासा सलतनत कबिले सुद्धां कासीस आला होता. त्याचा व कासीचे राज्याचा बिगाड होऊन लढाया जाल्या. कलकतेवाल्याचे लोक ठार मारून दौलत व कबिले सर्व लुटून घेतले. मुलकात अमल राज्याचा बसला. याचप्रमाणें अंतरवेद व गंगापारचे अमिरानी जमिदारानी जागां जागां इंग्रजांचे लोक मारून आमल घेतला. तिकडे इंग्रजांचा आब जाऊन गर्दी जाली आहे. राजश्री महादजी सिंद्यानी कुलारसची पलटणे जेरदस्त केलीं आहेत. त्यांचा फडशा लवकरच होऊन सिंदे अंतरवेदीस उतरणार. चेनापटणाकडे आज पाो लढायात हैदरखानांनीं इंग्रज सिखस्त करीतच आले. सांप्रत बंगल्यातील कल कुमक भारी चेनापटणास जाऊन पहिले व हे मिळोन लढाई मातबर जाहली. त्यांतहि इंग्रज सिखस्त होऊन चेनापटणाचे आश्रयास गेले. इंग्रजांचा आब चहूकडे गेला. तेव्हां नवी मसलत उपस्थित करण्यास त्यास विचारच पडेल. तथापि याउपर त्यांची चाल समजेल तसा विचार करावयास येईल. सविस्तर तुम्हांस कळावें म्हणून लिाा आहे. सरंजामी फौज लवकर जमा करावी, इतलाखाचीहि तोड पाडून रवानगी होईल. राा छ २९ सवाल हे विनंती.

¶*The reverses met by the English in all theatres of war especially the one at Benares at the hands of Chetsing, another at Kularas at the hands of Mahadaji Sindia and a third one at Chenapattan at the hands of Haidar, are reported to Ganesh Vishvanath Behere in this letter.*

---

ले. No. 402] [ 11-1-1775

पौ छ ९ जिलकाद तीन प्रहर रात्र पाहटेची.

श्री

सेवसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ताा छ ८ जिलकाद पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री विसाजीपंत लेले वसईहून लस्क-

रांत छ ४ जिलकादीं आले होते. हिकडून पुण्याहून राजश्री बाळाजीपंत ठोसर तेहि आले, आल्यानंतर साष्टीवर व इंग्रेजावर शह देऊन तंबी पोहोचवावयाचा मजकूर कोणे तऱ्हेने काम कसे करावे या कामास मजबुदी लोकांची वगैरे सरंजामाची कोणे प्रकारची असावी तो सर्व मजकूर बाळाजीपंत ठोसर यांजवळ विसाजीपंताचे मनोगतानरूप सरकारकाम व्हावें येविसींच्या कितेक प्रकारच्या युक्तीच्या तोडजोडी बोलोन सेवेसी विनंती करावयास सांगितलें आहे. सेवेशी येऊन विनंती करितलि त्यावरून निवेदन होईल. येथून विसाजीपंत छ ६ जिलकादी वसईस गेले. तेथील बंदोबस्त नित्यानित्य अधिकोत्तर होतच आहे. इंग्रेजाची तरांडी वसईचे बाऱ्यावर आली आहेत. त्यावरून वसईहून मारनिल्हेची पत्रें आलीं तीच बजिनस सेवेशी पाठविली आहेत. त्यावरून निवेदन होईल. आम्हांस फौज व लोक वसईस पाठवावे म्हणून लिा आहे त्यावरून कांही फौज व हशम लोक पाठवितो. तिकडून लस्करातून फौज राजश्री शिवाजी विठल वगैरे दीड हजारपावेतो आले, तेहि परभारेंच तिकडे जातील. त्यास येथून पत्रे पाठविली आहेत की जलदीने जाऊन वसईस दाखल दोणे. त्याप्रमाणे तीहि फौज जाऊन पावेल व÷ कांगोरीकर आले, पांचसे म्हणोन पत्र आहे. आज हजरी घ्यावयास लाविली आहे, त्यास राजश्री बळवंतराव जिवाजी याजबराबर देऊन रवाना करितों व आपाजी हरि याचे पत्र आज बोझरचे मुकामीहून आलें त्यास त्याजलाहि जलदीने लोक घेऊन वसईस जाण्याविसी लिहिलें आहे तेहि जाऊन पोहोचतील. फारच निकड असली आणि आम्हांस,बलाविलें तरी जाऊं. येथें तो घटकेवटकेस एक एक विचार येऊन पडतो त्याप्रमाणें करावा लागतो. तेथे आमच्या नालीसी व बोभाट तेथें सांगणार सांगतात व येथून लिहितात. त्याणी खरा असेल तो लिहावा. लटका सांगितल्याने त्यास आपणास पुसावे लागेल. रात्रदिवस मेहनत तरतूद करून याप्रमाणें गैरवाके सरकारांत लटके सांगतात. त्याचा बेयाज[1] आलाहिदा पत्री लिहिवितों. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports to Nana Fadnis at Poona the preparations that were being made to defend Bassein against an attack on the place planned by the English.*

---

÷ येथून अक्षर वेगळें.        १ तपसील

No. 403] [29-11-178

पौ छ १९ जिल्हेज

सुाा इहिदे समानीन

श्री

शेवेसी सदासिव धोंडदेव चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ४ जिल्हेजपावेतो माहाराजाचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. इंग्रजाची वसईवर खराबी जाली. दोन गलवते दारूची धारावी(स) आपोआप जलोन गेली. गाडर्ड याणी बंदरा(चे) आत जाऊन मोर्चे घातले आहेत. तीन मोर्चे तयार केले. तोफा चढऊन मार करावा इतकात आतून इकतीने हजार माणूस उतरोन येक मोर्चा मारू(न) साफ केला. इंग्रजाचे दोन अडीचशे माणूस मारले. याचे तीनसे च्यारशे पडले. त्याजव(रून) गार्डरड घाबरा जाहाला. वसईकरा(नी) गार्डरास सागोन पाठविले * * * इमत नाही. तुम्ही इग्रज तीन * * * * वसात नेम करून किला घ्यावा त्या * * * * नेम करावा आणि किला घ्यावा तुझे * * * मात आम्ही किला जगविला तरी * * * सरजाम तू आम्हास द्यावा ऐसी प्रति(ज्ञा) करून लढाई कर. वसई आमचे जीव आ(हे) तोपरियंत तुझे हाती येणे कलतच आहे. वरकड बारभाईकडील फौच पंचवीस हजार फौज खाली उतर(ली). खोपवलीपासून मु(ल)कात इग्रजाचा अमल होता तो उठविला. आता कल्याण बेलापुर, कलवे, पारसकि येथे अमल आहे. लढाई होणे मातबर कल्याणावरी होईल. मुलकातहि शे दोनशे माणूस मारिले. शे दोनशे पलोन गेले. अद्यापपरियंत इंग्रजाचा जय दिसत नाही. आजपरियंत याप्रो मजकूर आहे. हाली गोंदजी चिखले खिजमतगार व बाजीराव बर्वे याजकडील खिजमत(गार) नारायणजी मान्या दोघेजण पाय * * श्रम करून येथे आलें. सुर्तेस ग * * * व याची हाली निघाली. त्याजवर याची * * * केली आहे. शेवेसी पावोन सर्व मजकूर नि * * * करितील. पुण्याकडूनहि बातमी आली. सुरापूरवाला व मानाजी फाकडा व सटवोजी भोसले वगैरे सरदार जमियत श्रीपंढरपूरपरियेत आले ऐसे वर्तमान आहे. मजला बरे वाटत नवते. आता आरोग्य आहे. आंगात शक्त आद्यापि आली नाही. माहाराजाचे कृपेने आठापंधरा दिवसात बरा होईन. सिंदे होलकर यासी खटखट जाहाली. सिंदे यास कैद केले. अइल्याबाई यास कैद. ऐसे येथे

रांत छ ४ जिलकादीं आले होते. हिकडून पुण्याहून राजश्री बाळाजीपत ठोसर तेहि आले, आल्यानंतर साष्टीवर व इंग्रेजावर शह देऊन तंबी पोहोचवावयाचा मजकूर कोणे तऱ्हेने काम कसे करावे या कामास मजबुदी लोकांची वगैरे सरंजामाची कोणे प्रकारची असावी तो सर्व मजकूर बाळाजीपंत ठोसर यांजवळ विसाजीपंताचे मनोगतानरूप सरकारकाम व्हावें येविसींच्या कितेक प्रकारच्या युक्तीच्या तोडजोडी बोलोन सेवेसी विनंती करावयास सांगितलें आहे. सेवेशी येऊन विनंती करितिल त्यावरून निवेदन होईल. येथून विसाजीपंत छ ६ जिलकादी वसईस गेले. तेथील बंदोबस्त नित्यानित्य अधिकोत्तर होतच आहे. इंग्रेजाची तरांडी वसईचे बाऱ्यावर आली आहेत. त्यावरून वसईहून माारनिल्हेची पत्रें आलीं तीच बजिनस सेवेशी पाठविली आहेत. त्यावरून निवेदन होईल. आम्हांस फौज व लोक वसईस पाठवावे म्हणून लिा आहे त्यावरून कांही फौज व हशम लोक पाठविती. तिकडून लस्करातून फौज राजश्री शिवाजी विठल वगैरे दीड हजारपावेतो आले, तेहि परभारेंच तिकडे जातील. त्यास येथून पत्रे पाठविली आहेत की जलदीने जाऊन वसईस दाखल दोणे. त्याप्रमाणे तीहि फौज जाऊन पावेल ÷ व कांगोरीकर आले, पांचसे म्हणोन पत्र आहे. आज हजरी घ्यावयास लाविली आहे, त्यास राजश्री बळवंतराव जिवाजी याजबराबर देऊन रवाना करितों व आपाजी हरि याचे पत्र आज वोझरचे मुकामीहून आलें त्यास त्याजलाहि जलदीने लोक घेऊन वसईस जाण्याविसी लिहिलें आहे तेहि जाऊन पोहोचतील. फारच निकड असली आणि आम्हांस बलाविलें तरी जाऊं. येथें तो घटकेघटकेस एक एक विचार येऊन पडतो त्याप्रमाणें करावा लागतो. तेथे आमच्या नालीसी व बोभाट तेथें सांगणार सांगतात व येथून लिहितात. त्याणी खरा असेल तो लिहावा. लटका सांगितल्याने त्यास आपणास पुसावे लागेल. रात्रदिवस मेहनत तरतूद करून याप्रमाणें गैरवाके सरकारांत लटके सांगतात. त्याचा [1]वेयाज आलाहिदा पत्री लिहिवितों. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports to Nana Fadnis at Poona the preparations that were being made to defend Bassein against an attack on the place planned by the English.*

---

÷ येथून अक्षर वेगळें. १ तपसील

No. 403] [29-11-1780

पौ छ १९ जिल्हेज

सुा इहिदे समानीन

श्री

शेवेसी सदासिव धोंडदेव चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ४ जिल्हेजपावेतो माहाराजाचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. इंग्रजाची वसईवर खराबी जाली. दोन गलवते दारूची धारावी(स) आपोआप जलोन गेली. गाडर्ड याणी बंदरा(चे) आत जाऊन मोर्चे घातले आहेत. तीन मोर्चे तयार केले. तोफा चढऊन मार करावा इतकात आतून इकतीने हजार माणूस उतरोन येक मोर्चा मारू(न) साफ केला. इंग्रजाचे दोन अडीचशे माणूस मारले. याचे तीनसे च्यारशे पडले. त्याजव(रून) गार्डरड घाबरा जाहाला. वसईकरा(नी) गार्डरास सागोन पाठविले * * * इमत नाही. तुम्ही इग्रज तीन * * * * वसात नेम करून किला घ्यावा त्या * * * * नेम करावा आणि किला घ्यावा तुझे * * * मात आम्ही किला जगविला तरी * * * सरजाम तू आम्हास द्यावा ऐसी प्रति(ज्ञा) करून लढाई कर. वसई आमचे जीव आ(हे) तोपरियंत तुझे हाती येणे कलतच आहे. वरकड बारभाईकडील फौच पंचवीस हजार फौज खाली उतर(ली). खोपवलीपासून मु(ल)कात इग्रजाचा अमल होता तो उठविला. आता कल्याण बेलापुर, कलवे, पारसकि येथे अमल आहे. लढाई होणे मातबर कल्याणावरी होईल. मुलकातहि शे दोनशे माणूस मारिले. शे दोनशे पलोन गेले. अद्यापपरियंत इंग्रजाचा जय दिसत नाही. आजपरियंत याप्रो मजकूर आहे. हाली गोंदजी चिखले खिजमतगार व बाजीराव बर्वे याजकडील खिजमत(गार) नारायणजी मान्या दोघेजण पाय * * श्रम करून येथे आले. सुतेंस ग * * * व याची हाली निघाली. त्याजवर याची * * * केली आहे. शेवेसी पावोन सर्व मजकूर नि * * * करितील. पुण्याकडूनहि बातमी आली. सुरापूरवाला व मानाजी फाकडा व सटवोजी भोसले वगैरे सरदार जमियत श्रीपंढरपूरपरियेत आले ऐसे वर्तमान आहे. मजला बरे वाटत नवते. आता आरोग्य आहे. आंगात शक्त आद्यापि आली नाही. माहाराजाचे कृपेने आठापंधरा दिवसात बरा होईन. सिंदे होलकर यासी खटखट जाहाली. सिंदे यास कैद केले. अइल्याबाई यास कैद. ऐसे येथे

6275

सावकारी वगैरे वर्तमान तहकीकात आहे येसी तिकडील वर्तमान सेवकास त्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dhondadeo describes how Goddard was repulsed at Bassein. He also adds that the English fell back on the descent of Maratha troops into Konkan.*

---

*No. 404*] [*Dec. 1780*

**श्री**

**राजश्री बाजीपंत स्वामींचे सेवेसी**

विनंती उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तेथें लिहिलें कीं वसईस राजश्री नागोराम व राघोपंताकडील गारदी रा केले. त्यापैकीं कांहीं गारदी व राऊत उठोन आले. आम्ही फिरोन बदलापुरास आलों म्हणून लिहिलें. त्यास वर इकडे गडबड, त्यापक्षीं इतकी जलदी करावयाचें नवतें. वसईसारिखी राज्यांतील जागा, पूर्वी महत्प्रत्नें-करून साध्य केली. तिचें रक्षण संकटेंकरूनच केलें पाहिजे. पाऊस पडूं लागला तर चिंता नाहीं. वसईस फौजेची छावणी व्हावी असी (जागा) फाटलेले * * * * चा मुलूक घे * * * * नाहीं. याजकरितां काल तुम्हांकडे पाठविलीं आहेत. त्यांत फौजसुधां तुम्हीं यावें म्हणून लिहिलें आहे. ती पत्रें पावल्यापूर्वींच तुम्हीं माघारे आला. पत्रें पावलींच असतील. निदान पक्ष येक हजार राऊत पावसाळा वसईस छावणीस असावे. इंग्रजास फौजेचा दबाव भारी आहे, याजकरितां विसाजीपंतास लिहून पाठऊन हजार राऊतांची सोय तेथें करऊन फौज जरूर ठेवावी. इंग्रज सेजारी, कोणेसमईं काय करील कळत नाहीं. ते समईं घाटावरून राऊत पाठवीन म्हटल्यास समयास पोंहोंचणार नाहीं. तुम्ही कोकणास वाकीफ * * * * करितां वसईस फौज ठेवावयाची आज्ञा जरूर करावी. पारनेऱ्याकडील वर्तमान विसाजीपंतानी लिहिलें होतें त्याजवर कांहीं वर्तमान कळलें नाहीं. तुम्ही बदलापुरास आल्यावर तेथेंच मुकाम करून राहणें. पारनेऱ्याकडील, पकें वर्तमान कळेल, पुढें येतात किंवा मागें जातात हें समजेल. मागाहून पायगुडे आईतोळे काळे जाधव निगडे मुसा नारंज पाा आहेत हेहि तुम्हांजवळ येतील. यांत निवड करून वसईस हजार फौज कनिष्टपक्ष राही असें करणें. कासीपंत खऱ्या * * नाहीं म्हणून

तुम्हांसमागमें आले असले * * त्यास वसईस लोकसुधां लव * * * * खर्चास बारा हजार रुपये * * * * आहेत पावतील हे हजार व रावोपंताकडील पांचसें येकूण दीड हजार पाईचें माणूस व हजार राऊत याप्रमाणें पावसाल्यात तेथें असावें. मग कसाहि पेंच पडला तर चिंता नाहीं. वसई म्हणजे राज्यांतील स्थल, तेथील मजबुदीविसीं आळस कोणी करूं नये. श्रम पडले तर सोसावे. परंतु मजबुदी करावी. तुम्ही सर्वा गोष्टीस माहीत, त्याहावें असें नाहीं. ×जरूर लिहिल्याप्रमाणें करावें. रवाना छ ११ जमादिलाकर हे विनंती.

¶*The writer Nana Fadnis advises Bajipant to keep a strong reinforcement at Bassein as there is no knowing when the English would attack it.*

---

No. 405] [1781-1782

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो माहादेव गो

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा इसने समानीन मया व अलफ. सुरत व मुंबई येथील बंदरची सरकारातून बंदी केली असता जोहरी याणी माल आणून विकिला. साा अटकेस ठेवावयाबदल पाठविले आा

१ स्वरूपचंद
१ किपू दीपचंद
१ मूलचंद उपरडा
१ जाईता फूलचंद

---

४

येकूण च्यार आसामी किले सिहीगड येथे पाठविले असेत. तर पक्या बदोबस्ताने ठेऊन पोटास सिरस्ते प्राा सेर देत जाणे.

¶*The Peshwa orders four jewellers to be confined at Sinhagad for selling articles at Surat while the city was under blockade.*

---

× येथून नाना फडणिसांचें अक्षर.

No. 406] [1-1-1781

श्री

यादी विसाजी केशव सुा इहिदे समानीन मया व अलफ मारनिलेपासून सरकारात द्यावयाचा करार

रुा

५००००१

यादी हप्ते बंदी

२००००१ पौष अखेर

१००००० माघ अखेर

२००००० चैत्र अखेर

५००००१

इंग्रेजाचे मसलतीमुळे सरकारांत नजर पांच लाख येक रुपया सदर मुदती प्रों द्यावें. येणेप्रों करार करावे छ ९ मोहरम पौष मास

¶*Visaji Keshav is made to pay Rs. five lakhs in three instalments.*

---

No. 407] [13-2-1781

पौ छ १० रावल इहीदे

समानीन फालगुन मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद येशवंत व जनार्दन माहादेव मुकाम विजयदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ माहे सफरपावेतों स्वामींचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथा(स्थित) आहे विशेष. गोवेकर फिरंगी याचे वकील राजश्री नारायण विठल धुमे हुजूर आहेत. त्याचे चिरंजीव पुण्याहून गोव्यास जावयाकरितां कोकणच्या मार्गें देवगडीं आले. त्यांस अरमारी दोन गलबतें पावणीस देऊन गोव्यास पोहोचऊन देणें म्हणून छ १८ मोहरमचे आज्ञापत्र सादर जाहालें. त्यास दोनच गलबते पावणीस द्यावीं तरी मालवणकरी

---

\+ यापुढील मजकूर खुद्द नानाफडणविसाच्या हातचा.

व वाडीकर सावंत यांची गलबतें बाहीर दुर्बुध्धीन फिरतात. गुदस्तांपासून जपतच आहेत. यास्तव पांच गलबतें सिलेपोस देऊन आज्ञेप्रमाणें मशारनिले यांची गोंव्यास रवानगी केली. त्यांस तेथे पोहोचऊन गलबतें मावारी बंदरी यावयासी निघालीं, परंतु उत्राणे[१] वाऱ्याचे तुफान भारी गेलें. यास्तव गोंव्याचे [२]हेट वाऱ्याचे सोईवर होती. इतकियांत हैदर नाईक याकडील गलबतांची गाठ पडली. त्यांणी पांच साहा दिवस याचा पाठलाग केला. त्यावर दुसरी इंग्रजी तरांडी भेटलीं, त्यांणींहि गलबतांचा पिछा राखोन आंगावर आलीं. उत्राणीमुळे उपरचा पला तिलभर न ये. तेव्हां सरकारचा आणि फिरंगी याचा हाली तह आहे, त्याअर्थें फिरंगी याचे बंदरी जाऊन आश्रा करावा ऐसा गलबतकरी याणीं विचार करून फिरोन गोंव्यांस गेलीं. फिरंगीयाणे गलबतांची तोडमोड जाली होती, त्याची उस्तवारी करून दिल्ही. परंतु इकडे यावयासी निरोप देत नाहीं. तालुके विजयदुर्गाकडे गोव्याचे बदरची सिबाड धरून नेली आहे, त्याचा जाबसाल जाहालियावर निरोप होईल. निखालस तों बोलत नाहीं. परंतु कारण हें दिसतें. याचा विचार व्हावा. याप्रमाणें गलबतां-वरील लोकांनीं सांगोन पाठविलें. त्याजवरून गंगाधरपंत सुभेदार यासीं हे वर्तमान सांगितलें कीं, सिबाड त्याचे बंदराची तुम्हासहि गोवेकराची पत्रे येतात व हालींहि फतेमारी आली आहे. सिबाड सोडून देणे म्हणून सरकारचे आज्ञापत्रहि सादर जालें तें तुम्ही पाहिले. अल्प गोष्टीसाठी तहाचे गोष्टीस अंतर येऊं नये. ही गलबते सरकारची पांच, लोकसुधा तेथे गुंतलीं. त्यास सिबाडे-वरील जिनस आगोधर विकला. खटाराहि हाली सावकारास देतां हा देऊं नये. याजप्रमाणें त्यांस सागोन सावकारासहि ताकीद केली आहे. ऐशास सदरहू सिबाडेविसी गंगाधरपंत यासी आज्ञापत्र सादर होऊन व त्यांकडील वकील हुजूर आहेत त्यास गलबताविसीं आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

*¶Govind Yeshwant and Janardan Mahadeo report to Nana Fadnis the difficulties that were encountered by the ships sent to Goa with the son of Dhume, the Portuguese envoy. These ships while returning from Goa were pursued by a flotilla of Haidar and also by some English ships. The ships therefore sought shelter in the harbour of Goa where they were detained by the Portuguese who refused to allow them to leave the port unless a Portuguese vessel captured by the Marathas was released.*

---

१ उत्तर वारा. २ दक्षिण वारा.

No. 408] [21-4-1781

श्री

राजश्री सरनाईक व भवानराव माने
व समस्त सरदार व बारगीर गोसावी

यांसी

आशीर्वाद विनंती उपरी. इंग्रज आज खालापुराहून कूच करून पुढें चालला. यास तुम्ही आपले किल्यापैकीं वीस माणूस बोरघाटी ठेवावे व विसापूरपैकीं राजश्री भिकाजीपंत अणास सांगोन पंचवीस माणूस ठेवावे व विठोजी नाईक जाधव हेटकरी याजकडील रामजी नाईक जांबुळकर वीस लोकसुधां खोपवलीस वाड्यांत ठेवावे आणि तुम्ही लोकसुधां किल्यास निघोन यावें. आपले किल्यापैकी वीस लोक येणे प्रो ठेवावे.

किता

१ बहिरजी नाईक पारटे
१ बापूजी जाधव
१ निंबाजी सावंत
१ बावाजी चव्हाण
१ रतनोजी नान्हेवे
१ खंडोजी केदारी
१ अपाजी माडेकर
२ निंबाजी नाईक साबळे याजकडील.
२ इंदापूरकर याजकडील
१ मुराजी नाईक याजकडील

—

किता

२ शाबाजी नाईक गोळे व खास बारदार याजकडील.
२ गंगाजी नाईक याजकडील.
२ पीर मा॥ याजकडील.
२ मढकर याजकडील.
२ खंडोजी नाईक बच्ये याजकडील.

—

येणेप्रमाणें ठेऊन बाकी लोक झाडून घेऊन यावे. रा छ २६ रा॥खर हे विनंती.

¶*Arrangements are made to post piquets at Khopavali as the English were advancing from Khalapur.*

---

No. 409] [11-5-1781

श्रीगजानन

विज्ञापना. इंग्रजाचे बहीरबुनगे बुधवारी रात्रीस गेले म्हणून काल प्रातःकाली चार घटका दिवसास बातनी आली. ती तेव्हांच आपणाकडे पत्र लिहून पाठविले

आणि मी लोक घेऊन तिकडे गेलो. त्यास पुढील तोंडचे डेरे, राहुट्या वगैरे लस्कर तिसरी तक्षीम गेले. पुढे निवडुंगाची बारी होती ते झाडून तोडिली. कल्याणचे मार्गे त्याचे बुनग्याची रव पडली आहे . की काय म्हणोन डोंगर-किन्याराने पुढे बातमीस लोक पाठविले होते. त्यास दिवसाची तिकडे बुनग्याची रव नव्हती. त्याचे गोटाजवळचे खाडीपर्यंत गेले होते. तेथे त्याजकडील दोन भोई सापडले ते धरून आणिले त्याणी सांगितले की, वणजारा वगैरे बुनगे बेलापुरास गेले. मुंबईकराचा सरंजाम मुबईस जखमी सुधा गेला. बंगालवाल्या-कडील जखमी व मदरासवाल्याकडील होते ते पनवेली बापटाचे वाड्यात ठेविले आहेत. छावणीचा मजकूर नाही. कपितान ओकर[१] खालापूरचे तल्यावर गोळी लागली तो पनवेलीस गेल्यावर मेला. मदरासकर होता. त्याजवळ आपण चाकर होतो. हाली त्याचेच डेऱ्यात राहातो म्हणून सागतात. भोई बराबर सिपाई देऊन लस्करांत पाठविले आहेत. चवकसी करितां सविस्तर विदित होईल. स्वारी घाटावर जाईतोपर्यंत यास सोडू नये. याणी आमचा गोट येऊन पाहिला आहे. येथून लोक स्वारीस जातात असी त्यास बातनी कळेल, याजकरिता सूचना लिा आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to the capture of two Kolis who gave news about the strength of the English force.*

---

*No. 410*] [*11-5-1781*

## श्रीगजानन

विज्ञापना+ ता। छ १६ जमादिलोवल वर्तमान येथास्थित असे विशेष. इंग्रजाचा मुकाम आहे. मुबईकराची पलटणे वगैरे सरजाम होता तो झाडून मुंबईस गेला. कलकते, बंगाला व मदरासकर मिलोन पाच साहा पलटणे आहेत. इतका अजमास दिसतो, व मुंबईहून ग्रहस्त आला त्याणेहि सांगितले. सुर्तेकडून जलमार्गे गहू, हरभरा, जोरी, बाजरी, तूप, तेल वगैरे जिनस मुंबईस फार आला. आज प्रातःकालीच सिपाई बातमीस पाठविले आहेत. ते आलियावर अधिकोतर असल्यास लिहून पाठवीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.+

¶*Haripant Phadke writes about the strength of the combined English forces—news which he got from a man from Bombay.*

---

१ कॅप्टन वॉकर. + पत्र हरीपंत फडक्याचें.

No. 411] [2-6-1781 ?

३

पुरवणी तीर्थस्वरूप राजश्री अबाजीपंत दादा. तेव्हां करणे ते करितील याची चिंता नाहीं. बाबाजीपंत सहस्त्रबुद्धे याचा मजकूर लिहिला त्यास हल्ली ते कोठे आहेत ते ल्याहावे, त्याप्रमाणें सरकारचे पत्र पाठवून देऊं. मनोरची मामलत कमावीस सांगितलीच तर धनीपणा वडिलाकडे. कमाविसदार जो होणे तो होईल अगर न होईल, याप्रमाणेच श्रीमंताची मर्जी आहे. कृष्णाजीपंत दादरकर याचा काल जाहाला म्हणून लिहिले, यास त्याची असामी त्याचे लेकाचे नांवें कृपा करून घ्यावी. कृष्णाजीपंत जवारकर याचा मजकूर फार लिहिला तो श्रीमंतास श्रुत केला व मीहि समजलो. याची चिंता नाहीं. राजश्री त्रिंबकराव मलहार यासी आपले विचारास येईल व चाकरीची मेहनत पाहून बक्षीस अगर तैनात इजाफा करणे असेल तो करावा. हुजूर इजाफा करणे कठिण आहे. यास्तव हुजूर पार पडे असे करावे व बक्षीस घ्यावे. सारे लोकाचा भरणा आपणाकडे किती, त्यपैकीं आपले ठेवणुकेचे किती व हुजुरून किती गेले, हे सविस्तर लेहून पाठवावे. व कारकून मोसंबेकरी लौकर पाठवावे. खर्चाची निवड असेल तर माणसे पाठवावी. ऐवज पांच हजार रुपये दिल्हे आहेत त्याजवर कर्ज काढून पाठवीन. सारांष सरकारचे काम निर्लोभ करीत असावे व गरीबांचा दुवा वेत असावे. रवाना छ ९ जमादिलाखर बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंति. केशव नाईक याचे चालवावे. राजकारण हाती असो द्यावे. लेहून पाठवू तेव्हां करणे ते करावे. तूर्त केल्यास फिरोन राखणे कठिण पडेल. फरासीस व वलंदेज व दुसरा एक टोपीकर येकूण तिंवें टोपीकर चेनापट्टणचे काम काढून मुंबईवर येणार. दक्षिण समुद्रास चालीस मनवार[1] फरासीसाचे आले आहेत. भाद्रपदमासीं आश्विन कार्तिक मासीं जे होणे ते मुंबईवर हगामा होईल. हिंदुस्थानांत सिंदे गेले. त्याजकडे इंग्रजाची अनुसंधानें सलुकाची लागली आहेत. श्रीमंताचे दैव थोर आहे. पुढें बीदं+ बसावा ऐसा आहे. कळावे हे विनंति. महिमाजीराव सुर्वे यांचें गांव याजविषयीं विनंति करीत आहे होतील तेव्हां खरे. कळावे हे विनंति.

¶*Second sheet of a mutilated letter addressed to Abajipant Dada. The paper refers to a naval expedition of forty men-of-war against the English sent by the French, the Dutch and another European power.*

1 Man-of-war. + बेत.

No. 412] [9-6-1781

विरेकटर

श्री

हे पत्र माहाराज्या रघुनाथराव
श्रीमंत साहेब

आपले पत्र इंदुस्थानचे कोंपनीस पोहचले. ते पत्र दिसोन येते की फार मुदतीचे आहे. तीन वर्षें दोन महिने ते पत्र कोडतच दिल्हे. हणमंतराव व मनवर पारसी या दोघाचे हातून पोहचले. पत्रातील अन्वय सर्व कलोन आला. त्याजवरून विचार केला व आमचे चाकर इंदुस्थानामध्ये आहेत. त्यास त्याचे पत्रामधे लिहिले की, श्रीमंताचे काम त्याचे अबरूलायक करावे व खुषी होऊन, सोया पाहून, आपल्यास दिलासा देऊन आमचा स्नेह आपले बरेपणास आहे.[1] आपल्यास काही न्यून जाल्यास आम्हास खुषी नाही. आपले सर्व अर्थ जनराल कलकतेकर यास समजत आहे व त्यास पुरा येखत्यार (आहे). आपला तफावत आहे, त्याची बंदोबस्ती करावी. आपली सला करावी ते असी कीं, हिंदुस्ता (नात) राजे आहेत त्यास पसंद पडावी. दुसरी आपली हकीकत लिहिली होती तरी त्यात आम्हास पडावयास दरकार[2] नाही. परंतु त्या समजावयास आम्ही त्याची नकल करू(न) गवनर जनराल कोशल यास पाठऊ. झगड्याचा उजाला फिरफिरोन जाहाला व आपले पत्रास मुदत फार जाहाली व झगड्याचे जे भांडण आहे त्याचा सेवट काय होईल ते कलत नाही. आम्हास असी ताकत नाही की, येथून त्या जाग्यास तफावत फार आहे व जनराल कोसिले याचे यखितयारांत अटकळीत आपले मर्जीमाफक कसे आले आहे हे काही आम्हास सांगवत नाही. परंतु आम्हास तेथून तपसीलवार त्याचे हाली पत्र आले, त्यात त्याणी लिहिले त्याचे आम्ही शोधन केले त्यात की, आम्हाजवल त्याणी हुकूम मागितला की, दादासाहेबास फार जोरावार सरंजाम पाहिजे आणि आम्ही च्याहातो की, सर्वविसी आपल्या मर्जीस व मातबरीस अनकूल व्हावे. या पत्रावर आमची साक्ष शुध्ध राजपणाची थोरली मोहर येथे मारली. शहर लांडण तरीख ९ जून सन १७८१.

¶*This is a reply from England to Raghunathrao's letter to the Company sent with his agents Hanmantrao and Manwar Parsi ; it appears to be a broken Marathi translation of the original English, which is already before the readers in print.*

---

१ या पुढील मजकूर निराळ्या वळणाचा. २ अधिकार.

No. 413] [10-8-1781

नकल.

श्री

राजश्री बाबूराव साळोंखे व
हरजी ना॥ पाटील गो॥ यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रों माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद सु॥ इसने समानीन मया व अलफ. तुम्ही राजश्री राघोजी आंगरे वजारतमाव सरखेल याजकडे चाकरीस होता. त्यास तेथून रजा घेऊन हुजूर आला. त्यास तुम्ही पहिलेपासून सरकारचे पदरचे, सा॥ तुम्हास चाकरीस ठेऊन तुम्हाबरोबरी दाहा गलबते सरकारची देऊन, मुबईची बंदी जाली आसतां हरयेक जागाहून साहुकार माल मुंबईस नेतात व तेथून आणितात त्याचे वगैरे बंदोबस्ताचे काम सांगून स्वारीस पाठविले आहेत, त्याविसी कलमे

दरमाहा खर्चाची नेमणूक रु॥
४० खुद तुम्हास
    २५ बाबूराव सालोंखे
    १५ हरजी नाईक पाटील
    —
    ४०
१५ बाजी धोंडदेव कारकून
—
५५

येकूण पंचावन रु॥ दरमाहा नेमणूक करार करून दिल्ही आसे. तरी तुम्ही पैदास्त कराल त्यापैकी घेत जाणे. मजुरा पडेल. पुढे चाकरी करून दाखविल्यावर तैनातेचा बंदोबस्त करून दिल्हा जाईल कलम
१

समुद्रात फिरता मुंबईस कोणी माल नेईल व तेथून आणील त्यास व बेकौली सिबाड, डगी, माहागिरी आढलल्यास खेरीज गोवेकर फिर्गी

तुम्हास नवे लोक आ॥ ५० पनास ठेवावयाची आज्ञा केली आसे, तरी दीड माही अडसेरीसुधा दर आसामी रु॥ ८ आठ प्रो॥ करार करून बारमाही चाकरी. सालाचे आठ रोजमरे येणे प्रा॥ चाकरीचे तेरखेपासून व तुम्हाबरोबर सरकारचे खिजमतगार व ढलाईत दिल्हे आहेत त्याचा रोजमरा अरमारचे पैदास्त पौ॥ देत जाणे मजुरा पडेल.
कलम

तुम्ही सरकारात चाकरीस राहिला. त्यास येकनिष्टपणे सेवा करीत जाणे. तुम्हास राघोजी आंगरे याजकडे चाकरीस पाठविणार नाही. तिकडील वसवसा न धरितां चाकरी बज्याऊन दाखवणे.
कलम
१

करून दस्त करणे आणि सरकार
जाब घेत जाणे. कलम
१

येकूण च्यार कलमे करार केली आसेत. तरी सदरहू प्रो वर्तणूक करणे. जाणिजे छ १९ साबान आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa entertains into his service Baburao Salonkhe and Harji Naik and fixes their remuneration. The work assigned to them is to watch the coast and to stop goods going to Bombay.*

---

*No. 414*] [*20-10-1781*

पौ छ १२ जिल्काद
सन इसने समानीन कार्तिक मास.

श्री

राजश्री गोविंदराव व चिमाजी
माणकर गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद सुा इशने समानीन मया अलफ. तुम्ही विनंतीपत्र छ २८ सवालचे पाठविलें ते प्रविष्ट जालें. धोंडो भास्कर तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबाचा मेहुणा म्हणवितो. तो च्यार पाचसे माणसानसी जंजिरकर शामलाकडे राहून पेशकर जाले आहेत. त्याचा बाप भास्कर बाबजी मतगडानजीक मौजे रातवन या गावी होता. त्याचे शोधात होतोच. त्यास बातमी राखून स्वारी पाठऊन धरून आणिला म्हणोन लिहिलें ते कळले. यैशास धोंडो भास्कर याचे बापाची बातमी राखून धरून आणिला, उतम केले. त्यास पके बस्तानी हुजूर पाठऊन देणे. याउपरीहि त्यांजकडील मुबादला वरचेवरी करीत जाणे. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. जाणिजे. जाणिजे छ २ जिलकाद बहुत काय लिहिणे

¶*The Peshwa asks Govindrao and Chimaji Mankar to imprison Bhaskar Babaji, the father of Dhondo Bhaskar who called himself Raghoba's brother-in-law and who joined the Sidi with five hundred men.*

6285

No. 415]

श्री

राजश्री[१] हरिपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपर सिहीगडची याद पाठविली. त्यावर करार करून पाठविली. राजश्री बापूकडे पाठऊन त्यांचेहि हातचें करार करून घ्यावे जे, सुभेदारानी केले ते आम्हांस मान्य व संतोष आहे. याच कामावर मदार काय? मोठी मोठी कामे करतील हा भरवसा मानितो. तुम्ही त्याची खातरजमा केलीच असेल करावी. रा छ १६ जिल्हेज हे विनंती

¶*Nana writes to Haripant to secure Sakharam Bapu's approval to the arrangement proposed for Sinhagad.*

---

No. 416] [3-1-1782

श्री

राजश्री राऊ पंडित

प्रधान गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा करीत असिलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. तुम्हांस पेशजीं सरंजाम दिल्हा त्याजविसीं वगैरे कलमें :

तुम्हास लाख रुपयांचा सरंजाम सन सबा सबैनांत व सन तिसा सबैनांत. त्यास सरंजाम देतेसमई सरकारांत गांवगनावार अकार समजला नव्हता; येकंदर माहालावरून लाऊन दिल्हा. हालीं तुम्ही पाहाणी करून जमाबंदी केली आहे, त्या प्रमाणें रुजुवात होऊन येकंदर जाबता जाहाला पाहिजे. सबब गांवगनावार खराब जमीन घडणीस लाऊन तपसिलवार कागद पत्र पाठवावे. कलम १

इंग्रजाचा सरकारचा बिघाड, याजमुळें सरकारातोन मुंबैची बंदी केली आहे कीं इकडोन जिनस वगैरे जाऊं नये व तिकडील माल आणूं नये, याप्रमाणें बंदी जाहाली आहे; असें असतां कोणी जिनस नेला आणिला हे समजल्यावरी त्याचीं पारपत्येंहि होत आहेत. याअन्वयें तुम्हांकडोन बंदीचा बंदोबस्त असेलच. तथापि बंदोबस्त कसकसा आहे हे समजलें पाहिजे. कलम १

---

१ सबंध पत्र नाना फडणिसांचे हातचे.

येकूण दोन कलमें सदरहूप्रमाणें लिहिलीं असत. याच्या जावसालास व आणखी कितेक मजकूर समजला पाहीजे, यास्तव माहितगार · शाहाणा माणूस मातबर सालजाब उगवी असा लौकर पाठऊन द्यावा म्हणोन आज्ञा. ऐशास लाख रुपयाचा सरंजाम स्वामीनी लाऊन दिल्हा, त्याचा अर्थ पेशजीं निवेदन होऊन लाख रुपयाचे बेरजेस कमी आला, त्याचे ऐवजीं दुसरा मुलुक दिल्हा. तत्राप त्यांतहि कांहीं विनंती करणे आहेच. येविसीं ते समई विनंती करावी तर सरंजाम लाऊन दिल्हा, त्यापासून गडबडीमुळें प्रांतास चोळण होऊन मुलूक खराबीखालीं आला. प्रांताची पाहाणी होऊन संचणी जाहाली म्हणजे जमीनजुमल्याचा झाडा निवोन सविस्तर सेवेसीं निवेदन करावें, याअर्थी पाहाणी करविली, ते कागद गुदस्तां सन इहिदेंत चैत्रमासीं दफ्तरास वन्हिप्रवेश होऊन विल्हेस लागले. याजकरितां हालीं आज्ञेप्रमाणें कागद तयार करविले आहेत. जाहालें म्हणजे पाहोन कागदपत्र सुधां रवाना होऊन येतील; व बंदीचा मजकूर तर पेशजींपासून इकडील तालुक्यांचा बंदीचा बंदोबस्त आहेच. स्वामीचे सूचनेप्रमाणे बातमी वर्तमानाबद्दल हरयेक नित्य माहागेरी मचवा पाठऊन आणीत जावें. त्यास सरकारचीं गलबतें रेवदंड्यापासून मुंबैचे नस्तपावेतों दाहापाच नेहमी आहेतच. तेव्हां चोरी छपीनें सावकाराचा निभाव होणे कलतच आहे. * * चे मामलेदार सरकारचे आज्ञेनें काय करीत असतील तें नकले. वरचील इकडील बंदोबस्त आज्ञेप्रमाणे आहे. येथें सामान सरंजाम पाहिजे तो दिगर बंदरींतून येतो जातो, त्यास देखील सरकारचीं गलबतें छबिन्यास आहेत तीं छडाछड करितात. वरचील मुंबैची बंदी असतां जो सावकार आमदरफ्ती करितो त्याचें पारिपत्य होतच आहे, व असल्यास आज्ञेप्रमाणे पारिपत्य करावयास अंतर होणार नाहीं. सेवेसीं निवेदन होऊन आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. रवाना छ १८ माहे मोहरम बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

*¶Raghuji Angria furnishes an account of what he had done in settling the Saranjam granted to him by the Peshwa. He also writes that he has adopted measures to prevent goods going to Bombay.*

---

*No. 417]* *[21-4-1782*

श्री

शेवेसी आज्ञाधारक भास्कर भिकाजी चरणावरी मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ७ जमादिलावलपावेतों सेवकाचें वर्तमान

येथास्थित असें विशेष. छ २१ राखरचे आज्ञापत्र रवाना जाले ते छ २ जावली सादर जाले, तेथे आज्ञा.

पाच हजार ऐवज कमी जाला त्याचा मजकूर रा उमाजी नरसिंह हाजूर आले आहेत, विनंती करितील
* * * विदित होईल
* * * टोपी का.
* * लागली आठे ठी-
* * आहे आद्याप वरी
तिकडस सलूक जाला नाहीं.

वसई वगैरे छ २६ तारिखेस द्याव-याचा करार जाला आहे म्हणोन बोलतात. आइकिले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. १

पुण्याकडील वर्तमान जिवाजी माहादेव याणी विनंती लिहिली आहे, त्याजवरून विदित होईल.

सरकारची मर्जी येथे येण्याची आसल्यास पुढे जाग्याजुग्याची सोई करणे म्हणौन सेवकास आज्ञापत्र रवाना करावयाची आज्ञा आसावी व अजम जनराल हर्नबी यास पत्र की विस्वनाथजीकडील ऐवज * खर्चास देवावा
खर्चाची * * * पत्र आल्यास
* * * वल्यास उगवेल
* * * पाठवावयाची

सलूक सिंदे याचे विद्य (मा) ने जाला म्हणौन कलला. त्याहून जनराल कोशलास पत्रे आली ती छ ४ जावली वाचून सलूक जाल्याच्या तोफा मारिल्या आणि दरवाज्यावर कागद मारिले, शहरात परगाव फिरविले. सर्वामुखी सलूक जाला म्हणौन जाले. १

टोपीवाल्यानी सलूक करून घेतला. त्यांत सरकारचा जाबसाल तरी मेस्तर आपटन कारनेल याणी तह केला आहे. त्या बमोजीब सरकारचा जाबसाल याप्रो येथे बोलतात. आईकिले वर्तमान सेवेसी लिहिले आहे.

मजकडे सरकारची सिलक आहे. माझे विद्यमानाचे हिसेब हजूर पाठविले आहेत. त्याजवरून विदित जालेच असेल. आज्ञा होईल त्याप्रो हजूर रवाना करीन.

विस्वनाथजीकडील ऐवजाचा मजकूर तरी प्रस्तुत ऐवज हातास येत नाहीं. निग्रह केल्यानी परिणाम लागेल असा अर्थ दिसोन येत नाहीं. युक्तीयुक्तीने जे घडेल ते करून ऐवज वसूल होईल तो हजूर रवाना करीन. १

विलायेतेस पत्रे व कारकून व आविंद[1] पाठवावयाचा आहे तरी गलबतास नोर[2] काये पडतो तो मनास

१ मुसलमान. 2 Freight.

आणोन हजूर लिहिणे म्हणौन आज्ञा. आज्ञेप्रो मनास आणिले. त्यास पागोटेवाला जावयाचें परम कठिण. घडणे दुरापस्त आहे. त्याहीमधे येथील आधिपत्याचे हुकुमावर जाणे घडेल तरी नोर पंधरा हजारपावेतो पडल. याप्रो मनास आणिले आहे त्यावरून लिहिले असे.

शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

*¶Bhasker Bhikaji mentions several incidents in this letter—especially the treaty effected with the English at Salbai by Mahadaji Sindia.*

---

*No. 418*] [*April 1782?*

श्री

यादी कलमें

आम्ही तिकडे येतो, परंतु आम्हास तूर्त खर्चास पाच लाख रुा पाहिजेत. त्यापैकी तीन लाख रुपये सुर्तेस द्यावे, व येक लाख रुपये पायागडाच्या मुकामी द्यावे, व येक लाख उज्जनीस द्यावे, येकूण पाच लाख रुा आम्हास पोहचते करावे म्हणजे तिकडे येणे होईल..

अमदाबाद अगर डबई आम्हास द्यावी किल्या—

मातुश्री बाईनी व तुम्ही व होलकरानी शफत द्यावी. मुलेरीचा किला आम्हास द्यावा. किल्याचा माहालचा खर्च जाऊन नकी वसुली खानदेश बागलाण प्रांती बारा लक्षाचे माहाल आम्हास द्यावे. तूर्त सामान सरंजामास आम्हास यक लक्ष रुा सुर्तेस द्यावे.

अगर त्रिंबकचा किला व लगते बारा लक्षाचे माहालसिवाय किल्याची व माहालची सिबंदी वगैरे खर्च जाऊन निके वसुली द्यावे. बाईनी व तुम्ही व होलकरानी शफत द्यावी. तूर्त आम्हास सामान सरंजामास सुर्तेस लाख रुा पाठऊन द्यावे. म्हणजे आम्ही आनंदवेली व त्रिंबक वगैरे जागाशी.

(अपूर्ण)

*¶This appears to be a draft of terms which Raghunathrao proposed to Mahadji Sindia and wished that they should be ratified before he could leave the protection of the English.*

No. 419] [May 1782

श्री

इलिस ब्रो सकटताल यास पत्र जे हणमंतराव व मनवर पारसी याजबराबर आपण आमचे पत्राची उत्तरे दोघाजवळ दोन पाठविली ते पोहचली. त्यांत मजकूर कीं पातशहानी बहुत मुदत जाहली, तेव्हा सारा हिंदुस्थानचा तालुका या कंपनीस दिल्हा आहे. तरी त्या लोकानी तुमचा जाबसाल केला असेल म्हणोन कलमी केले व दोस्तीचे मरात[1] लिहिले ते जाहीर जाहले. त्यास आपल्यास आम्ही बहुत दोस्त जाणत आहो. आपल्या खुबीचे व दुरंदेसीचे जे मरातब आहेत ते आपल्यास योग्य आहेत. आमची दरखास्त[2] हेच कीं आपले दोस्तीचा सिलसिला[3] हंमेशा जारी असावा. हिंदुस्थानचा कंपनीकडे यखतियार हे गोष्ट येथार्थ आहे. लेकिन कंपनीवरहि हुकूम करणार पातशहा खावंद आहेत, त्यासही ताकीद करणार खावंद आहेत. त्यास आम्ही इंग्रजाचे स्थलास आपले कामाची उमेद ठेवून बसलो आहों. त्यास येथील मजकूर तरी

( जागा कोरी )

येणेप्रमाणे दोन कलमे लिहिली असत. तरी दोस्तीचे जागा आमचे कामाविशीं कोषीस करून काम होऊन येई ते करावें, तुम्हास मुनासब[4] असे. इकडे हैदरखानाचे वगैरे लढाईमुळें आमचे काम करावयास दिरंग असला तरी जोपर्यंत आमचे काम करावयाचा वख्त येईल तोंपर्यंत आमचे पर्वीची बेहबुदी व्हावी, आणि फितुरियास सलाहच करावयाचे ठरल्यास आम्हास मुलूख द्यावयाचा ठरेल तो फितुरियानजीक न द्यावा. कारण कीं त्याचे नजीकच दिल्हा तरी ते आम्हास दगा करतील. आणि आम्ही इंग्रजाचे आश्रयास आलो असतां आम्हास फितुरीयाचा दगा न व्हावा हे इंग्रजास योग्य आहे. सबब हिंदुस्थानच्या यख्तियारीस ताकीद पातशहापासून करावी कीं जर सलूक केला तरी श्रीमंतास मुलूक देणें तो गुजराथ प्रांतीं इंग्रजांचे मुलकाचे नजीक द्यावा म्हणजे हिंदुस्थानच्या फौजेशी इंग्रजाचा बिघाडहि करावयाचा जाहल्या आम्ही उपयोगीच पडूं.+ *

¶*This appears to be a draft of a letter intended for Ellis Browe, Secretary, by Raghoba who expresses his thorough reliance on the protection of the English and requests him to arrange to incorporate in the treaty with the Peshwa, if it comes off at all, terms by which he (Raghoba) could get such districts assigned to him as would be adjoining to the territory of the English and away from his enemies.*

---

१ मजकूर. २ मागणी अर्ज. ३ दळणवळण. ४ योग्य; रास्त.

+ सन १७८२ च्या उन्हाळ्यांत सालबाईचा तह ठरत असतां राघोबाचे वकील पत्रें घेऊन परत आले त्यांस जबाब म्हणून त्यानें हे मसुदे तयार केलेले दिसतात.

No. 420]

श्री

उइलिम जिमीस (जेम्स्) यास पत्र जे मनवर पारसी याजबराबर तुम्ही पत्र पाठविलें तें पोहचले, कितेक मरातब कदीम दोस्तीचे व आमच्या कामाचा खुलासा लिहिला व जुबानी मनवर पारसी याचे जुबानी सांगून पाठविले ते सविस्तर जाहीर होऊन बहुत खुषी जाहली. ऐसियास तुम्ही आमचे कदीम दोस्त व जे दोस्तीस लायक तेच तुम्हाकडून अमलांत येईल हे आम्हास खातरजमाच आहे. आम्ही येथील मजकूर सविस्तर कंपनीस लिहिला आहे. त्यातील सर्व अर्थ तुम्हास कळतील त्याप्रमाणे कामाची सरबराई करावी हे उचित असे.

¶*Raghoba's draft letter to William James expressing his reliance on his friendship with the English.*

---

No. 421] [31-1-1783?

पौ छ ६ रोवल

श्री

तीर्थरूप राजश्री आबाजीपंत दादा सुभेदार

वडिलांचे सेवेसी

अपत्यें भिकाजी गोविंद मुकाम पुणें साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. तांदुळवाडीचे मुकामचीं पत्रें पेशजी व अलीकडे पाठविलीं तें पावलीं; साकल्य मजकूर कळला. व श्रीमंताचीं पत्रें प्रविष्ट केलीं व साकल्य वर्तमान श्रुत केलें, त्याचे जाबसाल मागाहून पाठवितों. वडिलीं राजश्री रामचंद्र गणेश काजाकामाकरितां पाठविला त्यास आजारी पडला आहे. हाली राजश्री राघोपंत यासी पाठविलें आहे. ते येऊन पोंहचलें नाही; पावलियावर सारे कागदांची उत्तरें पाठवितों. वरकड कार्य लिहिलें होतें तें प्रस्तुत करूं नये, याप्रमाणें आज्ञा आहे. बलालगड घेत-ल्याचें व इंग्रजाचे लोकाशीं लढाई जाहल्याचें राजश्री कृष्णाजीपंतीं पत्रें पाठविलीं व आपण लिहिलें तें सविस्तर श्रीमंतास निवेदन केलें. हली हजार माणूस आपलेकडे रवाना केलें आहे, लौकरच येऊन पोंहचेल. राजश्री महिमाजीराव सुर्वे यांसी सोन्याचें कडें बक्षिस द्यावें लागतें म्हणोन लिहिलें, त्याप्रमाणें विदित केलें. आज्ञा जाहाली कीं करार केला आहे त्याप्रमाणें द्यावें. मिठाचीं वगैरे मजकुराचीं उत्तरें श्रीमंतांची घेऊन पाठवितों. मकरसंक्रमणाचे तिळ शरकरा पाठविली ते पावली.

6291

आज्ञेप्रमाणें स्वीकार केला; व ज्यांस प्रविष्ट करावयाची त्यांस प्रविष्ट श्रीमंत यजमानास व नानास व तात्यास प्रविष्ट केली, उत्तरें घेऊन पाठवितों. तीन हजार रुपये हुजुरून दिल्हे ते वसूल जाहाले आहेत. दुसरे सात हजार देविले आहेत त्यास मुदत आहे. गंभीरगडच्या सनदा व घांटावरून जिनस आणून द्यावा याप्रमाणें देणीं करून घेतलीं आहेत, कोणी मजजवळ चांगला कारकून झटोन काम करी ऐसा नाहीं. मी जाबसालास गुंततों तेव्हांच दफ्तरचें काम होत नाहीं. राघोपंत पाठविले ते आलियावर सर्व उलगडा करून पाठवितों. जीवधण व कामणदुर्ग वसवितों म्हणून लिहिलें, त्यास आपले दृष्टीस येईल तसें केलें पाहिजे. रवाना छ २७ सफर. बहुत काय लिहिणें कृपा असो दीजे हें विनंती. इंग्रज पांच कोशलदार हुजुर बोलणें बोलावयासी आले आहेत; ठरेल मजकूर तो आपणांस लेहून पाठऊं हे विनंती.

¶*Bhikaji Govind to Abajipant Dada giving news from Poona and accepting receipt of the customary exchange of sesamum and sugar.*

---

*No. 422]* *[20-4-1783*

## श्रीगजानन.

श्रीमंत राजश्री नाना फडणीस
साहेबाचे सेवेसी

सेवक जानराऊ धुलप मुकाम जंजिरे विजयदुर्ग कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल तागायत छ १७ जमादिलावलपावेतों यथास्थित असे विशेष. फिरंगियाचें मोसंबी तराडे मालवणच्या किनाऱ्यास आले, तेव्हां मालवणकरांहीं गलबतें पाठऊन तरांडे नेले, ते इर्षा फिरंगीयासी येऊन आपलें आरमार घेऊन फिरंगी याणें जंजिरे सिंधुदुर्ग येथें वेढा दिल्हा. स्वराज्यांतील स्थल, या समई कुमक करावी म्हणून मालवणकराचें पत्र आम्हांस आलें. टोपीकर तेथं सेर जाहाल्यानें उत्तम नाहीं हें समजोन खुस्कीने जमाव रवाना केला, जलमार्गें गुराबा घेऊन आम्ही गेलों. सरकारचें आरमार मालवणच्या उपराल्यास येतें असें समजोन फिरंगी याणें आपलें आरमार काढून बाहेर गेला तों आम्ही जाऊन पोंहोंचलों. बेजरब गुराबासुधां चालोन घेतलें. युध्ध च्यार दिवस मातबर जाहालें. युध्ध होत होत धावणी मुंबईच्या बाऱ्यावर गेली. युध्धाची रात्र जाहाली. जूझ होतां फिरंगीयाची तरांडी साहुकाऱ्या दोन मंज्या दस्त करून आणिल्या. नारळ वगैरा किरकोळ जिनस आहे. पेशजी वीस गलबतें सुधां चिरंजीव राजश्री

भगवंतराव धुलप यांसी स्वारीस पाठविलें. सारांश गलबतें स्वारीस गेलीं. भारी आरमार नव्हतें; परंतु असल्या सरंजामामध्यें खुस्कीनें जमाव रवाना करून जलमार्गें गुराबासुधां जाऊन, फिरंगीयाचा वेढा मालवणाहून उठऊन पराभव जाहाला, हें वृत्त आपणांस अवगत जाहालें पाहिजे. सर्व भरंवसा आपला धरून स्वस्थचित्तें संतोषरूप राहोन स्वामीसेवा करीत आहों. आपण सर्व प्रकारें दरबारीं आमचें साहित्य करीत आहां, तेव्हां किमपि चिंता नाहीं. आम्हीं आपले पदरीचे असो. विस्तारें काय लिहावें. कृपा करीत असिलें पाहिजे हे[१] विनंती.

¶*Janrao Dhulap reports to Nana Fadnis how he forced the Portuguese to raise the siege of Sindhudurg.*

---

*No. 423*] [*4-8-1783*

पौ छ २२ रमजान

सन आर्बा श्रावण मास.

**श्रीसीताकांत**

**राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांसी**

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राये कळो आला. राजश्री दादा गंगातीरास येणार, येविसीची बोलणीयाचे अर्थ राजश्री बलवंतराव विष्णु व जिवाजी माहादेव यानी लिहिलेच असतील. त्यास पुण्याहून निघोन धोडप किल्याजवल येऊन मुकाम केला. दादा बारीखाली राहिले. भेटी आशाढ शुध द्वादसीस जाहाल्या. भाशणे बहुत स्वछतेची जाली. पुढे जो निश्चये होईल त्याप्रमाणे लिहिण्यात येईल. वरकड वर्तमान बालाजी सिवदेव याचे पत्रावरून कलेल म्हणोन लिहिले. ऐशियास, आपण येशस्वी आहेत व ज्याप्रसंगी आपले जाणे घडले त्या प्रसंगी येशच प्राप्त होईल यैसा पुर्ता भरवसा. राजश्री दादाच्या व आपल्या भेटी जाहाल्या हे यैकून बहुत संतोष जाहाला. जेथे स्वछतेची बोलणी तेथे सर्व मनोदयानरूप घडेल. पुढे गंगातीरी राहावयाचा आथवा पुण्यास जावयाचा निश्चये त्याजकडील जो होईल तो लिहिण्यात यावा येथून वरचेवरी पत्रे राजश्री बलवंतराव विष्णु व जिवाजी माहादेव याजकडे आपले नावे पाठवण्यात आली ते तिकडून त्यानी आपणाकडे पाठविलीच

---

१. येथून अक्षर जानराव धुलपाचें.

असतील व इकडूनहि मुजरद सुतरस्वाराची जोडा पत्रे देऊन रवाना केली आहे. ते पोहचून सविस्तर मजकूर कलला असल. त्यास आपले जाण्याचा योग सत्वर पुण्यास घडावा आणि तेथील पत्रे आपली यावी. तदनुसार येथील विचार सर्व घडावा हे मानस. येदर्थीच पूर्वी सूचना लिहिण्यात आली आहे. तेथील प्रसंगानसार येथे उतरे यावी. रा छ ९ माहे रमजान. आपणाहून वर्तमान वरचेवर लिहीत असावें. येथील लक्ष सर्व आपले सल्हामसलतीवर असे. बहुत काये लिहिणें, लोभ असों दीजे, हे विनंती.

¶*Mudhoji Bhonsle learns with delight the news of an interview between Haripant Phadke and Raghoba and makes enquiries about the outcome of it.*

---

*No. 424]* *[21-9-1783*

पौ छ+ १६ मोहरम
आर्बा रामजी पाटिल
याणी दिल्हे.

**श्री**

**राजश्री बालाजीपंत नाना**
**गोसावी यासीं**

दंडवत विनंती उपरी. इंद्रसेन यास दीड लक्षाची जाहगीर द्यावयाचा करार केला आहे. त्याची नेमणूक करून सनद पाठऊन द्यावयाविशी येथून लिहिलें होतें. त्याचें उत्तर आपण लिहिलें कीं, कलकत्याहून पांच कलमाचा करार होऊन यावयाचा आहे, तो आला म्हणजे दीड लक्षाची जाहगीर द्यावयाची सनद पाठऊन देऊं. दीड लक्षाची जागीर आंतरवेदीस त्याचे मुलकास लगती नेमून पाठऊं म्हणोन तें कळलें; ऐशी पांच कलमांपो दोन कलमांचा जाबसाल होऊन आला. त्याच्या नकला व तीन कलमांचे ठरावाचा मजकूर पूर्वी आपणास लिहून पाठविला आहे त्याप्रो पांच कलमांचे पत्र शिक्यानिशी पाठवावें म्हणजे पांच कलमाचें पत्र इष्टिनाचे दस्कतानिशी व कंपनीचे मोहरेनिशी घेऊन आपणांकडे पाठऊन देऊं. पांच कलमांचा मजकूर करारांत आला आहे त्याप्रमाणें पक्केंच आहे, गुंता नाहीं. इंद्रसेन याचें मानस दीड लक्षाची जागीर सुरतेलगती द्यावी असें आहे व बोलण्यांतही असेंच आलें आहे. त्यास सुरतेलगती सोय होईशी असल्यास करून सनद पाठऊन द्यावी, नाहीं त्यापक्षीं यमुने अलीकडे कालपीचे

---

+ नाना फडणीसाचे हातची.

लगती दीड लक्षाची जागा नेमून सनद पाठऊन द्यावी म्हणजे इंद्रसेनास समजोन सांगावयास येईल. इंद्रसेन शाहाणा प्रमाणिक, ज्या गोष्टी करारांत आल्या त्याप्रमाणें त्याणें आमलांत आणून दिल्ह्या; पुढेंहि सरकारचा व इंग्रेजाचा स्नेह चालावा या गोष्टीस फार जपतो. यास कराराप्रमाणें जागीर लाऊन दिल्यानें सरकारउपयोगींच आहे. दीड लक्षाची जागा नेमून सनदा पाठऊन द्याव्या. रवाना छ २९ जिल्हेज बहुत काये लिहिणें. लोभ कीजे हे विनंति.

¶*Mahadji Sindia writes to Nana Fadnis about the jagir promised to Anderson for his exertions in negotiating the peace treaty. He suggests it should be situated either near Surat or near Kalpi.*

---

*No. 425*] [*4-10-1783*

पो छ जिलकाद सन
आर्बा समानीन कार्तिक
मास.

श्री

राजश्री बालाजी पंत नाना
गोसावीं यासीं

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माहादाजी सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. उरपाड माहाल इंग्रजांकडून सुटला, त्यास पूर्ववतप्रमाणें राजश्री विसाजीपंत बापू याचा याजकडे द्यावा, येविसीं पेशजी आपणांस दोन च्यार वेळां लिहिलें; परंतु महालची सनद होऊन माहाल याचा याजकडे होत नाहीं. राजश्री रामजी पाटीलहि आपणासी बोलतच आहेत; आपण नानाप्रकारच्या दिकती काडितात म्हणोन यैकिलें. त्यास याचा वोढगस्तीचा प्रकार. आमचेहि वचन माहाल सुटल्यानंतर तुमचा तुम्हाकडे देतों म्हणून गुंतलें आहे, तरी महालची सनद करून द्यावी, येविसीं वारंवार आपणास लिहावेंसें नाहीं. याचा अर्थ आपल्याहि ध्यानांत आहे. त्यास आनमान न करितां सनद उरपाड माहालची करून देवावी. रवाना छ ७ जि+लकाद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia to Nana Fadnis requesting the latter to give back the Pargana of Orpad to Visaji Bapu.*

+ येथून अक्षर निराळे वळणाचें, बाजूस महादजीचा शिक्का.

No. 426] [1782 (?)

पौ छ ११ रबिलाखर

श्री

तीर्थरूप राजश्री आबाजीपंत दादा
सुभेदार वडिलांचे सेवेसीं

अपत्यें भिकाजी गोविंद मुकाम पुणें साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे, विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. शिरगांवचा कोट सरकारांत फते जाहाल्याचें वर्तमान सविस्तर लिहिलें तें कळलें, व श्रीमंताचें पत्र प्रविष्ट केलें. श्रीमंताचें बोलण्याचा भाव इंग्रजाचा तह ठरत नाहीं, त्या अर्थी जमीनदोज किले ठाणीयांचे अवघड पडेल, परंतु न केले तर त्यास चैन पडों द्यावयाचें नाहीं; यांत काय जें घडेल तें घडो. राजश्री आबाजी भगवंत जाऊन उत्तर आपणांसी लिहिलें होतें तें काम हलीं करावें न करावें याची विनंती करून मागाहून लेहून पाठवितों. आजच जासुदाबराबर सविस्तर लेहून पाठविलें आहे त्यावरून कळेल. शिरगांवांस घोडी सांडलीं ते आपण बसावयासी ठेवावी याप्रमाणें आज्ञा जाहाली आहे. कळावें रवाना छ २९ रबिलौवल. पत्रें आपलीं फार आलीं. जाबसाल लिहिला तो फिरोन स्मरणानें तुसवत् जाहला असेल. करणें तें चित्तांत आणून करीत जावें. बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनंती.

¶*Bhikaji Govind advises Abaji Pant to create trouble for the English and to give them no rest as there is no possibility of amicable relations being established with them.*

---

No. 427] [19-2-1782?

श्री

राजमान्य राजश्री भास्कर भिमाजी यासी रघुनाथ बाजीराव नमस्कार सुा सलास समानीन मया व अलफ. राजश्री महादजी सिंदे याजकडून सलुकाचे बोलणे बोलावयास हुजूर कारकून आले होते. त्यांचे बोलणे कीं खासा स्वारी इकडे यावी, आम्ही चाकरी करून दाखऊ, असे कितेक स्नेहाचे बोलणें बोलतात; परंतु त्याचे आम्हास प्रमाण वाटत नाही. आम्हास तिकडे नेऊन दगा करावा किंवा फितुरी याचा व त्याचा पेच पडला आहे हा काही खुलासा समजत नाही. सबब त्याचा शोध घ्यावयास हुजुरून सिंदे याजकडे कारकून पाठविले असेत. त्याजकडील जसा जाबसाल आम्हास कळेल तसे आपल्यास कळऊ म्हणोन तुम्हीं जनराल हनेबी यास बोलणे. जाणिजे छ ५ रोवल.

¶*Raghunathrao informs Bhaskar Bhimaji that he is awaiting the return of his agents from Mahadji Sindia before deciding about his future plans.*

# Index to Selection No. 36

## *The First Maratha War*

(Figures denote numbers of letters)

### A

**Abaji Mahadeo**—76A; 113; displeased with Raghoba's conduct of affairs 257; 341.

**Abajirao Krishna Pratinidhi**—wishes the Barbhais success in their enterprise 32.

**Ahalyabai Holkar**—60; 251; 344; 403.

**Ako Sakharam**—son of Sakharam Bapu—308.

**Ambadas**—(son of Narottam Kishor?) 139; 140.

**Amin Saheb Pathan**—leads an army to the siege of Ahmedabad 257; threatened by the Barbhai's new ally Govindrao Gaikwad 289, 296, overpowered and seeks for terms 297.

**Amritrao Raghunath**—son of Raghoba—despatched against Ahmedabad 387, 390, 392, 393.

**Anandrao Dhulap**—46; captures two English vessels 221; ordered to move to Bassein to support Visaji Keshav 315.

**Anajirao**—283.

**Anandibai**—wife of Raghunath Bajirao—shows great presence of mind when surrounded by enemies 20; 58; 60; follows her husband to Ankaleshwar 97A; 251; 257; proceeding to her husband's camp 282; 397.

**Anandrao Gopal**—334.

**Anandrao Ram**—taken captive in the siege of Salsette 139.

**Anandrao Prabhu**—Holkar's Sardar—370.

**Anandrao Rastia**—despatched to the help of Naropant Keskar 188; 189.

**Anandrao Sindia** of Rewdanda—captures a trading vessel of the English 310.

**Anderson**—suggestion about granting him a jagir 424.

**Antaji Gabaji**—295.

### A—*contd.*

**Antaji Nagesh**—Fatesing's Karbhari 182; offers excuses for his master's visit to Raghoba 266.

**Anubai Ghorpade**—daughter of Balaji Vishvanath—requisitions help for the relief of Ichalkaranji 321.

**Aplaji Narayan**—63, 70.

**Appa Balwant**—sent in pursuit of Muhammad Isaf 241, 243, 247, 248, 249; overtakes Isaf 260, 261; his illness 269.

**Appaji Ganesh**—69; 85; invited to his presence by Raghunathrao 105; 158; mediates between Govindrao Gaikwad and Haripant Phadke 162; 177; 199; family confined for partisanship of Raghoba 235; prepares to stand a siege 257; 259; 269; 289, 296, 297; 299; hard pressed by the English 378; loses the city of Ahmedabad 379.

**Appaji Hari**—131.

**Appaji Paygude**—256, 259, 265, 269; 389.

**Appaji Ram**—Raghoba's clerk—sent to Surat to sell Raghoba's jewellry 143; 283.

### B

**Babuji Naik**—terms granted to placate him 43.

**Baburao Appaji Bavdekar**—a supporter of the Pretender—confined at the Visapur fort 377.

**Baburao Ballal**—318.

**Baburao Hari Gupte**—252; his mother released 306; deserting Raghoba's party 320.

**Baburao Kane**—346.



MO-I Bk Ca 12—47

B—*contd.*


**Baburao Patankar**—captured in the battle of the Mahi 143, 158; 340.

**Baburao Salonkhe**—413.

**Baburao Vishvanath Waidya**—reports the situation in Nagpur 63; 70.

**Bachaji Waman Phadke**—343.

**Bahirji Takpir**—399.

**Bahiro Raghunath Mehendale**—Kamavisdar of Surat—asks Naro Anandrao to enforce a strict blockade of Surat against the English 82, 83; reports the capture of Salsette and asks Naro Anandrao to continue the blockade 111, 120, 129, urges the necessity of blockading Surat and Broach 133, 134, 135; reports Raghoba's flight to Surat 152; 209; suggests how to intercept effectively letters passing between Raghoba and his accomplices 245; 253; 254; starts for Surat 278.

**Baji Ballal Paranjpe**—195.

**Baji Gangadhar** of Belapur—asked to watch closely secret correspondence passing through his station 301.

**Bajipant Joshi**—despatched against Kolhapur 325, 329, 330; reprimanded for want of discipline in his army 355; asked to strengthen the defence of Bassein 404.

**Bajirao Barve**—Raghoba's agent—sent to Haidar 141; 283; 305; reports his woeful plight at the Court of Haidar and begs to be relieved 332; asked to foment trouble for the Barbhais on the southern frontier 390; joins Raghoba at Surat 400; 403.

**Balaji Bapuji Kelkar**—reports the defeat of Raghoba at Kaira 209A.

**Balaji Ganesh**—reports risings in the Konkan in behalf of the Pretender 313; defeats the supporters of the Pretender 315.

**Balaji Janardan** alias **Nana Phadnis**—4; 14; 25; courts an alliance with the Nizam 29, 30, 38, 39; removes Gangabai to Purandar as a measure of safety 32; invites Sabaji Bhonsle to join his party 33; attempts to conciliate Babuji Naik 43; 46; learns of the meeting


B—*contd.*


**Balaji Janardan** alias **Nana Phadnis**—contd. of Sindia and Holkar with Dadasaheb and the subsequent negotiations 500, advised to secure the good-will of the Councillors at Bombay by means of presents 54; 59; 61; leaves Purandar to meet Raghoba 67; orders the confinement of the relatives of Dadasaheb's accomplices 76A; 93; 250; carries on negotiations with the English envoy 292; congratulates Bhivrao Panse on his success over the Pretender 312; informed of risings in the Konkan in behalf of the Pretender 313; learns of the capture of the Pretender 314; 333; 339; reinforces Bhivrao Panse 347, 349, 350, 351, 352, 356; exerting himself for repelling the English force 361-67; asks Behere to suppress the rising of Keso Krishna 371; 372; issues instructions to guard the Bombay-Poona pass 374; his differences with Holkar 387; reinforces the garrison of Bassein 404; 424; 425.

**Balaji Khanderao**—65; 145; 150; asks Naro Anandrao to march to his assistance with the utmost urgency 153; 256.

**Balaji Naik Pande**—his family confined for Raghoba's partisanship 235.

**Balaji Narayan Sohani**—51.

**Balajipant Lele**—20.

**Balajipant Thosar**—402.

**Balaji Vithal Phadke**—238.

**Balarao Govind**—314; 325; 344.

**Balwantrao Dhondadeo**—65; 145; 150; 256.

**Balwantrao Prabhu**—370.

**Balwantrao Vishnu**—273.

**Bapuji Hari**—238.

**Bapuji Janardan Prabhu**—punished for his treachery 185; 198.

**Bapu Moreshwar**—45.

**Basalatjang**—defeated by a detachment of Haidar 283.

**Bhagoji Balkavde**—reports the movements of Haripant Phadke and Raghoba 185; 257.

**Bhagawant Malhar**—394.

**Bhagawantrao**—185, 194, 197.

B—*concld.*

**Bhagawantrao Dhulap**—422.
**Bhaskar Babaji**—414.
**Bhaskar Bhimaji**—Raghoba's agent sent to Bombay—384; 400, 417, 427.
**Bhawani Kalo**—63; 70; 273.
**Bhawani Nagnath**—273.
**Bhawani Shivaram**—Bhonsle's ambassador to the Poona Court 8; 18; 19; 23; 63.
**Bhawanji Lokhande**—rushing reinforcements to Salsette 92.
**Bhawanrao Pratinidhi**—breaks out in revolt against Raghoba 21; 156.
**Bhikaji Govind**—426.
**Bhikaji Naik Kolhatkar**—322.
**Bhikan Khan**—280.
**Bhivrao Mantri**—15.
**Bhivrao Yeshwant Panse**—marches against the Pretender 310, engages the Pretender below the Bor Ghat 311, 312; 324; being reinforced 334, 342; 346; defends the passes against the joint army of Raghoba and the English 347, 348, 349; gains a success over the English 351; 352; 353; 356, 360, 361; in close grips with the English 362, 363, 364.
**Boddam, Mr.**—327; 384.

C

**Carnac, General**—327.
**Chandrarao Pawar**—267, 268, 344; creates trouble in Khandesh 370; reports his activities to Raghoba 382.
**Changoji Kadam**—169, 177, 181, 185; detached towards Jambusar 189; drives the English out of Jambusar 190, 191, 192, 193; 196; 226; 246; 253; 288.
**Chetsing, Raja of Benares**—gets incensed and attacks the English 401.
**Chimaji Mankar**—414.
**Chimna Bapu Bhonsle**—273.
**Chimnaji Nilkanth**—34.
**Chintaman Madhavrao**—takes reinforcements to Naro Anandrao 124, 128.
**Chinto Vithal Rairikar**—Raghoba's favourite —20; 141; traced at Ujjain 344; 370.

D

**Darkoji Nimbalkar**—230.
**Daryabai Bhonsle**—11; 17; 23; her differences with Sabaji composed by Trimbakrao Pethe 24; 33.
**Dattaji Narayan**—clerk to Naro Anandrao posted at Surat—writes news about the attack on Salsette 88; 89; 100; 101; 106; escapes from Surat and reports the refractory attitude of the Nawab 107.
**Daulat Baburao Gupte**—ravages the Surat Mahals 66; disappears at the approach of Naro Anandrao 76, 85, 119; 147; 180; 183; despatched to Poona under escort 331.
**Devji Avadhutrao Jatharkar**—238.
**Dhausha** (Jabitjang)—127; 221; kills Ismail Khan of Ellichpur 225; 378; 379; 380, 381, 385.
**Dhondji Sindia**—334.
**Dhondo Babaji**—poses as Raghoba's brother-in-law—414.
**Dhondopant Dada** (Dhondo Mahadeo)—309; 338.
**Dhondo Ram**—27, 29; 31; 35.
**Diwakar Purshottam**—63; 70; wishes success to the undertaking of the Barbhais 102.
**Durgabai**—Rani of Kolhapur—47.
**Durgoji Bhapkar**—371.

E

**Ellis Browe**—419.
**English, the**—occupy Salsette and threaten Bassein 44; 46; 54; a policy of disengaging them from the alliance with Raghoba advised 58; 72; help Raghoba with troops 74; 77; blockade of Surat planned against them to prevent their getting supplies 82, 83; their attack on Salsette referred to 84; their share in the revenue of the district of Broach confiscated 90; 97A; 99; negotiating with the Mughal Subhedar of Surat 100; blockade of Surat being enforced against them as a measure of reprisal 108, 111, 123; 125; 129; 133; 139; 151; receive the fugitive

E—*contd.*

**English,** the—contd.
Raghoba at Surat 152; 154; 157; raise batteries at Dharavi 163; 166; try a distant cannonading of Bassein 170; help Raghoba with men and munition 177; recruiting troops for the coming struggle 182, terms of their alliance with Raghoba 185; establish posts in Broach district 186, 187, 188, 192; attempts to disengage them from Raghoba 196; 200; seek to settle the dispute with the Poona Government 201; 206; their artillery prevents Haripant Phadke from coming to close grips with Raghoba 209; suffer a reverse at Kaira and are reported to be falling back on Surat 209A; 213; repulsed at Napad 218; disspirited by the defeat 223; occupy Kaira 224; inclined to treat with the Poona Government 228; 237; 253, 254; their friendship courted by Raghoba 255; their gains by the treaty with Raghoba 257; 268; advise Raghoba to march upon Poona 269; send Col. Upton to treat with the Poona Government 281; negotiations watched with interest 284, 285, 291, 297; disposed to make peace with the Poona Government 307; 310; 324; decide to renew the struggle on the failure of peace-talks 325; 326; 327; 336; 343; 345; march towards Poona 347; receive a set-back 351; their night attack fails 359; their fire returned by Maratha guns 363, 364; 365; battle of Ahmedabad 378; capture the city 379; 380, 381, 383; 386; 394; 395; their movements and plans being watched 396; suffer reverses all round 401; retreat on the descent of the Maratha force into Konkan 403; 408; 409; fall back upon Bombay 410; rumours of a French naval expedition being fitted against them 411; peace treaty agreed upon 417; 419; 420.

F

**Faizullakhan**—11.

**Fakirji Fadtare**—request to reward his services at Kasegoan 340.

**Fatekhan Rohila**—tracks down and seizes Muhammad Isaf 267.

F—*contd.*

**Fatesing Gaikwad**—invites Naro Anandrao to move expeditiously to check the ravages of Daulat Baburao in Surat Mahals 66; 68; 69; 73; 75; suggests Naro Anandrao how he could relieve him 78; 79; asks Naro Anandrao not to delay the reduction of Narottam of Hasot 80; asks Naro Anandrao to cross to the North of the Narbada with a view to forestall Govindrao Gaikwad his rival 81; advises Naro Anandrao not to be entangled with the English at Surat but come to his assistance immediately 85, 86; congratulates Naro Anandrao on the reduction of Narottam Kishor and asks him to come to his assistance 87; reports that his opponent is daily gaining in strength and needs to be put down without delay 94; reports the movements of Raghoba and his proposed meeting with Govindrao Gaikwad 103, and asks for reinforcements 104; 105; blames Naro Anandrao for his dilatory movements 109; asks Naro Anandrao to advance upon Baroda 116; 118; 119; 121; exasperated with Naro Anandrao 122; 123; 125; reports the battle of the Mahi 126; 131; 136; 140; joins Haripant Phadke 143; 147; 150; 173; 182; 189; 200; 224; meeting with Raghoba 230; 244; 245; opens negotiations with Raghoba 247; reconciled to Govindrao 251; 255; goes over to Raghoba's side 256, 257; his dubious attitude 258; 266; establishes amicable relations with the English 268; seeks terms from Raghoba 269; 285; 298; discussion about the division of his Jahgeer 317; joins hands with the English 387; his gains by the new alliance 393.

G

**Gabaji Ballal**—85, 103, 104, 116.

**Gambier, Mr.,** Chief of the Broach factory—pays a visit to Raghoba 160; 327.

**Ganesh Hari**—134; writes about disturbances in the Pargana of Amod 288.

G—*contd.*

**Ganeshpant Behere**—his proposal to check the advance of the English approved 333; 344; defeats Keso Krishna 371; learns of English reverses all round 401.
**Ganeshpant Pethe**—209; 299.
**Ganesh Vithal**—captured in the battle of the Mahi 158.
**Gangabai,** wife of Narayanrao Peshwa—removed to Purandar for safety 32; 33.
**Gangadhar Ballal**—272.
**Gangadhar Bhanu**—407.
**Gangadhar Dikshit Patankar**—persuades Govindrao Gaikwad to give up Raghoba's cause 289, 296, 297.
**Gangadhar Govind**—313, 315
**Gangadhar Mujumdar**—135.
**Gangadhar Raghunath**—107.
**Gangadharrao Rastia**—despatched to reinforce Naro Anandrao 187, 192, 193, 194, 199, 201, 214, 215, 241, 243, 265, 303.
**Ghulam Said Khan**—7.
**Girma Malhar Bokil**—397.
**Goddard**—358; 384; begins to treat Raghoba contemptuously 387, 388; 391; wins over Fatesing and attacks Ahmedabad 393; his differences with Raghoba 400; 401; suffers a reverse at Bassein 403.
**Gopal Naik Tambvekar**—65, 66, 68; 78; 80; 81.
**Gopalrao Keshav**—15.
**Gopikabai**—Mother of Narayanrao Peshwa—declines to interfere in political matters 53.
**Govind Hari**—asked to confiscate saranjams of Dada's partisans 52.
**Govind Raghunath**—106; makes good his escape from Surat 107.
**Govindrao Gaikwad**—62; declares in favour of the Barbhais while secretly negotiating with the opposite party 69; 75; 86; ravaging the country round Nadiad 94; asks his supporters to check the advance of the Poona army 96; meeting with Raghoba 103; 105; 106; 108; 110; his combination with Raghoba feared 112, 118, 113; 119;

G—*concld.*

**Govindrao Gaikwad**—contd.
122; 123; 125; joins Raghoba and opposes the Poona troops near Vankaner 126; meeting with Raghoba 127; joins Raghoba 131, 140, 143; 147; 148, 158, 159; tries to settle matters with Haripant Phadke 162, 165; 166; 169; 173; 176; 184; invited by Raghoba to rejoin at Cambay 185; 189; 192, 193, 194; deceives Haripant and openly walks into the arms of Raghoba 196, 197, 199, 201; fights on the side of Raghoba in the battle of Kheda 202; loses his colours to Haripant Phadke 205, 211, 213; reconciled to his brother, Fatesing 251; 255; withdraws from his former allies 257; 258; 259; 268; 287; persuaded to give up Raghoba's cause 289, 296, attacks Raghoba's force besieging Ahmedabad and brings it to submission 297; relieves Ahmedabad 298, 299, 307; a division of his Jahgeer discussed 317; 378; 379, 380.
**Govindrao Mankar**—414.
**Govindrao Sadashiv**—242, 243, 247, 248.
**Govind Vasudeo**—78; 80; 85; 86; 94; 104; 173.
**Govind Yashwant**—407.
**Guljarkhan**—ordered to be punished for his rebellious activities 44-A.

H

**Haidar Naik**—7; 62; 84; 141; 146; strengthens his position in the south in the midst of Maratha dissensions 283; urged by Raghoba to march upon Miraj 305, 390; 319; begins to doubt success of the cause of Raghoba and refuses help to his agents 332; 346; 385; gains several successes over the English in the Karnatak 401; 419.
**Haju Mehta**—85.
**Hanmantrao**—Raghoba's agent, sent to England to secure support to his master's cause 412; 419.
**Hanmantrao Atole**—his Saranjam confiscated for siding with Raghoba 52.

H—*contd.*

**Hari Ballal Phadke**—disturbances in his Mamlat 15; learns of Sabaji's favourable attitude towards the cause of the Barbhais 33; 39; 44; 45; 49; 56; entertained by Ahalyabai at Maheshwar on his way south 60; 63; prevents Mudhoji from joining Raghoba 64; suspects Raghoba's intentions and asks Naro Anandrao to move on 67, 68; 70; 72; gets a report of the strength of the joint army of Raghoba and his ally the English 74; 79; starts in pursuit of Raghoba 93, 103, 108; his arrival near Dhar reported 109; pursuing Raghoba 112, 113, 114, 116, 118, 121, drawing near Baroda 122, 123, 125, 127, 128, 131, 138; skirmishes with Raghoba's troops 143; crosses the Mahi and routs Raghoba's force 126, 148; 150; his difficulties 154; 156; 157; reports the battle of the Mahi 158; asks Naro Anandrao to watch closely the activities of Raghoba at Surat 159; 160; 161; informs that the Gaikwads were seeking an understanding 162, 165; 164; asks Naro Anandrao to elicit definite terms from Raghoba 165; 167; 169; 170; 171; inquires about Raghoba's movements and the strength of his new force 176; asks Naro Anandrao not to relax the blockade 177; his financial and other difficulties 177, 178, 179; takes up a strategic position on the Sabarmati near Dholka so as to prevent the combination of Raghoba's new levies and his old scattered force 182, 185, 186; reinforces Naro Anandrao 188; reports the advance of Raghoba and asks Naro Anandrao not to quit his post 189; reports the recovery of Jambusar and attempts to bring over Govindrao Gaikwad 192, 193, 194; 195; writes about the coming contest 196; sorely dissappointed with the deceitful conduct of Govindrao Gaikwad 197; begins skirmishing with Raghoba's troops 199, 200, 201, reports the battle of Kaira 202, encamped at Kaira 203, 204, congratulated on his success at Kaira 205; 208; hovering round the forces of Raghoba and his ally the English



H—*concld.*

**Hari Ballal Phadke**—contd. 209, 209-A, 211, 212, 213; reports his success at Napad 218; 220; closely pursues Raghoba 221, 222, 223; 224; 228, encamped at the Bawapir ford 228, 229; surprised by Raghoba while fording the Bawapir crossing and totally defeated 230; prepares to retire to the south 231, 233, 234; anxious to secure news of the enemy's movements 237; 239; his march south 240; sends a contingent to capture Muhammad Isaf 241, 242, 243, 246; 249; 255; 256; doubts the sincerity of Fatesing 258; reports the defeat of Muhammad Isaf 263; sends Dasara costumes 265; reports the details of the capture of Isaf 267; 268; learns of Fatesing Gaikwad having capitulated 269; 270; 271; 274; 275; 276, 277; 279; 285; 288; 289; is informed that Govindrao Gaikwad has been brought over 296, 297; 303; 307; 322; Raghoba's testimony of his character 325; 336; 339; 344; his meeting with Raghoba 423.

**Hari Bhide**—76A; 148; 155; punished with death for his supposed treachery 218, 223.

**Hari Umaji**—reports Raghoba carrying secret negotiations with Govindrao Gaikwad and the attitude of the latter 69; 86; reports his meeting with Raghoba 113; 115; 125; 287.

**Harji Naik**—413.

**Hastings, Warren**—387, 388; offered a bribe by Raghoba to secure him in his favour 391; 393.

**Hiroji Atole**—183.

**Hornby**—Governor of Bombay—384; Raghoba requests him to be liberally supplied with funds 400;

I

**Ismailkhan** of Ellichpur—8; 63; 64; 70; murdered 221, 225; 385.

J

**Jagannath Narayan**—57; 60.

**Jagannathpant**—9.

J—*contd.*

**Janardan Anant**—266; 267; 269.

**Janardan Ram Thosar**—72.

**Janardan Rayaji**—Fatesing Gaikwad's Sardar—66; 73; 78; 80; 85; 86; 94; 103; 104; 105; 119; 193; 249; 256.

**Janrao Dhulap**—Commander of the Maratha navy—seeks orders to send an expedition south 6; 84; defeats supporters of the Pretender 315; reports how he relieved Sindhudurg 422.

**Jayawantrao**—Wounded 227.

**Jiwaji Mahadeo**—Raghoba's agent to the English at Bombay 384, 400.

**Jiwaji Raghunath**—30; 39.

K

**Kakoba Parabhu**—166.

**Kashiba Holkar**—370.

**Keating, Col.**—preparing for the campaign 257; 326;

**Kedarji Ghorpade**—son of Maloji—15.

**Keshavrao Ballal**—his wife's strict imprisonment 149.

**Keso Govind**—155.

**Keso Krishna Datar**—Raghoba's adherent 370; defeated and flies towards Surat 371.

**Keso Mahadeo**—138.

**Keso Narayan**—reports Raghoba's arrival at Surat 151; 219, 220.

**Khanderao Gaikwad**—tries to effect conciliation between the Gaikwad brothers—Fatesing and Govindrao 147; 148, 158, 159; 162; 165; 169, 176; encamped on Kadi 186; 196; 197; promises to come over to Haripant Phadke's side 199; joins Haripant 201, 205; 230; 244; 246; 255; 258; brings over Govindrao Gaikwad to the side of the Barbhais 289, 296, 297; besieged at Ahmedabad 379; 394.

K—*contd.*

**Khanderao Pawar**—257; 333.

**Khanderao Trimbak**—333; called upon to pay his share of the contribution for paying off Raghoba's debts 373.

**Khando Awji**—Govindrao Gaikwad's adviser 69; 162; comes with peace proposals from Govindrao 176, 177, 182, 185, 189; 192, 193, 194, 197, 201; 297; 317.

**Khandoji Bhonsle**—captures Dhekanal 386.

**Kharagsing**—207.

**Kolhapur, Prince of**—attacks Ichalkaranji 321.

**Koner Raghunath**—advises Naro Anandrao to surprise Surat instead of pursuing Daulat Baburao any further 76; reports the rumour of the capture of Salsette by the English 110; reports Raghoba's departure from Surat 166.

**Konherrao Patwardhan**—218.

**Konher Zimdev**—239.

**Krishnaji Anant**—376.

**Krishnaji Jiwaji Pawar**—333.

**Krishnaji Narayan**—379, 380,

**Krishnaji Ram**—370.

**Krishnarao Kale**—advises Nana to accept the terms demanded by Raghoba 49; 372.

**Krishnarao Narayan Joshi**—reports the favourable attitude of Sabaji Bhonsle 17, 22, 23; 25; 27; 31; 33; 37; 38.

**Kukaji Shivaram**—Raghoba's agent sent with terms of surrender to Naro Anandrao 165; goes to meet Sakharam Bapu with peace proposals 170; 177; taken prisoner in the battle of Kaira 202, 205, 211.

**Kusaji Sindia**—103; 162; 258.

L

**Lakshman Govind**—262.

**Lakshman Narsi Kulkarni**—his family confined for partisanship with Raghoba 235.

**Lakshman Natu**—Raghoba's agent despatched to Broach to secure support of the English 143; 268; 307.

**Lakshmanpant**—267, 269.

L—*contd.*

**Lakshman Raghunath**—232.
**Lala Kayastha**—146.
**Lalji Patil**—85 ; 86 ; 94 ; 289.
**Lubin, St.**—French envoy—visiting the Poona Court 328.

M

**Madhavrao Ballal**—33.
**Madhavrao Bande**—defeated and seeks shelter among hills 140.
**Madhavrao Belose**—272 ; 343.
**Madhavrao Bhaskar**—283.
**Madhavrao Jadhavrai**—294.
**Madhavrao Narayan Peshwa**—congratulated on receiving the ministerial robes 55 ; 57 ; 62.
**Madhavrao Nilkanth**—208.
**Madhav Shet** of Amod—complains against the extortion of the English 157, 161.
**Mahadajipant Guruji**—50.
**Mahadaji Ramchandra**—reports how detrimental it would be to let the English administer Jambusar to recover their money 327.
**Mahadaji Vishvanath**—91.
**Mahadji Sindia**—reported to have joined the Barbhais 32 ; terms he proposed to conciliate Raghoba 48 ; 49 ; reports he has opened negotiations with Dadasaheb 50 ; persuades Dada to return to Poona 51 ; his vacillating attitude towards the Barbhais 58 ; a clash with Manaji Fakde's troops 59 ; 60 ; 63 ; accompanying Raghoba 67, 68, 69 ; his efforts towards conciliation fail and starts in pursuit of Raghoba 93, 103, 108, 112, 113, 118, 123, 125, 128 ; 130 ; 131 ; visits Dakor 177 ; 182 ; 185 ; 196 ; 227 ; 251 ; Raghoba attempts to wean him off from the Barbhais 257 ; 263 ; 280 ; watching the peace talks at Purandar 290 ; 310 ; informs Nana of the capture of the Pretender 314 ; 325 ; asked to assist Bajipant in the expedition against Kolhapur 329 ; 339 ; supports Bhivrao

M—*contd.*

**Mahadji Sindia**—contd.
Panse in the expedition against the Pretender 342 ; 347 ; 352 ; 375 ; descends into Khandesh 393 ; 397 ; 399 ; defeats an English army at Kularas 401 ; 403 ; peace-parleys opened with him by the English 411 ; mediates the final treaty 417 ; suggestion about granting a jagir to Anderson 424 ; 425 ; 427.
**Maharao Jaswant Nimbalkar**—15.
**Mahipatrao Kavde**—178.
**Mahipatrao Narsi Dhaygude**—takes reinforcements to Naro Anandrao 124, 126.
**Makaji Gite**—370.
**Makaji Lambhate**—Holkar's Sardar 370.
**Malba Bapu**—193 ; fails to prevent the combination of the Gaikwad's force with that of Raghoba 197 ; 231, 233, 234, 242, 243 ; 247 ; 248 ; 263.
**Malhar Bhagwant**—306.
**Malhar Jagjivan**—240 ; 303.
**Malharrao Gaikwad**—103.
**Malhar Yeshwantrao**—91.
**Maloji Ghorpade**—15 ; advises Raghoba t fly for his life 20 ; wounded 227 ; 230.
**Malsikare**—promised amnesty and good trea ment for deserting the Barbhais 300.
**Manaji Fakde**—a clash with Mahadji Sindi troops 59 ; 64 ; 74 ; 138 ; wounded in t battle of the Mahi 148, 158 ; 332 ; Mokasa villages transferred 340 ; 380 ; 3 advances from the South 403.
**Manaji Gaikwad**—74.
**Manaji Naik**—269.
**Manohar Bhivrao**—declares his allegi to the Peshwa and is restored to favour
**Mansingrao Mohite**—63 ; 70.
**Manwar Parshi**—Raghoba's agent sent England 412, 419, 420.
**Moroba Dada Fadnis**—341 ; 385.
**Moro Bapuji**—326.
**Moro Govind**—45.
**Moro Govind Tikhe**—273.
**Mostyn, Thomas**—326.

M—*contd.*

**Mudhoji Bhonsle**—seeks to compose differences with the Nizam 5, 8, 9, 10; his rear plundered by Nizam Ali 21; 24; 45; agrees to give up Raghoba's cause 60; 62; foiled in the attempt to join Dada's troops and marches upon Nagpur 64; defeats a force under Sabaji and plunders Ellichpur and Chanda 70; 102; plundering the Nizam's territory 127; despatches Sabaji 159; put hard in defending himself 165; 177; 185; 218; promises not to support Raghoba 221, 222; settles his dispute with the Nizam 225; retires to Nagpur 236; 252; 263; sends a detachment in search of Muhammad Isaf 267; 273; 423.

**Muhammad Ali Khan**—319.

**Muhammad Gaus Khan**—7.

**Muhammad Isaf**—his insolent conduct 11; guards Raghoba's camp against surprise 20; honour conferred on him 21; dismissed from Bhonsle's service 60, 236; 63; foiled in the attempt to join Dada's troops and marches upon Nagpur 64, 70; wounded 159; being tracked down 241, 242, 243, 247, 248, 249, 251; overtaken and defeated 260, 261; captured after a hot chase 267; 270.

**Muhammad Kabir Khan**—7.

**Murarrao Ghorpade**—prevents an open rupture between Raghoba and the rebel leaders 21; helplessly watches the aggressions of Haidar 283; 319.

N

**Nanko Krishna**—273.

**Narayan Vithal Dhume**—Portuguese envoy at Poona—407.

**Naro Anandrao Keskar**—despatched to Gujarat to assist Fatesing as against Govindrao Gaikwad 46; leaves for Gujarat 65, 66; asked to move expeditiously 67, 68, 70, 73; advised to surprise Surat instead of pursuing Daulat Baburao further 76; 79; requested by Gaikwad to relieve him 78; asked not to delay the reduction of Narottam of Hasot 80; asked to cross to the North of

N—*contd.*

**Naro Anandrao Keskar**—contd.

Narbada and thus anticipate Govindrao Gaikwad 81; asked to enforce a strict blockade of Surat to checkmate the English 82, 83, 85, advised by Fatesing to march to his assistance leaving the blockade of Surat to a small force 85, 86; complimented on the capture of Narottam of Hasot 87, 88; 89; instructed to confiscate the share of the English in the revenue of the district of Broach 90; 93; Fatesing repeats his appeal for help 94, 103, 104, 105; moving towards the Narbada 106; asked to watch the movements of Raghoba and continue the blockade of Surat 108; 109; 110; learns of the capture of Salsette by the English and is urged to continue the blockade 111, 112, gets news from Raghoba's camp with a warning not to trust his fair promises 113; instructed to send Narottam Kishor a prisoner to the fort of Trimbak 114; 115; asked by Fatesing Gaikwad to advance upon Baroda 116; asked to use his discretion in case of a coalition between Raghoba and Govindrao 118; 119; 120; instructed to unite forces with those of Haripant Phadke 121; 122; asked to close the ports of Surat and Broach 123; receives reinforcements from Haripant Phadke 124; 125; 129; 131; the necessity of blockading Surat urged on him 133, 134; 142; 145; 150; marching to Surat 153; 157; asked to watch closely the activities of Raghoba at Surat 159, and close the port 160, 162, 164; receives instructions as to how he should treat with Raghoba 165; 167; a skirmish with Raghoba's party from Surat 169, 170; 246; charged with the administration of Gujarat 173; 174; reports an unsuccessful attempt of the enemy to surprise him and is asked not to relax the blockade 177; 179; 181; fears his shaky position and appeals for reinforcements 182; reports the terms of the alliance between Raghoba and the English 185; 186; reports the growing menace of the English repeating his demand for

L—*contd.*

**Lakshman Raghunath**—232.
**Lala Kayastha**—146.
**Lalji Patil**—85 ; 86 ; 94 ; 289.
**Lubin, St.**—French envoy—visiting the Poona Court 328.

M

**Madhavrao Ballal**—33.
**Madhavrao Bande**—defeated and seeks shelter among hills 140.
**Madhavrao Belose**—272 ; 343.
**Madhavrao Bhaskar**—283.
**Madhavrao Jadhavrai**—294.
**Madhavrao Narayan Peshwa**—congratulated on receiving the ministerial robes 55 ; 57 ; 62.
**Madhavrao Nilkanth**—208.
**Madhav Shet** of Amod—complains against the extortion of the English 157, 161.
**Mahadajipant Guruji**—50.
**Mahadaji Ramchandra**—reports how detrimental it would be to let the English administer Jambusar to recover their money 327.
**Mahadaji Vishvanath**—91.
**Mahadji Sindia**—reported to have joined the Barbhais 32 ; terms he proposed to conciliate Raghoba 48 ; 49 ; reports he has opened negotiations with Dadasaheb 50 ; persuades Dada to return to Poona 51 ; his vacillating attitude towards the Barbhais 58 ; a clash with Manaji Fakde's troops 59 ; 60 ; 63 ; accompanying Raghoba 67, 68, 69 ; his efforts towards conciliation fail and starts in pursuit of Raghoba 93, 103, 108, 112, 113, 118, 123, 125, 128 ; 130 ; 131 ; visits Dakor 177 ; 182 ; 185 ; 196 ; 227 ; 251 ; Raghoba attempts to wean him off from the Barbhais 257 ; 263 ; 280 ; watching the peace talks at Purandar 290 ; 310 ; informs Nana of the capture of the Pretender 314 ; 325 ; asked to assist Bajipant in the expedition against Kolhapur 329 ; 339 ; supports Bhivrao

M—*contd.*

**Mahadji Sindia**—contd.
Panse in the expedition against the Pretender 342 ; 347 ; 352 ; 375 ; descends into Khandesh 393 ; 397 ; 399 ; defeats an English army at Kularas 401 ; 403 ; peace-parleys opened with him by the English 411 ; mediates the final treaty 417 ; suggestion about granting a jagir to Anderson 424 ; 425 ; 427.
**Maharao Jaswant Nimbalkar**—15.
**Mahipatrao Kavde**—178.
**Mahipatrao Narsi Dhaygude**—takes reinforcements to Naro Anandrao 124, 126.
**Makaji Gite**—370.
**Makaji Lambhate**—Holkar's Sardar 370.
**Malba Bapu**—193 ; fails to prevent the combination of the Gaikwad's force with that of Raghoba 197 ; 231, 233, 234, 242, 243 ; 247 ; 248 ; 263.
**Malhar Bhagwant**—306.
**Malhar Jagjivan**—240 ; 303.
**Malharrao Gaikwad**—103.
**Malhar Yeshwantrao**—91.
**Maloji Ghorpade**—15 ; advises Raghoba to fly for his life 20 ; wounded 227 ; 230.
**Malsikare**—promised amnesty and good treatment for deserting the Barbhais 300.
**Manaji Fakde**—a clash with Mahadji Sindia's troops 59 ; 64 ; 74 ; 138 ; wounded in the battle of the Mahi 148, 158 ; 332 ; his Mokasa villages transferred 340 ; 380 ; 381. advances from the South 403.
**Manaji Gaikwad**—74.
**Manaji Naik**—269.
**Manohar Bhivrao**—declares his allegiance to the Peshwa and is restored to favour 184.
**Mansingrao Mohite**—63 ; 70.
**Manwar Parshi**—Raghoba's agent sent to England 412, 419, 420.
**Moroba Dada Fadnis**—341 ; 385.
**Moro Bapuji**—326.
**Moro Govind**—45.
**Moro Govind Tikhe**—273.
**Mostyn, Thomas**—326.

M—*contd.*

**Mudhoji Bhonsle**—seeks to compose differences with the Nizam 5, 8, 9, 10; his rear plundered by Nizam Ali 21; 24; 45; agrees to give up Raghoba's cause 60; 62; foiled in the attempt to join Dada's troops and marches upon Nagpur 64; defeats a force under Sabaji and plunders Ellichpur and Chanda 70; 102; plundering the Nizam's territory 127; despatches Sabaji 159; put hard in defending himself 165; 177; 185; 218; promises not to support Raghoba 221, 222; settles his dispute with the Nizam 225; retires to Nagpur 236; 252; 263; sends a detachment in search of Muhammad Isaf 267; 273; 423.

**Muhammad Ali Khan**—319.

**Muhammad Gaus Khan**—7.

**Muhammad Isaf**—his insolent conduct 11; guards Raghoba's camp against surprise 20; honour conferred on him 21; dismissed from Bhonsle's service 60, 236; 63; foiled in the attempt to join Dada's troops and marches upon Nagpur 64, 70; wounded 159; being tracked down 241, 242, 243, 247, 248, 249, 251; overtaken and defeated 260, 261; captured after a hot chase 267; 270.

**Muhammad Kabir Khan**—7.

**Murarrao Ghorpade**—prevents an open rupture between Raghoba and the rebel leaders 21; helplessly watches the aggressions of Haidar 283; 319.

N

**Nanko Krishna**—273.

**Narayan Vithal Dhume**—Portuguese envoy at Poona—407.

**Naro Anandrao Keskar**—despatched to Gujarat to assist Fatesing as against Govindrao Gaikwad 46; leaves for Gujarat 65, 66; asked to move expeditiously 67, 68, 70, 73; advised to surprise Surat instead of pursuing Daulat Baburao further 76; 79; requested by Gaikwad to relieve him 78; asked not to delay the reduction of Narottam of Hasot 80; asked to cross to the North of

N—*contd.*

**Naro Anandrao Keskar**—contd.

Narbada and thus anticipate Govindrao Gaikwad 81; asked to enforce a strict blockade of Surat to checkmate the English 82, 83, 85, advised by Fatesing to march to his assistance leaving the blockade of Surat to a small force 85, 86; complimented on the capture of Narottam of Hasot 87, 88; 89; instructed to confiscate the share of the English in the revenue of the district of Broach 90; 93; Fatesing repeats his appeal for help 94, 103, 104, 105; moving towards the Narbada 106; asked to watch the movements of Raghoba and continue the blockade of Surat 108; 109; 110; learns of the capture of Salsette by the English and is urged to continue the blockade 111, 112, gets news from Raghoba's camp with a warning not to trust his fair promises 113; instructed to send Narottam Kishor a prisoner to the fort of Trimbak 114; 115; asked by Fatesing Gaikwad to advance upon Baroda 116; asked to use his discretion in case of a coalition between Raghoba and Govindrao 118; 119; 120; instructed to unite forces with those of Haripant Phadke 121; 122; asked to close the ports of Surat and Broach 123; receives reinforcements from Haripant Phadke 124; 125; 129; 131; the necessity of blockading Surat urged on him 133, 134; 142; 145; 150; marching to Surat 153; 157; asked to watch closely the activities of Raghoba at Surat 159, and close the port 160, 162, 164; receives instructions as to how he should treat with Raghoba 165; 167; a skirmish with Raghoba's party from Surat 169, 170; 246; charged with the administration of Gujarat 173; 174; reports an unsuccessful attempt of the enemy to surprise him and is asked not to relax the blockade 177; 179; 181; fears his shaky position and appeals for reinforcements 182; reports the terms of the alliance between Raghoba and the English 185; 186; reports the growing menace of the English repeating his demand for

N—*contd.*

**Naro Anandrao Keskar**—concld. reinforcements 188; learns of the recovery of Jambusar 190, 191, 192; plunders a party of the enemy's troops carrying succour to Olpad 193; learns that reinforcements have been sent 195; learns that the two armies are drawing near 196; asked to harass the English 197; 198; learns about the skirmishes on the Sabarmati between the two armies 199; 200; learns of the defeat of Raghoba near Kaira 202; 208; warned against a surprise 212; 213; asked to keep the Bawapir pass safe for communication 214, 215, 220; prepares to leave for the south 222; reports having cleared up the Bawapir ford 228; asked to capture Songad 231, 233, 234; 237; 240; 241; blamed for not remaining at his post 242, 243; asked to watch the movements of Fatesing Gaikwad 244; 247, 248, 249; 250; 253; explains why he left the vicinity of Surat 256; 259; learns of the defeat of Isaf 260, 261; requested to open the roads for merchants and their merchandise 262; 274; 275; 276; 277; 278; 286; 288; 303; 307; 309; 389.

**Naro Appaji**—20; congratulates Trimbakrao Pethe for composing the differences between Daryabai and Sabaji and bringing them over to the side of the Barbhais 24; asked to chastise Guljar Khan 44A; 59; 61; recounts the overwhelming troubles resulting from Raghoba's protracted affair 84; his death 181.

**Naro Ballal Bhuskute**—reports the help he rendered in the capture of Muhammad Isaf 270.

**Naro Ganesh**—intercepts papers from Raghoba to Govindrao Gaikwad and forwards them to Poona 98; 142; 145; repudiates the charge of harassing the ryots of Vasrai province 172; 175; 181; reports the recovery of Jambusar and the precipitate retreat of Mr. Perrott 190, 191; reports the whereabouts of the two armies 203, 204, 206; warns Naro Anandrao against a surprise

N—*contd.*

**Naro Ganesh**—contd. from the enemy 212; 216, 217, 219, 220; appointed Diwan to Holkar 368, 369; 389.

**Naro Ganesh Vadadekar**—95.

**Naro Krishna Darve**—supporter of Raghunathrao—holds Asher against the Barbhais 16; makes arrangements for the safe journey of Col. Upton 281.

**Naro Lakshman**—262.

**Naro Mahadeo Gajre**—114.

**Naro Shankar**—excuses himself for not actively participating in the league of the Barbhais 14; 41.

**Naro Shivdeo**—290; 325.

**Narottam Kishordas** of Hasot—42; 44; orders issued for his chastisement 76, becomes a cause of anxiety to the Poona Government 80, 83, force despatched against him 85; captured 87, 88, 101, 111; being sent to the Fort of Trimbak 112, 114; closely confined in the fort of Mahuli 117; 123; 139; 140; appropriates the revenue of Surat on the strength of a sanad from Raghoba 278.

**Naro Tukdeo**—293.

**Narsingrao Dhaygude**—26, 28; 29; 30; 35; request for releasing his villages 337.

**Narsingrao Govind**—147.

**Narsinh Shripat**—375.

**Nasrat Khan**—297.

**Netoji Jagtap**—family confined for partisanship of Raghoba 235.

**Nilkanth Gopal**—10.

**Nizam**, the—5; seeks counsel with his advisers as to the policy to be adopted towards Raghoba 7; differences with Bhonsle 8; 9; 10; 21; decides to support the Barbhais 28, 30, 34; 35; encamped at Balapur 60; meeting with the Barbhais at Aurangabad 85, 93; 156; rallies the broken army of Sabaji Bhonsle and sends it against Mudhoji 159; 165; marches upon Chanda 185; 218; assures the Poona Government of his support 221, 222; his dispute with Mudhoji Bhonsle settled 225; 236; 249, 252; encamping at Aurangabad 263; 385.

N—*concld.*

**Noronha, Monsr.**— (मुसा नारज) 310, 334, 347; 404.

**Nur Naroji**—a trader—262.

P

**Padaji Shelke**—130.

**Parashuram Bhau Patwardhan**—333; intercedes in behalf of Narsingrao Dhaygude 337.

**Parvatibai**– wife of Sadashivrao Bhau—removed to Purandar 32; 209A.

**Parvatsing** of Bansda—recommended to the Gadi of the State in a dispute of succession 295.

**Patangshah** of Jawhar—asks for reinforcements to defend Jawhar against Raghoba 309.

**Perrott, Mr.**—137; loses Jambusar and beats a precipitate retreat 190, 191.

**Portuguese,** the—6; detain Maratha vessels visiting Goa 407; forced to withdraw from Sindhudurg 422.

**Pratinidhi**—351.

**Pretender,** the, of Sadashivrao Bhau—defeated below the Borghat 311, 312; creates trouble in the Konkan 313; captured 314; 324; troops being rushed for his chastisement 334; penance inflicted on those who joined him 335.

**Punjaji Vaghela** of Rajpipla—helping Raghoba 172; 203; 212; 214, 215; driven back 228.

**Purushottam Krishna**—53.

R

**Rajaram Dinkar**—Raghoba's agent sent to the Governor General at Calcutta 387, 388, 391, 393.

**Rajaram Govind**—293.

**Rajaram Khanderao**—sends a secret report of the strength of Raghoba's forces 74; reports the safe despatch of Narottam Kishor and the fall of Salsette 139; 163.

R—*contd.*

**Raghoji Angria**—55; 92; captures the Pretender while flying to Bombay 314; enforces Peshwa's orders regarding closure of trade with Bombay 416.

**Ragho Keshav**—293.

**Raghopant Aitole**—16; 340; 404.

**Raghuji Bhonsle,** son of Mudhoji Bhonsle—11.

**Raghunath Bajirao** alias **Dadasaheb**—1; tries to win over the Nizam 5; 8; 9; 10; 12; suspects treachery and seeks resort in the fort of Gooty 13, 20; 15; directs an attack on the rebels 21; returning from the Karnatak 36; 40; retracts his steps to Pandharpur and takes Trimbakrao by surprise 41; states his terms 48; 49; flies to Malwa and talks with Sindia and Holkar 50; persuaded to return to Poona 51; 57; 59; 63; his vacillating attitude commented upon 67, 68; makes secret overtures to Govindrao Gaikwad 69; 70; 71; 72; encamped at Kadod 74, 75; supports Narottam of Hasot 77; 84; arrives at Betawad 85; takes fright and flies 93; 97A; his communication to Govindrao Gaikwad intercepted 98; his movements from Champaner and the proposed meeting with Govindrao reported 103; encamped near Baroda 104; tries to seduce Fatesing Gaikwad 105; 106; sends his agents to Surat 107; being pursued by the forces of the Poona Government 108, 110, 112, 113, 114; 116; 117; 118; marches away from Baroda 122; 123; 125; wins over Govindrao Gaikwad 127, 131; flying 132; his movements near the Mahi 136; 138; 139; 140; 141; retreats towards the Mahi on the approach of Haripant Phadke 143; engaged by the Poona forces and is defeated 126, 148, 158; his arrival at Surat reported 151; his flight from Mahi to Surat by the route of Cambay and Bhavnagar reported 152; 154; 156; his activities at Surat being watched 159; visited by Gambier 160; 162; sends a proposal of surrender 165; leaves Surat 166; sails for Cambay 174, 246;

R—*contd.*

**Raghunath Bajirao** alias **Dadasaheb**—contd.
prepares for another trial of arms 176, 177, 182, 185, 186; advances from Cambay 189; joined by his former associates 197; opens fire on Phadke's troops 199; 200, 201, suffers a reverse near Nadiad 202, 211, encamped at Nadiad 203, 204; 209; reported to be falling back on Surat for the monsoon 209A; 212; 213; defeated at Napad 218; 220; retiring upon Broach 221, 222, 223, 227, 228, his movements being closely followed 229; surprises Haripant Phadke at the Bawapir pass and routs his army 230; 238; 239; advances upon Ankaleshwar 241; 244; makes overtures to Fatesing 245; summons Baroda to surrender 247; sends envoys to Sindia and Holkar 251; 254; courting the alliance of the English 255; concludes a treaty with the English 257; 268; attacks Baroda and brings Fatesing to terms 269; 279; instigating Haidar to create trouble in the south 283; 284; 285; 287; fails to prevent the defection of Govindrao Gaikwad 289; makes inquiries about his son's birth time and also about his adherents 293; 296; a detachment of his army besieging Ahmedabad made to retire 297; 300; his secret correspondence closely watched 301; 304; urges Haidar to attack Maratha territory in the south 305; landed in a fix owing to the peace-parleys at Purandar 307; threatens Jawhar 309; 318; 322; his high regard for Haripant Phadke 325; 336; 341; 343; tries to negotiate a peace 346; marches on Poona 347; provision made to meet his expenditure after his surrender at Talegaon 357; 358; contribution raised to pay off his debts 373; his spies disappear from their custody 376; 378, 379, 380, 381, 383; 384; advised to speed up matters 385; complains about being slighted by Goddard 387, 388, 393, asks his agent with Haidar to urge him to foment trouble on the southern frontier 390; offers Warren Hastings a bribe of 50 lakhs to secure him in his favour 391;



R—*contd.*

**Raghunath Bajirao** alias **Dadasaheb**—concld.
complains to Hornby he is not receiving cordial support from Goddard 400; 401; a reply to his memorial from England 412; states terms of surrender 418; requests for an assignment of districts away from his enemies 419; 420; his final surrender 423; 427.

**Rajo Tamaji**—283.

**Ramchandra Ganesh**—330.

**Ramchandra Naik Paranjpe**—principal supporter of the Pretender—serious condition of his wife 316.

**Ramchandra Narayan**—Raghoba's agent—sent to Surat to sell off jewelry 143.

**Ramchandra Pawar**—61; 277; 333.

**Ramchandra Vithal**—family confined for his secure partisanship of Dadasaheb 91.

**Ramdas Vithaldas**—Raghoba's banker—185, 198.

**Ram Parabhu**—313.

**Ram Raja**—anxiety of the Barbhais for his possession 16; 57.

**Ramsey, Mr.**—327.

**Rana Bhagwantsing**—96; 97.

**Ranchod Krishna Sanjgiri**—suggests Nana to make costly presents to the Bombay Councillors to suggest their good-will 54.

**Ranekhan**—314.

**Rangrao Mahadeo**—293.

**Ranmal Bariya**—a friend and supporter of Parvatsing the claimant for the gadi of Bansda 295.

**Ravji Anant**—closes the passes into Gujarat 75; reports Raghoba's movements 133.

**Ruknuddaula**—5; 7; 8; 9; throws in his weight on the side of the Barbhais 27, 28, 29, 30, 34, 38, 39; 218, 225, put to death by Ismailkhan 218, 225, 227.

S

**Sabaji Bhonsle**—11; 15; allies himself wih the Barbhais 16; 17; 19; 23; his difference with Daryabai composed 24; 25; 32;

S—*contd.*

**Sabaji Bhonsle**—contd.
declares himself in favour of the Barbhais 33; 35; 37; reports the death of Trimbakrao Pethe 41; 63; mobilises troops to meet Mudhoji 64; killed in the hour of victory 159.

**Sadashiv Anant Karmarkar**—2; 3; asked to send news from the camp of Trimbakrao Pethe 4; 242, 243.

**Sadashiv Bhat Sintre**—made to undergo penance for having joined the Pretender 335.

**Sadashiv Raghunath**—279.

**Sadashiv Ramchandra Sukhatankar**—Raghoba's adherent—his relatives confined 76A; 113; wounded in the battle of the Mahi 148; 158, dissatisfied with Raghoba's conduct of affairs 257;

**Sakharam Bhagwant** alias **Bapu**—16; 18; 19; learns of the favourable attitude of Sabaji Bhonsle 22, 25; and of the Nizam 28, 29, 30, 34, 32; 33; 37; 38, 39; 40; his attempt conciliate Babuji Naik 43; 47; 59; leaves Purandar to meet Raghoba 67; learns that Raghoba is negotiating secretly with Govindrao 69; 93; 102; 119; 165, 250; learns of the secret negotiations carried on by Raghoba with Haidar 283; 287; negotiating with the English envoy 292; 299; 325; 343; 356; confined and property confiscated 385.

**Sakharam Hari Gupte**—74; his family confined 91; 113; 128; wounded in the battle of the Mahi 148; 158; 180; 185; fights in behalf of Raghoba in the battle of Kaira 202; dissatisfied with Raghoba's conduct of affairs 257; his mother released 306; 320.

**Sakharam Keshav**—a supporter of the Pretender—defeated and taken prisoner 315.

**Samsam-ud-daula**—7.

**Samsherkhan**—371.

**Satvoji Atole**—183.

**Satvoji Bhonsle**—138; despatched against Mudhoji Bhonsle 159; 400; 403.

**Satya Rathod**—295.

**Sayajirao Gaikwad**—98; 231; 248.

S—*concld.*

**Shahji Naik Nimbalkar**—killed at the Bawapir ford 230.

**Shahajkhan**—starts plundering in the name of Raghoba 44A.

**Shamrao Igal**—defeats Basalatjang and plunders his province 283.

**Shankaraji Keshav Phadke**—1.

**Shankaraji Khanderao**—ordered to confiscate Saranjams of Siledars fighting under Raghoba 62; 262; 267; released 271; 383.

**Shaw, Mr.**—139.

**Shivaji Vithal Vinchurkar**—41; 56; going to the succour of Salsette 131; 402.

**Shivbhat Khare**—12.

**Shriniwas Trimbak**—closely guards the Kondai Bari pass 279;

**Sidi of Janjira**—1.

**Sidoji Narsingrao Shitole Deshmukh**—reports Haripant Phadke's defeat at the Bawapir ford 230.

**Subhanji Atole**—his Saranjam confiscated for joining Raghoba 52.

**Subrao Burudkar**—310.

**Suja-ud-daula**—starts hostile operations as against the Marathas 84.

**Sukhanand Mehta**—96.

**Sultanji Nimbalkar**—15.

**Sumersing Gardi**—his insolent attitude 11; honours conferred on him 21.

**Surat—Nawab of**—77; 89; 107; fears to admit Raghoba in the City 160; 185; attempts to coax him 222; his unsteady attitude 228.

**Suryaji Bhavya**—a supporter of the Pretender—defeated and taken prisoner 315.

T

**Tahwarjang**—127; 385.

**Tajkhan Rohila**—seizes Muhammad Isaf 267.

**Tipu**—collecting with a high hand tribute in the Karnatak 283.

**Trimbak Dadaji**—Raghoba's agent to the Governor General at Calcutta 387, 388, 391, 393.

REFBK-0005115

T—*contd.*

**Trimbakrao Gaikwad**—a partisan of Govindrao Gaikwad—instructed to harass the enemy's forces, 96, 97 ; 267, 269.

**Trimbakrao Pethe** alias **Mama**—3 ; 4 ; 11 ; 14 ; 15 ; requisitions funds to pay his soldiery 16 ; 17 ; 23 ; brings about a reconciliation between Daryabai and Sabaji Bhonsle 23, 24 ; 25 ; 32 ; 33 ; 35 ; 37 ; 39 ; asked to proceed to Burhanpur 40 ; surprised by Raghoba and killed 41.

**Trimbak Suryaji**—132.

**Tukoji Holkar**—reported to have joined the Barbhais 32 ; terms he proposed to conciliate Raghoba 48 ; 49 ; meets Raghoba 50 ; persuades Raghoba to return to Poona 51 ; his vacillating attitude towards the Barbhais 58, 59 ; 63 ; accompanying Raghoba to the south 67, 68, 69 ; 93, 103, 108, 112, 113, 118, 123, 125, 128 ; 131 ; 136 ; takes leave of Haripant Phadke 242 ; 257 ; 263 ; watching peace talks at Purandar 290 ; 310 ; 339 ; instructed to reinforce Panse marching against the English 347 ; 352 ; 359 ; 365 ; Naro Ganesh appointed as his Diwan 368, 369, 387 ; descends into Gujarat 394 ; 399.

**Tulaji Angria**—his wife confined at the Visapur fort 377.

U

**Upton, Col.**—English envoy—proceeding to Poona 281 ; starts peace-talks 291, 292, 294 ; fails in the mission and goes back 325.

V

**Visaji Appaji Athavale**—330.

**Visaji Hari Bam**—family confined for partisanship of Raghoba 235.

**Visaji Keshav Lele**—44 ; advises Naro Anandrao to enforce a strict blockade of Surat 120 ; 129 ; 139 ; 163 ; 177 ; appointed Sarsubha of Konkan 221 ; 315 ; 322 ; 334 ; 346 ; 402 ; 406.

**Visaji Krishna Biniwale**—reported to have failed to succour Salsette 44 ; 83 ; 92 ; 129 ; makes inquiries about the general situation in Gujarat and requests Naro Anandrao to enforce the blockade of Surat 131 ; 139 ; encamping near Salsette 177 ; writes about the peace-talks at Purandar 292 ; reports his exertions for the defence of Bassein and recovery of Salsette 402.

**Vishvanath Narayan**—400.

**Vishvasrao Prabhu**—270.

**Vithal Ballal Subhedar**—63 ; 64 ; 264.

**Vithal Vishram**—283.

**Vithal Yashwantrao**—91.

W

**Walker, Capt.**—dies of a gun-wound 409.

**Wamanrao Patwardhan**—fails in his attempt to seize Raghoba 20 ; his clash with Raghoba 21 ; 32 ; 41 ; 155 ; sent towards Bhavnagar in pursuit of Raghoba 158, 159, 162, 165, 246 ; captures some elephants and horses belonging to Raghoba 169, 176 ; rejoins Haripant Phadke 177 ; 182 ; 189 ; posted on the Sabarmati ford 193 ; fails to prevent Gaikwad from joining Raghoba 197 ; sent in pursuit of Muhammad Isaf 241 ; 247 ; 248, 249 ; overtakes Isaf and forces him in the jungle fleeing for his life 260, 261.

**Watson**—reported to have been killed in the siege of Salsette 42.

**William James**—420.

Y

**Yashwantrao Mhaske**—kept in confinement at Fort Trimbak 338.

**Yeshwantrao Sindia**—47.

**Yesaji Ram**—prepares Dharwad to hold against Raghoba 36.

**Yesaji Sindia**—325, 330.

**Yesaji Shivdeo**—272 ; reprimanded for causing trouble at Arnala.

Z

**Zamsing**—63 ; 64 ; 70.



BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

(*Government do not assume any responsibility for the comments and views expressed by the editor.*)